





पेशवे

घराण्याचा इतिहास

प्रमोद ओक







पेशवे घराण्याचा इतिहास

[सोळाव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंत]

प्रमोद ओक

कॉन्टिनेन्टल

□

: प्रकाशक :
अनिरुद्ध अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
विजयानगर,
पुणे ४११ ०३०

*

: मुद्रक :
अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०

*

: आर्ट वर्क :
चित्रकार गजानन कुलकर्णी

*

प्रकाशन क्रमांक १०७८

*

पहिली आवृत्ती : मे १९८५

*

: दुसरी आवृत्ती :
सुधारून वाढवलेली
१९९१

*

*

मूल्य : एकशे चाळीस रुपये

□

दुसरी मुलाखत

अलीकडे इतिहास लेखनाची दिशा बदलत असल्याचे स्पष्ट जाणवत आहे. बदलत्या समाजजीवनाच्या पार्श्वभूमीवर विविध समाजघटकांच्या परस्परांतील संबंधांचा, अंतःप्रवाहांचा मागोवा घेऊन सामाजिक-सांस्कृतिक अंगांनी नव्या अन्वयार्थासह इतिहासाची फेरमांडणी करण्याचे प्रयत्न अलीकडच्या काळात विशेषत्वाने होताना दिसतात. या संदर्भात राजकीय इतिहासाच्या दृष्टिकोनातून केलेल्या विश्लेषणाइतकेच गतकालाचे सामाजिक मूल्यमापन देखील महत्त्वाचे असते हे विसरता कामा नये. इतिहासाच्या सामाजिक आशयाचे महत्त्व लक्षात घेऊन प्रस्तुत ग्रंथात महाराष्ट्राच्या पेशवेकालीन इतिहासाची मांडणी केली आहे.

महाराष्ट्राच्या उत्तर-मध्ययुगीन राजकीय व सामाजिक इतिहासाचा विचार केला तर असे दिसते की, शिवशाहीच्या अस्तानंतर मराठेशाहीच्या राजकारणाची दिशा बदलू लागली. थोरल्या शाहू महाराजांच्या कारकीर्दीत विविध सत्तागटांची, राजकीय समीकरणांची पुनर्मांडणी सुरू झाली. न्या. मू. महादेव गोविंद रानडे ह्यांनी या मांडणीचे वर्णन ' मराठा राजमंडळ ' असे केले आहे. या राजमंडळातील पेशव्यांचे स्थान आणि महत्त्व लक्षात घेऊन पेशवा-घराण्याच्या अनुषंगाने लेखन विषयाची मांडणी केली आहे.

घराण्याचा इतिहास लिहून त्याच्याच अनुषंगाने त्या त्या प्रदेशाच्या, देशाच्या समकालीन राजकीय-सामाजिक इतिहासाचा सूत्रबद्ध पद्धतीने आढावा घेणारी पुस्तके परदेशात उपलब्ध असतात. आपल्याकडे त्या मानाने कमी आढळतात. त्या पुस्तकांचे लेखन-तंत्र, प्रस्तुत ग्रंथाची आखणी करताना मी डोळ्यासमोर ठेवले आहे.

याच पद्धतीने सातारा, कोल्हापूर, येथील छत्रपतींची राजघराणी, ग्वाल्हेर, इंदूर, मिरज, बडोदा, इचलकरंजी, नागपूर, इत्यादी ठिकाणच्या मराठा-संघराज्यांतर्गत मराठी सत्ताकेंद्रांच्या कामगिरीचीही सामाजिक अंगाने मांडणी, तसेच पेशवाईच्या कालखंडाला आकार देणाऱ्या प्रमुख घराण्यांची वाटचाल व त्यांच्या कार्याचे यथातथ्य मूल्यमापन करता येईल. एकंदर इतिहासाच्या व्यापक मांडणीसाठी ते सहाय्यभूत ठरू शकते. त्यामुळे १८ व्या शतकातील महाराष्ट्रीय राज्यकर्त्या-वर्गाचे विविध पैलू व समाजांतर्गत विविध प्रवाह समजून घेता येतील.

आतापर्यंतची मराठ्यांच्या इतिहासाची लेखनपरंपरा मूलतः राजकीय आणि अंशतः सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, लष्करी, अशी आहे. पेशवेकालीन

इतिहासाच्या सामाजिक आशयांना प्राधान्य देऊन तत्कालीन समाजचित्रण पूर्वी देखील केले गेले आहे. परंतु त्याचे प्रमाण फार थोडे आहे.

या संदर्भात जुन्या पिढीतील संशोधकांपैकी सर्वश्री : वि. ल. भावे, वा. कृ. भावे, शं. ना. जोशी, रा. वि. ओतुरकर, य. न. केळकर, ह्यांची नावे प्रामुख्याने डोळ्यासमोर येतात. अलीकडच्या काळात त्यात श्री. पी. ए. गवळी, श्रीमती सुधा देसाई, श्रीमती शारदा देशमुख, या मंडळींनी मोलाची भर घातली आहे.

राज्यकर्तेपद किंवा तत्सम अधिकारपद भूषवणारे घराणे असेल तर त्या घराण्यातील व्यक्तींच्या व्यक्तीगत पातळीवरील विशिष्ट गुणदोषांचा, परस्परांतील संबंध व ताण-तणावांचा राजकारणावरही काही प्रमाणात प्रभाव पडू शकतो. हा काहीसा चटकन न जाणवणारा परंतु महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेऊन घराण्यांचा, त्यांतील व्यक्तींचा कर्तृत्व-आलेख तपासला तर इतिहासातील अनेक घटनांचा, घटना-क्रमांचा अन्वयार्थ लावणे सोपे जाईल. या पार्श्वभूमीवर पेशवे-घराण्याचा इतिहास आणि पेशवा-परिवारातील घडामोडी, पेशवाईचा राजकीय आलेख मांडताना जरूर तपासून पहाव्यात.

अर्थात् निरनिराळ्या कालखंडात त्या त्या वेळच्या परिस्थितीनुसार संपूर्ण समाजावर किंवा समाजाच्या काही घटकांवर आर्थिक, राजकीय प्रभुत्व प्रस्थापित करणारी निरनिराळी घराणी आढळतात. समाजाला दिशा दाखविण्याचे प्रसंगी दिशा बदलण्याचेही सामर्थ्य या घराण्यांमधील स्त्री-पुरुष व्यक्तींमध्ये असलेले आढळते. ज्याप्रमाणे व्यक्तींच्या जीवनात चढ-उतार, उत्कर्ष-अपकर्ष, यश-अपयश, आढळते तसेच या घराण्यांचे देखील उत्कर्ष-अपकर्ष होत असतात.

महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक घराण्यांतील व्यक्तिविशेषांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. त्यांच्या कामगिरीचा आढावा घेतल्याशिवाय महाराष्ट्राचा राजकीय व सामाजिक आलेख पूर्ण होत नाही. १८ व्या शतकापुरता महाराष्ट्राचा आढावा घेतला तर शिंदे, होळकर, पवार, जाधव, आंग्रे, घोरपडे, दाभाडे, प्रतिनिधी, गोखले, पटवर्धन, पानसे, रास्ते, फडके, विंचूरकर, ही घराणी सहजपणे डोळ्या-समोर येतात.

महाराष्ट्राच्या इतिहासात अव्वल स्थानाची म्हणजेच राजघराण्याची प्रतिष्ठा उपभोगणारी घराणी प्रामुख्याने दोन. पहिले छत्रपती शिवाजी महाराजांचे भोसले घराणे आणि दुसरे त्यांचे नातू सातारकर थोरले शाहू महाराज ह्यांनी १७१३ साली आपल्या राज्याच्या पंतप्रधानपदावर विराजमान केलेले श्रीवर्धनकर पेशवा घराणे.

पेशवाईचा कालखंड म्हणजे एका अर्थाने शिवशाहीचा उतरार्ध. हा कालखंड समर्थपणे घडवणाऱ्या पेशवा-घराण्याचा सामाजिक आशयासह अथपासून इतिपर्यंत समग्र इतिहास एकत्रित देणारा ग्रंथ उपलब्ध नसावा, ही या कालखंडाच्या सामाजिक अभ्यासासाठी अभ्यासकांना काहीशी उणीव भासत होती. ती थोडीशी का होईना भरून काढण्याचा पहिला प्रयत्न, प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या आवृतीच्या रूपाने (पहिली आवृत्ती : मे १९८५, 'केसरी प्रकाशन' पुणे- ४११०३०) मी १९८५ साली केला.

सर्वश्री : वि. का. राजवाडे, द. ब. पारसनीस, का. ना. साने, वासुदेवशास्त्री खरे, कृ. वा. पुरंदरे, इत्यादी ज्येष्ठ संशोधकांनी उजेडात आणलेली अव्वल दर्जाची ऐतिहासिक साधने व कागदपत्रे, रा. ब. वाड संपादित पेशव्यांच्या रोजनिशा, सनदापत्रे व इतर अव्वल कागदपत्रे, गो. स. सरदेसाईंची 'मराठी रियासत,' पेशवे दप्तरातील कागदपत्रांचे सरदेसाई संपादित ४७ खंड, सर्वश्री : त्र्यं. शं. शेजवलकर, ग. ह. खरे, वि सी. चितळे, द. वि. आपटे, इत्यादी संशोधकांचे संशोधन व लेखन, बखरी, चरित्रे, निरनिराळी दप्तरे, इत्यादी ग्रंथांमध्ये पेशवा-घराण्याची व घराण्यातील व्यक्तींची विपुल माहिती आहे. परंतु ती विखुरलेली आहे.

प्रायः राजकीय इतिहासाच्या दृष्टीने उपयोगी पडेल अशीच या संशोधनाची मांडणी आहे. सामाजिक दृष्टिकोनातून तसेच पेशवा घराण्याची सलग कुटुंब किंवा घटक या दृष्टीने त्यात दखल घेतलेली दिसत नाही. तसेच उपरोक्त साधनांमध्ये नवीन संशोधित माहिती आढळत नाही. सन १८१८ पासून सन १८५७च्या सशस्त्र उठावापर्यंतची पेशवा-घराण्यासंबंधी माहिती सलगपणे मिळत नाही. सन १८५८ पासून पुढची पेशवा-कुटुंबियांची व त्यांच्या आप्तांची माहिती इतिहासाच्या ग्रंथांमधून मिळत नाही, अशी परिस्थिती होती. मात्र हे सर्व तपशील सामाजिक इतिहासासाठी समाजाची तत्कालीन जडणघडण, समाज मनावरील विविध प्रभाव आणि एकंदर मानसिकता समजून घेण्यासाठी उपयोगी आहेत. त्या दिशेने संशोधन-लेखन करावे हीच या ग्रंथाच्या निर्मितीमागची प्रमुख प्रेरणा.

श्रीवर्धनकर भट–कुलोत्पन्न पहिले पेशवे, बाळाजी विश्वनाथ यांचे पणजे महादाजीपंत भट हे १५७५ साली श्रीवर्धनचे देशमुख होते अशी माहिती मिळते. त्यापूर्वीच्या व्यक्तींची माहिती मिळत नाही. महादाजीपंतांच्या जन्मापासून (अंदाजे सन १५४०/४५ ?) आजपर्यंतचा, श्रीवर्धनच्या देशमुखीसह, सुमारे ४५० वर्षांचा इतिहास, लहानमोठ्या बाबींसह (राजकीय उलाढाली व कौटुंबिक घडामोडी) प्रस्तुत ग्रंथात एकत्र दिला आहे.

घराण्यातील पुरुष व्यक्तींप्रमाणेच लेकी-सुनांची चरित्रे व वैयक्तिक नोंदी त्यांचे सासर-माहेर व अन्य कौटंबिक माहिती, कुलाचार, ह्या मंडळींनी नाशिकच्या

क्षेत्रोपाध्यायांकडे लिहून दिलेल्या समकालीन पारिवारिक नामावळचा, घराण्याचे सोयरे, पुरुषांच्या उपलब्ध जन्मकुंडल्या*, मस्तानीच्या वंशजांची (बांदा संस्थान) उपलब्ध अद्ययावत माहिती, अद्ययावत वंशावळी, नव्याने उपलब्ध झालेली संशोधित माहिती, हा सर्व तपशील दिला आहे. 'पेशवे घराण्याविषयीचा संदर्भ ग्रंथ' हे सूत्र डोळ्यासमोर ठेवून आखणी केली आहे.

(कै.) गो. स. सरदेसाई कृत 'मराठी रियासती' प्रमाणे पेशवाईचा राजकीय इतिहास, घटनांचे विश्लेषण व मूल्यमापन यावर भर न देता कौटुंबिक तपशीलांना व सामाजिक आशयाला प्राधान्य दिले आहे. लिखाणाची मांडणी संशोधनपर संदर्भ ग्रंथ सदृश केली आहे.

पेशवे हे राज्यकर्ते असल्यामुळे जन्म, विवाह, वैयक्तिक जीवन, मृत्यू एवढ्या पुरती त्यांची चरित्रे मर्यादित राहात नाहीत. त्यामुळे त्यांच्या राजकीय कारकीर्दीचा व संबंधित घडामोडींचा योग्य परामर्श घेतला आहे. 'मराठे' हा शब्दप्रयोग तत्कालीन 'महाराष्ट्रीय समाज' या अर्थाने केला आहे. '१८५७'च्या सशस्त्र उठावाबद्दल उहापोह केला नाही. शिवाय त्याच्या स्वरुपाबद्दल इतिहास-तज्ञात मतभिन्नता आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे.

ग्रंथाची आता नव्याने संपूर्ण पुनर्रचना केली असून पहिल्या आवृत्तीत राहून गेलेल्या त्रूटी दूर केल्या आहेत. अधिक माहिती व परिशिष्टे नव्याने समाविष्ट केली आहेत. परिणामतः पहिल्या आवृत्तीच्या तुलनेने प्रस्तुत आवृत्तीत छापील सुमारे १६० पृष्ठांइतक्या मजकुराची भर पडली आहे. महाराष्ट्राच्या पेशवेकालीन कालखंडाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यासासाठी प्रस्तुत आवृत्ती पूर्वीपेक्षा अधिक उपयोगी पडेल अशी आशा आहे.

प्रकाशक श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांच्याशी ग्रंथाच्या नव्या संकल्पित स्वरुपाबद्दल सविस्तर चर्चा झाली त्यावेळी, तपशीलाची विश्वासार्हता, दृश्यमानता, उपयूक्तता जास्तीत जास्त वाढवण्यासाठी अधिक प्रयत्न करावेत. ग्रंथात शक्यतो काहीही अपूर्णता राहू नये असा निर्णय घेतला. हा खऱ्या अर्थाने संदर्भ–ग्रंथ ठरावा हा हेतू.

हे संशोधन करीत असताना एकूण किती ग्रंथ आणि संदर्भ-साधने अभ्यासावी लागली, तो तपशील अभ्यासकांना मार्गदर्शक ठरेल व कामाच्या व्याप्तीची सर्वसाधारण कल्पना येईल या हेतूने येथे देत आहे :

---

* उपलब्ध कुंडल्या एकत्र मिळाव्यात एवढाच हेतू आहे. कुंडल्यांचा माझा अभ्यास नाही. तज्ञ मंडळीच त्याबद्दल निर्णय करू शकतील.

	तपशील	वाचले	उपयुक्त
१.	कोश, मोठे ग्रंथ, पुस्तके	३१५	२७०
२.	छोटया पुस्तिका, नियतकालिके त्रैमासिके, जर्नल्स इत्यादि	७३	६०
३.	वृत्तपत्रीय प्रासंगिक लेख व बातमीपत्रे	१२	१०
	एकूण	४००	३४०

याखेरीज अरुणोदय, इंदुप्रकाश, केसरी, दर्पण, धूमकेतू, प्रभाकर, वर्तमान-दीपिका, वृत्तवैभव, ज्ञानप्रकाश, ज्ञानसिंधु, ज्ञानोदय इत्यादि १९ व्या शतकातील वृत्तपत्रांचे सुमारे २०० अंक पाहिले.

नवीन संशोधित माहितीप्रमाणेच फोटो, चित्रे, रेखाचित्रे, आराखडे यांची नव्याने भर घातली आहे. तथापि नकाशे नव्याने समाविष्ट करणे काही अपरिहार्य कारणांमुळे शक्य झाले नाही.

चित्रसंग्रहापैकी काही चित्रे मी जमवली. चित्रकार श्री. जयंतराव खरे ह्यांनी पुष्कळशी चित्रे व फोटो स्वसंग्रहातून उपलब्ध करून दिले. माझे स्नेही श्री. सुधीर खरे, श्री. निनाद बेडेकर ह्यांनी स्वसंग्रहातील चित्रे व फोटो- त्यातील काही विशेष दुर्मिळ-मला सुलभपणे उपलब्ध करून दिले. प्रा. प्र. के घाणेकर ह्यांनी काही फोटो व लेखसाहित्य उपलब्ध करून दिले.

श्री. कृ. वि. ऊर्फ रावसाहेब पेशवा ह्यांनी ग्रंथ अद्ययावत आणि अधिक माहितीपूर्ण होण्यासाठी सहकार्य तर दिलेच शिवाय काही पूर्वजांचे व इतर काही महत्त्वाचे फोटो अगत्यपूर्वक दिले.

'श्रीदेवदेवेश्वर संस्थान पर्वती व कोथरुड' पुणे- ३० च्या मा. विश्वस्तांनी संस्थानच्या अधिकारकक्षेतील वास्तूंचे रंगीत फोटो ग्रंथात छापण्यासाठी घेण्याची परवानगी दिली. या सहृदांच्या निरलस सहकार्यामुळेच ग्रंथाला वेगळे दृश्य-परिमाण लाभले.

चित्रकार श्री. गजानन कुलकर्णी ह्यांनी सुबक मुखपृष्ठ व आर्टवर्कचे सर्व काम परिश्रमपूर्वक करून दिले. 'स्वस्तिक मुद्रणालया'चे श्री. रायरीकर पिता-पुत्र आणि त्यांचे सहकारी ह्यांनी ग्रंथ-छपाईची आघाडी नेहमीप्रमाणेच समर्थपणे सांभाळली व मला सर्व सहकार्य दिले.

ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रकाशित करण्याचे मान्य करून 'कॉन्टिनेन्टल प्रकाशन'चे श्री. अनिरुद्ध कुलकर्णी ह्यांनी सर्व सहकार्य दिले. अशाप्रकारे विविध पातळ्यांवर सहकार्य दिल्याबद्दल मी या सर्वांचा मन:पूर्वक आभारी आहे.

हा ग्रंथ संशोधनपर आहे. हे ललित लेखन नाही, असे असूनही या ग्रंथाची सुधारित आवृत्ती तयार करण्याची निकड निर्माण झाली याचे श्रेय साक्षेपी अभ्यासक, वाचक आणि ग्राहकांना आहे. पहिल्या आवृतीला वाचकांनी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळेच हा 'दुसऱ्या मुलाखती'चा योग आला आहे. अभ्यासक आणि वाचक दुसऱ्या आवृत्तीचेही उत्तम स्वागत करतील अशी आशा व्यक्त करून मी तूर्त आपली रजा घेतो. स्वल्पविराम ! !

१७ मार्च १९९१ (गुढीपाडवा)

प्रमोद ओक

पत्ता : ३९/२० एरंडवणे, कर्वेरस्ता
लेन ९ वी, पुणे – ४११००४.

* *

संक्षिप्त शब्दरूपांचा खुलासा

अर्काबुले – अर्काईव्हज बुलेटिन

इचसंइति – इचलकरंजी संस्थानचा इतिहास

इतिसं – इतिहास संग्रह

इस – इतिहासातील सहली

उमकोश – उर्दू मराठी शब्दकोश

ऐगो – ऐतिहासिक गोष्टी

ऐतिप – ऐतिहासिक पत्रव्यवहार

ऐतिले – ऐतिहासिक लेखमाला

ऐटि – ऐतिहासिक टिपणे

ऐमसा – ऐतिहासिक मराठी साधने

ऐलेसं – ऐतिहासिक लेखसंग्रह

ऐसंसा – ऐतिहासिक संकीर्ण साहित्य (भा. इ. सं. मंडळ प्रकाशने)

कासंपया – काव्येतिहाससंग्रह पत्रे यादी वगैरे

कित्ता – पूर्वी उल्लेखलेले

गकोश – गणेश कोश

त्रै × × : × × – त्रैमासिक वर्ष : अंक (भा. इ. सं. मंडळ प्रकाशने)

थोमापेरो – थोरले माधवराव पेशवे रोजनिशी

दुबापेरो – दुसरे बाजीराव पेशवे रोजनिशी

धया – धडफळे यादी

नाव्युकोश – नामादिशब्द व्युत्पत्तिकोश

पुद – पुरंदरे दप्तर

पुशव – पुणे (शहराचे) वर्णन

पेअ – पेशवाईची अखेर

पेकामहा – पेशवेकालीन महाराष्ट्र

पेद – पेशवे दप्तर

पेदसप – पेशवे दप्तर सनदा पत्रे वगैरे

पेब – पेशवे बखर

पेसा – पेशवाईच्या सावलीत

पोडिव्हॉ – पोलिटिकल डिपार्टमेन्ट व्हॉल्युम

ब्रस्वाच – ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र

बाबपेच – बाजीराव बल्लाळ पेशवे चरित्र

बाबापेरो – बाळाजी बाजीराव पेशवे रोजनिशी

भावपु – भारतवर्ष पुस्तक

भूभ्र - भूतावर भ्रमण

मइसा – महाराष्ट्रेतिहासाची साधने

मऐसा – मराठी ऐतिहासिक साधने

मदरु – मराठी दफ्तर रुमाल

मपइति – महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास

मरिउवि – मराठी रियासत उत्तर विभाग

मरिमवि – मराठी रियासत मध्य विभाग

मशकोश – महाराष्ट्र शब्दकोश

मसाछोब – मराठी साम्राज्याची छोटी बखर

मस्ता – बाजी – मस्तानी बाजीराव और उनके वंशज बांदाके नवाब

मोजं – मोडक जंत्री

मॉडा – मॉस्टिन डायरी

येनकेसं – य. न. केळकर संग्रह

राखं – राजवाडे खंड (मराठ्यांच्या इतिहासाची साधने)

वाइवृ – वार्षिक इतिवृत्त (भा. इ. सं. मंडळ)

विनामंच – वि. ना. मंडलीक चरित्र

विज्ञावि – विविध ज्ञानविस्तार मासिक

वैदनिका – वैद्य दप्तर निवडक कागद (खंड)

शारो – शाहू रोजनिशी

शिवलेख – शिवशाहीचा लेखनालंकार

षावृ – षाण्मासिक वृत्त (भा. इ. सं. मंडळ प्रकाशने)

समापेरो – सवाई माधवराव पेशवे रोजनिशी

सकेवाखं – समग्र केळकर वाङ्मय खंड

सखं – सह्याद्रि खंड

सदाच – सदाशिवरावभाऊ चरित्र

संकानेजी – संघर्षकालीन नेताओंकी जीवनियाँ

संवृ – संमेलन वृत्त (भा. इ. सं. मंडळ)

हरिसंव – हरिहरेश्वर संक्षिप्त वर्णन

होकै – होळकर कैफियत

BY GAZ — Bombay Gazzetter

EXP MRA PWR — Expantion of the Maratha Power

HIM — History of the Indian Mutiny

HOM — History of the Marathas

OR EX — Oriental Experiences

OR MEM — Oriental Memoiers


PB – Pogson's Bundellas (History of the Bundellas)

PRC — Poona Residency Correspondance


TES — Treaties Eng. & Sunnuds.

❋ ❋

अनुक्रमणिका




श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे



सौ.काशीबाई - थोरले बाजीराव पेशवे



मस्तानी - (राजा केळकर संग्रहालय, पुणे)



सवाई माधवरावांचा दरबार - दि. ९-९-१७९१

प्रकरण पहिले

पेशव्यांच्या इतिहासाची रूपरेषा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणापासून 'पेशवा' या अधिकार-पदावर निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका झाल्या आहेत. बाळाजी विश्वनाथ भट हे, भट घराण्यातील पहिले पेशवे थोरल्या शाहू छत्रपतींकडून १७१३ साली नेमले गेले. तेव्हापासून सन १८१८ पर्यंत याच घराण्याकडे पेशवाई चालली. हे भट घराणे मूळचे कुलाबा जिल्ह्यातील श्रीवर्धनचे. या मंडळींकडे श्रीवर्धन आणि हरिहरेश्वर या गावांची देशमुखी वंशपरंपरेने होती. श्रीवर्धनला भटांचा पिढीजात (प्रकरण ४ थे पहा) वाडाही होता.

बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचे पणजे महादाजीपंत भट १५७५ साली श्रीवर्धनच्या देशमुखीचा कारभार कर्तेपणाने पाहात असत. महादाजीपंतांचे चिरंजीव परशरामपंत हे शिवाजी महाराजांकडे चाकरीसाठी येणारे पहिले गृहस्थ. त्यांच्याकडे सरदारी होती. त्यांचे चिरंजीव विसाजीपंत ऊर्फ विश्वासराव देखील सरदार होते. विसाजीपंतांना पाच मुलगे होते : १. कृष्णाजी, २. जनार्दन, ३. रुद्राजी, ४. बाळाजी, ५. विठ्ठल. यांपैकी बाळाजी म्हणजेच बाळाजी विश्वनाथ पेशवे. काही कारणाने जंजिऱ्याच्या हबशांची भट मंडळींवर गैरमर्जी होऊन त्यांना श्रीवर्धन सोडावे लागले.

सन १६८० नंतर २५ वर्षे महाराष्ट्र परचक्र-यादवीने पोखरला होता. या काळात बाळाजीपंत श्रीवर्धन सोडून चिपळूणला राहात होते. पुढे चिपळूणहून वेळास या गावी जुन्या घरोब्याच्या भानू परिवाराकडे (नाना फडणीसांचे पूर्वज) आले. भानूंसह सर्व मंडळी देशावर सासवडला अंबाजीपंत पुरंदऱ्यांकडे, तेथून पुरंदऱ्यांसह साताऱ्याला आली.

या संक्रमण-काळात शाहू महाराजांचे आसन आणि राज्य स्थिर करण्यात बाळाजींनी महत्त्वाची कामगिरी बजावली. शाहू महाराजांचे पूर्वीचे पेशवे, बहिरोपंत पिंगळे १७१३ साली एका मोहिमेत कान्होजी आंग्र्यांकडून कैद झाले. त्यामुळे पेशवापद विशेष कर्तबगार व्यक्तीकडे असावे असे शाहू महाराजांना वाटू लागले. विचारविनिमय करताना त्यांना बाळाजींचे नाव सुचले. अशाप्रकारे सातारकर छत्रपतींचे पेशवा-पद भट घराण्याकडे १७१३ साली आले.

मराठी राज्यविस्ताराचा पाया घालणे, चौथाई-सरदेशमुखीच्या सनदा शाहू महाराजांच्या नावे दिल्लीच्या बादशहाकडून मिळवणे, जमाबंदी, दरखदारी, वगैरेची धोरणे ठरवणे, ही बाळाजींची प्रमुख कामगिरी. त्यामुळे दिल्लीची पातशाही मराठ्यांच्या आवाक्यात आली. पुढच्या सर्व पेशव्यांनी त्यांच्याच ध्येयधोरणांचा पाठपुरावा केला. २ एप्रिल सन १७२० रोजी बाळाजी सासवड येथे मृत्यू पावले.

त्यांच्या पत्नी राधाबाई (मृ. सन १७५३) डुबेरकर बर्वे सावकारांची कन्या. बाळाजींना १. थो. बाजीराव, २. थो. चिमाजीआप्पा हे दोन मुलगे आणि ३. भिऊबाई, ४. अनुबाई या दोन मुली अशी अपत्ये होती.

बाळाजींचे ज्येष्ठ चिरंजीव थोरले बाजीराव ह्यांना शाहू महाराजांनी दरबारी लोकांचा विरोध पत्करून पण बाजीरावांची धडाडी हेरून १७ एप्रिल सन १७२० रोजी पेशवा-पदावर नेमले. गनिमीकाव्याचे तंत्र शिवाजी महाराजांनंतर यांनीच यशस्वीपणे राबवले. एका अर्थाने थोरले बाजीराव, मराठी साम्राज्याचे संस्थापक. उत्तरेकडे साम्राज्य विस्ताराची कामगिरी त्यांनी पार पाडली. राज्याची सीमा बुंदेलखंडापर्यंत नेऊन मराठ्यांची कर्तबगारी सर्व देशाला दाखवली.

मस्तानी ही बुंदेलखंडनरेश छत्रसालांची एका इराणी वंशाच्या उपस्त्रीपासून झालेली मुलगी १७२९ साली बंगश विरुद्धच्या मराठ्यांच्या मोहिमेनंतर ती छत्रसालांनी बाजीरावांना अर्पण केली, असे उल्लेख मिळतात. शनिवारवाड्यात (पुणे) मस्तानीचा एक स्वतंत्र महालही होता. मस्तानीचा मुलगा (थोरला) समशेरबहाद्दर. ह्याचे वंशज म्हणजेच (प्रकरण ८ वे पहा) बांद्याचे नवाब.

थोरल्या बाजीरावांना शाहू महाराजांनी, पुणे गाव १७२६ साली वंशपरंपरेने इनाम दिले. त्यापूर्वी पेशवा परिवाराची कायमची वस्ती सुपे-सासवडला होती.

थोरले बाजीराव २८ एप्रिल सन १७४० रोजी नर्मदा तीरावर रावेरखेडी येथे मृत्यू पावले. त्यांच्या पत्नी काशीबाई (मृ. सन १७५८) ह्या चासकर-जोशी सावकारांची कन्या.

बाजीरावांची कारकीर्द त्यांचे धाकटे बंधू थोरले चिमाजीआप्पा यांच्याशिवाय पूर्ण होत नाही. चिमाजीआप्पाही शूर, धाडसी, मुत्सद्दी, होते. बाजीरावांच्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी बाजीरावांना अक्षरशः लक्ष्मणासारखी साथ दिली. चिमाजीआप्पांचे नाव इतिहासात विशेष गाजले, ते त्यांच्या अधिपत्याखाली यशस्वी झालेल्या पोर्तुगीजांविरुद्धच्या वसई-मोहिमेमुळे. बाजीरावांच्या मृत्यूनंतर चिमाजीआप्पा देखील १७ डिसेंबर सन १७४० रोजी पुण्यात वारले. त्यांच्या दुसऱ्या पत्नी अन्नपूर्णाबाई सती गेल्या.

चिमाजीआप्पांचे चिरंजीव सदाशिवराव भाऊसाहेब पेशवे. सन १७६१च्या पानिपतच्या मोहिमेचे सरसेनापती म्हणून त्यांचे नाव लोकांना परिचीत आहे. चिमाजीआप्पा थोरल्या बाजीरावांचे दिवाण होते. तीच भूमिका भाऊसाहेबांनी थोरल्या नानासाहेबांच्या कारकीर्दीत बजावली. हे कसलेले सेनापती होते. मराठ्यांच्या शत्रूंना जरब बसवणे, राज्याच्या फडाची योजनापूर्वक पुनर्रचना करणे, नव्या पद्धतीचा तोफखाना तयार करणे, ही यांची महत्त्वाची कामगिरी. लष्करी मोहिमांच्या बाबतीत भाऊसाहेबांवर बरीच मदार असे. 'पानिपत' हीच एक यांची मोठी मोहिम नव्हे.

१४ जानेवारी सन १७६१ च्या पानिपतच्या युद्धात भाऊसाहेब मारले गेले हेंच सत्य आहे. पुढे त्यांचे काही तोतये निर्माण झाले. भाऊसाहेबांच्या दुसऱ्या पत्नी पार्वतीबाई, पानिपत मोहिमेत हजर असूनही पतीचा मृतदेह समक्ष न पाहिल्यामुळे भाऊसाहेबांच्या निधनवार्तेवर विश्वास न ठेवून त्यांनी आपली सौभाग्यचिन्हे स्वतःच्या मृत्यूपर्यंत उतरवली नाहीत. भाऊसाहेबांना मुले झाली पण जगली नाहीत. त्यामुळे चिमाजीआप्पांचा वंश भाऊसाहेबांबरोबरच संपला. पुढे फक्त थोरल्या बाजीरावांचा वंश विस्तारला.

बाजीरावांच्या मृत्यूनंतर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब, पेशवा झाले. बाजीरावांना १. बाळाजी ऊर्फ नानासाहेब, २. रामचंद्र, ३. नाव अज्ञात, बालमृत ४. रघुनाथ ऊर्फ दादासाहेब, ५. जनार्दन ऊर्फ बाबासाहेब असे पाच मुलगे होते. यांपैकी नानासाहेब व रघुनाथराव यांचा अपवाद वगळता इतर तिघे लहान वयात वारले.

शाहू महाराजांनी दरबारचा विरोध पत्करून २५ जून सन १७४० रोजी थोरल्या नानासाहेबांना पेशवा-पदावर नेमले. कारभारात कधीही चुका काढता न याव्यात इतका नानासाहेबांचा कारभार चोख होता.

१७४९ साली स्वतःच्या आजारपणात शाहू महाराजांनी आपल्या राजकीय मृत्युपत्रानुसार स्वतःच्या मृत्यूनंतर, मराठेशाहीचा कारभार पूर्णपणे पेशव्यांकडे सोपवला. यानंतर साताऱ्याचे महत्त्व कमी होऊन पुण्याचे महत्त्व वाढले. राज्यसूत्रे पुण्यातून हलू लागली. नानासाहेबांच्या पहिल्या पत्नी गोपिकाबाई (मृ. सन १७८८) ह्या सावकार रास्त्यांची कन्या.

नानासाहेबांची कारकीर्द हा पेशवाईतील वैभवशाली काळ. या वेळी मराठेशाही, हिंदुस्थानातील सर्वांत प्रबळ सत्ता बनली होती. १७६० साली उत्तरेत पानिपतची मोहिम उद्भवली. १७६१ च्या प्रारंभी झालेल्या सर्वंकश युद्धात मराठी फौजेला पराभव पत्करावा लागला. उत्तरेकडील रयतेवरचा मराठ्यांचा अंमल

कमजोर झाला. पानिपतच्या युद्धानंतर स्वतः नानासाहेब उत्तरेत गेलेले नसते तर उत्तरेकडे मराठी राज्य टिकणे कठीण होते. पानिपतचा पराभव, बंधुशोक, पुत्रशोक यामुळे धीर खचून नानासाहेब पुण्यात पर्वतीवर २३ जून सन १७६१ रोजी मृत्यू पावले. दुसऱ्या दिवशी लकडीपुलाजवळ अंत्यसंस्कार झाले.

थोरल्या नानासाहेबांना १. विश्वासराव, २. माधवराव, ३. यशवंत, ४. मोरेश्वर, ५. नारायणराव असे पाच मुलगे होते. यांपैकी यशवंत, मोरेश्वर, हे अल्पवयीन वारले. विश्वासराव चांगलेच शूर व कर्तबगार होते. ते पानिपतच्या युद्धात कामी आल्यामुळे पेशवाईच्या इतिहासाला वेगळीच कलाटणी मिळाली.

नानासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांचे दुसरे चिरंजीव माधवराव २० जुलै सन १७६१ रोजी पेशवापदावर आले. त्या वेळी त्यांचे वय फक्त १६ वर्षे होते. मराठी साम्राज्याची जबाबदारी अतिशय कसोटीच्या वेळी अंगावर पडली तरी माधवराव डगमगले नाहीत. १७६३ सालच्या निजामाविरुद्धच्या राक्षसभुवनच्या युद्धापासून त्यांचे शौर्य, कठोर शिस्तप्रियता, सेनानायकत्व, इत्यादी गुण प्रगट झाले. माधवरावांचा आणि मराठेशाहीचा दरारा सर्वत्र वाढला. हैदर अलीखानासारखा कट्टर शत्रूही त्यामुळे वचकून असे. माधवरावांनी पानिपतची हानी लवकरच भरून काढली.

निजामाला राक्षसभुवनच्या लढाईत पेशव्यांची इतकी जरब बसली की, खडर्याच्या लढाईपर्यंत (सन १७९५) त्याने वर तोंड काढले नाही. यांच्या कारकीर्दीत मराठी फौजांनी उत्तरेकडे जाट, रोहिले, यांचा जबरदस्त पराभव केला. त्यामुळे पानिपतचा वचपा निघाला. राज्याचे बरेचसे कर्जही फेडले.

पानिपतनंतर थोरल्या नानासाहेबांचे धाकटे बंधू रघुनाथराव हेच पेशवे घराण्यात ज्येष्ठ पुरुष उरले होते. त्यांनी माधवरावांशी सहकार्य करण्याऐवजी दावा मांडला. कधी सबुरीने, तर कधी कठोरपणाने वागून माधवरावांनी अंतर्गत दुहीला तोंड दिले. घरच्या आणि बाहेरच्या शत्रूंशी आणि स्वतःच्या वाटेला आलेल्या आतड्याच्या क्षयासारख्या रोगाशी झगडत हा कर्तबगार पेशवा पुण्याजवळ थेऊरला चिंतामणीच्या मंदिराच्या ओवरीत वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी, १८ नोव्हेंबर सन १७७२ रोजी मृत्यू पावला. त्यांच्या पत्नी रमाबाई ह्या शिवाजी बल्लाळ जोशी यांची कन्या. त्या माधवरावांच्या बरोबर सती गेल्या.

माधवरावांना अपत्य नसल्यामुळे त्यांचे कनिष्ठ बंधू नारायणराव १३ डिसेंबर, सन १७७२ रोजी पेशवा झाले. त्यांच्या कारकीर्दीत विशेष घडामोडी झाल्या नाहीत. गारद्यांकडून नारायणरावांचा शनिवारवाड्यातच खून झाल्यामुळे त्यांची कारकीर्द ३० ऑगस्ट सन १७७३ रोजी संपली.

यानंतर प्रजेच्या, सरदारांच्या विरोधाला न जुमानता रघुनाथराव पेशव्यांनी साताऱ्याहून स्वतःसाठी पेशवाईची वस्त्रे आणवली. यामुळे अनेक सरदारांनी एकत्र

येऊन रघुनाथरावांच्या बंडखोरी विरुद्ध ' बारभाई ' कारस्थान रचले. नाना फडणीस, सखाराम बापू, मोरोबा, मामा पेठे, रामशास्त्री प्रभुणे, हरीपंत फडके, वगैरे मुत्सद्दी त्यात सामील होते.

दरम्यान या मंडळींनी गरोदर असलेल्या गंगाबाईंना (कै. नारायणरावांच्या पत्नी) सुरक्षिततेसाठी पुण्याहून पुरंदर किल्ल्यावर नेले. त्या कृष्णराव साठ्यांची कन्या. ' बारभाईंनी ' पुरंदर किल्ल्यावरून गंगाबाईच्या नावे पेशवाईची द्वाही फिरविली. पुढे गंगाबाईंना मुलगा झाला. तोच सवाई माधवराव पेशवा. गंगाबाई १७७७ साली वारल्या.

१७७३ साली ' बारभाई ' मंडळी आणि रघुनाथराव ह्यांच्यात यादवी सुरू झाली. पुरंदरला १८ एप्रिल, सन १७७४ ला सवाई माधवरावांचा जन्म झाल्यामुळे बारभाई-पक्षाची सरशी झाली. रघुनाथरावांच्या चंचल वृत्तीमुळे याच काळापासून पेशवाईत इंग्रजांचा हस्तक्षेप फार मोठ्या प्रमाणात होऊ लागला.

बारभाईंनी सवाई माधवरावांना वयाच्या ४० व्या दिवशी (२८ मे, सन १७७४) पेशवाईची वस्त्रे दिली. त्यांच्या कारकीर्दीत नाना फडणीसच राज्याचा कारभार पाहात होते. रघुनाथरावांचे पेशवाईविरुद्ध उद्योग सुरूच होते. सरतेशेवटी नाना फडणीसांनी हरएक प्रकारे सरदारांची एकजूट करून इंग्रज – रघुनाथराव युतीला तोंड देण्याचा संकल्प केला. त्यामुळे इंग्रजांनी मराठ्यांशी सालबाईचा तह केला. परिणामतः रघुनाथरावांना नाना फडणीसांच्या स्वाधीन होऊन कोपरगावला कैदेत रहावे लागले. तिथेच ११ डिसेंबर सन १७८३ रोजी रघुनाथराव मृत्यू पावले. त्यांच्या दुसऱ्या पत्नी आनंदीबाई ह्यांचे माहेर मळणच्या रघुनाथ महादेव ओकांकडे. नारायणराव पेशव्यांच्या खुनाच्या संदर्भात ' ध ' चा ' मा ' प्रकरणात यांची दुष्कीर्ती झाली आहे. ह्या आनंदवल्ली येथे २७ मार्च, सन १७९४ रोजी वारल्या.

रघुनाथरावांचे पहिले दोन मुलगे बालपणी मृत्यू पावले. तिसऱ्या खेपेला मुलगी झाली. ह्यामुळे वंश चालविण्यासाठी त्यांनी १९ एप्रिल सन १७६८ ला अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर भुस्कुटे (गाडगीळ) घराण्यातील मुलगा दत्तक घेतला. हेच अमृतराव पेशवे.

सन १७९० – ९२ मध्ये मराठ्यांनी इंग्रज – निजामाच्या सहाय्याने दक्षिणेकडील टिपू सुलतानाचा बंदोबस्त केला. सन १७९५ मध्ये मराठ्यांनी खर्ड्याच्या लढाईत निजामाचाही पूर्ण पराभव केला.

ह्यापूर्वी सन १७८७ पर्यंत महादजी शिंद्यांनी उत्तरेकडे मोठा पराक्रम करून दिल्लीच्या पातशहाकडून पेशव्यांसाठी ' वकील - ई - मुतालिक ' ही सनद मिळवली. सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत पेशवाईचे जुने वैभव पुन्हा दिसू लागले होते. ते

अपघाताने शनिवारवाड्यात स्वतःच्या महालाच्या सज्जातून २५ ऑक्टोबरला खाली पडून २७ ऑक्टोबरला (सन १७९५) वारले. यांच्या दुसऱ्या पत्नी यशोदाबाई या १४ जानेवारी सन १८११ ला, दुसऱ्या बाजीरावांच्या कैदेत असताना रायगड किल्ल्यावर वारल्या. या विजयदुर्गच्या गणेश विश्वनाथ गोखल्यांची कन्या.

सवाई माधवराव वारल्यावर थोरल्या नानासाहेबांचा वंश संपला. या वेळी रघुनाथरावांचे ज्येष्ठ दत्तक चिरंजीव अमृतराव, सख्खे चिरंजीव दुसरे बाजीराव आणि दुसरे चिमाजीआप्पा हे तिघेच हयात होते. मात्र पुढच्या काळात भारदस्तपणा जाऊन पेशवाईत बेबंदशाही माजली.

चिमणाजी रघुनाथ यांना गं. भा. यशोदाबाईंच्या मांडीवर दत्तक देऊन राज्य चालवण्याची योजना नाना फडणीसांनी आखली. त्याप्रमाणे १६ मे सन १७९६ रोजी दत्तकविधान होऊन २६ मे रोजी चिमणाजीला पेशवाईची वस्त्रेही मिळाली. इकडे बाजीरावांच्या खटपटी सुरूच होत्या. एकूण रागरंग पाहून 'महाडचे कारस्थान' करून नाना फडणीसांनीच बाजीरावांना ४ डिसेंबर सन १७९६ ला पेशवा-पदावर स्थानापन्न केले. चिमणाजीला पदच्यूत तर व्हावे लागलेच, शिवाय बाजीरावांनी स्वतः गादीवर आल्यावर त्याचे दत्तकविधानही रद्द केले.

प्रजेकडून जबरदस्तीने करवसुली करण्यासाठी १८०२ सालच्या दिवाळीत यशवंतराव होळकरांनी पुण्याची लूट केली. त्या वेळी बाजीरावांनी कोकणात पलायन केले.

पुण्यात होळकरांनी अमृतरावांचे चिरंजीव विनायकराव यांना यशोदाबाईंच्या मांडीवर 'बाळाजी माधवराव' या नावाने दत्तक देऊन पेशवाई चालवावी अशी योजना मांडली. पण ती फलद्रुप झाली नाही. इकडे बाजीराव इंग्रजांच्या सहाय्यासाठी धडपडत होते. सरतेशेवटी वसई मुक्कामी ३१ डिसेंबर सन १८०२ रोजी दुसरे बाजीराव आणि इंग्रज कंपनी-सरकार यांच्यात 'तैनाती फौजेचा तह' झाला. एका अर्थाने मराठेशाहीचे सार्वभौमत्व याच वेळी संपले. यानंतर दुसरे बाजीराव इंग्रजांच्या मदतीने १३ मे सन १८०३ ला पुन्हा एकदा पेशवा झाले.

यानंतरही पेशवे-इंग्रज यांच्यातील कुरबुरी संपल्या नाहीत. काही स्वाभिमानी सरदारांनी आणि बाजीरावांनीही सन १८०३ ते सन १८१८ पर्यंत राज्य वाचवण्यासाठी धडपड केली. परंतु पुण्याचा रेसिडेन्ट माऊन्टस्टुअर्ट एलफिन्स्टन ह्याच्या मुत्सद्देगिरीपुढे कशाचाही पाड लागला नाही.

१८११ सालच्या फेब्रुवारीत पुण्याला रेसिडेन्ट-पदावर आल्यापासून एलफिन्स्टनने फितूर पसरवून सरदारांच्या एकीला सुरुंग लावला होता. त्यामुळे पेशवाई लवकर खालसा व्हायला मदतच झाली.

अखेरीस ३ जून सन १८१८ रोजी, दुसरे बाजीराव पेशवे अशीरगडजवळ ढोलकोट येथे इंग्रज सेनापती जॉन मालकम यांच्यासमोर शरणागती पत्करून, इंग्रजांकडून सालीना आठ लाख रु. तनखा घेऊन कानपूरजवळ बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त येथे निवृत्त जीवन जगू लागले. त्यांनी हा उत्तरकाल दानधर्म, तीर्थयात्रा, धार्मिक कर्मकांडे करण्यात घालवला. ते २८ जानेवारी सन १८५१ रोजी तेथेच वारले.

बाजीरावांनी बिठूर येथे महाराष्ट्रातील वेणगावच्या भट घराण्यातील १. गोविंद ऊर्फ नानासाहेब, २. सदाशिव ऊर्फ दादासाहेब, ३. गंगाधर ऊर्फ बाळासाहेब हे तीन मुलगे दत्तक घेतले. बाजीरावांनी आपल्या मृत्यूपत्रान्वये १८३९ साली ज्येष्ठ दत्तक पुत्र नानासाहेब (धोंडोपंत) यांना वारस नेमले. इंग्रजांनी हे मृत्युपत्र मान्य केले नाही. पुढे धोंडोपंत नानासाहेब '१८५७' मधील पुढारी म्हणून गाजले.

दुसऱ्या बाजीरावांचे तीनही दत्तक मुलगे १८५७ च्या उठावात सामील झाल्यामुळे तिघांच्याही आयुष्याची अखेर हालअपेष्टात झाली. कोणाचाही वंश पुढे चालला नाही. नानासाहेब पेशवे पुढे बरीच वर्षे हयात असल्याबद्दल आख्यायिका आहेत. पण त्यांत तथ्य असेल असे वाटत नाही. शेवटी नानासाहेब आपल्या परिवारासह आश्रयार्थ नेपाळात गेले. नेपाळ सरकारने नानासाहेबांना आश्रय नाकारला पण इतर परिवाराला नेपाळात राहण्याची परवानगी दिली.

पेशवाईच्या अखेरच्या प्रत्यक्ष वारस म्हणजे दुसऱ्या बाजीरावांची औरस कन्या गं. भा. बयाबाई आपटे, या १९ जून सन १९१७ रोजी वाराणसी येथे वयाच्या ७० व्या वर्षी वारल्या. बयाबाईंचा विवाह ग्वाल्हेरचे सरदार रावसाहेब आपटे यांच्याशी सन १८५५ मध्ये झाला. बयाबाईंनी १९१३ साली वि. का. राजवाड्यांना पेशवा परिवाराची अखेरची हकीगत समक्ष सांगितली होती.

बाजीरावांचे धाकटे बंधू चिमणाजी रघुनाथ, पेशवाईच्या अखेरच्या काळातच राजकारणातून निवृत्त झाले होते. ते फेब्रुवारी सन १८१९ पासून वाराणसीला निवृत्त जीवन जगत होते. त्यांना इंग्रजांकडून सालीना २ लाख रु. तनखा मिळत असे. त्यांना मुलगा झाला पण जगला नाही. त्यामुळे त्यांचा वंश पुढे चालला नाही. हे चिमणाजी आप्पासाहेब ३० मे सन १८३२ रोजी वाराणसी येथे वयाच्या ४८ व्या वर्षी वारले. त्यांची मुलगी गं. भा. द्वारकाबाई यांचे नातू लक्ष्मणराव चिमणाजी थत्ते यांना, ते १॥ वर्षांचे असताना, दुसऱ्या बाजीरावांच्या दहाव्या पत्नी सईबाई यांनी १८८१ साली नेपाळमध्ये बोलावून दत्तक घेतले होते.

बाजीरावांचे थोरले दत्तक बंधू अमृतराव १८०३ साली इंग्रजांशी स्वतंत्र करार करून पेशवाईच्या राजकारणातून अलिप्त झाले होते. ते १८०५ सालापासून वाराणसीला आपल्या परिवारासह निवृत्त जीवन जगत होते. त्यांना इंग्रजां-

कडून सालीना ८ लाख रुपये तनखा मिळत असे. त्यांनी उत्तर आयुष्य धार्मिक प्रवृत्तीने घालवले. ते वाराणसीत ६ सप्टेंबर सन १८२४ रोजी वारले. बाजीराव, चिमाजीआप्पा आणि अमृतराव हे तिघेही बंधू एकदा उत्तर भारतात गेल्यानंतर पुन्हा कधीही दक्षिणेत किंवा महाराष्ट्रात आले नाहीत. कारण त्यांच्यावर इंग्रजांची बंधने होती.

अमृतरावांना विनायकराव हे एक चिरंजीव वारस होते. ते वाराणसी, चित्रकूट, येथे राहात. विनायकरावांना मुलगा होऊनही जगला नाही. म्हणून त्यांनी प्रथम नारायणराव आणि नंतर माधवराव असे अनुक्रमे थत्ते आणि केळकर घराण्यांतील दोन मुलगे दत्तक घेतले. विनायकरावांचे व नारायणरावांचे पुढे पटेनासे झाल्यावर त्यांचे दत्तकविधान रद्द करून विनायकरावांनी माधवरावांना दत्तक घेतले. विनायकराव ६ जुलै सन १८५३ रोजी वारले. त्यांनी मृत्युपत्रान्वये माधवरावांना वारस नेमले होते. १८५७ च्या उठावाच्या वेळी माधवराव फक्त ९ वर्षांचे असल्यामुळे, काही कडक बंधने घालण्यापलिकडे इंग्रजांनी त्यांना त्रास दिला नाही. माधवराव आणि त्यांच्या वंशजांचे वास्तव्य बासबरेली येथे असे. सुमारे सन १९२६ पासून ही मंडळी ब्रिटिश सरकारची परवानगी मिळाल्यावर पुण्यात स्थायिक झाली. पेशवा घराण्याची ही एकच शाखा (प्रकरण ९ वे पहा.) आज विद्यमान आहे.

❋ ❋

प्रकरण दुसरे

घराण्याचे पूर्ववृत्त

पेशवा पद

'पेशवा' या फारसी शब्दाचा अर्थ मुख्यमंत्री, पंतप्रधान, नेता, असा आहे. याच अर्थाचा मुसलमानी शब्द 'वझीर' आहे. पेशवा शब्दातील मूळ शब्द 'पेश' हा असून त्याचा अर्थ अग्रभाग असा आहे. 'पेशवाई' चा एक अर्थ स्वागत करणे, सामोरे जाणे, असा आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, 'पेशवे = धंद्यावरून' इतकाच खुलासा करतात.[1] पेशवा, पेशवाई, या शब्दांचा आजचा अर्थ (मराठ्यांचे पंतप्रधान) कालांतराने विशिष्ट संदर्भावरून रूढ झाला.[2] या शब्दांना महत्त्व १७१३ साली भट आडनावाच्या चित्पावन घराण्याकडे पेशवाईचा* अधिकार आल्यानंतर प्राप्त झाले. बाळाजी विश्वनाथ भट, पेशवा होण्यापूर्वी मराठेशाहीत एकूण ६ अधिकारी पेशवा-पदावर होते असे 'शाहू रोजनिशी' वरून (पृ. ४१, ४२) दिसते.

भटांपूर्वीचे पेशवे

शिवाजी महाराजांच्या बालपणी शहाजी राजांनी पुण्याच्या जहागिरीत १६४३ साली शामराज नीलकंठ रांझेकर यांना पेशवा नेमले होते. याबद्दलचे उल्लेख 'मराठी साम्राज्याची छोटी बखर' (पृ. १५), 'शिवदिग्विजय' (पृ. १८६) वगैरे मध्ये स्पष्टपणे आढळतात. दुसरे पेशवे नरहरी आनंदराव यांचा उल्लेख 'मराठी साम्राज्याची छोटी बखर' मध्ये (पृ. २०) आहे.

शिवाजी महाराजांच्या अभिषिक्त कारकीर्दीत प्रथम मोरोपंत पिंगळे, त्यांच्यानंतर त्यांचे धाकटे पुत्र भैरव (बहिरोपंत) हे पेशवा-पदावर होते. एका जुन्या शकावलीत या पूर्वकालीन पेशव्यांचा उल्लेख आहे[3].

भट घराण्याकडे पेशवाई

बाळाजी विश्वनाथ भट ह्यांनी शाहू महाराजांच्या कारकीर्दीच्या प्रारंभी

---

*'भट-पेशवे' घराण्यात 'पेशवा' तर 'पिंगळे-पेशवे' घराण्यात 'पेशवे' आडनाव लिहितात, असे डॉ. उदयसिंह पेशवा यांच्याकडून समजले.

आणि त्यापूर्वीही अनेक पराक्रम केले होते. त्यामुळे बहिरोपंत पिंगळयांनंतर बाळाजी विश्वनाथ भट यांना १७ नोव्हेंबर, सन १७१३ रोजी शाहू महाराजांकडून सातारकर छत्रपतींच्या पेशवा-पदाची वस्त्रे मिळाली. ऐतिहासिक पेशवाईचा हाच खरा प्रारंभ. या घराण्यातील एकूण नऊ पुरुष 'पेशवा' झाले. ते पुढील प्रमाणे :–

(१) बाळाजी विश्वनाथ (१७ नोव्हेंबर, सन १७१३ ते २ एप्रिल, सन १७२०, मृ.), (२) बाजीराव बल्लाळ (१७ एप्रिल, सन १७२० ते २८ एप्रिल, सन १७४० मृ.,) (३) बाळाजी बाजीराव (२५ जून, सन १७४० ते २३ जून, सन १७६१ मृ.), (४) माधवराव बल्लाळ (२० जुलै, सन १७६१ ते १८ नोव्हेंबर, सन १७७२ मृ.,) (५) नारायणराव बल्लाळ (१३ डिसेंबर, सन १७७२ ते ३० ऑगस्ट, सन १७७३ हत्या.), (६) रघुनाथराव बाजीराव (१० ऑक्टोबर, सन १७७३ ते सुमारे ४ महिने), (७) गं. भा. गंगाबाई भ्र. नारायणराव बल्लाळ (३० जानेवारी, सन १७७४ ते २७ मे सन १७७४, बारभाईतर्फे) (८) (सवाई) माधवराव नारायणराव २८ मे सन १७७४ ते २७ ऑक्टोबर, सन १७९५, मृ.), (९) चिमणाजी माधवराव (दत्तक) २६ मे सन १७९६ ते २७ ऑक्टोबर, सन १७९६ पदभ्रष्ट), (१०) बाजीराव रघुनाथ (मार्च, सन १७९६ ते २५ मे, सन १७९६, ४ डिसेंबर, सन १७९६ ते २४ ऑक्टोबर सन १८०२, १३ मे, सन १८०३ ते ३ जून, सन १८१८).

पेशवाई १८१८ साली अधिकृतपणे समाप्त झाली. त्यापूर्वी १६ नोव्हेंबर, सन १८१७ च्या रात्री येरवडयाच्या चकमकीच्या दरम्यान पुण्याहून दुसरे बाजीराव पेशवे कायमचे परागंदा झाले. १७ नोव्हेंबरला संध्याकाळी बाळाजीपंत नातूंच्या हस्ते शनिवारवाडयावर ब्रिटिशांचा 'युनियन जॅक' फडकवण्यात आला.

पूर्व परंपरा

बाळाजी विश्वनाथ भटांचे पूर्वज मुंबईच्या दक्षिणेला असलेल्या बाणकोट खाडीच्या उत्तर तीरावरील हरिहरेश्वर आणि श्रीवर्धन या दोन गावांचे देशमुख होते. श्रीवर्धन हे घराण्याचे मूलस्थान. हा गाव तेव्हाच्या जंजिरे संस्थानात असून जंजिऱ्याच्या दक्षिणेला बारा मैलांवर आहे. गाव प्राचीन काळापासून प्रसिद्ध असून तेथे फार मोठा व्यापार चालत असे. १७ व्या शतकात गाव अहमदनगरच्या निजामशाही घराण्याच्या अमलाखाली होता. १६३७ साली शाहजहान बादशाहाने त्या निजामशाहीचा शेवट केल्यावर गाव विजापूरच्या अदिलशाही अमलाखाली गेला. या सर्व कालखंडात कोकणातील मुलखाचा बंदोबस्त जंजिऱ्याच्या हबशाकडे असे. सन १६८६ मध्ये औरंगजेबाने अदिलशाही खालसा केली, तरीही कोकणातील मुलखाचा अधिकार हबशांकडेच कायम ठेवला.

परिवाराची स्थलांतरे

चिपळूण ← श्रीवर्धन (प्रां दंडाराजपुरी, जि. कुलाबा – देशमुखी)
- सासवड (घाटमाथा)
  - सातारा (बाळाजीपंतनाना – पेशवा)
    - सासवड (वास्तव्य)
      - पुणे (स्थलांतर, थोरले बाजीराव)
        - बुंदेलखंड (बांदा संस्थान)
          - महू कॅन्टोन्मेन्ट
            - इंदोर
              - सिहोर
                - इंदोर
                - सिहोर (मस्तानी – शाखा)
            - भोपाळ
              - आग्रा
        - मुंबई (रघुनाथराव)
          - सुरत
            - कोपरगाव, आनंदवल्ली
              - पुणे (दु. बाजीराव)
                - ब्रह्मावर्त
                  - नेपाळ
                    - o
        - वाराणसी (अमृतराव)
          - कर्वी ऊ. चित्रकूट (विनायकराव)
            - अलाहाबाद
              - बासबरेली (राजा माधवराव)
                - पुणे
        - वाराणसी (चिमणाजी)
          - नेपाळ (थत्ते द.)
            - पुणे

भट घराणे फार पूर्वीपासून श्रीवर्धनचे देशमुख होते. हे देशमुख लष्करी, फौजदारी, मुलकी या सर्व अधिकारांनी युक्त असत. ग्रामपंचायतीचे पुढारीपण देशमुख या नात्याने भटांकडे असे. श्रीवर्धन व हरिहरेश्वर हे दोन्ही गाव हबशांच्या राज्यात असले तरी व्यवहारतः देशमुखच गावात प्रमुख असत. सन १५७५ मध्ये बाळाजी विश्वनाथ (पेशवे) भटांचे पणजे महादाजीपंत भट दंडाराजपुरी प्रांतात देशमुख, देसाई, म्हणवले जात. श्रीवर्धनला पेशव्यांचा जुना पिढीजात वाडा होता. पुढे त्यांनी तो आपल्या इतमामाला शोभेल असा उत्तम प्रकारे बांधला.

बाळाजी विश्वनाथ, थोरले बाजीराव, थोरले नानासाहेब, थोरले माधवराव, थोरले चिमाजीआप्पा, भाऊसाहेब, रघुनाथराव, ही सर्व मंडळी, स्वतःला श्रीवर्धनचे देशमुख म्हणवून घेण्यात भूषण मानीत. श्रीवर्धनच्या बहुतेक देवतांना पेशव्यांकडूनच नैवेद्याची व्यवस्था झाली. तेथील ब्राह्मणांना दरसाल ३२।। खंडी भात धर्मादाय पोहोचत असे. देशमुखी चालवण्यासाठी पेशव्यांनी येथे आपला एक कायम प्रतिनिधी ठेवला होता.[४] बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनी बहिरवभट मेहेंदळ्यांना आपला प्रतिनिधी नेमले होते.[४] प्रत्येक पेशव्याच्या कारकीर्दीत असा कोणीतरी प्रतिनिधी नेमला जाई. या घराण्यात देशमुखी सन १८१८ पर्यंत चालत होती.

कोकणातील देशमुखी वतने

कोकणातील देशमुखी वतनांची, तसेच देशमुखी चालवण्याची भट घराण्याची परंपरा याबद्दल वि. का. राजवाडे यांनी पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे[५] : –

" शिलाहारांच्या व यादवांच्या राजवटीत देशांत व कोकणांत एकूणएक देशमुख्या व पाटीलक्या मराठ्यांकडे असत. प्रायः ग्रामांत पाटीलकी मराठ्याची व कुळकरण ब्राह्मणाचे किंवा असल्यास कायस्थाचे असा प्रघात होता. दंडाराजपुरी प्रांतात ग्रामकुळकरण व देशकुळकरण करणिक नावाच्या कायस्थांकडे फार पुरातन कालापासून आहे... यादवांचे साम्राज्य जाऊन व कोकणांतील शिलाहार संस्थानिकांचा अंमल उठून कोकणांत जेव्हा मुसलमानी सत्ता प्रस्थापित झाली तेव्हा लष्करी पेशाचे जे मराठे पाटील व विशेषतः मराठे देशमुख ते लढाईच्या धालमेलीत नष्ट, स्थानभ्रष्ट व परागंदा झाले. त्यांच्या देशमुख्या रिकाम्या पडल्या व त्या कालांतराने ब्राह्मणादिकांच्या हातांत मुसलमानी अंमलांत गेल्या. अशा तऱ्हेने दंडाराजपुरी प्रांतातील व कोकणांतील इतर प्रांतातील देशमुख्या ब्राह्मणादिकांच्या हातांत गेलेल्या आहेत. पैकी दंडाराजपुरी येथील देशमुखी भटोपनामक ब्राह्मण घराण्यांत मुसलमानी अंमलाच्या पहिल्या हप्त्यात आलेली आहे. अर्थात शक १३५० किंवा शक १४०० च्या सुमारास भटांच्या घराण्यांत देशमुखी आलेली आहे."

" भटांच्या घराण्यांत दंडाराजपुरी प्रांताची देशमुखी शक १४०० पासून शक १६०० पर्यंत अव्याहत चालत होती. शक १६०१ च्या आगेमागे देशमुखी व हबशांचे राज्य सोडून भट घराणे मराठराज्यात निघून गेले. नंतर १६३२ पर्यंत भटांनी देशमुखी परत मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या ३२ वर्षांत बाळाजी विश्वनाथाचे बंधू दिवंगत होऊन, तो व घरांतील कांही बाया व मुलेबाळे अशी काही दिवस कोकणांत दाभोळ, चिपळूण, अंजनवेल वगैरे ठिकाणी राहून नंतर सुमारे ३० वर्षे वरघांटी होती. कोकणांतून निघण्याच्या काळी बाळाजी चांगला कर्ता सवरता पुरुष असून त्याचे वय पंचविशीच्या सुमाराचे होते. "

' देशमुखीचा हकलवाजिमा मलिकंबरने ठरवून दिला होता असे या दस्तऐवजात म्हटले आहे. म्हणजे शक १५०० पासून शक १५३० पर्यंतच्या अवधीत दंडाराजपुरीच्या भट देशमुखांचा हकलवाजिमा निजामशहाचा प्रधान जो मलिकअंबर त्याने ठरवून दिला व तेव्हा भटांकडे देशमुखी होती असा अर्थ होतो. ह्याहीपूर्वी शक १४०० पासून भटांकडे देशमुखी चालत होती. हे इतरत्र दाखवून दिले आहे. '[६]

लेखांक १

बज्यानेब[७] आमीलान हाल व इस्तकबाल प्रगणा प्रगणे मरुड - नांदगाव तालुके कोट जंजिरे दंडाराजपुरी बीदानद सुरूसन्न इहिदे आशर मयातैन व आलफ आं कि बालाजी विस्वनाथ देसाई याणी इलतिमास लेहून पाठविले की प्रगणे मजकूरची देशमुखी आपले कदिम आसे आपले बडे मुदतलला परागंदा होऊन मराठराज्यामध्ये गेले याकरिता आपले वतन चालत नाही तर मलिक साहेबाचे जागा साहेब आहेत मेहेरबान होऊन वतन दिल्हेयाने वतनावर बेटा एऊन चाकरी करील म्हणोन इलतिमास पाठविला त्यावरून मेहेरबान होऊन प्रगणे मजकूरचे वतन देशमुखी मशारुलची कदिम सबब देऊन कदिम मलिकंबरी हकलवाजिमा खातरेस आणून पेशजी देविला होता लारी ६२ ।· रु. ९ सवा बासष्ट लाहारी नऊ रुके तो दूर करून हाली जदीद हकलवाजिमा रयतनिसबती करार केला आसे बीतपसील –

....

....

(टीप : येथे जरूरीपुरताच भाग घेतला आहे.)

घराण्याचे वळण

गृहशिक्षणाव्यतिरिक्त व्यावहारिक अनुभवाच्या बाबतीत पेशवे घराण्यात विशेष दक्षता घेत. बुद्धिमत्ता, उद्यमशीलता, शिस्त हे चित्पावनांचे मुख्य गुण

पेशवा-घराण्यात प्रथमपासूनच दिसतात. वैभवामुळे मुलांच्या शिक्षणाची हयगय कधीही झाली नाही. १. नाना फडणीसांनी सवाई माधवरावांच्या शिक्षणासाठी, मार्गदर्शनासाठी तयार केलेले 'श्रीनारायणव्यवहारशिक्षोपक्रम' या नावाचे, माघ शु. ५ शके १७११ पर्यंत तयार केलेले टिपण[८]. २. गं. भा. गोपिकाबाईंनी ८ जानेवारी सन १७८३ रोजी सवाई माधवरावांना—दिनश्चर्या, अभ्यास, वर्तणूक, व्यायाम, याबद्दल लिहिलेले गंगापूरहून पाठवलेले मोठे पत्र[९]. ३. थोरल्या नानासाहेबांनी रघुनाथरावांना (धाकट्या भावाला) लिहिलेले पत्र[१०]. या सर्व तपशीलावरून पेशवा घराण्यात शिक्षणाबद्दल काय खबरदारी घेतली जाई हे स्पष्ट होते.

पेशवे व इतर ब्राह्मण व मराठा सरदारांच्याही स्त्रिया बहुदा साक्षर असत. त्यांना पत्रे लिहिण्याचे, पोथी वाचण्याचे ज्ञान असे. पेशवा-घराण्यापैकी सर्व स्त्रियांना चांगले लिहिता वाचता येत असे. त्यांच्यापैकी राधाबाई, गोपिकाबाई, काशीबाई, गंगाबाई, आनंदीबाई, वाराणसीबाई विशेष बहुश्रुत असून त्यांना राजकारणाचीही चांगली जाण असे. मात्र समाजात ज्यांना स्वास्थ्य होते, राजकीय सामाजिक कारणांमुळे ज्यांना गरज भासली त्या स्त्रियाच प्रामुख्याने साक्षर व परिपक्व झालेल्या दिसतात.

त्या काळचे प्रतिष्ठित घराण्यांचे शिक्षण बालबोध व मोडीचे लेखन, वाचन, संस्कृत लिहिता वाचता येणे, हिशोबांची पूर्ण माहिती, घोडेस्वारी, शस्त्रनिपुणता, यांविषयी असे. १०–१२ वर्षाच्या मुलाला बाह्य व्यवहाराचा प्रत्यक्ष अनुभव मिळू लागे. पेशव्याने शिपाईगिरी व कारकुनी ह्या दोन्ही पेशांनी सरदार आणि कारभारी मंडळींवर ताण केली तरच त्यांचा वचक बसेल हे ओळखून पेशवे आपल्या पुढील पिढीची विशेष काळजी घेत. पुस्तकी शिक्षणापेक्षा व्यावहारिक बाबी व सैनिकी शिक्षणावर भिस्त असे. रामायण व महाभारत हे ग्रंथ शिक्षणाचा, स्फूर्तीचा, पराक्रमांचा पाया असत. [११]

पत्रव्यवहार व हिशोबी काम यांत पेशवा घराण्याचा अखेरपर्यंत हातखंडा होता. बाळाजीपंत, थोरले बाजीराव, थोरले नानासाहेब, थोरले माधवराव थोरले चिमाजीआप्पा, रघुनाथराव, भाऊसाहेब, बुद्धिवान, विद्वान्, गुणग्राहक आणि बहुश्रुत होते. थोरले बाजीराव, थोरले नानासाहेब विशेष संस्कृतज्ञ असून महाभारत, रामायण वगैरे ग्रंथांतील राजनितीतत्त्वांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. या दोघांना वेदांताची आवड होती. त्यांनी वेदभाष्य बाळगले होते. थोरले बाजीराव अनेक ठिकाणांहून उत्तमोत्तम ग्रंथ, पोथ्या जमा करून त्यांचा सखोल अभ्यास करीत असत. नानासाहेबांनी पंचतंत्र, हितोपदेश, चाणक्यनीती, रघुवंश इत्यादी ग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. रघुनाथरावांच्या दोन प्रचंड ग्रंथशाला – एक आनंदवल्लीला,

दुसरी त्रिंबकेश्वरला – होत्या. त्यांत लाखो रुपयांचे दुर्मिळ ग्रंथ, पोथ्या वगैरे संग्रह होता. यांपैकी काही ग्रंथांची यादी पे. द. २२ मध्ये उपलब्ध आहे. दुसरे बाजीरावही बुद्धिवान्, चाणाक्ष, संस्कृतज्ञ, होते. ते ज्येष्ठ वैदिकांना आमंत्रित करून वादसभा भरवत आणि स्वतः खंडन मंडनात सहभागी होत.

आयुष्यमान मर्यादा

'पेशवे-घराण्यातील पुरुषांचे कमी आयुष्यमान पाहाता पेशवे-घराण्यात क्षयाची बाधा असावी या संशयाला बळकटी येते.' या काही इतिहासकारांच्या समजुतीला तर्काखेरीज काही भक्कम आधार दिसत नाही. थोरल्या माधवरावांना क्षयाची बाधा झाली होती. यावरून उपरोक्त समजूत तर्कशुद्ध ठरत नाही.

गो. स. सरदेसाई म्हणतात : [११] 'एकंदरीत लहानपणापासून कामाचे ओझे व दगदग पडल्यामुळे या पुरुषांची आयुर्मर्यादा बरीच आखडली असे वाटू लागते. वयाच्या १०–११ व्या वर्षी त्यांचे विवाह होऊन बायकोचे वय ७–८ वर्षे असे. म्हणजे पुरुषांची वैवाहिक राहणी १६–१७ व्या वर्षी सुरू होई. हेही एक अल्पायुष्याचे कारण असावे. त्यास २०–२१ व्या वर्षी मुले होत. सदाशिवरावास १७ व्या वर्षी उमाबाईचे पोटी मुलगा झाला होता. चिमाजीआप्पा, सदाशिवराव व थोरला माधवराव वैवाहिक नीतीत खंबीर होते. सर्वच पुरुषांचा आयुष्यक्रम हल्लीहून पुष्कळसा भरीव (Intensive) व फार लवकर वाढीस लागलेला दिसतो.'

पेशवे घराण्यातील व्यक्तींना 'देवी' झाल्याचे उल्लेख मात्र वारंवार आढळतात. कारण देवीच्या विकारावर त्या काळी – इतर अनेक आजारांप्रमाणेच– प्रभावी औषधे उपलब्ध नव्हती. आजारपणात हिंदू देवतांप्रमाणेच पीर, दर्गे यांनाही आरोग्यार्थ नवस बोलले जात. पेशवा-परिवारही याला अपवाद नव्हता. सदाशिव, रघुनाथ आणि जनार्दन यांना देवी आल्या तेव्हा (पेद ४३ पृ. ९०) काशीबाईंनी शेखसल्ल्यास आणि 'सैद सादद पीर कसबे पुणे' यास कंदोरीचा (पीराचे नावे अन्नसमर्पण) नवस केला. आजारपण गेल्यावर नवस फेडला. फकीरांना खुर्दा वाटला.

त्या काळाच्या मानाने पुरोगामी गोष्ट म्हणजे दुसऱ्या बाजीरावांनी आपली चौथी पत्नी वाराणसीबाई हिला लग्नानंतर, सन १८०६ च्या अखेरीस इंग्रज डॉक्टरकडून देवी काढवून घेतल्या होत्या. याबद्दल इतिहासात उल्लेख आहेत. या मुद्याचा विचार करता सरदेसाईंच्या विधानांचा आशय अर्धसत्य वाटतो. कारण दिल्लीच्या मोगल घराण्यातील पुरुषांना याहीपेक्षा जास्त दगदग होत असूनही त्यांचे आयुष्यमान जास्त होते. यावरून पेशवे–भट घराण्यात सरासरी आयुष्यमान कमी होते, असेच म्हणावे लागते.

राज्याचे धोरण आणि राज्य-क्षेत्र

मराठेशाहीच्या पेशवेकालीन राज्यव्यवस्थेबद्दल इतिहास संशोधक रा. वि. ओतुरकर म्हणतात :[१२] " पेशव्यांच्या काळी मराठ्यांच्या सत्तेचे स्वरूप सरंजामदारी (feudal) पद्धतीचे होते. धर्माचा कधी कोणी निमित्त मात्र उपयोग करी. पण मुख्य हेतू मराठ्यांची सत्ता सर्वत्र प्रस्थापित करावयाची हा होता व ह्या व्यापक कार्यक्रमात सिद्दी व पोर्तुगीज यांचे उच्चाटन करणे हा एक भाग होता. धर्मभेदाने स्वारीस तेज चढले असेल पण ते स्वारीचे मूलभूत कारण नव्हे. पेशवे व त्यांचे प्रतिस्पर्धी एकाच धर्माचे असते तर पेशव्यांनी जंजिरेकरांवर किंवा गोवेकरांवर स्वारी केली नसती असे मानण्यास यत्किंचितही आधार नाही. '

पेशव्यांच्या राज्याचे पाच सरसुभे होते : १. गुजराथ, २. दौलताबाद, ३. कर्नाटक, ४. पुणे, ५. कोकण. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनी दिल्लीच्या बादशहाकडुन १७१९ साली पुढील सुभ्यांचे चौथाई व सरदेशमुखी हक्क मिळविले : १. हैद्राबाद, २. औरंगाबाद, ३. बेदर, ४. विजापूर, ५. खानदेश, ६. वऱ्हाड, यामुळे कालांतराने पेशवाईत 'सहा सुभे दक्खन' हा वाक्प्रचार रूढ झाला.

सर रिचर्ड टेंपल यांचा अभिप्राय

मुंबई इलाख्याचे एक गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल (सन १८७७–८०) आपल्या * Oriental Experiences या ग्रंथात पेशवेकुलाच्या कर्तबगारीबद्दल पुढील अभिप्राय व्यक्त करतात : 'वंशशुद्धीसंबंधाने सूक्ष्म बंधने पाळणारी जात पृथ्वीवर ब्राह्मणाइतकी दुसरी नाही. अर्थात् त्यांच्या ठिकाणी पुष्कळ चांगले गुण आनुवंशिक रीतीने उतरलेले आढळतात. पेशव्यांना राज्यप्राप्ती झाल्यामुळे या गुणांत काही एक कमतरता उद्भवली नाही. हे पहिल्या चार पेशव्यांच्या उदाहरणावरून स्पष्ट दिसून येते. एका मागून एक पराक्रमी चार पेशवे निर्माण झाले. त्यांच्या तोडीचे दुसरे उदाहरण समग्र हिंदू राजवटीत सापडत नाही, तरी इतर राष्ट्रांत असे चार पुरुष एकाच कुटुंबात झालेले दाखविता येतील काय असे कोणी विचारतील, तर मुसलमानातील मोगल बादशहांचा निर्देश करता येईल. राज्याची मुख्य अंगे चार – परराष्ट्रीय व्यवहार, लष्कर, अंतर्गत दिवाणी कारभार आणि दरबारी इतमाम. या चारही बाबतींत पेशव्यांचे नैपुण्य अप्रतिम दिसून आले. पसारा आवरण्याचे सामर्थ्य, हुकुमाची तामिली, कष्ट व संकटे सोसण्याची ताकद

---

* हा मूळ ग्रंथ पहायला मिळाला नाही. प्रस्तुत उतारा दुसऱ्या एका लेखावरून उधृत केला आहे.

अशा सर्व गुणांनी हे चार पेशवे विशेष स्मरणीय झाले. चवथा पेशवा अल्पवयी असूनही गुणांत कमी नव्हता. त्याला अकाली मृत्यू आला नसता तर आणखी पुष्कळ अघटित पराक्रम त्याने करून दाखविले असते. इंग्रजी लोक हिंदी लोकांविषयी बोलताना त्यांच्या दोषांवर जसा भर देतात तितकाच त्यांनी त्यांच्या गुणांवरही देणे उचित होय.'

❋ ❋

संदर्भ टिपा :

(१) नाव्युकोश पृ. २४६, (२) उमकोश पृ. २८४, (३) षाव् शके १८३४, ले. ६०, (४) वाइति शके १८३७, पृ. ९५-९६, (५) कित्ता पृ. ८६, (६) कित्ता पृ. ८८, (७) कित्ता पृ. ९०-९१, (८) राखं. ४, पृ. १ ते पृ. २२, (९) कासंपया ले. ३९३, (१०) रा. खं. १ ले. १४, पृ. ९६, (११) मरि (१७४९-६१), (१२) चिमाजी-आप्पा चरित्र-प्रास्ताविक.

प्रकरण तिसरे

वंशावळी

'गार्ग्य' गोत्री भट घराण्याची 'पेशवे–शाखा' बाळाजी विश्वनाथ भट ह्यांच्यापासून सुरू होते. येथे भट घराण्याच्या उपलब्ध वंशावळी त्या त्या उपशाखेनुसार दिल्या आहेत. चित्रकूटच्या विनायकराव पेशव्यांची दत्तक शाखा व मस्तानीपासूनची बांद्याची (या शाखेचा पेशवे विस्तारात समावेश केल्यास) शाखा, या दोनच शाखांचा आजतागायत विस्तार आढळतो. रूढ प्रथेप्रमाणे वंशावळीत फक्त पुरुषवंश (जनक व दत्तक) लिहितात. माहेरवाशिणींचा, सासुरवाशिणींचा वंशावळीत समावेश करीत नाहीत. मात्र येथे वंशावळी देताना पुरुष वंशाबरोबरच पेशव्यांच्या मुली व सुना यांचीही नावे समाविष्ट केली आहेत. माहेरवाशिणींचे नाव लिहून त्याखाली कंसात त्यांचे सासरचे आडनाव व पुरुषांचे नावाखाली कंसात त्यांच्या पत्नीचे (सासुरवाशिणी) पेशव्यांकडील नाव व माहेरचे आडनाव लिहिले आहे. वंशावळ परिपूर्ण दिसावी. विस्ताराची एकत्रित कल्पना यावी व सर्व नातेसंबंध स्पष्ट व्हावेत यासाठी ही पद्धत अनुसरली आहे.

वंशावळींचा अनुक्रम

१) श्रीवर्धनचे भट

२) थोरले नानासाहेब शाखा

३) मस्तानी शाखा – बांद्याचे नवाब (१)

४) मस्तानी शाखा -- बांद्याचे नवाब (२)

५) रघुनाथराव – दत्तक शाखा

६) रघुनाथराव – जनक शाखा

७) दुसरे बाजीराव – दत्तक शाखा

८) दुसरे नानासाहेब – जनक घराणे

वंशावळींचे संदर्भ–

१. श्रीवर्धनचे भट

- १ विसाजी
  - २ महादाजी (देशमुख, मामले दंडाराजपुरी सन १५७५)
    - ३ नारोपंत
      - ४ महादाजी (बाबाजी) (राजमाचीकर)
        - ५ नारोपंत १Δ
          - ६ त्रिंबक
            - ७ नारोपंत २ ●
              - ८ रामराव
                - ९ त्रिंबक
                  - १० नारायण (सन १८५७ हयात)
                - रामचंद्र (इ. स. १८३० हयात)
            - बाबाजी १
        - आबाजी २
          - महादाजी
    - परशराम (छत्रपतींकडे प्रवेश) (शिवाजी)*
      - कृष्णाजी १
        - विठोजी
          - अंताजी
            - 0
          - नारोपंत ●
            - 0
      - अंताजी २
      - विश्वनाथ ३ (पेशवे मूळ पुरुष)

टिपा – (१)* पेद ४४ पृ. ८०. (२) ● राजमाचीकर शाखेतील नारोपंत यांचे पिता – १) त्रिंबक नारो : पेद ४४ पृ. ८०. २) विठोजी कृष्णाजी : ऐति. वंशावळी – सरदेसाई पृ. १०२. ३) Δ 'नारो महादेव यांची शाखा कोकणात तळे येथे ' – इति. वि. का. राजवाडे : वाईवृ शके १८३७ पृ. १०६, यावरून सरदेसाईंचे उल्लेख चूक असावेत.

२. थोरले नानासाहेब यांची शाखा

२ महादाजी

३ परशराम (शिवाजी)

४ विश्वनाथ ३ — अंताजी २ — कृष्णाजी १ (पृ. १९)

५ बाळाजी ४
(प्रथम पेशवा) *
(प × राधा, बर्वे)
— मुलगी
(पती मेहेंदळे)
— जनार्दन २
विठ्ठल ५
— रुद्राजी ३
— कृष्णाजी १

६ बाजीराव (विसाजी) १
(मस्तानी, पृ. २१)
(प × काशी, चासकर)
— भिऊबाई ३
(मुलगी)
(पती जोशी)
— अनुबाई (मुलगी) ४
(पती घोरपडे)
— चिमाजीआप्पा २
(पृ.   )
— नारायण
(प ×
गोदावरी)

७ बल्लाळ १
(प २ × राधा, वाखरे)
(प १ × गोपिका, रास्ते)
— रामचंद्र २ (बालमृत्यु)
मुलगा ३ (बालमृत्यु)
— रघुनाथ ४ (पृ. २३)
जनार्दन ५
(प × सगुणा, भिडे)

८ विश्वासराव १
(प× लक्ष्मी, दी. पटवर्धन)
नारायणराव
(प × गंगा, साठे)
— मोरेश्वर ४
(बालमृत्यू)
माधवराव २
(प × रमा, जोशी)
— यशवंत ३
(बालमृत्यू)

९ स. माधवराव
(प २ × यशोदा, गोखले)
— (प २ × रमा, थत्ते)

१० चिमणाजी (द. आ.)
(प १ × सीता, दामले)
(प ३ × सत्यभामा, मेहेंदळे)
(प २ × कावेरी, जोशी)
— मुलगी
(बालमृत्यू)

११ द्वारका (मुलगी, पती थत्ते)

[*टीप : ५ व्या पिढीचा क्रम कासंपया ले. ४९१ नुसार. नाशिक उतारा क्रम : २ रुद्राजी ३ जानोजी ४. बाळाजी ५ विठ्ठल]

३. मस्तानी शाखा – बांद्याचे नवाब (१)

५ बाळाजी (सिहोर शाखा) चिमाजी आप्पा
(प×राधा, बर्वे)

६ बाजीराव (विसाजी) १ चिमाजीआप्पा (अंताजी) २
(मस्तानी) (प१×रखमा, पेठे) (प२×अन्नपूर्णा थत्ते)

७ समशेर बहाद्दर सदाशीवराव बयो (मुलगी)
(प१×लालकुंवर) (प१×उमा) (पती ओंकार)
(प२×मेहेरबाई) (फडणीस) (प२×पार्वती कोल्हटकर)

८ अलीबहाद्दर कृष्णराव १ २ मुलगे
(प१×बादशाह बेगम) मुलगा २ (बालमृत्यू)
(प२×दुलज बेगम) (प३×बक्षी बेगम) (बालमृत्यू)

९ समशेरबहाद्दर १ झुल्फिकार बहाद्दर २
फत्तेबहाद्दर २ (मृ.) (प×नवाब बेगम)
प्यारी बेगम (मुलगी) ३

१० अलीबहाद्दर मृ. स. १८७३
(प१×इफ्तकार महल) (प२× मुबारक महल)

११ उमराव बहाद्दर३ सुगरा बेगम१ बझीर बेगम२ झुल्फिकार बहाद्दर१ सरदार
ऊर्फ समशेर बहाद्दर (मुलगी) (मुलगी) ऊर्फ नवाब बहाद्दर बहाद्दर २
(पृ. २२)

१२ इक्बाल बहाद्दर१ एहसान बहाद्दर२ सैफअली बहाद्दर३
ऊर्फ अमीर बहाद्दर (प१ × कायसर बेगम) (प×२) (प×३)

१३ सरदार बहाद्दर अमीर बहाद्दर२ समशेरबहाद्दर१ झुबेर बहा.१
नवाब बाहद्दर१ इसरार बहाद्दर ४ मुलगे
तमकीन बहाद्दर ४ मुली
१ मुलगा
१ मुलगी

१४ जुनेद अली बहाद्दर १
सुजानअली बहाद्दर २ ←
खत्री बहाद्दर ३

४. मस्तानी शाखा – बांद्याचे नवाब (२)

(बांदा शाखा)

७ थोरले समशेर बहाद्दर / ६ थोरले बाजीराव

८ थोरले अलीबहाद्दर

९ समशेर बहाद्दर १ (आई दुलज बेगम) — झुल्फिकार बहाद्दर २ (आई बक्षी बेगम)

१० ० — अलीबहाद्दर (मृ. १८७३)

११ झुल्फिकार बहाद्दर १ ऊर्फ नवाब बहाद्दर (आई मुबारक महल) — समशेर बहाद्दर ऊर्फ ३ उमराव बहाद्दर (पृ. २१) (आई इफ्तकार महल) — सरदार बहाद्दर २ (आई मुबारक महल) — 0

१२ नवाबबहाद्दर १ — अख्तर जमाबहाद्दर २

१३ अलीबहाद्दर १ — मुहम्मद अब्बास बहाद्दर २ — हुजूर बहाद्दर (वंश संपला)

१४ अलीबहाद्दर — अब्बैस बहाद्दर

बांदा शाखेतील आणखी काही नावे समजली ती : मुश्ताक बहाद्दर, अशफाक बहाद्दर, अझीझ बहाद्दर, जमशेद बहाद्दर, आफाक् बहाद्दर, इश्ताक बहाद्दर, अखलाख बहाद्दर, दिलेरजहाँ बेगम, रझियाजहाँ बेगम, मुख्तारजहाँ बेगम, फर्रुखजहाँ बेगम, महम्मदजहाँ बेगम.

५. रघुनाथराव – दत्तक शाखा

७ रघुनाथराव ४
(प.१ ×जानकी, बर्वे) (प३ × मथुरा, पेंडसे)
(प२ ×आनंदी, ओक)

८ मुलगा (बालमृत्यू) अमृतराव (द. आ.)*
(पिता भुस्कुटे)

९ * विनायकराव मैनाबाई (मुलगी)

१० नारायणराव ३ (द. आ.) (पिता थत्ते) (प×गंगा, नेने)
माधवराव ४ (द. आ.) (पिता केळकर) (प ×लक्ष्मी, किबे)
काशीबाई २ (मुलगी) (पती जोग)
मुलगा १ (जनक) (बालमृत्यू)

११ मुलगी (बेपत्ता)
कृष्णराव १ (प ×रमा, पटवर्धन)
सदाशिवराव २ (प ×पार्वती, देव)

१२ विनायकराव १ (प१ ×साठे) (प२ ×मालती, पटवर्धन)
विश्वनाथराव २ (प × अन्नपूर्णा, भावे)
ठकुताई ४ (मुलगी) (पती पटवर्धन)
छबुताई ३ (मुलगी) (पती पटवर्धन)
रघुनाथराव १ (प×कमलिनी, पटवर्धन)
मुलगी २ (बाल मृ.)

१३ कृष्णराव २ (प्रतापसिंह) (प × रमा, आपटे)
सरोजिनी १ (पती पटवर्धन)
रत्नमाला ३ (बालमृत्यू)
विनायकराव ४ (उदयसिंह) (प × सरस्वती) (पंतप्रतिनिधी)
विश्वास (बालमृत्यू)
प्रभावती (बालमृत्यू)
तीन अपत्ये (बालमृत्यू)

[* यांच्या पत्नींची माहिती व्यक्तिचरित्रात पहा.]

१४ विश्वनाथ २ (महेंद्रसिंह) (प × सुचेता, दीक्षित)
मोहिनी १ (पती करकरे)
रघुनाथ ३ (पुष्कर)
शुभदागौरी १ (पती अत्रे)
सुपर्णा २

६. रघुनाथराव – जनक शाखा

७ रघुनाथराव
(प १ × जानकी, वर्वे)
(प २ × आनंदी, ओक)
(प ३ × मथुरा, पेंडसे)

८ भास्कर १ (बालमृत्यू)
विनायक २ (बालमृत्यु)
दुर्गा (मुलगी) ३ (पती जोशी)
मुलगी ४ (बालमृत्यू)
बाजीराव ५
चिमणाजी ६ (द. गे.)

९ (बाजीराव ५ यांची अपत्ये)
वामन १ (बालमृत्यू)
मुलगी २ (बालमृत्यू)
मुलगा ३ (बालमृत्यू)
कृष्णाबाई ४ (बालमृत्यू)
मुलगी ५ (बालमृत्यू)
योगाबाई ६ (मुलगी) (पती पटवर्धन)
कुसुमाबाई ७ (पती आपटे)

९ (चिमणाजी ६ यांची अपत्ये)
द्वारका १ (मुलगी) (पती थत्ते)
नारायण २ (बालमृत्यू)

७. दुसरे बाजीराव – दत्तक शाखा

७ रघुनाथराव (प १ × जानकी, बर्वे).
(प २ × आनंदी, ओक) (प ३ × मथुरा, पेंडसे)

८ बाजीराव (यांच्या एकूण ११ पत्नी)

९ धोंडोपंत (नानासो) १
(द. आ. भट)
(प. १ × सारजा, करमरकर)
(प. २ × सारजा, पाटणकर)
(प. ३ × कृष्णा, करमरकर) *

१० मैना *

सदाशिवराव २
(दादासो)
(द. आ. भट)
(प. × रोहिणी, कार्लेकर)

पांडुरंग (रावसो)
(द. आ. भट)
(प × रमा, ओक) ●

गंगाधरराव (बाळासो) ३
(द. आ. भट)
(प × काशी, गोडबोले)

टिपा : (१) * श्री. थत्ते नाव पार्वतीबाई देतात. परिशिष्ट सातवे पहा. (२) * या मुलीचे त्रोटक संदर्भ मिळतात. कदाचित अनौरस संतती असावी. (३) ● यांना मूल झाले होते. असा त्रोटक उल्लेख : 'एटिन फिफ्टीसेव्हन' – डॉ. सेन पृ. ३७८.

८. दुसरे नानासाहेब – जनक घराणे

१ गणेश (उपनाव भट, वेणगाव शाखा, मूळगाव श्रीवर्धन, जि. कुलाबा)

२ नारायण

३ विश्वनाथ | त्रिंबक | महादेव ऊ. माधवराव (प × गंगाबाई) | भास्कर ऊ. दाजीबा | गणेश ऊ. रावजी

४ (विश्वनाथ): पठ्ठ्या △ (बडोदा) | राघोबा △ (१८५७ चा बंदी) | सीताराम ऊ. पांडुरंग ऊ. रावसाहेब (द. गे.)

४ (त्रिंबक): आबा सदाशिव ऊ. दादासाहेब (द. गे.) गोदावरी (मु.) (द. गे.)

४ (महादेव): बाळभट ऊ. बाबा १ (नारायण) | गोविंद नाना २ (नानासो) (द. गे.) | गंगाधर ३ (बाळासो) (द. गे.) | कृष्णा (मु.) (द. गे.) मथुरा (मु.) (द. गे.)

४ (गणेश): विठ्ठल पंत १ ऊ. दादा सखाराम २

५ काशिनाथ (राघोबाचा) | आण्णा ऊ. रामराव * (बाळभटाचा)

टिपा : (१) △ ' १८५७ चा महाराष्ट्र ' – गोखले पृ. ९.

(२) * फ्रीडम स्ट्रगल इन् उत्तर प्रदेश, व्हॉ. ३. परिशिष्ट १, ४, ५, पृ. ६९५, ६९८, ६९९.

वंशावळींचे संदर्भ

१. केळकर य. न. (इतिहास संशोधक) यांचे संग्रहातील नोंदी.

२. गुप्त (डॉ.) भगवानदास – 'मस्तानी-बाजीराव और उनके वंशज बांदाके नवाब'.

३. गोखले पु. पां. – '१८५७ चा महाराष्ट्र' (इंग्रजांच्या नोंदी).

४. ढमढेरे (डॉ.) वा. रा. – 'नानासाहेब पेशवे व १८५७ चे बंड'.

५. नवाबबहादूर (बांदा शाखा) यांचेकडील माहिती.

६. नेने गो. प. यांचेकडील विश्वसनीय माहिती.

७. पेशवा कुटुंबियांकडील विश्वसनीय माहिती.

८. बेहेरे ना. के. – 'पहिले बाजीराव'.

९. भा. इ. सं. मं. वा. इतिवृत्त शके १८३५ – 'बयाबाई आपटे हकीगत'

१०. भट गणपतराव यांची सन १८२५–२६ मधील इंग्रज नोंदीमधील जबानी.

११. व्याह्यांची माहिती संबंधित कुलवृत्तांतांवरून.

१२. सरदेसाई गो. स. – 'पेशवे दप्तर खंड ४४ वा'.

१३. सरदेसाई गो. स. – 'नानासाहेब पेशवे चरित्र'.

१४. सरदेसाई गो. स. – 'मराठी रियासत' म. वि. भा. १, उ. वि. भा. १,२,३.

१५. सरदेसाई, काळे, वाकस्कर – 'काव्येतिहाससंग्रह – पत्रे, यादी वगैरे'.

१६. Sardesai G. S. – 'Historical Geneologies'.

१७. Sen. S. N.– 'Eighteen Fifty Seven'

१८. Bulletin of the Dept. of Archives – Vol 3.

❋ ❋

प्रकरण चवथे

दोन ऐतिहासिक वास्तु

श्रीवर्धनाचा वाडा

भट घराण्याकडे श्रीवर्धनची देशमुखी असल्यामुळे निदान चार पिढ्या नांदलेला जुना वाडा श्रीवर्धनला होता. या वाड्याबद्दल अतिशय माहितीपूर्ण लेख श्री. शं. ना जोशी यांनी 'सह्याद्री' मासिकाच्या बाजीराव विशेषांकात (मे, सन १९४०) लिहिला होता तो येथे (संक्षिप्त) घेतला आहे –

तिसरे पेशवे बाळाजी बाजीराव ह्यांनी आपल्या 'वतनी जुन्या घरट्याच्या' पहिल्याच जागी पुनर्रचना करून टुमदार वाडा बांधला. बाळाजी विश्वनाथानंतर थोरले बाजीरावांची राजवट सर्व हिंदुस्थान हे महाराष्ट्राच्या पराक्रमाची शाळा आहे, हे सिद्ध करण्यात व्यतीत झाली. त्यातच पेशव्यांचा वतनी प्रांत जो कोकण तो सिद्दीकडून हस्तगत झाला. अर्थात् त्यानंतर म्हणजे नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत त्यांना मूळ घराकडे लक्ष देणे शक्य झाले. त्या वेळच्या बांधणीतील चौथरा अविशिष्ट व अनाच्छादित असा आपल्या वैभवाचे स्मरण देत... स्फुरण देत आज दर्शित होत आहे.'

बाळाजी बाजीराव रोजनिशी भाग १ पृ. १०९ : 'श्रीवर्धनास देशमुखीचा जुना घरटा आहे, तेथे नवे घर बांधावे लागते त्यांस सामान ४३ लहान मोठ्या तुळया ८६ खांब ५०० कड्या व तितकेच सागवानी वासे इत्यादी १३२९ लाकडे आणून देणे' ही आज्ञा वसई प्रांताचे सुभेदार शंकराजी केशव ह्यांस केली आहे आणि हे सामान आणण्यास आपल्या देशमुखी वतनातील उत्पन्नातून खर्च करावा असेही तेथे सुचविले आहे व पुढील पृष्ठावर जिवाजी गणेश खासगीवाले ह्यांस या 'वतनी वाड्या' वरील बांधकामासाठी गुजराथी कसबी सुतार इत्यादी कारागीर पुरवण्याबद्दल हुकूम दिला आहे. ह्या हुकुमाप्रमाणे त्यावेळी (सन १७५० ऑगस्ट) वाडा बांधला गेला. वाड्याचा चौथरा ६० फूट लांब ४० फूट रुंद असून कमरेइतका उंच आहे. चौथऱ्याचे चौफेर बांधकाम उत्तम चिरेबंदी व सामान्यतः शाबूत आहे. चौथरा पूर्वाभिमुख आहे. त्यास चार पायऱ्या सवा पाच फूट रुंदीच्या अशा प्रशस्त आहेत. चौथऱ्यावर भिंती वगैरे बांधकाम आज उभे नाही. फक्त एक दगडी हौद,

दाराची सोय असलेला– दार बसवण्याचे नर शिल्लक आहेत असा– आहे. हौदा-जवळ एक कुंड आहे. जोत्यास उंचीमध्ये पूर्व अंगाला आठ आठ त्रिदली पदकशिला खाली व वर अशा असून पायऱ्याच्या दोन्ही बाजूस षोडशदली दोन कमले उठाव-दार काढली आहेत... चौथऱ्यावर खांबांचे चार तळखडे १४ फुटांवर समांतर रेषेत पूर्व-पश्चिम आहेत. जोत्याची पुरणी म्हणजे जमिनीतील रुंदी चांगली दोन हाताइतकी जाड आहे. चौथऱ्यात एकदोन ठिकाणी पिंपळाचे मूळ शिरून चौथऱ्याचा भेद चालला आहे व पायऱ्यांचे धोंडे सरकले आहेत.

श्रीलक्ष्मीनारायण हे देवस्थान आज श्रीवर्धन येथे 'श्रीलक्ष्मीनारायण' ह्याच नावाने ओळखले जाते. श्रीमंत पंतप्रधान पेशवे ह्यांच्या कुलदेवतांची आणि ग्राम-देवतांची जी यादी (वाइति शके १८३५) पेशव्यांचे उपाध्ये कर्वे व आप्त ओंकार ह्यांच्या संग्रहात उपलब्ध झालेली प्रसिद्ध आहे, त्या यादीतही 'लक्ष्मीनारायण' हेच नाव दिले आहे. तथापि देवाच्या हातातील आयुधक्रम पाहता ही मूर्ती 'श्रीधराची' आहे असे म्हणणे प्राप्त आहे. मूर्तीशेजारी डावीकडे 'श्री' म्हणजे लक्ष्मी उभी आहे त्यावरून 'लक्ष्मीनारायण' हे नाव रूढ झाले. पण मूळ श्रीधराचीच मूर्ती आहे हे अवश्य लक्षात घेतले पाहिजे व श्रीवर्धन ह्या ग्रामनामाशी त्याचा असलेला संबंध ध्यानात येण्यासही ते सोपे जाईल. मूर्तीच्या उजव्या अंगास पायाशी गरुड असून लक्ष्मी व गरुड यांच्या शेजारी जयविजय दाखविले आहेत. एकंदरीत मूर्तिशिल्प फार सुरेख आहे. श्रीधराच्या अंगावरील दागिने पाहिले म्हणजे नखशिखांत सालंकार मूर्ती कशी असते हे सहज लक्षात येईल. मूर्तीच्या प्रभावळीत दशावतार दाखविले आहेत. ही मूर्ती अकराव्या शतकातील आहे. होयसळ शिल्पाची छाया या मूर्ति-शिल्पात दिसून येते. पायाच्या घोट्याजवळ नऊ पदवलये असून तेथेच प्रलंब हार दिसतो. तो जानव्याप्रमाणे धारण केलेला आहे.

ह्या लक्ष्मीनारायणाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचा काष्ठलेख मंदिरातच आहे. मंदिर एकंदर सहा खणी लाकडी असून त्यातील प्रवेशद्वाराकडून म्हणजे पूर्वे-कडून दुसऱ्या भालेवर तुळईवर चार ओळीचा एक लेख पुढीलप्रमाणे आहे :

श्रीनारायणचरणितत्पर
धोंडु जोसि श्रीवर्धनपुर* निरं
तर स (श) क १६९६ जयनाम संवत्स (र) फा
ल्गुन वा। १३ मेसतरी लाल ॥

---

* 'श्रीवर्धनपूर' हा शब्द मूळ 'श्रीवर्धनकर' असा असावा. मोडी वाचनाच्या चुकीमुळे 'पुर' लिहिले असण्याची शक्यता वाटते.

पेशव्यांच्या ग्रामदेवता श्रीवर्धन येथेच कुसुमादेवी, सोमजाई, जिवनेश्वर व भैरव ह्या चार आजही प्रसिद्ध व नित्य पूजित अशा आहेत. सवाई माधवराव ह्यांच्या जन्मानिमित्त सर्वभर जे उत्सव समारंभ आणि देकार इत्यादी झाले, त्यांत श्रीवर्धन येथील कुसुमादेवी व स्थानपुरुष हे सोडून बाकी देवांपुढे दक्षिणा ठेवल्याची नोंद आहे. अशाच आणखीही नोंदी सापडतात.

ह्या नारायण देवस्थानाचा प्राकार चांगला प्रशस्त असून त्यात एक मोठी पुष्करणी आहे. प्रतिवर्षी येथे तीन मोठे व एक छोटा असे चार उत्सव परिस्थितीनुसार सांप्रत साजरे होतात. त्यांत एक थोरल्या बाजीरावांचा स्मृत्युत्सव वैशाख शु. १३ स साजरा होतो. ह्या देवस्थानास ४॥ खंडी भात आणि जोशी वाडीतील आगराचे ७५ रु. हे उत्पन्न सनदी आहे व वहिवाट पंचाकरवी होते. पंचमंडळीत स्थानिक ब्राह्मण प्रभु गृहस्थ आहेत.

—×—

श्री. य. न. केळकर यांचे संग्रहातून उपलब्ध झालेल्या नोंदीमध्ये श्रीवर्धनचा वाडा शाकारण्याबद्दलच्या तजवीजीची एक नोंद मिळते –

छ ६ रजब समान सीतैन मया व अलफ
(२८ नोव्हें. सन १७६७ शनिवार)

का॥ श्रीवर्धन येथे सरकारचा वाडा बांधला आहे त्यांस शाकारणीस सालगु॥ बाजी गंगाधर बेलापूर याजकडून कवले सत्तर हजार देविली होती त्यास त्याजकडील कवले वाईट सबब नेली नाही याजकरिता हाली तुम्हाकडून नळे कवले फर्मासी सुमार ७०,००० सत्तर हजार देविली असेत तरी प्रां॥साष्टी पा खर्च लागेल तो देवून कवले तयार करून श्रीवर्धनचे बंदरी पोहोचऊन देणे म्हणोन रामाजी महादेव यांस रसानगी यादी सनद... १

का॥ श्रीवर्धन येथे श्रीजीवनेश्वराचे देवालय सरकारातून बांधले आहे. त्याचे शाकारणी बा॥ विटा सुमार ७५००० देविल्या तरी वसई प्रांते खर्च लागेल तो देवून विटा तयार करून गलबतावर घालून श्रीवर्धनास पोचोऊन देणे म्हणोन विसाजी केशव यांस सनद... १

वाड्याच्या परिसराची सद्य स्थिती

श्रीवर्धनच्या वाड्याची, त्या परिसराची अलीकडच्या काळातील स्थिती मात्र अगदी वेगळी आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, चे माजी कार्यवाह (हल्ली विश्वस्त) व इतिहासप्रेमी लेखक श्री. म. श्री. दीक्षित २२ मार्च ते २४ मार्च सन १९८६ रोजी श्रीवर्धनला जाऊन आले, त्या वेळी त्यांनी नोंदलेला तपशील–

"भट घराण्याच्या मूळ वास्तुच्या चबुतऱ्यावर १९६१ साली ४–५ खणी धर्मशाळावजा एक मजली इमारत उभारली गेली. पुराणवस्तुखात्याने आपल्या ताब्यातील हा चबुतरा 'सत्कार्य सेवा समाज संस्थे'च्या ताब्यात दिला. पण १९७३ साली इमारत नगरपालिकेच्या ताब्यात दिली. अलीकडे या हॉलच्या इमारतीचा उपयोग टेबल-टेनिस, नाटयप्रयोग, रिसेप्शन्स, प्रकट सभा इत्यादी कार्यासाठी केला जातो. इमारतीसमोर कायमचे स्टेज बांधलेले आहे. समोर कंपाऊंड घातलेले ऐसपैस आंगण आहे. इमारतीत काही पेशवे व इतर नेते यांच्या तसबिरी आहेत. मूळ वास्तूचे २-४ नक्षीदार दगड तेवढे पायापाशी दिसतात. शंभर एक लोक बसू शकतील एवढे साधे सभागृह आणि ५०० माणसे बसतील एवढी समोरची बंदिस्त जागा, अशी या स्मारकाची स्थिती आहे." ११ मार्च सन १९८८ रोजी या आवारात बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारला गेला आहे.

शनिवार वाडा

थोरल्या बाजीरावांनी वाडा बांधण्यासाठी जी जागा निवडली त्यात काही वैशिष्टय होते असे दिसत नाही. मुठा नदीच्या किनाऱ्यावर मुसलमानी अंमलात अरबांची किल्लेहिसार नावाची गढी बांधलेली होती. त्या जागेच्या दक्षिणेला आणि शिवाजी महाराजांच्या लाल महालाच्या पश्चिमेला असलेल्या मोकळ्या जागेत वाडा बांधायचे ठरले. येथे पूर्वी कसब्याची मावळवेस होती.

वाडयाचा पाया १० जानेवारी सन १७३० रोजी शनिवारी (सौम्यनाम संवत्सर, माघ शु. ३ शके १६५१) सुमुहूर्तावर घातला गेला. २२ जानेवारी सन १७३२ रोजी शनिवारी (विरोधकृतनाम संवत्सर माघ शु. ७ शके १६५३) रथसप्तमीच्या मुहूर्तावर वाडयाची वास्तुशांत झाली. पायाभरणी आणि वास्तुशांत या दोन्ही दिवशी शनिवार आणि वास्तूचे नाव 'शनिवार-वाडा' हा योगायोग समजावा का ? अशीही एक अख्यायिका सांगतात की, वास्तुशांतीचे देवक ठेवण्या-पूर्वी स्वतः बाजीरावांनी जवळच्या छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपणचे निवास-स्थान असलेल्या लाल महालाच्या अवशेषातून जमिनीतील माती वास्तुशांतीच्या जागेवर आणली. त्यानंतरच धार्मिक विधी पार पडले.

थो. बाजीरावांनी बांधलेला वाडा दुमजली व तीन चौकी होता. वाडयासाठी १६,१२० रु. खर्च आला असे द. ब. पारसनीस म्हणतात. परंतु ग. ह. खरे यांच्या मते जास्त खर्च झाला असावा. पेशवाई अखेरपर्यंतही वाडयात त्या त्या वेळच्या गरजांनुसार दुरुस्ती, फेरबदल, नवी बांधकामे नेहमी चालू असत.

वाडयाची तटासह दक्षिणोत्तर लांबी सुमारे १८४। यार्ड, पूर्व – पश्चिम रुंदी सुमारे १६४। यार्ड असल्याने याचा आकार जवळजवळ चौरस आहे. वास्तूने सुमारे

६। एकर जागा व्यापली आहे. तटाचा जमिनीपासून सुमारे १६ फूट भाग चिरेबंदी असून वरचे काम पक्क्या विटांचे केलेले आहे. तटाची एकूण उंची ३३ फूट आहे. तटाचा माथा ११ फूट रुंद असला तरी पाया त्यापेक्षाही रुंद आहे.

तटाला ९ बुरुज असून सर्वांवर तोफा बसवण्याची सोय केलेली आहे. यांपैकी 'पागेचा बुरुज' आतून पोकळ असून त्याच्या पायथ्यापाशी मध्यभागी बांधून काढलेला एक गोल खड्डा आहे. त्यात तोफांचे गोळे ठेवत असत असे म्हणतात. सामान्यतः बुरुजांना विशिष्ट नावे आढळत नाहीत. फक्त दिल्ली दरवाजाच्या दोन्ही बाजूचे बुरुज बहुकोनी, संपूर्ण चिरेबंदी व लंबरूप आहेत. तटबंदीला पाच दरवाजे असून त्यांना अनुक्रमे १. दिल्ली, २. अलीबहाद्दर किंवा मस्तानी, ३. खिडकी, ४. गणेश, ५. नाटकशाळा ऊर्फ जांभूळ दरवाजा ही नावे आहेत. सर्व दरवाजे टोकदार कमानीं-मध्ये असून मोठे अणकुचीदार लोखंडी खिळे व जाडजूड पट्टया ठोकून ते भक्कम केलेले आहेत. यांपैकी दिल्ली दरवाजाची उंची २१ फूट असून रुंदी १४ फूट आहे. हाच सर्वांत मोठा दरवाजा. दिल्ली आणि गणेश या दोन दरवाजांमधूनच विशेष जास्त वावर होत असे. वाड्याच्या सर्व तटांवर मिळून २७५ शिपाई, रात्रंदिवस पहाऱ्यासाठी ५०० स्वार आणि वाड्यातील अंतर्गत बंदोबस्तासाठी १००० पेक्षा अधिक नोकर होते.

दिल्ली-दरवाजावर नगारखाना आहे. आगीच्या प्रलयातून वाचलेला अस्सल पेशवेकालीन शाबूत असलेला भाग एवढाच आहे. देवडीच्या भिंतींवर शेषशायी, गणपती, इत्यादी हिंदू देवतांची चित्रे काढली आहेत. ती आता बरीच खराब झाली आहेत. वाड्याच्या आतल्या भागांमध्ये काय चालले आहे, हे बाहेरच्या माणसांना दिसू नये म्हणून दिल्ली-दरवाजा, देवडी, आणि आतला चौक एका रेषेत न आणता नागमोडी रचना केली आहे. जुन्या योजनेनुसार वाड्यासाठी लागणारी जागा आणि प्रत्यक्ष बांधलेल्या इमारतींनी व्यापलेली जागा यांत तफावत पडू लागली म्हणून जवळचे इतर वाडे पाडून जागा मिळवावी लागली. ज्यांचे वाडे पाडले त्यांना मोबदला म्हणून पर्यायी जागा दिल्या.

एक मुसलमान सरदार पत्रात म्हणतो : "बाहेरून पाहता वाडा नरकासारखा दिसतो. आत स्वर्गासारखा दिसतो." १७९१ साली वाडा पाहून मेजर प्राइस म्हणतो : "वाड्यातील दिवाणखाना खूप प्रशस्त व जंगी होता. पण आत अत्यंत साधेपणा होता. लाकडातील खोदीव कामापेक्षा शोभादायक असे त्यात काही नव्हते. सर्व बैठकीवर पांढरी शुभ्र चादर एकजात पसरली होती."

थोरले बाजीराव, थोरले नानासाहेब, थोरले चिमाजीआप्पा, भाऊसाहेब, रघुनाथराव, जनार्दनपंत, थोरले माधवराव, विश्वासराव, नारायणराव, सवाई माधवराव, दुसरे बाजीराव, चिमणाजी रघुनाथ, ही पुरुष मंडळी, त्यांच्या स्त्रिया

थोरल्या राधाबाई, मस्तानी, थोरले समशेरबहाद्दर, थोरले अलीबहाद्दर, यांचे आयुष्य शनिवारवाड्यात गेले. त्यामुळे एकापेक्षा जास्त नावे असलेल्या वास्तूही शनिवारवाड्यात आढळतात. वेगवेगळ्या काळात वेगवेगळी नावे नोंदलेली आहेत.

या सर्व मंडळींना वावरण्यासाठी, दरबारी कामांसाठी, खासगी कामांसाठी वास्तू, भोजनगृहे, निवासस्थाने, दिवाणखाने, देवघरे, ग्रंथशाला, अश्वशाला, गोशाला, औषध–भांडार, व्यायामशाला, कोठीशाला, वस्तुभांडार, वस्त्रागार, शस्त्रागार वगैरेंसाठी इमारती बांधल्या गेल्या. सरदार, मुत्सद्दी, परराष्ट्रांचे वकील, वगैरेंची ये – जा, गाठीभेटी, खासा दरबार, उत्सवांचे दरबार, राज्याचा फड, यांसाठी इमारती निर्माण झाल्या. पाण्यासाठी हौद, विहीर, शोभेसाठी कारंजी बांधली. यांपैकी 'हजारी कारंजे' विशेष प्रसिद्ध आहे. हे १६ दलांचे, कमळाच्या आकाराचे असून त्याचा परिघ ८० फूट होता. त्याच्या मध्यभागी एक, चार कोपऱ्यात चार, प्रत्येक दलाच्या शिरेवर सहा, टोकासमोर एक, दोन दलांच्या जोड्यावर प्रत्येकी पाच मिळून एकंदर १९७ नळ्या होत्या. पुढे पाण्याचा पुरवठा कमी पडू लागल्यामुळे, पुण्यापर्यंत आणलेले कात्रजचे पाणी वाड्यात आणले. ते प्रथम वाड्याच्या अग्नेय कोपऱ्यात साठवून नंतर सर्व वाड्यात खेळवले गेले.

सन १७५८ मध्ये फक्त पेशवा-घराण्यातील २० व्यक्ती एकाच वेळी वाड्यात-राहात होत्या. नातेवाईक वगैरे १५ माणसे धरली तर एकाच वेळी एकाच दर्जाची किमान ३५ माणसे वाड्यात राहात होती. त्यांचे सहाध्यायी, आश्रित नोकरवर्ग, पहारेकरी, सरकारी कामासाठी येणारे लोक, अधिकारी व सेवकवर्ग, मिळून वाड्यात १००० मंडळी वावरत असतील. त्यामुळे थोरल्या नानासाहेबांच्या काळात जास्त इमारती बांधल्या. सन १७६१ नंतर वेग मंदावला. वाड्याला किल्ल्यासारखा तट बांधायची प्रथम योजना होती. १७३१ साली तटाचे बांधकाम सुरू देखील झाले होते. पण थोरल्या शाहू महाराजांनी विरोध केल्यामुळे बांधकाम थांबविले. त्यांच्या मृत्यु-नंतर, १७५५ साली आज दिसणारी तटबंदी बांधली. १७५२ साली दिल्ली – दरवाजा, १७६० साली दगडी बुरुज बांधले, अशी नोंद आहे.

या वास्तूत गणेशमहाल विशेष वैभव संपन्न होता. तो १७५५ साली थोरल्या नानासाहेबांनी बांधला. पेशव्यांकडील गणेशोत्सव याच महालात साजरा होई. महालाच्या एका भिंतीत सुंदर मखर तयार करवून त्यात संगमरवरी दगडाची भव्य गणेशमूर्ती कायमची प्रतिष्ठापित केली होती. मूर्तीच्या बाजूला भिंतीवर पौराणिक कथाप्रसंग चितारले होते.

दसऱ्याचा दरबार गणेशमहालातच भरत असे. युद्धांचे विजयोत्सवही याच महालात साजरे होत. सवाई माधवरावांचा विवाहसमारंभ १७८२ साली येथेच

साजरा झाला. परराष्ट्रीय वकिलांची, मुत्सद्यांची, अधिकाऱ्यांची भेट पेशवे याच महालात घेत असत.

वाड्याच्या एका दालनात पेशव्यांचा ग्रंथसंग्रह होता. त्यात संस्कृत, प्राकृत भाषांतील अनेक दुर्मिळ ग्रंथ, पोथ्या, आणि प्राचीन हस्तलिखिते होती. एक चित्रशाळा होती. तिथे पेशवे, पेशव्यांचे प्रमुख सरदार, मोगल पातशाह, काही प्रसिद्ध ब्रिटिश अधिकारी, निजाम, हिंदुस्थानातील प्रमुख राज्यकर्ते, इत्यादींची रंगीत तैलचित्रे होती.

एक जिन्नसखाना ऊर्फ अजबखाना या नावाचा महाल होता. त्यात अत्यंत दुर्मिळ, परिश्रमपूर्वक जमा केलेल्या, भेटीदाखल आलेल्या वैचित्र्यपूर्ण वस्तू ठेवलेल्या असत. तेथे पृथ्वीचा मोठा ग्लोब होता. त्यावर प्रमुख देश, शहरे व नद्यांची नावे लॅटिन भाषेत लिहिलेली होती. हा सवाई माधवरावांना भूगोल शिकवण्यासाठी जमा केलेल्या साधनांपैकी असावा असा तर्क आहे. त्यांचा भूगोल-शिक्षक युरोपियन (बहुदा ब्रिटिश) होता.

शनिवारवाड्याच्या एका भव्य महालात भिंतीवर 'ब्रिटिश – मेकचे' घड्याळ लक्ष वेधून घेईल अशा जागी लावले होते. ते सतत कार्यरत होते. २७ जानेवारी सन १८२७ रोजी लागलेल्या मोठ्या आगीत विध्वंस होईपर्यंत घड्याळ नियमित चालू होते हे विशेष.

दुसऱ्या बाजीरावांनी शनिवारवाड्यात राहणे आवडेनासे होऊन स्वतःसाठी बुधवारवाडा, शुक्रवारवाडा, विश्रामबागवाडा, हे वाडे बांधले. साधारणतः १८०८ सालानंतर पेशव्यांचा वावर कमी झाल्यामुळे शनिवारवाड्याच्या वैभवाला उतरती कळा लागली. तथापि उत्सव-समारंभ, इंग्रजांच्या भेटीगाठी, खासे दरबार, विशेष समारंभ शनिवारवाड्यातच होत होते. देखरेखीच्या कमतरतेमुळे वाड्यातील इमारती आगीत भस्मसात होऊ लागल्या.

७ जून १७९१ ला पहिली आग लागली. याखेरीज ७ आगींचे उल्लेख मिळतात. संपूर्ण कोठी, सातखणी बंगला, जवाहिरखाना, काही तसबिरी, दुसऱ्या बाजीरावांनी बांधलेला आस्मानी महाल, नवा दिवाणखाना, ह्या इमारती वेगवेगळ्या आगीत भस्मसात झाल्या. आग पसरू नयेत म्हणून काही बांधकामे पाडावी लागली. २१ फेब्रुवारी सन १८२८ ला सर्वात मोठ्या आगीत नगारखाना, नानासाहेबांचा जुना आरसेमहाल यांसह इतर काही किरकोळ इमारती वगळता बहुतेक सर्व बांधकाम भस्मसात झाले.

येरवड्याच्या लढाईनंतर १६ नोव्हें. सन १८१७ च्या रात्री दुसरे बाजीराव पुणे सोडून गेले. त्यानंतर पेशवा कुटुंबातील कोणाही व्यक्तीचे पाय या इतिहास प्रसिद्ध वास्तूला लागले नाहीत. १७ नोव्हें. सन १८१७ ला संध्याकाळ पूर्वी कोतवालीतून

किल्ल्या आणून पुण्याचा कलेक्टर हेन्री डंडास रॉबर्टसन साहेबाच्या उपस्थितीत दिल्ली दरवाजा उघडला गेला. थोड्याच वेळात शनिवारवाड्यावर 'युनियन जॅक' फडकला.

इंग्रजांची मध्यवर्ती कचेरीही शनिवारवाड्यात स्थलांतरित झाली. १८२१ साली वाड्याचे तुरुंगात रुपांतर झाले. १८२५ साली मुख्य इमारतीच्या पहिल्या मजल्यावर तुरुंग, दुसऱ्यावर दवाखाना, तिसऱ्यावर वेड्याचे हॉस्पिटल असल्याची बिशप रेजिनॉल्ड हेबर यांची नोंद आहे.

मुंबई इलाख्याचे ब्रिटिश गव्हर्नर सर जॉर्ज लॉईड यांना शनिवारवाड्याविषयी फार आदर वाटत असे. वाड्याच्या आतील मातीच्या ढिगाऱ्यांचे उत्खनन करून शनिवारवाड्याचे मूळ रूप उजेडात आणण्याचे काम ह्यांच्याच हुकूमाने 'डिपार्टमेन्ट ऑफ आर्केऑलॉजी' तर्फे पार पडले होते.

* *

प्रकरण पाचवे

कुलदेवता – कुलाचार

श्रीवर्धनचे भट, ऋग्वेदी चित्तपावन ब्राह्मण घराणे. त्यांचे गोत्र गार्ग्य, सूत्र आश्वलायन, शाखा शाकल. गार्ग्य हे त्रिप्रवरी गोत्र असून त्याचे प्रवर आंगिरस, ब्राहस्पत्य, भारद्वाज हे आहेत. 'चित्तपावन' पुस्तकात, चित्तपावनांच्या ६० प्राचीन आडनावांच्या यादीत गार्ग्य गोत्रजांमध्ये भट आडनाव नाही. १. कर्वे, २. गाडगीळ, ३. लोंढे, ४. माटे, ५. दावके ही आडनावे आढळतात. मात्र गार्ग्य गोत्राच्या श्लोकात 'भट' आडनाव आहे. भटांचे देशमुखी गाव असलेल्या हरिहरेश्वरचा उपलब्ध इतिहास मनोरंजक आहे. कुलदेवता, कुलाचारांपूर्वी तो पाहू या.

श्री क्षेत्र हरिहरेश्वर

हरिहरेश्वरचा सन १७१५ पासूनचा थोडातरी इतिहास उपलब्ध आहे. प्राचीन इतिहास बहुधा कुठेही उपलब्ध नसावा. मूळ देवालये व पायऱ्या जावळीचे सुभेदार राजे चंद्रराव मोरे यांनी बांधल्या. शिवाजी महाराज येथे अनेकदा दर्शनासाठी येत असत. रामदास स्वामी महाबळेश्वरचे दर्शन करून हरिहरेश्वराचे दर्शन घेऊन गेल्याचा उल्लेख त्यांच्या तीर्थांच्या यादीत मिळतो. संभाजी राजे येथे दर्शनाला येत. यात्रेकरूंना त्रास न होईल अशी दक्षता घेत.

कालभैरवाच्या देवालयावरील कोरीव लेखानुसार या देवालयाचा जीर्णोद्धार थोरले बाजीराव पेशव्यांनी सन १७२३ मध्ये केला. बाळाजी विश्वनाथ पेशवे, हे दैवत नवसाला पावल्याबद्दल जीर्णोद्धार बोलले होते. तो नवस बाजीरावांनी पूर्ण केला. निर्णोद्धाराला आपलाही हातभार म्हणून कान्होजी आंग्रे यांनी एक हजार रुपये श्रीमंत बाजीराव पेशव्यांकडे दिले. या जीर्णोद्धाराबद्दलचा मंदिरातील लेख –

कोरीव लेख (शक १६४५ वैशाख शु. ?)


१ इष्वाब्धि शोडशे शाके । शोभकृत वत्सरे प्रभुः ।
माधवे के शुक्ले । प्रारंभे देवतालयम् ॥
२ श्री वर्धन देशाधिकृत । बाळाविश्वनाथामिध ।
सुत विश्वनाथानत । जीर्णोद्धारः कृतः ॥

श्रीकालभैरवाचे देवालय १७९३ साली आगीने जळाले. ते पेशवे सरकारने पुन्हा बांधले. देवळाच्या उजव्या बाजूला समुद्रकाठी धर्मशाळा होती. ती १७४९ साली बांधून पूर्ण झाली. चौघड्याची इमारत थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीत पूर्ण झाली. त्यांनी तेथेच १७६९ साली चौघडा सुरू केला. चौघड्यावर प्रथम मुसलमान लोक नेमले होते. कालांतराने हिंदू लोक नेमले. नैवेद्य नंदादीपाला रु. २०९० आ. १० व चौघड्याला रु. २४०० मिळत. रु. ४१ आ. १० चा पहिला हप्ता राजमाची गडावरून दिला गेला. श्रावण-कार्तिक अभिषेक सुरू झाला. त्यासाठी पुण्याहून ब्राह्मण येत.

पेशवे सरकारातून या देवस्थानाला महावस्त्रे (तिवेटी ३, दुपेटे ५, चिरा १, बादली १, पटका १, जरी खण १, भरजरी वस्त्रे देवीस १, जरी पातळ १, शेला १, मंदील जरी १, धोतरजोडी, देव पुसण्यास सुती शेला,– किंमत रु. १०३०) व नित्यवस्त्रे (लुगडी, तिवेटे, फेटे, चिरा बादली १, जरी कापड १, पटका १, दुपेटा १, धोतरजोडी १– किंमत रु. २६० आ. ८) दरसाल मिळत. शिवाय ३ खंडी भात, १।। मण मूग, ३ पायली उडीद, ६ शेर तूप, ६ मण तेल, २० नारळ, नळे, चंद्रज्योती व रोख रु. ३१ श्रावण व कार्तिक मासांकरिता मिळत असत. सर्व नोकरांना घरे दिली होती. ती शाकारण्यास पेंढा २००० मिळे. गुरवाला वर्षात ३ खंडी भात व ब्राह्मण पुजाऱ्याला दरमहा ५ मण भात शिवाय कापडचोपड, तसेच देव पुसण्यासाठी खादी व शेला मिळत असे.

येथे गुरव ब्राह्मण वगैरेंना कसलेच हक्क दिले नव्हते. देवाला सर्व देणग्या पेशवे सरकारमार्फतच द्याव्या लागत. अशा देणग्यांची नोंद थोरले बाजीरावांच्या रोजकीर्दीत नमूद आहे. चौघड्याच्या व्यवस्थेसाठी स्वतंत्र कारकून असे. बाकीची

श्री हरिहरेश्वर



व्यवस्था श्रीवर्धनचे मामलेदार पाहात. सेवेकरी व यात्रेकरूंना पेशवे-सरकारातून मदत मिळे. जरी जंजिऱ्याचे नवाबसाहेब पेशव्यांबरोबर मित्रत्वात वागत असत, तरी अनेक बेजबाबदार सरदार मराठी मुलखात त्रास देत. अशा वेळी हिंदू लोकांना बाणकोटचा इंग्रज रेसिडेन्ट आश्रय देत असे.

येथे अनेकांनी येऊन आपली पीडा निवारण केल्याच्या नोंदी पेशवे-दप्तरात आहेत. पीडिताला व सेवेकऱ्याला सरकारी मदत असे. श्रीमंत माधवराव आजारपणात ओरडत. त्यांची ओरड व क्लेश श्रीचा प्रसाद मिळताच थांबले असे म्हणतात. पेशवे-कुलातील स्त्रीपुरुष व सरदार येथे नेहमी दर्शनासाठी येत. खूप खर्च करीत. हे क्षेत्र देवघर नावाच्या खेड्याजवळ असून बंदर आहे. श्री हरिहरेश्वर काळभैरवाचे स्थान १/२ मैल डोंगराच्या पायथ्यापाशी अगदी समुद्रकाठी आहे.

हे जणू दक्षिणकाशी क्षेत्रच होय. येथे ब्रह्मा, विष्णू, महेश व आदिशक्ती पार्वती अशी चार वाळूची लिंगे आहेत. अगस्ती ऋषींनी यांची स्थापना केली असे म्हणतात. समोरच श्रीकाळभैरव योगेश्वरीसहित वाळूच्या स्थापित मूर्ती आहेत

'पोंक्षे कुलवृत्तांता'त (पृ. ३२५) पुढीलप्रमाणे माहिती आढळते. :–

"श्रीवर्धन गावचे उत्तर बाजूस श्री सोमजाई देवीचे देवळाजवळ थोड्या अंतरावर डोंगराचे पायथ्यास १. श्रीवर्धन देवीचे ठिकाण (उभ्या शिलेवर खोदलेला लेख) नजीकच आंब्याचे झाडाखाली दोन पादुका दगडी जुनाट आहेत. त्या श्रीवर्धन देवीच्या म्हणतात. जवळच १. श्री वागजाई २. केदार (बहिरी) ३. नवलाई ४. महाकाली महासरस्वती महालक्ष्मी (कुसुमादेवी) ह्या उभ्या दगडी मूर्ती आहेत. सर्व देवतांचा प्रतिवर्षी उत्सव अश्विन शु. १ ते शु. ९ नवचंडी पाठ असा सर्व गावाचा होतो."

नारायणराव पेशव्यांच्या जन्माबद्दल श्रीस नारळ व वस्त्रे आली होती. सौ. रमाबाई पेशव्यांनी दर्शनाला येऊन रु. १०४ आ. २ खर्च (दक्षिणा रु. ६९, कपडे रु. ३५ आ. २) केले. अनेक सरदार, प्रवासी, इंग्रज अंमलदार येथे येत असत. सुवर्णदुर्ग तालुक्यातून श्रावणमासी रु. ७ भात, डाळ, तूप, वगैरे सामान येत असे. कार्तिकमासात २४ रु. तोफेची दारू, नळे– चंद्रज्योती येत असत. येथे वर्षातून दोन यात्रा भरतात. एक महाशिवरात्रीची, दुसरी कार्तिकात भैरवाष्टमीची. दसरा व यात्रेचे दिवशी येथे तोफ वाजत असे. तोफ सन १७३३ पासून सुरू झाली होती.

पूर्वी यात्रेकरूंना शिधासामुग्री, लाकूडफाटा, भांडी, पेशव्यांच्या कारकुनांकडून मिळत असत. राजापुरीचे देशमुख मानकर यांच्या कुटुंबातील दोन स्त्रियांनी सेवा केली. त्यांना पेशव्यांकडून दरमहा १०० रु. व एक नोकर मिळत असे. नारो

त्र्यंबक सोमण यांनी २५० रु. खर्च करून देवळानजीक दिपमाळ बांधली आहे. (पहा : १) भा. इ. सं. मं. त्रै. व. १९ अंक ४:२) हरिहरेश्वर संक्षिप्त वर्णन)

कुलदेवता व नैवेद्य

पेशव्यांच्या देवघरातील देवतांची नावे, एकूण सख्या आणि देवतांचे नैमित्तिक नैवेद्य याबद्दल, सरदार आबासाहेब (गं. ना.) मुजुमदार यांनी प्रसिद्ध केलेल्या दोन नोंदी येथे दिल्या आहेत.[1] यांपैकी लेखांक १ सरदार ओंकारांकडील, लेखांक २ कुलोपाध्याय कर्व्यांकडील आहे.

लेखांक १ ॥ श्री ॥

यादी ग्रामदेवता वगैरे देवतांस नैवेद्य घालावयाचे ते :

१५ नवरात्रांत व कार्यप्रयोजनीं घालावयाचे तपसीलवार

१ उतरेश्वर कुलस्वामी (देवतांची यादी)
१ जोगेश्वरी कुलस्वामी
१ महालक्ष्मी कोलापूरवासिनी
१ हरिहरेश्वर वस्ती हरेश्वर
१ कालभैरव वस्ती हरेश्वर
१ गणपती हरेश्वरचा
१ भैरव वस्ती श्रीवर्धन
१ जिवनेश्वर वस्ती श्रीवर्धन
१ लक्ष्मीनारायण वस्ती श्रीवर्धन
१ स्थानपुरुष वस्ती श्रीवर्धन
१ सोमजाई वस्ती श्रीवर्धन
१ कुसुब देव वस्ती श्रीवर्धन
१ बाबदेव दिव्याचा
१ कालेश्वरी पुजाऱ्याची
१ काळकाई मघऱ्याची

१५

२ नवरात्रात दसऱ्यापावेतो (नैवेद्यांची यादी)
१ दिपावलीचे पाडव्यास
१ वर्षप्रतिपदेस
१ सीमगी पौर्णिमेस
१ व्रतबंधास

१ विवाहास
१ आन्यत्र पुण्याहवाचन दिवसी श्रावणीचे व शाल्योदक मात्र खेरीज करून.
१ मरवादिक कर्माचे दिवसी
१ श्रावणीचे दिवसीचे स्थानपुरुषाचे नावे नारळ एक फोडावा व गूळ-पावशेर, वजनाचे प्रमाण नाही.

२५

लेखांक २ **।। श्रीगणेशायनमः ।।**

।। अद्येत्यादि प्राप्त्यर्थं गार्ग्य गोत्रोत्पन्नेन बाजीरावशर्मणा* मम यजमानेन अनुज्ञातोहं तत्पुत्रस्य भावी व्रतबंधकर्मणः निर्विघ्नतासिद्ध्यर्थं प्रथमं तत् ग्राम देवताभ्यः कुलदेवतादिभ्यश्च तांबुलसमर्पणं अक्षतसमर्पणंच करिष्ये ।।

१ श्रीलक्ष्मीनारायणाय सांगाय सपरिवाराय तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीस्छानपुरुषाय नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्री कालभैरवाय नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीकुसुमादेव्यै नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीमहालक्ष्म्यै नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीउतरेश्वराय नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीभैरवाय नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीकालश्रियै नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीगणपतये नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीकालिकायै नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीजीवनेश्वराय नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीसोमजाईदेव्यै नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीयोगैश्वर्यै नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीहरिहरेश्वराय नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीबाबदेवाय नमः तांबूलं समर्पयामि ।।
१ श्रीसमस्तकुलदेवताभ्यो नमः तांबूलं समर्पयामि ।।

सवाई माधवराव पेशव्यांच्या प्रथम विवाहाच्या निमित्ताने सर्व देवतांना आहेर दिले. त्या यादीत [२] देवतांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : १ श्रीहरिहरेश्वर, १ श्रीकालभैरव, १ श्रीउतरेश्वर, १ श्रीमहादेव, १ श्रीजीवनेश्वर, १ श्रीसोमजाई,

* दुसऱ्या बाजीरावांच्या पुत्राच्या व्रतबंधाचा प्रसंग पेशवाईत आला नाही. यावरून हा उल्लेख थोरल्या बाजीरावांचा असणे शक्य आहे.

१ श्रीकुसुबदेवी, १ श्रीस्थानपुरुष, १ श्रीक्षेत्रपाल लक्ष्मीनारायण, १ श्रीजोगेश्वरी, १ श्रीमाहालक्ष्मी, १ श्रीकालेश्वरी कारल्याची, १ जाखमाता खुजाऱ्याची, १ श्रीकालकाई मेघऱ्याची, १ श्रीकालभैरव दिव्याचा. या यादीतील 'जाखमाता खुजाऱ्याची', ही बहुदा दुय्यम देवता असावी. श्रीलक्ष्मीनारायणाचे दोन उल्लेख १ श्रीक्षेत्रपाल लक्ष्मीनारायण, २. लक्ष्मीनारायण वस्ती श्रीवर्धन, असे अनुक्रमे उपरोक्त आहेर यादीत व लेखांक १ मध्ये आढळतात. क्षेत्रपाल शब्दावरून, लक्ष्मीनारायण श्रीवर्धनचे ग्रामदैवत असा निष्कर्ष निघू शकतो.

व्यक्तिगत उपास्य दैवते

घराण्याच्या मुख्य देवघरात वर दिलेल्या देवतांचा समावेश असे. याखेरीज खासे मंडळींची स्वतःची स्वतंत्र देवघरेही असत. त्या त्या व्यक्तीच्या वैयक्तिक उपास्य देवतेची तिथे स्थापना केलेली असे. महादेव हेच या घराण्याचे कुलदैवत. पूर्वी पत्रव्यवहारावर खासा पत्रलेखक श्रीकारा पुढे आपल्या उपास्य दैवताचे नाव लिही. त्यावरूनही उपास्य देवतेचा खुलासा होतो. श्री. य. न. केळकरांनी याबद्दल सविस्तर लिखाण केले आहे.[३]

पत्रांप्रमाणेच शिक्के देखील उपास्य दैवत शोधायचे उत्तम साधन आहे. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या शिक्क्यात शंकराचा स्पष्ट उल्लेख आहे. थोरले बाजीराव, थोरले चिमाजीआप्पा या दोघांचेही उपास्य दैवत शंकरच होते. या दोघांकडून प्रत्यक्ष किंवा त्यांच्या आर्थिक सहाय्याने जी प्रमुख देवळे निर्माण झाली, ती मुख्यतः शंकराची होती. उदा. – ओंकारेश्वर, पाषाणचा पंकजेश्वर किंवा अमृतेश्वर आणि ज्योर्तिलिंगांपैकी सुप्रसिद्ध भीमाशंकर. या देवस्थानांची मांडणी थोरले बाजीराव व चिमाजीआप्पांच्या पुरस्काराने भिडे सावकारांनी केली. बाळाजी विश्वनाथांनंतर आपल्याला पेशवापद मिळाल्याची माहिती थोरल्या बाजीरावांना वडूथ येथे समजली. त्या जागी त्यांनीच शकुनेश्वर ऊर्फ शकुंतेश्वर महादेवाची स्थापना केली. थोरल्या बाजीरावांच्या खाशा देवपंचायतनात 'उत्तरेश्वर' नावाचे अपूर्व बाणलिंग होते. ते कंपवात झालेल्या दुसऱ्या बाजीरावांच्या हातून बिठूर येथे त्यांच्या मृत्युपूर्वी काही आठवडे हातातून निसटून भंगले. (त्रै १८ : ४)

सदाशिवराव भाऊसाहेबही कट्टर शिवोपासक होते. श्रीत्र्यंबकेश्वरचे ज्योतिर्लिंग व मंदिर यांचा जीर्णोद्धार त्यांनी केला. त्यांच्या देवपंचायतनात एक काश्मिरी लिंग होते. त्याची अर्चा पेशवाई अखेरपर्यंत चालू होती. भाऊसाहेबांच्या मृत्यूनंतर काश्मिरी लिंगाची स्थापना खाशा देवघरातून मुख्य देवघरात झाली. 'खमस खमसैन छ ३० जमादिलाखरच्या' पेशवे रोजकिर्दीतील नोंद : "१२ रु. छ २५ रोज प्रदोषानिमित्य खर्च राजश्री भाऊंच्या देवघरात काश्मिरी लिंगावर अभिषेक केला त्यास.'

शके १७३५ मध्ये दुसऱ्या बाजीरावांनी आपल्या खाशा व घराण्यातील इतर महत्त्वाच्या देवतांच्या पूजाअर्चेचा मक्ता दिला होता. त्यातही या काश्मिरी लिंगाचा उल्लेख आहे.

थोरले नानासाहेबही कट्टर शिवोपासक होते. पुण्याला पर्वतीवरचे श्रीदेव-देवेश्वर संस्थान, नसरापूरचे नरसेश्वराचे मंदिर, महादेवाचे बनेश्वर मंदिर, ही त्यांचीच निर्मिती आहे. ऑगस्ट सन १७४९ मध्ये बनेश्वर मंदिराची सुरुवात झाली तर २० मे सन १७५९ ला वडगावला शकुंतेश्वराची स्थापना झाली.[४] नानासाहेब गणेशभक्तही होते. पेशव्यांच्या प्रख्यात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात त्यांनीच सुरू केला. त्यापूर्वीचे स्वरूप मर्यादित असे. श्रावणातील देकारानंतर भाद्रपदात गणेशोत्सव शनिवारवाड्यात[५] टोलेजंग पद्धतीने गणेश रंगमहालात साजरा होई. याच काळात पेशवे घराण्यात गणेशोत्सवाला कुलाचाराचे रूप प्राप्त झाले.

थोरले माधवराव पूर्ण गाणपत्य होते. त्यांनी नीलरत्नाची गणपतीची मूर्ती मुद्दाम करवून घेतली होती.[६] असाध्य दुखण्यामुळे माधवराव थेऊरला आले, त्याच दिवशी त्यांनी दहा हजार रुपयांचा मोत्याचा तुरा गणपतीला वाहिला होता.

रघुनाथरावांसारखा अतिकट्टर शिवोपासक पेशवा घराण्यात दुसरा कोणी, झाला नसेल. तेव्हाच्या पत्रव्यवहारात काही सांकेतिक नावे रूढ झाली होती. वृद्ध किंवा कपि म्हणजे सखारामबापू बोकील, लेखक म्हणजे नाना फडणीस, सुधा (अमृत) म्हणजे अमृतराव[७] पेशवे, शिवाय अमृतरावांचे उल्लेख 'संजीवनी' (अमृतसंजीवनी या अर्थाने), 'त्रयोदश अवतार' (अमृत हे १३ वे रत्न) असेही आढळतात तसाच रघुनाथरावांचा उल्लेख 'सांब' नावाने आढळतो.

रघुनाथरावांचा सांबाचा देव्हारा चांदीचा[८] होता. स्वतःच्या शिक्क्यात त्यांनी 'श्रीसांब सपुत्रो' हे शब्द घातले होते. हरणाचे दूध पिणे, सूर्याला गरम पाण्याचे अर्घ्य देणे, सोमवार सांबाचा वार म्हणून त्या दिवशी कारकुनी कामे व कचेरी बंद ठेवणे ही रघुनाथरावांची पद्धत असे. सांबासाठी खास पालखीची नेमणूक होती. रघुनाथ-राव जातील तिथे हा लवाजमा जात असे.

रघुनाथरावांच्या देव्हाऱ्यात किती आणि कोणते देव होते याची थोडी माहिती उपलब्ध आहे. १. सांब हा मुख्य देव. २. नारायण म्हणजे कृष्णार्जुनाची रथाधिष्ठित मूर्ती, याखेरीज सांबाच्या भोवती १. पार्वती १२ तोळे, २. गणपती ५। तोळे, ३. कार्तिकस्वामी १०। तोळे अशा तीन सोन्याच्या मूर्ती होत्या. त्याखेरीज ९॥ तोळे वजनाचे भैरवी यंत्र होते. शिवाय सोन्याचे मोर, पोवळ्याचा गणपती, बाण, वगैरे होतेच. एक अपूर्व दक्षणावर्त शंख होता.

रघुनाथनावांच्या दैवतात कार्तिकस्वामी आणि व्यंकटेश यांचीही गणना होती. म्हणूनच त्यांनी पर्वतीवर कार्तिकस्वामींची स्थापना केली. श्रीव्यंकटेशाची मूर्ती

त्यांच्या देवांमध्ये असावी पण त्यांच्या कोपरगावच्या देवतार्जनात नसावी असे वाटते.[९]

दुसरे बाजीराव बिठूरला गेल्यावर त्यांचे देव पुण्याला खाशा देवघरातच राहिले होते. त्यांच्या चौथ्या पत्नी वाराणसीबाई वाईच्या फाटक-रास्त्यांकडील. या माहेरपण संबंधामुळे पेशव्यांचे काही देव वाईला होते. वाईला राहिलेले देव, १८३६ साली पुण्याहून बिठूरला रवाना झाले. हे काम लोकहितवादींचे वडील हरीपंत गोविंद देशमुख[१०] यांनी केले. यात सवाई माधवरावकालीन हिऱ्याचे चौकीवरील पंचमुखी महादेवाची मूर्ति होती. समकालीन मूल्यमापनानुसार त्या काळची या देवांच्या दागिने व जवाहिराची किंमत २ लाख रु. भरते. यापैकी बरेच जवाहिर दुसऱ्या नानासाहेबांनी १८५७ च्या धामधुमीत बिठूरला भागिरथीमध्ये टाकले.

गोडसे भटजींच्या पुस्तकात वरील देवांखेरीज दोन देवांचा उल्लेख आहे:[११] " थोरले माधवराव यांस अमोलिक रत्नासारखे वडाचे पुष्प मिळाले होते तेही घेतले. दक्षणावर्त शंख घेतला. गौरीशंकर नावाचा अत्युत्तम कांतीचा बाण होता, तोही घेतला. याप्रमाणे आणखी काही राजरत्ने होती ती शेल्यात बांधून घेऊन देवास नमस्कार करून संपत्तीने भरलेला वाडा सोडून बाहेर पडले. त्यासमयी तिघांचेही नेत्रांतून अश्रुधारा चालल्या होत्या. "

अमृतराव आणि त्यांचे चिरंजीव विनायकराव पेशवे कट्टर गणेशभक्त होते. अमृतरावांनी वाराणसीला बांधलेले अमृतविनायक मंदिर अभ्यासकांना ज्ञात आहेच.

बिहूर येथील कुलाचार

बिहूर येथे दुसरे बाजीराव परंपरागत कुलाचार कसे पार पाडीत, त्याबद्दल उपलब्ध असलेल्या नोंदी मनोरंजक वाटण्यासारख्या आहेत.[१२] तेथे मुख्यतः पाच उत्सव होत.

१. **कृष्णेचा उत्सव** – वैशाख शु. १ पासून दहा दिवस दररोज भोजनाला दीडशें पान. अकराव्या दिवशी लळीत. बाराव्या दिवशी पारणे. त्या दिवशी मुक्तद्वार. पात्री दक्षिणा एक आणा. दररोज पुरणपोळी. शेवटी एक पक्वान्न. सकाळी गाणे. तिसरे प्रहरी नाच. रात्री कथा बारा वाजेपर्यंत. आरतीच्या वेळी पाच तोफा सोडीत. एकंदर पाच हजार रुपये खर्च होत असे.

२. **भागीरथीचा उत्सव** – ज्येष्ठ शु. १ पासून शु. १० पर्यंत. दररोज आठ हजार पान. दररोज नवे पक्वान्न. विशेष पक्वान्न मांडे व पोळ्या होत असत. दक्षिणा एक आणा. बाकी सर्व व्यवस्था पहिल्या उत्सवाप्रमाणे. एकंदर खर्च रु. २४ हजार. पक्वान्न २८ मणांचे लागत असे.

३. **श्रीगोंदेचा उत्सव** – श्रावणात पहिल्या उत्सवाप्रमाणेच. हे सर्व उत्सव गंगेवर गंगामंदिरात होत असत.

४. **गणेशचतुर्थी** – भाद्रपद शु. ४. प्रतिपदेस सोन्याचा गणपती (१२१ तोळयांचा) बसवायचा शु. ४ स मखरात मृत्तिकेचा एक व शिवाय १२१ गणपती मखराबाहेर बसवायचे. ते शु. ५ स बोळवायचे. मखरातील गणपती अनंतचतुर्दशीस बोळवायचा. चतुर्थीच्या दिवशी बाजीराव स्वतः पूजा करीत. ६० मृत्तिका पूजेस आणीत असत. बाकी उत्सवाचा बेत वरप्रमाणे. हा उत्सव जुन्या वाड्यात (दु. नानासाहेब राहात असत तो वाडा) होत असे.

५. **बालाजीचा उत्सव** – आश्विन शु. १ पासून शु. १० पर्यंत. वरप्रमाणे.

दर अमावस्येला दर्श करीत. त्यास दहा ब्राह्मण व तीन सुवासिनी. दक्षिणा प्रत्येकी दहा रुपये. वडिलांचे श्राद्ध– पांच ब्राह्मण, दक्षिणा प्रत्येकी ५०० रु. सरस्वतीबाई (पत्नी, माहेर पेंडसे) हिच्या श्राद्धासाठी पांच ब्राह्मण, दक्षिणा प्रत्येकाला १२०० रु. अहेव नवमीच्या सुवासिनी १००, प्रत्येकी दक्षिणा ५ रु. वद्य तृतियेच्या पक्षासाठी १२५ ब्राह्मण. प्रत्येकी १० रु. दक्षिणा. पिंडास भात पाच मण तांदुळाचा. प्रत्येक पिंड सुमारे ३ शेर भाताचा. असे १२५ पिंड करीत. ब्राह्मणास विडा देत. त्याची किंमत ५ रु. ह्या विड्याला त्रयोदशगुणी विडा म्हणतात.

कथा, कीर्तनात सुपारी, लवंगा, वेलदोडे, सूठ-मूठ भरून देत. दररोज वैश्वदेवाला पाच शेर वजनी तांदुळाचा भात लागे. बाजीरावसाहेब स्वतः प्रातः, मध्यान्ही, सायंकाळी अर्घ्य दिल्याखेरीज कधी राहात नसत.

बाजीरावसाहेब दररोज रात्री १२ वाजता उठत. बारा विष्णुसहस्रनामाचे पाठ स्वतः करीत. इतके होत आहे तोपर्यंत ३-४ घटिका उरत. गरम पाण्याचे स्नान केल्यावर संध्या वगैरे आटोपून सूर्योदयाला होमशाळेत अग्नीदर्शनाला येत. तेथून मेण्यात बसून गंगाकाठी ब्रह्मयज्ञास जात. प्रवाह काठापासून लांब असल्यामुळे काठावर कुंड तयार केले होते तेथे ब्रह्मयज्ञ करीत. त्या वेळी पुन्हा स्नान करीत नसत. वस्त्रांतर करीत. ब्रह्मयज्ञास तीन मण – १ मण जव देवास, १ मण तांदुळ ऋषीस, १ मण तीळ पितरांना. दररोज धान्य लागे. या कृत्यास चार घटका लागत.

स्वतः उपोषणे, एकादशी व चतुर्थी करीत. दोन द्वादशा व चतुर्थी ह्यांस दर महिन्यात मुक्तद्वार. बायका-पुरुष मिळून २००० पान होत असे. छायादान काशाचे भांड्यात पाच शेर तूप घालून दररोज ब्राह्मणास देत व गोप्रदान १०० रुपये दररोज २०० ब्राह्मण अनुष्ठानाला बसत. त्यांना दरमहा ८ रु. पगार असे. " धर्मात्मा सत्यसन्धश्च ॥ रामो दाशरथे यदि ॥ त्रैलोक्यानः प्रति द्वंद्व शरयीणं जहिरावणी ॥ " हा मंत्र त्या वेळी ब्राह्मणांनी म्हणावयाचा असे. पुत्रकामना इष्टी, शत्रूनाशार्थ इष्टी

ह्या महिन्या–दोन महिन्यांनी होत असत. अग्निहोत्रासंबंधी स्वर्गसत्र व नक्षत्र इष्टी होत असत.

बारा सणांचे बारा आणि वाढदिवस अशा १३ दिवशी नजराणे होत. बैठक होई. तेव्हा बाजीराव हजर असत. बारा सण – वर्षप्रतिपदा, अक्षय्य तृतिया, नाग-पंचमी, राखीपौर्णिमा, गणेशचतुर्थी, दसरा, दिवाळी (नर्कचर्तुदशी, बलीप्रतिपदा) संक्रांत, वसंत पंचमी, हुताशनी, रंगपंचमी आणि वाढदिवस, या दिवशी चार आण्यापासून आठ आणे दरमाणशी नजरा देत. दिवाळीत पाच दिवस नाच. ह्याला बाजीराव येत नसत. सुगंधी तेल व मसाल्याची तबके मानकऱ्यांकडे जात. कार्तिक महिना सर्व देवळात व गंगेवर दिवे लावीत.

खाशा पंगतीस दररोज महिनाभर धनुर्मास. माणशी आदपाव लोणी, अच्छेर तुपाच्या वड्या व मूगदळाचे लाडू. दररोज बायका-पुरुष मिळून १२५ होत. इतर चार ठिकाणी महिन्यात चार वेळा धनुर्मास होई. बेत खाशा पंगतीप्रमाणे. संक्रांत – तीळपात्र खुद्द बाजीरावांकडे चांदीचे ताट भर (वजन ४०० भार) तीळ व दक्षिणा एक मोहोर. इतर मंडळीस ताटे तांब्याची व दर पात्री २ रु. दक्षिणा. शिमग्याला बाजीरावांकडे पाच शेराची एक अशा गाठ्या असत. राख्याही मोठ्या असत. ह्या नजर येत.

बिहूरला पोहोचल्यावर बाजीराव ज्या जागी बसले तेथे लहानसा तंबू व त्यात गादी स्थापली. तिचे तोंड दक्षिणेकडे करून ठेवले. तिची रोज पूजा व नैवेद्य होत असे. दरसाल नवा कठडा घालीत पण पहिला काढीत नसत. गं. भा. आनंदीबाई मासिक शिवरात्रीस जागर करीत व चार प्रहरांना पूजा करीत.[१]

बिहूरच्या कपिलेश्वराला रोज रुद्राची एकादसणी आणि पाच शेर दहीभात महादेवाच्या पिंडीला लिंपण्याचा प्रघात होता. तो कालांतरानी काढून वानरांना खाऊ घालत. सूर्यास्ताचे वेळी वजनी मणभर चणे देखील वानरांना खाऊ घालत.

प्रचलित कुलाचार

पेशवे घराण्याच्या कुलोपाध्यायपणाची वृत्ती कर्वे घराण्याकडे ऐतिहासिक काळापासून सोपवली होती. आजही पेशव्यांचे कुलोपाध्याय तेच कर्वे घराणे आहे. "पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांची मुंज घरच्या गरीब परिस्थितीमुळे होऊ शकत नव्हती. त्या वेळी कर्व्यांनी त्यांची मुंज लावली. याबद्दल कृतज्ञता म्हणून बाळाजी विश्वनाथ यांनी स्वतः पेशवेपदावर आल्यावर, पेशव्यांचे कुलोपाध्यायपण कर्व्यांना दिले." ही आख्यायिका खरी नाही. कर्वे मंडळींना जी पहिली सनद पेशव्यांकडून मिळाली ती १७२९–३० साली थोरल्या बाजीरावांनी दिली आहे.[११]

पूर्वी राजघराण्यातील मंडळींना राजकारणाची घालमेल आणि लष्करी मोहिमा यामुळे सोयरसुतकाची बंधने पाळणे शक्य होत नसे. तेव्हा त्या त्या घराण्यांच्या कुलोपाध्यायांकडे सोयरसुतक पाळण्याची जबाबदारी सोपवण्यात येत असे. याला पेशवे घराणे देखील अपवाद नव्हते. 'राजमाचीकर' ही पेशव्यांचीच शाखा असल्यामुळे त्यांचेकडे पेशव्यांकडील सुतक पाळण्याची जबाबदारी सोपवलेली असे. इतर प्रासंगिक कर्तव्ये कर्व्यांकडे सोपवलेली असत.

अमृतराव पेशव्यांचे एक वंशज डॉ. वि. वि. ऊर्फ उदयसिंह पेशवा यांनी दिलेल्या माहितीनुसार, कुलदेवतांसंबंधीचा एक श्लोक रोज पूजेचे वेळी म्हणण्याची पेशव्यांकडे फार पूर्वीपासून प्रथा आहे. तो श्लोक पुढीलप्रमाणे : " श्रीलक्ष्मीनारायणं स्थानपुरुषं कालभैरवं कुसुंबाम् ।। श्रीमहालक्ष्मी उतरेश्वर भैरवो कालश्रियं गणपति ।। किलकालकायै श्रीजीवनेश्वर सहसोमजायै योगेश्वरी ।। हरिहरेश्वर बाबदेवां देवां नमामि ।। निज पूर्वज पूजितांघ्रिम् ।। ॐ ।। शुभं भवतु ।। "

अमृतराव पेशव्यांचे दत्तक नातू माधवराव विनायकराव पेशवा १९१३ साली वारले. ऐतिहासिक काळापासूनचे कुलाचार माधवरावांच्या मृत्यूपर्यंत बहुशः पाळले जात. त्यानंतर कारणपरत्वे बदल झाले. १९५५ सालानंतर याबाबत जास्त आटोपशीरपणा आला. स्थलकाल परिस्थितीनुसार हे स्वाभाविक आहे. सामान्यतः सन १९५५ नंतरच्या कुलाचारांचे येथे विवेचन केले आहे.

यापूर्वीच्या याद्यात दिल्याप्रमाणे, पारंपारिक कुलदेवता १५, महापुरुष १, अशा १६ नित्य पूजीत देवता आणि नवरात्रात देवी नैमित्तिक, अशा एकूण १७ देवता पुजल्या जातात. वार्षिक आणि नैमित्तिक पाळले जाणारे कुलाचार पुढील-प्रमाणे :

गौरीचे व्रत : चैत्र शु. ३ ते वैशाख शु. ३ दरम्यान, देवी चांदीच्या झोपाळ्यावर ठेवतात. एक महिनाभर सुवासिनींना भोजन. चैत्र शु. ३, चैत्र वद्य ३, वैशाख शु. ३ या दिवशी हळदी कुंकू समारंभ करण्याची प्रथा आहे.

बोडण : बोडण भरण्याची चाल आहे. कोणतेही मंगल कार्य झाल्यानंतर बोडण भरतात. पूर्वी याखेरीज नवरात्रात एक वार्षिक बोडण असे. हल्ली हे बोडण भरत नाहीत. फक्त कार्याचे भरतात.

नैवेद्य : देवता १५ आणि महापुरुष १ असे १६ नैवेद्य असतात. शनिवार-वाड्यात नारायणराव पेशव्यांची हत्या झाल्यानंतर पुढे त्यांचे नावे 'महापुरुष' हे स्थान निर्माण झाले. नवरात्रात आणि कार्याचा महानैवेद्य करतात. सामान्यतः पुरणपोळी, ५ भाज्या, ५ कोशिंबीरी, खीर, इतर नेहमीचे पदार्थ व गोड पक्वान्न असा महानैवेद्य असतो. १६ नैवेद्य, १६ स्वतंत्र ताटांमध्ये वाढले जातात. देवघरात

' महापुरुषाची ' सुपारी असते. सामान्यतः कार्याचे वेळी सुपारीचे विसर्जन करून नवीन सुपारी प्रतिष्ठित करतात. धुंधुरमासात रोज महिनाभर मुगाच्या लाडूचा नैवेद्य दाखवला जातो.

राजा माधवराव विनायकराव पेशवा १९१३ साली होळी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी वारले. म्हणून ' सिमगी पौर्णिमेचा ' नैवेद्य १९१४ सालापासून बंद झाला.

गोंधळ : पूर्वी रूढीनुसार नवरात्रात वार्षिक आणि कार्याचे वेळी गोंधळ असे. हल्ली फक्त मंगल कार्यानंतर गोधळ असतो.

तुलसीविवाह : जनरीतीप्रमाणे होतो. वेगळेपण असे नाही.

गणेशचतुर्थी : भाद्रपद शु. ४ ला श्री गणेशाची प्रतिष्ठापना होते. रोज गोड नैवेद्य. रोज रात्री शेजारती आणि वर्फी, विडा, दुधाचा नैवेद्य. विसर्जनाचा दिवस ठरलेला नसे. पूर्वी घरातील काही व्यक्तींचे चंद्रबळ पाहून पाच दिवसांनंतरच्या कोणत्याही योग्य दिवशी श्रीचे विसर्जन करीत. गेली काही वर्षे चंद्रबळ न पाहता सरसकट सातव्या दिवशी विसर्जन करतात. गणेशपूजन कुलोपाध्याय कर्व्यांकडून होते. विसर्जनाचे आदले रात्री शेजारती न होता श्रीची पाद्यपूजा होते.

वाराणसीला ' अमृतविनायक ' या पेशवा कुटुंबियांच्या खाजगी ट्रस्ट पैकी मंदिरात भाद्रपद शु. १ ते शु. ५ पर्यंत गणेशपूजन आणि माघ शु. ५ ला (वसंतपंचमी) वसंतपूजा आणि प्रसाद होतो.

उत्तर भारतात वास्तव्य असताना तेथेही गणेशोत्सव साजरा होई. तेव्हा गणपती १० दिवस पूजण्याची प्रथा होती. पेशव्यांकडील गणेशोत्सव म्हणजे स्थानिक लोकांना मोठे आकर्षण असे. आसपासचे लोक दर्शनाला येत. पूर्वी बासबरेलीत गणेशमूर्ती तयार केल्या जात नसत. पेशव्यांकडचे सेवकच मूर्ती घडवीत. पुढे पुण्याहून मूर्ती मागवण्याची प्रथा रूढ झाली. बासबरेलीला स्थानिक परिस्थिती-नुसार, पारंपारिक तांदुळाच्या उकडीचे मोदकाऐवजी गव्हाच्या कणकेचे तळलेले मोदक नैवेद्यासाठी करीत. पुन्हा पुण्यात स्थायिक झाल्यानंतर तांदुळाच्या उकडीचे मोदक करणे शक्य होऊ लागले. बासबरेली येथे विसर्जनाचे आदले रात्री लळीत व्हायचे. रात्री श्वेत वस्त्रावर कुंकवाची पावले काढली की गणपती उठला असे समजायचे. कै. विश्वनाथराव राजासाहेब पुणे–बासबरेली दोन्ही गावी जाऊन–येऊन असत. ते बासबरेलीला असले की तेथेच गणेशस्थापना होई.

गौरीपूजन : खड्यांच्या गौरीची पूजा होते. गौरी आगमनाच्या दिवशी नदीवर जाऊन गौरी आणून तबकात ठेवतात. रोज पूजा व नैवेद्य होतो. गौरी भोजनाचे

दिवशी घावन घाटले करून सुवासिनींना भोजनासाठी बोलावतात. पंचांगानुसार गौरींचे विसर्जन होते.

आश्विनातील महालक्ष्मी : तांदुळाच्या उकडीचा मुखवटा करतात. शरीराचा भाग हंड्यांची उतरंड रचून उभा करतात. हंड्यांमध्ये पाच प्रकारची धान्ये भरलेली असावी लागतात. देवीला स्वतंत्र कापडी हात जोडतात. सौभाग्यलेणी व अलंकारांनी देवी सजवतात. घरातील सुवासिनी पूजा करतात. संध्याकाळी मोठ्या प्रमाणावर हळदीकुंकू समारंभ होतो. रात्री साडेबारा वाजता देवीचे विसर्जन होते. देवी अंगात आलेल्या व्यक्तीला कोणीही काहीही प्रश्न विचारायचे नाहीत अशी फार पूर्वीपासून रूढी आहे.

घरात नूतन विवाह किंवा जन्म झाल्यास देवीचे कापडी हात बदलून नवीन कापडी हात तयार करतात. पूर्वीचे हात नदीत विसर्जित करतात. देवीच्या मंगळसूत्रात थोडी तरी भर घालून नवीन घडवून घेतात.

नवरात्र : आश्विन शु. १ ते आश्विन शु. ९ घटस्थापना. नवमीला होम. नऊ दिवस सप्तशतीचा पाठ वाचतात. नवरात्रात दिवा लावल्यानंतर वात बदलायची नाही. अखंड दिवा व रोज एक माळ वहायची असते. वाढती माळ नाही. माळ कोणत्याही फुलांची चालते. मात्र पहिल्या दिवशी ज्या फुलांची माळ असेल त्याच जातीच्या फुलांची लागते. फुले बदलता येत नाहीत. या काळात घरातील कोणीही व्यक्तीने कोणत्याही एकाच धान्याचे पदार्थ खावे अशी पद्धत आहे. नवरात्र उत्थापन झाल्यावर नवरात्रात पेरलेले गहू व शमीची पाने दसऱ्याच्या दिवशी कुलदैवतांना वाहून नंतर ज्येष्ठ मंडळींना द्यावी व आशिर्वाद घ्यावा.

इतर बाबी : हुताशनीला संध्याकाळी होळी पेटवतात. हुताशनीचा नैवेद्य आता करीत नाहीत. विवाहानंतर नवविवाहितांनी ओहोर जाण्याची म्हणजे कुलदेवतांच्या दर्शनाला जाण्याची चाल आहे. श्रावणात प्रत्येक शुक्रवारी सुवासिनी-भोजन करण्याची चाल आहे. श्रावणात शिवामूठ वाहण्यासाठी माहेरवाशिणी घराबाहेर जात नाहीत. घरच्या देवातील स्वतंत्र पंचायतनातच शिवामूठ वाहतात.

माधवराव विनायकराव पेशवा यांच्या मृत्यूपर्यंत पेशवाईतील श्रावणमास-दक्षिणेची प्रथा कुलाचार म्हणून चालू होती. श्रावण शु. ६ रोजी प्रतिकात्मक दक्षिणा दिली जात असे.

श्रावण व माघ या दोन महिन्यांत अनुक्रमे श्रीहरिहरेश्वर आणि श्रीउतरेश्वर या देवांना पूर्ण महिनाभर रोज अभिषेक होत असे. पूर्वी सांगतेच्या दिवशी लघुरुद्र करीत असत. आता लघुरुद्र करीत नाहीत. सांगता प्रत्येक महिन्याच्या शेवटी स्वतंत्रपणे होत असे. आता कुलाचार म्हणून नाही, फक्त वैयक्तिक श्रद्धा म्हणून श्रावणी सोमवारी अभिषेक करतात.

नर्कचतुर्दशीच्या दिवशी हनुमान पूजा व आरती होई. गूळ-चण्याचा नैवेद्य दाखवला जाई. कृष्णराव बाळासाहेबांनी स्वतःच्या श्रद्धेखातर जयपूरहून रामपंचायतनाच्या मूर्ती घडवून घेतल्या होत्या. तेव्हापासून बासबरेलीला रामनवमीचा उत्सव होत असे. रामनवमीच्या दिवशी तेथे कुटुंबियांपैकी कोणी असेल तरच हल्ली उत्सव करतात. अन्यथा नाही. रामनवमी हा कुलाचार नाही.

प्रत्येक धार्मिक उत्सवाची सांगता वसंतपूजेने होई. त्या वेळी ऋग्वेद, यजुर्वेद सामवेद, अथर्ववेद या चारही वेदांचे पठण होई. हल्ली सामान्यतः सामवेद आणि अथर्ववेदाचे वैदिक ब्राह्मण उपलब्ध नसल्यामुळे ऋग्वेद, यजुर्वेदाचे पठण होते.

गणेश मंदिर आणि अन्नपूर्णा अन्न-छत्र

श्रीमंत अमृतराव पेशव्यांनी राजकीय संन्यास घेऊन वाराणसीला १८०५ साली स्थायिक झाल्यावर १८०७ साली ज्येष्ठ शु. ६ या दिवशी (शुक्रवार, ११ जून) अग्नेश्वर घाटावर श्री गणेशाचे मंदिर बांधले आणि राजा घाटावर प्रथम घाट बांधून अन्नपूर्णा-मंदिर बांधले व अन्न-छत्र सुरू केले. यामुळे अग्नेश्वर घाटाची नावे गणेश घाट ऊर्फ नया घाट अशीही रूढ झाली. ही सर्व जमीन पूर्वी नागर ब्राह्मणांची होती. त्यांच्याकडून १८०७ साली श्रीमंत अमृतरावांनी विकत घेतली होती.

या गणेशमंदिराचे नाव पुढे ' अमृत-विनायक ' मंदिर असे बदलण्यात आले. अशा प्रकारे नावात श्रीमंत अमृतराव आणि त्यांचे चिरंजीव श्रीमंत विनायकराव यांची नावे गुंफण्यात आली. गणेश-मंदिराच्या परिसरात पुरातन शमी वृक्ष आहे. तो निदान स्थापनेपासून असावा असे वाटते.

जवळच हनुमान-मंदिर ' संकटमोचन ' नावाने बांधले. श्रीराम-लक्ष्मण खांद्यावर असलेल्या स्थितीत हनुमानाची मूर्ती मंदिरात प्रतिष्ठापित केली आहे. हनुमान-मंदिराचे बांधकाम सुरू असताना जमिनीत श्रीविष्णूची एक मूर्ती सापडली. ती हनुमान मंदिराच्या तळघरात ठेवली. श्रीविष्णूचे स्वतंत्र मंदिर बांधलेले नाही. श्रीविष्णूची मूर्ती ११ व्या किंवा १२ व्या शतकातील असावी असा पुरातत्त्वतज्ज्ञांचा अंदाज आहे.

अन्नपूर्णा अन्न-छत्र अन्नपूर्णा मंदिरात चालत असे. ही एकूण स्वतंत्र सहा मंदिरे आहेत. (१) श्री अन्नपूर्णा देवी, (२) श्रीलक्ष्मीनारायण, (३) श्रीअमृतेश्वर, (४) श्रीविनायकेश्वर, (५) श्रीनारायणेश्वर, (६) श्रीसिद्धिविनायक. शिवमंदिरे असलेल्या या सर्व परिसराला ' शिवालय ' म्हणत असत.

या मंदिरांची दैनंदिन व्यवस्था व धार्मिक व्यवहार काहीही अडथळे न येता सुरळीत चालू रहावा यासाठी अमृतरावांनी स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली.

१८१७ साली त्यांनी दोन लाख रुपये सहा टक्के व्याजाने वाराणसीच्या कलेक्टरकडे मुदत-ठेवीच्या रूपाने ठेवण्यासाठी सुपूर्त केले. या रकमेच्या व्याजातून मंदिरे व अन्न-छत्राचा व्यवहार चालावा अशी व्यवस्था करून या धर्मादायात खंड पडू नये असा इंग्रजांशी कराराही केला. सुमारे ७–८ वर्षे व्यवहार सुरळीत चालविल्यानंतर १८२४ सालच्या सुमाराला इंग्रजांनी व्याजदर एकतर्फीच चार टक्क्यांवर उतरवला. ह्यामुळे धर्मादायावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून विनायकरावांनी तीन लाख रुपये ठेवीत नव्याने गुंतवले.

अमृतरावांच्या पश्चात् ही व्यवस्था त्यांचे चिरंजीव विनायकराव यांनी इंग्रजांकडून मान्य करून घेतली. विनायकरावांचे पश्चात् १८५६ सालपर्यंत ही व्यवस्था सुरळीतपणे चालू होती.

सशस्त्र उठावामुळे १८५७ साली इंग्रजांनी ही मंदिरे, त्यांतील संपत्ती व चीजवस्तू व गंगेवरील घाट हे सर्व जप्त केले. १८५७ साली अन्न-छत्रात रोज १००० ब्राह्मण जेवत होते. जप्तीनंतर या ब्राह्मणांच्या भोजनाची व्यवस्था कशी करावी, असा वाराणसीच्या कलेक्टरपुढे प्रश्न उभा राहिला. मालमत्तेच्या जप्तीमुळे निर्माण झालेल्या समस्यांचा विचार करून १८५८ साली मंदिरे व घाट यांवरील जप्ती उठवली व सर्व व्यवस्था पूर्वीप्रमाणे सुरू ठेवली.

मंदिरांतील सोने-चांदीची भांडीकुंडी, जडजवाहीर, दागिने, व इतर चीजवस्तू मात्र मुक्त केल्या नाहीत. उलटपक्षी त्या संपत्तीचा जाहीर लिलाव करून जमा झालेला पैसा सरकारी तिजोरीत जमा करण्यात आला. ठेव रकमेपैकी २ लाख रुपये रक्कम १८६६ साली मंदिरांच्या खर्चासाठी ४० वर्षांच्या मुदतीच्या ठेवीमध्ये गुंतवली. ती दर ४० वर्षांनी इंग्रज सरकारतर्फे पुन्हा गुंतवली जाई व पेशवा परिवाराला त्याबद्दल फक्त कळवले जाई. ठेव रकमेपैकी उरलेले ३ लाख रु, मात्र इंग्रजांनी सपशेल हडपले.

अन्नछत्राबद्दल एक जुनी नोंद मिळते : अमृतरावसाहेब पेशवे यांनी एक उत्तम प्रकारचे गणेश मंदिर बांधून त्या देवास अलंकारही पुष्कळ दिले व पूजा व उत्साह यांबद्दल नेमणूकही चांगली करून दिली. शिवाय अन्नपूर्णा नावाचें अन्नसत्र घालून त्याचें खर्चाकरितां इंग्रेज सरकारांत कांहीं पैसा ठेऊन त्याचें व्याज त्या सत्राचे खर्चाकडे लाऊन दिले. त्या सत्रांत तीनशेपर्यंत ब्राह्मण व संन्यासी यास भोजन देण्याची योजना केली. त्याजवर त्यांचे चिरंजीव विनायकरावसाहेब पेशवे यांनी त्या सत्रांत बाराशें ब्राह्मण दररोज जेवीत जावे असे ठरवून, त्यांस जास्ती खर्च लागे तो महिन्याचे महिन्यांस चित्रकूटाहून आपले खासगीतून पाठवीत होते. परंतु दुर्दैवेकरून पुढे सन १८५७ इसवी साली विनायकराव पेशवे यांचे ज्येष्ठ दत्तपुत्र नारायणराव ह्यांजवर बंडात सामील असण्याचा आरोप आल्यावरून त्यांची

सर्व मालमत्ता इंग्रज सरकारने खालसा केली. त्या वेळेस देवाचे अलंकार व सर्व सामान जप्त करून त्याचा लिलाव केला. त्यामुळे बापूसाहेब ह्यांजकडून पूर्वीच्या तीनशांखेरीज नऊशे पात्रांबद्दल जो खर्च अन्नसत्राचे नेमणुकेत दर महिन्यांस मिळत होता तो नाहिसा झाला. त्यामुळें अमृतरावसाहेब ह्यांनी प्रथम जी तीनशे पात्रे जेवण्याची नेमणूक करून दिली होती तितकी मात्र चालत असून त्या सत्रांत तीनशे ब्राह्मणभोजन होत आहे. बंडाचे दोषावरून नारायणरावसाहेब यांजबरोबर त्यांचे कनिष्ठ बंधू माधवरावसाहेब यांसही सरकारने प्रतिबंधात ठेविले होते. परंतु पुढे नारायणरावसाहेब मरण पावले आणि माधवरावसाहेब हे बंडाचे वेळी वयांत आलेले नसल्यामुळे, त्यांजवर बंडात सामील असण्याचा दोष शाबीत झाला नाही, सबब ते मोठे झाल्यावर सरकारने त्यांस बंधमुक्त करून जो नेमणूक अन्नसत्राकडे चालत होती, ती त्यांचे हवाली करून अन्नसत्र चालविण्याचे काम त्यांचे त्यांनी पहावे असे ठरविले. त्याप्रमाणे माधवरावसाहेब यांजकडून हल्ली व्यवस्था चालत आहे. "

हल्ली या देवस्थानचा सर्व खर्च ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेच्या व्याजातून चालतो. देवस्थानच्या विश्वस्तांची नेमणूक महसूल-आयुक्त करतात. हा खासगी ट्रस्ट असल्यामुळे पेशवा घराण्यातील कर्ते पुरुषच विश्वस्त असतात असे डॉ. वि. वि. ऊर्फ उदयसिंह पेशवा यांचेकडून समजते.

अन्न-छत्र[१५] व मंदिर दोन्हीची अंदाजपत्रके, जमाखर्च-व्यवस्था, दैनंदिन कारभार व्यवस्था स्वतंत्र असे. पूर्वी अन्नदान विशेष पुण्यप्रद समजले जात असल्यामुळे अन्न-छत्राचे अंदाजपत्रक अमृतविनायक मंदिरापेक्षा मोठे असे. काही वर्षांनी मंदिराचे अंदाजपत्रक अन्नछत्रापेक्षा मोठे झाले.

अन्नपूर्णा अन्न-छत्राची व्यवस्था पुढीलप्रमाणे असे – तेलंगण, कर्नाटक आणि गोकर्ण महाबळेश्वर येथील भाविक स्त्रिया पुण्यप्राप्तीच्या भावनेने वाराणसीला वास्तव्य करीत. सेवाभावाने अन्नछत्रासाठी कामे करीत. यांना ' आम्मा ' म्हणता याखेरीज आचारी, वाढपी, पाणके, ही स्वतंत्र पगारी मंडळी असत. कायमचा सेवकवर्ग पुढीलप्रमाणे असे-- हेड कारकून १, कारकून १, कोठावळा १, पुजारी १, शिष्य २, चौकीदार ४.

अन्नछत्रात रोज दुपारी एका वेळचे जेवण दिले जाई. जेवणासाठी रोज सकाळी कुपन्स वाटली जात. भोजनार्थी माणसाची योग्यता आणि गरज पाहूनच कारकून कुपन देत असे. ज्यांना कुपन मिळाले असेल त्यांनाच जेवण मिळे. रोज १०० ते १५० पान होई. रोजचे जेवण साधेच असे. उत्सवाचे दिवशी पक्वान्न असे. अन्नछत्रात १) नवरात्राचा उत्सव, २) स्थापना दिन, ३) भाद्रपद शु. ४ ते भाद्रपद

शु. ८ गणेशोत्सव, ४) वसंतपूजा, हे चार धार्मिक उत्सव केले जात. प्रत्येक उत्सवाची सांगता वसंतपूजेने होई.

अमृतविनायक मंदिरासाठी कायमचा सेवकवर्ग पुढीलप्रमाणे असे – हेड कारकून १, कारकून १, पुजारी १, शिष्य २, चौकीदार ४. दोघे शिष्य दोन पाळयांमध्ये पूजेची सर्व तयारी, गंगेवरून पाणी आणणे, ही कामे करीत. दोघे कारकून इतर दैनंदिन व्यवहार पाहत. पुजाऱ्याचे काम फक्त पूजा करणे एवढेच असे. सकाळी व संध्याकाळी पूजा होई. दोन्ही पूजांनंतर पूर्ण भोजनाचा नैवेद्य दाखवला जाई. याचा स्वयंपाक दोन्ही वेळा पूर्ण सोवळयाने होई. याखेरीज दुपारी फक्त फळांचा नैवेद्य दाखवला जाई.

भाद्रपद शु. १ ते शु. ५, माघात गणेशजन्म ५ दिवस आणि स्थापनेचा दिवस, हे विशेष उत्सव होत, सांगता वसंतपूजेने होई. ऐन थंडीच्या दिवसांत (विशेषतः माघ महिना) देवाला गरम पाण्याने स्नान घालत. या काळात देवासाठी गरम कपडेही वापरले जात.

देवतांची स्थलांतरे

पेशवाईतील[१५] जुने पारंपारिक देव शनिवारवाड्यात रघुनाथराव दादासाहेबांकडे होते. प्रत्येक व्यक्तीचे वैयक्तिक देवघर आणि घराण्याचे देवघर वेगवेगळे असे. त्यामुळे काही देवता दुसऱ्या बाजीरावांबरोबर, काही देवता दुसऱ्या चिमाजी आप्पासाहेबांबरोबर गेल्या. त्याचप्रमाणे काही मूर्ती, प्रतिमा अमृतरावांबरोबर वाराणसीला गेल्या. अमृतरावांचे पश्चात् त्यांचे चिरंजीव विनायकराव बापूसाहेब १८२९ साली चित्रकूटला स्थायिक झाले. त्या वेळी 'जुने देव'* त्यांचेबरोबर चित्रकूटला गेले. विनायकरावांनी जरी नारायणराव या पहिल्या दत्तक मुलाचे दत्तकविधान रद्द केले तरी विनायकरावांचे पश्चात 'जुने देव' नारायणरावांकडेच राहिले. पुढे नारायणरावांचे पश्चात् त्यांच्या पत्नी गं भा. गंगाबाईसाहेब 'जुने देव' घेऊन वाराणसीला स्थायिक झाल्या.

विनायकरावांचे दुसरे दत्तक चिरंजीव माधवरावसाहेब इंग्रजांच्या आज्ञेनुसार १८५७ च्या उठावानंतर सज्ञान झाल्यावर बासबरेलीला स्थायिक झाले.' जुने देव' गं. भा. गंगाबाईसाहेबांकडे वाराणसीला असल्यामुळे माधवरावांनी बासबरेलीत

---

* पेशवेकालीन शनिवारवाड्यात असलेल्या देवांचा उल्लेख सोयीसाठी 'जुने देव' असा केला आहे. अमृतरावांचे नातू माधवराव पेशवा यांनी कालांतराने बास-बरेलीला स्वतःचे नवीन देव स्थापन केले. त्यांचा उल्लेख सोयीसाठी 'बरेलीचे देव' असा येथे केला आहे.

स्वतःचे स्वतंत्र देव स्थापन केले. गं. भा. गंगाबाईसाहेब वाराणसी येथे १९०५ साली वारल्यानंतर माधवरावांनी वाराणसीहून ' जुने देव ' बासबरेलीला आणले. यानंतर काही वर्षे बासबरेलीला १) जुने देव. २) बरेलीचे देव, हे दोन्ही पूजले जात.

माधवरावांना दोन मुलगे होते. ज्येष्ठ कृष्णराव बाळासाहेब आणि कनिष्ठ सदाशिवराव बाबासाहेब. कालांतराने माधवरावांनी असा निर्णय केला की, ' बरेलीचे देव ' बाळासाहेबांच्या (थोरल्या) शाखेकडे रहावेत आणि ' जुने देव ' बाबासाहेबांच्या (धाकटया) शाखेकडे रहावेत.

बासबरेलीला माधवरावांच्या दोन स्वतंत्र वास्तू एकाच कंपाऊंडमध्ये होत्या. बाळासाहेब आणि बाबासाहेब या वास्तूंमध्ये निरनिराळे राहात असत. माधवरावांच्या निर्णयाप्रमाणे ' बरेलीचे देव ' बाळासाहेबाच्या शाखेत ' जुने देव ' बाबासाहेबांच्या शाखेत पूजले जात. सर्व पारंपरिक कुलाचार फक्त कृष्णराव बाळासाहेबांच्याच शाखेत (थोरली शाखा म्हणून) होत असत.

बाबासाहेबांचे चिरंजीव रघुनाथराव तात्यासाहेब १९२६ साली पुण्यात प्रथम स्थायिक झाले. त्यांच्याबरोबर ' जुने देव 'ही बरेलीहून पुण्यात आले. तात्यासाहेबांच्या पत्नी कमलिनीबाईसाहेब यांनी स्वतंत्र राहती वास्तू बांधल्यानंतर ' जुने देव ' पुण्याच्या स्वतःच्या वास्तूत आले. कृष्णराव बाळासाहेबांचे धाकटे चिरंजीव विश्वनाथराव राजासाहेब १९३६ साली पुण्याला स्थायिक झाले. त्यांच्या शाखेतील ' बरेलीचे देव ' बासबरेलीला होते. पुण्यात पेशवेकालीन ' जुने देव ' पुजले जात.

घराण्याच्या पारंपरिक देवांमध्ये, थोरल्या नारायणरावांच्या शनिवारवाड्यातील हत्येनंतर – ऐतिहासिक काळापासून – त्यांचे नावे ' महापुरुष ' म्हणून एक देवता पुजली जाऊ लागली होती. ' जुन्या देवां ' मध्ये ' महापुरुषाची ' सोन्याची मूर्ती असे. ' बरेलीच्या देवां 'मध्ये मात्र तशी मूर्ती नसून महापुरुषाची सुपारी असे.

सन १९५० आणि सन १९५१ ही दोन वर्षे पेशवा कुटुंबियांना फार कसोटीची गेली. काही अमंगल अनुभवांमुळे पेशवाईतील ' जुने देव ' घराण्याला लाभत नाहीत अशी प्रचिती आली. या भावनेमुळे ' जुने देव ' पुण्यातील घरातून काढून वाराणसीला अमृतविनायक मंदिरात ठेवले. तेथेही चांगला अनुभव आला नाही. तेव्हा काही वर्षांपूर्वी (१९८० सालापूर्वी) ' जुने देव ' गंगा नदीत विसर्जित केले. आता देवघरातील मूर्तींपैकी ऐतिहासिक काहीही अस्तित्वात नाही. दरम्यान १९५३ साली कृष्णराव रावसाहेबांच्या विवाहानंतर ' बरेलीचे देव ' पुण्यात आणले. तेव्हापासून ' बरेलीचे देव ' पुजले जातात.

* *

संदर्भ टिपा :


१) वाइति. श. १८३५ पृ. १०४ ते १०६. २) पेद ३२ क्र. १९६. ३) ज्ञानेश्वर त्रै. १:१. ४) मरिउवि १७४९-६१. ५) पेद ३ पृ ११५. ६) पेद ३२ पृ ४५. ७) ऐलेसं ४२४२. ८) थोमापेरो १ नोंद १०९. ९) पेद ४ १०) पेद ४१ पत्र २७५. ११) 'माझा प्रवास' पृ. ३६. १२) त्रै. १८ : ४. १३) संवृ ६, श. १८४० पृ. ८३. १४) 'तीर्थ-यात्रा प्रबंध' पृ. ११७-१८. १५) कृ. वि. पेशवा याजकडून.

प्रकरण सहावे

पेशव्यांच्या कुंडल्या


अनेक ठिकाणी दिलेल्या पेशवे मंडळींच्या जन्मकुंडल्या येथे एकत्र दिल्या आहेत. (त्रै. १६ : ३ ले. द. ना. आपटे – पटवर्धन संग्रह).

थोरले बाजीराव (१)



शके १६२२ भाद्रपद शुद्ध १५. रविवार. यांची इंग्रजी तारीख १८–८–१७०० अशी येते. कुंडलीतील ग्रह स्थितीशी या तिथीवारांचा मेळ आहे. चिटणीसी बखरीत, बाजीरावाला वस्त्रे मिळाली तेव्हा त्याचे वय २० / २२ होते असे म्हटले आहे. त्यापैकी २२ हा आकडा गृहीत धरून १७२० – २२ = १६९८ हा जन्माचा सन रियासतीत दिला आहे. (म. रि. म. वि. १ पृ. १३५) परंतु त्यापेक्षा इ. स. १७०० हा सन वरील कुंडलीच्या आधारे अधिक विश्वसनीय आहे असे म्हणावे लागेल.

थोरले नानासाहेब



याच संग्रहातील नानासाहेबांचे जन्मटिपण असे : श्री शके १६४३ मार्गशीर्ष कृष्ण १३ बुधे सूर्योदयात् घटी ४० पळे १९ तदा श्रीमान नानाख्य प्रभुणां जन्म, या मितीशी जुळणारी इंग्रजी जन्मतारीख १६–१२–१७२१.


राजवाडे खंड २ (पृ. ४५।४६) मध्ये नानासाहेबांची अंशात्मक ग्रहस्थिती व कुंडली दिली आहे. ती बहुतेक बरोबर आहे. मात्र राहू व केतू यांची अदलाबदल, चुकीने कुंडली व अंशात्मक स्थिती या दोहोंतही झाली आहे. रियासतीत (म. रा. म. वि. २ पृ. २) नानासाहेबांच्या जन्माची तारीख १२

डिसेंबर अशी आहे. ती बरोबर दिसत नाही. (पुणे दप्तरातील नोंद – जन्मकाल मार्गशीर्ष वाा १३ सह १४ घटी ४१ पळे ५२ ज्येष्ठा प्रथम चरण शके १६४३)

नानासाहेबांची ग्रहस्थिती (षा. वृ. शके १८३४).

र	चं	मं	बु	गु	शु	श	रा	के	लग्न
८	७	०	७	७	७	७	८	२	४
६	१९	१५	२२	६	९	२१	२२	२२	२०
११	२७	५२	१४	२	१३	५	५०	५०	४५


सदाशिवरावभाऊ



उपर्युक्त संग्रहातील भाऊसाहेबांचे जन्मटिपण असे : शके १६५२ अधिक भाद्रपद शुक्ल २ भौमे सूर्योदयात् घटी १८ पळे ३६ तदा श्रीमत्सदाशिव प्रभुणां जन्म.

वरील मितीशी जुळती इसवी सनाची तारीख ४ ऑगस्ट १७३० अशी येते. काव्येतिहास संग्रहातील शकावलीत (चित्रशाळा प्रत पृ.४५८) श्रावण शु. ४ अशी मिती दिली आहे. ती चुकीची दिसते. राजवाडे खंड २ मधील नोंद " ४ सफर रोजी खबर चिमाजी आपास पुत्र झाला म्हणोन आली छ ११ रोजी नामकर्ण ठेविले. (पृ. ६१) " सदाशिवराव भाऊसाहेब यांचा या उल्लेखावरून ३० मोहरमला जन्म झाला व बाराव्े दिवशी म्हणजे ११ सफरला नाव ठेविले अशी संगती लागते व जन्माची तारीख ४ ऑगस्ट १७३० ही निश्चित होते. तेव्हा म. रि. म. वि: ३ पृ. २५१ वर ५–७–१७३० ही तारीख दिली आहे ती बरोबर दिसत नाही.

विश्वासराव बल्लाळ




सदरहू ग्रंथातील विश्वासरावांचे जन्म टिपण असे : शके १६६४ श्रावण शुक्ल २ गुरौ श्री सूर्योदयात् गत घटी २९ पळे ५४ तदा श्रीमत् विश्वासराय प्रभुणां जन्म.

वरील मितीची इंग्रजी तारीख २२ जुलै इ. स. १७४२ अशी येते. ब्रह्मेंद्रस्वामींचे चरित्रामध्ये (पृ. ११२ ले. १८०) सदाशिव चिमणाजीने ब्रह्मेंद्रास लिहिलेल्या पत्रात श्रावण


शुद्ध २ गुरुवार २ घटी दिवस बाकी असता विश्वासरावाचा जन्म झाल्याचे लिहिले आहे. अस्सल पत्रातील उल्लेखाचा वरील कुंडलीशी पूर्ण मेळ असून पत्रातील उल्लेखापेक्षा सूर्योदयात् गत घटी २९ प. ५४ उल्लेख अधिक निश्चित स्वरूपाचा आहे.

माधवराव बल्लाळ



राजवाडे खंड २ पृ. १०० वरील उल्लेख "छ २५ मोहरम (१७–२–१७४५) गोपिकाबाई प्रसूत जाली. छ २५ मोहरम (शके १६६६) माघ व. ११।१२ मंदवार ११ घटिका दिवसास माधवराव यांचा जन्म मकर राशी होता" असा आहे. पिल्ले जंत्रीवरून पहाता त्या दिवशी नक्षत्र २१ वे म्हणजे उत्तराषाढा होते. अर्थात् त्याचा मकर राशीशी मेळ आहे. मोडक जंत्रीप्रमाणे २५ मोहरमला वद्य १२ व रविवार असल्यामुळे वरील उल्लेखातील मंदवार चुकीचा समजून १७ फेब्रुवारी ही तारीख ठरवलेली दिसते. परंतु पिल्ले जंत्रीवरून वर दिलेल्या तिथीचा वाराशी व वाराचा २५ मोहरमशी मेळ बसतो व इंग्रजी तारीख १६ फेब्रुवारी १७४५ ही येते. रियासतीत ही तारीख बरोबर दिली आहे. (म. वि. ४ पृ. १ कुंडली – वाइति शके १८३२).


नारायणराव बल्लाळ



पटवर्धन संग्रहातील नारायणरावांचे जन्मटिपण असे : शके १६७७ युवसंवत्सरे श्रावण शु. ४ सोमे सूर्योदयात् गत घटी ७ पळे ३५ तदा श्रीमन्नारायण राय प्रभुणां जन्म.

वरील मितीची तारीख ११ ऑगस्ट इ. स. १७५५ अशी आहे. राजवाडे खंड २ पृ. ४० मध्ये "छ जिल्काद (१० ऑगस्ट १७५५) नारायणराव जन्मले. कन्यारास श्रावण शु. ३ रविवार" असा उल्लेख आहे. परंतु जिलकादचा श्रावण शुद्ध रविवार याच्याशी मेळ बसत नाही. या तारखेचा म. रि. म. वि. ३ पृ. २५२ मधील १० ऑगस्ट या तारखेशी मेळ आहे. पण पटवर्धन संग्रहावरून हीमध्ये एक दिवसाचा फरक करणे इष्ट दिसते, म्हणून ११ ऑगस्ट १७५५ हीच तारीख घ्यावी असे वाटते.


सवाई माधवराव




सवाई माधवरावांचे जन्मटिपण असे : शके १६९६ अधिक वै. शु. ७ इंदुवासरे सूर्योदयात् १७ घटी ३० पळे कुलीर लग्नोदये जन्म (रा. खं. १० ले. १३७ पृ. ८९) याची इंग्रजी तारीख १८ एप्रिल १७७४ अशी येते. पिल्ले जंत्रीवरून कुंडलीतील ग्रहस्थितीचा वरील तारखेशी मेळ आहे.

उत्तरायणे वसंतऋतौ अधिक वैशाख शुद्ध ७ इंदुवासरे २६।४२ अदितिथौ ३२।२० धृतौ योगे ५५।५८ वणिज करणे तत्र मेषार्क गतांशाः ७ भोग्यांशाः २३ तत्र श्रीसुर्योदयादिष्टकालः १७।३० तत्र समये कुलीरे लग्नोदये श्रीमंतां प्रभुवर्याणाम् जन्म ता. १८ एप्रिल सन १७७४.

बाजीराव रघुनाथराव



जन्म तारखेबद्दलचे उल्लेख (१) ' पौष वद्य ९ भौमवासर धारेस जन्म (भावश पंतप्रशका. पृ. ६४) तारीख २४ जाने. छ. २१ जिलकाद खमस सबैन मया अलफ. मिती बारांचा मेळ नाही. (२) १०-१-१७७५ (मरिउवि १ बृ.३१) (३) ७-२-१७७९ मरि (४) पौष शुद्ध ९, मंगळवार १०-१-१७७५ (ऐलेसं पृ. २२२८ ले. १४३९) कुंडलीवाइति शके १८३२ पृ. ८२)




चिमणाजी रघुनाथ : भारतवर्ष पंतप्रधान यांची दुसरी शकावली पृ. ७४ मध्ये यांचे जन्मटिपण आहे. ते असे : चैत्र शु. ८।९ चिमाजीआप्पाचा जन्म जाला. शके १७०६ मुक्काम कोपरगाव कचेश्वर. पुनर्वसु नक्षत्र. रात्रौ शेष घ. ३ तेव्हा जन्म ता. ३० मार्च. छ. ८ जावल १७८४.

र	चं	मं	बु	गु	श	रा	के	ने
११,	३,	१,	१०,	१०,	९,	१०,	४,	१०,
१८,	२,	१९,	३,	९,	१,	१७,	१७,	२६,
५८,	४३,	४०,	१५,	१९,	६,	१०,	१०,	१८,

या ग्रहस्थितीचा तिची बाराशी मेळ आहे.

—×—×—

थोरले बाजीराव (२)




'प्रतापी बाजीराव' या पुस्तकात 'सांस्कृतिक समालोचन' या प्रकरणांत (पृ. १९) ही कुंडली दिली आहे. कुंडलीचा आधार दिला नाही. मात्र फलज्योतिष अन्वयार्थ सविस्तर दिला आहे.

—×—×—


(त्रै. १९ : ३,)

बाळासाहेब ऊर्फ गंगाधर



तिसरे बाळासाहेब व नानासाहेब पेशवे या दोन पुरुषांच्या जन्मपत्रिका कर्मधर्मसंयोगाने १८५३ शकात भाद्रपद वद्य १४ मंदवारी म्हणजे श्री. नानासाहेबांचे श्राद्धतिथीचे (शके १७८०, भाद्रपद वा। १४ बुधवार ता. ६–१०–१८५८) दिवशी राजापूर येथील संस्कृत पाठशाळेच्या पुस्तकालयात उपलब्ध झाल्या. राजापूर समीप ३।४ कोसावरील श्री. वे. विनायक रामचंद्र भट्ट गुर्जर यांजकडून त्यांचा संस्कृतलिखित संग्रह श. १८५१ शकात मिळाला. त्यात ह्या पत्रिका एकाच पत्रावर मिळाल्या.

दुसरे नानासाहेब (१८५७)




ह्यांत नैकशास्त्रविशारद पंडित प्रकांड जयकृष्ण अनंत गुर्जर ह्यांच्या हाताचेच बरेच ग्रंथ असून ते जालवण प्रांत यमुनातीरे शक १७३५ ते ६५ वर्षाचे अवधीत प्राय: लिहिलेले आहेत त्यात ह्या मिळाल्या ह्यांची यथातथ्य प्रतिमा देत आहे.


— × — × —

(भा. वृ. श. १८३४)

थोरले चिमाजीअप्पा (१)




बाळाजी विश्वनाथ




रघुनाथराव बाजीराव



श्रीमंत राघोबादादा यांची जन्मकुंडली मेणवली दप्तरातून उपलब्ध. श्रीशालिवाहन शक १६५६ (सन १७३४) आनंदनाम संवत्सरे श्रावण शुा १३ गुरुवार सूर्योदयात् गत घटी ४२ प. १० इत्यादि. मकर राशी जन्म स्थान माहुली. (त्रै. २८ : १–२).





थोरले बाजीराव (३) **थोरले चिमाजीअप्पा (२)**

येथे दिलेल्या शके १८३२ च्या (भा. इ. सं. मं.) इतिवृत्तातील थोरले बाजीराव आणि थोरले चिमाजीआप्पा यांच्या राजवाडेकृत कुंडल्यांबद्दल श्री. का. ना. साने म्हणतात.[१]

" पृ. ८४ वर दिलेली ही कुंडली चिमाजीआप्पाचीच असल्यास ती बाजीराव बल्लाळच्या कुंडलीशी सर्वथैव मिळती अशी आहे. हे कसे ? बाजीराव वडील व चिमाजी धाकटा बंधू असे असता त्या उभयतांच्या जन्मकाळची ग्रहस्थिती एक सारखीच कशी असू शकेल ? राजवाडे यांनी दिलेल्या चिंतामणी बल्लाळच्या (चिमणाजी ?) कुंडलीत शुक्र, शनी, दर्शविलेले नाहीत. केतूचे स्थान चुकीने कुंभ पडले आहे, ते मीन पाहिजे. बाजीराव बल्लाळचे कुंडलीत शुक्राचे स्थळ दर्शविलेले नाही. शुक्र द्वादशस्थानी मीन राशीस्थ (उच्च) ग्वाल्हेर कुंडलीत दिलेला आहे. "

सवाई माधवरावांचे नक्षत्रमान

खेड येथील एका जोश्याच्या दप्तरात मिळालेली सवाई माधवरावांचीकुंडली[२] :

ओळ : १. श्रीगणेशायेनमा – जन्म, २. पत्रिका सके १६९६ अये नां, ३. म सछरे आधीक वैशाख सु, ४. ध ७ सप्तमी सीमवारी, ५. श्रीमंत रा नारा, ६. येणराऊ बलाळ ते तो स्वर्गास, ७. कैलासास गेले त्याची श्री, ८. गंगाबाई प्रसुत जाली तीस, ९. रत्न पुत्र जाला (ले) जेन्मनक्षेत्र, १०. पुनरवसु घटीका ३२ ते + व, ११. घटीका ५४, १२. पुरंधरचे माचीस प्रसुत जाली, १३. जन्मनाव हरदेव, १४. चरण तिसरा घटी १६ पळे, १५. मेशक्रात होती, १६. देवगण गुण, १७. जेन्म जाला समये पाहोन लेह, १८. ने पुढे राज्याचा बंदोबस्त व, १९. कारभार कैसा जाला होल ते पहावे, २०. गरोधरपणात मुलुक खरा, २१. व फार जाला फी (त) व्यामुळे. "

❋ ❋

संदर्भ टिपा :

(१) षा. वृ. शके १८३४ पृ. ३२०. (२) वाइति शके १८३२ पृ. ७०.

प्रकरण सातवे

संक्षिप्त व्यक्तिपरिचय

पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांना पेशवाई मिळाल्यानंतर ते व त्यांच्या वंशजांचा उल्लेख 'पेशवा' नावाने होऊ लागला. या कुलातील इतर सर्व मंडळी, बाळाजींचे सर्व बंधू, बंधूंचे वंशज, पूर्वीप्रमाणेच 'भट' आडनाव लावीत. बाळाजींचे चुलत चुलते बाबाजी ऊर्फ महादाजीपंत बिन नारोपंत भट यांची शाखा, राजमाचीला नेमणूक झाल्यामुळे 'राजमाचीकर भट' म्हणून ओळखली जाऊ लागली. भट, पेशवे, राजमाचीकर, या तीनही श्रीवर्धनच्या (जि. कुलाबा) भट घराण्याच्याच शाखा. यांपैकी राजमाचीकर ही थोरली पाती आणि पेशवे ही धाकटी पाती. या प्रकरणात (१) राजमाचीकर-शाखा (२) भट-शाखा (३) पेशवे-शाखा या क्रमाने माहिती दिली आहे.

राजमाचीकर-शाखा

नारोपंत महादाजी : (५) हे भट आडनाव लावीत. भट – पेशवे वंशावळीत हे भटांच्या थोरल्या शाखेत येतात. **पत्नी** : लक्ष्मीबाई. 'त्यावर तीर्थरूप नारोपंतांची स्त्री मातुश्री लक्ष्मीबाई महायात्रेस गेली' असा उल्लेख मिळतो.[१]

नारोपंत त्र्यंबक : (७) यांचा उल्लेख राजमाचीकर नावाने आढळतो. दि. ४–१०–१७७३ च्या पत्रात, "नारो त्र्यंबक इंदुवारी (सोमवारी) वारले. आज आठ दिवस जाले श्रीमंतास काल कळले. दशाहातील आहेत. सुतक धरतीलच असे नाही. आठ पुरुषांतरे आहेत. तीन दिवसाचेही म्हणतात, म्हणून वर्तमान आहे." असा उल्लेख मिळतो.[२]

रामराव नारोपंत : (८) 'दुबापेरो' मध्ये यांचा उल्लेख : "कैलासवासी माधवराव साहेब यांचे उत्तर कार्य केले त्यास विद्यमान रामराव नारायण देशमुख इस्तकबील छ १३ रबिलाखर आश्विन शु. १४ मंगळवार ते छ २५ मिनहू आश्विन व. १२ रविवार मुदत रोज १३ एकूण खर्च जाहला."

त्रिंबक रामराव : (९) मुंबई इलाख्याचे पहिले गव्हर्नर ऑनरेबल माऊन्ट-स्टुअर्ट एलफिन्स्टन यांच्या निवृत्तीच्या वेळी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मुंबई – पुणे या ठिकाणी निधी जमविण्यात आला. या निधीसाठी पैसे

देणाऱ्या पुण्यातील गृहस्थांची नावे दि. २१–१०–१८२७ च्या ' बॉम्बे कुरिअर'च्या अंकात प्रसिद्ध झाली आहेत. त्यामध्ये ' त्रिंबक भाऊ राजमाचीकर यांचे नाव आहे. देणगीदारांना ' मुत्सद्दी मंडळी ' म्हटले आहे.[३]

नारायण त्रिंबक : (१०) २ मार्च सन १८५७ च्या ' ज्ञानप्रकाशा 'त यांचा उल्लेख एका बातमीत आहे : ' रा. रा. नारायणराव त्रिंबक राजमाचीकर ठाणे जिल्ह्यातील मुनसफ यांची स्वारी मुलाचे लग्नाकरिता रजा घेऊन एथें आली आहे. '

या बातमीवरून यांचा व्यवसाय कळतो. ह्याखेरीज दोन तर्क करता येतात. १. यावेळी यांचे वय निदान ४० वर्षे आणि २. ' वर ' मुलाचे १८ वर्षे असावे. कारण मुलगा ' विवाहयोग्य ' आहे.

भट-शाखा

महादाजी विसाजी : (२) हे भट आडनाव लावीत. सन १५७५ मध्ये हे दंडाराजपुरीचे देशमुख होते. यांच्या पूर्वजांची व भावंडांची चरित्रात्मक माहिती मिळत नाही. यांच्या वडिलांच्या नावाबद्दल अद्याप निर्णायक माहिती उपलब्ध नाही.

परशराम महादाजी : (३) हे शिवाजी महाराजांच्या चाकरीत असल्याची माहिती उपलब्ध आहे. " वाका श्रीमंत कैलासवासी सिवाजी छत्रपती माहाराज त्याचेजवळ श्रीमंत कैलासवासी परशरामपंत उपनांव भट कसबे श्रीवर्धन तो मार प्रां दंडाराजपुरी येथील देशमुख हे चाकरीस राहिले. तो प्रकार सदरी लिहिला आहे. त्याचे चिरंजीव कैलासवासी विसाजीपंत यांस दोन हजार फौजेची सरदारी सांगितली. "[४]

यांचे दुसरे नाव शिवाजी (?) होते अशीही एक नोंद मिळते.[५] " पेशवे यांचा मूलपुरुष परशरामपंत भट प्रपंचाच्या तापत्रयामुळे सिवाजीराजे पुंडावा करीत होते त्याजवल येऊन करवीरचे मुकामी येऊन भेटले. सर्व हकीगत विदित करोन खास कोठीवर राहिले. पुढे चिरंजीव विश्वासराव हेहि आले. त्यांचे कर्तृत्व पाहून राजे याणी सरदारी सांगितली.[६] [४]

यांचे एक नाव त्यांचे नातू विठ्ठल विश्वनाथ यांच्या नाशिकच्या क्षेत्रोपाध्यायाकडील लेखात अंताजी दिले आहे.[५] विठ्ठलपंतांच्या एका चुलत्याचेही नाव अंताजी होते. हे पाहता अंताजी नावाबद्दल शंका उद्भवते.

विश्वनाथ परशराम : (४) हेही शिवाजी महाराजांच्या चाकरीत होते.[४] पेशवे वंशावळीत यांचा उल्लेख ' मूळ पुरुष विसाजीपंत गोत्र गार्ग्य उपनाम भट

वतन श्रीवर्धन देशमुख प्रांत दंडाराजपुरी पंचमहाल ' असा आहे.[७]

हे अलिबाग तालुक्याच्या (जि. कुलाबा) ईशान्य सरहद्दीजवळच्या शहाबाद गावचे देशपांडे असल्याचा उल्लेख आहे. " त्यामध्ये श्रीवर्धनचे देशमुख व शहाबाज(द)चे देशपांडे रा विश्वनाथपंत दादा, उपनाम भट्ट गोत्र गार्ग्य यांचे पुत्र बालाजीपंत[८] ..."

पत्नी : यांच्या महायात्रेचा उल्लेख, " तेव्हा त्याणीं (बाळाजी विश्वनाथ) भिकंभट वझे यांना त्रिस्थळी महायात्रेचे उपाध्येपण दिल्हे. त्यावर तीर्थरूप नानाचे (बाळाजी विश्वनाथ) मातुश्रीसी यात्रा वे. मू. शिवभट मेहेंदळे घेऊन गेले."[१]

मुलगी : ही श्रीवर्धनच्या देशमुखीच्या कारभारात लक्ष घालत असे.[९] पती बहिरवभट मेहेंदळे. (नाना फडणीसांचे आजोळकडील पूर्वज)

नारायण कृष्णाजी : (६) हे भट आडनाव लावीत. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचे थोरले बंधू. कृष्णाजी यांचे नारायण हे चिरंजीव असल्याची नोंद, " कृष्णाजी विश्वनाथ यांचे पुत्र नारोबा यांची स्त्री गोदुबाई "[७] **पत्नी** : गोदुबाई. आनंदीबाई पेशव्यांनी स्वत: कोपरगावला कैदेत असताना आपले उपाध्याय कर्वे यांच्यामार्फत जुलै सन १७८८ मध्ये ' गोदाबाई सासुबाई 'कडे कुलाचारांबद्दल विचारणा केली आहे.[१०] ग. ह. खरे आपल्या ' शनिवार वाडा ' या पुस्तिकेत (पृ. २५) गोदावरी ही बाळाजी विश्वनाथाची थोरली भावजय असा उल्लेख करतात तो चूक आहे.

जनार्दन विश्वनाथ : (५) हे बाळाजी विश्वनाथ यांचे थोरले बंधू. यांचे नाव ' जानो विश्वनाथ ' असे आढळते. बाळाजी कारणपरत्वे चिपळूणला राहू लागल्यानंतर त्यांच्या वतीने कुळकरणाचे काम व देशमुखीचे वडिलोपार्जित काम श्रीवर्धनला राहून हेच पहात असत.[११] ' यांना जंजिऱ्याच्या नबाबाने गोणीत घालून समुद्रात बुडवले' ही समजूत चूक आहे.*

यांच्या हातची सन १७०६ मधील एक नोंद नाशिकच्या क्षेत्रोपाध्यायांकडे आहे. बंधू बाळाजी ' सेनाकर्ते ' झाल्यावर हे ' सरसुभेदार ' होते. दि. २–८–१७०८ च्या पत्रात यांचा उल्लेख ' मोकदम ' असा आहे. तेव्हा ते बाळाजीपंतांचा शिक्का वापरीत.[१२]

रुद्राजी विश्वनाथ (५) हेही बाळाजींचे एक थोरले बंधू. शाहू महाराजांनी बाळाजींना लिहिलेल्या पत्रात, " राजश्री रुद्राजी विश्वनाथ यांजवल तुमची घोडी सभर (शंभर) होती ' असा उल्लेख आहे. पत्रावर तारीख नाही.[१२]

---

*ज्यांना समुद्रात बुडवले त्यांचे नाव संभाजीपंत मोकाशी. त्यांचेमार्फत चिपळूणला मिठागाराचे मक्त्याचा भरणा व्हायचा.– पेद ७ प १, २, ४०.

विठ्ठल विश्वनाथ : (५) हे बाळाजींचे धाकटे बंधू. हे महाडला कारखानीस होते. [१३] नाशिकला क्षेत्रोपाध्यायांकडे यांचे लेख आहेत. शके १६०१ मध्ये यांनी स्वतःचा उल्लेख 'श्रीवर्धन देसाई' असा केला आहे. १७०१ साली मेढे येथे हवालदार असल्याचा उल्लेख सत्का. ९·११२ येथे आहे. [१४]

पेशवे शाखा—थोरली पाती

बाळाजी विश्वनाथ : (५) हे भट घराण्यातील पहिले पेशवे. उपलब्ध माहितीवरून यांचा जन्म सन १६६० चा असावा.* श्रीवर्धन हेच यांचे जन्मस्थळ. पाळण्यातले नाव बाळकृष्ण. कुलाबा जिल्ह्यातील वरसई गावी यांची मुंज झाली. यांनी तेथील गणपतीला २१ सोन्याच्या दुर्वा वाहिल्या होत्या. [१५]

हबशांची गैरमर्जी होऊन श्रीवर्धन सोडून बाहेर पडावे लागल्यानंतर चिपळूण—दाभोळकडे वास्तव्य असताना बाळाजींचे लग्न झाले असावे. चिपळूण बंदर त्यावेळी जंजिऱ्याच्या हबशांच्या ताब्यात होते. त्यांचे तर्फेने चिपळूणचा सुभा आवजी बल्लाळ यांच्याकडे होता. मीठ-बंदरचा हवाला बाळाजी विश्वनाथ भट श्रीवर्धनकर यांच्याकडे होता. मीठ-बंदर आणि जकात नाक्याच्या जबाबदारीमुळे बाळाजी चिपळूणला रहात असत. [११] पुढे ते दाभोळचे सभासद होते. चिपळूणलाच त्यांची ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकरांशी पहिली भेट झाली असावी. [११] बाळाजींचे प्रचलीत नाव 'बाळाजीपंत नाना' व घरगुती नाव 'नाना' असे होते.

श्रीवर्धनहून चिपळूणला आणि चिपळूणहून देशावर केव्हा स्थलांतर केले याची नेमकी माहिती मिळत नाही. बाळाजींनी चिपळूणहून देशावर स्थलांतर केले त्याबद्दल अनेक उपपत्ती दिल्या जातात. त्यापैकी एक : [१६]

"बाळाजींनी श्रीवर्धन सोडले त्या वेळी वेळास या गावी हरी महादेव, बाळाजी महादेव, रामाजी महादेव असे तीन भानू कुलोत्पन्न बंधू राहात. त्यांचा व बाळाजींचा लहानपणापासून स्नेह असे. वेळासला जाऊन बाळाजींनी श्रीवर्धन सोडण्याचा बेत भानू बंधूंना सांगितला. भानू बंधूही बाळाजींबरोबर यायला निघाले. बाळाजी तिवरा घाटाने देशावर यायला निघाले. बाळाजी चिपळूणला येतात तोच श्रीवर्धनमधून ते पळून गेल्याची गोष्ट हबशास समजली. हबशाने संतापाने बाळाजीस पकडून आणण्याबद्दल अंजनवेलच्या किल्लेदारास हुकूम दिला. क़िल्लेदाराने बाळाजीचा पाठलाग करून त्यास कैद केले व अंजनवेलीस आणले. हबशाने त्यास अंजनवेलीच्या किल्ल्यात कैदेत ठेवण्याचा हुकूम किल्लेदारास दिला. त्या ठिकाणी बाळाजी सुमारे २५ दिवस कैदेत होते. या काळात त्रिवर्ग भानूंनी

* निश्चित जन्म तारीख उपलब्ध नाही.

मोठी खटपट करून, किल्लेदारास लाच देऊन नानांची (बाळाजी) मुक्तता केली. नंतर भानूंसह बाळाजी, आंबाजी त्रिंबक पुरंदरे यांचेकडे सासवडला येऊन पोहोचले. बाळाजीनी आंबाजीस आपला बेत कळवला. तो बेत आंबाजीस पसंत पडून आंबाजी, बाळाजी व भानू बंधू साताऱ्यास येऊन पोहोचले. काही दिवस आंबाजी व बाळाजी हे मक्त्याच्या मामलती करून मोगलाईत १०००-५०० स्वार बाळगून होते."

साताऱ्याला बाळाजींनी महादाजी कृष्ण जोशांमार्फत शंकराजीपंत सचीवांकडे मुतालिकीची चाकरी केली. यापूर्वी १६८९ साली बाळाजी रामचंद्रपंत आमात्यांकडे नोकरीवर असल्याचा उल्लेख मिळतो. 'भारतवर्षा'त छापलेल्या शाहू बखरीत लिहिले आहे :

ते समयी* परशराम त्रिंबक कुळकर्णी किनईकर, व नारो शंकर कुळकर्णी मौजे गांडेकर व बाळाजी विश्वनाथ भट श्रीवर्धनकर देशमुख हे त्रिवर्ग अमात्य यांची सेवा शागिर्दीची करून होते. त्यांस त्रिवर्गाचे चातुर्य व शहाणपण पाहून कामे योजून त्रिवर्गास सांगितली.

१ परशराम त्रिंबक यांस दफ्तरच्या लिहिणेचें काम सांगितले.

१ नारो शंकर यांस पागेचे काम सांगितले.

१ बाळाजी विश्वनाथ यांस कोठीचे लिहिणेचे काम सांगितले.

३

सन १६९४ च्या सुमाराला ते चांगल्या नोकरीवर होते. नोकरीतील जबाबदाऱ्या वाढत जाऊन सन १६९९ ते सन १७०३ दरम्यान पुण्याचे सरसुभेदार झाले होते. या काळात गं. भा. येसूबाई आणि छोटा शाहू मोगलांच्या कैदेत महाराष्ट्रातील मोगली छावणीतच असत. कैदेत असताना सुद्धा अंतस्थ मार्गाने स्वातंत्र्यलढा चालवण्याच्या संदर्भात गं. भा. येसूबाईंचा मराठी सरदार व मुत्सद्यांशी संपर्क होताच. जोत्याजी केसकर, बंकी गायकवाड या मध्यस्थांमार्फत, पुणे प्रांताचे सरसुभेदार या नात्याने बाळाजींशीही संपर्क होता. उभय माता-पुत्रांची व्यवस्था नीट ठेवण्याकडे बाळाजी हस्ते परहस्ते कसोशीने लक्ष देत. त्यांची मोगली पक्षातील अनेक सरदारांशी ओळख व चांगले व्यक्तीगत संबंध (Personal Rapport) असून त्यांच्यामार्फत बाळाजी गोडी गुलाबीने आपली सर्व कामे करून घेत.

भीमा नदीच्या काठी औरंगजेबाची छावणी असताना (सन १६९५ – सन १६९९) बाळाजींनी औरंगजेबाच्या धाकट्या मुलीच्या (झेब-उन्निसा बेगम) वतीने गं. भा. येसूबाई व शाहू यांची पुण्याचा सरसुभेदार या नात्याने उत्तम

* छ. राजाराम महाराज जिंजीला गेले त्यावेळी. ते नोव्हेंबर १६८९ ते नोव्हेंबर १६९७ पर्यंत जिंजी येथे होते.

बडदास्त ठेवली होती. शाहू व बाळाजींचा पहिला परिचय याच काळात झाला असावा.

१७०२ साली सिंहगडला मोगली वेढा पडला असताना, बाळाजींनी त्यांच्याच शब्दांत स्वतः 'जीवावरच्या खेळात' नाव घेण्यासारखी कामगिरी केली. या काळात त्यांचा उल्लेख 'दिम्मत सेनापती' (सेनापतीच्या वतीने) असा आढळतो. सिंहगड मोगलांच्या ताब्यात देण्यासाठी एप्रिल सन १७०३ मध्ये किल्ल्यातून बाहेर आलेल्या दोन गृहस्थांपैकी एकाचे नाव 'बाळू पंडीत' आहे. हा गृहस्थ म्हणजेच बाळाजी विश्वनाथ भट होय. बाळाजींनी १७०५ साली वणी, दिंडोरीकडेही स्वाऱ्या केल्या होत्या.

सन १७०३ ते सन १७०७ दरम्यान बाळाजी दौलताबादचे सरसुभेदार होते. या काळात महसूल-व्यवस्था व वसुली, न्यायनिवाडे, देवस्थानची इनामे, क्वचित् युद्धप्रसंग ही कामे त्यांना पार पाडावी लागत. त्यामुळे मराठा-मंडळातील बहुतेक सर्व लहान मोठ्या सरदारांशी, मुत्सद्दी व अधिकाऱ्यांशी बाळाजींचा उत्तम परिचय होता. या धामधुमीच्या काळात स्वतःच्या अधिकारपदामुळे बाळाजी अनेकांच्या उपयोगी पडले. आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्यांना पदरी शिलेदार ठेवावे लागत. त्यांनी या काळात अनेक मित्र जोडले.

बाळाजींची हुषारी पाहून त्यांना व आंबाजीपंत पुरंदऱ्यांना परशुरामपंत त्रिंबक प्रतिनिधींच्या विशेष शिफारशीवरून सेनापती धनाजी जाधवांनी आपल्याकडे नोकरीवर घेतले. जमाबंदीच्या कामांची जबाबदारी बाळाजींकडे सोपवली. याप्रमाणे धनाजी जाधवांच्या सरंजामी व वतनी गावांचा महसूल जमा करण्याचे काम बाळाजींनी पत्करले. हा एक प्रकारे दलालीचा व्यवसाय असे. त्यासाठी फौज बाळगून सर्व महसूल मालकाकडे बंदोबस्ताने पोहोचवावा लागे. असो.

चासकर-जोशांच्या मध्यस्थीने ताराबाईंनी बाळाजींची रांगणा किल्ल्यावर नेमणूक केली.[२०] जाधवांच्या हाताखाली असताना बाळाजींनी गुजराथवरही स्वारी केली होती. शाहू मोगलांच्या कैदेतून सुटून दक्षिणेकडे आल्यावर धनाजी जाधवांच्या-वतीने बाळाजींनी शाहूची भेट घेतली. यामुळेच त्यांना व धनाजींना शाहू तोतया नाही याची खात्री पटली. सुमारे १०-११ वर्षांपूर्वी बाळाजींचा भीमाकाठी छावणीत शाहूशी परिचय झाला असल्यामुळे शाहू अस्सल आहे किंवा तोतया ? याची खातरजमा करण्याची कामगिरी बाळाजींना दिली असणे शक्य आहे.

पुढे ब्रह्मेंद्रस्वामींनीही बाळाजींना शाहूच्या पक्षाला मिळण्याचा सल्ला दिला. बाळाजींनीच धनाजी जाधवांनाही शाहूच्या पक्षात आणले. सन १७०८ मध्ये बाळाजी शाहूच्या आमात्यांचे मुतालिकही होते.[२१] शाहू महाराजांच्या राज्या-

भिषेकापासून धनाजी जाधवांच्या मृत्यूपर्यंतच्या सुमारे ५।। महिन्यांच्या काळात बाळाजींनी विशेष उलाढाली केलेल्या आढळत नाहीत.

धनाजी जाधवांच्या पश्चात् त्यांचा मुलगा चंद्रसेन आणि बाळाजी यांच्यात सेनापती पदासाठी चुरस लागली. या वेळी शाहू महाराजांनी चंद्रसेनविरुद्ध बाळाजींचा उपयोग करून घेतला. यानंतरच्या काळात बाळाजींनी शाहू महाराजांचा जम बसवण्याच्या कामात कर्तबगारी सिद्ध केल्यानंतर शाहू महाराजांनी त्यांना २० ऑगस्ट सन १७११ रोजी 'सेनाकर्ते' किताब दिला. २५१०२०० रु. सरंजाम बहाल केला.[२२] खंडेराव दाभाडयांकडील हक्कापैकी आर्धा मोकासाही बाळाजींना दिला.[२३] त्यांनी १७१२ साली खटावकरांचे बंड मोडले. नंतर राज्यरक्षणासाठी सैन्यबळ वाढवायला सुरुवात केली. ताराबाईच्या (कोल्हापूरकर) पक्षाचा बिमोड करून शाहू महाराजांचे राजपद स्थिर केले.

१७१३ साली (यांना पेशवाई मिळण्यापूर्वी) चौथाई, सरदेशमुखी, घासदाणा हे मराठ्यांचे मोगलाई प्रांतातील हक्क* तहानुसार सुरळीत वसूल होईनात. या वसुलीसाठी शाहू महाराजांनी चंद्रसेन जाधव आणि बाळाजींना फौजेसह रवाना केले. या मोहिमेत या उभयतांचे पटेना. चंद्रसेनने आपल्या स्वारांकरवी बाळाजींना पुत्रांसह पांडवगडजवळ आडवून धरले. या प्रसंगी पिलाजी जाधवांनी त्यांची सुटका केली. कोल्हापूरकर ताराबाईचा पक्ष घेऊन बंडाळी करणाऱ्या कान्होजी आंग्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शाहू राजांनी तत्कालीन पेशवे बहिरोपंत पिंगळे यांना पाठवले. यावेळी पिंगळे आंग्र्यांच्या हाती कैद झाले. अखेरीस बाळाजींनी शाहू महाराजांच्या आज्ञेवरून पिंगळ्यांना सोडवले. या प्रकरणामुळे बहिरोपंत पिंगळे शाहू महाराजांच्या मनातून उतरले व बाळाजींबद्दलचा भरवसा वाढला. बाळाजींनी पेशवापद या मोहिमेपूर्वीच हेतूपूर्वक ग्रहण केले होते.

खुद्द पेशवेच कैद झाल्यामुळे नामुष्कीची वेळ आली होती. बहिरोपंत पिंगळे यांना दूर करून दुसऱ्या कोणाकडे तरी पेशवापद द्यावे असा शाहु महाराज विचार करू लागले होते. या वेळी आंबाजीपत पुरंदऱ्यांनी महाराजांना पेशवापदासाठी बाळाजींचे नाव सुचवले. परशरामपंत प्रतिनिधींनी देखील "याजकडे फौजेचे वळण आहे. त्यास पेशवाईची वस्त्रे द्यावी." असा बाळाजींबद्दल निर्वाळा दिला.

आतापर्यंतच्या अनुभवाने बाळाजी हरहुन्नरी, व्यवहारदक्ष, वजनदार, अनुभवी, एकनिष्ठ सेवक आहेत, याची शाहू महाराजांना खात्री पटली होती. त्यांनी

---

* हे हक्क मराठे पूर्वीपासूनच वसूल करीत असत. याबद्दल पत्रे उपलब्ध आहेत. १७१९ साली पातशाही सनदा मिळाल्यामुळे वसुलीला 'सनदशीर' रूप आले इतकेच.

पेशवापद 'बाळाजी बिन विश्वनाथ उपनाम भट दे।। श्रीवर्धन' यांना देण्याचे ठरवले. बाळाजींशी सल्लामसलत झाली. 'प्रथम पेशवापद बहाल करून मगच रवाना करावे, दुसरा पेशवा कायम आहे असे कान्होजीस दिसेल तरच तो नरम येईल' असे बाळाजींनी शाहू महाराजांना स्पष्ट सांगितले.[२४]

'याजवर बहुत संतोष पावून प्रधानपदास योग्य आहेत समजोन सुमुहूर्त पाहोन मुख्य प्रधानपदाची वस्त्रे सा सनगे व जवाहीर, शीरपेंच, तुरा, कंठी, चौकाडा, ढाल, तलवार, शिक्के, कटार व चौघडा, साहेबनौबत, हत्ती, घोडे जरी-पटका याप्रमाणे देऊन मुख्य प्रधान केले. शके १६३५ विजयनाम संवत्सरे सुरुसन आर्बा अशर मया व अलफ राज्याभिषेक शक ४०'.

बाळाजींना पुण्याच्या दक्षिणेला ८ मैलांवर मांजरी या गावी पेशवा पदाची वस्त्रे दि. १७ नोव्हेंबर सन १७१३ रोजी मिळाली. त्याच वेळी रांजणगाव, कुर्डा, वगैरे पाच महालांचे सरदेशमुखी वतनही त्यांना लिहून दिले. आतापर्यंत बाळाजीं-कडे असलेले 'सेनाकर्ते' पद होनाजी अनंतना मिळाले. रामाजीपंत भानू फडणीस झाले. मुतालिकी आंबाजीपंत पुरंदऱ्यांना मिळाली.[२५] बाळाजी विश्वनाथ, पेशवा झाले. या काळात पुणे प्रांत रंभाजी निंबाळकरांचे प्रशासक बाजी कदम यांचे ताब्यात होता. तो पुढे दोन वर्षांनी नोव्हेंबर सन १७१५ (कार्तिक शके १६३७) मध्ये बाळाजींनी शाहू महाराजांकडे घेतला.[२५]

राज्यकारभार चालवताना प्रथमतः दुरावलेली माणसे सामोपचारांनी जोडून राज्याला बळकटी आणण्याचे धोरण बाळाजींनी पत्करले. अंतर्गत विरोध निर्बल होतील असे प्रयत्न केले. याचवेळी कान्होजी आंग्र्यांचे सिद्दीशी भांडण होते. म्हणून कान्होजींनीही बाळाजींशी समेट केला. पश्चिमेकडे नाविक सत्ता वाढत असताना शाहूच्या स्वराज्य-पक्षाचा पाठींबा लाभल्यास वाटेल तो पराक्रम करता येईल हे बाळाजींनी कान्होजीस पटवून दिले. अखेरीस २८ फेब्रुवारी सन १७१४ रोजी पेशवे–आंग्रे यांच्यात सलोख्याचा तह झाला. लढाई न करताच वाटाघाटी करून सामोपचाराने कान्होजी आंग्र्यांना वळवल्यामूळे बाळाजींची प्रतिष्ठा आणखी वाढली.

सन १७१६ च्या प्रारंभी दमाजी व राजजी या बंधूंनी शाहू महाराजांविरुद्ध मिरजेच्या बाजूला दंगा सुरू केला होता. ते बंड करून खंडणी घेऊ लागले. त्यांच्या बंदोबस्तासाठी 'थोडा बहुत जमाव देऊन' बाळाजींची रवानगी झाली. या मोहिमेच्या दरम्यान चंद्रसेन जाधवाने शाहूला आणि दमाजी थोराताने बाळाजींना पकडण्याचा कट फसला. मात्र बाळाजी दमाजींना भेटायला गेले असताना दमाजींनी 'फितूर दगाबाजी करून' परिवारासह बाळाजीपंत व आंबाजीपंत पुरंदऱ्यांना ५ ऑगस्ट सन १७१६ रोजी हिंगणगावच्या गढीत कैद केले. पैका, खंडणी, द्यावी म्हणून राखेचे

तोबरे भरण्यापर्यंत हाल केले.[२५]

'खंडणी ठरवून निघावे' असा शाहू महाराजांनी निरोप पाठवला.' पैका तरतूद करून आणितो' म्हणून आंबाजीपंत व पिलाजी जाधव बाहेर पडले. नंतर ऐवज थोरातांना देऊन बाळाजीपंतांसह सर्वजण कैदेतून सुटले. यावेळी बाळाजींनी थोरातांचा पराभव करून थोरातांकडून पुरंदर किल्ला आपल्याकडे वर्ग करून घेतला. दरम्यान हबशांनी बळकावलेले आंग्र्यांचे किल्ले परत घेण्यासाठी कान्होजी आंग्र्यांनी बाळाजींची मदत मागितली. या मदतीमुळे आंग्र्यांनी आपले सर्व किल्ले हबशांकडून परत मिळवले.

बाळाजींनी सासवड जवळच्या गराडे गावाची पाटीलकी खरेदी केली होती. दरम्यान शाहू महाराजांनी सासवड व सुपे ही गावेही बाळाजींना इनाम दिली. पुणे, सासवड, सुपे, अशा कोणत्यातरी गावी कायमची वास्तू असावी यासाठी बाळाजी प्रयत्न करीत होते. सन १७१८ च्या पूर्वार्धात ते सुप्याला राहात होते.[२६] ९ जानेवारी सन १७१८ च्या पत्रात ते म्हणतात;[२६] 'सुपे येथे रहावयासी आम्हास महाराजांची आज्ञा जाली आहे. तरी तेथे कोटाची मजबूदी कशी पाणी कसे ते लिहून पाठविणे' यानंतर बाळाजी २३ मे सन १७१९ ला सासवडला राहू लागले.[२७]

शाहू महाराजांच्या अष्टप्रधानांच्या एका यादीत 'राजश्री बाळाजी पंडीत प्रधान होनु १३००० ' अशी नोंद आढळते.[२८] सन १७१७-१८ दरम्यान बाळाजींनी हुसेनअली सय्यदच्या सहाय्याने थोरातांचा सपशेल पराभव केला. बाळाजींच्याच सांगण्यावरून सोमवंशी, दाभाडे, निंबाळकर, इत्यादी सरदारांनी खानदेश, गुजरात-मध्ये धुमाकूळ सुरू केला. सन १७१८ मधील पेशवे-सय्यदबंधू तहानुसार मराठ्यांचे चौथाई, सरदेशमुखी हे हक्क अबाधित राहिले. सय्यद बंधूंनी बाळाजींच्याच सहाय्याने दिल्लीच्या फर्रुखसियर बादशहाला पदच्यूत करून रफिउद्दौरजात याला २८ फेब्रु. सन १७१९ रोजी दिल्लीच्या तख्तावर बसवले. याच वेळी बाळाजींनी मोगलांच्या कैदेत अडकून पडलेल्या शाहू महराजांच्या बायका माणसांची सुटका केली.[२९]

१७१३ सालच्या जानेवारीत दिल्लीत बादशाह जहांदरशाहची कत्तल करून फर्रुखसियरला बादशाह करण्यात सय्यद बंधूंचा मोठा वाटा होता. त्यामुळे दिल्लीत सय्यद बंधूंचे प्रस्थ खूप वाढले होते. मोगली सत्तास्पर्धा आणि वर्चस्वाची महत्त्वाकांक्षा याबाबत सय्यद बंधू निजामापेक्षा वेगळे नव्हते. ते डोईजड होऊ नयेत म्हणून बादशाहाने त्यांच्या नाशाचा डाव रचला. तेव्हा काळाची गरज म्हणून सय्यद बंधूंना मराठी सत्तेशी दोस्ती करावी लागली. बाळाजींनी या संधीचा मुत्सद्देगिरीने मराठी सत्तेच्या उत्कर्षासाठी पुरेपुर फायदा उठवला.

या मोहिमेत स्वतः बाळाजी दिल्लीस गेले होते. त्यांना बादशाहाकडून शाहू

महाराजांच्या नावे ३ मार्च आणि १५ मार्च सन १७१९ रोजी अनुक्रमे चौथाई आणि स्वराज्य, सरदेशमुखीच्या सनदा मिळाल्या. बाळाजींनी आपले लोक दिल्लीला वकील म्हणून ठेवले. याच मुक्कामात प्रतिपक्षाकडूनच बाळाजींची हत्या करण्याचा कट रचला गेला होता. परंतु वेळेवरच सुगावा लागल्यामुळे बाळाजी निसटू शकले. पूर्वयोजनेनुसार बाळाजींच्या वेषात पालखीत बसलेले बाळाजी महादेव भानू (नाना फडणीसांचे आजोबा) दुर्दैवाने कटवाल्यांकडून मारले गेले.[10] दरम्यान बाळाजी २२ मार्चला दिल्लीहून निघाले. काशीयात्रा करून सिरोंज, भेलसा, सिहोर, हंडिया, नेमाड, बुऱ्हाणपूर मार्गे जून महिन्यात औरंगाबादला व ४ जुलै सन १७१९ रोजी साताऱ्याला पोहोचले. या पराक्रमाबद्दल ४ जुलैलाच शाहू महाराजांनी बाळाजींचा मोठा सत्कार केला.

दिल्लीच्या शाही सनदेनुसार १५ हजार फौजेनिशी पातशाहीचे, पर्यायाने मोगल साम्राज्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी मराठ्यांनी घेतली.[11] यामुळे शिवाजी महाराजांच्या स्वराज्यासह मराठ्यांनी मागे जिंकलेला सर्व मुलूख परत मिळाला. उत्तरेकडे नवे कार्यक्षेत्र व पराक्रमाची संधी मिळाली. शाहू महाराजांचा जम बसून राज्यव्यवस्था सुरळीत सुरू झाली. बाळाजींना सय्यद बंधूंकडून दिल्लीतील वास्तव्याचा खर्च, मोहिमेचा सर्व खर्च, वाटखर्च, मौल्यवान पोषाख व इतर अनेक गोष्टी भेट म्हणून मिळाल्या. असे म्हणतात की, या मोहिमेचा खर्चवेच वजा जाता बाळाजींनी ३० लाख रुपये राज्याच्या तिजोरीत जमा केले.

शाहूला मोगलांच्या कैदेतून मुक्त करताना 'मोगलांच्या ताबेदारीत राहून शाहूने राज्य करावे. स्वराज्य, चौथाई, सरदेशमुखी, हे हक्क वसूल करावे' असा शहजादा अझमशाह व शाहू यांच्यात तोंडी समझोता झाला होता. शाहूला प्रत्यक्ष सनदा मात्र मिळाल्या नव्हत्या. स्वतःच्या राज्याभिषेकानंतर शाहूने १७०९ साली मोगल बादशाह बहादूरशाह याच्याकडे तो दक्षिणेत आला असताना, सनदांची मागणी केली. राजारामांची पत्नी ताराबाईनेही असा अर्ज केला होता. तेव्हा बहादूरशाहाने, 'तुम्ही आपसात तंटा मिटवा मग सनदा देऊ' असा निर्णय दिला. याच सनदांच्या अश्वासनामुळे शाहू स्वराज्यावर आपला हक्क सांगत असे. बाळाजींनी दिल्लीहून १७१९ साली आणल्या त्या याच सनदा होत.[12]

या सनदांचा दुसरा अर्थ असा की, मराठ्यांनी आपले राज्य लढून परत मिळवले नाही तर पातशाही सनदांच्या कृपाछत्रामुळे 'दान' मिळाले. शाहूला याची प्रथम पासूनच जाणीव होती. पातशाही सत्तेला दुखवू नये या शाहूच्या सुप्त धोरणाचे खरे इंगित यातच आहे.

या सनदांमुळे बुऱ्हाणपूर, वऱ्हाड, विजापूर, कर्नाटक, बेदर आणि हैद्राबाद

या ६ मोगली सुभ्यांतून (सनदेमध्ये उल्लेख असलेले) काही विशिष्ट हक्क वसूल करण्याचा अधिकार मराठ्यांना मिळाला. असो.

१७१९ सालचा पावसाळा संपताच, दरम्यान सुरू झालेला कोल्हापूरकर संभाजीचा पुंडावा मोडण्यासाठी बाळाजींनी बेळगाव, रुकडी, तावळे, डिग्रज, भागात मोहिम उघडली. मार्च सन १७२० च्या उत्तरार्धात इस्लामपूरनजीक कोल्हापूरकर संभाजीवर निर्णायक विजय मिळवल्यानंतर बाळाजी सासवडला घरी परतले. परंतु आठवड्याच्या आतच २ एप्रिल सन १७२० रोजी शनिवारी* (शार्वरीनाम संवत्सर, चैत्र शु. ६ शके १६४२) वारले.[३३]

'बाळाजी विश्वनाथ पेशवे ऊर्फ थोरले नाना यांचा काल सासवड येथे जाला. वटेश्वरी दहन केले. तेथे वृंदावनही बांधण्यात आले.' त्यांच्या अस्थी प्रयागला कोणाबरोबर केव्हा पाठवल्या याचा दाखला उपलब्ध नाही.[३३]

पातशाही मुलखात आक्रमण करण्याचे धोरण बाळाजींनी आखले आणि पुढे चालवले. शत्रूच्या कमजोरीचा फायदा उठवला. दिल्लीचा बादशाह फर्रुखसियर आणि दिल्ली दरबारचे प्रबळ सरदार कर्तुमकर्तुम सय्यद बंधू यांच्यातील परस्पर वैमनस्याचा फायदा घेऊन बाळाजींनी दिल्ली दरबारात मराठ्यांचे वर्चस्व स्थापन केले. मराठ्यांचे लक्ष गृहकलहातून बाहेरच्या उद्योगात लावले. दिल्लीच्या राजकारणात मराठ्यांचा शिरकाव करून घेतला. त्याचा महाराष्ट्राच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाला आहे. मराठी साम्राज्याच्या वाढीला येथूनच प्रारंभ झाला. दरखदारी, जहागिरी, सरंजामी, वतनदारी, इत्यादी बाबतीत पद्धती ठरवून राज्यव्यवस्थेत शिस्त आणली. चौथाई वसुलीसाठी सरदारांना प्रदेश वाटून दिले. बाळाजींनी लावून दिलेली व्यवस्था पुढे ७५ वर्षे टिकली.★

दिल्लीच्या सनदांमुळे मराठ्यांनी दिल्लीच्या पातशाहीचे मांडलिकत्व पत्करले असा आक्षेप घेतला जातो, तो फारसा बरोबर नाही. पातशाही सत्तेबद्दलच्या शाहू महाराजांच्या काहीशा बोटचेपेपणाच्या धोरणामुळे तसा समज होणे शक्य आहे. या नाण्याची दुसरी बाजूही लक्षात घेतली पाहिजे.

---

* पेशवाईच्या दोन प्रथा : १. पेशव्यांचा मृत्यू झाल्याचे समजल्यावर सातारकर छत्रपती पेशव्यांच्या सन्मानार्थ तीन दिवस चौघडा बंद ठेवीत. २. पेशवा परिवारात पुत्रजन्म झाला की, त्याप्रीत्यर्थ श्रावणात ब्राह्मणांना स्वतंत्र देकार मिळे.

★ 'श्रीमंत कैलासवासी छत्रपती शाहू माहाराज याचे कारकीर्दीस श्रीमंत कैलासवासी विसाजीपंत यांचे चिरंजीव श्रीमंत कैलासवासी बाळाजीपंत नानासाहेब याणी येकनिष्टपणे पराकाष्टेची सेवा केली.' - मदरु भाग २ पृ. ६९.

दिल्लीचे तख्त हे हिंदुस्थानातील सर्वोच्च राजसत्तेचे प्रतीक आहे, ही प्रबळ भावना लोकांच्या मनांत पिढ्यानुपिढ्या रुजली होती. उलटपक्षी मराठी सत्ता काहीशी विस्कळित झाली होती. अशा स्थितीत, दिल्लीच्या सत्तेचा दिखाऊ डोलारा कायम ठेवून दिल्लीपतीच्या सनदांन्वये विशिष्ट राजकीय व प्रशासकीय अधिकार मिळवायचे. त्यांच्या आधाराने मराठी सत्ता प्रबळ करायची आणि प्रत्यक्ष दिल्लीच्या राजकारणाची सूत्रे मराठ्यांनीच चालवायची हे बाळाजींचे राजकीय धोरण होते.

शाहू महाराजांच्या राज्याभिषेकानंतरच्या दहा वर्षांतील राजकीय परिस्थिती पाहता तत्कालीन सरदारांच्या वैयक्तिक कर्तबगारीला वाव देणे व त्यासाठी प्रत्येकाला कार्यक्षेत्र वाटून देणे आवश्यक होते. या धोरणामुळे दाभाडे (गुजराथ), भोसले (वऱ्हाड, गोंडवन), प्रतिनिधी (सातारा), सचीव (पुणे–मावळ), पेशवा (खानदेश, बागलाण, माळवा), सरलष्कर (गोदावरी खोरे), फत्तेसिंग (कर्नाटक), आंग्रे (कोकणपट्टी), हे त्या त्या प्रांताचे वतनदार शाहूच्या छत्राखाली आले. मराठा–संघराज्य (Maratha Confederacy) पद्धतीचा हाच प्रारंभ होय.

बाळाजी स्वराज्यव्यवस्था, मोगली व्यवहारांचे जाणकार होते. त्यांनी शिवशाहीचा उत्तरार्ध, छत्रपती राजारामाची राजवट, रामचंद्रपंत आमात्यांची कारभारपद्धती, मोगलाईचे राज्यतंत्र जवळून पाहिले होते. शत्रूच्या कमजोरीचा फायदा उठवून त्यातून राज्यहित कसे साधावे, हे त्यांना चांगलेच अवगत होते. कोणालाही डिवचून त्यांचेवर झडप घालून त्याचे सामर्थ्य खच्ची करण्यापेक्षा प्रतिपक्षाचे मर्मस्थान जाणून आपली प्रतिष्ठा कायम ठेवून त्याला आपल्या पक्षात सामील करण्याचे कसब बाळाजींमध्ये भरपूर होते.

आवश्यक असेल तेव्हा सैन्यबळाचा परिणामकारक वापर करावा. वाटाघाटींनी कार्यभाग साधत असेल तेव्हा मुत्सद्देगिरी चालवून राज्याचे नुकसान टाळावे. पण पाऊल मात्र पुढेच पडले पाहिजे, हे त्यांचे सूत्र होते. यामुळेच औरंगजेबानंतर मोडकळीस आलेली मोगली सत्ता कमजोर करून आपल्या काबूत आणावी या धोरणाचा पाया बाळाजींनी रचला. हेच धोरण त्यांच्या नंतरच्या तीन पेशव्यांनी चालवून मराठी सत्तेला देशात सार्वभौमत्व प्राप्त करून दिले. शाहू महाराज तर बाळाजींना ‘ अतूल पराक्रमी सेवक ’ म्हणत.[३४]

बाळाजींचे व्यक्तिमत्व विशाल होते. गौरवर्ण आणि रुबाबदार चेहेरा, यामुळे त्यांची चांगली छाप पडत असे. त्यांची बुद्धी विलक्षण तल्लख होती. त्यांच्या कारकीर्दीत मराठी मुलखात शांतता, सुबत्ता होती. न्यायाच्या बाबतीत हे शाहू महाराजांच्या नातलगांचीही भीड बाळगत नसत. यांना उत्तम विद्याभिरुची होती. विद्वानांना चांगले प्रोत्साहन मिळत असे. देशमुख दंडाराजपुरी, अधिकारी श्रीवर्धन,

सभासद दाभोळ, सरसुभेदार प्रांत पुणे व दौलताबाद, मुख्य देशाधिकारी, लेखक, महालनिहाय, मुतालिक, पंतसचीव, सेनाकर्ते, ही उपपदे वेळोवेळी बाळाजींच्या नावापुढे लावलेली आढळतात[३५].

पत्नी : राधाबाई, बाळाजी चिपळूण– दाभोळकडे असताना हे लग्न झाले असावे. 'हे लग्न २० रु. त झाले अशी ख्याती आहे[३६]' यांच्यासह बाळाजी देशावर आले. राधाबाई पेशवाईतील कर्तबगार स्त्रियांपैकी एक होत्या. पेशव्यांच्या घरातील सगळा कारभार त्यांच्याच सल्ल्याने चाले. व्यावहारीक दृष्टीने पेशव्यांच्या सोयरिकी श्रीमंत घराण्यात करण्याची राधाबाईंची खटपट असे. रघुनाथरावांसाठी ओंकार सावकरांची मुलगी करावी अशी राधाबाईंची इच्छा होती, त्याचे कारण यावरून स्पष्ट व्हावे[३७].

राधाबाई या द्वितीय पत्नी. बाळाजींचा प्रथम विवाह कोकणात वास्तव्य असताना झाला असावा असे वि. का. राजवाडे म्हणतात. पण त्याला सबळ आधार मिळत नाही[३८].

आपल्या आणि नातलगांच्या मुलांमध्ये साधी, काटक, साहसी वृत्ती राधाबाईंनीच बाणवली. ह्यामुळेच पुढे सगळयांचा उत्कर्ष झाला. सगळी राजकारणे राधाबाईंना चांगली समजत असत. कठीण प्रसंगात थो. बाजीराव व थो. चिमाजीआप्पा राधाबाईंचा सल्ला घेऊन वागत असत. हे दोघेही आपल्या आईची कर्तबगारी ओळखून होते. 'मातुश्रींच्या आशीर्वादापासून आपले सर्वकाही मनोरथ सिद्धीस जातात' अशी या वीरपुत्रांची भावना असे.

राधाबाई अत्यंत चतुर, बुद्धिमान् होत्या. प्रसंग पडल्यास राजकारस्थानेही तडीस नेण्यात कुशल होत्या. राजकारणाची बातमीपत्रे मागवून बातम्या राखीत. त्यांना चांगले लिहिता-वाचता येत असे. स्वभाव स्वाभिमानी, पाणीदार होता. सर्व पेशवे कुटूंबीय, सरदार, मुत्सद्दी, त्यांना वचकून असत. थोरले बाजीराव, चिमाजीआप्पा पुण्याबाहेर असताना राधाबाईच पुण्यातील कारभार दक्षतेने चालवीत. परिवारातील मुलांचे संगोपन, शिक्षण, धार्मिक कृत्ये, कौटुंबिक बाबी, वगैरे राधाबाईच जातीने पहात[३९].

त्यांचा कारणपरत्वे ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकरांशीही पत्रव्यवहार असे. त्यात युद्धाच्या घडामोडी, कौटुंबिक बाबी, लिहिलेल्या आढळतात.* राधाबाईंना खासगत खर्चासाठी एक गाव मोकासा दिल्याची नोंद : '५–२–१७३४ छ. ११ रमजान मातुश्रीबाई यांस मौजे आंबोसी ता चोण हा गाव दिल्हा होता त्यास तो बरा नव्हे

* १) पारसनीसकृत ब्रह्मेंद्रस्वामींचे चरित्र. २) पेद ९ यामध्ये राधाबाईंची व त्यांना इतरांनी लिहीलेली अनेक पत्रे उपलब्ध आहेत.

याजकरिता मौजे कलल ताा तलोजे हा गाव मोकासा दिल्हा येविसी सनद–१[४०],

राधाबाईंनी ९ ते ११ नोव्हेंबर सन १७२८ दरम्यान (थो. बाजीराव व परिवारासह) तुळजापूर व पुढे पंढरपूरची यात्रा केली होती.[४१] सन १७३५ मध्ये त्या काशीयात्रेला गेल्या होत्या. तेव्हा उत्तरेकडील सरदार व सत्ताधीशांनी, राजपूत राजांनी, इतकेच नव्हे तर, पेशव्यांच्या शत्रूंनीही राधाबाईंची उत्तम बडदास्त ठेवली होती.

उदेपूरच्या राण्याने आठवडाभर पाहूणचार केला. मोत्याची माळ १, पदक १, हातचे सोन्याचे चुडे, हत्तीचा छावा १, खर्चासाठी ५००० रु. देऊन राधाबाईंचा मोठा सत्कार केला. याखेरीज दिवाण बिहारीदास यांनी १००० रु. नजर केले.

नाथद्वार मार्गे जयपूरला आल्यावर सवाई जयसिंगाने सुमारे २-२॥. महिने वैभवशाली पद्धतीने पाहुणचार केला. यमुनातीरावरील मुक्कामात स्वारीच्या बंदोबस्तासाठी खुद्द दिल्लीच्या बादशहाने स्वारांचे पथक पाठवले होते.

बाजीरावांचा जुना शत्रू मूहम्मदशाह बंगश याने आपल्या दिवाणाला सत्कार-सामुग्रीसह राधाबाईंच्या क्षेमकुशल समाचारासाठी पाठवले होते. वाटखर्चासाठी १००० रु. दिले होते. शिवाय विकेशा स्त्रीला वापरता येतील अशी सोवळी पातळे (तांबडी आलवणं) भेटीदाखल दिली होती. बंगशाने राधाबाईंना ' आपण मला मातेसमान ' अशा शब्दाने गौरवले आहे, हा बाजीरावांचा नैतिक विजयच म्हटला पाहिजे.

यात्रा मुक्कामांचे दरम्यान ठिकठिकाणी सत्कार स्वीकारावे लागतील. वाटा-घाटी कराव्या लागतील. आपण स्वतः विधवा स्त्री असल्यामुळे समक्ष काही स्वीकारणे योग्य नाही. यासाठी पेशवा परिवारातील पुरुष मनुष्य बरोबर असणे वाजवी होईल. हे लक्षात घेऊन निदान पेशव्यांचा प्रतिनिधी म्हणून छोट्या सदाशिवला (भाऊसाहेब) यात्रेबरोबर पाठवावे अशी राधाबाईंनी चिमाजी-आप्पांना विनंती केली होती. ही विनंती नम्रपणे पण ठामपणे नाकारताना चिमाजी-आप्पा म्हणतात : " वरंकड चिरंजीवाचे यात्रेचे दिवस हे आहेत यैसे नाही. . . . . तुम्ही यात्रा करावयास जातां, देवधर्म तीर्थ करावयास चिरंजीवाचा पायगोवा होईल यैसे आहे. " याबद्दल पेद ९ मध्ये उल्लेख आहेत.

यात्रेच्या काळात राधाबाईंनी रजपूतांना एकत्र आणून दिल्लीच्या सत्तेविरुद्ध राजकारण जुळवले होते[४२]. या धामधुमीच्या काळातही काशीयात्रा इतमामाने आणि निर्विघ्नपणे पार पडली. यावरून बाजीरावांचा देशात किती दरारा होता हेच दिसून येते.

१४ फेब्रुवारी सन १७३५ रोजी राधाबाईंनी काशीयात्रेला प्रस्थान ठेवले. २४ मे सन १७३६ रोजी यात्रा संपवून पुण्याला परतल्या[४१]. यात्रा मुक्कामांची संक्षिप्त

नोंद : ता. १४ फेब्रु. सन १७३५ पुण्याहून प्रयाण, ८ मार्च बुऱ्हाणपूर, १८ एप्रिल नर्मदापार बढवाई, ६ मे उदेपूर, १८ मे नाथद्वार, २१ जून जयपूर मुक्काम १५ सप्टेंबरपर्यंत, सप्टें–ऑक्टो. मथुरा वृंदावन, कुरुक्षेत्र, प्रयाग (हरिद्वार, आयोध्येचा उल्लेख नाही) १७ ऑक्टो. काशीत दाखल, २३ डिसेंबर काशीहून गयेकडे प्रयाण, जाने. सन १७३६ गयेहून बुंदेलखंडमार्गे सागरहून बढवाईजवळ नर्मदा उतरून मे महिन्यात पुण्यात दाखल. १ जून सन १७३६ ला मावंदे केले.[४४] यात्रा खर्च १ लाख रु. झाला.

१५ जुलै सन १७५१ ला सोमवारी (श्रावण शु. ४) थो. नानासाहेबांनी पुणे मुक्कामी यांची रौप्यतुला केली. सामाजिक व धार्मिक बाबतीत लोकहिताला प्राधान्य देऊन वागण्याची त्यांची पद्धत असे. सरदार पटवर्धनांच्या एका कौटुंबिक प्रकरणात, ' तुम्ही प्रायश्चित्त देणे आम्ही आज्ञा केली तेच आज्ञा प्रभुची दुसरा अर्थ चित्तात न आणणे ' असे ब्राह्मणांना बजावल्याचे आणि गावात दुष्काळ पडला असता लोकांना पाणी न देता बगीचाला पाणी पुरवठा करीत राहिल्याबद्दल सरदार त्रिंबकरावमामा पेठ्यांना समज दिल्याबद्दलचे उल्लेख अभ्यासकांना परिचीत आहेतच.[४६] त्या पुण्यात वारल्या. मृत्यूतिथी ' श्रीमुखनाम संवत्सर, चैत्र वद्य २ शके १६७५ (गुरुवार) ' अशी आहे. ' मोडक-जंत्री 'नुसार याची इंग्लिश तारीख १९ एप्रिल सन १७५३ येते. काही ठिकाणी २०-३-१७५३ तारीख दिली आहे ती चूक आहे. राधाबाईंच्या उत्तरकार्याचा खर्च ८,२६७ रु. झाला.[४७] गणेशभट कर्वे व गोविंद कृष्ण गोखले यांच्याबरोबर अस्थी महायात्रेला पाठवल्याची १७ जून सन १७५४ ची नोंद आहे.[३३]

राधाबाईंचे पिता दादाजी जोगदेव बर्वे सावकार डुबेरकर,* परगणा नाशिक मूळगाव नेवरे जि. रत्नागिरी. **मुली :** (१) भिऊबाई ज. सन १७०८ ' शनिवार पेठेतील अमृतेश्वराचे देऊळ कै. भिऊबाई बारामतीकर यांनी बांधले. ' असा ' पुणे गॅझेटिअर ' मध्ये उल्लेख आहे. पण तो बरोबर नसावा. चित्रावांच्या जमिनीच्या सनदेत देऊळ कोणी बांधले याचा स्पष्ट निर्देश नाही.[४८] भिऊबाईंचा विवाह शके १६३३ (सन १७१२) मध्ये झाला. या ७ जून सन १७४७ रोजी रविवारी (प्रभवनाम संवत्सर, ज्येष्ठ शु. १० शके १६६९) वारल्या. पती आबाजी (आबुराव) सदाशिव जोशी, नाईक. भिऊबाईंचे स्मरणार्थ बाबूजी नाईकांनी शिवरामभट चित्राव यांच्या जागेत सिद्धेश्वराचे देवालय बांधून चित्रावांनाच पूजेचे काम सांगितले.

---

* ' कन्या येक, ती देश राजपुरीचे देशमुख श्रीवर्धनचे राहणार उपनाव भट गार्ग्य गोत्री; विश्वनाथ याचा पुत्र बाळाजीपंत यास दिल्ही '– ' बरवे घराण्याचा इतिहास '– आ. शके १८३८, पृ. १०.

नाईक जोशांनी पुण्याच्या शनिवार पेठेचा विस्तार केला. तेव्हा थो. बाजीरावांनी या पेठेचे उत्पन्न भिऊबाईंच्या लुगडे चोळीसाठी लावून दिले.

(२) अनुबाई ज. सन १७१४. वयाचे ६ वे वर्षी १७१९ साली विवाह झाला. यांना वर्षातून बरेच दिवस आपल्याजवळ राहाता यावे यासाठी पेशव्यांनी सन १७२२ मध्ये त्यांना पुण्यात एक वाडा बांधून दिला. मौजे वडगाव तर्फ चाकण हा गाव, पर्वतीचा बाग, हडपसरचा बाग, वगैरे बागा, इनाम करून दिल्या. यांना वैधव्य आल्यानंतर शाहू महाराजांनी आजरे गाव इनाम करून दिला. पुढे यांनी ३१ खेड्यांची सनद रीतसर मिळवली. सन १७५६ मधील सावनूर मोहिमेत त्या हजर होत्या. नानासाहेब पेशव्यांच्या अखेरीपर्यंत त्या बहुतेक स्वाऱ्यांत हजर असत.

डिसेंबर सन १७६६ मध्ये त्यांना तैनात मिळे ती : 'पालखीबद्दल ११०० रु., पालखीच्या सामानाबद्दल १५० रु., कापडाबद्दल ३५० रु.,'[४९] वैधव्यकाळात यांनी अखेरपर्यंत इचलकरंजी संस्थान खंबीरपणे सांभाळले. यांनी आपल्या कर्तबगारीने धारवाड सुभ्याची मामलत किल्ल्यासह मिळवली. यांची वागणूक नेमस्त असे. सर्व व्यवहारावर काटेकोर लक्ष असे. या, उत्तर पेशवाईत तोतया भाऊसाहेबाच्या पक्षाला मिळाल्यामुळे पेशव्यांची यांच्यावर इतराजी झाली. पुढे त्यांनी पेशवाईच्या राजकारणातून अंग काढून घेतले. या मनस्तापापायी त्या काशीला गेल्या. ३० डिसेंबर सन १७८३ रोजी मंगळवारी (शोभननाम संवत्सर, पौष शु. ७ शके १७०५) तुळजापूरला वारल्या. यांची एक मुलगी वेणूताई (सौ. येसूबाई) त्रिंबकरावमामा पेठ्यांना दिली होती. अनुबाईंचे पती व्यंकटराव नारायणराव घोरपडे (जोशी–शांडिल्य गोत्र.)

बाजीराव बल्लाळ : (६) यांचा जन्म १८ ऑगस्ट सन १७०० रोजी रविवारी (विक्रमनाम संवत्सर, भाद्रपद शु. १५ शके १६२२) झाला. यांचे जन्मस्थळ स्पष्टपणे उपलब्ध नाही. जन्म आजोळी डुबेर येथे बर्व्यांचे वाड्यात झाला असावा असा प्रवाद ऐकिवात आहे. बाळंतपणाची प्रथा लक्षात घेता हे शक्य आहे, पण कागदोपत्री उल्लेख उपलब्ध नाही. यांचे पाळण्यातले नाव विश्वास होते. बालपणी विश्वासराव, विसाजी, असेही म्हणत. यांची अपत्ये यांना बाबासाहेब म्हणत. 'बाळाजी विश्वनाथ यांनी बाजी नावाचे जेवढे पराक्रमी पुरुष होऊन गेले त्यांची एक स्वतंत्र बखर स्वदस्तुरची लिहून ठेवली होती ती वाचत होते. त्याच-वेळी त्यांना पुत्र जन्माची वार्ता समजली म्हणून मुलाचे नाव बाजीराव ठेवले.' अशी आख्यायिकावजा माहिती मिळते.[५०]

हे वयाच्या बाराव्या वर्षीच वडीलांबरोबर मोहिमेवर जाऊ लागले. यामुळे त्यांना व त्यांचे धाकटे बंधू चिमाजीआप्पा यांना राजनीती, युद्धनीती, राज्य-व्यवस्था वगैरेचे उत्तम शिक्षण प्रत्यक्ष अनुभवातून मिळाले. बाजीरावांनी वडीलांबरोबर

राहून मराठेशाहीच्या सातारा राजधानीपासून दिल्ली दरबार पर्यंतचे सर्व राजकारण पाहिले होते. हे सेनापती खंडेराव दाभाडयांना गुरुस्थानी मानत असत. बाजीरावांनी वडीलांपेक्षाही वरचढ पराक्रम, कर्तबगारी दाखवली. १७१३ साली पांडवगडचे चकमकीचे वेळी यांना पहिला युद्धानुभव मिळाला. त्या वेळी हे वडीलांबरोबर होते. वडीलांच्या हयातीत काही काळ हे पेशव्यांचे मुतालिक होते.[५१] वडील बाळाजी दिल्लीच्या मोहिमेवर निघण्यापूर्वी, ६ ऑक्टोबर सन १७१८ ला भरलेल्या खास दरबारात समारंभपूर्वक बाजीरावांना सरदारी व चिमाजीआप्पांना मुतालिकी मिळाली.

वडिलांच्या मृत्यूनंतर यांची हुषारी, धडाडी पाहुन दरबारातील काही सरदारांचा विरोध पत्करूनही 'सबका सुनना दिलका करना' या न्यायाने शाहू महाराजांनी बाजीरावांना पेशवापद दिले. कऱ्हाड नजीक मसूर मुक्कामी, १७ एप्रिल सन १७२० रोजी गुरुवारी (शार्वरीनाम संवत्सर, चैत्र शु. ७ शके १६४२) यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली. 'राजश्री बाजीराव बल्लाळ, राजश्री बाळाजी विश्वनाथ मुख्य प्रधान यांचे पुत्र राजश्री बाळाजी विश्वनाथ मृत्यू पावले याकरिता त्यांचे पुत्र राव मशारनिल्हे यांजवरी स्वामी कृपाळु होऊन पेशवाईचा धंदा सांगितला. छ २० जमादिलाखर बितपसील तैनात सालिना 'होनु' पादशाही १३०००– अशरीन मया व अलफ'[५२]

पेशवाई मिळाल्यावर बाजीराव लगेच खानदेशात हुसेनअली सय्यदच्या मदतीसाठी मोहिमेवर गेले. सन १७२० च्या दसऱ्यानंतर निजामाने मराठेशाही विरुद्ध कुरापती काढायला सुरुवात केली. १५ डिसेंबर सन १७२० ला पेशव्यांनी निजामाचा पराभव केला. सन १७२१ मध्ये माळव्याच्या दाऊदखानाचा पराभव केला. सन १७२१ अखेरीला थोरल्या बाजीरावांचा आणि पोर्तुगीजांचा प्रथम संबंध आला. सन १७२१ मध्ये कान्होजी आंग्र्यांनी शाहू महाराजांचे मांडलिकत्व पत्करल्यानंतर, पोर्तुगीजांविरुद्ध मदतीसाठी बाजीरावांनी कान्होजींना पाचारण केले. या संयुक्त मराठी फौजांपुढे आपला निभाव लागणार नाही, असे पाहून पोर्तुगीजांनी पेशव्यांशी ९ जानेवारी सन १७२२ रोजी वरसोली मुक्कामी तह केला. पण तो फार काळ टिकला नाही.

यानंतर बागलाण, खानदेश हस्तगत करून बाजीरावांनी माळव्यावर एकूण तीन स्वाऱ्या केल्या. त्यांनी १७२२ साली उदाजी पवारना माळव्यात व गुजराथमध्ये अंमल बसवण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे पवारांनी धारला आपले ठाणे बसवले. माळव्याच्या दुसऱ्या मोहिमेसाठी बाजीरावांनी २७ जानेवारी सन १७२४ ला उत्तरेकडे प्रयाण केले. उज्जैनीचा शाही सुभेदार दयाबहादूरचा पराभव केला.

१७२६ साली शाहू महाराजांनी बाजीरावांना पुणे गाव वंशपरंपरागत इनाम दिले.[५३] (३१ मार्च सन १७२६, खरे जंत्री). यानंतर राजकारणासाठी आवश्यक वाटल्यामुळे व पुणे मध्यवर्ती असल्यामुळे आतापर्यंतचा सासवडचा मुक्काम सोडून थोरले बाजीराव पुण्याला आले. पुण्यात त्या वेळी पेशव्यांचा खाजगी वाडा नसल्यामुळे पेशवे परिवार शनिवारवाडा बांधून होईपर्यंत धडफळयांच्या वाडयात राहात असे.[३५] सुरुवातीला काही वर्षे थो. बाजीराव वडीलांचा शिक्का चालवत असत.[५४]

बाजीरावांनी आपल्या कारकीर्दीत कृष्णा नदीच्या दक्षिणेला फक्त दोनच स्वाऱ्या केल्या. पहिली नोव्हेंबर सन १७२५ ते मे सन १७२६ दरम्यान चित्रदुर्गची, दुसरी नोव्हेंबर सन १७२६ ते एप्रिल सन १७२७ दरम्यान श्रीरंगपट्टणची. वस्तुतः सातारा दरबारातील विरोधक सरदारांच्या उठाठेवींमुळे कर्नाटकात फारसे लक्ष न घालता उत्तरेकडे लक्ष केंद्रित करून, मोहिमांच्या निमित्ताने दूर राहण्याचा मार्ग बाजीरावांनी पत्करला होता. बाजीरावांच्या दक्षिणेकडील स्वाऱ्यांच्या वेळी, दक्षिणेकडचे चौथाई व सरदेशमुखीचे हक्क लागू केले. कोल्हापूरकर संभाजीला हाताशी धरून निजामाने सुरू केलेली बंडाळी मोडण्यासाठी १६ सप्टेंबर सन १७२७ ला निजामाविरुद्ध मोहिम सुरू केली. या मोहिमेत २५ फेब्रुवारी सन १७२८ रोजी औरंगाबादच्या पश्चिमेला मराठ्यांनी निजामाचा पूर्ण कोंडमारा केला. पालखेडला दोन्ही फौजांमध्ये मोठे युद्ध होऊन निजाम मराठी फौजांना पूर्णपणे शरण आला. ६ मार्च सन १७२८ ला दोन्ही पक्षांमध्ये मुंगीशेगाव येथे तह झाला. पुढे ५ नोव्हेंबरला निजामाचा एक मोठा सरदार ऐवजखान याचा मराठी फौजांनी पराभव केला.

निजाम वरचढ होऊ लागल्याने दिल्लीच्या बादशाहाने बाजीरावांची मदत मागितली. बाजीरावांनी मदत करण्याचे मान्य करून, ' मराठ्यांनी २५००० फौज गुजराथेत कायमची ठेवुन बादशहाच्या शत्रूंचा बंदोबस्त करावा आणि त्याबद्दल त्यांना बादशाहाने तमाम गुजराथ प्रांताच्या चौथाई सरदेशमुखीच्या हक्कांची सनद करून द्यावी ' असा, मोगलांचा सरदार सरबुलंदखानाशी करार केला.

बाजीरावांच्या पत्रांवरून असे दिसते की, याच दरम्यान शाहू महाराजांनी राज्याला झालेली कर्जे फेडण्याचा तगादा लावला होता. काही तरी साहस केल्याशिवाय धनोत्पत्ती होण्यासारखी नव्हती. उत्तरेकडे स्वारी करून काही धनलाभ झाल्यास पहावे यासाठी १७२८ साली मोहिम आखण्यात आली. या मोहिमेत २९ नोव्हेंबर रोजी आमझेरा येथे चिमाजीआप्पांनी गिरीधरबहाद्दर या बलाढ्य मोगल सरदाराला साफ बुडवले. बाजीरावांनी वऱ्हाड–मध्यप्रांतातून उत्तरेकडे त्वरेने प्रयाण करून देवगड, गढामंडला मार्गाने बुंदेलखंडाकडे आगेकूच सुरू केली. दरम्यान मूहम्मदशाह बंगशने महाराजा छत्रसाल बुंदेला यांच्या पुत्रांच्या आधिपत्याखालील बुंदेली फौजांचा आणि डिसेंबर सन १७२८ मध्ये जैतपूरजवळ वृद्ध

छत्रसालांचा पराभव केला. रागरंग पाहून, मराठे व राजपूत यांच्यात वेळप्रसंगी एकमेकांना मदत करून बादशाही बुडवण्याच्या, पूर्वी झालेल्या करारानुसार छत्रसालांनी मदतीच्या खलित्यासह दुर्गादास राठोड यांना बाजीरावांकडे पाठवले.

छत्रसालांचा खलिता मिळाला तेव्हा बाजीराव गढामंडला (गढाकोटा ?) येथे होते. खलिता पाहताच परिस्थितीचे गांभीर्य जाणून बाजीरावांनी तातडीने उत्तरेकडे प्रयाण केले. या वेळी चिमाजीआप्पा उज्जैनला होते. बाजीरावांनी चिमाजीआप्पांना कळवले, 'आम्ही छत्रसालांचे मुलखात आहो तुम्ही सुचेल तिकडे पोट भरणे, आम्ही इकडे भरतो.[५५] या संदर्भातला, 'जो गति ग्राह गजेंद्र की सो गति भई जानहु आज ॥ बाजी जात बुंदेल की राखो बाजी लाज ॥' हा दोहा प्रसिद्ध आहे.[५६]

या मोहिमेतील बाजीरावांच्या दैदिप्यमान यशामुळे खुष होऊन, त्यांना आपला मुलगा मानून छत्रसालांनी आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा (उत्पन्न ३२ लाख रु.) बाजीरावांना देण्याचे जाहीर केले.[५७] छत्रसालांच्या काही पत्रांवरून मात्र, याबद्दल शक्यतो दिरंगाई व्हावी अशी त्यांची इच्छा असल्याचे दिसते.[५८] महाराजा छत्रसाल ५ डिसेंबर सन १७३१ रोजी मृत्यू पावले. निदान सन १७३४ पर्यंत तरी १/३ हिस्सा बाजीरावांकडे आलेला नव्हता. मात्र या मोहिमेमुळे मराठ्यांचा पाय उत्तर हिंदुस्थानात कायमचा रुतून बसला.

बुंदेलखंडच्या यशानंतर एका मराठी सरदाराने पत्रात लिहिले आहे : "रावांचा पुण्यप्रताप ऐसा जाला आहे की हस्तनापूरचे राज्य घेऊन छत्रपतीस देतील तर आज अनुकूल आहे."

बुंदेलखंडच्या मोहिमेपूर्वी, शाही करारानुसार गुजराथचे वसूली हक्क पेशव्यांना मिळाले होते. गुजराथ सुभा दाभाड्यांकडे होता. सरबुलंदखानाच्या उपरोक्त करारामुळे दाभाड्यांच्या अधिकारांना धक्का बसला. पेशव्यांचे गुजराथमधील वर्चस्व नाहीसे करण्यासाठी त्यांनी निजामाशी हातमिळवणी केली. यातूनच पुढे दाभाड्यांचे पेशव्यांशी वैमनस्य निर्माण झाले.

दाभाड्यांच्या बंदोबस्तासाठी बाजीराव १७३१ साली गुजराथेत उतरले. त्यांनी डभईजवळ भिलापूर येथे त्रिंबकराव दाभाड्यांचा पराभव केला. दाभाडे १ एप्रिल रोजी लढाईत अपघाताने अनपेक्षितपणे कामी आले. सुरतजवळ दमण येथे बाजीरावांनी निजामाचाही पराभव केला. कालांतराने ४ नोव्हेंबर सन १७३३ ला पेशवे दाभाडे यांच्यात पुन्हा सख्य झाले. त्यापूर्वी एप्रिल सन १७३३ मध्ये बाजीरावांनी जंजिऱ्याच्या सिद्दीविरुद्ध मोहिम सुरू केली पण डिसेंबरमध्ये आवरली. जंजिऱ्याची दुसरी मोहीम फेब्रुवारी सन १७३५ ते ३ एप्रिल सन १७३५ दरम्यान झाली.

ऑक्टोबर सन १७३५ मध्ये (धनत्रयोदशी) पुन्हा बाजीराव उत्तरेकडे निघाले. राजस्थान आणि माळव्याच्या खंडणीचा प्रश्न कायमचा निकालात काढण्यासाठी जयसिंगाशी कायमस्वरूपी वाटाघाटी करणे हा हेतू होता. हे काम पूर्ण करून मे सन १७३६ अखेर बाजीराव दक्षिणेकडे यायला निघाले. गुजराथ, माळवा प्रांतांची सुभेदारी, चौथाई तत्वावर मराठ्यांना द्यावी, ही बाजीरावांची मागणी दिल्लीच्या बादशहाने प्रथम अमान्य केल्यामुळे बादशाही फौज आणि आश्रितांचा समाचार घेण्यासाठी बाजीरावांनी नोव्हेंबर सन १७३६ मध्ये पुन्हा उत्तरेकडे मोहिम आखली.

एका महिन्याच्या आत भोपाळ गाठले. जानेवारी १७३७ च्या मध्यास भेलसा, नंतर अटेर, भदावर, काबीज करून आग्र्याच्या रोखाने वाटचाल सुरू होताच बादशाहाने सादतखान, कमरुद्दीनखान यांसारख्या सरदारांना मराठी फौजांवर सोडले. हे पाहून मोगलांना जरब बसविण्यासाठी थेट दिल्लीला धडक देण्याचा बाजीरावांनी निर्णय घेतला. २९ मार्च सन १७३७ ला दिल्लीच्या परिसरात कुशबंदी नजीक मराठी फौज पोहोचलेली पाहताच दिल्लीकरांची दाणादाण उडाली. यावेळी दिल्लीत कोणीही मोठा सरदार किंवा पुरेशी फौजही नव्हती. या मोहिमेत बाजीरावाबरोबर मस्तानीही होती. त्याबद्दल समकालीन उल्लेख मिळतात.

या वेळी दिल्लीत लुटालूट खूप झाली. मराठी फौजांनी बाजारपेठ लुटली. मोगली फौजांमधून त्यांना चाहूलही लागू न देता सतत दहा दिवस अखंड घोडदौड करून दिल्लीला दिलेली धडक हे बाजीरावांच्या जीवनातील आणखी एक तेजस्वी प्रकरण आहे.

'मराठे दुबळे नाहीत. मराठे आजही खंबीर आहेत हे सर्व सत्ताधीशांना दाखवावे. मराठ्यांचा दणका बादशाहाला उमगला म्हणजे दिल्लीश्वर मंडळींचे डोळे उघडतील.' हे दिल्लीवर धडक मारण्यामागे राजकीय आणि लष्करी सूत्र होते. हा हेतू साध्य होताच मराठी फौज तातडीने दक्षिणेकडे वळली. जुलै सन १७३७ मध्ये बाजीरावांचे पुण्यात आगमन झाले.

इकडे मोगली फौजेची दाणादाण उडाल्यानंतर सर्व मुस्लिम मुत्सद्दी व सत्ताधीशांनी सर्वांच्या वतीने निजामाला मराठी फौजांवर हल्ला करण्यासाठी पाठवण्याचा निर्णय घेतला. ही बातमी मिळताच पावसाळा संपल्यावर ऑक्टोबर सन १७३७ अखेर बाजीरावांनी फौजेसह पुण्याबाहेर प्रस्थान ठेवले.

डिसेंबर सन १७३७ मध्ये प्रख्यात भोपाळचे युद्ध होऊन निजामाचा पूर्ण पाडाव झाला. जुलै सन १७३८ मध्ये पेशवे पुण्याला परतले.

एप्रिल सन १७३९ मध्ये इराणच्या नादिरशहाने दिल्लीवर आक्रमण केल्याचे ऐकून बाजीराव उत्तरेकडे निघाले. दरम्यान नादिरशहा इराणला परत गेला.

या काळात पेशवे-परिवारात मस्तानीच्या संदर्भात वादळ निर्माण झाले. उपलब्ध कागदपत्रांवरून या वादंगाला नोव्हेंबर सन १७३७ पासून उग्र स्वरूप आले, असे दिसते. या मानसिक तणावाच्या स्थितीतही बाजीरावांनी निजामपुत्र नासिरजंग विरुद्ध गोदावरीचे युद्ध नेहमीच्याच धडाडीने यशस्वी केले. २७ फेब्रुवारी सन १७४० ला नासिरजंग व बाजीराव यांच्यात मुंगीपैठण येथे तह झाला. नासिरजंगने नाइलाजाने हंडिया व खरगोण हे परगणे बाजीरावांना दिले. त्यांची व्यवस्था लावण्यासाठी ३० मार्च रोजी बाजीराव खर्गोणला गेले.[५९]

अचानक प्रकृती बिघडून, नर्मदा तीरावर रावेरखेडी या गावी विषमज्वराने (उजाडता सोमवार) २८ एप्रिल सन १७४० रोजी (पहिला प्रहर) बहुधा पहाटेचे सुमाराला (रौद्रनाम संवत्सर, वैशाख शु. १३ शके १६६२) थोरले बाजीराव[६०] वारले. बाजीरावांच्या मृत्यूपूर्वी सुमारे तीनच दिवस आधी पत्नी काशीबाई आणि मुलगा जनार्दनपंत तेथे पोहोचले होते. और्ध्वदेहिक जनार्दनपंत यांनी केले. बाजीरावाची मृत्यूतिथी :[६१]

'यम रम नृप शाके रौद्र संवत्सरे मा धवधवल त्र्ययोदश्यार्कवारे निशायां ।।
नृप मुकुटमणी श्री शाहु मुख प्रधानो सुरपतिमपिद्रष्टुं प्रस्थितो रावबाजी ।। '

ज्या ठिकाणी बाजीरावांचा अंत झाला तेथे त्यांची समाधी आहे. जिथे दहन झाले तिथे चबुतरा व त्यावर शिवलिंगाची स्थापना केली आहे. समाधीच्या व्यवस्थेसाठी थो. नानासाहेबांनी मौजे रावेर हा गाव नेमून दिला होता.[६२] बाजीरावांच्या मृत्यूनंतर थोड्याच वेळात वियोग असह्य होऊन प्राणत्याग केलेल्या हत्तीचे व घोड्याचे अशी दोन थडगी जवळच आहेत. बाजीरावांची छत्री, वृंदावन, राणोजी शिंद्यांकडून बांधवली आहेत. बाजीरावांच्या मृत्यूबद्दल मि. किंकेड म्हणतात :

'Bravest of the brave, fairest of the fair, Bajirao died like a most fascinating figure in a romance of love.'

बाजीरावांची उंची ६ फूट होती असा ओझरता उल्लेख मिळतो, मात्र स्वभाव कसा होता हे समजायला प्रत्यक्ष तपशील उपलब्ध नाहीत. परंतु जे थोडे तपशील आणि समकालीन नोंदी उपलब्ध आहेत, त्यांवरून काही निष्कर्ष काढता येतात. त्यांचा स्वभाव मुळात गोड व मनमिळावू नव्हता. उमदा होता पण रोखठोक पद्धतीचा होता. त्यात शिपाईबाण्याची उद्दाम वृत्ती होती. 'बाजीराव साहेब बहुत उद्दाम प्रकृतीचे शिपाईगिरीत अवघा वेळ मग्न, राज्यकारभार चालवावयास सबुरी असावी तो भाव नव्हता.' असा उल्लेख 'कासंश ७' मध्ये आढळतो.

बाजीरावांची भूमिका केवळ पंतप्रधानांची नसून सेनापतीची होती. त्यांनी सर्व मराठी सरदारांत 'मराठा साम्राज्या'ची आकांक्षा निर्माण करून चारही दिशेला राज्य विस्तार केला. आपल्या दराऱ्याने शत्रूला निस्तेज केले. पालखेडची लढाई, डभईची लढाई, भोपाळची लढाई, बुंदेलखंड–वसईच्या मोहिमा, हे बाजीरावांच्या यशाचे एकापेक्षा एक उज्ज्वल टप्पे आहेत. लष्करी ताकदीने आपला हक्क पैदा करणे ही त्यांची पद्धत आणि प्रत्यक्ष भेटी, वाटाघाटींनी राजकारण खेळवणे ही शाहू महाराजांची पद्धत, या दोन्हींचा एकत्रित परिणाम म्हणजे मराठी साम्राज्याचा विस्तार.

मोगल बादशाहाशी उघड वैर पत्करायचे नाही. मोगली सुभेदारांशी सबुरीने वागावे. कधी धीमेपणाने, कधी बलपूर्वक मागण्या पदरात पाडून घ्याव्या. या पद्धतीने हक्कदार स्वकीयांची मराठी राज्याभोवती संरक्षक फळी उभारायची हे बाजीरावांचे धोरण होते. राज्यविस्तार होण्यासाठी हे धोरण फलदायी ठरले

बाजीरावांनी हिंमतीने पुढे होऊन स्वतंत्र बुद्धीने अनेकविध जबाबदाऱ्या अंगावर घेतल्या. जुन्या सरंजामी वृत्तीच्या सरदारांना युक्तीने बाजूला सारून नवीन सरदार निर्माण केले. पेशव्यांचे अधिकार गाजवण्याची धमक आपल्यात आहे हे शत्रू-मित्रांच्या, विशेषतः छत्रपतींच्या नजरेस आणून दिले. देशाच्या राजकारणावर स्वतःची छाप बसवली. दिल्लीचे राजकारण हस्तगत करण्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा यांनी धरली होती. युद्धभूमीवर गनिमी काव्याच्या जोरावर शत्रूला हटकून नामोहरम करण्याचे कसब शिवाजी महाराजांनंतर यांनीच दाखवले. त्यांच्या सुसज्ज फिरत्या फौजा नेहमी तयार असत. हमखास विजयाची खात्री असेल तेव्हाच बाजीरावांनी युद्धे पत्करली. अनेक पराक्रमी सरदारांच्या साथीने बाजीरावांनी अल्पावधीतच विस्तारलेली राज्याची सीमाच त्यांच्या कर्तबगारीची साक्ष देत आहे. **थोरले बाजीराव हे जगातील एकमेव अपराजित सेनापती होते.**

शिवाजी महाराजांच्या तोडीचा पराक्रम करून त्यांनी हिंदवी स्वराज्याची पताका सर्व भारतखंडात नाचवली. 'जे हाती घ्यावे ते सिद्धीस जावे अपयश असे कधी ठावूक नाही,' अशी बाजीरावांची प्रशंसा त्यांच्या शत्रू-मित्रांनी मुक्त कंठाने केलेली आढळते. शिवाजी महाराजांना 'स्वराज्य–संस्थापक' तर बाजीरावांना 'साम्राज्य–संस्थापक' म्हणता येईल.

दिल्लीची पातशाही, पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिद्दी, निजाम, मोगली सत्ता, यांना त्यांनी आपल्या वर्चस्वाखाली ठेवले. बाजीरावांमुळेच मराठ्यांचे राज्य व लौकिक सर्वत्र पसरला. बाजीरावांचे शरीरसामर्थ्य अचाट होते. भक्कम पीळदार शरीरयष्टी, शुभ्र गौरवर्ण, उमदे व्यक्तिमत्व, वागण्यातील आदब, न्यायनिष्ठुर वृत्ती, तेजस्वी अंगकांती, यांमुळे बाजीरावांची सहज छाप पडे. उत्तर हिंदुस्थानात

त्यांना पाहण्यासाठी गर्दी जमे. भपकेबाज पोषाखाचा त्यांना तिटकारा असे. नेहमी पांढरा पोषाख करीत. नोकरांसाठी आडून न राहाता सर्व कामे स्वतः करीत. त्यांचे स्वतःचे स्वारीचे चार उमदे घोडे होते. (निळा, गंगा, सारंगा, अबलख) त्यांना दाणावैरण, पाणी, रोज स्वतः हाताने देत. खोटेपणा, अन्याय, चैन, ऐषाराम त्यांना बिलकूल खपत नसे.

काही इंग्रज अधिकारी बाजीरावांना मराठीत पत्रे लिहीत. मुंबईचे समकालीन गव्हर्नर जॉन हॉर्न यांनी बाजीरावांना १७३५ साली लिहिलेले मराठी पत्र उपलब्ध आहे. [६३] असो.

बाजीरावांना उत्तम विद्याभिरुची होती. ते विद्वानांचे चहाते असून गुणवंतांचा परामर्श घेत. यांच्या आश्रयातील निरंजन माधव नावाचा कवी लिहितो : [६४]

'शाहू भूपतीचा प्रधान। बाजीराव बल्लाळ पृथ्वीरत्न।
परम यशस्वी पावन गुण। भूपाळ मंडळी शिरोमणी ॥ १ ॥
गुण रत्नांचा परीक्षक। स्वयें सद्‌गुण पूर्ण अशेख।
तेणे संग्रह केला सम्यक। ज्येष्ठ बंधुसह आमुचा ॥ २ ॥

पत्नी : काशीबाई. यांचा विवाह सन १७११ च्या सुमारास झाला. या पतीबरोबर स्वारीवर जात असत. १७३५–३६ सालच्या माळव्याच्या स्वारीत, या उत्तरेकडे गेल्या होत्या. यांची प्रकृती काहीशी अधू असे. यामुळेही थो. बाजीराव मस्तानीकडे आकृष्ट झाले असण्याची शक्यता काही इतिहासकार वर्तवतात. काशीबाईंना अखेरीस क्षयाचा आजार झाला होता असा प्रवाद आहे. पायाचे इसब आणि संधीवातावर अनेक दिवस उपचार चालू असल्याचे दाखले इतिहासात आहेत. त्यांच्या पायावर उपचार करण्यासाठी निजामाकडील हिंदू वैद्य भरमण्णा याला आणवावा अशी सूचना निजामाकडील वकीलाने केली होती.[६५] यांची तुला झाली होती.[६६]

काशीबाई स्वभावाने शांत, प्रेमळ, पतिनिष्ठ, मनमिळावू, सोशिक, होत्या. थो. बाजीराव रावेरखेडीला वारले, त्या वेळी या मुलगा जनार्दनसह रावेरखेडीलाच होत्या. पेशव्यांच्या मृत्यूनंतर या सैन्यासह मंगळवारी ३ जूनला रात्री (२ घटिका रात्री) पुण्यात परतल्या.[६०]

वैधव्यकालात त्या देवधर्मात व्यग्र असत. त्यांनी सन १७४२–४३ मध्ये रामेश्वर-यात्रा केली होती. यात्रेहून त्या २८ मे, सन १७४३ ला पुण्याला परतल्या.[६७] १६–२–१७४६ ला काशीयात्रेला प्रस्थान ठेवले.[६८] यांचे माहेरचे नाव लाडूबाई होते. घरात ताई म्हणत. यांनी माहेरच्या चासकमान गावाच्या सौंदर्यवृद्धीसाठी खूप पैसा खर्च केला. भीमा नदीवर घाट बांधला. गावाच्या पश्चिमेला नदीकाठी

सोमेश्वर महादेवाचे मंदिर बांधले आणि रावेरखेडी येथे नर्मदाकिनाऱ्यावर रामेश्वराचे मंदिर बांधले. काशीबाई २७ नोव्हेंबर, सन १७५८ रोजी, सोमवारी (बहुधान्यनाम संवत्सर, कार्तिक वद्य १२ शके १६८०) वारल्या. यांच्या अस्थी 'कृष्णाजी महादेव चिपळूणकर यांचेबरोबर महायात्रेला पाठवल्या..' अशी १८-१२-१७६० ची नोंद आहे,[३३] काशीबाईंचे पिता महादाजी कृष्ण चासकर (जोशी, शांडील्य गोत्री) पेशव्यांचे सावकार, पोतदार. बाळाजी विश्वनाथ पेशवे दौलताबादचे सरसुभेदार असताना त्यांचा चासकर-जोशांशी परिचय झाला होता. त्याचे पुढे नात्यात रूपांतर झाले.

मस्तानी : हिची व हिच्या वंशाची माहिती ८ व्या प्रकरणात दिली आहे.

बाळाजी बाजीराव : (७) थोरले नानासाहेब या नावाने हे इतिहासात प्रसिद्ध आहेत. यांचा जन्म १६ डिसेंबर सन १७२१ रोजी, बुधवारी (प्लवनाम संवत्सर, मार्गशीर्ष वद्य १३ सह १४, शके १६४३) नाणे-मावळात वडगाव जवळ साते या गावी (पुणे-मुंबई रस्त्यापासून जवळ) झाला.[६९]

बाळाजी विश्वनाथांचे मृत्यूनंतर 'बाजीराव पेशवे यांना पुत्र झाला वर्ष-श्राद्धाचे पूर्वी, म्हणून बाळाजीपंतांचे नाव ठेविले.' या पुत्रजन्मानंतर 'शाहू महाराजांनी मोठा समारभ करवून खासा पुण्यास गेले. दानधर्म करविला.' ह्यांचे राज्यकारभाराचे सर्व शिक्षण प्रसिद्ध रणधुरंधर, मुत्सद्दी रामचंद्रबाबा शेणवी (सुंठणकर) यांच्याकडे झाले. मुंज ११ जानेवारी, सन १७२८ रोजी, (प्लवनाम संवत्सर, माघ शु. ११ शके १६४९) झाली. बालपण पुणे व सातारा येथे गेले.

थो. बाजीराव लहानपणी वडीलांबरोबर राहून शिपाईगिरी शिकले. तसा प्रघात स्वतः बाजीरावांनी ठेवला नव्हता. त्यांनी नानासाहेबांना आपल्या बरोबर स्वारीत नेल्याचा उल्लेख नाही.

वयाला १५ वर्षे पूर्ण झाल्यावर, यांना चुलते चिमाजीआप्पा आपल्या-बरोबर नेहमी साताऱ्याला नेत. नानासाहेबांचा बराच मुक्काम साताऱ्यालाच असे. त्यामुळे छत्रपतींच्या दरबारातील मराठेशाहीची सर्व कारस्थाने, व्यवहार, घडामोडी सतत डोळ्यापुढे राहून, यांना मराठेशाहीच्या राज्यतंत्राचे उत्तम ज्ञान झाले. शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर मराठेशाहीची व्यवस्था लावताना या अनुभवाचा उत्तम उपयोग झाला.

थोरल्या बाजीरावांनी त्यांना खास पथकाचे सरदार नेमले होते. त्यांचे नावे शिक्का-कटचार केली होती.[७०] शाहू महाराजांच्या मिरजेच्या स्वारीत (सन १७३९) हे हजर होते. सन १७३५-३६ मध्ये पुण्याजवळ शिरूर प्रांतात तळे-

गावच्या उपद्रवांचा बिमोड करायच्या स्वारीत नानासाहेब असावेत, कारण ते प्रथम नसरापूरला जाऊन तेथून सुप्याला गेले असा दाखला आहे. मात्र याला पुरेसा आधार नाही. उत्तरेच्या १७३५ च्या स्वारीत व शाहूच्या दक्षिण हिंदुस्थानच्या स्वारीत १७३७ साली नानासाहेब हजर होते.

थोरले बाजीराव वारले तेव्हा हे मानाजी आंग्र्याच्या मदतीसाठी चिमाजी-आप्पांसह कुलाब्याला गेले होते. तिथेच बाजीरावसाहेब वारल्याची वातमी समजली. कुलाब्याला क्रिया करून नानासाहेब पुण्याकडे निघाले. ते २५-५-१७४० रोजी (सोमवारी) पुण्यात दाखल झाले.[७१] दुसऱ्या दिवशी बाजीरावांचे मासिक श्राद्ध होते. बाजीरावांच्या मृत्यूनंतर मसनदीची शान संभाळू शकेल असा नानासाहेबांइतका योग्य पुरुष अन्य कोणी न दिसल्यामुळे शाहू महाराजांनी यांनाच पेशवापद दिले.

२५ जून सन १७४० रोजी, बुधवारी (रौद्रनाम संवत्सर, आषाढ शु. १२, शके १६६२) सकाळी सातारा येथे पेशवाईची वस्त्रे देण्याचा समारंभ झाला.[७२] वस्त्रांचा तपशील : '१ मंदील सरासरी १ झगा जामेदार मोतेचूर १ चादर १ पटका १ इजार एकूण ५ कित्ता – १ तलवार १ कटार शिक्केसमेत १ तुरा मोतियाचा १ हत्ती राजश्री देवरामाकडून देविला समेत आंबारी एकूण ४' (वस्त्रांची किंमत २३० रु.).

याच समारंभात चिमाजीआप्पा व महादाजीपंत पुरंदरे यांनाही मानाची वस्त्रे देण्यात आली. विरुबाईंनी* नानासाहेबांना ११० रु. किंमतीची मानाची वस्त्रे वेगळी दिली. पेशवाई मिळाल्यानंतर नानासाहेबांनी स्वत:ची सरदारी गोविंद हरी पटवर्धनांकडे दिली. याच वेळी नानासाहेबांना ३० गाव मोकासा मिळाले.

त्यांचे सातारा दरबारातील प्रतिस्पर्धी बाबूजी नाईक बारामतीकर, रघूजी भोसले नागपूरकर, प्रतिनिधी वगैरे नेहमी नानासाहेबांच्या चुका काढायला टपलेले असत. त्यांना चुका कधीही काढता आल्या नाहीत. इतका नानासाहेबांचा कारभार चोख असे. नानासाहेबांनी शाहू महाराजांची मर्जी शेवटपर्यंत संभाळली. विश्वास सार्थ करण्यासाठी त्यांना पहिली २-३ वर्षे अविश्रांत मेहनत घेऊन उत्तरेकडील मराठी मुलखाचा बंदोबस्त करावा लागला.

थोरल्या बाजीरावांना भोपाळच्या निजामाच्या पराभवानंतर माळव्याची सनद मिळणार होती. पण पुढे नादिरशहाचे आक्रमण व त्यानंतर बाजीरावांचा अकाली मृत्यू यामुळे माळव्याची सनद मिळणे लांबले होते. ही सनद ४ जुलै सन १७४१ ला सवाई जयसिंगामार्फत बादशाहाकडून मिळाली. 'श्रीमंतांच्या दैवास उपमा नाही.'[७३]

---

* शाहू महाराजांची नाटकशाळा.

नानासाहेबांच्या विरोधकांच्या कारवाया आणि राज्याच्या कर्जाची चिंता याबद्दलच्या मनस्तापामुळे शाहू महाराजांनी ९ मार्च सन १७४७ रोजी नानासाहेबांना पेशवापदावरून दूर केले. पण त्या तोलाचा इतर कोणी मानकरी पुढे न आल्याने नानासाहेबांनाच पुन्हा १ एप्रिल रोजी पूर्ववत पेशवापदाची वस्त्रे दिली. ९ मार्च ते १३ एप्रिल दरम्यान नानासाहेब साताऱ्यालाच होते. त्यांनी बाबूजी नाईक, रघूजी भोसले, शाहू महाराजांची थोरली राणी, दाभाडे वगैरे मंडळींच्या मसलती मोडून सर्व कारवायांचा बंदोबस्त केला. दरम्यान सन १७४६ च्या पावसाळ्यात शाहू महाराजांनी कर्नाटकचा सर्व मामला पेशव्यांकडे दिला.

शाहू महाराजांच्या हयातीपर्यंत नानासाहेबांनी, सुरंज - भेलसे (सन १७४०-४१), माळवा, प्रयाग, बंगाल (सन १७४१–४३), बुंदेलखंड (मार्च सन १७४४ ते जुलै सन १७४४) भेलसे (सन १७४४ – ४५), कर्नाटक (सन १७४६ – ४७), नेवाई (सन १७४७ – ४८), इतक्या मोहिमा केल्या. पोर्तुगीजांच्या वसई - गोवे दरम्यानच्या घालमेलींचाही (सन १७४७) बंदोबस्त केला. कर्नाटकातील शत्रूपक्षीय हालचाली बंद पाडल्या.

नानासाहेबांना शाहू महाराजांबद्दल इतका आदर होता की, ते महाराजांचे पश्चात त्यांच्या 'पादुका देव्हाऱ्यात ठेवून त्यांची पूजा करीत, ती कधी अंतरीत नसत.'[७४] सन १७४९ पासून महाराजांची प्रकृती बिघडू लागली. साताऱ्याच्या निरोपानुसार ऑगस्ट महिन्यात नानासाहेब सैन्यासह पुण्याहून साताऱ्याला आले. महाराजांनी मृत्यूपूर्वी ठरवलेल्या, भविष्यकालीन राज्यव्यवस्थेचे सर्वांना सविस्तर निवेदन केले. (शाहूची यादी – १ ऑक्टोबर सन १७४९). राज्याची सर्व सूत्रे इतःपर पेशव्यांकडे सोपवली. महाराज १५ डिसेंबर सन १७४९ रोजी मृत्यू पावले. कोल्हापूरकर ताराबाईचा नातू रामराजा याला नानासाहेबांनी ४–१–१७५० रोजी सातारच्या गादीवर बसवले. सर्व सरदारांची स्वतंत्र व्यवस्था करून २२ एप्रिल सन १७५० रोजी नानासाहेब पुण्याला परतले.

मराठ्यांनी दिल्लीचा बादशाहा व बादशाही यांचे संरक्षण करावे. ह्यासाठी सैन्य ठेवावे, सैन्यखर्चासाठी मोगलाईत चौथाई व सरदेशमुखी वसूल करावी असा दिल्लीच्या बादशहाने पेशव्यांशी सन १७५१ मध्ये करार केला. सन १७५१–५२ मध्ये नानासाहेबांनी दमाजी गायकवाडांचे बंड मोडले. गायकवाडांना ३० एप्रिल सन १७५१ ला कैद केले. गायकवाडांकडील प्रांतापैकी अर्धी गुजराथ पेशव्यांच्या नावावर करून घेऊनच १६ मार्च सन १७५२ ला दमाजींना मुक्त केले. सन १७५२ मध्येच निजामाचाही पराभव केला. त्या वेळच्या भालकीच्या तहाच्या वेळी नानासाहेबांनी, 'आम्ही गनीम लोक शिवाजी महाराजांचे शिष्य आहो' असे उद्गार काढले होते. निजामाचा वझीर गाझीउद्दीन याला मदत करून तापी–गोदावरी-

कडील प्रदेश मराठी राज्याला जोडला. पण त्याचवेळी १६ ऑक्टोबर सन १७५२ ला गाझीउद्दीनचा खून झाल्यामुळे निजामशाही समूळ नष्ट करण्याची संधी गेली. तथापि सलाबतजंगकडून वरील नद्यांचा दुआब लिहून घेतला. पुढील ४-५ वर्षे पेशवे व निजाम यांच्यात सख्य होते.

भालकीच्या तहानंतर नानासाहेब धारवाड, रायचूर, श्रीरंगपट्टणहून खंडण्या वसूल करून जून सन १७५३ मध्ये परत फिरल्यानंतर त्यांच्या मोहिमा पुढीलप्रमाणे झाल्या : बागलकोट हरिहर (२ जानेवारी सन १७५४ ते ४ जून सन १७५४), बेदनूर (ऑक्टोबर सन १७५४ ते १२ एप्रिल सन १७५५), सावनूर (२० ऑक्टो. सन १७५५ ते १९ जुलै सन १७५६), श्रीरंगपट्टण (१ जानेवारी, सन १७५७ ते १९ जून सन १७५७), मेहेंदळयांची स्वारी (सन १७५८), पटवर्धन – रास्त्यांची स्वारी (सन १७५९), पटवर्धन – बिन्नीवाल्यांची स्वारी (सन १७६०).

यांपैकी पहिल्या ५ स्वाऱ्यात नानासाहेब जातीने हजर होते. सन १७५७–१७५८ मध्ये सिंदखेडला व जानेवारी ते मार्च सन १७६० मध्ये उद्गीरला अशी निजामाविरुद्धची तीन युद्धे जवळ जवळ एकतर्फीच झाली. सिंदखेडच्या युद्धानंतर मान्य केलेला २५ लाख उत्पन्नाचा मुलुख निजामाने न दिल्यामुळे उद्गीरची मोहीम उद्भवली होती. उद्गीरच्या मोहिमेत पेशवे-कुलातील सर्व पुरुषांनी भाग घेतला होता. या मोहिमेत निजामाकडून ८५ लाखांचा मुलूख शिवनेरी, नळदुर्ग, अहमदनगर, दौलताबाद, असिरगड, यांसारखे किल्ले पेशव्यांना मिळाले. निजामाकडील हैद्राबाद, विजापूर, या दोन सुभ्यांवरही पेशव्यांनी चौथाई लागू केली. सन १७५५–५६ मध्ये पेशव्यांनी इंग्रजांच्या मदतीने आरमारी युद्धात आंग्र्यांचा पराभव केला. या सर्व मोहिमांमुळे मराठी राज्याची सरहद्द कृष्णा नदीपासून तुंगभद्रा नदीपर्यंत पुढे सरकली.

मोठमोठया मोहिमांमुळे थोरल्या बाजीरावांपासून राज्याला झालेल्या कर्जापैकी बरेचसे कर्ज नानासाहेबांनी फेडले. १७४३ साली उत्तर हिंदुस्थानच्या मोहिमेत श्रीकाशीक्षेत्र मुक्त करण्याचाही नानासाहेबांचा हेतू होता. पण पेशवे परतल्यावर मागे मोगली सुभेदार ब्राह्मणांचे हाल करतील हे ओळखून, काशीकर ब्राह्मणांनी तत्कालीन प्रकांड पंडीत नारायण दीक्षित पाटणकर यांचे नेतृत्वाखाली पेशव्यांना भेटून, काशीकडे न येण्याची भीड घातली.[७५]

सन १७५८ च्या सुमाराला मराठा – साम्राज्य सत्ता, दरारा, वैभव सर्वच दृष्टीने कळसाला पोचले होते. मराठा – साम्राज्याची ताकद ओळखून चाणाक्ष इंग्रजांनी आपला वकील पुणे दरबारात पाठवला. यापूर्वी सन १७४८ पासूनच अहमदशाह अब्दाली व इराणच्या दुराणी बादशाहाच्या पंजाब प्रांतावर सुरू झालेल्या

स्वाऱ्यांना रघुनाथराव पेशवे, शिंदे, होळकर, इत्यादी मातबरांनी यशस्वीपणे पायबंद घातला होता. मराठ्यांच्या वाढत्या प्रभावामुळे मुसलमान सत्ताधीश पेशव्यांचा पाडाव करण्याची संधी शोधतच होते. याचीच परिणीती पानिपतच्या सर्वंकष युद्धात झाली.

पानिपतच्या युद्धाच्या वेळी मात्र प्रतिकूल परिस्थितीची हकीगत कळल्यानंतरही आणखी एक विवाह करण्याचा नानासाहेबांचा विचार होता.[७६] दुसरा विवाह झाल्यानंतर पानिपतहून महादाजीपंत पुरंदऱ्यांचा मदतीसाठी निर्वाणीचा खलिता आल्यानंतरच चाळीस हजार फौज व खजिना यासह नानासाहेब उत्तरेकडे निघाले. माळव्यातून १८ जानेवारी सन १७६१ च्या पत्रात ते भाऊसाहेबांना लिहितात:[७७] 'पूर्वी लिहीत आलो त्याअन्वये चाळीस हजार फौजेनिशी कोटाबुंदीवरून जयनगरचे (जयपूरचे) सुमारे येतो. आपण आब्दालीस कोंडून राखावे सर्व फौजा येक होताच सपक्षपातीसह उत्तमप्रकारे पारिपत्य जाहालिया सर्व कामे त्यात होतात.' यावरून असे वाटते की, उत्तरेकडील हलाखीचे वृत्त नानासाहेबांना उशीरा मिळाले असावे.

नानासाहेब बऱ्हाणपूर, हंडिया, भोपाळवरून भेलसा येथे २४ जानेवारी सन १७६१ ला पोहोचले. गोपिकाबाई, माधवराव वगैरे सर्व कुटुंबीय मंडळी या स्वारीत होती. पेशव्यांना पानिपतच्या आघाताची बातमी पानिपतहून १९ जानेवारीला निघालेल्या सावकारी जासूदाकडून २४ जानेवारीलाच प्रथम भेलसा येथे संशयित स्वरूपात समजली. 'दो मोती गलत दसबीस आसेरफित फरकात खुर्देकू रुपयाको गणत नही' ही सांकेतिक भाषेतील बातमी पानिपतहून आली.[७८] परंतु प्रत्यक्ष युद्धभूमीवरील माणसांची हकीगत कळायला बराच वेळ लागला. परस्परविरोधी बातम्यांमुळे सर्वांची मने गोंधळून गेली. शेवटी ग्वाल्हेरच्या दक्षिणेला पाठोरा येथे स्वारीचा मुक्काम असताना मल्हारराव होळकर, पार्वतीबाई, वगैरे मंडळींची भेट होऊन सविस्तर हकीगत समजली. नानासाहेबांचे हृदय विदिर्ण झाले. तरीही हिंमत धरून त्यांनी चंबळ नदीच्या दक्षिणेकडील मुलखाचा बंदोबस्त करविला.

भाऊसाहेबांच्या मृत्यूमुळे नानासाहेबांना जबर मानसिक धक्का बसला होता. नाना पुरंदऱ्यांना त्यांनी २३-२-१७६१ ला लिहिलेल्या पत्रात त्यांची विदिर्ण मनःस्थिती स्पष्ट होते. ते म्हणतात[७९] :

"येक भाऊ वाचून दुनिया दौलत व्यर्थ आहे. त्याचे हातचे पत्र पाहीन तेव्हा माझे बायकोस मला जीव येईल. आता तो वेडेपणे आहो. लेक अल्पायुषी होता. सूर्यमंडळ भेदून गेला. ते दुःख परमार्थ शास्त्रपुराणे करून टाकिले परंतु चिरंजीव भाऊ वाचून दुनिया व्यर्थ आहे."

या वेळी नानासाहेब उत्तरेकडे नसते तर उत्तरेकडील मराठ्यांचा अंमल पूर्णपणे नष्ट झाला असता. वस्तुतः तसेच पुढे जाऊन गिलच्यांचे पारिपत्य करावे असा

हेतू होता. परंतु होळकर, नारो शंकर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, वगैरे पानिपतहून आलेले सरदार व इतर मंडळी अनुकूल नसल्यामुळे तो बेत सोडून द्यावा लागला. नानासाहेब नेहमीच्या मनःस्थितीत व उमेदीत असते तर त्यांनी कदापिही बेत बदलला नसता. सर्व परिस्थिती पाहून सर्वांनी पुण्याकडे परत फिरण्याचा बेत केला.

सर्व फौज व सरंजामासह पेशवे २२ मार्च सन १७६१ ला पाठोराहून पुण्याकडे परत फिरले. परत येताना ११ एप्रिल रोजी ओंकार-मांधाता येथे नर्मदेवर नानासाहेबांची तुला करण्यात आली. त्या वेळी त्यांचे वजन पूर्वीच्या (सन १७५४) १७८ पौंडाऐवजी फक्त ११४ पौंड भरले. २१ एप्रिल रोजी इंदोरला वर्षप्रतिपदा पार पडली. पुढे नर्मदा-तापीवरून स्वारी गोदावरी तीरावर आली. टोक्याला १६ मे रोजी थो. बाजीरावांचे श्राद्ध केले. ६ जून रोजी नानासाहेब पुण्याला पोहोचले. पानिपतच्या आघातामुळे त्यांची प्रकृती ढासळू लागली. त्यांनी शिंदे, पवार, होळकर, व ज्येष्ठ सरदारांवर दरबारी कामात कोताई केली असा ठपका ठेवून त्यांचे महाल जप्त केले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे नानासाहेबांचा कारभारावर ताबा राहिला नाही. शेवटी हवाफेरासाठी त्यांनी पर्वतीवर स्थलांतर केले.

पर्वतीवर स्थलांतर केल्यानंतरच्या तारीखवार नोंदी पुढीलप्रमाणे– १२ जून (शुक्रवार) पर्वतीवर आजारी म्हणून गावात परत, २२ जून (सोमवार) पुन्हा पर्वतीवर गेले. २३ जून (मंगळवार) रात्री पर्वतीस देहावसान. ६ जून ते १२ जून पर्यंत नानासाहेब पालखीत बसून जात असत. अखेरीस अंगात ज्वर वाढून वाताचे झटके येऊ लागले. वाताच्या झटक्यात ' भाऊ ! भाऊ ! ' असे किंचाळत पर्वतीवरील वाड्याच्या होमशाळेत बंधू रघुनाथरावांचे मांडीवर मस्तक ठेऊन २३ जून सन १७६१ रोजी मंगळवारी (वृषनाम संवत्सर, ज्येष्ठ वद्य ६ शके १६८३) दीड प्रहर रात्री नानासाहेब वारले.[८०] पानिपतच्या आघाताने नानासाहेब वारले असा समज आहे, पण ते तात्कालिक कारण असावे. ' प्रधानपंत क्षयाची वेथा होऊन वारले. ' असे विधान चिटणीसी बखरीत आहे. आघातामुळे आजार बळावून मृत्यू आला असणेही अशक्य नाही. असो.

दुसऱ्या दिवशी (बुधवारी) अंत्यसंस्कार झाले. संस्कार माधवरावांनी केले. अंत्ययात्रा लकडी पुलावरून नदीकाठी येऊन तेथे अग्नी देण्यात आला. त्या ठिकाणी वृंदावन बांधण्यात आले. नारो केशव बर्वे यांचेबरोबर अस्थी महायात्रेला पाठवल्या.[८१]

नानासाहेबांचे हस्ताक्षर वळणदार व आकर्षक असे. ' श्रीगणेशकृतकामृत ' नावाचे त्यांनी केलेले संस्कृत काव्य उपलब्ध आहे.[८२] नानासाहेब कलमबहाद्दर संस्कृतज्ञ होते.

पेशव्यांनी बादशाहीला संरक्षण दिल्यामुळे नागपूरकर भोसल्यांशी वितुष्ट आले. इंग्रजांच्या मदतीने आंग्र्यांचे सामर्थ्य विकलांग करून पेशव्यांनी इंग्रजांना

आरमारी सामर्थ्यात वरचढ होऊ दिले आणि स्वराज्याची एक बाजू कायमची लंगडी केली हे नानासाहेबांवरील आक्षेप खोडून काढणे जड जाते. १७४८ सालनंतर नानासाहेब जातीने उत्तर हिंदुस्थानात गेले नाहीत. सामान्यतः त्यांचे धोरण 'सरदारीने काम करावे जातीनिशी जाया होऊ नये.' हे असे. तरीही यामुळे नानासाहेबांची तडफ, मुत्सद्देगिरी, यांना उणेपणा येत नाही.

ते स्वतः कुठेही असले तरी सर्व ठिकाणचे व्यवहार स्वत: उलगडत. श्रीरंगपट्टणला राहून दिल्लीचा, तर बुंदेलखंडाहून कर्नाटकाचाही कारभार करीत. एका ठिकाणी एका वेळी ३-४ दिवसांपेक्षा जास्त मुक्काम होत नसे. यांचा चाणाक्षपणा, धूर्तपणा, बेतशीर वागणे याबद्दल इंग्रज वकील गॉर्डन याने १७३९ सालीच आपल्या रोजनिशीत लिहून ठेवले आहे. उभयतांची भेट १७३९ मध्ये झाली होती. नानासाहेबांचा स्वभाव हिशोबी, धीमा, तडजोडीचा परंतु प्रसंगी अत्यंत कडक होता. त्यांच्या चौरस बुद्धीला थोरले चिमाजीआप्पा यांचे परिपूर्ण मार्गदर्शनच कारणीभूत होते.

नानासाहेब मनुष्य-स्वभावाची पारख करून माणसांना आपल्या कामी लावून घेण्यात कुशल होते. आतल्या गाठीचे होते. स्वतःचा थांग लागू न देता दुसऱ्याचे इंगित काढून आपला शह कायम ठेवणे, अडचणीच्या वेळी युक्तीने निभावून जाणे, प्रसंगी पड खाऊन आपला हेतू सिद्धीस जाण्याची संधी निर्माण करणे, भिन्न वृत्तीच्या लोकांना नाना उपायांनी सरळ आणणे, अशी नानासाहेबांची अष्टपैलू वागणूक होती. या गुणांमुळेच त्यांच्या हातून राज्याचा उत्कर्ष झाला. सदाशिवराव व माधवराव यांस हाताखालचे लोक कापत, तेच नानासाहेबास भजत. 'कै. नानासाहेबांनी लोभ केला त्याप्रमाणे आपण आकृत्रिम लोभ करून चालवावे.' असे अनेक सरदारांचे उल्लेख पुढे कैक वर्षे वाचायला मिळतात.

वि. का. राजवाडे म्हणतात : 'सन १७५० सालापासून तो सन १७६१ सालापर्यंत सर्व भारतखंड महाराष्ट्रमय करून टाकण्याचा बाळाजीने उद्योग केला. सारांश, ह्या १७५० सालापासून ब्राह्मणपदपादशाहीचा प्रारंभ झाला. व हिंदुपदपादशाही हा शब्द मागे पडला.'

नानासाहेब सर्व प्रकारच्या विद्वानांना, गुणवंतांना प्रोत्साहन देऊन चांगला परामर्श घेत. यांच्याच कारकीर्दीत पुण्यात रात्री पहाऱ्याची तोफ* उडवण्याची प्रथा सुरू झाली. यांनी पर्वतीवर देवदेवेश्वराचे देऊळ, पर्वतीचे तळे, अनेक मंदिरे

---

* '१२ जानेवारी सन १८५६ या रात्रीपासून तोफ उडवणे बंद झाले. यामुळे चोरी आणि रंडीबाजी व तमाशा पहात रात्री भटकणारे यांना मोकळीक मिळाली' – 'पुणे शहराचे वर्णन' पृ. १२२.

बांधली. नव्या बागा तयार करवल्या. पेठा वसवल्या. कात्रज तलावाचे पाणी नळाने पुण्याला आणणे ही त्या काळातील मोठी कामगिरी समजली जाते.

नानासाहेबांच्या **पत्नी** : (१) गोपिकाबाई. जन्म सन १७२५. माहेरचे-सासरचे अशी स्वतंत्र नावे समजली नाहीत. विवाह ११ जानेवारी सन १७३० रोजी रविवारी (सौम्यनाम संवत्सर, माघ शु. ४, शके १६५१) वाई येथे झाला. लग्न-खर्च १,१९,८२५ रु. १२ आणे झाल्याचा दाखला मराठी दप्तरात सापडतो. यांचा गर्भादान विधी जानेवारी सन १७४० मध्ये झाला. १७४२ साली उत्तरेकडील मोहिमेत गोपिकाबाई बरोबर गेल्या होत्या. त्यांना ' तीन महिने गेल्याचे ' लक्षात आल्यावर खानदेशातून पुण्याला परत पाठवले. पुढे मुलगा झाला तोच विश्वासराव.

गोपिकाबाई पुष्कळ वेळा पतीबरोबर स्वारी शिकारीवर जात. त्यांना चांगले लिहिता-वाचता येई. राजकारणातील उलाढालींची चांगली समज होती. प्रसंगी दरबारी कामातही भाग घेत. रघुनाथरावांचे गोपिकाबाईंबद्दलचे मत माधवरावांनी एका पत्रात व्यक्त केले आहे ; ' वडिलांस मनसुबाही कळतो केवळ वरकडी बायकां-प्रमाणे नव्हत. प्रपंच, परमार्थ दोन्ही वडिलास कळतात तेथे काय विस्तारे लिहावे ?'

गोपिकाबाई हुषार, तेजस्वी, करारी परंतु उग्र, महत्त्वाकांक्षी, समंजस, धोरणी, थोड्या अधिकार गाजवण्याच्या वृत्तीच्या होत्या. पारिवारिक आपत्त्या आणि अवास्तव करारीपणा यामुळे त्यांच्या स्वभावात पुढे कडवटपणा आला होता. मात्र मूळ स्वभाव प्रेमळ, आस्थेवाईक, गुणग्राहक होता. त्या चांगल्याच बहुश्रुतही होत्या. त्यांनीच रघुनाथ यादवाला आज्ञा करून ' पाणिपतची बखर ' लिहून घेतली.*

इतरांचा मोठेपणा, गौरव त्यांना सहन होत नसे. सदाशिवरावभाऊंचा दरबारातील वचक, उत्कर्ष, समशेरबहाद्दरना स्वपराक्रमाने मिळालेले सन्मान, रघुनाथरावांचा दरारा, गोपिकाबाईंना खुपत असे. या बंधूंच्या तडफेपुढे नानासाहेबांचे तेज फिके पडते असे त्यांना वाटे. सर्वसमावेशक वृत्ती अंगी नसल्यामुळे व प्रत्येक गोष्ट आपल्याच तंत्राने करायच्या वृत्तीमुळे माणसे जोडणे त्यांना जमले नाही. उत्तर-कालीन भाऊबंदकीची काही बीजे गोपिकाबाईंच्या स्वभावात निश्चितच होती.

गोपिकाबाई स्वभावतःच स्वतःविषयी बेफिकीर असत. भय हा शब्दच जणू त्यांना ठाऊक नव्हता. हीच वृत्ती माधवरावांत उतरली होती. माधवरावांचा मोठे-

---

* ' पाणिपतची बखर ' ही ' श्रीमंत महाराज गोपिकाबाईसाहेब मुक्काम शहर पुणे ' यांनी लिहिण्यास सांगितली. ती ' रघुनाथ यादव लेखक दिमत चिटणीस ' यांनी १० जानेवारी सन १७६३ ते १८ फेब्रुवारी सन १७६३ या काळात लिहिली– प्रस्तुत बखर पृ. १

पणा त्या पूर्ण ओळखून होत्या. माधवरावांच्या कर्तृत्वाविषयी त्यांना कौतुक व अभिमान वाटे.

माधवराव स्वतःच्या जबाबदारीने कारभार पाहू लागल्यावर, हे दोघेही मायलेक सारखेच करारी व स्वतंत्र बाण्याचे असल्यामुळे – एक म्यानात दोन तलवारी राहणार नाहीत हे ओळखून – गोपिकाबाई फाल्गुन शके १६८५ (सन १७६४) दरम्यान नाशिकजवळ गंगापूरला कायमच्या स्थायिक झाल्या. त्या गंगापूरला स्थायिक होण्यापूर्वीच बेलगाव व गंगापूर हे दोन गाव त्यांना खासगत खर्चासाठी तोडून दिले होते. या गावांचा सालिना वसूल १९०० रु. होता. गोपिकाबाईसाठी गंगापूरला १८००० रु. खर्चून मोठा वाडा बांधला होता. 'गंगापूर येथील गोपिकाबाईसाहेबांचा वाडा अगदी पडून जाऊन त्याच्या जोत्याचे दगड मात्र काही ठिकाणी दिसतात.[८४]' गंगापूरचे सृष्टीसौंदर्य अल्हादकारक असे. येथील नदीला गोपिकाबाईंनीच घाट बांधला : डिसेंबर सन १७६४ मध्ये त्या काही दिवस जगदीशपूरला (नाशिकजवळचे जलालपूर ?) राहात होत्या.[८४] यांना सालिना १२००० रु. नेमणूक होती. याखेरीज आणखी लागेल तो खर्च देण्याची परवानगी असे.

गंगापूरला रामचंद्र नारायण गोरे नावाचे चित्पावन गृहस्थ गोपिकाबाईंचे कारभारी होते. 'मातुश्रीबाईसाहेब गंगापूरहून आल्या '[८५] याखेरीज दि. २४ जून सन १७७१ रोजी पुण्याहून विठ्ठलराव गोरक्ष वालवलीकर यांनी लिहिलेल्या पत्रात पुढीलप्रमाणे मजकूर आहे.[८६]

'दि. १९ जून १७७१ रोजी पेशवे नाशिकला गेले त्यांच्याबरोबर गोविंद शिवराम, हरीपंत फडके, गोपिकाबाई व रमाबाई ह्या गेल्या असून तीन हजार घोडेस्वार, पंचवीस हत्ती, पंचाहत्तर उंट, शंभर बैल, एक तोफ व पंचवीस पालख्या आहेत. पाद्री डॉक्टरही गेला आहे. '

या उल्लेखांवरून गोपिकाबाई गंगापूरला स्थायिक झाल्यानंतर पुण्यात कधीही आल्या नाहीत ही समजूत चूक ठरते. निदान आजारी माधवरावांना भेटण्यासाठी त्या पुण्याला येऊन गेल्या होत्या असे दिसते. सन १७७२ अखेर नारायणराव, पेशवापदावर आल्यानंतर, कारभार आपल्या पक्षाच्या लोकांच्या हाती देऊन नारायणरावांचा मार्ग निर्वेध करावा यासाठी गोपिकाबाई पुण्यात आल्या होत्या. परंतु आपल्याला यश येत नाही असे पाहून निराशेने गंगापूरला परत गेल्या.

नारायणरावांची शनिवारवाड्यात हत्या झाल्याचे समजल्यावर गोपिकाबाईंची अवस्था भ्रमिष्टासारखी झाली होती. स्वतःच्या हयातीत स्वतःचे पाचही मुलगे (दोन बालपणी व तीन कर्तेपणी) मृत्यू पावल्याचे पहावे लागल्यामुळे हे

साहजिकच होते. त्यानंतर त्या गंगापूर सोडून पंचवटीतील एका मठात जाऊन राहिल्या. तेथे जोगीणीप्रमाणे जोगवा मागून मिळणाऱ्या भिक्षेवर त्यांनी सुमारे ९ महिने निर्वाह केला. सवाई माधवरावांना पेशवाईची वस्त्रे मिळाल्यानंतर २९ मे सन १७७४ रोजी त्या पुन्हा गंगापूरला वाड्यात जाऊन राहिल्या.

गोपिकाबाईंना खासगत खर्चासाठी १ म्हसूल, २ सुकेणे, ३ वडनेर ही तीन गावे दिल्याची १०-३-१७७३ ची नोंद आहे.[८७] त्यांनी नाशिकला बरीच देवळे, कुंडे बांधली. गंगापूरला धार्मिक वृत्तीने जीवन घालवले. गंगापूरला श्रीकृष्ण बालाजीचे मंदिर स्थापून त्याच्या खर्चासाठी सालिना १ लाख रुपयांची सनद,[८८] दि. २५-११-१७८४ ची, सवाई माधवरावांकडून करवून घेतली. गोपिकाबाईंना काशीयात्रा मात्र कधीच घडली नाही. सप्टेंबर-ऑक्टोबर सन १७७२ मध्ये त्या महायात्रेला जाणार होत्या. पण थोरल्या माधवरावांच्या वाढत्या आजारपणामुळे बेत रद्द झाला.[८९]

आयुष्याच्या अखेरच्या पर्वात उतारवय आणि दुखण्याने त्या बेजार झाल्या. सन १७८४ च्या कार्तिकात (नोव्हेंबर) त्यांनी सवाई माधवरावांना प्रथम पाहिले. नाना फडणीस आणि हरिपंत फडके यांनी ७ ते २७ नोव्हेंबर सन १७८४ आणि मार्च सन १७८८ मध्ये सवाई माधवरावांना मुद्दाम गंगापूरला नेले होते. सवाई माधवरावांची वागणूक पाहून त्यांनी माधवरावांना थोड्याच दिवसात पुण्याला परत पाठवले.* त्या निराश झाल्या असाव्यात.

अखेरीस ३ ऑगस्ट सन १७८८ रोजी (किलवनाम संवत्सर, श्रावण शु. २, शके १७१०) प्रातःकाली गंगापूरजवळ पंचवटी येथे वारल्या. ' दि. १०-८-१७८८ श्रीमंत मातुश्री बाईसाहेब यांस श्रावण सुध द्वितीयेस रविवारी पंचवटीस कैलासवास जाहला. '[९०] याच कारणामुळे १७८८ सालची श्रावणमास दक्षिणा, सुतक संपल्यानंतर म्हणजे वद्य पक्षात वाटली.[९१] गोपिकाबाईंच्या उत्तरक्रियेला रोख रु. २७,९५० आणि कापड रु. ५,५७९ रु. मिळून एकूण खर्च ३३,५२९ रु. झाला. बंधू गंगाधर भिकाजी रास्ते यांनी क्रिया केली आणि १० दिवसांतील विधी केले. पुढचे सर्व विधी पेशव्यांनी पुण्याला केले. गोपिकाबाईंचे पिता भिकाजीपंत शामजी रास्ते (गोखले) नाईक, रा. वाई. वा. पुणे.

पत्नी : (२) राधाबाई. विवाहाचे वेळी वय ९ वर्षे. विवाह २७ डिसेंबर सन १७६० रोजी झाला. ' मोडक जंत्री ' व ' भा. व. पंतप्रधान शकावली 'नुसार (पृ. ४३) तिथी शनिवार मार्गशीर्ष वद्य ६ शके १६८२ (विक्रमनाम संवत्सर) ही येते. विवाह हिरडपूरला झाला.[९२] ' वाखरे देशस्थ सावकार यांची कन्या नोवरी पाहून त्रिंबकराव मामाचे विद्यमाने श्रीमंती लग्न केले. ' मुली पाहण्यासाठी आणल्या

* सवाई माधवरावांना गोपिकाबाईंनी केलेला उपदेश कासंपया ले. ३९३ मध्ये आहे.

जात. त्यांपैकी राधाबाईंची नोंद[९३] : '१७-१२-१७६० छ ८ जमादिलावल ५ नारायणराव नाईक वाखरे पैठणकर याची मूल आणली तीस.'

या विवाहाचा उल्लेख एका पत्रात आढळतो[९४] : 'येथील मनसबा तरी मार्गेस्वर वद्य सप्तमीस श्रीमंतांचे लग्न जाले. नवरी पैठणची सावकारांची देशस्थाची नवा वर्सांची असे. प्रातःकाली देवप्रतिष्ठा जाली दो प्रहरा रात्री लग्न जाले. पहाटे साडे जाले नवरी घरास आणिली' पत्रात वद्य ६ ऐवजी वद्य ७ असा उल्लेख आहे. तो ६ हवा. गोपिकाबाई गंगापूरला गेल्यानंतर, पार्वतीबाईंनी राधाबाईंचा यथायोग्य प्रतिपाळ केला. तारुण्यात पदार्पण करीत असताना वैधव्य आल्यामुळे मनाची उदासीनता वाढून राधाबाई खंगू लागल्या. यातूनच आजारपण ओढवले.

राधाबाईंच्या आजारपणाबद्दल नाना फडणीसांनी गोपिकाबाईंचे गंगापूरचे कारभारी रामचंद्रपंत गोरे यांना पत्राने कळवले.[९५] पत्रानुसार, राधाबाईंची प्रकृती इतकी क्षीण झाली होती की, पालखीत निजायचेही सामर्थ्य अंगी उरले नव्हते. जीवाची आशाही उरली नव्हती. नाना फडणीसांनी रघुनाथरावांना लिहून आज्ञा आणवून तुला वगैरे करवल्या. प्रायश्चित्ते, इतर विधी व रौप्यतुला झाली. हे सर्व विधी नारायणरावांनी केले. रौप्यतुला खर्च ४००० रु. व इतर खर्च मिळून एकूण खर्च ६००० रु. झाला. राधाबाईंची तुला बहुधा ज्येष्ठ शके १६९३ मध्ये झाली असावी. थोरले माधवराव या काळात विशेष आजारी असून त्यांचा मुक्काम 'मौजे कटोरे पा। चांदवड उत्तर गंगा तीर' येथे होता.

राधाबाई शनिवारी ता. ९ नोव्हेंबर, सन १७७१ रोजी वारल्या.[९६] 'हिचा मृत्यू शके १६९३ कार्तिक शु. ३ मंदवारी जाला.' राधाबाईंचा मृत्यूदिन १९-११-१७७० असा, 'कासंपया' मध्ये पृ. ४७९ वर दिलेला चूक आहे. राधाबाईंचे पिता नारायणराव वाखरे, सावकार (देशस्थ) रा. पैठण. असे सांगतात की, या विवाहाचे वेळी पेशव्यांना व त्यांच्या जानवशाला राहण्यासाठी वाखरे यांनी पैठणला मोठा तीन चौकी वाडा बांधला होता. वाडा आजही उत्तम स्थितीत आहे.

विश्वास बल्लाळ : (८) यांचा जन्म २२ जुलै सन १७४२ रोजी गुरुवारी (दुंदुभिनाम संवत्सर, श्रावण शु. २ शके १६६४) झाला.[९७] पेशवा घराण्यात थोरल्या बाजीरावांनंतर यांच्याइतका राजबिंडा, देखणा, मर्दानी पुरुष दुसरा झाला नाही. बखरकार रघुनाथ यादव म्हणतात :[९८] 'पुरुषांत देखणा विश्वासराव व बायकांत देखणी मस्तानी बाईसाहेब समशेर बहादूर यांची मातोश्री.' यांनाही प्रसंगानुरूप युद्धनीती, राजनीतीचे उत्तम शिक्षण प्रत्यक्ष अनुभवातून मिळाले. लहानपणातच पराक्रम गाजवून शौर्याची, हुषारीची चुणूक दाखवली. यांची मुंज ९ मार्च सन १७४९ रोजी गुरुवारी (शुक्लनाम संवत्सर, चैत्र शु. २

शके १६७१) झाली.[९९] '२३–३–१७४९ छ. १४ राखर तिसा आर्बैन व्रतबंध खर्च चि. विश्वासराव.'[१००]

निजामाविरुद्धच्या सिंदखेडच्या लढाईत (ऑगस्ट सन १७५७ ते जानेवारी सन १७५८) विश्वासराव एका आघाडीवर प्रमुख होते. या १५ वर्षाच्या विश्वासरावांना सोबत जनकोजी शिंदे होते. युद्धाचे वेळी पिछाडीवरून खुद्द नानासाहेब आणि सदाशिवरावभाऊ पाठपुरावा करीत होते. औरंगाबाद–सिंदखेडला मराठ्यांनी निजामाचा पार धुव्वा उडवला. विश्वासरावांनी वय लहान असूनही अतुलनीय शौर्य गाजवले होते. मुख्यतः 'दक्षिण मोकळी करणे' या धोरणाला अनुसरून हे युद्ध झाले. सन १७५९ च्या उद्‌गीरच्या मोहिमेत विश्वासरावांच्या हाताखाली स्वतंत्र १० हजार फौज होती. या युद्धात त्यांनी हत्तीवरून उत्तम तिरंदाजी केली. सोबत जनकोजी शिंदे होतेच. हे दोघे सारख्याच वयाचे असल्यामुळे त्यांच्यात अखेरपर्यंत चांगली मैत्री होती.

यानंतर लगेच पानिपतची मोहिम उद्‌भवली. युद्धाचा, राजनीतीचा व्यापक अनुभव मिळावा आणि भाऊसाहेबांना 'पायगुंता' असावा म्हणून गोपिकाबाईंच्या आग्रहावरून विश्वासरावांनाही मोहिमेवर नेले अशी लोकप्रिय समजूत आहे.[१०१] पण त्यात तथ्य नसावे. उलटपक्षी गोपिकाबाईंचा विरोध होता. भाऊसाहेबांनीच कोणी तरी 'धनी' बरोबर असावा असा आग्रह धरल्यामुळे अखेरच्या क्षणी विश्वासरावांनीही मोहिमेवर जावे असे ठरले.[१०२]

या मोहिमेत मराठ्यांनी दिल्ली शहर काबीज केल्यावर (ऑगस्ट सन १७६०) भाऊसाहेबांनी खास दरबार भरवून दरबारात सर्वांकडून विश्वासरावांना मुजरा करविला. याच वेळी विश्वासरावांनी लाल किल्ल्याची लष्करी दृष्टीने पाहणी केली. १७६० सालचा दसरा मराठी फौजांनी विश्वासरावांचे नेतृत्वाखाली कुंजपुऱ्यात दिमाखात साजरा केला.

पानिपतच्या प्रसिद्ध सर्वंकश युद्धाचे दिवशी (१४ जानेवारी, सन १७६१) दुपारपर्यंत भाऊसाहेब व विश्वासराव दोघेही हत्तीवरच होते. दुपारी विश्वासराव हत्तीवरून उतरून 'दिलपाक' नावाच्या घोड्यावर स्वार झाले. भाऊसाहेबही आपल्या 'चंद्रसेन' घोड्यावर स्वार झाले. दुपारी ३ च्या सुमाराला तिरंदाजी करताना शत्रूची गोळी लागून विश्वासराव जखमी झाले. त्याही परिस्थितीत त्यांनी भाऊसाहेबांना धीर दिला. थोड्याच वेळात ते मृत्यू पावले.

विश्वासराव खंबीर होते तोपर्यंत मराठ्यांचा विजय निश्चित होता. यानंतर रिकाम्या आंबाऱ्या पाहून फौजेचा धीर खचला. दरम्यान विश्वासरावांचे शवाचा हत्ती वळवून सुजाउद्दौलाने आपल्या गोटात नेला. नंतर अहमदशाह अब्दालीने विश्वासरावांचे शव आपल्याकडे मागून घेतले. अशी अख्यायिका सांगतात

की, ' विश्वासरावांचे शव जेव्हा अहमदशाह अब्दालीने पाहिले, तेव्हा तोही त्याचे सुस्वरूप व तेज पाहून फार हळहळला. तो मुर्दा पहावयास संपूर्ण दुराणी लष्करातील आबालवृद्ध जमा झाले होते.'[१०२]

काशीराज, गणेश वेदांती, इत्यादी मुत्सद्द्यांनी अब्दालीकडे एक लाख रु. खंडणी भरून मोठ्या मिनतवारीने विश्वासरावांचे शव मराठ्यांच्या गोटात आणले. धार्मिक विधियुक्त अग्नी दिला. विश्वासरावांचा अग्निसंस्कार १५ जानेवारी रोजी झाला. त्यांनी नानासाहेबांना पानिपतहून पाठवलेल्या एका पत्रात लिहिले आहे : फौज व खजिना पाठविणे मी आपल्यासाठी लिहित नाही. माझ्यासारखे पुत्र आपणास आहेत व होतील परंतु भाऊसाहेबांसारखा बंधू मिळणार नाही. **पत्नी :** लक्ष्मीबाई. माहेरचे नाव दुर्गाबाई. विवाह २ मे सन १७५० रोजी बुधवारी (प्रमोदनाम संवत्सर, वैशाख शु. ८ शके १६७२) झाला.[१०३] या विवाहासाठी छत्रपती रामराजे सातार्‍याहून पुण्याला आले होते. '१७९ रु. १२ आणे माहाराज छत्रपती रामराजे पंतप्रधान यांच्या पुत्राच्या लग्नास पुणियास आले त्याबाा खर्च हिजरी सन ११५९ '[३३] यांचा गर्भादान विधी एप्रिल सन १७५८ मध्ये झाला. गोपिकाबाईंना त्यांच्याबद्दल विशेष जिव्हाळा वाटत असे. लक्ष्मीबाई पानिपतला गेल्या होत्या. युद्धानंतर पुण्याला परतल्या. युद्धाचे दरम्यान त्या रणभूमीवर होत्या किंवा त्यांना सुरक्षिततेसाठी इतरत्र पाठविले होते याची माहिती मिळत नाही. पुढे १४ फेब्रुवारी सन १७६३ ला (चित्रभानुनाम संवत्सर फाल्गुन शु. २, शके १६८४) सोमवारी पुण्यात वारल्या. त्यांच्या उत्तरकार्यानिमित्त रु. ४८६९ आणे ६ इतकी रक्कम खर्च झाली.[१०४] पिता हरी बाळकृष्ण दीक्षित पटवर्धन.

माधव बल्लाळ : (८) यांचा जन्म १६ फेब्रुवारी, सन १७४५ रोजी शनिवारी (रक्ताक्षीनाम संवत्सर, माघ वद्य ११, शके १६६६) सकाळी ११ घटिका असताना सावनूर येथे झाला. त्या वेळी थो. नानासाहेब मोहिमेच्या वाटेवर सावनूरला होते. सावनूरच्या नवाबांसंबंधी लिहिलेल्या ' दिलेरजंगी ' या दुर्मिळ पुस्तकात माधवरावांच्या जन्मासंबंधी पुढीलप्रमाणे उल्लेख आहे.–[१०५]

" नानासाहेब यांची बाईको गोपिकाबाई गरोदर होती ती त्याच दिवसी प्रसूत जाहाली पुत्रोछाह जाहाला तेणेकरुन नानासाहेब परम संतोष होऊन बहुतेकांस इनाम दिल्हे. पुत्राचें नाव माधवराव ठेविले. बाल बालंतिणीस सवणुरांस ठेऊन आपण खुद फौजेसुद्धां निघोन गेले. नवाब साहेबांनी बालंतिणीचे व मुलाचे चांगल्या रितीने संवरक्षण करुन कांहीं दिवसांनंतर त्यांस उंची वस्त्रपात्र देऊन व मुलाचे अंगावर जवाहीर व मोत्याचें दागिने ठेऊन बरोबर लोक वगैरे देऊन पुण्यास रवाना केले. या कारणानें माधवराव याणी नवाबसाहेब यांस मामा म्हणत होते."

रघुनाथराव पेशव्यांनी ब्रह्मेंद्रस्वामींना लिहिले आहे; "ती राजेश्री नाना यांची स्त्री सौ मातोश्री गोपिकाबाई वहिनी माघ वा। ११।१२ सह मंदवारी प्रात:काळीच्या अकरा घटिका दिवसास प्रसुत होऊन पुत्र जाहला."[१०६]

माधवरावांची मुंज १४ फेब्रुवारी सन १७५२ रोजी शुक्रवारी (फाल्गुन शु. ११, शके १६७३) झाली.[१०७] 'चि. रा. रा. माधवराऊ याचा व्रतबंध फालगुन सुध येकादसी भृगुवारीं योजला आपण सह (परिवार) यावे म्हणोन लिहिले '[३१] माधवरावांची मुंज त्र्यंबकराव मामा पेठे यांनी पुण्यात लावली.[१०८] यांना राज-कारणाचे धडे प्रसंगानुसार, प्रत्यक्ष गादीवर येण्यापूर्वीच मिळाले होते. थोरले भाऊ विश्वासराव पानिपतवर पडले, वडील नानासाहेब पानिपतच्या पराभवामुळे धक्का बसून अकस्मात निधन पावले. यामुळे काहिशा अनपेक्षित व अपरिहार्यपणे पेशवापदाची जबाबदारी माधवरावांकडे आली.

माधवरावांना पेशवाईची वस्त्रे सोमवारी, २० जुलै, सन १७६१ रोजी (वृषनाम संवत्सर, आषाढ वद्य ३, शके १६८३) मिळाली. याच वेळी नीळकंठ महादेव ऊर्फ आबा पुरंदरे यांना मुतालिकीची व सखारामबापूंना दिवाणगिरीची वस्त्रे देण्यात आली. पोरवयातच मोठ्या साम्राज्याचा भार अंगावर पडला तरी माधवराव डगमगले नाहीत. सुरुवातीच्या काळात झालेल्या माधवरावांच्या स्वाऱ्यांची नोंद[१०९] : १) जाने. सन १७६२ उरळी २) नोव्हें. सन १७६२ घोडनदी ३) ऑगस्ट सन १७६३ राक्षसभुवन.

याच काळात पेशव्यांच्या अडचणींचा फायदा उठवण्यासाठी निजामाने हालचाली सुरू केल्या. उद्‌गीरच्या लढाईत भाऊसाहेबांनी निजामाकडून ८५ लाखांचा मुलूख काबीज केला, तरी प्रांतांची नीट व्यवस्था लावणे त्यांना पानिपतच्या तातडीमुळे शक्य झाले नव्हते. निजामाला त्या अपमानाचा सूड घ्यायचा होता. यमाजी शिवदेवांनी आपले व्याही विठ्ठल सुंदर परशरामी यांचेमार्फत निजामा-कडून पेशव्यांवर स्वारी करवली. नळदुर्ग, अक्कलकोट, परगणे काबीज करून निजामाने मराठी राज्यात अक्षरश: थैमान घातले. यामुळे माधवरावांनी २० ऑगस्ट, सन १७६१ ला निजामाविरुद्ध मोहीम उघडली. या मोहिमेत यश येत असताना रघुनाथरावांनी २९ डिसेंबर, सन १७६१ ला निजामाशी अनपेक्षितपणे तह केला. यामुळे निजामाला जरब बसली, परंतु पुरता बिमोड झाला नाही.

यानंतर पेशव्यांनी कर्नाटकात हैदरविरुद्ध मोहीम उघडली. पानिपतच्या युद्धानंतर दक्षिणेकडे हैदरचा उदय झाला होता. जून, सन १७६२ पासून चुलते रघुनाथरावांच्या घरभेदी वृत्तीमुळे त्यांच्याशी माधवरावांचा बेबनाव सुरू झाला. यातूनच घोडनदीजवळ उभयतांच्या फौजांमध्ये लढाईला ७ नोव्हेंबर, सन १७६२ ला तोंड फुटले. या वेळी रघुनाथरावांच्या बाजूला सखारामबापूंसारखे सल्लागार

असल्यामुळे परिस्थितीला तोंड देणे माधवरावांना जड गेले. लढाईतील अनावश्यक प्राणहानी टाळण्यासाठी आळेगाव मुक्कामी १३ नोव्हेंबरला माधवराव रघुनाथरावांना शरण गेले. या वेळी रघुनाथरावांनी निजामाशी हातमिळवणी केली होती. घरभेदीपणापायी निजामासारखा पिढीजात शत्रू घरात शिरतो असे पाहून, राज्यहितासाठी रघुनाथरावांना शरण जाण्याचा माधवरावांनी घेतलेला निर्णय समंजस, पोक्त, दूरदृष्टीचा होता यात शंका नाही.

थोड्याच दिवसांत रघुनाथराव व निजाम यांच्यांत बेबनाव सुरू झाला. रघुनाथराव पुन्हा माधवरावांच्या पक्षात आले.* दरम्यान निजामाने पुण्यावर हल्ले चढवून पुण्याची लूट व जाळपोळ केली. ६ मार्च, सन १७६३ रोजी पेशव्यांनी निजामाचे लक्ष द्विधा करण्यासाठी औरंगाबादवर हल्ला चढवला व २ लाख रु. खंडणी मिळवली.

यानंतर राक्षसभुवनजवळ झालेल्या, १० ऑगस्ट, सन १७६३ च्या युद्धात पेशव्यांनी निजामाचा अक्षरशः दारुण पराभव केला. युद्धानंतर निजाम–पेशवे यांच्यात २५ सप्टेंबरला पैठणला झालेल्या तहानुसार निजामाकडून उद्‌गीरच्या तहाचा ६० लाख रु. आणि नवीन २२ लाख रु. असा एकूण ८२ लाखांचा मुलूख पेशव्यांना मिळाला. या वेळी भयंकर हानी होऊन निजामाने पेशव्यांची इतकी दहशत घेतली की, निजाम खर्ड्याच्या लढाईपर्यंत (सन १७९५) मराठ्यांच्या वाटेला गेला नाही. निजामाचा विख्यात मुत्सद्दी विठ्ठल सुंदर परशरामी याच युद्धात मारला गेला. यापुढे माधवरावांना कर्नाटककडे निर्वेधपणे लक्ष देता आले.

राक्षसभुवनच्या युद्धानंतर १४ ऑगस्टला गोपिकाबाईंना लिहिलेल्या पत्रात रघुनाथराव, माधवरावांबद्दल म्हणतात[११०] :

" चिरंजीव रायांनी यंदा मेहनतीत व शिपाईगिरीत कमी केली नाही. आम्हापेक्षा अधिक जाहले. इतके दिवस त्यांनी लढाई देखिली नव्हती. (ही) पहिली लढाई पाहिली. ह्यांत सर्वप्रकारे तर्तूद अधिक केली. त्यांचा पुढे कर्तेपणाचा भरंवसा आम्हांस आला. "

राक्षसभुवनच्या युद्धानंतर, निजामाने १० मे ते १५ मे दरम्यान बेचिराख केलेल्या पुण्याची मुहुर्तपूर्वक पुनर्रचना केली.[१११] नव्या पेठा वसवल्या. राक्षसभुवनच्या मोहिमेपासून माधवरावांचे तेज, पराक्रम, जरब, इत्यादी गुण झळकू लागले. यानंतरच्या काळात माधवरावांनी कर्नाटकात एकंदर पाच स्वाऱ्या केल्या.

* समेटानंतर गोपिकाबाईंना लिहिलेल्या पत्रात (१७–२–१७६३) माधवराव म्हणतात : " प्रस्तुत तीर्थरूप राजश्री दादासाहेब व आम्ही एक झालो हीच गोष्ट एका करोडीची झाली " – ऐलेसं १ प. ९१.

पहिल्या स्वारीत (जानेवारी--जून सन १७६२) ते धारवाड ते तुंगभद्रा नदीपर्यंतच्या टापूतील खंडण्या घेऊन परतले. दुसऱ्या स्वारीत (१७ जानेवारी सन १७६४ – जून सन १७६५) हुबळी, गदग, कुंदगोळ, नवलगुंद, वेहळळी, मुळगुंद, जालिहाळ, या ठाण्यांसह तुंगभद्रा नदीपर्यंतचा मुलूख काबीज केला. धारवाड, सावनूर, रट्टेहळळी, येथे प्रचंड लढाया दिल्या. अनंतपूर येथे हैदरशी तह केला. ३२ लाख रु. खंडणी वसूल केली. तिसऱ्या स्वारीत (नोव्हेंबर सन १७६६ – जून सन १७६७) तुंगभद्रेचे दक्षिण तीर काबीज केले. शिरे, होसकोटे, बाळापूर, वगैरे स्वराज्याची जुनी गावे काबीज करून ३० लाख रु. खंडणी वसूल केली. चौथ्या स्वारीत (नोव्हेंबर सन १७६९ – जानेवारी सन १७७१) तुंगभद्रेच्या दक्षिण तीरापलीकडचा प्रांत काबीज केला. भैरवगड, निजगळ, येथे निकराची युद्धे झाली. पटवर्धनांचे शौर्य, मुरारराव घोरपड्यांचे त्या त्या प्रसंगानुसार बचावात्मक धोरण, या गोष्टींचा समन्वय या मोहिमेत दिसला.

स्वतःच्या प्रकृतीच्या कारणास्तव हैदर विरुद्धच्या चौथ्या स्वारीतून १३ मे सन १७७० ला पुण्याकडे खासे परत निघाले. पुढे चौथी स्वारी त्रिंबकराव मामा पेठे, गोपाळराव पटवर्धन वगैरे अनुभवी सरदारांनी एकोप्याने तडीस गेली. या वेळच्या प्रमुख गोष्टी म्हणजे सरदार गोपाळराव पटवर्धनांचा मृत्यू, गुरुमकोंडा, कोलार, मोतीतलाव, येथील संहारक लढाया, श्रीरंगपट्टणचा हैदर - पेशवे यांच्यातील तह, पाचव्या स्वारीत (जून सन १७७१ ते जून सन १७७२) मागील खंडणी व स्वारी-खर्चाबद्दल ३६ लाख रु. व दरसाल १४ लाख रु. हैदरला कबूल करायला लावले. कर्नाटकातील मोहिमांमुळे शहाजी राजांच्या वेळचा जहागिरीचा सर्व मुलूख मराठी राज्यात सामील झाला.

कर्नाटकातील मोहिमांत माधवरावांचे शौर्य, चिकाटी, शिस्त, जरब, वगैरे गुण कसोटीला उतरले. माधवरावांच्या श्रेष्ठतेची कबुली हैदरनेही दिली. राज्याची आर्थिक घडी प्रामुख्याने दक्षिणेकडील या मुलखातील वसुलीवर अवलंबून असे.

यापूर्वी ऑक्टोबर सन १७६५ मध्ये पुण्यात सदाशिवराव भाऊंच्या तोतयाचे प्रकरण उद्भवले. तोतयाची पर्वतीवर चौकशी होऊन तो खोटा ठरल्यावर त्याला नगरच्या किल्ल्यात डांबून ठेवण्यांत आले.*

५ फेब्रुवारी सन १७६६ ला कुरुमखेड येथे पेशवे – निजाम यांची सदिच्छा भेट झाली. मराठी राज्याला मुख्य धोका तीन बाजूंनी होता. रघुनाथराव पेशव्यांचा घरभेदीपणा, नागपूरकर भोसल्यांची अधिकारलालसा, निजामाचा धर्मांध संधी-

* 'सदाशिवरावभाऊ' या पुस्तकात दिलेली तोतयाची माहिती मुळीच विश्वसनीय मानता येत नाही.

साधूपणा. रघुनाथराव किंवा भोसले यांच्यात निजामाच्या मदतीखेरीज एकट्याने पेशव्यांविरुद्ध मसलती करण्याची कुवत नव्हती. राक्षसभुवननंतर निजामाचीही हिंमत संपली होती. अशा वेळी निजामाशी सलोखा केल्यास इतर दोघांना बगावतीची हिंमत होणार नाही, हाच मुत्सद्देगिरी व दूरदृष्टीचा विचार पेशवे – निजाम भेटी-मागे होता.

३ डिसेंबर सन १७६७ ला इंग्रजांचा वकील मॉस्टिन व माधवरावांची पहिली भेट व वाटाघाटी झाल्या.* इंग्रज कंपनी सरकारच्या वसई – साष्टी-बद्दलच्या मागण्या माधवरावांनी साफ नामंजूर केल्या. निजाम व हैदरअली यांचा बंदोबस्त करून राज्याची सुव्यवस्था लावत असतानाच घरातल्या रघुनाथराव* पेशवे, जानोजी भोसले यांसारख्या, शत्रूंशी संगनमत करून मराठेशाही धोक्यात आणणाऱ्या हितशत्रूंचाही माधवरावांना सुरुवातीपासून बंदोबस्त करावा लागला. परिणामतः चुलते – पुतण्यात आळेगाव (नोव्हेंबर सन १७६२) व घोडपे येथे (जून सन १७६८) अशा दोन लढाया झाल्या.

जानोजी भोसल्यांविरुद्ध ऑक्टोबर सन १७६५ ते फेब्रुवारी सन १७६६ व नोव्हेंबर सन १७६८ ते मे सन १७६९ अशा दोन मोहिमा झाल्या. भोसल्यांबरोबर त्यांनी प्रथम ३० जानेवारी, सन १७६९ रोजी खोलेश्वरचा व २३ मार्च, सन १७६९ रोजी कनकेश्वरचा तह करून भोसल्यांना पूर्णपणे नमवले. २७ ऑगस्ट, सन १७६९ रोजी तिसऱ्या प्रहरी, पुण्यात पर्वतीहून देवदर्शन घेऊन परतताना माधव-रावांच्या खुनाचा असफल शस्त्र प्रयोग झाला. त्यातून माधवराव बचावले.

१७६९ अखेरपासून त्यांना क्षयाचा (टी. बी.) त्रास सुरू झाला. कर्नाटकच्या चौथ्या स्वारीत सरदारांना दिलेल्या वचनपूर्तीसाठी माधवराव सप्टेंबर १७७० मध्ये पुन्हा कर्नाटक-स्वारीवर निघणार, तोच नागपूरकर जानोजी भोसले भेटीसाठी आले. त्यामुळे माधवराव कर्नाटकात डिसेंबरमध्ये निघाले. डिसेंबरअखेर मिरजेला मुक्काम असताना प्रकृती बिघडल्यामुळे परत फिरले व २० जानेवारी सन १७७१ ला पुण्यात आले.

---

* पेशव्यांना भेटायला मॉस्टिन १९–११–१७६७ ला मुंबईहून निघाला. पनवेलच्या खाडीत शिरल्यापासून पेशव्यांचा पाहुणा या नात्याने त्याला वागवण्यात आले. बेलापूरच्या किल्ल्याजवळ तोफांच्या सरबत्तीने त्याला सलामी देण्यात आली. सन्मानार्थ शिंगही फुंकण्यात आले. – ' इतिहास विहार ' (खंड ७) केळकर न. चिं. पृ. ५६.

* रघुनाथरावांना नजरकैदेत टाकावे लागले तरी माधवरावांनी त्यांचा अनादर केला नाही. ' त्यांस दुःसंगाची बाधा होती. एरवी तीर्थरूप स्वच्छ अंतः-करणाचे स्फटिकवत् ' – ' सखाच ' पृ. २६९.

सन १७७१–७२ हा काळ बहुतेक औषधोपचार, हवाफेर, प्रकृतीसाठी धर्मकृत्ये व अनुष्ठाने यांतच गेला. पुणे, थेऊर, जेजुरी, सिद्धटेक, कटोरे येथे मुक्काम असे. माधवरावांना आतड्याचा क्षय होता. त्यामुळे त्यांना पोटदुखीच्या असह्य वेदना होत. असो. ९ जून ते १९ जून, सन १७७१ या दरम्यान त्यांचा मुक्काम थेऊर क्षेत्री होता. जुलै मध्ये ते गोदावरी-तीरावर कटोरे येथे हवाफेरासाठी गेले. तेथे १३ जुलै रोजी त्यांची सुवर्णतुला झाली. ऑगस्ट अखेरपर्यंत मुक्काम कटोरे येथे होता. ऑक्टोबर सन १७७१ पासून प्रकृती सुधारू लागली. बेट कोपरगावजवळ कचेश्वर येथे चंद्रग्रहणाचे मुहूर्तावर २३ ऑक्टोबर ला त्यांची सुवर्णतुला झाली. १७७१ साली माधवराव वारल्याची बातमी इंग्रजांना समजली पण ती खोटी [११२] ठरली. ९ जानेवारी ते ५ फेब्रुवारी, सन १७७२ पर्यंत माधवरावांचा मुक्काम सिद्धटेकला होता. फेब्रुवारीपासून थेऊरला होते.[११३] मे महिन्यात पुण्याला आले असावेत. जून १७७२ मध्ये पुण्याहून पालख्यांची डाक बसवून गंगापूरला आईच्या भेटीसाठी जाण्याचे नक्की ठरले होते. पण प्रकृती बिघडल्यामुळे बेत रद्द झाला. [११४] स्वतःच्या आजारपणात ते ज्या पोर्तुगीज डॉक्टरचे औषध घेत, त्या डॉक्टरचे नाव 'फ्रेई लियांद्रू द माद्रि द देऊस' असे असून तो माधवरावांबरोबर थेऊरलाही गेला होता. पेशव्यांच्या विनंतीनुसार आणखी एक डॉक्टरही गोवेकरांनी पुण्याला पाठवला होता. त्याचे नाव 'मानुयल फ्रान्सिस्कु गोंसाल्विस' असे होते. [११५] एका अर्मेनियन डॉक्टरने देखील औषधी तेल तयार करून दिले होते. [११६]

माधवरावांनी गोपिकाबाईंना, ८–१०–१७७१ च्या पत्रात 'पोटातही फिरंग्याचे औषध घेत असतो.' असे कळवले होते. याच काळात त्यांनी सेनापती हरीपंत फडक्यांना आजपर्यंतच्या अविचल निष्ठेबद्दल कृतज्ञता म्हणून, श्रीवर्धनच्या आपल्या वडिलोपार्जित देशमुखी वतनापैकी स्वतःच्या हिश्शातील भाग इनाम करून दिला. २६–१२–१७७१, खरनाम संवत्सर, मार्गशीर्ष वद्य ५, गुरुवारी, माधवराव, नारायणराव, रघुनाथराव यांनी ही सनद फडके परिवारातील मोरो बापूजी, गंगाधर आबाजी, हरी बल्लाळ, धोंडो बल्लाळ यांचे नावे दिली आहे. [११७]

२७ मार्च ते जुलैपर्यंत (सन १७७२) माधवराव पुण्यात होते. प्रकृती दिवसेंदिवस फारच बिघडल्यामुळे ऑगस्ट महिन्यात जीवाची आशा सोडून पुण्याहून थेऊरला 'चिंतामणी' जवळ येऊन राहिले. 'शके १६९४ नंदननाम संवत्सरे खासा श्रीमंत शरीरी अस्वस्थ श्रीमंत रघुनाथ बाजीराव वाडियात असता खासा निघोन थेवरास श्रीगणपती जवळ खास वाडियात जाऊन राहिले." [११८]

जयपूरचे वैद्य गंगा विष्णु (लागवणकर), साताऱ्याचे रुपेश्वरबुवा, तेरदळचे रणछोडजी वैद्य, महम्मद अली हकीम, इंग्लिश डॉक्टर कॅनिंगहॅम आणि पूर्वोक्त पोर्तुगीज डॉक्टरांचे कडक उपचार चालू होतेच. भूतबाधा, मांत्रिक, तांत्रिक वगैरे

उपाय झाले. पण 'दोन दिवस प्रकृती बरी, तर चार दिवस विकृत' असे होऊ लागले. या सर्व कालावधीत राज्याच्या भवितव्याची चिंता माधवरावांना व्यग्र करीत होती, म्हणून त्यांनी सर्व सरदारांच्या अनुमतीने भावी राज्यव्यवस्थेसंबंधी प्रख्यात '९ कलमी यादी' ३० सप्टेंबर सन १७७२ रोजी निश्चित केली.

१ नोव्हेंबरला (कार्तिक शु. ६) थेऊर मुक्कामी खासा वाड्यातून मंदिराच्या ओवरीत वास्तव्यासाठी आले. याच दिवशी १०८ गोदानास प्रारंभ केला. "रात्रौ भूमी शयनच होते, 'येतील त्यास येऊ देत जाणे मना न करणे' अशी आज्ञा जाली." ६ तारखेला (कार्तिक शु. ११) पूर्ण प्रायश्चित घेतले. त्याची सर्व तयारी स्वतःचे नजरेखाली करवली. ५० हजार रुपये कांची कामाक्षीला धर्म करण्याचा संकल्प सोडला. स्वतःजवळील सुलक्षणी गायींचे स्वहस्ते दान केले. बोलण्याची किंवा हालचाल करण्याची शक्ती उरली नव्हती तरीही सर्वांवर वचक कायम होता. त्याही स्थितीत लोक माधवरावांना घाबरत असत. यानंतर 'भूमी सारवून दर्भाचा सोवळा बिछाना करून भूमीशय्येवर शूद्र स्पर्श नसावा असे राहिले.' त्यापूर्वी केळीच्या पानांच्या सुरळ्यांवर निजत.

इतरांनी करवावी तेव्हा हालचाल होई. हरीपंत फडके व श्रीमंत नारायणराव स्वहस्ते अन्न भरवीत, तेवढेच अन्न पोटात जाई. व्याधीमुळे अंगाचा दाह, वेदना व जीवाच्या संताप होई. ज्वर नसतानाही प्रकृती बिघडे. मृत्यूपूर्वी ३--४ दिवस वैद्यांजवळ 'अतिसार मरणसमयी व्हावा हे उत्तम, कफ होऊ न द्यावा, नाही तर स्मरण गजाननाचे व्हावयाचे नाही', अशी माधवरावांनी विनंती केली होती. मृत्यूपूर्वी ३–४ दिवस सतत असेच बोलत असत. 'प्राण जाते समयी अन्न न घालणे दूध व गंगोदक मिलोन घालणे' असेही त्यांनी बजावले होते.* क्षयाचा रोगी चिडका, तिरसट. बनतो. अखेरपर्यंत निराश होत नाही. माधवरावांचा स्वभाव तसाच बनला होता. त्यांनी इच्छाशक्तीच्या बळावर लोकांच्या अंदाजापेक्षा सहा महिने जास्त काढले असे म्हटले तर चूक ठरू नये.

अखेर १८ नोव्हेंबर सन १७७२ रोजी, बुधवारी (नंदननाम संवत्सर, कार्तिक वद्य ८. शके १६९४) सकाळी त्यांनी स्वतःच सर्वांना महायात्रेची तयारी करायच्या सूचना दिल्या. अखेरपर्यंत सावध होते. स्मरणशक्ती शेवटपर्यंत कायम होती. नारायणरावांना रघुनाथराव आणि सखारामबापूंच्या हाती सोपवले. "महायात्रेस आम्ही जातो. आमचे स्वारीची तयारी करा" असे बोलले. मृत्यूपूर्वी दोन घटिका (सुमारे ४८ मिनीटे) बोलणे थांबवून तोंडाने 'गजानन ! गजानन ! !' असा जप सुरू केला.

---

* त्यांचा खासा स्वयंपाक निव्वळ कोळशावर होत असे. — 'ऐलेसं' १०७२

'नवंबर १८, सन १७७२, शके १६९४ कार्तिक वद्य ८, बुधवार, साबान २२ प्रातःकालचे सहा घटिका दिवसास श्रीमंत पंतप्रधान माधवराव रावसाहेब यांचे थेऊर येथे श्रीगणपतीचे मंदिरातील ओवरीत देहावसान झाले. सौ. रमाबाई सती गेल्या.' [११९]

'२८ नोव्हेंबर सन १७७२ –(माधवरावांचे पिंडाला) कावळा शिवला नाही. तेव्हा 'नारायणरावास पुत्र जाला तर माधवराव असे नाव ठेवावे' म्हणून उदक सोडले तेव्हा काकस्पर्श जाला.' [१२०] माधवरावांच्या अस्थी नाशिकला गोदातीरी पाठवून देण्यात आल्या. उत्तरकार्य यथासांग करण्यात आले.

माधवरावांच्या कारकीर्दीतील मुख्य सहा गोष्टी सांगता येतील : १) हैदर अलीचा पराभव. प्रांतांची देवाण-घेवाण करून दक्षिण निर्वेध केली. २) उत्तरेकडील बंडाळी मोडून पानिपतच्या पराभवाचा वचपा काढला. ३) निजामाला जरब बसवली. ४) घरातील व दरबारातील रुष्ट व असंतुष्ट आप्त व सरदारांना राज्याविरुद्ध वागू न देता त्यांना राज्यकार्यासाठी वळवून राज्यकारभारात सुधारणा केल्या. ५) खजिना व शस्त्रसज्जता कायम राखली. ६) राजकीय व सामाजिक व्यवहारांत वस्तुनिष्ठ धोरण ठेवले. अतिशय कार्यक्षम हेरखाते हे माधवरावांच्या कारभार-पद्धतीचे एक वैशिष्टच.

माधवराव गोरेपान, उंच, थोराड शरीराचे गृहस्थ होते. डोळे काळेभोर व पाणीदार होते. चेहरा उग्र होता. ते स्वभावाने मितभाषी असून रोखठोक व ठासून बोलत. लेखन निःसंदिग्ध, हुकूमतीचे पण रेखीव असे. तरुण वयात कोमल, गोरे, देखणे दिसत. कठोर परिश्रम, काळजी, निग्रहाने निस्तेज बनले. राहणी साधी व श्रमशील होतीं. अनेकांचे सल्ले घेत तरी स्वतःच्या स्वतंत्र मताप्रमाणेच चालत.

त्यांनी वडीलांचे पानिपतपूर्वीचे बहुतेक संकल्प सिद्धीस नेले. दिल्लीचा बादशाह, निजाम, हैदर, रजपूत राजे, शीख, जाट, इत्यादींचे व्यवहार स्वराज्याच्या दृष्टीने निर्गमात आणले. पूर्वीच्या ३ पिढ्यांत राहिलेली अपूर्णता व उघड चुका सुधारून राज्याचा गाडा अधिक सुरळीत केला.

माधवरावांच्या कारकीर्दीत रघुनाथरावांमुळे पेशव्यांच्या गृहकलहाला उघडपणे सुरुवात झाली. माधवरावांनी शिंदे, होळकर, कानडे, बिन्नीवाले, वगैरे सरदारांमार्फत राजपुताना व बुंदेलखंडात तर घोरपडे, पानसे, फडके, पटवर्धन, वगैरे सरदारांमार्फत कर्नाटकात मराठ्यांचा अंमल स्थीर केला. दारुगोळा, तोफा वगैरे शस्त्रास्त्रांचे कारखाने पुणे, ओतूर, नाशिक, बागलकोट, इत्यादी ठिकाणी काढले. मात्र शास्त्रीय ज्ञानाच्या अभावी परावलंबित्व दूर झाले नाही. यांचेवेळी सरदारांची

नवी पिढी उदयाला आली.*

माधवराव धाडसी, करारी, न्यायनिष्ठूर राज्यशासक आणि अप्रतिम सेनापती होते. त्यांनी अल्पवयातही जी माणसे निवडून पुढे आणली, त्यांपैकी एकही टाकावू निघाला नाही, ही गोष्ट त्यांना माणसांची किती पारख होती याची निदर्शक आहे. राज्याच्या कर्जफेडीसाठी त्यांनी स्वतःच्या खासगी संपत्तीपैकी लाखो रुपये, जडजवाहीर अर्पण केले. त्यांना लबाडी, चैन, थाटमाट, बिलकूल खपत नसे. मनुष्य-प्रयत्न बलवत्तर; यावर त्यांचा विश्वास होता. त्यांचा कारभार लष्करी बाण्याचा असे. झटपट सर्वांगीण प्रगती साधण्याकडे त्यांचे लक्ष असे. 'अल्पावधीतच राज्य-कारभाराची विस्कटलेली घडी त्यानी पूर्ववत् बसवली आणि राष्ट्रात नवा जोम व जूट निर्माण केली. या त्याच्या कर्तृत्वास त्याचे अनुवंशिक गुण, बापाने लावलेले वळण व दिलेले शिक्षणच उपयोगी पडले.' [१२१]

यांच्याच कारकीर्दीत मराठ्यांनी इंग्रजांच्या आश्रयाने राहणाऱ्या शहाआलम बादशहाला दिल्लीच्या गादीवर बसवले. पानिपतचा कलंक धुवून काढण्यासाठी माधवरावांनी रामचंद्र गणेश कानडे व विसाजी कृष्ण बिन्नीवाले या सरदारांची उत्तरेकडे कायमची नेमणूक केली. या सरदारांनी दिल्ली काबीज करून दिल्लीच्या किल्ल्यावर मराठ्यांचे भगवे निशाण फडकावले.

शाही शिक्के-कटचार मराठ्यांच्या ताब्यात आली. या मोहिमेत महादाजी शिंदे होते. पानिपतनंतर दहा वर्षांत दिल्लीत मराठ्यांचे वर्चस्व स्थापन झाले. या सरदारांनी उत्तरेकडे केलेल्या पराक्रमांची वर्णने ऐकून माधवराव इतके आनंदित झाले की, या मोहिमेचे सेनापती व सरदारांना सोन्यारुप्याची फुले उधळीत पुण्यात आणवावे अशी आज्ञा केली.

माधवरावांनी गंगापूरला गोपिकाबाईंची उत्तम व्यवस्था ठेवली होती दोघांचा नियमित पत्रव्यवहार होत असे. गोपिकाबाईंना मोडी लिपी येत नसे. त्यामुळे माधवराव त्यांना बाळबोधीत पत्रे लिहीत. ते गंगापूरला जाऊन आईला भेटत. महत्त्वाच्या बाबींवर गोपिकाबाईंची मते मागवत. आईचा खूप मान ठेवीत. माधवराव आईच्या अध्यां वचनात असले तरी त्यांनी राजकारणात आईचा सल्ला कधीच 'अंतीम' मानला नाही. स्त्रियांनी राजकारणात लुडबूड करणे त्यांना बिलकूल खपत नसे. तसेच कारणाशिवाय कौटुंबिक भानगडीत पडण्याची त्यांची पद्धत नव्हती. ग्रॅन्ट डफ सारख्या इंग्रजाभिमानी इतिहासकारानेही पुढील शब्दांत

* सखारामबापू माधवरावांबद्दल म्हणतात : "माधवरावांसारखा कर्ता दुसरा नाही; याजला सोडूं नये आसे चित्तापासून परंतु दादाकडील कल आम्हास जरूर राखावा लागतो."– पे. द. ३९ ले. ६१

माधवरावांचा गौरव केला आहे. – " The plains of Panipat were not more fatal to the Maratha Empire than the early end of this excellent Prince "[१२२]

पत्नी : रमाबाई. माधवरावांचा विवाह प्रथम नरहर आप्पाजी वैद्य यांच्या मुलीशी ठरला. १७५३ साली मार्गशीर्ष शु. १० हा मुहूर्त ठरला. परंतु काही दिवस आधी वधूला मूळ नक्षत्र असल्याचे लक्षात आल्यामुळे हा विवाह मोडला. नुकसान-भरपाई म्हणून द्रव्यदान देऊन वधूपक्षाची समजूत काढली. त्यानंतर ऐनवेळी रमाबाईंशी विवाह ठरला. [१२३], [१२४]

विवाह जरा घाईने परंतु मोठ्या थाटाने रविवारी ९ डिसेंबर, सन १७५३ रोजी (श्रीमुखनाम संवत्सर, मार्गशीर्ष शु. १४, शके १६७५) पुण्यात झाला. रमाबाईंचे माहेरचे नाव समजले नाही. रमाबाईंचा जन्म शके १६७० मध्ये झाला. [१२५] त्यांचे वडील १७६७ साली वारले. त्या वेळी आईला भेटायला त्या नाशिकला गेल्या होत्या. रमाबाईंचे गर्भादान ३ जुलै सन १७६५ रोजी झाले. त्याचा खर्च ८२७२ रु. झाला. मूल मात्र झाले नाही. ' २८–९–१७६४ नंतर चिरंजीव सौ. रमाबाई यांसी आस्विन सुध सुक्रवारी त्रितियेस रजोदर्शन प्राप्त जाले ' ' २४–६–१७६५ चि. सौ. रमाबाई यांचे गर्भादान आषाढ सुध नऊमी गुरुवारी कर्तव्य आहे ' अशा दोन नोंदी पे. द. ३२ मध्ये आढळतात.

सन १७६६–६७ मधील कर्नाटकच्या स्वारीत रमाबाई गेल्या होत्या. याखेरीज '५–१–१७६९ रमाबाई लष्करातून पुण्यात परत ' अशी नोंद ' माधवराव पेशवे शकावलीत ' आहे.

श्रीवर्धन, हरिहरेश्वरला यात्रेसाठी रमाबाई अनेक वेळा जात असत. त्यांपैकी १७६६ सालच्या यात्रेचा थोडा तपशील मिळतो. ही यात्रा बहुधा १९ ऑक्टो. सन १७६६ ते २६ नोव्हें. सन १७६६ दरम्यान झाली. खर्च २५२६ रु. झाला. गंगाबाई, पार्वतीबाई या देखील बरोबर होत्या. हुजूरपागा, कामाठी, उष्टरखाना (उंट) पीलखाना (हत्ती), वाजंत्री वगैरे सर्व तऱ्हेचा लवाजमा होता. यात्रेत रमाबाईनी इतरही देवदर्शने केली.[१२६]

दिवे येथे देवदर्शनाला जात असताना मतगड किल्ल्यावरून त्यांच्या सन्मानार्थ १३ तोफा उडवण्यात आल्या. पुढे १७६८ साली हरिहरेश्वर येथे चौघडा रमाबाईंनीच माधवरावांकरवी सुरू केला.

स्वतःच्या आजारपणात माधवरावांनी फार आग्रह केल्यामुळे १७७२ सालच्या पूर्वार्धात त्या हरिहरेश्वराच्या यात्रेला गेल्या होत्या. यात्रेची तयारी २–३ महिने चालली होती. ४ एप्रिल सन १७७२ ला वर्षप्रतिपदेच्या शुभमुहूर्तावर प्रस्थान

ठेवले. त्यापूर्वी २४ जानेवारी सन १७७२ ला पेशव्यांनी जंजिऱ्याच्या सिद्दीकडे वस्त्रे पाठवल्याची नोंद आहे. या वेळचा सिद्दी याकूतखान (बाबामिया) ह्याच्याशी, २ सप्टेंबर सन १७७१ ला तह झाल्यामुळे ह्या काळात दोन्ही सत्ताधीशांचे संबंध सलोख्याचे होते. त्याचे प्रतिबिंब यात्रेच्या तपशीलात आढळते.[१२६]

सिद्दीकडून रमाबाईंना १०७४ रु. ची सन्मान - वस्त्रे (खासा ५८९ रु. ८ आ., जाफराखानी १०४ रु. ८ आ., महम्मदी धुवट बुट्टेदार ८० रु. मंदील ३०० रु.,) मिळाली. सिद्दीकडून भेटी घेऊन येणाऱ्या अधिकाऱ्यांना एकूण २२५ रु. च्या परतभेटी मिळाल्या.[१२६]

रमाबाई, धार्मिक वृत्तीच्या, नेमनिष्ठ, पतिव्रता होत्या. त्यांनी पुण्याजवळच्या पंचयात्रा (सिद्धटेक, थेऊर, मोरगाव, जेजुरी, कुरकुंभ) केल्याचे अनेक ठिकाणी उल्लेख मिळतात. त्यांनी उपास तापास करून शरीराला चांगलेच कष्टवले होते.

त्या फक्त संसारी स्त्री होत्या. पारिवारिक गोष्टींखेरीज सामाजिक किंवा राजकीय उलाढालींत त्यांना काहीही गम्य नसे. विशेष करारी वृत्ती व स्वतंत्र कर्तबगारी अंगी नव्हती. उलटपक्षी त्या देवभोळ्या, सत्प्रवृत्त, गरीब स्वभावाच्या होत्या. त्या सती गेल्यामुळे उत्तरकालीन लेखकांनी रमाबाईंचे व्यक्तिमत्व मोठे करून रंगवले आहे. गोपिकाबाईंचे रमाबाईशी फारसे जमत नसे. दोघींत नेहमी कुरबुरी चालू असत. गोपिकाबाईंचा नैसर्गिक ओढा थोरली सून सौ. लक्ष्मीबाईंकडे असे. कादंबऱ्यांमध्ये रंगवलेले व्यक्तीचित्रण व गोपिकाबाई-रमाबाईंचे संबंध इतिहासाला धरून नाहीत.

माधवरावांनी कार्तिक शु. ६ रोजी (१. नोव्हें.) रमाबाईंना सहगमनाविषयी सांगितले.[१२७] तेव्हा त्या 'ईश्वरेच्छा प्रमाण' इतकेच बोलल्या. त्या दिवसापासून त्या फक्त दूध व गोमूत्रावर राहिल्या.

'भारत वर्षा'तील 'गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत' मध्ये माधवरावांचे एक मृत्यूपत्र दिले आहे, सर्व तपशील पाहता तो कच्चा दस्तऐवज असावा असे दिसते. या दस्तऐवजाचा उल्लेख इतरत्र आढळत नाही. त्यात एक कलम (पृ. २१) पुढीलप्रमाणे आहे :

"आमचा अंतकाल जाल्यावर आमची स्त्री सौभाग्यवती रमाबाई सहगमनाचा विचार निश्चयात्मक करून आहे त्यास इजला कोणी स्वकीयें परकीयें मोहात घालूं नये. जो विचार आहे तोंच यथा विभवानुसार समारंभ करून करवावा त्यास व्यत्यय न व्हावा."

रमाबाईंनी कार्तिक शु. ३ रोजी (२९-१०-१७७२) त्यांची सतीची वस्त्रे आणण्यासाठी पुण्याला सांडणीस्वार पाठवला होता. त्यावरून रमाबाईंनी सहगमनाचा निर्णय आधीच घेतला असावा असे वाटते. या सांडणीस्वारामुळे पुण्यात

माधवरावांच्या मृत्यूची आवई उठून हाहा:कार माजला. वस्तुस्थिती समजल्यावर शांतता झाली. माधवरावांच्या आजारपणात रमाबाई बहुतेक काळ पुण्यातच असत. अखेरच्या काळात मात्र थेऊरला होत्या.

माधवरावांच्या मृत्यूनंतर सती जाऊ नये म्हणून अनेकांनी रमाबाईंना विनविले. त्या सर्वांना, ' ईश्वरी सत्ता प्रमाण सती जाणे हा धर्म आपला आम्हास चवदा इंद्र होईजोपर्यंत स्वर्गवास लाभ होतो ' एवढेच रमाबाईंनी सांगितले. महायात्रेला निघाल्यावर त्यांनी स्वत:चे दागिने व मोहोरा दान केल्या. सामान्य चाकरांनासुद्धा किमान एक मोहोर दान केली. नंतर धर्मशास्त्रानुसार विधिपूर्वक सती गेल्या. उभयता पतीपत्नींच्या उत्तरकार्याचा खर्च [१२८]– रोख रु. ५८, ५१६ आ. ६ आणि जामदारखान्यापैकी १२,५२४ रुपयांचे कापड मिळून ७१,०४० रु. ६ आणे. सुमारे १ लाख रु. रमाबाईंनी सती जाताना दानधर्म केला. तो– ६०,६५० रु. धर्मादाय, २१,९५० रु. बक्षीस, १६,७८० रु. इनाम व देणगी, ६२० रु. धर्मादाय इनाम. याखेरीज गजदानार्थ आंबारीसुद्धा भवानी नावाचा हत्ती दिला.*

रमाबाईंच्या सहगमनावर लिहिलेल्या पोवाड्याचा काही भाग ॲक्वर्थ व शाळीग्राम यांच्या ' ऐतिहासिक पोवाडे ' मध्ये उपलब्ध आहे. सहगमनाबद्दल जेम्स फोर्बस म्हणतो. ' आपली सारी धनदौलत आणि जडजवाहीर तिने आपल्या नातेवाईकांना वाटून टाकले आणि माधवरावांच्या शवाबरोबर ती स्मशानात गेली. तेथे सर्व धार्मिक विधी पार पडल्यावर मोठ्या आश्चर्यकारक संथपणे आणि धैर्याने ती चितेवर चढली आणि स्वत:च्या हाताने तिने त्या चंदनाच्या चितेला अग्नी लावला नंतर ब्राह्मणांनी चितेत तूप व सुगंधी तेले ओतली.' [१२९]

रमाबाईंचे पिता शिवाजी बल्लाळ जोशी रा. गराडे, सोलापूर – जोशांकडे संगमनेर, सोलापूर, मिरज, येथील कोटांचे अधिकारपण असे. रमाबाईंचे वृंदावन थेऊरला गणपतीच्या देवळाजवळ नदीच्या पात्रात आहे. * पूर्वी या ठिकाणी जे वृंदावन होते. त्याचा जिर्णोद्धार मि. किंकेड आय्. सी. एस्. डि. जज्जसाहेब यांनी केला. त्या जिर्णोद्धाराचा १३२ रु. ४ आणे आणि समारंभाचा १५६ रु. ६ आणे ३ पैसे खर्च थेऊर व चिंचवड देवस्थानांनी केला. हा समारंभ रविवार दि. ५ जानेवारी सन १९०८ रोजी झाला.[१२५]

---

* आणखी तपशील पहा – पेद ३२ पत्रे, १९०/९१/९२.

* थेऊरच्या समाधी– वृंदावनावरील अर्वाचीन शिलालेख :–

श्रीमती महासती सौभाग्यवती रमाबाईसाहेब पेशवे या आपले पति श्रीमंत माधवराव बल्लाळ पेशवे यांचे निधन होताच त्यांचे समागमे या स्थानी सती गेल्या. बुधवार कार्तिक वद्य ८ शके १६९४.

ता. १८–११–१७७२.

यशवंत बल्लाळ : (८) याच्या जन्माबद्दल पुढीलप्रमाणे नोंदी मिळतात : "भाऊसाहेब यास पुत्र जाला छ १५ साबान छ २९ साबान नानासाहेब यांस यशवंतराव म्हणून पुत्र जाला होता." याचा जन्मदिवस 'मोडक जंत्री 'नुसार शनिवार १३ ऑगस्ट सन १७४८ (विभवनाम संवत्सर, भाद्रपद शु. १, शके १६७०) हा येतो. २५ ऑगस्ट, सन १७४८ ची नोंद : "छ ११ रमजान तिसा आर्बेन, पुत्राछाह राजश्री नाना यासी पुत्र जाला व राजश्री भाऊ यासी पुत्र जाला."[१३१]

हा जवळजवळ बालपणीच वारला. त्याची नोंद : "शुद्ध १३ सह १४ गुरुवारी श्रीमंत राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांचा पुत्र तिसरा ती वरसाचा होता त्यास बरे वाटत नव्हते त्यास रोजमजकुरी सकाळच्या दहा घटिका दिवसास देवआज्ञा जाली. फटकाळ गोष्ट जाली."[१३२]

'मोडक जंत्री 'नुसार या नोंदीतील मृत्यूदिन : "शुक्रवार २६ जुलै, सन १७५१ (प्रजापतिनाम संवत्सर, श्रावणमास, शके १६७३).

मोरेश्वर बल्लाळ : (८) याच्या जन्माची नोंद :[१३३] "भाद्रपद वद्य १ बुधवारी राजश्री बाळाजी बाजीराऊ यास चौथा पुत्र जाला. अडीच पावणेतीन प्रहर दिवस जाला होता. राजे कूच करून गेलियावरी पुत्र जाला असे." 'मोडक जंत्री' नुसार हा दिवस येतो, "बुधवार, भाद्रपद वद्य १, ५ प्रमादिनाम संवत्सर शके १६७२" म्हणजे ५ सप्टेंबर सन १९५०

जन्माबद्दलची आणखी एक नोंद :[१३३] "९–९–१७५० छ १८ सवाल खर्च पोतापैकी ८२॥ रुपये पुत्रउत्साह रा. नानास छ १४ सव्वाली पुत्र जाला ते दिवसी खर्च मोहरा नाणे ६.६८॥ रु. मुलाचे नाळावरी ठेविल्या. नालच्छेदन समयी मोहोरा नाणे ५"

याच्या मृत्यूची नोंद : "चैत्र शुद्ध ८ मंदवारी श्रीमंत राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांचा चौथा पुत्र लहान होता त्यास का॥ मजकुरी देवाज्ञा जाली" यावरून 'मोडक जंत्री 'नुसार मृत्यूचा दिवस : 'शुक्रवार २२ मार्च सन १७५१, प्रजापतिनाम संवत्सर, शके १६७३.[१३४]

नारायण बल्लाळ : (८) यांचा जन्म ११ ऑगस्ट, सन १७५५ रोजी सोमवारी (युवनाम संवत्सर, श्रावण शु. ४ शके १६७७) झाला. या वेळी श्रावणमास दक्षिणेसाठी रमण्यात जे ब्राह्मण जमले होते, त्यांना पुत्रजन्माबद्दल १ रु. जास्त दक्षिणा दिली.[१३५] यांची मुंज २८ मे सन १७६२ रोजी शुक्रवारी (ज्येष्ठ शु. ५, शके १६८४) रघुनाथरावांनी लावली. मुंजीचा खर्च रु. १९,९७६ आ. ४ आला.[१३६] आईचे देखरेखीखाली यांचा संस्कृत, व्याकरण, काव्य, वगैरेचा अभ्यास झाला. सन १७६४ पर्यंत यांचा बहुतेक काळ आईच्या सहवासात गेला. सन १७६१ मध्ये

वडीलांबरोबर (पानिपतच्या वेळी) उत्तर हिंदुस्थानात गेले असताना, परतीच्या वाटेवर (मे सन १७६१) यांना देवी[१३७] आल्या. सन १७६७ व सन १७६९ च्या कर्नाटकच्या स्वाऱ्यांत हे हजर होते. सन १७६९ पासून माधवरावांनी निरनिराळ्या कारभाऱ्यांजवळ बसून कामे समजून घ्यावी, थोडे बहुत निकाल करावे, असे सांगितले होते. तसेच कित्येक कारभार व मसलती नारायणरावांकडे सुपूर्त केल्या. माधवरावांच्या दुखण्यात, माधवरावांचे शेरे व्हायचे. त्या जागी नारायणरावांकडून शेरे करवीत.[१३८] महादाजीपंत गुरुजींनी (करकरे) नारायणरावांजवळ बसून मखलाशी (निकालपत्रावर शेरा) द्यावी असे माधवरावांनी ठरवले होते.

माधवरावांनी २३ ऑगस्ट सन १७७० रोजी नारायणरावांना दिवाणगिरीची व सखारामबापूंना मुतालकीची वस्त्रे दिली. परिणामतः हातचा कारभार गेल्यामुळे सखारामबापूंना ही व्यवस्था नापसंत होती. मराठ्यांनी उत्तरेकडील मोहिमेत (सन १७७१–७२) मोठे यश मिळवले. त्या वेळी नजिबखानाचा मुलगा जाबीताखान याचेकडे ' मीरबक्षी ' पद होते. ते महादाजी शिंद्यांनी नारायणरावांचे नावे देवविले.

कटोरे मुक्कामी प्रकृती सुधारल्यावर २८–८–१७७१ रोजी माधवरावांनी नारायणरावांना उपदेश केला तो :[१३९] (१) बयाजीपंतावर कृपा करावी. (२) नाना फडणीसांशी बहुत सख्य असावे. (३) सौ. रमावहिनीशी बहुत सख्य करावे. (४) पुण्यकर्म बहुत करावे. (५) उदासीनता व क्रोध किंचित कार्यकारण धरावा. (६) इंद्रिय निग्रह करावा. (७) पुस्तकांचा बंदोबस्त करावा. (८) तीर्थरूपांची भेट झाल्यास बोलून कृपा संपादन करावी. (९) त्रिपदी पाठ करावी.

नारायणरावांना खुलासेवार समजावून देऊन सर्व कारभाऱ्यांनी कारभार चालवावा अशी माधवरावांनी आज्ञा काढली होती. नारायणरावांना अनुभव मिळावा, स्वतःचाही भार हलका व्हावा असा माधवरावांचा हेतू होता. मात्र नारायणरावांचे हातून कारभार रेटणार नाही असे माधवरावांचे ठाम मत होते.* पुढे माधवरावांचे उत्तरकार्य उरकून सर्व मंडळी २ डिसेंबर सन १७७२ रोजी पुण्याला आली. ३ डिसेंबरला पेशवाईची वस्त्रे आणण्यासाठी नारायणरावांनी प्रस्थान ठेवले.

---

* ' श्रीमंत माधवराव यांनी मरणापूर्वी एकांती श्रीमंत नारायणरावसाहेब यांस सांगितले होते की– जे काय करणे ते हरीपंत यांचे विचारे करीत जा तर काही दिवस वाचशील नाहीतर तुझ्या जीवास कठीण आहे.' — ' अधिकारयोग ' पृ. ९.

' " रावसाहेब याणी नारायणरावसाहेब यांस सांगितले की, दादासाहेब याहाचा आट तुमच्यानी निघनार नाही. माझा काही भरोसा नाही त्यास तुम्ही बाोर फौज देऊन हिंदुस्थानात पाठविले म्हणजे तुम्ही राजस्वस्थ (कराल) नाही तर चैन पडू देनार नाही. " — ' सनपुरीची बखर ' पृ. ३६ आ. स. १९५०.

साताऱ्याला वाटाघाटी होऊन १३ डिसेंबर, सन १७७२ रोजी, रविवारी (नंदननाम संवत्सर, मार्गशीर्ष वद्य ३, शके १६९४) रात्री (३ घटिका रात्रीस) नारायणरावांना पेशवाईची वस्त्रे मिळाली.[११८] या वेळी रघुनाथरावांना रिजंट नेमण्यात आले. सखारामबापू कारभारी व नाना-मोरोबा फडणीस झाले. पंढरपूर वगैरे यात्रा करून ३१ डिसेंबर रोजी नारायणराव पुण्यात दाखल झाले. नारायणराव व रघुनाथराव यांनी एक विचाराने चालायचे ठरवले पण लवकरच त्यांच्यात बेबनाव झाला. १७७३ साली, आरमारी सरदार कृष्णराव धुळुप यांनी फिरंग्यांचा पराभव केला. या मोहिमेखेरीज नारायणरावांच्या कारकीर्दीत विशेष घडामोडी झाल्या नाहीत.

नारायणरावांचा कारभार उच्छृंखल असे. माधवरावांच्या तापट स्वभावाचे अनुकरण करीत, पण माधवरावांची गुणग्राहकता, विवेकबुद्धी, त्यांचेजवळ नव्हती.* सखारामबापू व नाना फडणीस यांचेशीही नारायणरावांचे जमत नसे. नारायणरावांना पेशवाई मिळाल्यामुळे रघुनाथराव-आनंदीबाई मनातून नाराज होते. नारायणरावांचे मनातही रघुनाथरावांबद्दल संशय होता. त्यामुळे नारायणराव रघुनाथरावांकडे सल्ल्यासाठी जात तेव्हा रघुनाथराव दुर्लक्ष करीत. विकल्पामुळे चुलते–पुतण्यांतील द्वैतभाव वाढत गेला. त्यातच अविचारी लोकांच्या सल्ल्याची भर पडली. रघुनाथराव व आनंदीबाई आपल्या विरुद्ध मसलती करतात हे पाहून पूर्ण चौकशी न करताच त्यांना नारायणरावांनी ज्या पद्धतीने कैदेत टाकले, ते नाना फडणीस, सखारामबापू. यांसारख्या मुत्सद्द्यांनाही आवडले नाही.

याच सुमाराला चांद्रसेनीय कायस्थ परभुंचे एक सामाजिक प्रकरण उद्‌भवले. त्यात नारायणरावांनी परभुंच्या विरुद्ध निकाल देऊन अपमानास्पद अटी लादल्या. (१) वैदिक मंत्रे करून काहीच कर्मे करणार नाही. (२) वैदिक मंत्र येत असतील त्यांचा उच्चार करणार नाही. (३) भाताचे पिंड करणार नाही. (४) देवपूजादिक कर्मे पुराणोक्त मंत्र करूनच करू व ब्राह्मण भोजन आपले घरी करणार नाही, (५) शालीग्राम पूजा करणार नाही. (६) ज्या देवास शुद्र जातात त्या देवास जाऊ. (७) ब्राह्मणांना दंडवत मोठ्याने म्हणत जाऊ. (८) वैदिक ब्राह्मण व आचारी व पाणके व शागीर्द ब्राह्मण व ब्राह्मण बायका चाकरीला ठेवणार नाही. आपले घरीही ठेवणार नाही. (९) आमच्या ज्ञातीमध्ये संतोषे पाट लावतील त्यांना आम्ही अडथळा करणार नाही.

---

* नारायणरावांबद्दल सर्वसाधारण मत होते : " श्रीमंत (माधवराव) गेले यामुळे सर्वच फसल्यासारखे झाले आहे. वाघ गेला सारी कोल्ही राहीली आहेत."– ऐलेसं १२४३. या काळात ' द्यावे ' दादासाहेब करितात ' देणे ' नारायणरावसाहेब करितात अशी नोंद सापडते.

या कतव्यामुळे नारायणरावांवर नाराज होऊन परभू मुत्सद्दी रघुनाथरावांच्या पक्षाला मिळाले. त्यातच भर म्हणजे नारायणरावांनी गोपिकाबाईंच्या सल्ल्यावरून सखारामबापूंना कमी करून नाना फडणीसांकडे कारभार सोपवला. १४ मार्च ते १० एप्रिल सन १७७३ दरम्यान नारायणराव गोपिकाबाईना भेटायला गंगापूरला गेले असताना पुण्यात रघुनाथरावांनी हैदरअली व रोहिले यांच्याशी, पेशवापदाच्या प्राप्तीसाठी हातमिळवणी करून नजरकैदेतून पळून जाण्याचा प्रयत्न केला. हा कट उघडकीला येताच कैदेतील बंधने आणखी कडक झाली. रघुनाथराव- आनंदीबाई यांची खूपच आबाळ होऊ लागली. यातच नागपूरकर भोसले प्रकरणाची भर पडली.

जानोजी भोसल्यांनी आपला पुतण्या रघूजी (मुधोजीचा मुलगा) दत्तक घेण्याची इच्छा माधवरावांजवळ व्यक्त केली होती. त्याला माधवरावांनी मान्यताही दिली होती. साबाजी व मुधोजी भोसल्यांमध्ये या दत्तक प्रकरणावरून भाऊबंदकी सुरू झाली. मुधोजींचा पक्ष वरचढ होता. नारायणरावांनी साबाजींचा अभिमान धरून त्यांच्या कुमकेसाठी नागपूरला जायचे ठरवले. पेशव्यांची मसलत मोडण्यासाठी मुधोजींनी पुण्याला कारकून पाठवले. योगायोगाने हे कारकुन परभू होते. परिणामतः हे कारकून, रघुनाथरावांचे पक्षपाती, पुण्यातील परभू वगैरे असंतुष्ट लोकांनी एकत्र येऊन पुण्यातच एक कट रचला. रघुनाथरावांना नजरकैदेतून सोडवून पुण्याबाहेर न्यावे. फौज जमा करण्यासाठी त्यांना मदत करावी. फौज जमल्यावर पुण्याबाहेर धामधुम सुरू करावी. यामुळे पेशवे आपोआप पुण्यात गुंतून पडतील व त्यांची नागपूरची मसलत बारगळेल. नागपूरचे राजकारण मुधोजींच्या मर्जीनुसार सिद्धीस जाईल, असे या कटाचे स्वरूप होते.

व्यंकटराव व लक्ष्मणराव काशी, सखाराम हरी गुप्ते, यांसारखे मुत्सद्दी कटात सामील झाल्यावर मूळच्या मसलतीचे स्वरूप पालटले. नंतर जो कट ठरला तो ' मोठा कट. ' त्यात असे ठरले की, रघुनाथरावांना नजरकैदेतून मुक्त करावे. त्यांना पेशवाईच्या गादीवर बसवून नारायणरावांना कैदेत टाकावे. या कटात स्वतः रघुनाथराव, सखाराम बापू, चिंतो विठ्ठल रायरीकर, भवानराव प्रतिनिधी, ही मंडळी देखील सामील होती. पुढे नारायणरावांना मारण्याचाही कट शिजला. तो ' छोटा कट. ' दोन्ही कटांत असणारी मंडळी बहुशः निरनिराळी होती. गारद्यांशी हत्येबद्दल झालेल्या गुप्त करारात पाच लाख रु. रोख व तीन किल्ले किंवा किल्ल्यांखेरीज प्रत्येक किल्ल्याला १ लाख रु. प्रमाणे ३ लाख रु. द्यायचे ठरले होते.

याचे पर्यवसान नारायणरावांचा भर दिवसा शनिवारवाड्यात खून होण्यात झाले. ३० ऑगस्ट, सन १७७३ रोजी सोमवारी (विजयनाम संवत्सर, भाद्रपद शु. १३, शके १६९५) तिसरे प्रहरी (दुपारी) नारायणरावांचा खून झाला. मराठेशाहीच्या

इतिहासात खुद्द तख्तशीन राज्यकर्त्याचा, त्याच्याच राजवाड्यात, त्याच्याच कनिष्ठ प्रतीच्या लोकांनी केलेला हा पहिला व अखेरचा खून. त्रिंबकरावमामा पेठ्यांनी तेलंगी ब्राह्मणांच्या मदतीने नारायणरावांच्या शरीराचे भाग एकत्र करून त्याच रात्री त्यावर नडगेमोडीवर दहन संस्कार केले.* 'उत्तरकार्य खर्च एकूण पोतापैकी २२,०८४ रु. १३ आ. भूयसी दक्षिणा १४,३४० रु. एकूण ३६,४२४ रु. १३ आ. छ. ११ जमादिलाखर आर्बा सबैन मया व अलफ.[३३] ३०-८-१७७३'.

नारायणरावांनी पोक्त विचाराने चांगली माणसे हाताशी धरून कारभार केला असता तर यादवी माजून राज्य पोखरले गेले नसते. इंग्रजांनाही मराठेशाहीत ढवळाढवळ करता आली नसती.*

नारायणरावांच्या **पत्नी** : गंगाबाई यांचा विवाह २२ एप्रिल सन १७६३ रोजी शुक्रवारी (सुभानुनाम संवत्सर, वैशाख शु. ९, शके १६८५) त्रिंबकरावमामा पेठ्यांनी सिंहगडावर लावला.[१४०] यांचे गर्भादान १७ जुलै सन १७६९ रोजी झाले. नारायणरावांच्या हत्येच्या वेळी त्या सुमारे पावणेदोन महिन्यांच्या गरोदर होत्या. त्या गरोदर असल्याचे नारायणरावांच्या हत्येनंतर समजल्यामुळे रघुनाथरावांच्या पक्षाकडून त्यांना मारण्याचे प्रयत्न सुरू झाले.[१४१] यामुळे गंगाबाईंचे संरक्षण करणे हे 'बारभाईंचे' प्रमुख कर्तव्य होऊन बसले. वाटाघाटींनंतर सखारामबापूंनी नारो आप्पाजी तुळशीबागवाले यांच्या सहाय्याने, गंगाबाईंना माहेरी जाण्याच्या निमित्ताने शनिवारवाड्यातून बाहेर काढून लागोलाग पालखीत बसवून बंदोबस्ताने पुरंदर किल्ल्यावर पोहोचवले.

रघुनाथरावांच्या पदरी महादाजी सदाशिव गोडसे हा अत्यंत विश्वासू कारकून होता. 'बारभाईंनी' त्याला जमीन व रोख रक्कम देण्याचे मान्य करून त्याच्या बदल्यात गंगाबाईंना पुरंदर किल्ल्यावर पोहोचवण्याची कामगिरी सोपवली. करारा-प्रमाणे बिनधोक काम झाले. प्रथम साताऱ्याला न्यायचा विचार होता पण दूरचा पल्ला म्हणून पुरंदर नक्की ठरला.[१४२]

'२६-१-१७७४ गंगाबाई व पार्वतीबाई यांस लवकर वाड्याबाहेर काढून साताऱ्यास नेणार असे ऐकतो' आणि '३०-१-१७७४ आज सकाळी ६ वाजता गंगाबाई व पार्वतीबाई, यांच्यासह नाना फडणीस, हरीपंत वगैरे पुरंदरास निघून

---

* आजच्या लकडीपुलाजवळ मुठा नदीच्या दक्षिण काठावर पुलाच्या पूर्वेला, हल्ली-च्या संभाजी पोलीस चौकी पाठीमागे नदीच्या पात्रात हे स्थान येते.

* नारायणरावांच्या हत्येची बरीचशी माहिती देणारे पांडुरंग या कवीने लिहून २४ सप्टेंबर सन १८१८ ला पूर्ण केलेले एक काव्य 'इतिहाससंग्रहा'त (मार्च सन १९१०) उपलब्ध आहे.

गेले' अशा दोन नोंदी मॉस्टिन-डायरीत मिळतात.[१४३] सातारचा एक अधिकारी बाबुराव कृष्ण आपटे याला नाना फडणीस ३०-१-१७७४ च्या पत्रात गंगाबाईसह पुरंदरला पोहोचल्याचे कळवतात.[१४४] या नोंदींचा विचार करता, गंगाबाई ३० जानेवारीलाच पुरंदरला दाखल झाल्या. लोकांच्या समजुतीनुसार वसंत पंचमीला १८ जानेवारीला नाही. ती तारीख चूक आहे.

पुरंदरहून गंगाबाईंच्या नावे द्वाही फिरवून 'बारभाईंनी' कारभार सुरू केला. गंगाबाई धोरणी, दक्ष, समंजस, होत्या. स्वतः राजकारणात भाग घेत नसत. मुत्सद्द्यांच्या धोरणाने चालत. राज्यकारभाराविषयी गुप्त खलबते होत, तेव्हा हजर असत. प्रत्येक महत्त्वाच्या कामी कारभारी त्यांची अनुमती घेत. गंगाबाईंचे डोहाळेजेवण पुरंदर किल्ल्यावर झाले.[१४५] '१८-४-१७७४ श्रीमंत मातुश्री गंगाबाई यांसी डोव्हाळे जेवण करावयाविसी आज्ञा जाली होती तेव्हा राजश्री बापूस पुसिले तो त्याणि उत्तर केले. हा विध कोणीच येथे केला नाही. त्यानंतरी पार्वतीबाईंनी वरीच विध केला.'

गंगाबाई नवज्वराने १२ जुलै सन १७७७ रोजी शनिवारी (हेमलंबीनाम संवत्सर, आषाढ शु. ७ शके १६९९) पुण्यात माहेरी सकेशा स्थितीत वारल्या.[१४६] श्रीमंत नारायणरावांच्या हत्येच्या वेळी गरोदर असल्यामुळे त्यांचे केशवपन झाले नाही. त्यांनी मृत्यूच्या वेळी सखारामबापूंना सांगितले[१४७] की, 'नानांनी व तुम्ही मिलोन श्रीमंतांचे व दौलतीचे रक्षण करावे.' त्यांच्या उत्तरकार्याची नोंद:[१४५] 'छ ५ रज्जब आर्बा सबैन २२,०८४ रु. १३ आ. उत्तरकार्य १४,३४० भूयसी एकूण ३६,४२४ रु. १३ आ.' पिता कृष्णराव हरी साठे.

माधव नारायण : (९) इतिहासात 'सवाई माधवराव' या नावानेच विशेष परिचीत आहेत. यांचा जन्म पुरंदर किल्ल्यावर १८ एप्रिल, सन १७७४ रोजी बुधवारी (जयनाम संवत्सर, अधिक वैशाख शु. ७, शके १६९६) झाला.[१४८] गंगाबाईंना मुलगा व्हावा म्हणून अनेक देवतांना नवस बोलण्यात आले होते. ते नंतर फेडले. नवसांचा एकूण खर्च १,३४०४२ रु. झाला.[१४९] 'पुत्र उत्साह मातुश्री गंगाबाई यांस पुत्र जाहला सबब खर्च जाहला तो ७७१० रु. आर्बा सबैन मया व अलफ रबिलावल २२"[१५०] या वेळी सुईणपण केल्याबद्दल येसूबाई सोहोनी यांना सोन्याचे दागिने बक्षीस दिले.[१५१]

सवाई माधवरावांना वयाचे ४० वे दिवशी, २८ मे सन १७७४ रोजी शनिवारी (जयनाम संवत्सर, वैशाख वद्य ३ शके १७९६) पेशवाईची वस्त्रे देण्यात आली. त्यापूर्वी २९ एप्रिलला बारसे झाले असावे.[१५२] माधवरावांसाठी पेशवाईची वस्त्रे शिक्के, कट्यार, गंगाबाई गरोदर असतानाच पुरंदरला सुमुहूर्तावर आणून ठेवले होते.[१५३] सवाई माधवरावांचा चौलविधी (जावळ)

फाल्गुन शके १६९८ मध्ये झाला.[१५४] यांच्या बालपणी ते स्वतः, गंगाबाई, नाना फडणीस, सखारामबापू, यांना कैद करण्याचा कट रघुनाथरावांच्या पक्षातील मंडळींनी केला होता, तो फसला.

सवाई माधवराव सव्वातीन वर्षांचे असताना त्यांची आई वारली. नंतर त्यांचे पालनपोषण पार्वतीबाई, सगुणाबाई, नाना फडणीस, यांनी केले. नारायणरावांच्या हत्येनंतरचा पहिला मोठा गणेशोत्सव शनिवारवाड्यात २७ ऑगस्ट सन १७७८ रोजी बुधवारी थाटाने साजरा झाला. नवस केल्याप्रमाणे माधवरावांची मुंज २१ एप्रिल, सन १७७९ रोजी बुधवारी (विकारीनाम संवत्सर, वैशाख शु ५, शके १७०१) पर्वतीवर थाटाने[१५५] करण्यात आली. नंतर २६ एप्रिल रोजी माधवरावांनी सुमुहूर्तावर शनिवारवाड्यात प्रवेश केला. त्यांच्या शिक्षणाचा एक भाग म्हणून पौराणिक व ऐतिहासिक बखरी रचण्यात आल्या. भौगोलिक शिक्षण देण्यासाठी युरोपियन शिक्षक नेमण्यात आला. खेळ, मैदानी कसरती, व्यायाम, अश्वारोहण, युद्धनीती, राजनीती, शस्त्रविद्या, शिकवण्यासाठी नाना फडणीसांनी उत्तम व्यवस्था केली होती.

सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत पेशव्यांना दिल्लीच्या बादशहाकडून 'वकील–ई–मुतालिक' ही सनद मिळाली. महादाजी शिंद्यांनी बादशाही कबजात घेतली. बादशहाला दरमहा ६५००० रु. तनखा देण्याचे मान्य करून 'वकील–ई–मुतालिक' व 'मीरबक्षी' ह्या सनदा पेशव्यांच्या वतीने १७८४ साली मिळवल्या.[१५६] सनदा घेऊन महादाजी शिंदे १३ जानेवारी, सन १७९२ रोजी पुण्याजवळ वानवडी येथे दाखल झाले. त्या दिवशी संध्याकाळी सवाई माधवराव लवाजम्यासह महादाजींना गणेशखिंडीपर्यंत सामोरे गेले होते. सनदा पेशव्यांना २२ जून सन १७९२ रोजी शुक्रवारी पुण्याजवळ वानवडी येथे 'फर्मानवाडी'त समारंभाने अर्पण केल्या.[१५७]

रघुनाथराव पेशव्यांचे चिरंजीव दुसरे बाजीराव यांनी स्वतः जुन्नरला कैदेत असतानाही बळवंतराव नागनाथामार्फत सवाई माधवरावांशी गुप्तपत्रव्यवहार करून माधवरावांचे मनात आपल्या विषयी सहानुभूती निर्माण केली होती. यासंबंधी सर्व हकीगत नाना फडणीसांना समजताच त्यांनी बाजीरावांचा दुटप्पी स्वभाव व घरभेदीपणा न उमजून परिणामतः राज्याला घातक होईल असे संधान, न कळत का होईना बाजीरावांशी केल्याबद्दल सवाई माधवरावांची कडक शब्दांत हजेरी घेतली. पुढे इतर बाबतीतही नाना फडणीसांचे व सवाई माधवरावांचे जमेनासे झाले. या सर्व गोष्टींचा फार मनस्ताप होऊन माधवराव आजारी पडले. त्यांना नाना फडणीसांची सावधगिरीची भूमिका व दूरदृष्टी उमगली नाही. यातूनच पुढील अनर्थ ओढवला.

रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ६–६।। च्या सुमाराला वाताच्या झटक्यात (हिस्टेरिया) शनिवारवाड्यातील गणेश महालाच्या वरच्या मजल्यावरील स्वतःच्या दिवाणखान्याच्या सज्जातून (बाल्कनी) माधवराव तोल जाऊन खाली कारंजाच्या कठड्यावर पडले. उजव्या मांडीला मोठी जखम झाली. अस्थीभंग झाला. जबड्याच्या उजव्या बाजूला मार लागून दाताची कवळी बाहेर निघाली. नाकावाटे रक्त वाहू लागले, अपघाताची बातमी समजताच नाना फडणीसांनी तातडीने येऊन माधवरावांना आरसे महालात आणवले. वैद्य व हबीब (अस्थी तज्ञ) बोलावून तावडतोब उपचार केले. पण काहीही उपयोग न होऊन, मंगळवारी २७ ऑक्टोबर सन १७९५ रोजी संध्याकाळी ७ च्या सुमाराला (राक्षसनाम संवत्सर, अश्विन शु. १४ शके १७१७) माधवरावांचा [१५८] अपघाती अंत झाला.*

त्याचबरोबर नाना फडणीसांनी 'शर्थीने राज्य राखण्यासाठी' २३ वर्षे केलेले प्रयत्न वाया गेले. 'श्रीमंत आमरणांत बोलत होते. बोलून चालून राजश्री नानास सांगितले. 'आमची वेळ जवळ आली. आम्हास राज्याची इच्छा नाही. तुम्ही आमचे नावाचा दुसरा करणे. आपण सूर्यमंडळ भेद करून जातो. [१५९]

सवाई माधवरावांच्या मृत्यूबद्दल इंग्रज वकील युथाप म्हणतात : [१६०] "The death of the Peshwa in consequence of a fall from an upper appartment.' जास्त चौकशी केल्यानंतर युथाप म्हणतो : 'The Peshwa in a temporary fit of delirum or derrangement jumped or fell from an upper room or terrace into a fountain below.' 'सवाई माधवराावाने गणपतीचे दिवाणखान्याचे दुसऱ्या मजल्यावरून दक्षिणेकडे कारंजांचे हौदात उडी टाकली. [१६१]

हा दिवाणखाना पूर्व बुरुजाजवळ आहे, तर हजारी कारंजे पश्चिम भागात आहे यावरून सवाई माधवरावांनी उडी टाकली ती हजारी कारंजावर नव्हे, तर आठ कारंजाचे हौदावर. ६ जानेवारी १८०९ ला सवाई माधवरावांच्या अस्थी प्रयागला पाठवल्या.

इंग्रजांशी यशस्वी युद्ध व खर्ड्याच्या लढाईतील (सन १७९५) विजय, याच काय त्या यांच्या कारकीर्दीतील महत्त्वाच्या गोष्टी होत. यांच्या कारकीर्दीत सर्व

---

* सवाई माधवरावांचा मृत्यू कोणीतरी गृहस्थाने श्लोकबद्ध केला आहे : 'नगकुनगकुशाके प्राग्दले राक्षसाब्दे ऽ। शिवनिभयुतकुजाहे पौर्णिमाचाश्विनस्य। अखिल नरवर श्रीमाधवाख्यः प्रधानो। दिनमणिरिवचास्तं देवलोकं जगाम् ।।'— 'इतिहास-संग्रह', ऑगस्ट सन १९०९. सवाई माधवरावांची समाधी बांधल्याचा उल्लेख मिळत नाही.

कारभार नाना फडणीसच पाहात होते. या काळात मराठेशाहीचे वैभव व वर्चस्व थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीप्रमाणे पुन्हा दिसू लागले होते. सवाई माधवरावांचा स्वभाव थोडा तऱ्हेवाईक, कुढा, संतापी, होता असे म्हणतात. नारायणरावांच्या हत्येचा गरोदर अवस्थेतील गंगाबाईंवर मानसिक आघात झाला होता. वैद्यकशास्त्राधारे पाहिल्यास, त्या मानसिक ताणाचा, गर्भावस्थेतील माधवरावांवर विपरीत परिणाम झाला असावा.

पत्नी : (१) रमाबाई – विवाह १० फेब्रुवारी, सन १७८३ रोजी* सोमवारी (शुभकृतनाम संवत्सर, माघ, शु. ९ शके १७०४) पर्वतीवर मोठ्या थाटाने झाला. त्या निमित्ताने रचलेले ' रमास्वयंवर ' हे संस्कृत काव्य[१६२] आणि कुलदेवतांना केलेल्या आहेराची १५ जून, सन १७८२ ची यादी[१६३] उपलब्ध आहे. या विवाहानिमित्त पर्वती रमण्यात फेब्रुवारी, सन १७८३ मध्ये १०,०८२ ब्राह्मणांना एकूण २४,००० रु. दक्षिणा वाटली.[१६४]

रमाबाईंचे गर्भादान २१ ऑक्टोबर, सन १७८९ रोजी, बुधवारी झाले. त्या समारंभाला थोरले अलीबहाद्दरच्या परिवारातील मंडळी हजर होती. त्यांचे कारभारी दिनकर बल्लाळ गोरे ४ नोव्हेंबरच्या पत्रात म्हणतात :

" श्रीमंत सौावती रमाबाईसाहेब यांचे वोटभरण कार्तिक शु।। ३, बुधवारी जाले. श्रीमंत राजश्री दादासाहेब अहेर घेऊन गेले होते. समागमे मी होतो व श्रीमंत सौ. बेगमासाहेबास बोलाविले होते. वोटीचा सरंजाम आपले येथून नेला होता. तेथून मानाची लुगडी चोल्या यथा पधत दिल्ह्या.''[१६५]

१७९३ साली रमाबाई नवज्वरानी आजारी पडल्या. ' आपण आजारी असल्याचे तिने बाहेर कळूच दिले नव्हते. तिच्या शरीरी बहुत क्षीणता येऊन दुखणे विकोपाला गेले. तेव्हा उपायांची योजना सुरू झाली. '[१६६] रमाबाई ३१ जानेवारी, सन १७९३ रोजी गुरुवारी (परिधावीनाम संवत्सर, माघ वद्य ४, शके १७१४) माहेरी वारल्या. यांचे पिता केशव भैरव थत्ते नाईक, (टोकेकर).[१६७] **मुलगी** : नोव्हेंबर, सन १७९० मध्ये रमाबाई ४ महिन्यांच्या गरोदर असल्याचा उल्लेख ऐलेसं क्र. ३२४१ मध्ये मिळतो. यावरून या मुलीचा जन्म एप्रिल, सन १७९१ मध्ये झाला असावा. पण ती लवकरच वारली.

सवाई माधवराव - रमाबाई यांच्या अस्थी जानेवारी सन १८०९ मध्ये काशीला पाठवल्याची नोंद : '५०० रु. श्रीमंत माधवराव व सौ रमाबाईसो कैलासवासी जाहाली त्यांच्या अस्थी काशीस पाठवावयाकरिता शुद्धयर्थ खर्च जाहाले

---

* या विवाह - कार्याची सर्व व्यवस्था नाना फडणीसांनी कलमवार ठरवली होती. हा तपशील ' काव्येतिहास संग्रहा 'त ले ३९७ मध्ये उपलब्ध आहे.

छ १३ जिलकाद शके १७३०.'[१६७]

पत्नी : (२) यशोदाबाई यांचा विवाह ६ मार्च सन १७९३ रोजी, बुधवारी (परिधावीनाम संवत्सर, फाल्गुन वद्य ९ शके १७१४) झाला. (विवाह वर्णन : ऐलेसं ९ – पृ. ४५८९ – ९३).

विवाह निश्चय फाल्गुन वद्य ५ या दिवशी झाला. (ऐलेसं ३५०२) त्या दिवशी तीन मुली 'दाखवण्यासाठी' वाड्यात आणल्या होत्या. 'श्रीमंतांनी तिनी मुली रुबरु नेऊन पाहिल्या.' 'राजश्री नानांचे (नाना फडणीस) विचारास येईल तिचा निश्चय करावा याप्रमाणे (श्रीमंतांनी) आज्ञा केली.' त्यांपैकी 'राजश्री गणेश विश्वनाथ गोखले वस्ती हल्ली कुवेशी प्रांत राजापूर तालुका विजयदुर्ग यांची कन्या निश्चय केली.'

यांच्या ऋतुप्राप्तीपूर्वीच सवाई माधवराव मृत्यू पावले होते. या मध्यम बांध्याच्या सुंदर होत्या. स्थूल, उंच, किंवा ठेंगू नव्हत्या. चेहरा स्वच्छ असून देवीचे व्रण नव्हते. हातावरच्या हिरव्या रेषा दिसत असे यांचे वर्णन आढळते.

दुसऱ्या बाजीरावांनी, पेशवाई मिळाल्यावर यशोदाबाईंना कैदेत टाकले. धाकटचा चिमाजी आप्पांच्या पत्नी सीताबाई व बाजीरावांच्या तिसऱ्या पत्नी राधाबाई यांच्या मदतीने पण जबरदस्तीने यशोदाबाईंना पालखीत घालून पुरंदर किल्ल्यावर पोहोचवले.[१६९] ऑगस्ट, सन १८०१ मध्ये सर्व नोकरचाकर दूर करण्यात आले. सन १८०२ च्या प्रारंभी रायगड किल्ल्यावर सख्त कैदेत ठेवले. खासगत खर्चासांठी दरमहा ५–७ हजार रु. खर्च करण्यात येत. यांना दग्यानेही मारण्याचा प्रयत्न बाळाजी कुंजीर मार्फत सन १८०२ च्या नोव्हेंबर मध्ये झाला होता.

९ मार्च १८०३ रोजी पेशवे–इंग्रज यांच्यात झालेल्या करारातील यशोदाबाईबद्दलचे कलम: 'श्रीमंत मातुश्री यश्वदाबाईसाहेब यांस पेशजी गोपिकाबाई गंगापूरास राहून सत्काल घालविला त्याप्रो यांस येथे ठेऊन पेशजी बाईकडे सरंजाम वगैरे देवस्थानाकडे दानधर्म कन्यादानाबा चालत होता त्याप्रो चालवावा.'[१७०]

आपल्या आजारपणात मृत्यू जवळ आल्याचे जाणवल्यावर यशोदाबाईंनी, कारकुनाला बोलावून सांगितले की, 'धर्मशास्त्रानुसार गडावर मृत्यू येणे योग्य नव्हे. तेव्हा आपणास गडाखाली पाचाड गावी हलवावे' तथापि पेशव्यांच्या आज्ञेखेरीज काहीही करणे शक्य नव्हते. यानंतर ७–८ दिवस ताप येऊन त्या १४ जानेवारी, सन १८११ (प्रमोदनाम संवत्सर, पौष वद्य ५ शके १७३२) रोजी वारल्या. सोमवारी पहाट होण्यापूर्वी जगदीश्वराचे मंदिराजवळ अंत्यविधी झाला. हे वर्तमान कळल्यावर त्यांच्या आईने स्वतः रायगडला जाऊन इतरांच्या मदतीने

अस्थी पुण्याला आणवल्या. दु. बाजीरावांनी पुण्याहून भास्कर दीक्षित कर्व्यांना पाठवले होते. यशोदाबाईच्या तोतया प्रकरणात जे साक्षी पुरावे नोंदण्यात आले, त्यानुसार खऱ्या यशोदाबाईचे मृत्यूच्या वेळचे वय ३० वर्षे असावे.

पुण्याला ओंकारेश्वरजवळ अस्थी पुरण्यात आल्या. चिंतामण दीक्षित कर्वे यांनीं श्राद्धकर्म केले. काही समकालीन साक्षींप्रमाणे अस्थी–विसर्जन भीमा नदीत झाले. उत्तरकार्याची नोंद : [१७१] '२६–१–१८११ माधवरावसाहेब यांची स्त्री यश्वदाबाई पौष वद्य पंचमीम साल मजकुरी मृत्यू पावली यांचे उत्तरकार्याबद्दल खर्च जाहाले छ. ३० जिल्हेज ३०,००० रु.' यशोदाबाईंचे पिता गणेश विश्वनाथ गोखले, रा. विजयदुर्ग.

चिमणाजी माधव : (१०) दत्तक आले. जनक पिता रघुनाथराव पेशवे. यांचा जन्म ३० मार्च सन १७८४ रोजी, सोमवारी (क्रोधीनाम संवत्सर, चैत्र शु. ८/९ शके १७०६) बेट कोपरगाव येथे, आनंदीबाई कैदेत असताना तीन घटिका रात्री झाला. रघुनाथराव वारले त्या वेळी आनंदीबाई यांचे खेपेला गरोदर होत्या. यांचे बालपण आनंदवल्लीला कैदेत गेले. मुंज फेब्रु. – मार्च, सन १७८९ मध्ये कोपरगावला झाली.

सवाई माधवरावांच्या अनपेक्षित अपघाती मृत्यूनंतर थोरल्या नानासाहेबांचा कोणी वारस राहिला नाही. नाना फडणीस व इतर मुत्सद्यांच्या विचाराने रघुनाथरावांचा कनिष्ठ मुलगा चिमणाजी यालाच सवाई माधवरावांच्या पत्नी यशोदाबाई यांच्या मांडीवर दत्तक देण्याचा निर्णय झाला. नाना फडणीसांच्या सांगण्याप्रमाणे परशुरामभाऊ पटवर्धन जुन्नरला गेले. त्यांनी चिमणाजीला आपल्या हवाली करण्याबद्दल बोलणे लावले. ही सूचना बाजीरावांनी धुडकावून लावली.

बाजीराव दाद देत नाही असे पाहून बाजीरावाच्या अटी मान्य करून चिमणाजीसह त्याला पुण्याला आणवावे असे नाना फडणीसांनी परशुरामभाऊंना कळवले. नंतर परशुरामभाऊ बाजीराव व चिमणाजींसह ३ मार्च, सन १७९६ ला पुण्यात आले. खडकी मुक्कामी तळ देऊन राहिले. पुढे चिमणाजींच्या दत्तकविधानाची मसलत नक्की ठरून, परशुरामभाऊ रात्रीच्या वेळी चिमणाजींसह पुण्यात आले. १२ मे ला चिमणाजींनी समारंभपूर्वक शनिवारवाड्यात प्रवेश केला. दौलतराव शिंद्यांचे दिवाण बाळोबातात्या पागनीस यांनी चिमणाजींचे दत्तकविधान करवून, पेशव्यांच्या वतीने सर्व कारभार हातात घेतला. अशाप्रकारे १६ मे रोजी सोमवारी (अनलनाम संवत्सर, वैशाख शु. १०, शके १७१८) दत्तकविधान झाले. महादेव दीक्षित आपटे आणि यज्ञेश्वरशास्त्री द्रवीड यांनी शास्त्रार्थ सांगितला.[१७२] काही शास्त्री पंडितांनी अशास्त्रीय म्हणून दत्तकविधानाला विरोध केला.

'राजश्री चिमणाजी माधवराव यांस पेशवाईची वस्त्रे सातारियाहून आणली. २३-५-१७९६' साताऱ्याहून वस्त्रे त्रिंबकराव अमृतेश्वर पेठे यांनी आणली.[१७३] यानंतर गुरुवार, २६ मे, सन १७९६ रोजी (वैशाख वद्य ४, शके १७१८) आठ घटिका दिवस आल्यावर समारंभाने पेशवाईची वस्त्रे मिळाली. शिंद्यांच्या अनुज्ञेने बाबा फडके यांनी 'देवावे' करावे आणि परशुरामभाऊंनी 'घ्यावे' करावे असे ठरले.

वास्तविक नात्याचा विचार करता, चिमणाजी रघुनाथ हे यशोदाबाईंचे चुलत चुलत सासरे. धर्मशास्त्रात न बसणारे हे दत्तकविधान करण्यामागे निव्वळ राजकीय सोय होती हे उघड आहे. नाना फडणीस आणि परशुरामभाऊ पटवर्धन यांना या द्राविडी प्राणायामाची गरज का भासली याचे विवेचन[१७४] खरेशास्त्रींनी केले आहे :–

'हे दत्तकविधान बोलून चालून राजकीय स्वरूपाचे होते. चिमाजी माधवराव यांच्या जागी बाजीराव माधवराव यांचे दत्तकविधान करता आले असते तर तेही नानास नकोसे होते असे नाही. बाजीराव रघुनाथ अगर चिमाजी रघुनाथ यांनी आपल्या जन्मसिद्ध हक्काने स्वतंत्रपणे पेशवाईचे धनी होणे मात्र त्यास अनिष्ट होते. याचे कारण असे की माधवराव नारायण यांच्या कारकीर्दीत त्यांच्या नावावर सावकाराकडून कोटयवधी रुपये नानांनी कर्ज काढले होते व पेशव्यांच्या नावे सनदा लिहून पुष्कळांना जहागिऱ्या, तैनाता, इनामे वगैरे दिली होती. एकट्या परशुरामभाऊंचेच म्हैसूर वगैरे स्वाऱ्यांसंबंधी पेशव्यांकडे चाळीस लक्ष रुपये कर्ज तुंबले होते. पेशवाईच्या गादीवर बाजीराव रघुनाथ स्वयंसिद्ध हक्काने बसले तर ते मागच्या पेशव्यांच्या वेळी झालेला कारभार आपण कांही एक जाणत नाही असे म्हणणार व पुढे पेशवाई मिळाल्यावर बाजीरावसाहेबांनी तसे म्हटलेही !!! तेच बाजीराव अगर चिमाजीआप्पा माधवरावांचे पुत्र या नात्याने गादीवर बसल्यास माधवरावांनी जे जे केले ते ते सर्व कबूल करण्यावाचून यांस सुटकाच नव्हती. यशोदाबाईच्या मांडीवर चिमाजीआप्पास देण्यात असा हा राजकीय हेतू होता. चिमाजीआप्पाचे सरकारी कागदोपत्री मात्र 'चिमणाजी माधवराव' असे नाव लागायचे होते. एरवी खासगी व्यवहारात राघोबांचे पुत्र म्हणवून घेण्यास व आपल्या आईबापांचे श्राद्धपक्ष करण्यास त्यास कोणचीच हरकत नव्हती.'

दत्तकविधानानंतर थोड्याच दिवसांत ज्योतिषशास्त्रदृष्ट्या चिमाजीआप्पांच्या राशीत 'पंचग्रही' चा कुयोग फलज्योतिषांना समजला. पापग्रहांच्या परिहारार्थ एक हत्ती व पाच हजार रुपये दक्षिणा साहित्यासह दान केले. पुढे 'महाडच्या कारस्थानानुसार' नाना फडणीसांनी शिंद्यांमार्फत बाळोबातात्या पागनीसांना २६ ऑक्टोबर, सन १७९६ ला कैद करवले. दुसऱ्याच दिवशी, चिमाजीआप्पा व परशुरामभाऊ पटवर्धन स्वसंरक्षणार्थ पळून जात असताना जुन्नरच्या किल्ल्यात

नारोपंत चक्रदेवांच्या कैदेत पडले. चक्रदेवांनी चिमाजीआप्पांना पुण्यात भांबुर्ड्याला आणून ठेवले. पुढे पुण्याजवळ मुंढवे मुक्कामी बाजीराव, अमृतराव व चिमाजीआप्पा यांची कार्तिक वद्य ७, शके १७१८ रोजी सोमवारी भेट झाली. नाना फडणीसही येऊन भेटले.[१७५]

यानंतर दौलतराव शिंद्यांच्या जिम्मेदारीने ४ डिसेंबर सन १७९६ पासून बाजीरावांची दुसरी कारकीर्द सुरू झाली. बाजीरावांनी प्रथम शास्त्रीपंडितांची सभा घेऊन त्यांच्याकडून चिमाजीआप्पांचे दत्तकविधान रद्द करवले.[१७६] बाजीरावांनी अहमदाबाद सुभा चिमाजींचे नावे करून त्याची मामलत आपल्या विश्वासातील केसो कृष्ण यांना सांगितली. पण पुढे राजकारणाचे वावटळीत ही योजना सोडून द्यावी लागली.

सन १८०२–०३ पर्यन्त बाजीरावांची चिमाजीआप्पांवर मर्जी साधारण बरी राहिली. आपले नेहमी लक्ष असावे या अंतस्थ हेतूने बाजीराव चिमाजीआप्पांना बरोबर घेत. १८०२ सालच्या वसईच्या तहानंतर बाजीरावांच्या मनात चिमाजी-आप्पांविषयी नेहमी संशयच राहिला. त्यापूर्वी चिमाजीआप्पाही बाजीरावांना योग्य मान देत. परशुरामभाऊंचे फडणीस बाबा काळे चिमाजीआप्पांबद्दल[१७७] म्हणतात : चिमाजीआप्पाही पाहिले, गोरे फार आहेत. चपळ व बुद्धिमान आहेत. परंतु येथे क्रोध काही जाजती आहेसा भासतो. तथापि श्रीमंत बाजीरावसाहेब यांची मर्जी बहुत राखतात.'

वसईच्या तहापूर्वी कोकणातून मुंबईला जाण्यासाठी बाजीरावांनी ब्रिटिश जहाजातून प्रयाण करण्यापूर्वी बरोबरच असलेल्या चिमाजीआप्पांनी (वय १८ वर्षे) बाजीरावांना कळकळीने सांगितलं होतं :

" स्वकियांची कैद पुरवली कारण आपली मानखंडना झाली तर ती स्वकियांकडून होईल. आपले शीर धडावेगळे होण्याची वेळ आली तरी ते स्वकियां-कडून होईल. त्यात आपणास भूषण नसले तरी दूषण खास नाही. पण टोपीकरांच्या कृपाछत्राखालील सिंहासन आपणास नको. "

बाजीरावांचे कारकीर्दीत चिमाजीआप्पांना अधिकार तर नव्हताच, उलट शनिवारवाड्याच्या एका खोलीत सामान्य कैद्याप्रमाणे रहावे लागे. चिमाजीआप्पांची नेमणूक वाढावी यासाठी त्यांचे सासरे मोरोपंत दामले यांनी काही खटपट केली असावी. त्यांना कैदही झाली होती. या काळात चिमाजीआप्पांच्या दैनंदिन गरजां-चीही आबाळ होई. किमान खर्चासाठीही पैसा वेळेवर मिळत नसे. बाजीरावांचे रंगढंग पाहून त्यांना चीड येई. उभयतांत खूप खडाजंगी होई. चिमाजीआप्पा बाजीरावांहून समंजस व धीम्या स्वभावाचे होते. अंगी विशेष कर्तबगारी मात्र

नव्हती. त्यांच्याभोवती नेहमी बाजीरावांचे हेर व बातमीदार असत. सरकारी अधिकाऱ्यांकडूनही त्यांना विशेष मान दिला जात नसे. पुढे बहुतेक सण व श्राद्ध-पक्षही दोन्ही भावांकडून वेगवेगळे होऊ लागले. दत्तकविधान रद्द झाल्यावरही चिमाजीआप्पा थोरल्या नानासाहेबांचा पक्ष करीत.[१७८]

अनेक कारणांवरून दोन भावांत नेहमी कुरबुरी चालू असत. फारच आबाळ होऊ लागली तेव्हा चिमाजीआप्पांनी निकरावर येऊन नेमणूक तोडून मागितली. ही गोष्ट बाजीरावांनी नाकारली. त्याविरुद्ध चिमाजीआप्पांनी उपोषण सुरू केले. इंग्रज रेसिडेन्टकडे दिनचर्या लिहून ठेवण्यासाठी पेशव्यांनी बयाजी नाईक नेमला होता, त्याच्या मार्फत नाईलाजाने आपली दुर्दशा रेसिडेन्ट एलफिन्स्टनच्या कानावर घातली. ही नेहमीचीच पद्धत होती.

१७ नोव्हेंबरला एलफिन्स्टन, बाजीराव, चिमाजीआप्पा यांची बैठक झाली. 'पेशवाईच्या कारभारात ढवळाढवळ करण्याची इच्छा नाही. स्वतंत्र राहण्यासाठी पुरेशी नेमणूक मिळावी म्हणजे झाले, असे चिमाजीआप्पांनी स्पष्ट सांगितले.

एलफिन्स्टनने मध्यस्थी करून चिमाजीआप्पांना सन १८०६ च्या मार्गशीर्षात (बहुधा डिसेंबर) दोन लाख रु. सालिना नेमणूक देवविली.* ही नेमणूक चिमाजी-आप्पांच्या पश्चातही त्यांच्या मंडळींना चालू रहावी म्हणून बाजीरावांनी २० लाख रु. इंग्रज सरकारच्या हवाली केले. ही रक्कम मात्र इंग्रजांनी हडपली.[१७९] या नेम-णुकीची रक्कम पोहोचल्याबद्दल बाजीराव लेखी पावत्या घेत असत.

एलफिन्स्टनने बाजीरावांशी सविस्तर बोलून मध्यस्थी केली. यानंतर उभयता बंधूंत थोडासा सलोखा व दळणवळण सुरू झाले. यानंतर लौकिकात तरी बाजीराव चिमाजीआप्पांचे मानपान व्यवस्थित संभाळत. दरबारी कामातून चिमाजीआप्पांनी पूर्वीच लक्ष काढून घेतले होते. पेशवाई अखेरच्या धावपळीत पांढरकवड्याच्या ठाण्यावर इंग्रजांचा छापा पडला. बाजीराव उत्तरेकडे जात असताना बोरी गावात असताना इतर सरदारांसह बाजीरावांच्या अनुज्ञेने चिमाजीआप्पाही थकलेल्या अवस्थेत देशावर आले आणि कॅप्टन डेव्हीस यांचे स्वाधीन झाले. काही दिवसांनी पुण्याला येऊन एलफिन्स्टनना भेटले. एलफिन्स्टनने त्यांना सन १८१८ चा ज्येष्ठ महिना संपेपर्यंत (मे–जून) फुलशहरला रहायला सांगितले. पुढे ४ महिने कोकणात राहण्याची आज्ञा झाली, तेव्हा वसईला राहिले. नंतर पुण्याला येऊन आपली व्यवस्था करवून घेऊन, मराठेशाही खालसा झाल्यावर, इंग्रजांच्या अनु-मतीने जानेवारी सन १८१९ मध्ये चिमाजीआप्पा वाराणसीला जाऊन राहिले. तेथे

* 'श्रीमंत चिमणाजी रघुनाथ जुन्या वाड्यांत (शनिवारवाडा) आहेत. शके १७२८. खर्चाची नेमणूक जाली आहे.' – 'कासंपया' ले. ४९७ पृ. ५०३.

आसी घाटावर मोठा वाडा बांधून राहात असत.* त्यांनी गंगेवर दोबुरजी घाटही बांधला.

चिमाजीआप्पा वाराणसीतच महामारीने बुधवारी ३० मे, सन १८३२ रोजी (नंदननाम संवत्सर, ज्येष्ठ शु. १ शके १७५४) वारले. सरदेसाईंच्या रियासतीत व इतर काही पुस्तकांत मृत्यूची तारीख ९ जून सन १८३० ही दिली आहे. त्याचा आधार ज्येष्ठ वद्य ३० शके १७५२ हा दिवस (रा. खंड ४) असावा. परंतु चिमाजीआप्पांच्या द्वितीय पत्नी कावेरीबाई यांनी चिमाजीआप्पांच्या मृत्यूनंतर मुंबईच्या गव्हर्नरला १९-९-१८३३ रोजी पाठवलेल्या अर्जात मृत्यूची तारीख ३० मे सन १८३२ हीच दिली आहे.[८०] दुसरे असे की, तत्कालीन 'दर्पण' वृत्तपत्रात २० जुलै सन १८३२ च्या अंकात चिमाजीआप्पा वारल्यानंतर त्यांच्या मृत्यूची बातमी छापली होती. त्यात चिमाजीआप्पांच्या मृत्यूचा दिवस २९ मे सन १८३२ (वैशाख वद्य ३०) हा दिला आहे. कला-तिथीच्या हिशोबामुळे त्यात एक दिवसाचा फरक पडला असावा इतकेच. यावरून ९-६-१८३० ही तारीख निराधार ठरते.

पत्नी : (१) सीताबाई (हे सासरचे नाव) या लग्नाच्या तीन तारखा १६ मे, सन १७९७ (पेअ. पृ. २६), ८ जून सन १७९८ (ऐलेसं ४२३९, ४२४१ ४२४५), १८ जून १७९७ (भावश), अशा आढळतात. मात्र दत्तकविधान रद्द करवल्यानंतरच विवाह* पार पडला. सीताबाई रोजच्या रिवाजाप्रमाणे ओंकारेश्वराच्या देवळात वाती लावण्यासाठी संध्याकाळी गेल्या असताना, तुपाने बरबटलेले ताम्हण हातातून निसटून अंगावर पडले व पेटत्या निरांजनाने लुगडे पेटून त्याच दिवशी म्हणजे २६ फेब्रुवारी सन १८०९ रोजी रविवारी (विभवनाम संवत्सर, फाल्गुन शु. ११, शके १७३०) सीताबाई वारल्या.[८१] पिता मोरोपंत आप्पाजी दामले.

पत्नी : (२) कावेरीबाई. यांचे लग्न एलफिन्स्टनच्या विद्यमाने ठरले. लग्न कोपरगावला २० मे, सन १८१२ रोजी बुधवारी रात्री २ वाजता (अंगिरानाम संवत्सर, वैशाख शु. १०, शके १७३४) झाले.[८२] चिमाजीआप्पांबरोबरच या वाराणसीला गेल्या. पतीच्या पश्चात् कावेरीबाई व त्यांची ९ वर्षाची मुलगी द्वारकाबाई व बराच मोठा परिवार होता. चिमाजी आप्पांनंतर त्यांचे पेन्शन आणि मालमत्ताही इंग्रज सरकारने जप्त केली. चिमणीआप्पांनी ७-८ लाखाची मालमत्ता

---

* हल्ली वाराणसी रेल्वे स्टेशन ज्या ठिकाणी आहे त्याचे बरोबर समोर काही अंतरावर चिमाजीआप्पांचा एक वाडा होता.

* विवाहाचे निमंत्रणपत्र ज्येष्ठ वद्य १, शके १७१९ चे (दि. १०-६-१७९७) उपलब्ध (कासंपया ले ४६४) आहे.

मागे ठेवली होती. कावेरीबाईंनी जप्त केलेली मालमत्ता परत मिळावी म्हणून खूप प्रयत्न केले पण दाद लागली नाही.

अखेरीस अत्यंत निराशेने त्या वाराणसी कायमची सोडून चित्रकूटला विनायकराव पेशव्यांकडे गेल्या. बरोबर मुलगी व जावईही गेले. कावेरीबाई चित्रकूटला १० मे सन १८३६ रोजी मंगळवारी (दुर्मुखनाम संवत्सर, वैशाख वद्य १० शके १७५८) वारल्या.[१८२] त्यांचे पिता महादाजीपंत जोशी.

मुलगी : द्वारकाबाई. यांचे सासरचे नाव सरस्वतीबाई. चिमाजीआप्पांच्या मृत्यूच्या वेळी या ९ वर्षांच्या होत्या, यावरून त्यांचा जन्म १८२३ सालचा असावा. मालमत्ता परत मिळत नाही हे पाहून कावेरीबाईंनी जवळचे जवाहीर वगैरे विकून मुलीचे लग्न वाराणसीला सोमवार, ३ जून सन १८३३ रोजी (विजयनाम संवत्सर, ज्येष्ठ वद्य १ शके १७५५) थाटाने करून दिले. द्वारकाबाईंचे मृत्यूनंतर त्यांच्या पतीचे दुसरे लग्न बाजीरावांनीच ज्येष्ठ वद्य १०, शके १७६७ रोजी (२९ जून सन १८४५) करून दिले. द्वारकाबाईंचा मुलगा चिमणाजी थत्ते याची मुंजही बाजीरावांनीच केली.[११] द्वारकाबाईंच्या विवाहपत्रिका कावेरीबाईंच्या नावाने छापल्या होत्या. सातारकर छत्रपतींना निमंत्रण पाठवले होते.[११] द्वारकाबाईंचे पती गणेश रघुनाथ थत्ते **पत्नी** : (३) सत्यभामाबाई पिता गोविंद बल्लाळ मेहेंदळे रा. मंगळवेढे.

नारायण चिमणाजी : (११) आई कावेरीबाई. बहीण द्वारकाबाईपेक्षा वयाने लहान होता. हा तान्हेपणीच वारला.[११]

रामचंद्र बाजीराव : (७) याचा जन्म सन १७३२ मध्ये झाला असे दिसते. याच्याबद्दल दोन नोंदी पुढीलप्रमाणे मिळतात[१८३] : (१) सलास सलासीन मया व अलफ छ १० रबिलाखर खर्च पोतापैकी कारकून खासा राजश्री .... पंत चिरंजीव रामचंद्रपंताचे बारशास खर्च ७० रु. १० आ. ता बहिरंभट उपाध्ये (२) सलास सलासीन छ १६ रबिलाखर, भाद्रपद वद्य ३, रविवार खर्च ३ रु. ४॥। आ. रामचंद्रपंतास ताईत केला त्यास सोने[११] 'मोडक जंत्री'नुसार यांच्या तारखा अनुक्रमे सोमवार दि. २१–८–१७३२ आणि रविवार दि. २७-८–१७३२ येतात. हा १७३३ साली वारला.

पुत्र बाजीराव : (७) याचे नाव समजले नाही म्हणून 'पुत्र' उल्लेख केला. 'दि. १३–३–१७३३ यानंतर चि.सौ. कासीबाईस फालगुण बहुल द्वादसीसह त्रयोदसी मंदवासर संध्याकालचा सात घटिका दिवस आला तत्समयी प्रसूत जाली पुत्र जाला.' या पत्राला 'पत्रात उल्लेखलेल्या बाजीरावाचे पुत्राचा जन्म ३–३–१७३३ रोजी झाला. हा मुलगा लहानपणी वारला असावा' अशी तळटीप आहे.[१८४]

पेशवे शाखा - धाकटी पाती

रघुनाथ बाजीराव : (७) यांचा जन्म माहुली येथे १ ऑगस्ट, सन १७३४ रोजी गुरुवारी (आनंदनाम संवत्सर, श्रावण शु. १३ शके १६५६) झाला. राघोभरारी, राघोबा, दादासाहेब या नावांनी हे इतिहासात प्रसिद्ध आहेत. यांच्यामुळे पेशवाईला जे तणाव सहन करावे लागले त्यामुळे यांना रियासतकार सरदेसाई 'पेशवाईतील कलीपुरुष' म्हणतात. ते परप्रकाशी कलीपुरुष होते असं म्हणणं जास्त योग्य ठरेल. रघुनाथरावांची मुंज सोमवारी ४ फेब्रुवारी, सन १७४० रोजी (माघ वद्य ३ शके १६६१) नानासाहेब पेशव्यांनी लावली. हे लहानपणापासून बराच काळ साताऱ्याला होते. यांनी पूर्वायुष्यात उत्तरेकडील राजकारण बरेच गाजवले.

रघुनाथराव प्रथम नोव्हेंबर सन १७५० मध्ये उत्तरेकडे गेले होते. पुढें २० डिसेंबर, सन १७५२ ते जून सन १७५३ पर्यंत गुजराथमधील गोहदच्या स्वारीवर गेले होते. उत्तर हिंदुस्थानातील पहिल्या स्वारीवर ३० ऑगस्ट, सन १७५३ ते ऑक्टोबर सन १७५५ च्या दरम्यान गेले होते. जाटांविरुद्ध सन १७५४ च्या युद्धात त्यांनी कुंभेरीच्या किल्ल्याला वेढा घातला. विजय दृष्टिपथात आला, तोच जाटांशी तह केला. उत्तरेकडील दुसऱ्या स्वारीत यांनी गाजवलेले शौर्य केवळ अतुलनीय होते. या स्वारीवर रघुनाथराव नोव्हेंबर, सन १७५६ ते ऑक्टोबर, सन १७५८ च्या दरम्यान गेले होते. याच स्वारीत जानेवारी सन १७५८ मध्ये कुंजपुरा जिंकले. लाहोर, अटक काबीज करून हिंदुस्थानची पश्चिम सरहद्द निर्वेध केली. अहमदशाह अब्दालीच्या फौजांना हिंदुस्थानाबाहेर पिटाळून दिल्ली काबीज केली. मथुरा, वृंदावन, गया, कुरुक्षेत्र, वगैरे पवित्र तीर्थक्षेत्रे मुसलमानांचे अमलातून सोडवली. मोगल बादशहा अहमदशाहाला कैदेत टाकून अझिझुद्दिनला (दुसरा अलमगीर) बादशाह केले. सन १७५९-६० च्या निजामविरुद्धच्या उद्‌गीरच्या मोहिमेतही यांनी मोठा पराक्रम गाजवला होता. रघुनाथराव लढाईचे वेळी, त्यांना ब्रह्मेंद्रस्वामींनी दिलेले प्रासादिक* सोन्याचे कमळ दंडावर 'निर्विघ्न' म्हणून बांधत असत.

अंगी मोठे शौर्य, धडाडी असूनही मुत्सद्देगिरी व चोख हिशोबीपणा यांच्या अभावामुळे रघुनाथरावांच्या बहुतेक मोहिमा आतबट्ट्याच्या होत. रघुनाथरावांच्या कार्यपद्धतीबद्दल सखारामबापू म्हणतात[२], 'रघुनाथरावाचा कारभार सुस्त, लटका व वोढा' याच मुद्यांवरून रघुनाथराव व सदाशिवरावभाऊ यांच्यात भर दरबारातही खटके उडत. थोरल्या नानासाहेबांच्या मृत्यूनंतर (सन १७६१) मात्र रघुनाथरावांना पेशवाईच्या मसनदीचा लोभ सुटून रघुनाथराव- थो. माधवराव यांच्यात बेबनाव

---

* ब्रह्मेंद्रस्वामी पेशव्यास निरनिराळे पोषाक पाठवित असत. प्रासादिक समजून लढाईच्यावेळी पेशवे ते परिधान करीत असत. - 'ब्रस्वाच' पृ. १०९

सुरू झाला. परिणामतः पेशवाईला विघातक वळण लागले. २२ ऑगस्ट सन १७६२– दादाची '५ किले व दहा लक्षांची जागीर स्वदेशी देणे' ही मागणी थोरल्या माधवरावांनी मान्य केली नाही.[३] याच रघुनाथरावांनी एका स्वारीचा खर्च भागवण्यासाठी चक्क हिंदूंचेच धर्मक्षेत्र पैठण लुटले.

थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीत सुरुवातीला जरी रघुनाथराव ज्येष्ठ सल्लागार म्हणून राज्यकारभार पहात असले, तरी त्यांच्या अकार्यक्षम कार्यपद्धतीमुळे माधवरावांना लवकरच कारभार आपल्या हातात घ्यावा लागला. यामुळे नाराज होऊन रघुनाथरावांनी निजामाशी हातमिळवणी केली.

सन १७६३ च्या निजामाविरुद्धच्या मोहिमेत औरंगाबादेजवळ निजामाचा तळ असताना सरदार रामचंद्रराव जाधवांतर्फे एका मारेकऱ्याने रघुनाथरावांवर ६ मार्च, सन १७६३ ला खुनी हल्ला केला, पण सुदैवाने रघुनाथराव बचावले. यानंतर जानेवारी, सन १७६६ ते जून सन १७६६ च्या उत्तरेकडील मोहिमेत त्यांनी फारसे यश मिळवले नाहीच, उलट २५ लाखांचे कर्ज आणि अहिल्याबाई होळकर यांची अडवणूक करून अपकीर्ती मिळविली. आनंदवल्ली येथे (ऑक्टोबर–दसरा) १७६७ साली माधवराव–रघुनाथराव यांचे दरम्यान झालेल्या तहानुसार माधवरावांनी त्यांच्या २५ लाख कर्जाचा हवाला घेतला. स्वतंत्र जहागीर मान्य केली.[४] रघुनाथरावांनी काही महिन्यांतच तह धुडकावून पेशव्यांविरुद्ध युद्धाची तयारी केली. १५ हजार फौज जमा करून नागपूरकर भोसले, निजाम, मुंबईकर इंग्रज, बडोद्याचे दमाजी गायकवाड, यांचेबरोबर रघुनाथरावांनी पेशव्यांविरुद्ध खलबते सुरू केली. यानंतर मात्र माधवरावांनी आपली सर्व फौज जमवून घोडपेच्या युद्धात रघुनाथरावांच्या फौजेचा पार धुव्वा उडवला. खुद्द रघुनाथरावांना, घोडपेच्या किल्ल्याला सख्त वेढा घालून, नाकेबंदी करून कैद केले आणि शनिवारवाड्यात नजरकैदेत ठेवले. ही मोहीम जून सन १७६८ मध्ये झाली.

नजरकैदेत असताना झालेल्या वाटाघाटींमध्ये रघुनाथरावांनी एक किल्ला व पाच लाख रु. तैनात मागितली. माधवरावांनी हे नाकारून रघुनाथरावांना नाशिक परगण्यात स्वतंत्र जहागीर तोडून घेण्याबद्दल राजी केले. नाशिकच्या पश्चिमेला तीन मैलावरील 'चावंडस' गावी रघुनाथराव वाडा बांधून राहू लागले. सन १७६४ मध्ये त्यांना खर्चासाठी ५ लाख ६३ हजार वसुलाचे महाल तोडून दिले होते, त्यात १७७१ साली १० हजार रु. महालाची भर घातली. रघुनाथरावांचा लवाजमा, आश्रित, नाटकशाळा, नोकर यांची संख्या मोठी असे. यांच्या पदरी मुस्ताफा[५] नावाचा हकीम असून त्याला दरमहा २५० रु. पगार होता.

थो. माधवरावांच्या ऐन आजारपणात हे शनिवारवाड्यात कैदेतच असत. अनेक सरदारांच्या निग्रहाच्या विनंतीवरून, ते देखील रघुनाथरावांनी, कट कार-

स्थाने, अनुष्ठाने, राजकारण, फितुरी, किंवा राज्याला घातक असे काहीही करणार नाही असे लिहून दिल्यावरच त्यांची १९ मार्च, सन १७७२ रोजी नजरकैदेतून मुक्तता झाली.

'अमृतरावाला सात लाख रु. जहागीर द्यावी. त्याचा राज्यावर काही अधिकार रहाणार नाही, असे मी लिहून देतो. मला १२ लाख रु. जहागीर मान्य करावी. मी देखील राज्यात हिस्सा मागणार नाही.' अशा आशयाचा करार रघुनाथरावांनी यावेळीं लिहून दिला, पण कालांतराने धुडकावून लावला. 'माधवरावांचा अंतकाल जवळ आला आहे असे पाहून सन १७७२ च्या दसऱ्याला (६ ऑक्टोबर) सर्वांच्या काळजीग्रस्त मनस्थितीतील काहीशा गाफिलपणाचा गैरफायदा घेऊन रघुनाथराव बंडाव्याच्या इराद्याने पुण्यातून निसटून तुळापूरपर्यंत गेले. परंतु लगेच पकडले गेले. माधवरावांच्या कारकीर्दीत रघुनाथरावांची नजरकैद सामान्यतः नाममात्रच असे. राजकीय उलाढाली, कटकारस्थाने करायची नाहीत, एवढीच बंधने असत. व्यक्तिगत व्यवहारांना मज्जाव नसे.

नारायणरावांच्या कारकीर्दीत हैदरअली व रोहिले यांचे पेशवाई खिळखिळी करण्याचे प्रयत्न चाललेच होते. रघुनाथरावांनी या परकीयांची मदत मिळवण्याची खटपट केली. हा कट उघडकीला येताच रघुनाथरावांवरील बंधने आणखी कडक झाली. सौ. रमाबाईंनीही सती जाण्यापूर्वी रघुनाथरावांना विनंती केली होती, 'सर्वांचे वडीलपणे यथास्थित चालवावे' परंतु ते सर्व निष्फळ ठरले.

नारायणरावांच्या हत्येनंतर दोनच दिवसांनी रघुनाथरावांची वागणूक कशी होती, हे ऐति. ले. संग्रहातील (क्र. १२५७) २-९-१७७३ च्या पत्रावरून स्पष्ट समजते. त्यावरून नारायणरावांच्या हत्येला त्यांची सहानुभूती असावी हा संशय बळावतो. तो मजकूर असा –

'(दादासाहेब) सदरेस जाऊन बसले. तमाम चोपदारांस वगैरे यांस बोलावू पाठवून बंदोबस्त करू लागले. सुतक नाही. नित्य नमस्कार सूर्यास घालितात. 'वैरियाचे सुतक कशास ?' म्हणतात. गोवध देखील वाड्यात जाला. दोघी कुणबीणी मेल्या, बालहत्या, ब्राह्मण हत्या, गोहत्या, स्त्री हत्या, सारेच जाले."

यानंतर रघुनाथरावांनी पुण्यात स्वतःच्या नावाची द्वाही फिरवली. 'थो. माधवराव व नारायणराव पेशवापदावर फार काळ राहू शकले नाहीत, कारण वस्त्रे देणारा सातारकर छत्रपती अपेशी आहे' म्हणून रघुनाथरावांनी रामराजांकडून वस्त्रे स्वीकारून स्वतः पेशवापदावर यायला नकार दिला. दत्तक अमृतरावांना पेशवा करावे असा त्यांचा विचार होता. या मसलतीला आनंदीबाईंनी विरोध केला. बऱ्याच विचारविनिमयानंतर पेशवापद स्वीकारायला रघुनाथराव राजी झाले.[१]

अखेर १० ऑक्टोबर, सन १७७३ रोजी वस्त्रे मिळाली. परंतु रघुनाथरावांनी स्वतः साताऱ्याला न जाता ९ वर्षांच्या अमृतरावांना पाठवून आपल्या नावाची वस्त्रे आणवली. आळेगावला साध्या समारंभाने ३१ ऑक्टोबरला स्वतः वस्त्रे धारण केली. नारायणरावांच्या मृत्यूनंतर ज्येष्ठ मुत्सद्यांनी रघुनाथरावांच्या अधिकार लालसेला शह देण्यासाठी व राज्याच्या हितसंरक्षणासाठी आघाडी स्थापन करण्याचा निर्णय घेतला. हेच 'बारभाईंचे कारस्थान.' बारभाई म्हणजे १२ लोक असा मात्र अर्थ नाही. '२८ फेब्रुवारी सन १७७४ ला रघुनाथ बाजीराव याजकडील पेशवाई दूर केली' अशा छत्रपतींच्या आज्ञापत्राचा उल्लेख 'पेठे-दप्तरा'त (भाग २) आहे.

बारभाई मंडळींच्या हालचाली जानेवारी सन १७७४ पासून सुरू झाल्या. रघुनाथरावांचे सैन्य व बारभाईंचे सैन्य यांच्यातील पहिली लढाई पंढरपूरजवळ कासेगाव येथे २६ मार्च सन १७७४ रोजी झाली. त्यानंतर रघुनाथराव नर्मदा उतरून खानदेशात गेले. शिंदे, होळकरांचे न ऐकता इंग्रजांच्या मदतीची आशा धरून खांबायतला गेले. तेथे थारा मिळेना मग पायीच भावनगर, धंदुका मार्गाने घोघो बंदरी दाखल झाले. यावेळी इंग्रजांनी स्वतःच्या स्वार्थासाठी रघुनाथरावांना आपल्या जहाजातून ऐषारामाने सुरतेला आणले.

६ मार्च, सन १७७५ ला रघुनाथरावांनी इंग्रजांशी सुरतेचा तह केला त्यानुसार ठाणे, वसई, साष्टी, हा प्रदेश इंग्रजांकडे आला. त्याच्या मोबदल्यात इग्रजांनी रघुनाथरावांना पेशवाई मिळवून द्यावी असे ठरले. फौजेच्या खर्चासाठी रघुनाथरावांनी सहा लाख रु. किंमतीचे दागिने इंग्रजांकडे गहाण टाकले. २२ मार्च, सन १७७५ ला रघुनाथरावांना खंबायतला पोहोचवण्यात आले. पुढे इंग्रजांनी त्यांची व्यवस्था सुरतेला महंमदी बागेत केली.[१०] या काळात इंग्रजांना युद्ध नको होते म्हणून इंग्रज-पेशवे यांच्यात २९ फेब्रुवारी, सन १७७६ ला 'पुरंदरचा तह' झाला. या तहानुसार रघुनाथरावांनी स्वस्थ बसायचे कबूल केले होते. आता इंग्रजांनी रघुनाथ-रावांचा पक्ष उघडपणे सोडला. व त्यांना सालीना ३ लाख १५ हजार रु. नेमणूक पत्करून गंगाकाठी स्वस्थ रहायला सांगितले.

रघुनाथराव बारभाईंच्या धास्तीने सुरत सोडायला तयार झाले नाहीत. मग इंग्रजांनीही दुर्लक्ष केले व फक्त २०० स्वारांनिशी सुरतेला ठेवून घेतले. ३१ मार्च, सन १७७६ ला रघुनाथराव सुरतेचा फिरंगी वखारकार जेरोनिमु रिबेरु नेव्हिस याच्या मार्फत दमणकरांशी संधान बांधून दमणला पोर्तुगीजांच्या आश्रयाला आले. तेथून त्यांनी गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नरशी 'आश्रयासाठी' बोलणे सुरू केले. दरम्यान या घडामोडी बारभाईंना समजल्यामुळे पेशव्यांच्या जरबेने पोर्तुगीजांनी रघुनाथरावांना, दमणच्या किल्ल्यात काही अटींवर राहू देण्याखेरीज इतर काहीही सहाय्य द्यायला नकार दिला. मग रघुनाथराव निराश मनाने तारापूरमार्गे मुंबईला येऊन राहिले.

सदाशिवरावभाऊंच्या तोतयाप्रमाणे आपणही पकडले जाऊ म्हणून रघुनाथ-राव इंग्रजांच्या आश्रयाला गेले. मुंबईचा राहता वाडा हल्लीच्या वरळीला होता.* तेथील दिनक्रमही पुण्याप्रमाणेच देवधर्मात बुडालेला असे. 'दादाचा हा वाडा थोडया वर्षापूर्वी इंप्रुव्हमेंन्ट ट्रस्टने पाडला असे समजते.'[११] 'राघोबादादाने मुंबईत मलबार हिलवर एक उंच इमारत बांधली आणि या इमारतीत तो सन १७७६ साली राहात होता. पण ही इमारत केव्हाच नष्ट झाली[१२] – जेम्स डग्लस.'★ रघुनाथराव दोन वर्षे मुंबईच्या बाहेर पडले नाहीत. या वास्तव्यात त्यांनी घारापुरीच्या लेण्यांबद्दल विशेष उत्सुकता दाखवली नाही.[१३]

या काळात इंग्रज त्यांना दरमहा १५ हजार रु. मदत देत असत. रघुनाथ-रावांचे पुण्यातील कारस्थानही (पहा : नाना फडणीस चरित्र) चांगले जुळत आले होते. सरतेशेवटी नाना फडणीसांनी मुत्सद्देगिरीने हे कारस्थान फोडले. १७७९ सालच्या तळेगावच्या लढाईत इंग्रजांचा पूर्ण पराभव होऊन, रघुनाथराव शिंद्यांच्या स्वाधीन झाले. याच वेळी 'वडगावचा तह' झाला. या तहाने रघुनाथरावांचा पेशवाईचा अधिकार कायमचा संपला. शिंद्यांच्या स्वाधीन झाल्यानंतर त्यांनी झाशीला राहाण्याचे कबूल केले. शिंदे–होळकरांच्या बंदोबस्तात झाशीला जात असताना चोळीमहेश्वर जवळ फौजेला हुलकावणी देऊन रघुनाथराव निसटले.[१४] पश्चिम खानदेश मार्गाने गुजराथेत जाऊन त्यांनी इंग्रजांच्या सहाय्याने सुरतेत तळ ठोकला.

तळेगावच्या पराभवाचे शल्य त्यांच्या मनातून गेले नाही. आपण सुचवलेले डावपेच इंग्रजांनी लढवले नाहीत म्हणूनच पराभव झाला अशा समजुतीने त्यांनी इतःपर हिंदुस्थानातील इंग्रजांशी संबंध न ठेवता थेट इंग्लंडच्या राजाकडून फौज मागवून पुण्यावर स्वारी करावी या हेतूने ब्राह्मण हणमंतराव व दुसरा मणियार पारशी या दोघांना १९–९–८१ ला इंग्लंडला रवाना केले. याचा उल्लेख सर एडमंड बर्क यांच्या पत्रव्यवहारात आहे. इंग्लंडमध्ये या वकिलांची उत्तम बडदास्त

---

* आताच्या वरळीच्या समुद्रकिनाऱ्यानजीक समुद्राभिमुख असा हा वाडा होता. समुद्रसान्निध्यामुळे दैनिक पूजाअर्चा वगैरे सुखेनैव पार पडत असे. पूर्वी वरळी, खंबाला हिल, मलबार हिल, ह्या सर्व परिसराचे नाव 'मलबार हिल' आढळते. स्वतंत्र नावे नंतरच्या काळात रूढ झाली.

★ " His (Bajee Rao) father Ruganath Rao, built a lofty tower on Malbar Hill in which he lived in 1776 When Poona was too hot for him. But it has long since disappeared. " — 'Book of Bombay', P. 358-9, Ed. 1883.

ठेवून बर्कने रघुनाथरावांना [15] * लिहिले : 'इंग्लंडच्या राजाकडून तुम्हाला स्वतंत्र फौजेची मदत मिळणे शक्य नाही.' दरम्यान, सुरतेला असताना रघुनाथरावांनी एका नागर ब्राह्मणाची मुलगी पळवली. त्यावरून मनस्ताप होऊन तिच्या आई-बापांनी जीव दिला. याबद्दल इंग्रजांनी रघुनाथरावांचा कडक निषेध करून त्यांना राहत्या वाड्याबाहेर जायला बंदी केली. [16]

रघुनाथराव आपले भाग्य इंग्रजांच्या हाती देऊन सुरतेत चार वर्षे स्वस्थ राहिले. मात्र इंगजांच्या मदतीने त्यांनी आपल्या कारवाया चालूच ठेवल्या. तेव्हा मात्र हैदरअली व फ्रेंच यांच्या सहाय्याने पेशव्यांनी इंग्रजांना पक्का शह देण्याची तयारी केली. ते पाहून इंग्रजांनी माघार घेतली व ते तहाला तयार झाले. महादाजी शिंद्यांच्या मार्फत, ग्वाल्हेरपासून २० मैलांवर सालबाई येथे १७ मे, सन १७८२ ला इंग्रज व मराठे यांच्यात तह झाला. यामुळे रघुनाथरावांना जवळ जवळ ७–८ वर्षे इंग्रजांनी दिलेला आधार कायमचा तुटला. रघुनाथराव पूर्णपणे एकाकी पडले.

सन १७७९ पासून त्यांची प्रकृती खंगत चालली होती. बुद्धीला भ्रम झाला. अशा अवस्थेत ते सुरत सोडायला तयार नव्हते. अखेरीस नाना फडणीस व हरीपंत फडके यांनी २१ मे सन १७८३ ला इंग्रजांशी, रघुनाथरावांना पेशव्यांच्या स्वाधीन करण्याविषयी करार केला. [17] त्यानुसार रघुनाथरावांना पेशव्यांच्या स्वाधीन व्हावेच लागले. नंतर गोदावरीच्या तीरावर कोपरगाव हे ठिकाण पसंत करून रघुनाथरावांना तेथे परिवारासह जुलै १७८३ पासून सामान्य कैद्याप्रमाणे बंदीवासात रहावे लागले. या काळात नारायणरावांच्या हत्येबद्दल स्पष्ट कबूली देऊन त्यांनी धर्मशास्त्रानुसार प्रायश्चित घेण्याचे मान्य केले. नाशिक, पंचवटी, कोपरगाव, कचेश्वरचे शिष्ट ब्राह्मण व काही मातबर आसामी यांनी एकत्र येऊन प्रदीर्घ विचारविनिमयानंतर प्रायश्चित्त-विधीचा मसुदा तयार केला. नंतर गोदावरी–वारणा संगमावरील सांगवी या गावी ४ ऑगस्ट, सन १७८३ रोजी, सोमवारी (शोभननाम संवत्सर, श्रावण शु. ६, शके १७०५) रघुनाथरावांनी प्रसन्न चित्ताने संकल्प सोडला व सक्षौर प्रायश्चित घेतले.

प्रायश्चित घ्यायला दोन महत्त्वाची कारणे घडली : (१) कोपरगावच्या एकाकी अवस्थेत नारायणरावांच्या हत्येबद्दल त्यांना मानसिक टोचणी लागली. प्रकृती खालावत चालल्यामुळे आपण फार दिवस जगत नाही हे उमगले. मृत्यूपूर्वी, थोरल्या वहिनींची गोपिकाबाईंची– एकदा तरी भेट घ्यावी असे त्यांना वाटले. या

* "I am Sorry, Sir to inform you that I can give you no sort of hope of your ever obtaining the assistance of the troops you require."– Correspondence of Ed. Burk, Vol 3. P. 6, by Filts Williams.

संदर्भात, हरीपंत फडके गंगापूरला गेले असताना गोपिकाबाईंनी त्यांना सांगितले,[१८] 'यास अनुताप जाहला नाही मी दर्शन घेत नाही यास लोकलज्जा तेव्हा पश्चात्ताप काही नाही लबाडी आहे याची प्रकृती मजला ठावूक आहे माझ्या पोटातील दुःख गेले नाही. दादाचे दर्शन त्याचा सहवास अति दुःखप्रद आहे. आहे त्याप्रो प्रायश्चित्त घेऊन एकटा येईल तर दर्शन होईल." ३० जुलैला (१७८३) हरीपंतांना लिहिलेल्या पत्रात त्या म्हणतात : (इतिहास संग्रह नोव्हेंबर १९०८ पृ. ३२)

"दादा आमचे बंदीस होता तेव्हा तो आमचे मुलाबाळास चांगले पहात होता की काय ? तसे तो येथे मुले माणसेसुद्धा येणार, त्याजकडे मी वाईट डोळयांनीच पाहीन." (२) आनंदीबाईनी देखील प्रायश्चित्त घेऊन जाऊबाईंची खातरजमा करण्यास सांगितले.

प्रायश्चित्त घेतल्यानंतर काही दिवसांनी उभयतांची गंगापूरला भेट झाली. मुलाखतीचे वेळी इतर कोणीही हजर नव्हते. मुलाखतीचे तपशील उपलब्ध नाहीत. ही मुलाखत झाल्यानंतर रघुनाथराव कचेश्वर गावी राहू लागले. तेथेच नोव्हेंबरमध्ये प्रकृती खालावली. आणि ११ डिसेंबर, सन १७८३ रोजी, गुरुवारी (शोभननाम संवत्सर, मार्गशीर्ष वद्य ३, शके १७०५) सहा घटिका[१९] रात्री वारले. कचेश्वरला गोदावरीच्या पलीकडे शुक्लेश्वर आणि विष्णु अशी दोन मंदिरे आहेत. त्याजवळच रघुनाथरावांचा भव्य वाडा होता. त्यातच त्यांचे निधन झाले. पुढे वाडा उद्ध्वस्त झाला. जमिनीचा लिलाव झाला. वाडयाचे घोटीव दगड विकण्यात आले. ते ज्यांनी विकत घेतले त्यांचे कसेही भले झाले नाही अशी आख्यायिका आहे.[२०]

मृत्यूपूर्वी रघुनाथरावांनी कचेश्वरजवळ हिंगणी येथे, ज्या जागी गोदावरी दक्षिणवाहिनी होते तेथे, एका जंगी वाडयाची उभारणी सुरू केली होती. परंतु स्वतःच आजारी पडल्यामुळे हे काम आपल्या हयातीत पुरे होत नाही, तर निदान आपली राख तिथे पडावी या हेतूने आपला अंत्यविधी त्या वाडयाच्या जागी व्हावा अशी इच्छा दर्शवल्यामुळे तेथे रघुनाथरावांचे दहन केले. त्या ठिकाणी सांबाची स्थापना करण्यात आली. वाडयाचे बांधकाम अपुरेच राहिले. त्याला 'तीन भिंतीचा वाडा' असे म्हणतात. पुढे बाजीराव किंवा अन्य कोणीही त्या जागेची वास्तपुस्त घेतली नाही.[२१]

'मृत्यूचे वर्तमान पुण्यात तिसरे दिवसी समजल्यानंतर उत्तरकार्याकरिता नाना फडणीस याणी लाख रुपये रोख पाठविले. दहा दिवसपर्यंत कृत्य अमृतराव याणी केले नंतर सपिंडी बाजीराव याणी केली.' पुण्याच्या कारभाऱ्यांनी रघुनाथरावांच्या अस्थी काशीला पाठवायची परवानगीही नाकारली होती.[२२] मार्च सन १७७५ ते मे सन १७८३ दरम्यान रघुनाथराव इंग्रजांच्या आश्रयाला होते. या

मुदतीत बारभाईंचे हाती प्रत्यक्ष दोनदा सापडले. दोनदा सापडण्याचे बेतात असता निसटून गेले.[२३]

रघुनाथरावांमुळे तत्कालीन इंग्रज सरकारला सात वर्षे जो जबरदस्त खर्च सोसावा लागला, (तैनात खर्च वगैरे) तो भरून काढण्यासाठी ' रघुनाथपट्टी ' नावाचा स्वतंत्र कर सरकारतर्फे बसवण्यात आला. सुरतेबाहेर रघुनाथरावांचा वाडा मात्र होता. त्यांनी थोरले माधवरावांच्या कारकीर्दीच्या प्रारंभी अग्निहोत्र घेतले होते. त्यांची वृत्ती, " अवशीस बोलणे एक आणि पहाटेस बोलणे एक ' अशी असे.[२४]

नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूनंतर मोठा अधिकार हातात येऊनही जबाबदारी समर्थपणे पेलण्याची कुवत रघुनाथरावांचे अंगी नव्हती. पुणेकर ब्राह्मण रघुनाथरावांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात :[२५] ' तुम्ही महाराज भोळे राजाई तुम्हास कळेना तीन पिढ्या दौलत मिलविली ती तुम्ही क्षयास नेली. ' श्री. वि. का. राजवाडे म्हणतात :

" दादाने संस्थान द्रोह केला त्याबद्दल त्याचे करावे तसे शासन न करिता कीड तशीच राहू दिली. या किडीच्या आश्रयाने अनेक सरदारांना राज्याचे विरुद्ध वागण्यास अवसर मिळाला. ही कीड नाहीशी केली असती तर सरदारांची फुटीची भावना जमीनदोस्त झाली असती.[२६] "

रघुनाथरावांच्या गैरमुत्सद्दी, चंचल संशयी स्वभावामुळे इंग्रजांना मराठेशाहीत शिरकाव करण्याची संधी आपोआप मिळाली. यामुळेच उत्तर पेशवाईचा इतिहास संकट – परंपरांनी व रघुनाथरावांच्या अपकृत्यांनी भरलेला आढळून येतो.

पत्नी : (१) जानकीबाई. विवाह २५ फेब्रुवारी, सन १७४२ रोजी, गुरुवारी (दुर्मतिनाम संवत्सर, फाल्गुन शु. २, शके १६६३) झाला.[२३] गर्भादानाची नोंद :[२७] " १५–१०–१७५० छ २४ जिल्काद इहिदे खमसैन जमा आहेर गर्भादान सौ. जानकीबाई राजश्री रघुनाथपंत दादा " पिता गणेशपंत बर्वे रा. जालगाव[२८] या बाळंतपणानंतर लगेचच वारल्या. मृ. शुक्रवार, २२ ऑगस्ट, सन १७५५ (युवानाम संवत्सर, श्रावण वद्य १, शके १६७७), **पत्नी** : (२) आनंदीबाई, जन्म ऑक्टोबर (आश्विन) सन १७४७[३०] ह्या रूपाने अगदी आकर्षक, सुंदर, गोऱ्यापान, स्वभावाने करारी, महत्त्वाकांक्षी, कर्तबगार पण अहंकारी व धूर्त होत्या. पेशवे कुलाच्या इभ्रतीची यांना फार काळजी असे.

माहेरच्या ' ओक ' घराण्याचाही फार अभिमान असे. ' वोकांची ल्येक मी वोक प्रखर म्लान व दनी नव्हत माझा जन्म स्वभाव असा ' असे त्यांनी एका प्रसंगी उद्गार काढले होते.[३१] जडजवाहीर व दागिन्यांची त्यांना फार हौस (खरे

म्हणजे सोस) असे. 'पतीच्या दुर्गुणांमुळे तिच्या गुणांची माती झाली' असे बहुतेक इतिहासकारांचे मत होते. नारायणराव पेशव्यांच्या खुनाबद्दल इतिहासात आनंदीबाई विरुद्ध सुस्पष्ट पुरावा उपलब्ध नाही. तो बखरींवर आधारीत आहे.*

आनंदीबाईचे वडील नानासाहेब पेशव्यांच्या पदरी कारकून-शिलेदार होते. रघुनाथरावांच्या वागण्या - बोलण्याला पुरून उरेल अशी ही चुणचुणीत मुलगी पाहून नानासाहेबांनी रघुनाथरावांसाठी नियोजित केली. हे लग्न १७ डिसेंबर, सन १७५५ रोजी बुधवारी (युवानाम संवत्सर, मार्गशीर्ष शु. १४, शके १६७७) गलगले या म्हैसूर राज्याच्या सीमेवरील गावी, लष्करी छावणीत झाले. लग्न खर्च रोख रु. ३७,५७१ आणि कापडखर्च रु. २३,०७५ मिळून एकूण खर्च ६०,६४६ रु. झाला.[१२] थोरल्या माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतरच्या काळात यांचे नाव फार गाजले.

मार्च सन १७७७ ते सन १७७९ च्या उन्हाळ्यापर्यंत या मंडालेश्वर येथे बारभाईंच्या कैदेत होत्या. त्या उन्हाळ्यात त्यांना रघुनाथरावांकडे बुऱ्हाणपूरला पोचविले. तेथून त्या रघुनाथरावांसह सुरतेला गेल्या. जुलै सन १७८३ ते ऑक्टोबर सन १७९२ पर्यंत या कोपरगावला परिवारासह नजर कैदेत होत्या. आनंदीबाईंच्या कोपरगावच्या वाड्याला 'विटाळशीचा वाडा' म्हणत. अस्पर्श स्थितीत असताना त्या वाड्याच्या दुसऱ्या मजल्यावरील खोलीत रहात.[१३] कोपरगावी त्यांना सालिना दोन लाख रु. नेमणूक होती.[१४] रघुनाथरावांच्या मृत्यूनंतर यांनी नाटकशाळा व लेकावळ्यांसह सर्व परिवाराचा योग्य परामर्श घेतला.

ऑक्टोबर, सन १७९२ मध्ये त्यांची सपरिवार रवानगी आनंदवल्लीला करण्यात आली. तेथेच आनंदीबाई सकेशा स्थितीत २७ मार्च १७९४ रोजी, गुरुवारी (प्रमादिनाम संवत्सर, फाल्गुन वद्य ११ शके १७१५) पहाटे सूर्योदयापूर्वी वारल्या. रघुनाथरावांनी अग्निहोत्र घेतल्यामुळे त्यानुसार सर्व विधी होऊन प्रत्यक्ष अग्निसंस्कार दिवस बराच वर आल्यावर पूर्ण झाले. अंत्यविधी दुसऱ्या बाजीरावांनी केले. अस्थी १८०० साली राघोपंत गोडबोल्यांबरोबर काशीला पाठवल्या. तोपर्यंत अस्थी टोक्याला परशरामपंत धर्माधिकारी यांच्याकडे होत्या.[१५]

आनंदीबाईंचे पिता रघुनाथ महादेव ओक. मूळगाव मळण (जि. रत्नागिरी) व्य. कारकून-शिलेदार, सावकार.

मुली : (१) दुर्गाबाई ऊर्फ गोदुबाई, जन्म ११ डिसेंबर, सन १७६५ यांचा विवाह नारायणराव पेशव्यांनी ७ फेब्रुवारी १७७३ रोजी, रविवारी (नंदननाम संवत्सर, माघी पौर्णिमा, शके १६९४) मोठ्या थाटाने लावून दिला.[१६]

---

* सविस्तर माहितीसाठी 'दुर्दैवी आनंदीबाई पेशवे' – प्रमोद ओक, आ. स. १९८८ हे पुस्तक पहा.

दुर्गाबाई ही नारायणरावांची विशेष लाडकी बहीण होती. थो. माधवरावांचे निधन होऊन थोडेच दिवस झाले आहेत तेव्हा दुर्गाबाईचा विवाह आणखी काही दिवसांनी करावा असे नारायणरावांचे मत होते. परंतु बहुमतापुढे त्यांचे मत मागे पडले. या विवाहाची आमंत्रणे नारायणरावांनी जातीने घरोघर जाऊन दिली होती. मोरोबा पटवर्धन (ऐलेसं १२४६) पत्रात लिहितात, "नारायणराव खासाच आमंत्रणास ५०/७५ घरास पायउतार गेले होते."

पार्वतीबाईंचे सशास्त्र केशवपन झाल्याखेरीज हा विवाह होणार नाही असे त्यापूर्वी वादंग निर्माण झाले होते. परंतु सर्वांनी थोडे पडते घेतल्यामुळे विवाह सुरळीत पार पडला. दुर्गाबाईंना नारायणराव पेशव्यांच्या खुनाबद्दलची आपल्या आईवडिलांची भूमिका पसंत नसल्यामुळे त्यांची दुर्गाबाईंनी निर्भत्सना केली होती असे म्हणतात. खुनाचे वेळी त्यांचे वय ७॥ वर्षे होते. इतक्या लहान वयात हे राजकारण समजण्याची त्यांची कुवत असेल का ? ही शंका आहे.

यांना नाना फडणीसांनी पुरंदर किल्ल्यावर, सवाई माधवरावांच्या जन्माच्या वेळी मुद्दाम ठेवले होते हे मात्र खरे आहे. यानंतर यांची रघुनाथराव आनंदीबाईशी अखेरपर्यन्त भेट झाली नाही. या डिसेंबर सन १७८३ पूर्वी केव्हातरी वारल्या. पती पांडुरंग बाबूजी नाईक जोशी, रा. बारामती (२) यांचा जन्म १० ऑक्टोबर, सन १७६९ रोजी (विरोधीनाम संवत्सर, आश्विन शु. १०, शके १६९१) झाला.[१७] बालमृत्यू झाला. फेब्रु. सन १७६९ मध्ये नागपूरकर भोसले चालून येणार अशी आवई उठली होती. त्या वेळी गरोदरपणामुळेच आनंदीबाई, सुरक्षिततेसाठी पुरंदरला जायला सांगितले असताही गेल्या नाहीत.

पत्नी : (३) मथुराबाई. रघुनाथराव दुसऱ्यांदा सुरतेला आल्यानंतर (सन १७७९) हा विवाह सुरतेला मुहंमदी बागेत झाला.[२१] या देवीच्या विकाराने सुरतेला ५ जून सन १७८० रोजी, सोमवारी (शार्वरीनाम संवत्सर, ज्येष्ठ शु. ३ शके १७०२) वारल्या. पिता भिकाजीपंत गणेश पेंडसे. मूळगाव केळशी.

पुत्र रघुनाथ : (८) याचे नाव समजले नाही म्हणून पुत्र असा उल्लेख केला आहे. आई जानकीबाई, यांच्या जन्माची नोंद, "श्रावण शुद्ध ९, मंदवारी, राजश्री राघोबादादा, श्रीमंतांचे भाऊ याची स्त्री प्रसुत जाली. कन्या जाली. ती संध्याकाळी वारली.' या नोंदीतील 'कन्या' हा उल्लेख चूक असून हा मुलगा होता. 'मोडकजंत्री 'नुसार जन्मदिवस येतो : शनिवार, १६ ऑगस्ट, सन १७५५, श्रावण शुद्ध ९, शके १६७७ युवानाम संवत्सर.

नारायणराव पेशव्यांचा जन्म याच वेळी ११ ऑगस्टला झाला होता. म्हणून रघुनाथराव नारायणरावांना पुत्रवत मानत ही वस्तुस्थिती आहे. असे असताना

नारायणरावांची हत्या का व्हावी ? अशी शंका उद्भवणे सहाजिक आहे. याचे उत्तर राजकारणाचे रंग एवढेच देता येईल.

भास्कर रघुनाथ : (८) यांचा जन्म २६ फेब्रुवारी, सन १७६२ रोजी शुक्रवारी, (वृषनाम संवत्सर, फाल्गुन शु. २, शके १६८३) वडगावच्या वाड्यात झाला.[३६] २७ मार्चला बारसे झाले. 'चित्रभान सवसरे श्रीमंत रा। रघुनाथपंत दादा यांचे पुत्राचे बारसे वडगाव नेबरज येथे जाले. सुध द्वितियेस नाव भास्करराव ठेविले आसे '[३८] यांचा लहान वयात खूप सत्कार झाला. सन १७६२ अखेरच्या आळेगावच्या युद्धानंतर रघुनाथरावांनी, भवानराव प्रतिनिधींना दूर करून भास्करला छत्रपतींचे प्रतिनिधीपद देऊन (दि. १३-१२-१७६२) सरदार राजेबहाद्दर नारो शंकर यांना भास्करचे मुतालिक नेमले. भास्कर त्रिंबकेश्वर येथे देवीच्या विकाराने ६ मार्च, सन १७६३ रोजी, रविवारी (चित्रभानुनाम संवत्सर, फाल्गुन वद्य ७ शके १६८४)[३९] वारला. 'विविध ज्ञानविस्तार' मासिकाच्या जून सन १९३१ च्या अंकात भास्करची 'सवाई तुलसीदास' (पुनर्जन्म ?) नावाने अगदी अविश्वसनीय माहिती दिली आहे.

विनायक रघुनाथ : (८) याचा जन्म १५ ऑगस्ट सन १७६४ रोजी गुरुवारी 'चावंडस' येथे झाला.[४०] (तारणनाम संवत्सर, श्रावण वद्य ५ शके १६८६) यांच्या जन्माप्रीत्यर्थ 'चावंडस'चे नाव बदलून 'आनंदवल्ली' केले. याचे काही महिन्यांचे वय असताना, आनंदवल्ली येथेच स्वतः रघुनाथराव याला हातावर खेळवत असताना हातातून निसटून एखाद्या चेंडूप्रमाणे खाली दगडावर पडून अपघाती मरण पावला. (कासंपया पत्र ४९६१ पृ. ५४१).

अमृतराव रघुनाथ : (८) दत्तक आले. जनक पिता गोविंद नारायण भुस्कुटे* (गाडगीळ). पहिले दोन्ही मुलगे लहानपणी वारले. तिसऱ्या खेपेला (सन १७६५) मुलगी झाली. यामुळे वंश चालवण्यासाठी रघुनाथरावांनी, भुस्कुटे या सगोत्र घराण्यातला एक ३॥ वर्षांचा मुलगा १९ एप्रिल, सन १७६८ रोजी (सर्व जितनाम संवत्सर, वैशाख शु. ३ शके १६९०) नाशिक मुक्कामी विधिपूर्वक दत्तक घेतला. नाव अमृतराव ठेवले. हेच अमृतराव पेशवे.

दत्तकविधानाच्या वेळचे अमृतरावांचे वय पहाता, त्यांचा जन्म ऑक्टोबर, सन १७६४ मधील असावा. अमृतरावांच्या बालपणातील दोन नोंदी : 'आमृतराव पहिल्याने घेतले तेव्हा प्रथम घेताच निराले तेज दिसो लागले. पुढेहि माधवराव देखील द्वेष करीत परंतु यांचे दैव चांगले दैववान आहेत.'[४१] 'चिरंजीव घेतला आहे त्याचा व्रतबंध करणार होते, वद्य दशमीस तो राहिला चिरंजीव घेतल्याची साखर

---

* हे भुस्कुटे वसईजवळच्या पापडी गावचे– 'ज्ञानकोश' खंड १९ पृ. १७

वस्त्रे येथे आली होती ती याणी माघारी लावली '[४२] कालांतराने रघुनाथरावांना बाजीराव व चिमणाजी हे दोन मुलगे झाल्यामुळे, अमृतरावांचा पेशवाईच्या गादीवर हक्क राहिला नाही.

घोडपेच्या पराभवानंतर (सन १७६८) नजरकैदेत असताना रघुनाथरावांनी–दत्तक घेतलेल्या मुलास पुण्यास आणवावे किंवा त्याचे नावे २ लक्ष जहागीर व एक किल्ला द्यावा असा आग्रह धरला. थो. माधवरावांनी, 'दुसऱ्या गोत्राचा मूल त्याचे बोलू नये. आम्ही कर्जदार ऐवज कोठून द्यावा ?' असे स्पष्टपणे सांगून मसलत नाकारली. बारभाईच्या धामधुमीच्या काळात अमृतराव रघुनाथरावांबरोबरच असत. त्यांच्याबरोबर सुरत, मुंबईला खूप दिवस होते. रघुनाथराव मुंबईला असताना अमृतराव २–३ हजार फौजेसह तारापूरला आश्रयासाठी राहिले होते. बारभाईनी यांच्यावर भिवराव पानशांना पाठवल्यावर फौजफाटा व लवाजमा सर्व सोडून अमृतराव एकटेच मुंबईला येऊन राहिले. या वेळी त्यांचे वय १२ वर्षे होते. बारभाईच्या कारकीर्दीत जून, सन १७८३ ते ऑक्टो. सन १७९२ पर्यन्त कोपरगावला, ऑक्टो. सन १७९२ ते एप्रिल १७९४ पर्यन्त आनंदवल्लीला, फेब्रुवारी सन १७९६ पर्यन्त बंधूसह यांना शिवनेरीला कैदेत रहावे लागले होते. पुढे दौलतराव शिंद्यांचे दिवाण बाळोबातात्या पागनीस यांनी अमृतरावांना जांब गावी कैदेत ठेवले. सन १७९६ च्या अखेरीस दुसऱ्या बाजीरावांना पेशवाईची वस्त्रे मिळाली तेव्हा यांनाही उंची पोषाख (किंमत ११८२ रु. १४ आणे) देऊन यांचा सन्मान करण्यात आला.

नाना फडणीसांना कैद करण्याच्या कटात अमृतरावही सामील झाले होते. सन १७९७ साली नाना फडणीसांना कैद झाल्यानंतर बाजीरावांनी दौलतराव शिंदे व इतर सरदारांच्या आग्रहामुळे यांना स्वत:चे कारभारी नेमले. याच सुमाराला अरुण, खुटवाड, शहाडौरा, इत्यादी ६ माहाल नेमून दिले.[४३] ते काही दिवस अमृतरावांकडे होते. त्यांना मुख्य कारभारी या नात्याने रोज सकाळी लवाजम्यासह वाड्याबाहेर पडून पूजेसाठी फुले, दुर्वा, तुळस, समीधा, इत्यादी पूजा-साहित्य भारंभार गोळा करण्याचे काम करावे लागे.[४४]

अमृतरावांनी पूर्वी सुरत, मुंबईला इंग्रजांची कवायती फौज पाहिली होती. त्याच धर्तीवर पेशव्यांची फौज तयार करण्यासाठी त्यांनी एम्. आर्. विल्यमटोन हा युरोपियन अधिकारी नेमला होता. अमृतराव राज्यकारभारात हुषार व परिस्थितीचे मर्म ओळखणारे होते. हे जाणूनच, 'अमृतरावांच्या हाती मराठी राज्याची सूत्रे जातील तर हिंदुस्थानात आपला निभाव लागणार नाही, असा स्पष्ट अभिप्राय खुद्द वेलस्लीने दिला आहे. अमृतराव मूलत: सरळ स्वभावाचे असल्यामुळे कालांतराने त्यांचे व कपटी बाजीरावांचे बिलकूल जमेनासे झाले. पूर्वी तिघेही भाऊ

समदुःखी असल्यामुळे त्यांचे एकमेकांशी सलोख्याचे संबंध होते. बाजीराव अमृतरावांना थोरला भाऊ म्हणून योग्य मानही देत. हिंमत व चाणाक्षपणा अंगी असल्यामळे आपण कारभार तरी पहावा अशी अमृतरावांना धमक वाटे. साहजिकच बाजीरावांना अमृतराव आपल्या पेशवाईच्या हक्कात प्रतिस्पर्धी वाटू लागले. शिवाय कारभारी या नात्याने अमृतराव, बाजीरावांच्या बेबंद, अनागोंदी कारभाराला संधी मिळेल तेथे अटकाव करू लागले. यामुळे उभयतांत कायमचे वितुष्ट आले. साधारणतः १७९८ सालापासून दोघांचे संबंध बिघडले ते अखेरपर्यंत.

दरम्यान महादाजी शिंद्यांच्या पश्चात्, त्यांच्या तीन पैकी दोन पत्नी (यमुनाबाई व भागिरथीबाई) व एक नाटकशाळा (केशरी) व दौलतराव शिंदे यांच्या घरातील दत्तक व वारसा हक्क यावरून वाद निर्माण झाला. या प्रकरणात जून सन १७९८ पासून अमृतरावांनी दौलतराव शिंद्यांच्या विरुद्ध शिंदे बायांचा पक्ष उचलून धरला. यामुळे वैमनस्य धरून, दौलतराव शिंद्यांनी, २५ जूनला रात्री अमृतरावांच्या गोटावर अकस्मात् हल्ला केला. गोट उद्ध्वस्त झाला. या गदारोळात अमृतरावांची पत्नी सावित्रीबाई (पिता मोडक) व मुलगा विनायकराव पाषाणकडे व अमृतराव विठ्ठलवाडीकडे पळून गेले.

थोड्या दिवसांनी बायांचा पक्ष सोडावा या शर्तीवर दौलतरावांनी अमृतरावांना भिवंडी प्रांतात सात लाख रुपयांची स्वतंत्र जहागीर तोडून देण्याचे बाजीरावांच्या मध्यस्थीने मान्य केले. 'शके १७२०, अमृतरावसाहेब यांस सात लक्षाचा मुलूख द्यावयाचा करार जाला त्याच्या सनदा दिल्ह्या छ. १९[४५] जाखर' याप्रमाणे १ ऑक्टोबरला, (सन १७९८) जहागीर तोडून घेऊन अमृतरावांनी शिंदे बायांचा पक्ष कायमचा सोडला.

'पूर्वी बाजीरावाने गोदातीरी अमृतरावास जहागिरी नेमून दिली होती. तिचे सालिना उत्पन्न ४ लाख रु. होते. शिवाय पुरंदर, सावनूर तालुका, सुरत येथे त्याची काही उत्पन्ने होती. त्यांचा वसूल तीन लाख रु. होता. गोदावरीकडील काही प्रदेश त्याच्या ताब्यात असून त्याचे भरीस त्याने आणखी ४ लाखांची मागणी पेशव्यांकडे केली होती.' असा उल्लेख 'पूना रेसिडेन्सी कॉरस्पॉन्डन्स' मध्ये आढळतो. २३ एप्रिल, सन १८०० रोजी बाजीरावांनी अमृतरावांना दिवाणगिरीची वस्त्रे दिली.[४६] बाजीरावांना पेशवापद मिळण्यासाठी मदत करण्याबद्दल कबूल केलेल्या रकमेच्या वसुलीसाठी दौलतराव शिंद्यांनी, बाजीरावांच्या संमतीनेच पुण्याच्या प्रजेवर अत्याचार केले, हे समजल्यावर स्वार्थी राजकारणाचा तिटकारा येऊन कारभारीपद सोडून, २० जुलै, सन १८०० ला अमृतराव पुण्यातून सहपरिवार निघून गेले.[४७] पुढे नगरजवळ भिंगार येथे एक महिना होते. त्यानंतर आपली जहागीर सोडून कोकण, भिवंडी, भिवपुरी वगैरे ठिकाणी राहून जुन्नरकडे गेले.

विरोधी पक्ष बलवान होत असतानाच बाजीरावांनी अमृतरावांना भेटीसाठी बोलावले. २ सप्टेंबर, सन १८०१ ला कचेश्वर येथे दोघांच्या भेटी झाल्या. पण दुरावा कमी झाला नाही. नंतर ५–६ दिवस पुण्याला राहून अमृतराव जुन्नरला परत गेले. सन १८०२ च्या जानेवारीत बाजीरावांविरुद्ध पुंडावा सुरू झाला. याच सुमाराला अमृतरावांनी यशवंतराव होळकरांना मदतीसाठी पुण्याला बोलावले. मदतीबद्दल त्यांनी यशवंतरावांना एक कोटी रु. देऊ केले होते.

हे पैसे जमा करण्यासाठी रयतेवर जादा कर बसवला. तो सधन नागरिक आणि सावकारांनी द्यावा असे ठरवण्यात आले. पण हा कर सहजपणे कोणीही देईना. आर्थिक गरजेपोटी बसवलेल्या या कराच्या वसुलीसाठी यशवंतरावांनी मीरखान पठाण याची नेमणूक केली.

मीरखानाने पुण्याच्या रयतेवर चार महिने अनन्वित अत्याचार केले.

होळकरांनी २५ ऑक्टोबर, सन १८०२ ला ऐन दिवाळीच्या दिवशी (आश्विन वद्य १४) पहाटे पुण्यावर हल्ला चढवून लुटालूट व जाळपोळ केली. या काळात अमृतराव जुन्नरहून सूत्रे चालवत होते. बाजीराव यापूर्वीच पळून गेल्यामुळे होळकरांनी पुण्याचा बंदोबस्त केला व अमृतरावांना आग्रहाने पुण्याला बोलावले. अमृतराव जुन्नरहून ७ नोव्हेंबरला पुण्याला आले. वाटाघाटींनंतर होळकरांच्या तंत्राने अमृतरावांनी १२ नोव्हेंबर, सन १८०२ पासून पुण्याचा कारभार हातात घेतला. अमृतरावांनी काही दिवस पेशवा पद उपभोगले ही समजूत चूक आहे मात्र ते पेशवापद नाकारून भांबुर्ड्याला आपला स्वतंत्र दरबार भरवू लागले. बाजीराव परागंदा झाल्यामुळे पेशवाईचा शिक्का कोणाचे नावे करावा? असा पेच निर्माण झाला.

'आपण शिकस्त करूनही बाजीराव इंग्रजांकडे गेले. सबब विनायकरावांना यशोदाबाईंचे मांडीवर 'बाळाजी माधवराव' या नावाने दत्तक देऊन, त्यांचे नावे पेशवाईची वस्त्रे आणवावी' अशी यशवंतराव होळकरांनी मसलत मांडली. बाजीरावांनी अधिकृतपणे पेशवापदाचा त्याग केला नसल्यामुळे अशा मसलतीमुळे त्यांना पदच्युत केल्यासारखे होईल. म्हणून प्रथम अमृतरावांनी ही सूचना नाकारली. सरतेशेवटी त्यांनी मान्यता दिली. दरम्यान काहीही करून विनायकरावांसह कोकणात भेटीसाठी यावे. असा बाजीरावांनी अमृतरावांना निरोप पाठवला. पण त्यामागचा अटकेचा डाव ओळखून अमृतराव कोकणात गेले नाहीत.

२२ डिसेंबर, सन १८०२ ला अमृतरावांनी विनायकरावांचे नावे पेशवाईची वस्त्रे आणवली. ही बातमी समजल्यावर बाजीरावांनी अमृतरावांचा भिवंडीचा वाडा साफ लुटला. दरम्यान बाजीरावांचे कोकणातील उद्योग अमृतरावांना समजत होतेच.

बाजीरावांनी वसईला इंग्रजांशी तह केला ही बातमी पुण्यात पोहोचली. २ जानेवारी, सन १८०३ रोजी, अमृतराव, यशवंतराव होळकर, बाबा फडके, मोरोबा फडणीस, वगैरे मंडळी पुढच्या धोरणांबद्दल वाटाघाटी करू लागली. बाजीरावांविरुद्ध नाराज असलेल्या सर्व सरदारांनी एकत्र यावे, बाजीरावांविरुद्ध सामना करावा अशी मसलत ठरली. या काळात सर्व मराठा मंडळाची एकजूट करण्याचा अमृतरावांनी अटोकाट प्रयत्न केला, पण सर्व सरदारांच्या आत्मकेंद्रित वृत्तीमुळे सर्व प्रयत्न फोल ठरले.

बाजीराव १८०२ साली वसईला पळून गेल्यानंतर पेशवा घराण्यातील एकमेव ह्यात पात्र उमेदवार म्हणून राज्याची सूत्रे अमृतरावांकडे आली होती. १८०३ साली पुण्यात बाजीरावांच्या आगमनामुळे त्यांची स्थिती बिकट झाली. पुण्याचे राज्य चालवल्याच्या रागाने बाजीरावांनी सात लाखांची नेमणूक जप्त केली. य वेळी अमृतराव इंग्रज विरोधी गटात सामील होणे इंग्रजांना परवडले नसते. म्हणून इंग्रजांनी अमृतरावांचा अनुनय सुरू केला.

'वसईच्या तहा' नंतर थोड्याच दिवसांत बाजीरावांचे इंग्रजांशी संबंध बिघडले. या काळात दौलतराव शिंद्याने बाजीरावांना यशवंतराव होळकरांबद्दल लिहिलेली काही पत्रे यशवंतराव होळकरांच्या हातात पडली. एका पत्रातील 'यशवंतरावाने ज्या ज्या मागण्या केल्या आहेत, त्या त्या मागण्या पूर्ण करण्याचा आपल्याला फक्त देखावा करायचा आहे. युद्ध संपल्यावर आपण त्याचा पुरेपूर सूड घेऊ.' या मजकुराने यशवंतरावांचे डोळे खाडकन् उघडले.

हा सर्व आर्थर वेलस्लीचाच बनाव होता. मराठा सरदारांत फूट पाडण्याचा हा एक मार्ग होता. काही पत्रे यशवंतराव होळकरांच्या हातात पडतील अशी योजना वेलस्लीनेच केली होती. याच काळात दौलतराव शिंदे व बाजीराव यांची पत्रे हातोहात पकडून अमृतरावांनी आर्थर वेलस्लीच्या स्वाधीन केली. यामुळे बाजीरावांची सर्व कारस्थाने इंग्रजांना समजली. यापूर्वी वसईच्या तहानंतर बाजीराव पेशवापदावर बसले त्या वेळी, अमृतराव नाशिकला निघून गेले होते. अमृतराव असंतुष्ट राहू नयेत, काही कटकटी निर्माण होऊ नयेत व दोन्ही भावांत सलोखा निर्माण व्हावा यासाठी वेलस्लीने अटोकाट प्रयत्न केले, पण उपयोग झाला नाही. सरतेशेवटी अमृतरावांनी पुण्याचा नाद कायमचा सोडला व इंग्रजांशी १४ ऑगस्ट, सन १८०३ रोजी स्वतंत्र तहनामा केला.

अमृतराव व आर्थर वेलस्ली यांच्यात स्वतंत्र नेमणुकीविषयी वाटाघाटी झाल्या, तेव्हा 'वसईच्या तहामुळे झालेले नुकसान भरून निघावे व शिंद्यांनी १ ऑक्टोबर, सन १७९८ ला आपल्याला दिलेल्या जहागिरीइतकी नेमणूक मिळावी' अशी अमृतरावांनी अपेक्षा व्यक्त केली. त्यानुसार वेलस्लीनी सालिना तैनात ७

लाख रु. व नोकरखर्च १ लाख रु. अशी एकूण ८ लाख रु. नेमणूक मंजूर केली.[४८] इतक्या मोठ्या तैनातीबद्दल इंग्रज सरकारच्या कौन्सिलने लॉर्ड वेलस्लीकडे खुलासा मागितला. वेलस्लीने दिलेल्या अहवालात याबद्दल स्पष्ट खुलासा केला आहे.

इंग्रजांनी अमृतरावांशी हा तह केलेला बाजीरावांना बिलकूल आवडले नाही. त्याबद्दल त्यांनी आर्थर वेलस्लीकडे कडक निषेध नोंदविला. त्यावर वेलस्लीने दिलेले उत्तर पहाण्यासारखे आहे :

" अमृतरावांबद्दल महाराष्ट्रात सर्वसामान्य लोकांना आदर वाटतोच, याशिवाय राज्यकारभार करण्याची कला त्याला अवगत आहे. ब्रिटिश सैन्य ज्या वेळी बाजीरावांसह पुण्यात आले त्या वेळी अमृतरावाने सर्वांत शेवटी पुणे शहर सोडले हे त्याला भूषणावह समजले पाहिजे. "

" या परिस्थितीमुळे समोर होणाऱ्या युद्धामध्ये अमृतरावाची मैत्री संपादन करणे आम्ही आवश्यक समजतो. म्हणून आम्ही अमृतरावांशी मैत्री केलेली आहे. ',

यानंतर मात्र अमृतराव आपल्या परिवारासह कायमचे वाराणसीला जाऊन निवृत्त जीवन जगू लागले. १८०४ च्या सुरुवातीला अमृतराव वाराणसीला स्थायिक झाले असे सरदेसाई ' रियासती 'त म्हणतात ते बरोबर नाही.

अमृतरावांनी दि. ३–८–१८०५ रोजी लॉर्ड वेलस्लीला लिहिलेल्या पत्राचा[४९] गोषवारा : मुंबईस अमृतराव यांचेशी कंपनी - सरकारने करार केला की, अमृतरावांनी बनारस यात्रा करून यावे. त्यास दीडवर्ष लागेल तोपर्यंत त्यांची राहण्याच्या जागेची सोय करून दिली जाईल. याप्रमाणे अमृतराव यांनी त्यावेळचे पुण्याचे रेसिडेन्ट ले. क. बॅरी क्लोज यांच्या परवानगीने नवी जमीयत (सैन्याची तुकडी) ठेवली. गयेस जाऊन तेथून वाराणसीस आले. तेव्हा कंपनी - सरकारच्या सरहद्दीपर्यंत थॉमस ब्रुक हा इंग्रज अधिकारी त्यांना सामोरा आला व अमृतरावांना वाराणसीला घेऊन गेला. त्यांनी अमृतरावांच्या इतमामाला साजेल अशी सरबराई केली. धर्मादाय खर्चामुळे झालेले कर्ज बाजीरावांशी (अमृतरावांचे) सख्य असते तर बाजीरावांनीच फेडले असते. परंतु तशी परिस्थिती नसल्यामुळे हे कर्ज कंपनी - सरकारने फेडावे अशी अमृतरावांनी विनंती केली आहे. याच पत्रात शेवटी, ' वेलस्ली विलायतेस जाणार असे आम्ही ऐकतो. त्यानंतर आमचा बंदोबस्त कोणाकडे सुपूर्त करणार ?' असे अमृतरावांनी स्पष्ट विचारले आहे.

अमृतरावांनी दि. २०–८–१८०५ रोजी गव्हर्नर-जनरल कॉर्नवॉलिसना लिहिलेल्या पत्राचा गोषवारा :[५०] बाजीरावांशी वैमनस्य आल्यावर अमृतरावांना नक्त नेमणूक (बाजीरावांकडून) करून देण्याचे, कंपनी-सरकारने कबूल केले. वेलस्लीने अमृतरावांना सांगितले की, तुम्ही दीड-दोन वर्षे येथून (पुण्याहून) सुरत

वगैरे ठिकाणी दूर जा. तोपर्यंत नेमणुकीची व्यवस्था करून देऊ. त्यानंतर अमृतरावांनी स्वतःकडे असलेला मुलूख वेलस्लीच्या स्वाधीन केला. गावीलगडच्या स्वारीत त्यांनी वेलस्लीला मदत केली. वेलस्लीच्या सांगण्याप्रमाणे न करता सुरतेऐवजी वाराणसीची यात्रा केली. नागपूरकर भोसल्यांच्या मदतीने ते १८०५ सालच्या अखेरीस वाराणसीला* जाऊन पोचले.[५१]

वाराणसीच्या जीवनक्रमात अमृतरावांनी दानधर्माबद्दल खूप लौकिक मिळवला. नवीन ' राजघाट ' बांधला. असे सांगतात की, ' अमृतराव आपले वाढदिवसाचे दिवशी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत जे ब्राह्मण व अपंग येतील त्या प्रत्येकाला एक शेर तांदूळ व एक रुपया दक्षिणा देत असत. या प्रसंगी पन्नास हजार रुपयांवरही कित्येक वेळा खर्च होत असे.

अमृतराव परोपकारी व धार्मिक वृत्तीचे होते. त्यांना ख्रिश्चन धर्माविषयी कुतूहल वाटत असे. ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून ते धर्माबद्दल माहिती मिळवीत. त्यांच्याशी चर्चा करीत. या संदर्भात रेव्ह. मॉरिस यांचे नाव आढळते.[५२]

अमृतरावांनी आयुष्यात खूप बरे वाईट दिवस पाहिले होते. स्वभाव चांगला असूनही राजकारणात वाव न मिळाल्याने पुढे आले नाहीत. हे वाराणसीतच ६ सप्टेंबर सन १८२४ रोजी सोमवारी रात्री (तारणनाम संवत्सर, भाद्रपद शु. १३, शके १७४६) वारले. ७ सप्टेंबरला सकाळी अग्नीसंस्कार झाले असावेत.[३] वि.का. राजवाड्यांनी (राखं ४ पृ. १८२) दिलेला मृत्यू शक १७४५ चूक आहे.

त्यांच्या पत्नींविषयी इतिहासात माहिती मिळते ती – **पत्नी** : (१) सावित्रीबाई. हे लग्न रघुनाथरावांनी टोके या गावी वैशाख महिन्यात (मे अखेर) सन १७७२ मध्ये मोठ्या थाटाने केले.[५४] लग्न खर्च थोरल्या माधवरावांनी दिला. या जुलै सन १७७८ मध्ये वारल्या.[५४] मृत्यूनंतरही पिशाच्च रुपाने यांचे दर्शन होई म्हणून नथू भगताकडुन इलाज केला होता. पिता धोंडभट बिवलकर.[५५]

पत्नी : (२) सावित्रीबाई. हे लग्न रघुनाथरावांनी शिंद्यांच्या छावणीत कैदेत असताना, वडगावच्या १६ जानेवारी, सन १७७९ च्या तहानंतर तळेगाव मुक्कामी फेब्रुवारी, सन १७७९ मध्ये लावून दिले.[५४] अमृतरावांची ही पत्नी बाळंतपणानंतर बरेच दिवस आसन्नमरण राहून मे, सन १८०३ मध्ये वारली,' असा उल्लेख मिळतो.[५५] यावरून त्या सुमाराला यांना मूल झाले असावे, पण ते लवकर वारले असावे. पिता शिवशंकरशास्त्री मोडक.[५५] **पत्नी** : (३) दुसऱ्या पत्नी आजारी असतानाच, १८ मार्च, सन १८०३ ला हा विवाह झाला. नाव सत्यभामाबाई. पिता

---

* ' श्रीमंत अमृतराव साहेब काशीस गेले, तेथे आहेत. शके १७२८ ' – ' कासंपया ' ले. ४९७ पृ. ५०३.

नारायणभट फडके सावंतवाडीकर.[५५] **पत्नी :** (४) यांचे पिता विनायकपंत दातार.[५५] **पत्नी :** (५) यांचे पिता गोविंदपंत[५५] घाटे

ऐ. ले. संग्रह, खंड १४, पत्र क्र. ६७५९ मध्ये (दि. १-१२-१८०३) एक उल्लेख मिळतो : 'श्रीा राजश्री अमृतरावसाहेब वसलीकडे (वेलस्ली) जाऊन भेटी जाल्या. कुटुंब औरंगाबादेस होती. ती. विनायकराव व त्याची स्त्री व राव साहेबांची स्त्री व मैनाताई बहिण ऐशी नगरचे किल्ल्यास आली.' मैनाबाई ही अमृतरावांची बहीण नसून मुलगी (विनायकरावांची बहीण) होती. श्री. ग. ह. खरेही असेच म्हणतात.[५६]

विनायक अमृतराव : (९) यांची आई सावित्रीबाई म्हणजे अमृतरावांच्या दुसऱ्या पत्नी.[५४] विनायकरावांचा जन्म १७९२ साली झाला. अमृतरावांनी आपल्या थोरल्या मृत दत्तक भावावरून यांचे नाव 'विनायक' ठेवले. यांची मुंज ७ फेब्रुवारी, सन १७९९ रोजी गुरुवारी (कालयुक्तनाम संवत्सर, माघ शु. ३, शके १७२०) झाली.[५७]

१८०२ साली दुसरे बाजीराव पुण्यातून परागंदा झाल्यावर अखेरीस अमृतरावांनी यांच्या नावे पेशवाईची वस्त्रे आणायला मान्यता दिली. यशोदाबाई पेशव्यांच्या मांडीवर विनायकरावांना 'बाळाजी माधवराव' या नावाने दत्तक देऊन त्यांचे नावे वस्त्रे आणवावी अशी मसलत ठरली होती. त्या वेळी यशोदाबाई रायगड किल्ल्यावर बाजीरावांच्या कैदेत असल्यामुळे अर्थातच यशोदाबाईंना मुक्त करून पुण्याला घेऊन येणे ही कामगिरी प्रथम पार पाडायची होती. परंतु यशवंतराव होळकरांनी अटोकाट प्रयत्न करूनही यशोदाबाई मुक्त झाल्या नाहीत. बऱ्याच वाटाघाटींनंतर सातारकर छत्रपतींनी २२ डिसेंबर, सन १८०२ ला विनायकरावांचे नावे पेशवाईची वस्त्रे दिली. परंतु यशोदाबाईंच्या कैदेमुळे दत्तकविधान होऊ शकले नाही व वस्त्रे पर्वतीवर तशीच पडून राहिली.[५८]

यांना व्यवहारात बापूसाहेब म्हणत. वडिलांचे पश्चात् आठ लाखांची नेमणूक व अफाट संपत्तीचा वारसा यांच्याकडे आला. त्यांनी निष्फळ चैनबाजीत संपत्ती खर्च केली नाही. दरसाल दीड लाख रु. दानधर्माबद्दल खर्च करीत. यांना ख्रिस्ती धर्माबद्दल कुतूहल असून मिशनऱ्यांकडून ख्रिस्ती धर्माबद्दल माहिती ऐकत. इंग्रज सरकारकडून होणाऱ्या मनस्तापामुळे १८२९ साली हे वाराणसी सोडून बांदा झाले. बांद्यापासून करवी ४५ मैलांवर आहे. १८१८ सालापर्यंत करवीला इंग्रजांची लष्करी छावणी होती. १८१८ साली करवी छावणी अमृतरावांना जहागिरीमध्ये[५९] दिली. अमृतराव तिथेही राहात असत. पुढे विनायकरावांना ही जहागिरी पुरेना जहागिरीतील करवी (तिरोहा) ह्या पायोष्णी नदीच्या काठावरील गावी स्थायिक

म्हणून इंग्रजांनी चित्रकूटच्या महंताकडून ४६९१ रु. उत्पन्नाचा आणखी एक गाव त्यांना देवविला. यामुळे विनायकराव व त्यांच्या वंशजांना 'चित्रकूटवाले पेशवे' आणि करवीला राहत असल्यामुळे 'करवीचे राव' अशा दोन्ही नावांनी लोक ओळखू लागले. अमृतरावांना आणि विनायकरावांना निवृत्तीच्या काळात इंग्रजांनी 'महाराजा' ही पदवी दिली होती.

१८४४ साली पुणे–मुंबईमध्ये शेषाद्रि बंधूंचे (नारायण आणि श्रीपती) धर्मांतर प्रकरण खूप गाजले होते. या भावंडांचा प्रश्न निरनिराळ्या ठिकाणच्या धर्मसभांपुढे अनेक वेळा आला होता. त्यांपैकी चित्रकूट येथील घटनेबद्दल 'ज्ञानोदय' वृत्तपत्रातील बातमीत विनायकरावांचा उल्लेख आहे :

" काशीजवळ चित्रकूट या ठिकाणीं शेकडों जातवाल्यांसमक्ष श्रीपती म्हणाला कीं, मला माझ्या भावाजवळ राहायची इच्छा आहे. बाजीरावाचा पुतण्या विनायकराव यानेही असा सल्ला दिला कीं, यांस माघारा पाठवा. त्याचा मुकदमा सुप्रीम कोडतात नव्हता तेव्हांपासून लोक अशीच मसलत देत होते. "

– 'ज्ञानोदय' ता. १२ डिसेंबर, सन १८४४ इसवी.

विनायकरावांना मिळालेल्या गावांची कागदोपत्री नोंद 'महल अमृतराव' अशी पुढे अनेक वर्षे होती. त्यांच्या कारकीर्दीत करवी गाव लहानशी राजधानीच बनले होते. विनायकरावांनी तेथे मोठा वाडा बांधला होता. शिवाय पिवळी कोठी, तलाव कोठी, जंगली बाग, कटोरा तलाव वगैरे बाग-बगीचे, तलाव व मंदिरे व वास्तू उभारल्या. त्यांपैकी 'गणेश बाग' नावाचे विस्तीर्ण व रमणीय उद्यान विशेष उल्लेखनीय होते. विनायकरावांनी ४ जानेवारी, सन १८५३ रोजी आपले मृत्युपत्र केले. ते चित्रकूट येथे १८५६ साली वारले असे काही पुस्तकांमध्ये लिहिले आहे, ते चूक आहे. इंग्रजांच्या अधिकृत नोंदीनुसार विनायकराव ६ जुलै, सन १८५३ रोजी बुधवारी (प्रमादिनाम संवत्सर, ज्येष्ठ आमावस्या, शके १७७५) वारले.[६०]

विनायकरावांच्या **पत्नी** : (१) सरस्वतीबाई. हा विवाह २३ एप्रिल, सन १८०३ रोजी, शनिवारी (वैशाख शु. २ शके १७२५) संगमनेरला झाला. पिता दातीर.[५५] **मुलगी** : काशीबाई. यांचा जन्म सन १८०७ सालचा असावा. ५ सप्टेंबर, सन १८१४ रोजी लॉर्ड हेस्टिंग्जने अमृतरावांची राहत्या वाड्यात आपल्या परिवारासह भेट घेतली, त्या वेळी काशीबाई ७ वर्षांची, चुणचुणीत, धीट होती. यामुळे तिचे कौतुक झाले. हेस्टिंग्जनी या भेटीचा वृत्तांत लिहून ठेवला आहे. काशीबाई गोऱ्यापान. सुस्वरूप होत्या. यांचे लग्न १८१५ साली झाले. सासरचे नाव अन्नपूर्णाबाई. पती हरी बळवंत जोग, वा. करवी, रा. पुणे अमृतराव पेशवे कोकणात सरसुभे असताना त्यांना बळवंतराव जोगांची खूप मदत झाली होती.

ते स्मरून अमृतरावांनी आपली नात काशीबाई, बळवंतरावांचा मुलगा हरी[११] याला दिली. **पत्नी** : (२) आनंदीबाई. माहेर परांजपे. 'आनंदीबाई परांजपी सावित्रीबाईची सून.' 'हिला पुत्र झाला पण तो ५ वे दिवशी वारला.'[१२]

नारायण विनायक : (१०) थत्ते घराण्यातून* दत्तक आले. 'नारायण' हे दत्तक घरचे नाव. नारायणराव जनक घराकडून विनायकरावांचे नातेवाईक होते. ही समजूत चूक आहे. कालांतराने विनायकरावांशी यांचे जमेनासे झाले, म्हणून विनायकरावांनी यांचे दत्तकविधान रद्द केले. त्याबद्दल इंग्रज सरकारला अधिकृतपणे कळवलेही होते.

वारसा–हक्क काढून घेतल्यावरही यांना विनायकराव दरमहा २०० रु. हातखर्चासाठी देत असत. आपल्या पश्चात् माधवरावांनीही असे पैसे द्यावेत असे विनायकरावांनी बंधन घातले होते. नारायणराव व माधवराव हे दत्तक बंधू बिलकूल इंग्रजांविरुद्ध नव्हते. उलट इंग्रजांशी चांगले स्नेहसंबंध ठेवीत असे अनेक उल्लेख मिळतात. १८५७ चा उठाव पसरू लागल्यावर, बांद्याची फौज करवीवर हल्ला करील हे पाहून लढाईच्या धाकाने, नारायणरावांनी नवाब अलीबहादूरना दोन लाख रुपये कर्जाऊ दिले.

६ जून सन, १८५८ ला करवीमध्ये जनरल व्हिटलॉक* यांचे इंग्रज सैन्य घुसले त्यावेळी करवीचे १५००० सैन्य व ४० तोफा इतकी साधने होती. व्हिटलॉकचाही, करवी काबीज करण्यापूर्वी मोठी लढाई होईल असा अंदाज होता. परंतु इंग्रज सैन्याची दूरून चाहूल लागताच करवीचे सैनिक जंगलात पळून गेले. लढाई झाली नाही.

---

* इतिहासातील माहिती व नारायणरावांच्या पत्नी गंगाबाई यांच्या सख्ख्या बंधूंचे पणतु (कै.) गो. प. नेने यांनी कागदांवरून तसेच परंपरेने चालत आलेली पेशव्यांची काही माहिती दिली, त्यावरून नारायणराव व गंगाबाई पेशव्यांची माहिती येथे दिली आहे.

* बांडा – येथून तारीख ६ जून पावेतों वर्तमान आले आहे, की जनरल व्हिटलॉक तारायंत्राद्वारें खबर लिहितात, कीं सीरशान याचे नजीक इंग्रजी फौज आल्याचें वर्तमान ऐकून नारायणराव हा चकीत झाला आहे. आणि त्याभोंवतीं वेढा पडून तो हाल्ली छावणीत प्रतिबंधात आहे.

'ज्ञानप्रकाश' तारीख २८ जून, सन १८५८ इसवी.

याबद्दल जनरल व्हिटलॉकने आश्चर्य व्यक्त केले आहे.[६२] तथापि अनपेक्षितपणे सर्व चित्र पालटले. या सर्व घडामोडींमुळे नारायणराव व माधवरावांना इंग्रजांना शरण जाण्याखेरीज मार्ग राहिला नाही.*

लोकहितवादी देशमुख म्हणतात[६३] : 'विनायकराव यांजवळ पाच कोटींची दौलत होती. ती सर्व त्यांचे दत्तकाकडून १८५७ साली लुटीस गेली.' गोडसे भटजी∆ म्हणतात[६४] : 'चित्रकूटवाल्यांपाशी अर्थ बहुत असून व्यवस्थित सर्व जिनसा होत्या. एकंदर सोने, मोती, जवाहीर, मिळून चार कोटींची मुख्य दौलत होती. याखेरीज भांडी वगैरे. यांपैकी काही एक ठेविले नाही.' मॅलेसन म्हणतात[६५] : 'In the palace itself was stored the wherewhital to compensate soldiers for many a hard fight. In it's vaults and strong rooms were specic jewels and diamonds of priceless value.'

ह्या लुटीवर हक्क कोणाचा, याबद्दल सर ह्यू रोझ व जनरल व्हिटलॉक यांच्यात तंटा लागून 'कोर्ट ऑफ ॲडमिरल्टी'ने व्हिटलॉकचा ह्या लुटीवर हक्क आहे असा निकाल दिला. ही सर्व लूट इंग्रज सरकारने जनरल व्हिटलॉक व त्याच्या सैनिकांना 'प्राईझमनी' म्हणून बहाल केली.[६५]

उठाव शमल्यानंतर नारायणरावांची चौकशी होऊन त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली.[६७] परंतु नंतर गव्हर्नर-जनरल लॉर्ड कॅनिंग यांनी शिक्षा रद्द करून त्यांना १८५८ साली हजारीबाग येथे तुरुंगात नजरकैदेत ठेवले. यांच्या शिक्षेबद्दलची एक समकालीन बातमी उपलब्ध आहे :

"नारायणराव आणि माधवराव असें कैलासवासी अमृतरावसाहेब यांचे नातु आणि नानासाहेब यांचे पुतणे आहेत. त्यांतील नारायणराव यांस काळेपाण्याची शिक्षा ठरली, असें टेलिग्राफावरून कळत आहे."

— 'ज्ञानप्रकाश' ता. १५ नोवेंबर, सन १८५८ इसवी.

हजारीबागला नारायणरावांच्या परिवाराला ७०० रु. नेमणूक होती. कालांतराने अल्सरसदृश विकारामुळे नारायणराव १८६० साली हजारीबाग येथेच वारले.[६८]

पत्नी : गंगाबाई नारायणरावांचे पश्चात् या वाराणसीला स्थायिक झाल्या. नेने कुटुंबात चालत आलेली हकीगत अशी : 'नारायणराव व गंगाबाई यांची

---

* याबद्दल 'हिस्टरी ऑफ दि इंडियन म्युटिनी ऑफ १८५७'– के, मॅलेसन भाग ६ आणि 'माझा प्रवास'– विष्णुभट गोडसे, या पुस्तकांमध्ये सविस्तर माहिती दिली आहे.

∆ "चित्रकूट येथें श्रीमंत नारायणराव पेशवे व माधवराव पेशवे यांनी काहीं अनुष्ठाने सुरू केली आहेत" असे समजल्यामुळे गोडसे भटजी चित्रकूटला गेले– 'माझा प्रवास' पृ. १००

१८५८ सालीच इंग्रजांनी ताटातूट केली. दोघांना अनुक्रमे हजारीबागला व वाराणसीला ठेवले. नारायणराव आजारी असल्याचे समजल्यावर गंगाबाईंनी, एकदा तरी त्यांची भेट व्हावी म्हणून इंग्रजांकडे अर्ज विनंत्या केल्या. परंतु या पती-पत्नींची १८५८ सालानंतर कधीही भेट झाली नाही. नारायणराव वारल्याची बातमी इंग्रजांनी गंगाबाईंना पत्राद्वारे कळवली. इंग्रजांनी करवी लुटल्यानंतर गंगाबाई आपले बंधू व माहेरच्या नातेवाईकांसह काही अंतर पायी, काही अंतर बैलगाडीने, असा प्रवास करून वाराणसीला आल्या. गोडसे भटजी म्हणतात[१४] : 'नारायणरावाचे बायकोजवळ जाऊन अंगावरील दागिने मागितले. तिने नथीखेरीज सर्व दागिने काढून दिले. ते घेऊन आपले गावात कोणी आप्त असल्यास तेथे राहण्यास जावे. हा मेणा भोईसुद्धा तयार आहे. असे सांगितल्यावरून बाईसाहेब ईश्वरस्मरण करून मेण्यात बसून आपले माहेरचे आप्तांकडे निघून गेल्या.'

गंगाबाई वाराणसीला स्थायिक झाल्यानंतर त्यांच्या इस्टेटीची व्यवस्था वैद्य नावाचे गृहस्थ पाहात असत. ते वारल्यानंतर गंगाबाईच्याच सांगण्यावरून, त्यांचे भाचे बळवंत ऊर्फ विष्णू केशव नेने यांना व्यवस्थापक नेमण्यात आले. गंगाबाईंना हयातीपर्यन्त ७०० रु. पेन्शन मिळत असे. त्या वाराणसीत कपिलेश्वर महादेवाच्या गल्लीत भाड्याच्या घरात राहात असत. वाड्याच्या देवडीवर 'घडी घंटा' असे.* यावरून तद्देशीय लोक त्यांना 'घडीवाली बाईसाहेब' म्हणत असत. परिवारात त्यांना 'महाराज साहेब' म्हणत असत. त्यांनी आमरणान्त आपले आयुष्य सन्मार्गाने घालवले. गंगाबाई १९०५ साली वाराणसी येथे मरण पावल्या. त्यांचे पिता महादेव लक्ष्मण नेने.

नारायणरावांची **मुलगी** : हिची नेने परिवारामार्फत चालत आलेली पारंपारिक हकीगत अशी :

'करवीची लूट झाली त्या वेळी (जून, सन १८५८) ही मुलगी ८-९ वर्षांची होती. गावात हलकल्लोळ माजला. सगळे लोक निरनिराळ्या दिशांना पांगले. त्या वेळी या मुलीची आप्तांपासून ताटातूट झाली. ह्या धावपळीत मुलगी एका इंग्रज मडमेच्या हाती लागली. तिने मुलीला आपल्या बरोबर नेले. हे त्याचवेळी खात्रीपूर्वक समजले, पण इंग्रजांच्या धाकामुळे काही करता आले नाही. मुलगी बेपत्ता झाल्यामुळे गंगाबाई पुढे अनेक महिने दुःखी-कष्टी असत.' या माहितीवरून मुलीचा जन्म १८५० सालचा असावा.

---

* घड्याळाचे टोल वाजतात त्याप्रमाणे, देवडीवरचा पहारेकरी दर तासाने घंटेचे टोल देत असे. म्हणून घंटेला 'घडी घंटा' म्हणत.

माधव विनायक : (१०) वाराणसीच्या केळकर घराण्यातून दत्तक आले. विनायकरावांचे, ज्येष्ठ दत्तक मुलगा नारायणराव यांचेशी जमेनासे झाल्यावर ते दत्तकविधान रद्द करून विनायकरावांनी यांना दत्तक घेतले. 'माधव' हे दत्तक घरचे नाव. इंग्रजांच्या नोंदीनुसार सन १८५७ मध्ये यांचे वय ९ वर्षे होते.[६९] यावरून यांचा जन्म सन १८४८ चा असावा. माधवरावांचे शिक्षण वयाच्या ७ व्या वर्षी, वाराणसी येथील प्रकांड पंडित बापूशास्त्री ऊर्फ नरहरी सीताराम देव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले. यांचे कारकीर्दीत चित्रकूट-करवीच्या कारभाराची व्यवस्था पाहण्यासाठी रामचंद्रराव दामोदर पेंडसे यांची इंग्रज सरकारकडून नेमणूक झाली होती. विनायकरावांच्या हयातीपर्यंतची 'महाराजा' ही पदवी जाऊन नारायणराव व माधवरावांना 'राव ऑफ करवी' ही पदवी मिळाली.

विनायकरावांच्या मृत्युपत्रानुसार, माधवराव चित्रकूट–करवी संस्थानचे एकमेव वारस होते. ते शेवटपर्यंत इंग्रजांशी एकनिष्ठ होते. गोडसे भटजी म्हणतात :[७०]

"श्रीमंत नारायणराव व माधवराव पेशवे हे इंग्रजांशी बिघडले नव्हते, परंतु त्यांचा दिवाण राधाकिशन म्हणून परदेसी होता, तो बिघडला होता. प्रथम जेव्हा इंग्रज सरकारवर गहजब गुदरला तेव्हा तेथील कलेक्टर वगैरे साहेब लोकांनी चित्रकूट खालचा २५ लक्षांचा मुलूख व डंघईचा मुलूख श्रीमंत नारायणराव पेशवे यांचे स्वाधीन करून दप्तर स्वाधीन केले व आपण जीवभयास्तव पळून गेले."

करवीच्या लुटीची व घडामोडींची चौकशी करण्यासाठी इंग्रज सरकारने F. D. Mayne यांना स्पेशल-कमिशनर म्हणून नेमले.[७१] "The Commissioner fully obsolved him from all blame, vide his report dated Sept 8, 1858."

पेशवा परिवाराचा काहीही दोष नाही असे यात निष्पन्न झाले. इतकेच नव्हे तर, लुटीसंबंधी व माधवरावांसंबंधी जनरल व्हिटलॉकने सरकारला दिलेला अहवाल चुकीचा व खोडसाळ असल्याचेही या स्पेशल कमिशनरने म्हटले आहे. करवीची धामधूम होण्यापूर्वीच, शांतता प्रस्थापनेसाठी माधवरावांनीच इंदोरला रेसिडेन्टला राजनिष्ठेचे पत्र पाठवून इंग्रज सैन्याला पाचारण केले असे उल्लेख मिळतात.[६६]

श्री. कृष्णराव पेशवा यांचेकडून पूर्वापार चालत आलेली माहिती समजली ती पुढीलप्रमाणे :

'इंग्रजांनी करवीची लूट केली त्याची कारणे दोन. (१) उठावापूर्वी बंडवाल्यांनी करवीच्या डेप्युटी कलेक्टरची हत्या केली होती. (२) दत्तक-विधान रद्द झाल्यामुळे नारायणराव, पूर्वीपासून पेशवा परिवारावर नाराज होते. त्यांनी व काशीबाई (जोग) यांनी, करवीवर हल्ला केल्यास खूप लूट मिळेल असा इंग्रजांना

निरोप पाठवला. करवीला लुटालूट खूप झाली पण लढाई झाली नाही.'

'धामधुमीनंतर नारायणरावांना हजारीबागला, व माधवरावांना अलाहाबादला ठेवले. लहान वय पाहून माधवरावांना प्रत्यक्ष कैद न करता, परवानगीशिवाय अलाहाबाद सोडायचे नाही, इतकेच बंधन घातले. कै. विनायकराव पूर्वी नारायणरावांना दरमहा २०० रु. देत. तेवढीच रक्कम माधवराव अल्पवयीन असेपर्यन्त त्यांच्यासाठी इंग्रजांनी मंजूर केली. माधवराव सज्ञान झाल्यावर कारभाऱ्यांकडे (गार्डियन्स) संसारखेगमीसाठी सालिना किती रकमेची तरतूद करावी, अशी इंग्रजांनी विचारणा केली. कारभाऱ्यांनी, सालिना ३०,००० रु. पुरेसे होतील अशा आशयाचा जबाब दिला. त्यानुसार ४ टक्के दराने ज्या रकमेचे सालिना ३०,००० रु. व्याज येईल इतकी रक्कम (साडेसात लाख रु.) पेशवा परिवाराकडून इंग्रजांकडे ठेव म्हणून ठेवावी असे इंग्रजांनी ठरवले.'

'दरम्यान लुटीच्या वेळी एकूण संपत्तीबरोबरच पेशव्यांच्या २९।। लाख रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा इंग्रजांना मिळाल्या होत्या. प्रॉ. नोटा लूट किंवा प्राईजमनी म्हणून गृहीत धरता येणार नाहीत असा ब्रिटिश पार्लमेंटने निर्णय दिला. यांपैकी ७।। लाख रु. फंड सालिना पेन्शनच्या मुद्दलाची रक्कम म्हणून वेगळा काढून गव्हर्नर-जनरलने पेन्शनची तरतूद केली. लुटीच्या वेळी या प्रॉ. नोटा 'बँक ऑफ बंगाल' मध्ये होत्या. त्या इंग्रजांकडे गेल्या. यांपैकी २२ लाख रु. प्रॉ. नोटांच्या स्वरूपात आमच्याकडे आहेत असे ब्रिटिश सरकारने कळवले होते. पुढे ती कागदपत्रे 'बँक ऑफ बंगाल'मधून 'बँक ऑफ इंग्लंड'मध्ये गेली असे म्हणतात. माधवराव सज्ञान झाल्यावर इंग्रजांनी त्यांना बुलंदशहर व बासबरेली यापैकी कोणत्या गावी राहाणे पसंत पडेल, असे विचारले. माधवरावांनी बासबरेली पसंत केले. या वेळेपर्यंत ते अलाहाबादला राहात.'

माधवरावांच्या शिक्षण व्यवस्थेविषयी १८६३ सालचा उल्लेख मिळतो.[७१] 'Madho Rao was pardoned in consideration of his youth and is now being educated at Bareilly as a ward of the British Government. A provision of Rupees 30,000 a year has been made for him.' माधवराव सुमारे १८६६ साली कर्तेपणाने कारभार पाहू लागले. 'माधवराव संवत् १९२३ में राज्याधिकार करनेके लायक हो गया था।'[७२]

माधवराव आग्रा विद्यापीठाचे बी. ए. होते. बरेली कॉलेजच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते. काव्यरचना करीत. दशग्रंथी होते. उत्तर प्रदेशातील बाबराल गावी त्यांनी बरेच जीवन घालवले. १८८९ साली बासबरेलीला वाडे बांधले. १८८९ सालापासून बाबराल आणि जवळच राजघाट-नरोडा येथेही जमीनी खरेदी करून वाडे बांधले. 'स्थावर मिळकतीच्या उभारणीसाठी त्यांनी इंग्रजांकडून ५० हजार

रु. कर्ज घेतले होते. कर्जफेडीबद्दल दोन्ही पक्षांच्या समजुतीने त्यानंतर कायम सालिना २५ हजार रु. पेन्शन व ५ हजार रु. फेड असे ठरले ' असे श्री. उदयसिंह पेशवा यांचेकडून समजले. त्याप्रमाणे पुढे दरसाल २५ हजार रु. मिळू लागले.

' १८५७ 'चे राजबंदी असल्यामुळे माधवरावांच्या हालचालींवर बंधने होती. कारणपरत्वे पुण्यात किंवा महाराष्ट्रात पाहुणे म्हणून यायला बंदी नव्हती. प्रवास कलेक्टरच्या परवानगीनेच करता येई. कुलोपाध्याय कर्व्यांची एक शाखा पुण्यात राहात असे. त्यांचेकडे उन्हाळ्यात २-३ महिने माधवराव येऊन राहत. माधवराव बासबरेली येथेच २२ मार्च, सन १९१३ रोजी, हुताशनी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी (परिधावीनाम संवत्सर, फाल्गुन वद्य १, शके १८३४) रविवारी वारले.

पत्नी : लक्ष्मीबाई पिता किबे. सरदार रा. इंदोर (बहुधा सरदार गणेश विठ्ठल ऊर्फ दाजीसाहेब किबे.)

(माधवरावांच्या वंशजांची माहिती प्रकरण ९ मध्ये पहा.)

बाजीराव रघुनाथ : (८) बारभाई व रघुनाथराव यांच्यामधील चकमकींच्या काळात आनंदीबाई गरोदर असल्यामुळे त्यांना रघुनाथरावांनी धारला खंडेराव पवारांच्या किल्ल्यात सुरक्षिततेसाठी ठेवले होते. तेथे आनंदीबाई यथाकाल प्रसूत होऊन, १० जानेवारी, सन १७७५ रोजी मंगळवारी (जयनाम संवत्सर, पौष शु. ९ शके १६९६) मुलगा झाला.[७३] हेच प्रसिद्ध दुसरे बाजीराव पेशवे. यांचे सुरुवातीचे बालपण माळव्यातील धामधुमीत गेले. बारभाईंची सरशी झाल्यानंतर यांच्या आयुष्यातील पहिली २२ वर्षे बारभाईच्या नजरकैदेत कोपरगाव, आनंदवल्ली, शिवनेरी, जुन्नर, येथे गेली. हे लहानपणापासून उनाड, कपटी, कांगावाखोर वृत्तीचे होते.

मार्च सन १७९५ मध्ये खड्र्याची मोहिम उद्‌भवली. या काळात नाना फडणीसांनी यांना जुन्नरजवळ शिवनेरी येथे कैदेत ठेवले. बाजीरावांना राजनीती, युद्धनिती वगैरेचे काहीही शिक्षण मिळाले नव्हते. त्यामुळे यांच्यात राजकारणी पोच बिलकूल निर्माण झाला नाही. राज्यकारभार संभाळायची कुवत अंगी मुळीच नव्हती. स्वतः कैदेत असतानाही यांनी सवाई माधवरावांशी गुप्त पत्रव्यवहार करून त्यांच्या मनात स्वतःविषयी सहानुभूती व नाना फडणीसांविषयी तिरस्कार निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. यातून सवाई माधवरावांना मनस्तापही झाला.

सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर कोणीतरी मुलगा यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक घेऊन गादी चालवावी असा नाना फडणीसांचा मनसुबा होता.[७४] त्यासाठी राज्यात योग्य मुलाचा शोध सुरू झाला. हे पाहून बाजीरावांनी दौलतराव शिंद्यांकडे आपला माणूस पाठवून ' बाहेरचा दत्तक होऊ देऊ नये. आपणास पेशवापद मिळवून

द्यावे म्हणजे आम्ही तुम्हास सवाकोट रुपये रोख व २५ लक्षांची जहागीर देतो.' असा करार इमान प्रमाण व बेलभंडारासह अगदी गुप्तपणे लिहून दिला. खुद्द नाना फडणीसांना याची खबर निजामाकडून समजली. नाना फडणीसांनी बाहेरचा दत्तक घ्यायचा विचार सोडून त्याऐवजी चिमणाजी रघुनाथ याला दत्तक द्यायची योजना आखली.

नाना फडणीसांच्या योजनेप्रमाणे बाजीराव व चिमाजीआप्पांना पुण्याला आणण्यासाठी १५ फेब्रुवारी १७९६ ला परशुरामभाऊ पटवर्धन जुन्नरला पोहोचले. वाटाघाटीच्या वेळी बाजीरावानी, 'गादीवर आपणच, तेसुद्धा बाजीराव रघुनाथ याच नावाने बसणार' असे स्पष्ट सांगितले. शेवटी बाजीरावांच्या सर्व अटी मान्य करून परशुरामभाऊ, बाजीराव व चिमणाजीसह ३ मार्च, सन १७९६ रोजी पुण्याला आले. बाजीराव व चिमणाजी खडकीला तळ देऊन राहिले. बाजीराव पुण्यात आल्यावर ५ मार्चच्या भेटीच्या वेळी नाना फडणीसांनी त्यांना पेशवाईची वस्त्रे स्वीकारण्याची विनंती केली. परंतु बाजीरावांनी नाना फडणीसांवर विश्वास नसल्यामुळे दौलतराव शिंदे पुण्यात येईपर्यंत काहीही करायला नकार दिला. दरम्यान सर्व रागरंग पाहून नाना २१ मार्चला संध्याकाळी तडकाफडकी साताऱ्याला व तेथून महाडला निघून गेले. पुण्यात दुसऱ्याच दिवशी बाजीरावांनी आपल्या नावे द्वाही फिरवली.

पुण्यात आल्यावर दौलतराव शिंद्यांनी करार–रकमेबद्दल निकड लावली. बाजीरावांनी, तुम्ही पुण्यात यायला विलंब केला असे सांगून करार धुडकावून लावला. यामुळे पूर्वीच्या मसलतीप्रमाणे चिमणाजी रघुनाथ २६ मे, सन १७९६ ला पेशवे झाले. दरम्यान महाडला नाना फडणीसांनी हालचाली सुरू केल्या. प्रथम इंग्रज, नागपूरकर भोसले, निजाम, यांना आपल्या बाजूला वळवले. दोन कोट रुपये व २६ लाखांची जहागीर देण्याचे मान्य करून दौलतराव शिंदे यांना आपल्या बाजूला वळवले. स्वतःच बाजीरावांना गादीवर बसवायचे ठरवले. हेच प्रसिद्ध 'महाडचे कारस्थान.'

अशा प्रकारे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनेक उलाढाली करून बाजीराव ४ डिसेंबर, सन १७९६ रोजी रविवारी रात्री (अनलनाम संवत्सर, मार्गशीर्ष शु. ५, शके १७१८), हडपसर मुक्कामी पेशवापदावर आरूढ झाले.[७५] नाना फडणीसांनी पूर्ववत् सर्व कारभार हातात घेतला. गादीवर येताच बाजीरावांनी जुन्या सरदारांचा छळ आरंभला. मार्च सन १७९७ मध्ये कर्जपट्टी, सरंजामपट्टी, भाडेपट्टी, वेतनपट्टी, वगैरे नवेच कर बसवले. यानंतर शिंदे बायांचे प्रकरण, सर्जेराव घाटगे प्रकरण, अशा अनेक घटनांना बाजीरावांना तोंड द्यावे लागले.

या दरम्यान (मरिउवि ३ पृ. ५४७) ९ जुलै, सन १७९७ ची नोंद मिळते :

" त्यांचे (श्रीमंतांचे) व अमृतरावांचेही आतून वाकडे आहे. मन शुद्ध नाही. श्रीमंत त्रीवर्ग यांचे व नानांचे कालत्रयी बनायचे नाही. "

नाना फडणीसांच्या मृत्यूनंतर चांगला, विश्वासू सल्लागारही राहिला नाही. पेशव्यांनी विठोजी होळकरना अविचारी वृत्तीने शनिवारवाड्याच्या पुढच्या चौकात १६ एप्रिल, सन १८०१ रोजी स्वतःच्या डोळ्या-देखत हत्तीच्या पायी दिल्यामुळे यशवंतराव होळकर बाजीरावांविरुद्ध चवताळून उठले. यानंतर पुणे प्रांतात धुमाकूळ सुरू झाला. पुढचे भवितव्य ओळखून बाजीरावांनी कोकणात निघून जाण्याची आधीपासून तयारी ठेवलीच होती. त्याप्रमाणे बाजीराव प्रथम सिंहगड, तेथून सुवर्णदुर्गला पळाले. थोड्याच दिवसांत होळकरांनी २५ ऑक्टोबर, सन १८०२ या दिवाळीचे (आश्विन वद्य १४) दिवशी पहाटे पुण्यावर हल्ला करून लूट व जाळ-पोळ केली. घरांना खणत्या लावल्या. शनिवारवाड्याला इजा केली नाही पण वाड्यातील चिजवस्तू, शस्त्रागार लुटले.[७६] हत्तीवरील आंबाऱ्याही नेल्या.

बाजीरावांनी पुण्यात परतावे म्हणून होळकरांनी विनंत्या केल्या. पण बाजीरावांच्या मनातील भीती गेली नाही. यानंतर पायवाटेने २५ नोव्हेंबर, सन १८०२ रोजी सुवर्णदुर्गला गेले. सुवर्णदुर्गाहून निघताना १ ते ४ डिसेंबर इंग्रजांच्या जहाजातच राहिले. वाटेत रेवदंड्याला २ दिवस मुक्काम केला. जहाजातून ८ डिसेंबरला वसईला पोहोचले. वसई मुक्कामात बाजीरावांनी मुंबईला जाऊन १० डिसेंबरला गव्हर्नर जोनाथन डंकन यांची भेट घेतली. होळकरांशी तह करण्यापेक्षा अनायसे हाती आलेल्या बाजीरावांशी तह करणे जास्त व्यवहार्य व श्रेयस्कर असल्या-मुळे पुण्याचा रेसिडेन्ट ले. क. बॅरी क्लोज व बाजीराव यांच्यात तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. तह करताना शिंदे – होळकरांशी विचार-विनिमय व्हावा ही बाजी-रावांची सूचना इंग्रजांनी फेटाळून लावली. पूर्णपणे क्लोजच्याच तंत्राने, कोणाचाही सल्ला न घेता बाजीरावांनी वसई मुक्कामी इंग्रजांना ३१ डिसेंबर, सन १८०२ रोजी, शुक्रवारी (दुंदुभिनाम संवत्सर, पौष शु. ७, शके १७२४) तह लिहून दिला.[७७] हाच मराठेशाहीच्या इतिहासातील सर्वांत नामुष्कीचा 'तैनाती फौजेचा तह.'[७८]

एका अर्थाने मराठी राज्याचे सार्वभौमत्व त्याच वेळी संपले होते. बाजीरावांच्या दुर्दैवी जीवनाबद्दल कोपरगाव निवासादरम्यानचा फलज्योतिषाचा एक उल्लेख आढळतो.[७९] ' बाजीराव याचे पत्रिकेत आहे की, यांजवळ वडिलांचे वेळचे काही राहू नये. परंतु येथे त्यांचेच आहे नवे कोण्ही दिल्हे नाही. पहिले मात्र घेऊन गेले. – ता. ३०–६–१७८८.'

१३ मे, सन १८०३ रोजी शनिवारवाड्यात, ' हिज हायनेस बाजीराव पंडित पंतप्रधान बहाद्दूर ' यांना आर्थर वेलस्लीने पेशवापदावर प्रविष्ट केले. पेशव्यांनी अधिकार धारण केल्याचा जाहीरनामा काढला. यानिमित्त पेशव्यांच्या इच्छेनुसार शनिवारवाड्यात, आर्थर वेलस्लीच्या मुक्कामावर, मुंबई, सुरत, बडोदे, कलकत्ता, मद्रास, श्रीरंगपट्टण इत्यादी ठिकाणी खुशालीच्या १९ तोफांची सरबत्ती झाली. इंग्रजांचे संरक्षण मिळाल्यामुळे स्वस्थता लाभल्यावर बाजीरावांनी सरदारांच्या नेमणुका जप्त करून स्वतःचे उत्पन्न वाढवायला सुरुवात केली. १९ जुलै सन १८१५ ला पंढरपूरला बडोद्याच्या, गायकवाडांच्या वकिलीवर ब्रिटिशांच्या विद्यमाने पुण्याला आलेल्या गंगाधरशास्त्री पटवर्धनांची हत्या झाल्यानंतर एलफिन्स्टनने बाजीरावांवर सतत पाळत ठेवली. सरदारांशी स्वतंत्र करार करून त्यांच्यावरील बाजीरावांचे स्वामित्व नष्ट केले. याही परिस्थितीत बाजीरावांनी इंग्रजांच्या विरुद्ध ब्रह्मदेशच्या बादशहाची मदत घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.* मंत्राच्या सहाय्याने इंग्रजांचा पराभव करता आल्यास पहावे म्हणून पुण्यात महादेवशास्त्री साठे यांच्या घरी एक मनुष्यही पाठविला होता.[८०]

इंग्रजांविरुद्ध तयारी करण्याच्या निमित्ताने १८१६ सालच्या अखेरला बाजीराव शनिवारवाड्यातून पर्वतीला, तेथून सासवड-पुरंदर-मार्गाने सैन्याची जमवाजमव करीत ते ३० डिसेंबरला, चाकणला पोहोचले ही बातमी समजताच इंग्रजांनी त्यांना १ जानेवारीला कोरेगावजवळ गाठले. लगेच युद्धाला तोंड लागले. युद्ध संपण्यापूर्वीच बाजीराव जेजुरी मार्गे साताऱ्याला निघून गेले. याच वेळी बाजीरावांचा हस्तक त्रिंबकजी डेंगळे पुंडावा करीत होता. एलफिन्स्टनने ' एक महिन्याचे आत त्रिंबकजीला आमचे स्वाधीन करा.' असे पेशव्यांना बजावून जामीन म्हणून त्रिंबक, पुरंदर, रायगड, सिंहगड, हे किल्ले ताब्यात देण्याची मागणी केली. बऱ्याच वाटाघाटीनंतर रायगड, ऑगस्ट, सन १८१७ मध्ये पेशव्यांना परत मिळाला.[८१]

बाजीरावात युद्धाची धमक नाही हे ओळखून एलफिन्स्टनने नवीन तहाची कलमे एकतर्फी तयार केली. या १३ जून, सन १८१७ च्या तहान्वये महाराष्ट्राबाहेरचा ३४ लाख वसुलाचा (प्रामुख्याने कर्नाटकचा) प्रदेश इंग्रजांकडे गेला. इतःपर पेशव्यांचा मराठे सरदारांशीही संबंध राहिला नाही. १८१७ सालच्या पावसाळ्यात बाजीरावांनी पंढरपूरहून माहुलीला जाऊन पुन्हा युद्धाची तयारी केली. या वेळी मराठ्यांच्या सर्व सरदारांची फौज एकत्र झाली होती. यानंतर ५ नोव्हेंबर, १८१७ ला झालेल्या खडकीच्या लढाईच्या वेळी बाजीराव पेशवे परिवारासह पर्वतीवर जाऊन देवदेवेश्वर मंदिराच्या उत्तरेकडील तटावर उभे राहून लढाई पहात होते.

* ' मराठी रियासत ' उत्तर विभाग ३ – गो. स. सरदेसाई पृ. ४८४.

पूर्वी लॉर्ड व्हेलेंशिया व बाजीराव यांची १६ ऑक्टोबर, सन १८०३ रोजी पुण्यात भेट झाली होती. त्या वेळी लॉर्ड व्हेलेंशिया यांनी ईस्ट-इंडिया कंपनीतर्फे बाजीरावांना एक लांब टप्प्याची दुर्बिण भेट दिली होती. ती दुर्बिण बाजीरावांनी या वेळी लढाई पहाण्यासाठी वापरली.

यानंतर १६ नोव्हेंबरच्या (सन १८१७) रात्री पुण्याजवळ येरवडा येथे चकमक झाली. मराठी सैन्याचा पराभव झाला. त्याच रात्री बाजीराव पुण्यातून कायमचे पळून गेले. 'कार्तिक शु. ९, शके १७३९, सोमवारी, इंग्रजांनी जुन्या वाड्यात संध्याकाळी तीन घटका दिवसास झेंडा लावला.'[८३] इंग्रजांनी शनिवारवाडा ताब्यात घेऊन तेथे आपली मुख्य कचेरी थाटली. सर्व सरकारी मालमत्तेसह पुणे शहर इंग्रजांच्या ताब्यात आले.*

आता फक्त बाजीरावांकडून राज्यत्यागाच्या अंतिम करारावर सही घेणे एवढाच उपचार बाकी राहिला होता. मराठे व इंग्रज यांच्यात शेवटची लढाई गोपाळ आष्टी येथे २० फेब्रुवारी, सन १८१८ रोजी झाली. लढाईत पेशव्यांचे शेवटचे सेनापती बापू (नरहर गणेश) गोखले कामी आले. ही लढाई संपण्याची वाट न पाहता बाजीराव इतरत्र पळून गेले. त्यांच्याबरोबर पुरुष वेषातील तीन स्त्रिया आणि त्यांची पत्नी सरस्वतीबाई एवढी मंडळी होती. △ या वेळी त्यांच्या जवळची एक कोट रुपयांची मालमत्ता इंग्रजांच्या हातात पडली. बाजीरावांच्या अनुयायांनी त्यांचे स्वामित्व झुगारावे यासाठी जनरल स्मिथ याने साताऱ्च्या राजवाड्यावर 'युनियन जॅक' फडकवल्यानंतर, एलफिन्स्टनने ११ फेब्रुवारी, सन १८१८ रोजी जाहीरनामा काढून इंग्रज सरकारच्या अमलाची द्वाही फिरवली. साताऱ्च्या छत्रपतींकडून फर्मान काढवून बाजीरावांना बंडखोर ठरवले.[८४]

---

* 'दुसरा बाजीराव जमाखर्चाचा हिशोब, रोजचा रोज, रात्री स्वतः लिहून ठेवीत असे. त्याला हिशोब लिहिण्याचा फार नाद असे. तो पुण्यातून निघून गेल्यावर इंग्रजांनी शनिवारवाडा ताब्यात घेऊन तपासला तेव्हा बाजीरावाच्या पलंगाखाली २४ वर्षांचा हिशोब उत्तम प्रकारे लिहून ठेवलेला आढळला. बाजीरावाचे हस्ताक्षरही उत्तम होते.' अशी आख्यायिका ऐकिवात आहे. मात्र मूळ आधार उपलब्ध झाला नाही. — 'महाराष्ट्र सारस्वत' भाग १, पृ. ६१६.

△ "बाजीराव याणी आपले बायकोस (△ ही सरस्वतीबाई. दुसरी बायको वाराणसीबाई या वेळी रायगडावर होती. – मूळची तळटीप) छिटाचा अंगरखा व पायजमा घालून रुमाल बांधवला होता. ती व ढमढेरे यांच्या चार दोन बायका घोड्यावर घालून बरोबर चालविल्या होत्या."– 'मराठी रियासत, उत्तर विभाग ३' गो. स. सरदेसाई (आ. स. १९३२) पृ. ५२८.

आतापर्यंतचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरल्यावर बाजीरावांनी शिंद्यांची मदत मिळवण्याचा प्रयत्न केला. पण त्यातही यश आले नाही. बाजीरावांना कुठेही आसरा मिळाला नाही. त्यांनी अखेरीस आपला वकील १६ मे, सन १८१८ रोजी महूच्या इंग्रजांच्या लष्करी छावणीत जनरल मालकमकडे पाठवला. १ जूनला जनरल मालकमने बाजीरावांना अटी स्पष्टपणे कळवल्या. या अटी सैल करून घेण्याचा बाजीरावांनी अटोकाट प्रयत्न केला. पण जनरल मालकमने जुमानले नाही. २ जूनला मालकमने बाजीरावांना निर्वाणीचा इशारा (अल्टिमेटम) देऊन निर्णय २४ तासांत कळवायला बजावले. बुधवारी, ३ जून, सन १८१८ ला (बहुधान्यनाम संवत्सर, वैशाख वद्य ३०, शके १७४०) सकाळी १०, वाजता 'श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे' अशीरगडजवळ ढोलकोट येथे जनरल मालकमच्या स्वाधीन झाले.

'Never was an Empire so foolishly lost.' असे उद्गार ग्रँट डफ सारख्याने काढले आहेत. तर 'इंग्रजांकडील पसाभर बाजरी घेऊन त्यांची चाकरी करावी परंतु यांचे (पेशव्यांचे) रुपये मशाल अबदागिरी नको' असे उद्गार एका देशी उच्च पदस्थ अधिकाऱ्याने दादोबा पांडुरंग यांचेजवळ काढले होते.[८८]

शरणागतीच्या वाटाघाटींमध्ये बाजीरावांना तैनात किती असावी यावर एकमत होईना. कारण पूर्वी इंग्रजांनी अमृतरावांना मंजूर केलेली ८ लाखांची तैनात बाजीरावांच्या मनात बोचत होती. अमृतरावांची तैनात बंद व्हावी यासाठी बाजीरावांनी जंग जंग पछाडले होते. हे प्रकरण इंग्लंड व हिंदुस्थान दरम्यान कैक वर्षे धुमसत होते. आता, अमृतरावांपेक्षा कमी तैनात असू नये असा आग्रह धरून हट्टाने नेमणूक मिळवली, नाही तर, इंग्रजांनी यापेक्षा कितीतरी कमी रक्कम मंजूर केली असती. अखेरीस मालकमने कंपनी-सरकारच्या वतीने सालिना ८ लाख रु. नेमणूक मान्य केली.*

बाजीरावांच्या उत्तरेकडील प्रवासाच्या दरम्यान त्यांचे निवासस्थान नक्की करण्यात येणार होते. मोंघीर. गोरखपूर, मथुरा, वाराणसी, बिठूर या गावांचा विचार चालू होता. दिल्लीला राहण्याचीही बाजीरावांनी तयारी दर्शवली होती. पण ही कल्पना लॉर्ड हेस्टिंग्ज्ने राजकीय कारणास्तव नाकारली. मोंघीरचा

---

* "बाजीरावाला दिल्या जाणाऱ्या रकमेतून गंगा नदीचा नवीन कॅनॉल बांधता आला असता किंवा कलकत्त्यापासून दिल्लीपर्यंत रेल्वेलाइन बांधता आली असती."– Delhi Gazettee, 5 Feb. 1854.

ही नेमणुकीची रक्कम एक रकमी न देता दरमहा ६६,६६६ रु. ६ आणे ३ पै. याप्रमाणे चुकती केली जात असे. – त्रै. १८ : ४ पृ. १४१.

उन्हाळा बाजीरावांना मानवणे शक्य नव्हते, म्हणून मोंघीर बाद झाले. एखाद्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी उर्वरीत आयुष्य घालवण्याची बाजीरावांची इच्छा होती. तीर्थक्षेत्रे नाहीत म्हणून बाजीरावांनी गोरखपूर बाद केले. तुलनेने सरहद्दीजवळ असल्यामुळे सरकारने मथुरा नाकारले.

प्रथम वाराणसीला स्थायिक व्हायची बाजीरावांची इच्छा होती.[८५] त्यांचा धर्मभोळेपणा इंग्रजांना माहिती होता. एखाद्या प्रतिष्ठित हिंदू तीर्थक्षेत्राचे ठिकाणी बाजीरावांनी स्थायिक होणे इंग्रजाना त्रासदायक ठरले असते. यामुळे लॉर्ड हेस्टिंग्जने वाराणसीही बाद केले. वाराणसीच्या लोकांमध्ये 'माजी पेशवे' म्हणून राहणे बाजीरावांना कमीपणाचे वाटले असते हेही एक कारण होतेच. या विषयावर बरेच दिवस काथ्याकूट चालू होता.[८६]

कानपूरजवळ बिठूरला बाजीरावांनी स्थायिक व्हावे असे सरकारकडून सुचवण्यात आले. बिठूर हे तीर्थक्षेत्र नव्हते, हवा अनारोग्यकारक होती, अशा कारणांमुळे बिठूर बाजीरावांना पसंत नव्हते. परंतु कानपूरसारखे मोठे ठाणे जवळ असल्यामुळे इंग्रजांना ते फारच सोयीस्कर होते. लॉर्ड हेस्टिंग्जच्या आग्रहामुळे अखेरीस बाजीरावांनी बिठूर मान्य केले.[८७]

दरम्यान शरणागतीनंतर १२ जूनला नर्मदा ओलांडली. पुढे १७ ऑगस्टला त्यांनी उत्तरेकडे कूच केले. बाजीरावांच्या इच्छेप्रमाणे त्यांचे जुने स्नेही कॅ. लो यांना उत्तरेकडे बाजीरावांसह राहण्याची परवानगी देण्यात आली. पुढे कॅ. लो बिठूरचे कमिशनर नेमले गेले. बाजीरावांचा उत्तरेचा प्रवास कर्नल स्किनर याच्या देखरेखीखाली बंदोबस्ताने सुरू झाला. राजपुताना – अजमेर – मथुरा – दिल्ली असा प्रवास व्हायचा होता. प्रथम मथुरेला दोन महिने मुक्काम झाला.[८८] दरम्यान ऑक्टोबर, सन १८१८ मध्ये लॉर्ड हेस्टिंग्ज्ने बाजीरावांनी बिठूरलाच स्थायिक व्हावे असा अंतिम निर्णय दिला. त्यानुसार फेब्रुवारी, सन १८१९ मध्ये बाजीराव बिठूरला पोहोचले.

बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त हा गाव व त्याच्या आसपासचा लहानसा मुलूख त्यांना जहागिरीदाखल देण्यात आला होता. हा प्रदेश सुमारे ६ चौरस मैलांचा होता. व्यवस्थेसाठी स्वतंत्र इंग्रज कमिशनर नेमला होता. बंगाल रेग्युलेशन्स १८३२ (I) नुसार बाजीराव पेशवे आणि त्यांची बिठूरची 'प्रजा' यांना ब्रिटिश कायदे लागू होत नसत. हा प्रदेश कानपूर कोर्टाच्या न्यायालयीन कक्षेबाहेर ठेवण्यात आला होता.[८९]

बाजीरावांच्या जहागिरीतील प्रजेसंबंधी त्यांचे अखत्यार व इतर कायदेकानू तयार व्हायला १८३२ साल उजाडले. हे कायदे म्हणजे 'Bengal Regulations (I of 1832) 1832', ७ फेब्रुवारी सन १८३२ पासून अमलात आले. या

जहागिरीला बाहेरचा (ब्रिटिश हद्दीतील) दिवाणी-फौजदारी कायदा लागू नसून तेथे गव्हर्नर जनरल – इन् – कौन्सिल ने वेळीवेळी सुपूर्त केलेल्या अधिकारान्वये बाजीरावाने न्याय द्यावा. बाजीरावांचा प्रजाजन जहागिरीबाहेर गुन्हा करील किंवा बाहेरचा इसम जहागिरीत येऊन गुन्हा करील तर त्याला ब्रिटिश कायद्यान्वये शिक्षा व्हावी वा न्याय मिळावा असा या कायद्याचा (रेग्युलेशन्स) अर्थ होता.

या प्रदेशातील १०-१५ हजार मनुष्यवस्ती हीच बाजीरावांची प्रजा. बिठूरला पोहोचल्यानंतर त्यांची ' श्रीमंत पेशवा पंडित पंतप्रधान ' ही बिरुदावली जाऊन ते ' महाराजा बाजीराव ' झाले. मराठी पदवी ' श्रीमंत ' किंवा ' महाराज ' अशी असून इंग्रज ' हिजहायनेस ' असे संबोधित असत.

या राज्यत्यागाबद्दल इंग्रजांची प्रतिक्रिया. :

" As soon as he (Bajee Rao) left for Benarus Deccan & Konkan breathed freely almost for the first time in their history and the country set out like a giant in a new race of existance "[१०]

देशी प्रतिक्रियाही अशाच आढळतात. बिठूरला लागणारे देशी पदार्थ, वस्तू, तसेच माहेरवाशिणी, सासुरवाशिणींची ने–आण, विवाह-योजनेत मध्यस्थी, ही कामे लोकहितवादींचे वडील हरीपंत देशमुख करीत असत.[११]

बिठूरला बाजीरावांचे इंग्रजांशी संबंध स्नेहभावाचे असत. या काळात त्यांनी इंग्रजांना वेळोवेळी पैशाची व इतरही शक्य ती मदत दिली होती. अफगाण-युद्धाच्या वेळी (सन १८३९) ६ लाख रुपयांची देणगी, तर पंजाब युद्धाच्या वेळी (सन १८४४) एक हजार स्वार व पायदळ स्वखर्चाने दिले होते.*

' ब्रह्मावर्त येथील रेसिडेन्टास सणवार वगैरे उत्सव प्रसंगी आपल्या दरबारात बोलावून त्यांचा प्रेमपूर्वक आदर सत्कार करीत असत. त्याचप्रमाणे कानपूर येथील बडे बडे युरोपियन अधिकारी कोणी भेटीस आले तर त्यांच्या आदरपूर्वक भेटी घेत असत. त्यामुळे बाजीराव साहेबांबद्दल सर्वांचे मत चांगले असे. '[१२]

बाजीरावांना बिठूरच्या वास्तव्यात, वारसा चालवायला आपल्याला मुलगा नाही ही एकच खंत वाटत असे.

१८३६ साली ' मॅक्सवेल बारनेट ॲन्ड कंपनी' चे ॲडाम मॅक्सवेल आणि त्यांचे साथीदार उमरावअली या दोघांनी बाजीरावांना, ' आम्ही तुमची पेशवा-

---

* बाजीरावसाहेब एकदा म्हणाले होते, ' आजन्मात तांब्याचे नाण्यास शिवलो नाही. रुपे, सोने, ह्या शिवाय इतर धातूस स्पर्श केला नाही.' – त्रै. १८ : ४ पृ. १४६.



बाजीराव रघुनाथ पेशवे

(श्री. वि. का. राजवाडे ह्यांनी बिठूरहून मिळवलेले, उतारवयातील चित्र)

पदावर पुन्हा स्थापना करू ' अशी लालूच दाखवून एक कारस्थान उभे केले. या कामापोटी एक हप्ता म्हणून या दोघांनी बाजीरावांकडून साडे अकरा लाख रु. लाच घेतली होती. हे कारस्थान अचानक उघडकीला आले. संपूर्ण प्रकरणाची

न्यायालयीन चौकशी करून इंग्रजांनी दोघांना कडक शिक्षा फर्मावली. या प्रकरणात बाजीरावांचा फारच थोडा संबंध आढळला.[१]

बाजीरावांनी ११ डिसेंबर सन १८३९ ला मृत्युपत्र केले. त्यावर ३० एप्रिल सन १८४१ ला निर्णायक सही केली. या दस्तऐवजामुळे उत्तर प्रदेशाच्या लेफ्ट. गव्हर्नरने १८४० सालचा पेशव्यांबद्दलचा हुकूम रद्द करून, नानासाहेबांना जरूर ते सहाय्य देण्यासाठी इंग्रज कमिशनर मॅन्सनला जरूर तो हुकूम फर्मावला. उपरोक्त मृत्यु पत्रान्वये नानासाहेबांना वारस व उत्तराधिकारी नेमले. इतर कोणाही परिवार-सदस्यासाठी स्वतंत्र नेमणूक किंवा तरतूद ठेवली नाही.

१८४० साली बाजीरावांची प्रकृती खालावली. मार्च, सन १८४१ मध्ये त्यांना प्रथम अर्धांगाचा झटका आला. बाजीरावांचा मृत्यू झाल्यास पार पाडायच्या कारवाईसंबंधी वायव्य प्रांताच्या सरकारने बिठूर – कमिशनरच्या मार्गदर्शनासाठी स्वतंत्र नियमावली तयार केली.

यावेळी खबरदारी म्हणून बिठूर–कमिशनरने उत्तर प्रदेशच्या लेफ्ट.–गव्हर्नरला बाजीरावांच्या मृत्यूनंतरच्या बंदोबस्ताविषयी विचारले. उत्तर आले, "खजिन्याची आणि मूल्यवान वस्तु-भांडाराची कुलुपे मोहोरबंद करून पक्का बंदोबस्त ठेवायचा." या आजारपणातून बाजीरावांची प्रकृती सुधारल्यामुळे विशेष बंदोबस्ताची वेळ आली नाही.

१८४२ साली उत्तर हिंदुस्थानात दंगे झाले. त्या वेळी बाजीराव व बांद्याचे तत्कालीन नवाब झुल्फिकारअली, काही कामानिमित्त गवर्नर–जनरलला भेटायला अलाहाबादला गेले होते. त्यांचा प्रस्तुत दंग्याशी संबंध असल्याच्या संशयावरून त्यांना कर्नल स्लिम यांच्या पूर्व परवानगीखेरीज अलाहाबाद सोडायची मनाई केली होती.

१८४२ सालच्या काही इंग्लिश व मराठी वृत्तपत्रांमध्ये या दंग्यांच्या बातम्या वाचायला मिळतात. त्यांपैकी 'ज्ञानसिंधू' मधील* बातमी :–

दुसऱ्या बाजीरावाचें बंड

"चालत्या महिन्याचें ११ व्या तारिखेच्या आग्रा अखबार पत्रांत अलाहाबादचे अेक पत्र छापिले आहे. त्यात असें आहे कीं, बांदा येथील नवाब "झुल्फिंकार खान" व पेशवे "बाजीराव" हे उभयतां गव्हर्नर–जनरल साहेबांची भेट घेण्या-

* अंकाची तारीख दिलेली नाही. परंतु तपशीलावरून ऑगस्ट महिना असावा असे दिसते. संदर्भ– "बरोबर शंभर वर्षांपूर्वी –" संग्राहक : श्री. य. न. केळकर. 'सह्याद्रि' मासिक जुलै, सन १९४४, पृ. ४२४.

करिता अलाहाबाद येथे आले आहेत. ऑगस्टच्या ४ तारिखेस लॉर्डांची व त्यांची भेट मोठ्या समारंभाने झाली. आणि त्याच दिवशी सायंकाळी गव्हर्नर.-जनरल साहेबास कर्नल "अिशलीमन" साहेबांचे एक पत्र आले. त्यांत असें सुचविलें आहे की, हिंदुस्थानात जो अलीकडे जो दंगा झाला होता त्यांत मुख्यत्वे या उभयतांचेच अंग आहे असे लॉर्डास लिहून आल्यानंतर लॉर्डांनी पेशवे "बाजीराव" व नबाब "झुल्फिकारखान" या उभयतांस कर्नल "अिशलीमन" साहेब याच्याकडून दुसरे काही लिहून येईपर्यंत अलाहाबाद सोडून जाऊ नये असा हुकूम केला."

बाजीरावांनी १८४४ साली आपली संपत्ती व पेन्शन आपल्या दत्तक मुलाला मिळावी म्हणून कंपनी-सरकारच्या संचालकांपर्यंत खूप प्रयत्न केले. त्या वेळी बाजीराव स्वतः हयात असल्यामुळे, या प्रश्नाचा तूर्त विचार करण्याची आवश्यकता नाही, अशा आशयाचा जबाब कंपनी-सरकारकडून आला. (नंबर ५६, ता. ६-११-१८४४).[९२]

१८४७ सालच्या सुमाराला वयोमानामुळे त्यांची दृष्टी अधू होऊन जवळ जवळ अंधत्वासारखी स्थिती झाली होती. तरीही स्मरणशक्ती शेवटपर्यंत शाबूत होती. "पर्वणी होती म्हणून स्नानास गेले. स्नानाचे वेळी पोहले. संध्या, भोजन होऊन निजण्याचे वेळी हिशोबावर सही करण्याची वेळ आली. सही करिताना हात कांपू लागला. तोच वायु झाला... बाजीरावाचे अर्धे अंग व दोन्ही डोळे वायूने गेले. डोळे गेल्यावर पाच सहा वर्षांनी स्वर्गस्थ झाले."[९४]

ते शरीराने धष्टपुष्ट व उमदे दिसत. चेहरा उतारवयापर्यंतही बाळसेदार व वयाचे मानाने खूप तरुण दिसे, असे लोक सांगत.[९५] इतर पेशव्यांच्या तुलनेने बाजीरावांना मिळालेले मानसिक – शारीरिक स्वास्थ्य, बेफिकीर, सुखासीन वृत्ती हेच याचे कारण असावे.

कन्याविक्रयाविरुद्ध हूकूम काढणे हीच एक गोष्ट बाजीरावांच्या जीवनात त्यातल्या त्यात भली दिसते.[९६] यांनी ९ वर्षावरील कोणीही मुलगी अविवाहित राहू नये असा हुकूम काढला होता. बाजीरावांच्या खर्चाच्या नोंदीत 'विलासप्रकरण' हे मोठे कलम असे. नाटकशाळा, कलावंतीणी, अनेक प्रिय पात्रांच्या नावे खर्च पडले आहेत.[९७] बाजीरावांच्या नावे लिहिलेली त्यांच्या काही प्रिय पात्रांची पत्रेही उपलब्ध आहेत.[९८]

असे म्हणतात की, बाजीरावांनी स्वतःच्या मृत्यूच्या वेळी आपल्या मुलांना, निकटवर्तीयांना इंग्रजांशी स्नेहभावाने वागा असे सांगितले होते. मरणापूर्वी एकदा पुण्याला भेट द्यायची बाजीरावांची तीव्र इच्छा होती. ती अर्थातच

पूर्ण झाली नाही.*

काही दुखण्यामुळे ते जानेवारी सन १८५१ मध्ये विशेष आजारी पडले. पौष शु. ९ ला (११ जानेवारी) आजार बळावला. या आजारपणात डॉ. मॅकिकन, डॉ. चेक यांनी औषधोपचार केले. थोड्याच दिवसांनी मंगळवार, तारीख २८ जानेवारी, सन १८५१ रोजी सकाळी ८–९ च्या सुमाराला (साधारणनाम संवत्सर, पौष वद्य १२, शके १७७२) त्यांचे बिठूरला राहत्या वाड्यात निधन झाले. त्यांचे और्ध्वदेहिक दुसरे नानासाहेब पेशवे यांनी केले. त्याच दिवशी दुपारी सर्व विधी पूर्ण झाले. साठ मण चंदनाची व तुळशीची काष्ठे लागली. बाजीरावांनी अग्निहोत्र घेतले असल्यामुळे वाटेत तीन ठिकाणी स्नाने घालावी लागली.[१०] उत्तरक्रिया व दानधर्म मिळून १ लाख रु. खर्च झाले. या दिवशी चंद्राला व सूर्याला खळे पडले होते. Δ

बाजीरावांच्या मृत्यूची बातमी कांही दिवसांनी पुण्याच्या 'ज्ञानप्रकाश' वृत्तपत्रात आणि इतर १–२ वृत्तपत्रांत एका कोपऱ्यात चार ओळीत छापून येण्यापलीकडे प्रजेने त्यांच्या मृत्यूची दखल घेतली नाही. कारण आयुष्यभराच्या नकर्तेपणामुळे व दुराचारांमुळे त्यांनी प्रजेची सहानुभूती गमावली होती. बिठूरचे कमिशनर मॅन्सन यांनी, मृत्यूची बातमी ३१ जानेवारीला वरिष्ठ सरकारला कळवली. त्रै. १८ : ४ मध्ये 'पौष वद्य १२, शके १७७२ रोजी मृत्यू पावले' असा स्पष्ट निर्देश आहे. 'इतिहास संग्रह' नोव्हेंबर १९१२ (पृ. २५) मध्ये २८-१-१८५१ हीच तारीख तिथीसह बिनचूक दिली आहे. याखेरीज आणखी एक अधिकृत नोंद मिळते.[११] 'Baji Rao II died on 28 th Jan. 1851' यावरून, काही ठिकाणी लिहिल्याप्रमाणे बाजीराव पौष शु. १२, म्हणजे १४ जानेवारीला नव्हे, तर वद्य १२ म्हणजे २८ जानेवारीला वारले.

'ज्ञानोदय' वृत्तपत्राच्या १५ फेब्रुवारी, सन १८५१ च्या अंकात दुसरे बाजीराव पेशवे वारल्याची बातमी आढळते :

---

* इंग्रजांच्या कराराप्रमाणे बाजीरावांना तीन खून (मृत्यूदंड), अमृतरावांना दोन खून, चिमणाजीला एक खून असे माफ होते. बाजीरावाला डाकेतून पत्र पाठवण्याचा खर्च पडत नसे. त्यांना डाकेतून १ शेर, अमृतरावांना ३/४ शेर, चिमणाजीला १/२ शेर वजनाचा लखोटा पाठवण्याचा अधिकार होता – त्रै. १८ : ४, पृ. १४१.

Δ टोपी काढून लवून सलाम करणे याला जनरेली सलामी (Genral's Salut) म्हणत. नानासाहेबांना 'बाजीरावाचे तेरावे दिवशी 'तुम्हाला ही सलामी मिळणार नाही. पेन्शन मिळणार नाही. आजपासून तुम्ही रयत आहात' अशी वर्दी कमिशनरकडून आली. – त्रै. १८ : ४ पृ. १४७ – ४८.

श्रीमंत बाजीरावसाहेब यांचे मरण

" २८ जानेवारी १८५१ रोजी रावबाजीचा मृत्यू झाला. ३२ वर्षे ब्रह्मावर्तास पेन्शन घेऊन राहिले. ते थोर कुळातील व मोठ्या योग्यतेचे पुरुष होते. तथापि वर्तणूक व आचार चांगला नव्हता. यास्तव अपकीर्तीही तशीच राहिली."

बाजीरावांच्या ह्यातीत, बिठूरच्या कारभाराचा आढावा घेऊन त्याचे इतिवृत्त कंपनी-सरकारला कळवण्याची पद्धत असे. सन १८३१ च्या इतिवृत्तात ' फेथफुल ' नावाचा हंगामी कमिशनर म्हणतो :

"इ. स. १८२५ पासून बाजीरावाच्या प्रकृतीत काही एक बदल नाही. ती आहे तशीच आहे. पेशवा व्यायाम फार थोडा घेतो. घोडा व हत्ती यांच्यावर तो चुकूनसुद्धा स्वारी करीत नाही. स्वारीचे सर्व व्यवहार पालखीतून चालतात. दसऱ्याची स्वारीसुद्धा पालखीतूनच निघते.'

बाजीरावाच्या मृत्यूनंतर बिठूरच्या-कमिशनरची कचेरी बंद करण्याचे सरकारी फर्मान ३० ऑक्टोबरला (सन १८५१) हंगामी कमिशनर मोर्लंडला मिळाले-३१ ऑक्टोबर पर्यंत कचेरी बंद करावयाची होती. त्या वेळी कचेरीत विशेष समारंभाच्या वेळी वापरायच्या मौल्यवान वस्तू पुढीलप्रमाणे होत्या : 'एक चांदीची छत्री, एक चांदीचे पानदान, अत्तरदान, गुलाबपोश.' या वस्तू नंतर आगऱ्याच्या लेफ्ट. गव्हर्नरकडे पाठवण्यात आल्या.

मेजर मॅन्सन हे सन १८५१ पर्यन्त सुमारे २० वर्षे बिठूरचे कमिशनर होते. ते बाजीरावांच्या हितसंबंधांची विशेष काळजी घेत. शिवाय २० वर्षांच्या सहचरामुळेही बाजीरावांना त्यांच्याबद्दल आपुलकी वाटे. बाजीरावांच्या मृत्यूनंतर त्यांचे पेन्शन त्यांच्या दत्तक मुलाकडे चालवण्याची मॅन्सनने कंपनी-सरकारकडे शिफारस केली होती. ती अर्थातच सरकारने अमान्य केली.[९९] बिठूर-कमिशनरचा शिक्का मे सन १८५२ मध्ये वायव्य सरहद्दप्रांताच्या सरकारकडे जमा करून घेऊन नंतर नष्ट करण्यात आला.

बाजीरावांनी बिठूरला सरसतेश्वर मंदिरासमोर एक घाट बांधला. त्याला 'महाराज घाट' म्हणत. वाराणसीत भैरवमंदिराजवळ एक लाकडी वाडा बांधला.[१००]

'बाजीरावसाहेब पेशवे यांनी कालभैरवासंनिध मोठा लाकडी वाडा बांधिला आहे. त्याक्षेत्री लाकडी काम एवढेच आहे. बाकी सर्व घरे दगडाची आहेत. शिवाय पेशवे यांनी मणिकर्णिकेसमीप व्यंकटेशाचे मंदिर बांधिले आहे. ते बहुत चांगले आहे. ब्राह्मणभोजन करण्याची सोय फार चांगली आहे. सन १८५७ चे बंड समाप्त झाल्यावर वाडा व व्यंकटेशाचे मंदिर ही इंग्रज-सरकारने शिंद्यास बक्षीस दिली.'*

* प्रत्यक्षात शिंद्यांनी वाडा लिलावात विकत घेतला होता.

याखेरीज त्यांनी ब्रह्मघाटाचा जिर्णोद्धार केला व आसी घाटाजवळ आणखी घाट बांधला.

बाजीरावांबद्दल वि. का. राजवाडे म्हणतात :[६६] ' एकंदरीत पुरुष निष्काळजी व बालीश खरा. स्वशरीर संरक्षण एवढीच या गृहस्थाची काळजी. ह्यापलीकडे दुसरी जबाबदारी त्याने ओळखली नाही व ओळखण्याचे त्याच्या अंगात सामर्थ्यही नव्हते. साम्राज्य, तत्संबंधक राष्ट्राच्या पुढाऱ्यावरील जबाबदारी, प्रजेचे ऋण वगैरेची जाणीव या पुरुषाला भासलीच नाही.'

न. चिं. केळकर म्हणतात :[६७] ' बाजीराव महत्त्वाकांक्षी होता. हुषार होता. धूर्त होता. पेशव्यांचे वर्चस्व हिंदुस्थानात पुन्हा स्थापन करावे असे त्याला वाटत असे. पण करारी व दृढ बुद्धीचा नसल्यामुळे त्याचे कोणतेही हेतू सिद्धीस गेले नाहीत.'

' प्रभाकर ' या वर्तमानपत्रातील ' कोकणस्थाचे ' पत्र प्रसिद्ध आहे. त्यात दुसऱ्या बाजीरावाबद्दल उल्लेख आहे : " पुण्यात अखेरचा पेशवा बाजीराव हा तर इतका मुर्ख होता कीं, याणें आळसी निरोपयोगी आसल्या लक्षावधी ब्राह्मणांस रोज साखरभात आणि बुंदी यांचीं जेवणें द्यावीं आणि फौजेस रुकसत दिल्ही. आतां असल्या मुर्खत्वास काय म्हणावें पहा बरें जेंव्हां इंग्रज लोकांहीं पुणें घेतले. तेंव्हां ज्या ब्राह्मणांनीं त्यांचे अन्न खाल्ले ते उपयोगी पडले किं काय ? तेंव्हां पहा बरें जर त्यांचे वाटचें त्या अन्नाचे पैक्यानें पलटणी ठेविल्या असत्या तर किती उपयोगी पडल्या असत्या. " – १३ मार्च १८४२ इसवी.

बाजीरावांनी पेशवाईवर असताना – पेशवाईवर येण्यापूर्वीची धरून – सहा व बिठूरला उत्तरकालीन वास्तव्य असताना पाच अशी एकूण अकरा लग्ने केली.* त्यांना विवाहित पत्नींपासून पुण्याला व बिठूरलाही मुले झाली होती. पण त्यांपैकी बिठूर मुक्कामी वयाच्या ६८ व्या वर्षी झालेली योगाबाई व वयाच्या ७२ व्या वर्षी झालेली कुसुमाबाई (बयाबाई आपटे) या दोघी मुलींचा अपवाद वगळता इतर अपत्ये जगली नाहीत.

बाजीरावांच्या पत्नींची माहिती : **पत्नी :** (१) भागिरथीबाई. विवाह १६ जुलै, सन १७८६ रोजी (पराभवनाम संवत्सर, आषाढ वद्य ५, शके १७०८)

---

* को गोहागर येथे वो राजश्री विनायकभट खरे यांची कन्या वर्षे ६ सरून ७ वर्ष आषाढ मासी लागेल ती मूल चांगल्यात दृष्टीस पडली तेव्हा वेदशास्त्रसंपन्न राजश्री नीळकंठशास्त्री थत्ते हरणईत होते त्यास दाखविली.... (दि.२२-२-१८०३) " पेद ३२ पृ. २३.

'ज्येष्ठ शु. १, रविवारी रात्रौ जाहाले.'[१०] कार्य कोपरगावी झाले. लग्नानंतर ह्या १९ जुलै रोजी सासरी दाखल झाल्या. या आजारी पडल्या तेव्हा भगताकडून इलाज करण्यात आले होते. मृ. सन १७९३. यांची उत्तरक्रिया गोपिनाथभट कर्वे यांनी केली.[९२] पिता धोंडभट भागवत. हे रघुनाथराव पेशव्यांचे आश्रित होते. सवाई माधवरावांनी धोंडभटांना बोलावून त्यांची मुलगी बाजीरावांना द्यावी अशी आज्ञा केली.[१०१] या सोयरिकीमुळे बाजीरावांनी धोंडभटांना ६००० रु. उत्पन्नाची तीन गावे इनाम दिली.

पत्नी : (२) सरस्वतीबाई. विवाह १८ जून सन १७९३, मंगळवार, (प्रमादिनाम संवत्सर, ज्येष्ठ शु. ९, शके १७१५) हे कार्य जुन्नर मुक्कामी बाजीराव कैदेत असताना झाले. माहेरचे नाव दुर्गा, सत्यभामाबाई नाही.[१०२] जांब गावी शिंद्यांच्या कैदेत असताना ६ जानेवारी सन १७९७ रोजी, शुक्रवारी, (अनलनाम संवत्सर, पौष शु. ८ शके १७१८) वारल्या.[१०३] यांची उत्तरक्रिया बाजीरावांनी, त्यांचा मुक्काम पुण्याजवळ मुंढवे गावी असताना केली. पिता धोंडभट नारायण मंडलीक (प्रसिद्ध विचारवंत रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांचे आजोबा). धोंडोपंतांना बाजीरावांनी पालखीचा मान दिला होता. पालखीत बसून धोंडोपंत रोज बाजीरावांच्या दर्शनासाठी सरकारवाड्यात (शनिवारवाड्यात) जात असत.

पत्नी : (३) राधाबाई. विवाह १६ फेब्रुवारी सन १७९७ रोजी (माघ वद्य ६, शके १७१८) गुरुवारी पुण्याजवळ मुंढवा येथे गोरज मुहूर्तावर झाला.[९५] सकाळी देवप्रतिष्ठा झाली व संध्याकाळी विवाह झाला. विवाहानिमित्त ओंकारेश्वराच्या बागेत ब्राह्मणभोजन झाले.[१०४] ह्या फार सुस्वरूप होत्या. यांना व्यवहारात 'ताईसाहेब' म्हणत. या बाजीरावांच्या विशेष लाडक्या होत्या. यांचे गर्भादान मंगळवार, ४ मार्च, सन १८०० रोजी (फाल्गुन शु. ८ शके १७२१) झाले.[१०५] मूल झाल्याचा दाखला नाही.

यशोदाबाई पेशव्यांना कैदेसाठी रायगडला नेले त्या वेळी लौकिक शोभेसाठी जाऊ सौ. सीताबाईसह याही गेल्या होत्या. धामधूम संपल्यानंतर यशवंतराव होळकरांनी २ जानेवारी सन १८०३ ला, राधाबाईंना लवाजम्यासह पुण्याला पोचवले. त्यापूर्वी रायगड व होळकरांच्या कैदेत महाड येथे त्यांचा मुक्काम होता. पुण्यात अमृतरावांचा मुलगा विनायकराव बापू राधाबाईंना सामोरा गेला. त्याने बाईंना सन्मानपूर्वक पुण्याजवळ भांबुर्डा येथे अमृतराव पेशव्यांच्या गोटात पोचवले.

यांचा मृत्यू सोमवारी १९ मे, सन १८०६ रोजी (क्षयनाम संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध १, शके १७२८) शनिवारवाड्यातच झाला.[१०६] उत्तरक्रियेचा खर्च १,१३,९९६ रु. झाला. 'प्रथम दिवसापासून क्रिया नारायणराव रामचंद्र भट याजकडून करविली.'



निर्मिती सन १८१३. आगीचे भक्ष्यस्थानी १३ मे, सन १८७९. एकूण क्षेत्रफळ १४० फूट × १५० फूट = २१००० फूट. पूर्वेकडे मुख्य दरवाजा. उत्तरेकडे छोटा दरवाजा. जोते ३ फूट उंच. चित्रात मनोऱ्यावर दिसणारे घड्याळ सरदार विंचूरकरांनी पेशव्यांना भेट दिले होते.

पुण्याचे श्री. विनायक विष्णु रानडे, बी. ए., एल्‌एल्. बी., (ज. स. १८६५ मृ. स. १९४९) यांनी तेव्हाच्या उपलब्ध माहिती व स्मरणाच्या आधारे वाड्याचे एक परस्पेक्टिव १८८३ साली काढले होते. पुढे त्यांनी चित्रकाराकडून आधारभूत चित्र काढवून घेतले, तेच येथे छापले आहे.

पिता चिंतामण ऊर्फ दाजिबा हरी फडके.[१०७] (सेनापती हरीपंत फडके यांचे ज्येष्ठ चिरंजीव.)

या विवाहाच्या निमित्ताने दाजिबा फडक्यांनी आपली 'मोतीबाग' बाजीरावांना आंदण दिली. १८०८ साली बाजीरावांनी तिथेच विश्रामबागवाडा बांधला. पुण्यात 'राधाबाईचा बाग' असल्याचा एक उल्लेख 'तुळशीबागवाले दप्तरात,'[१०८] आढळतो. 'पुण्याजवळ कोथरूड येथे देवाची स्थापना करून तो बाग बाजीराव पेशवे यांस दिला.'' [१०९]

पत्नी : (४) वाराणसीबाई. माहेरचे नाव समजले नाही. विवाह मंगळवार ११ जून सन १८०६ रोजी (क्षयनाम संवत्सर, ज्येष्ठ वद्य १० शके १७२८) पुण्यात नाना फडणिसांच्या वाड्यात झाला. येथेच फाटक–रास्ते (व्याही) मंडळींना जानोसा दिला होता. व्याह्यांची सर्व व्यवस्था पेशव्यांचे दिवाण सदाशिव माणकेश्वर यांनी जातीने पाहिली होती. विवाहानिमित्त चार दिवसांचा शिधाखर्च सुमारे १६००० रु. झाला. रमण्यात सुमारे २६००० रु. दक्षिणा वाटली. सुमारे ५००० रु. चे कापड वाटले. [११०]

मंगळवारी ६।। घटकांपूर्वी लग्न झाले. बुधवारी ६ घटिका पहाटे, शनिवारवाड्यात गृहप्रवेश झाला. नंतर दोन घटकांनी उभयता वधू - वर शुक्रवारवाड्यात गेली. तेथे घटकाभर राहून पुन्हा नानावाड्यात आगमन झाले. गुरुवारी सुनमुख झाले.

बाजीरावांच्या पसंतीसाठी अनेक मुली पुण्यात आणल्या होत्या. त्यांपैकी एकीशी विवाह - निश्चय होऊन कार्य-तिथीही पक्की ठरली होती. एवढ्यात फाटक – रास्त्यांची मुलगी त्यांच्या पाहण्यात आली. नजरेत भरली आणि पहिला निर्णय बदलून हिच्याशी लग्न ठरले. जिच्याशी प्रथम विवाह ठरला होता, तिचा नंतर साठे घराण्यातील मुलाशी विवाह लावून देण्यात आला.

वाराणसीबाईंच्या पत्रिकेत पुत्रयोग आहे, असे समजल्यावरून बाजीरावांनी त्यांच्याशी लग्न केले अशी नोंद आहे. विवाहानंतर सहाच महिन्यांनी मुंबईहून इंग्रज डॉक्टर बोलावून २२ डिसेंबर सन १८०६ रोजी त्यांना देवी काढवून (इनॉक्युलेशन) घेण्याचा यशस्वी प्रयोग झाला. तत्कालीन समाजात ही अभिनव गोष्ट होती.* याबद्दल बाजीरावांनी त्या डॉक्टरांना २००० रु. बक्षिस दिले.

---

* पुण्यात या काळात देवीची लस टोचण्याचे काम यशस्वीपणे व मोठ्या प्रमाणावर चालल्याचे बाजीरावांच्या कानावर आले होते. ब्रिटिश रेसिडेन्ट ले. क. बॅरी क्लोज आणि बाजीराव यांचे स्नेहसंबंध होते. बाजीरावांनी वाराणसीबाईंना लस टोचण्याची इच्छा एकदा ले. क. क्लोजजवळ बोलताना व्यक्त केली. त्यावर क्लोजने बाजीरावांची खात्री पटल्यावर क्लोजच्या खास देखरेखीखाली डॉ. कोट्स्कडून वाराणसीबाईंना देवी काढवल्या.–' इतिहासातील सहली ' खंड २, पृ. २५.

पुण्यात बुधवारवाडा बांधताना त्यात वाराणसीबाईंच्या आवडीनुसार खास सोयी करवून घेतल्या होत्या. यांना बाजीरावांचे गुरु वे. शा. सं. रामचंद्रशास्त्री साठे संस्कृत रघुवंश शिकवीत. बाईंची वाणी मधुर आणि शुद्ध असे, असा पंडिता रमाबाईंच्या चरित्रात (पृ. १५) उल्लेख आहे.

पुढे काही महिन्यांनी वाराणसीबाईंना फिट्‌स्‌चा आजार जडला. यामुळे पुत्रसंततीची आशा दुरावली या समजुतीने बाजीरावांनी आणखी एक विवाह केला. विवाहापूर्वीपासून फिट्‌स्‌ येत किंवा कसे, हे समजत नाही.

त्या १८१८ साली रायगडला आल्या.[१११] त्यांनी इंग्रजांविरुद्ध किल्ला मोठ्या हिंमतीने लढवला. पण १० मे सन १८१८ रोजी रायगड पडला. इंग्रज अधिकाऱ्यांनी वाराणसीबाईंबद्दल गौरवोद्‌गार काढले आहेत.[११२] इंग्रजांनी त्यांना हत्ती, उंट, १०० शिपाई व मालमत्तेसह पुण्याला जायची परवानगी दिली.

त्या प्रथम माहेरी वाईला राहिल्या. त्यामुळे त्यांच्यार्फत बाजीरावांच्या हस्तकांना सहाय्य होत असल्याचा, रेसिडेन्ट माऊन्टस्टुअर्ट एलफिन्स्टनला संशय होता. त्यांनी बाईंना बिठूरला पोचवण्याची जबाबदारी ग्रॅन्ट डफकडे (साताऱ्याचा पोलिटिकल एजंट) सोपवली. कारण वाई गाव सातारा प्रांतातच येत होते. वाराणसीबाईंनी वाटखर्च १ लाख रुपये मागितला. अखेरीस ५० हजार रुपये वाटखर्चासह पुणे मार्गे बिठूरला रवाना झाल्या.[११३]

या खेपेला पुण्यात असताना त्या विश्रामबागवाड्यात राहात असत. या धामधुमीच्या ताणामुळे त्यांचा फिट्‌स्‌चा आजार बळावला. या १८४० सालच्या सुमाराला बिठूरला वारल्या असाव्यात. पिता नारायण गोपाळ फाटक – रास्ते रा. वाई.

मुलगी : कृष्णाबाई, जन्म बुधवार, दि. २४ जुलै सन १८१६ (धातृनाम संवत्सर, आषाढ वद्य ३०) ही बालपणीच वारली.[११४]

पत्नी : (५) वेणूबाई. माहेरचे नाव कुसाबाई. विवाह ३ जून, सन १८०८ रोजी (प्रभवनाम संवत्सर, ज्येष्ठ शु. ९ शके १७२९) पुण्यात मोठ्या टोलेजंग समारंभाने झाला. मुलाच्या जन्मानंतर दोन महिन्यांनी या माहुली येथे १२ नोव्हेंबर सन १८१६ रोजी मंगळवारी रात्री (धातृनाम संवत्सर, कार्तिक वद्य ७ शके १७३८) वारल्या.[११५] यांना 'बाईसाहेब' म्हणत. पिता हरी रामचंद्र देवधर ऊर्फ ढमढेरे.

पत्नी : (६) सरस्वतीबाई. विवाह ३१ डिसेंबर, सन १८१२ रोजी गुरुवारी (अंगिरसनाम संवत्सर, मार्गशीर्ष वद्य १३, शके १७३४) अवशीचे सात घटिका रात्री माहुलीला झाला. या, सर्व पत्नींमध्ये तरुण व नवीन म्हणून नेहमी बाजीरावांबरोबर शुक्रवारवाड्यात राहात असत. यांचा 'पदर येण्याचा' समारंभ झाला

तेव्हा रेसिडेन्ट एलफिन्स्टनने २० हजार, १०० रु. आहेर केला होता. यांचे बिठूरला नवज्वराने (बहुदा सन १८२५)* निधन झाले. मृत्यूपूर्वी बाजीरावांनी यांच्या हातून २५ हजार रु. दानधर्म करवला होता. यांच्या और्ध्वदेहिकाचा खर्च दीड लाख रु. झाला. बिठूरच्या आर्सी लष्कर भागात गंगाकिनारी यांचे दहन झाले. त्यांचे स्मरण म्हणून बाजीरावांनी तिथे एक संगमरवरी शिवमंदिर 'सरसतेश्वर' बांधले. रूढीप्रमाणे त्यांची रक्षा मंदिराखाली पुरली.

सरस्वतीबाई रूपाने व गुणाने लोकोत्तर असून हूषार, दानशुर, हसतमुखी, तेजस्वी, न्यायी, मोकळ्या मनाच्या, तसेच कडक होत्या. [११६] त्या राजवाड्यातील सर्व कारभार हुषारीने पहात. 'गैर चालीचा पुरुष अगर स्त्री दृष्टीस पडल्यास त्यास ती एकदम वाड्याबाहेर हाकून देई.' [११६] त्यांच्या स्वच्छ चारित्र्यामुळे बाजीरावांना नैतिक धाक वाटत असे. 'हिच्या मृत्यूनंतर दीड लाख रु. दानधर्म केला.' यांचे पिता बळवंतराव नीळकंठ पेंडसे. शिलेदार. बाजीराव बिठूरला गेले तेव्हा बळवंतरावहीं सहकुटुंब तिथे स्थायिक झाले.

मुलगी : जन्म २ ऑगस्ट सन १८१६ रोजी (धातृनाम संवत्सर, श्रावण शु ९ शके, १७३८) शुक्रवारी झाला. मूळगाव मेढे. ही त्याच किंवा दुसऱ्या दिवशी वारली.

पत्नी : (७) सत्यभामाबाई. पिता अभ्यंकर.* रा. मालगुंड.

पत्नी : (८) गंगाबाई. पिता बळवंतराव आठवले, रा. पडळी. या आठवल्यांनी बाजीरावांचा वारसाहक्क अग्रहक्काने आपल्या दोन नातींना (त्या जनक मुली

---

* 'सह्याद्री' मासिकाच्या जानेवारी, सन १९४५ च्या अंकात (पृ. २४) मृत्यूचा दिवस ३ जुलै सन १८२५ दिला आहे. याचा आधार मात्र दिला नाही. ३ जुलैची 'मोडक जंत्री' नुसार तिथी : पार्थिवनाम संवत्सर आषाढ, वद्य ३, शके १७४७ रविवार, अशी येते.

* दुसरे बाजीराव पेशवे यांच्याबद्दल पंडिता रमाबाई म्हणतात : "दुसऱ्या बाजीरावांनी ६० वर्षांच्या वयात अंध झाल्यावर अग्निहोत्र कायम ठेवण्याकरिता एका ९–१० वर्षांच्या मुलीशी लग्न केले होते. त्या बाईसाहेब हल्ली नेपाळात आहेत. कपाळ आमच्या हिंदुस्थानातील बायकांचे !!! बाजीरावसाहेब आमच्या जातीचे राजे असून नात्याने माझे मावसे होते. तरी ते आपले म्हणून त्यांचे दुर्गुण माझे आवडते नाहीत"– मूळ संदर्भ : 'पंडिता रमाबाई यांचा इंग्लंडचा प्रवास' तळटीप– पृ. १४ (आ. स. १८८३).

अभ्यंकरांचे पूर्ण नाव महादेव काशिनाथ अभ्यंकर, रा. मालगुंड, वा. वाई 'महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई' : ले. दे. ना. टिळक पृ. ४७३.

म्हणून) मिळावा म्हणून खूप प्रयत्न केले. परंतु उपयोग झाला नाही.

मुलगी : (१) ही जन्मानंतर सहा दिवसांत वारली. [११७]

मुलगी : (२) योगाबाई. जन्म शके १७६५, (सन १८४३). या दक्षिणेत कधीच आल्या नाहीत. [११७] विवाह दुसऱ्या नानासाहेब पेशव्यांनी १८५५ साली करून दिला. या बिठूरला १८५८ साली वारल्या. सासरचे नाव बहुदा सरस्वतीबाई. पती गणपतराव हरिहर ऊर्फ बापूसाहेब पटवर्धन, कुरुंदवाड. बापूसाहेब साहित्याचे भोक्ते, संस्कृत-तज्ञ व कवी म्हणून प्रसिद्ध होते. ते १८९९ साली वारले.

मुलगी : (३) कुसुमावती ऊर्फ बयाबाई. जन्म १६ जानेवारी [११७] सन १८४७ रोजी, शनिवारी (पराभवनाम संवत्सर, पौष शु. १५, शके १७६८) बिठूर येथे झाला. विवाह दुसऱ्या नानासाहेब पेशव्यांनी १८५६ साली (?) करून दिला.

उठावानंतर नानासाहेबांच्या संदर्भात, मि. रुटलेज यांच्यापुढे दिलेल्या साक्षीत बयाबाईंचे श्वशूर बाबासाहेब आपटे म्हणतात :

"हे लग्न संवत् १९१२ च्या फाल्गुन मासात होळीचा उत्सव चालू असताना म्हणजे ख्रि. सन १८५६ च्या मार्च–एप्रिल मासांच्या संधीस बिठूर येथील राजवाड्यात झाले व त्या संबंधीचा सोहळा सुमारे दीड मास चालला होता."

बयाबाईंचे सासरचे नाव सरस्वतीबाई. विवाहानंतर लहान वयामुळे या नानासाहेब पेशव्यांच्या परिवारातच राहात. वर्षभरातच उठावाची धामधूम सुरू झाल्यामुळे, त्या संपूर्ण कालावधीत त्या पेशवे परिवारातच राहात असत. परिवारासह नेपाळलाही गेल्या होत्या. त्यांचे श्वशुर बाबासाहेब आपटे यांचे इंग्रज सरकारात व ग्वाल्हेर दरबारातही पूर्वीपासून चांगले वजन असल्यामुळे, उठाव शांत झाल्यावर १८६१ साली* बाबासाहेबांनी रेसिडेन्टच्या खास परवानगीने यांना खाटमांडूहुन ग्वाल्हेरला आणले. [११८]

उठाव शमल्यानंतर, ५००० रु. पेन्शन घेऊन मुंबईला रहावे असा इंग्रज सरकारने बयाबाईंसमोर प्रस्ताव मांडला. बाईंनी हा प्रस्ताव नाकारून ग्वाल्हेरलाच राहण्याचा निर्णय घेतला अशी एक आख्यायिका ऐकिवात आहे.

नेपाळहून ग्वाल्हेरला वास्तव्यासाठी आल्यावर बयाबाई कारणपरत्वे बऱ्याच नियमितपणे शिंद्यांच्या वाड्यावर येत असत. ग्वाल्हेरचे अधिपती जयाजीराव शिंदे

---

* 'त्यांची (नानासाहेबांची) बहीण म्हणजे बाबासाहेब आपटे यांची सून या बाईस आणण्याकरितां चालीप्रमाणें सासऱ्याकडून कारकून, कुणबीण वगैरे नेपाळास जाऊन त्यांनी आपल्या बाईसाहेबांस इतमामाने आणिल्या. ह्या बाईसाहेब ग्वाल्हेरीस आहेत.'– 'ज्ञानप्रकाश' १७ जून, सन १८६१ इसवी.

यांना बाईबद्दल फार आदर वाटत असे. बयाबाई महालात येताच जयाजीराव उठून उभे राहात व बयाबाईंना मुजरा करीत आणि त्या परत जाईपर्यंत ते खाली बसत नसत. पती गणपतराव ऊर्फ रावसाहेब आपटे वारल्यानंतर या (अंदाजे १८८४ साली) वाराणसी येथे कायमच्या स्थायिक झाल्या.*

वैधव्यातील बहुतेक आयुष्य त्यांनी वाराणसीमध्ये दुर्गाघाटावरील आपल्या वाड्यात परमेश्वर भक्तीत घालवले. यांना अखेरपर्यंत मूल झाले नाही. कारण-परत्वे क्वचित महाराष्ट्रात येत असत. यांना ग्वाल्हेर व इंदूर दरबारने काही नेमणूक करून दिली होती. शिंदे, होळकर आणि कंपनी-सरकार बयाबाईंचा चांगला मानमरातब ठेवीत असत. बाईंनी उज्जैनीला क्षिप्रा नदीकाठी एक शिवालय बांधून त्यात वीतभर उंचीच्या अस्सल स्फटिकाच्या बाणाची स्थापना केली. हा नेपाळहून आणलेला बाण पाहण्यासाठी लांबलांबचे लोक येत. पुढे बाण चोरीला गेल्यावर त्या ठिकाणी 'नर्मदेश्वर' स्थापला.[११९]

सुप्रसिद्ध पेशवे घराण्यातील अखेरची जनक वारस या नात्याने सरकार-कडून पोलिटिकल पेन्शन मिळावे यासाठी बयाबाईंनी सरकारकडे वैधव्यकालात अर्ज केला. 'विवाहानंतर घराणे बदलले' या मुद्यावर सरकारने पेन्शन नाकारले. डेक्कन-सरदारांच्या यादीत आपले नाव समाविष्ट व्हावे हा अर्ज देखील सरकारने 'आपण दक्षिणेकडील रहिवासी नाही व दक्षिणेकडे आपली मालमत्ताही नाही' या मुद्यांवर फेटाळला. बयाबाईंनी 'स्पेशल केस' म्हणून स्वतंत्र विचार व्हावा असा अर्ज गव्हर्नर-जनरलकडे केला. अपवादात्मक विशेष बाब म्हणून गव्हर्नर-जनरलने बयाबाईंचा अर्ज मंजूर केला. त्यानुसार मुंबई सरकारला जरूर ते आदेश दिले. सन १८८६-८७ पासून बयाबाईंचे नाव फर्स्ट-क्लास डेक्कन-सरदारांच्या यादीत नोंदले गेले.[१२०]

शके १८३५ (सन १९१३) मध्ये बयाबाई पुण्याला आल्या होत्या. त्या वेळी त्यांनी 'किर्लोस्कर थिएटर' मध्ये श्री. न. चिं. केळकर यांचे 'तोतयाचे बंड' हे नाटक पाहिले होते.[१२१] बयाबाईंनी स्वतः पाहिलेली, अनुभवलेली, पेशवे कुटुंबियांची

---

* गं भा. बयाबाई आपटे यांचे तरुण वयातील एक छायाचित्र 'सह्याद्रि' मासिकात (नोव्हेंबर सन १९४२, पृ, ७८१) श्री. य. रा. गुप्ते यांनी लेखासोबत छापले आहे. छायाचित्राबद्दल श्री. गुप्ते म्हणतात : "बयाबाईंचे सुवासिनी स्थिती-तील छायाचित्र शोधीत होतो. शेवटी श्रीमंत लक्ष्मणराव चिमणाजी थत्ते यांची माझी ओळख होऊन त्यांनी मला एक दिले. श्री. थत्ते यांची आजी द्वारकाबाई दुसऱ्या श्रीमंत बाजीराव साहेबांचे बंधू चिमणाजी आप्पा यांच्या कन्या होत. श्रीमंत थत्ते यांस प्रस्तुत छायाचित्र बयाबाई साहेबांनीच दिलेले आहे. तेव्हा त्याच्या सादृश्याविषयी वाद राहात नाही." (पृ. ७८१).

अखेरची हकीगत १९१३ साली इतिहासाचार्य वि. का. राजवाड्यांना सांगितली होती. राजवाड्यांनी ती प्रसिद्धही केली होती.[१२२] ११ फेब्रुवारी सन १९१३ च्या 'केसरी' च्या अंकातही हा वृत्तांत आहे. त्याच्या शेवटी राजवाडे, बयाबाईंबद्दल म्हणतात : "पेशव्यांच्या घराण्यातील औरस संतती आज ही एकटी बाई आहे, बाई निःस्पृह, धैर्यशाली व अभिजात असून भटांच्या घराण्यातील मुखवटचाची ठेवण त्यांच्या चेहऱ्यात दिसते."

त्या १९ जून सन १९१७ रोजी मंगळवारी (पिंगलनाम संवत्सर, ज्येष्ठ वद्य ३०, शके १८३९) दुपारी दोन वाजता वाराणसीच्या वाड्यात निधन पावल्या.[१२१] ४ सप्टेंबर, सन १९१७ च्या 'केसरी' च्या अंकात बयाबाईंविषयी मृत्युलेख आहे. २-९-१९१७ च्या 'संदेश' वृत्तपत्रातील अ. ब. कोल्हटकरांचा बयाबाईंविषयीचा 'शेवटची वेल सुकली' हा लेख प्रसिद्ध आहे. बयाबाईंचे पती रावसाहेब गणेश हरी आपटे, सरदार वा. ग्वाल्हेर.

पत्नी : (९) मैनाबाई या नानासाहेब पेशव्यांबरोबर नेपाळमध्ये गेल्या होत्या. तिकडेच सन १८८६ पूर्वी केव्हा तरी (बहुधा नेपाळमध्ये गेल्यावर २-३ वर्षातच) वारल्या. पिता गोखले.

पत्नी : (१०) सईबाई. या नानासाहेब पेशव्यांबरोबर नेपाळमध्ये गेल्या. * त्यांनी चिमणाजी रघुनाथ पेशव्यांची मुलगी द्वारकाबाई, यांचे नातू लक्ष्मणराव चिमणाजी थत्ते (जन्म सन १८७९) यांना वाराणसीहून नेपाळमध्ये बोलावून १८८१ साली दत्तक घेतले. सईबाई २५ मार्च सन १८९६ रोजी बुधवारी (दुर्मुखनाम संवत्सर, चैत्र शु. १२ शके १८१८) नेपाळमध्ये राणीगंज येथेच राहत्या वाड्यात मृत्यु पावल्या. या वेळी लक्ष्मणराव थत्ते वाराणसीत होते. सईबाईंचे और्ध्वदेहिक, बाईंचे (चुलत बंधूंचे चिरंजीव) भाचे कृष्णाजी बळवंत रिसबूड* यांनी केले. दत्तक पुत्र लक्ष्मणराव थत्ते यांनी 'थत्ते' आडनावच लावले. सईबाईंचे पिता रिसबूड.

पत्नी : (११) यांचे पिता चितळे, दणदणे. ●

---

* सईबाईंची सविस्तर माहिती 'संकीर्ण उतारे' या प्रकरणात व सातव्या परिशिष्टात पहा.

* रिसबूड यांचे समक्ष निवेदन परिशिष्ट ७ अखेर पहा.

● चितळे घराण्याच्या १९ क्रमांकाच्या 'रतलाम शाखे'च्या माहितीत, मूळ पुरुष हरी यांचे पूर्वज श्रीवर्धनहून उज्जैन येथे आले. हरी यांचा आवाज व चालणे यांवरून यांचे दणदणे असे टोपण नाव पडले अशी माहिती दिली आहे. यावरून 'दणदणे' हे गावाचे नाव नाही असे स्पष्ट होते. बाजीरावांची चितळे कुलोत्पन्न पत्नी, ह्या हरीपंतांची नातलग असावी. - 'चितळे कुलवृत्तांत' पृ. ८४.

वामन बाजीराव : (९) आई वाराणसीबाई. याच्या जन्मापूर्वीची, आपल्याला मुलगा व्हावा म्हणून बाजीरावांनी अनुष्ठान केल्याची नोंद मिळते. ' १५–३–१८०९, नाशकास पंचवटीस रामनवमीचा उत्साह सरकारचे दाहा हजार रुपये खर्च करून करणार श्रीमंत पुत्रोत्पत्तीस्तव नाशकाजवळ संगम आहे तेथे काही ब्राह्मण करवणे अनुष्ठान खर्च करणार याकरितां नाशकास पंधरा दिवस मुक्काम आहे. '[१२४]

याचा जन्म १० ऑक्टोबर सन १८१० रोजी बुधवारी (प्रमोदनाम संवत्सर, आश्विन शु. १३, शके १७३२) पुण्याला शुक्रवारवाड्यात झाला. पुत्रजन्माचे समारंभात १,७८,६४१ रु. खर्च झाला. '२१–१०–१८१० : ९०० रु. पुत्रजन्मानिमित्य खैरात खर्च जाहले. छ. २१ रमजान '[१२५] ' १८१०–११ कार्तिक शुद्ध सप्तमी, मंदवार, छ. ५ सवाली नामकरण करून वामनराव ठेविले. '[१२६] ' ३–११–१८१० चिरंजीव राजश्री वामनराव याचे बारशानिमित्य दोन हजार येकसे सत्त्याहत्तर रु. खर्च केला. छ. ५ सवाल[१२५] ' ११–२–१८११, रु. १६०५ माघ वद्य १ पावेतो चिरंजीव राजश्री वामनराव आण्णा याचे प्रकृतीस आरोग्यार्थ अनुष्ठानास दक्षिणा दिल्ही. छ. १६ मोहरम '[१२५] ' शके १७३३ – वामनराव श्रीमंत बाजीरावसाहेब यांचे पुत्र झाले होते ते पुणे मुक्कामी शुक्रवारच्या वाड्यात चैत्र शु. ३ स. छ. २ रावली मृत्यू पावले. उमर ५ म. २० दि.[१२७] वामनराव बुधवारी २७ मार्च, सन १८११ रोजी वारला.

पुत्र बाजीराव : (९) बारसे होण्यापूर्वीच मृत्यू पावला म्हणून याचा उल्लेख ' पुत्र ' असा केला आहे. आई वेणूबाई. याचा जन्म माहुली मुक्कामी, १० सप्टेंबर, सन १८१६ रोजी, सोमवारी (धातृनाम संवत्सर, भाद्रपद वद्य २ शके १७३८) झाला. यांना जन्मतःच तोंडात सगळे दात होते. या अनैसर्गिक स्थितीमुळे हा मुलगा ११ व्या दिवशी वारला.[१२५]

धुंडीराज बाजीराव : (९) माधवराव (महादेव) नारायण भट यांचे कुटुंब १८२७ साली बाजीरावांच्या आश्रयाला बिठूरला गेले. हे मूळचे पश्चिम महाराष्ट्रातील माथेरान जवळच्या वेणगावचे गार्ग्य गोत्री भट घराणे. श्रीवर्धन हेच यांचे मूळ गाव. भट घराण्याच्या तळे (मामलत) शाखेपैकी ही एक उपशाखा असावी. या कुटुंबात ' धुंडीराज'चा जन्म ८ डिसेंबर, सन १८२४ रोजी, सोमवारी (पार्थिवनाम संवत्सर, मार्गशीर्ष शु. ६, शके १७४७) झाला.* हेच १८५७ च्या उठावातील प्रसिद्ध नानासाहेब पेशवे.

---

* योगायोग असा की, महात्मा ज्योतिराव फुल्यांचे जीवलग स्नेही व सहकारी, रा. ब. सदाशिव बल्लाळ गोवंडे यांचा जन्म देखील ८ डिसेंबर, सन १८२४ रोजी झाला. –' त्रिमूर्ती दर्शन ' पृ. ९.

यांचे जनक घरचे नाव गोविंद. दत्तक घरचे नाव धुंडीराज, याचाच अपभ्रंश धोंडोपंत असा झाला. बालपणचे लाडके नाव नाना. तेच पुढे रूढ झाले. यांचे दत्तक-विधान ७ जून सन १८२७ रोजी गुरुवारी (सर्वजितनाम संवत्सर, ज्येष्ठ शु. १३, शके १७४९) झाले. (परिशिष्ट बारावे पहा.) यांना व्यवहारात 'नानासाहेब' म्हणू लागले. 'धोंडू राजा होईल. त्याची कीर्ती सर्वदूर पसरेल' असे भविष्य बालपणीच वर्तवल्याची एक आख्यायिका ऐकिवात आहे. पण त्याला आधार मिळाला नाही.

बाजीरावांना 'नाना' बद्दल खूप जिव्हाळा वाटत असे. एखादा मुलगा दुर्दैवाने लवकर वारला तर, नाव चालवण्यासाठी कोणीतरी मुलगा असावा म्हणून बाजीरावांनी त्याच भट कुटुंबातील आणखी दोन मुलगे दत्तक घेतले.[१२२] नाना-साहेबांची मुंज ८ फेब्रुवारी सन १८२९ ला रविवारी (सर्वधारीनाम संवत्सर, माघ शु. ५, शके १७५०) झाली. निमंत्रणपत्रिका ३ जानेवारीला पाठवल्या.

बाजीरावांनी आपल्या मृत्युपत्रानुसार आपली पदवी, संपत्तीचे वारसा हक्क, दत्तकपुत्र या नात्याने नानासाहेबांना दिले होते. कंपनी-सरकारने या मृत्यूपत्राला अर्थातच कधीही मान्यता दिली नाही. १८५१ सालापूर्वीच्या नानासाहेबांच्या जीवनाबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. लहानपणी त्यांना शक्तिवर्धनासाठी रोज सूर्योदयापूर्वी चिराईताचा काढा देण्यात येत असे. त्यांचा संस्कृत भाषेचा अभ्यास चांगला होता. शिवाय उर्दू, पर्शियन, या भाषाही चांगल्या येत असत. बनारसचे पंडित उमाशंकर हे संस्कृत, उर्दू, पर्शियन, हिंदी, या भाषा शिकवत असत. नानासाहेब उत्तम अश्वारोहणपटूही होते. घोडदौड शिकण्यासाठी गंगा-तीरावर सुसज्ज पागा उभारली होती. त्यांचे इंग्रजी भाषेचे ज्ञान कमी होते. तरीही इंग्रज व इंग्रजीचे जाणकार यांच्यापेक्षा त्यांची अभिरुची व सौजन्य कमी नव्हते. 'नानासाहेब इंग्रजी शिकले ते बाजीरावास कळू न देता शिकले होते.'[१२७] ते सर्व अँग्लो-इंडियन वृत्तपत्रांचे, साप्ताहिकांचे, वर्गणीदार असून त्यांचे इंग्रज शिक्षक मि. टॉड यांचेकडून नानासाहेब रोज इंग्रजी वृत्तपत्रे वाचून घेत.

नानासाहेब धर्मनिष्ठ असले तरी धर्मांध नव्हते. गंगा नदीबद्दल त्यांना फार आदर वाटे. पोषाख नीटनेटका असे. जडजवाहीर वापरण्याची त्यांना हौस असे. दरबारात किनखापी अंगरखा, तुमान, अंगावर जडजवाहीर, रत्नजडित शिरपेच वापरीत. त्या रत्नांचे इंग्रजांना मोठे आकर्षण वाटे. नानासाहेब शरीराने किंचित् स्थूल असून डोळे तेजस्वी होते. स्वभावाने सात्त्विक, सरळ, मधुरभाषी होते. परक्यावर पटकन् विश्वास ठेवत. उत्तम खेळाडू व जलतरणपटू होते. बिलिअर्ड उत्तम खेळत. या खेळांच्या निमित्ताने ते इंग्रज अधिकाऱ्यांत मिसळत. उदार वृत्तीमुळे त्यांनी लोकांचे, इंग्रजांचे प्रेम संपादन केले होते. ते मोठ्या थाटाने,

रुबाबाने राहात. इंग्रजांचे उद्योग, इतिहास, कला, चालीरीती, ख्रिस्ती धर्म, यांबद्दल त्यांना कुतूहल असे. तत्कालिन राजकीय प्रश्नांसंबंधी त्यांची मते सुस्पष्ट असून, ती बोलून दाखवायला ते कचरत नसत. त्यांचे प्राणीसंग्रहालय व युद्धसाहित्याचे शस्त्रागार मोठे होते.

इंग्रजांचे नेहमी आदरातिथ्य करणे नानासाहेबांना फार आवडे. बिठूरच्या स्वतःच्या वाड्यात ते वारंवार इंग्रजांना मोठ्या मेजवान्या देत. चमचमीत जेवणा-नंतर नाच व संगीत याची व्यवस्था केली जाई. अशा मेजवान्यांचे वेळी नानासाहेब खाण्यापिण्यासंबंधी मांसाहार-शाकाहार, मद्यपान, वगैरेबद्दल विधिनिषेध बाळगत नसत. * इंग्रज अधिकारी वातावरणात बदल म्हणून वारंवार बिठूरला येऊन पाहुणचार घेत. परत जाताना अधिकाऱ्यांना नानासाहेब काही ना काही मौल्यवान भेटी देत. यामुळे कानपूरच्या इंग्रज अधिकाऱ्यांत ते खूप लोकप्रिय होते.

कंपनी-सरकार त्यांना ' राजा ' मानायला तयार नसल्यामुळे नानासाहेब स्वतः कानपूरची इंग्रजांकडील आमंत्रणे नाकारीत. बिठूरला मात्र इंग्रज स्त्री-पुरुषांच्या सामान्य गरजा तत्परतेने पुरवल्या जात. कानपूरच्या इंग्रजांबद्दल बातमी राखून त्याबद्दल नानासाहेब विचारपूस करीत. नानासाहेबांमध्ये झटकन् कोणाला आपलेसे करण्यासारखा काहीही विशिष्ट गुण नव्हता. ते एकूण बेताच्याच बुद्धीचे (Average Calibure) गृहस्थ होते, असे बहुतेक इंग्रज अधिकाऱ्यांचे मत आढळते.

१८५६ साली नानासाहेबांच्या जवळ ५० लाख रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा होत्या. १८५६–५७ च्या दरम्यान त्यांपैकी ४७ लाख रु. च्या नोटा विकून त्यांनी ते पैसे इतरत्र गुंतवले होते.[१२९]

बाजीरावांच्या मृत्यूनंतर त्यांचे पेन्शन आपल्याला मिळावे म्हणून नाना-साहेबांनी कंपनी-सरकारकडे अर्ज केले. कलकत्त्याचे नामांकित वकील हरभुजजी रुस्तुमजी मोदी, इंग्लंडचे सर जॉन लॅग यांसारख्या मोठ्या कायदेपंडितांचा या कामी सल्ला घेतला. कंपनी-सरकारने बाजीरावांचे पेन्शन व बिठूरची जहागीर याबद्दलचे नानासाहेबांचे हक्क १५ सप्टेंबर सन १८५१ च्या लॉर्ड डलहौसीच्या खलित्यान्वये नाकारले. [१३०] कंपनीच्या संचालकांनी १९ मे सन १८५२ रोजी लॉर्ड डलहौसीचा निर्णय कायम केला. [१३१] सन १८३२ च्या बंगाल रेग्युलेशन्सनुसार पेशवे-परिवाराला मिळणारी सूट ब्रिटिशांनी फेब्रुवारी सन १८५२ मध्ये केलेल्या कायद्यामुळे बंद झाली. ही सर्व मंडळी सामान्य नागरीक बनली. इंग्रजांनी ठेव म्हणून असलेले पेशव्यांचे तीस लाख रु. त्यांना परत केले. ५०० पायदळ, एक

---

* मेजवानीच्या वेळी नानासाहेब स्वतः हजर राहात नसत. फक्त इंग्रजांना सर्व सोयी उपलब्ध मात्र करून देत, असेही उल्लेख मिळतात.

घोड्याचा रिसाला, तीन तोफा, एवढेच एकूण बळ बाळगायला नानासाहेबांना परवानगी दिली. विठूर व आसपासचा प्रदेश फक्त वहिवाटीपुरताच नानासाहेबांकडे ठेवला. १८५७ सालापूर्वी नानासाहेबांनी कानपूरच्या पलीकडे कुठेही प्रवास केला नव्हता.

इंग्रज, नानासाहेबांना ' विठूरचा महाराज ' म्हणून ओळखत. नानासाहेबांना त्यांनी आपल्या शिक्क्यातील ' पेशवा बहादूर ' हे शब्द बदलायला लावले. ' श्रीमान नाना धोंडोपंत बहादूर ' या नव्या शिक्क्याने नानासाहेबांचा व्यवहार सुरू झाला.

इंग्रजांनी पेन्शन नाकारल्यानंतरही नानासाहेब त्यांच्याशी आपुलकीने व औदार्याने वागत. त्यांनी इंग्रजांना वेळोवेळी आर्थिक व सैनिकी मदत केली होती. आपले हक्क शाबीत करण्यासाठी त्यांनी खटपट सुरू केल्यावरच ' राजकीयदृष्टचा ' कंपनी-सरकारचे त्यांच्या हालचाली व उद्देशांकडे ' लक्ष वेधले. ' त्यापूर्वी नानासाहेबांबद्दल प्रतिकूल शंका घेण्याचे काही कारण नव्हते. अनेक इंग्रज अधिकारी व नानासाहेब यांचे वैयक्तिक स्नेहसंबंध जाहीर होते. आपले म्हणणे कंपनीच्या संचालकांपुढे मांडण्यासाठी नानासाहेबांनी आपले स्नेही मुहम्मदअली अझिमुल्ला व राजा पिराजी भोसले यांना इंग्लंडला पाठवले. भोसले बोटीवरच वारले. परंतु अझिमुल्ला मे, सन १८५३ मध्ये इंग्लंडला पोहोचले. मात्र त्यांना या कामात बिलकुल यश आले नाही.

दरम्यान पेशवा-परिवारात एक अंतर्गत वादळ उठले.

दुसऱ्या बाजीरावांनी आपल्या मृत्यूपत्रान्वये नानासाहेबांना आपले वारस व उत्तराधिकारी ठरवले होते. साहजिकच ' कर्ता 'पण नानासाहेबांकडे आले . सर्व परिवार आणि आश्रितांच्या पालनपोषणाची जबाबदारी देखील नानासाहेबांकडे आली.

नानासाहेबांनी प्रत्येक व्यक्तीच्या खर्चाची तरतूद करून त्याप्रमाणें प्रत्येकी रक्कम ठरवून दिली होती. उत्तराधिकारी या नात्याने नानासाहेबांचा याबद्दलचा अधिकार अंतिम होता. त्यातूनच वाद उद्भवला.

बाजीरावांच्या विधवा स्त्रिया मैनाबाई आणि सईबाई यांनी सरकारकडे तक्रार केली की, त्यांना नानासाहेब खर्चासंबंधी कोणतीही मोकळीक देत नाहीत. उलट गैरसोय करतात. जडजवाहीरही नानासाहेबांनी जप्त केले आहे. नानासाहेबांना अशा प्रकारे वागण्याचा काहीही हक्क नाही असे या विधवांचे म्हणणे होते.

या तक्रारींची चौकशी केल्यानंतर त्यांत काहीही तथ्य नसल्याचे आढळले. विधवांच्या असंतुष्ट वृत्तीमुळे काही गैरव्यवहार होऊ नयेत म्हणूनच नानासाहेबांनी

योग्य खबरदारी घेतली होती. या कौटुंबिक वादाचे पडसाद तत्कालीन वृत्तपत्रातही उमटले. २३ नोव्हेंबर, सन १८५६ चा 'ज्ञानप्रकाश' म्हणतो :

"बाजीराव साहेब यांच्या बायका आणि दत्तक पुत्र यांत परस्पर कलह उत्पन्न झाला. याजमुळे गवरनर जनरलसाहेब लवकर अशी तजवीज करणार आहेत कीं दत्तक आणि बाया यांस पृथक जागी ठेवणार आहेत, असे आम्हांस घरगुती बातमीवरून कळत आहे."
—'ज्ञानप्रकाश'

सरतेशेवटी, विधवांनी नानासाहेबांशी मिळते घेऊन सुखासमाधानाने रहावे· नानासाहेबांच्या योग्य इच्छा मानल्या तर त्यांना सर्व सवलती मिळू शकतील असे विधवांना अधिकृतपणे कळविण्यात आले.

१८५६ सालच्या अखेरीला इंग्रज कंपनी-सरकारामार्फत, चिमणराव थत्ते या पेशवे-घराण्यातील (धाकटचा चिमाजीआप्पांच्या द्वारकाबाई या मुलीचा मुलगा, रा. वाराणसी) अज्ञान मुलाला हाताशी धरून बिठूरच्या मिळकतीपैकी अर्ध्या मालमत्तेवर (औरस वारस या नात्याने) हक्क शाबीत करण्यासाठी नानासाहेबांवर दिवाणी दावा दाखल करण्यात आला.

या वेळी चिमणराव थत्ते अज्ञान असून त्याचे पालनकर्ते अर्थातच सरकार होते. म्हणूनच कंपनी-सरकारने स्वतःच अज्ञानाच्या वतीने नानासाहेबांवर दावा लावला होता. इतकेच नव्हे तर पेशवा-परिवारातील स्त्रियांनाही प्रतिवादी करून त्यांच्यावरही समन्से काढून त्यांना कोर्टात दाव्याच्या वेळी समक्ष हजर रहायला फर्मावले होते.

खुद्द पेशवा घराण्यातील कुलीन स्त्रियांना न्यायालयात हजर करण्याच्या समन्समुळे नानासाहेब फार दुखावले गेले.

याच काळात हळूहळू समाजातील वातावरण इंग्रजांविरुद्ध पेटत होते. परंतु त्याची झळ अद्याप बिठूरला लागली नव्हती.

मे, सन १८५७ मध्ये मीरतला दंगल सुरू झाल्यानंतर उठाव इतरत्रही पसरू लागला. कानपूरलाही गडबड होईल म्हणून कानपूरचे कलेक्टर व डिस्ट्रिक्ट–मॅजिस्ट्रेट हिल्डरसन यांच्या विनंतीनुसार नानासाहेब कानपूरच्या खजिन्याचे व दारूगोळ्याचे रक्षण करण्यासाठी ३०० पायदळ, घोडदळ, दोन तोफा, यांसह बिठूरहून कानपूरला दाखल झाले. या वेळी त्यांनी नवाबगंज येथे मुक्काम केला. त्यांनी ही ज़बाबदारी २२ मे (१८५७) ला पत्करली. या वेळी त्यांनी इंग्रजांना खूप मदत केली. याचवेळी सर हेन्री लॉरेन्स व गुबीन्स या दोघांनी लखनौहून कानपूरला जनरल व्हीलरला पत्र पाठवले होते की : 'नानासाहेब बिथरलेले दिसतात. त्यांचेवर विश्वास ठेवू नका.' व्हीलरला हे पत्र मिळण्यापूर्वीच नानासाहेब कानपूरला पोहोचले होते.

कानपूरमध्ये आलेल्या बंडवाल्या सैनिकांनी उठावात सामील होऊन नेतृत्व स्वीकारण्याचा निर्वाणीचा आग्रह केल्यामुळे, नानासाहेबांनी ५ जून, सन १८५७ ला उठावाचे नेतृत्व स्वीकारले. * सहाजिकच इंग्रजांचा खजिना व दारूगोळा बंडवाल्यांच्या हाती आला. इंग्रजांची आपल्याबद्दल वागणूक सहिष्णू नाही असे त्यांना आतापर्यंत जाणवले होते. कानपूरचा लढा बंडवाल्यांनी नानासाहेबांमुळेच जिंकला. २८ जूनला कानपूरमध्ये नानासाहेबांच्या सन्मानासाठी मोठा दरबार भरवण्यात येऊन बहादूरशहा बादशाहचे प्रतिनिधी म्हणून त्यांना २१ तोफांची सलामी देण्यात आली. ३० जूनला त्यांना बिठूरला, दुसऱ्या बाजीरावांनी पूर्वी पुण्याहून आणलेल्या पेशव्यांच्या ऐतिहासिक सिंहासनावर, समारंभपूर्वक राज्याभिषेक करण्यात आला. हा समारंभ ६ दिवस चालला. मेजवान्या, इनामे, बक्षिसे देण्यात आली.

१ जुलै १८५७ ला नानासाहेबांच्या नावाने जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. ५ जुलैला कानपूरला बिठूरच्या राज्याभिषेकाची आवृत्ती करण्यात आली. यानंतर इंग्रजांचाही प्रतिकार कडवा होऊ लागला. जनरल हॅवेलॉकच्या कानपूरकडे निघालेल्या सैन्याने फत्तेपूरजवळ बंडवाल्यांचा पराभव केला. पांडु नदीवरील लढाईत १५ जुलैला बाळासाहेब पेशव्यांच्या सैन्याचा पराभव झाला. आता नानासाहेब १६ जुलैला अहिरवा गावाजवळ सैन्यासह सज्ज झाले. तेथील निकराच्या लढाईत नानासाहेबांचा सपशेल पराभव होऊन ते अत्यंत निराशेने बिठूरला निघून गेले.

या संदर्भात 'ज्ञानोदय' वृत्तपत्राच्या १ ऑगस्ट, सन १८५७ च्या अंकात पुढीलप्रमाणे बातमी वाचायला मिळते :

"बाजीराव पेशव्याचे दत्त पुत्र नानासाहेब पळून बिठोरला गेले. आपल्या कृत्याचे फळ त्यांना भोगावेच लागेल. सिंहापुढे कोल्ह्याचे काय चालणार ?"

बिठूर सोडण्यापूर्वी, आपण नदीत आत्महत्या करणार असल्याची अफवा नानासाहेबांनी मुद्दामच पसरवली होती. १७-१८ जुलैच्या रात्री नावेतून बिठूर सोडून परिवारासह, कानपूरपासून २५ मैलांवरील फत्तेपूर चौरासी या गावी ते गेले. प्रयाणापूर्वी नानासाहेबांनी बिठूरला दिल्लीपती बादशाहाचे नावे १००, थोरले बाजीरावांचे नावे ८०, स्वतःचे नावे ६०, स्वतःची आई व पत्नी यांचे नावाने प्रत्येकी २१ तोफांची सलामी देववली. त्यांनी प्रथम फत्तेपूरचे एक स्नेही जमीनदार

* 'बिठूर येथील लोकमताप्रमाणे पाहिले तर धाडसाचा किंवा शौर्याचाही आरोप नानासाहेबांवर अकारण लादला गेला होता. नानासाहेबांचा अंत शेवटी कसा झाला ते कोणासच नक्की सांगता येत नाही.' – 'मराठे व इंग्रज' ले. न. चिं केळकर. पृ. ११८
'Nana – No one knew him, gave him credit for any extraordinary ability or, any striking quality' – '1857' – By S N. Sen.

जयसिंग यांच्याकडे नोव्हेंबर सन १८५७ पर्यंत मुक्काम केला. दरम्यान मेजर स्टिव्हन्सनच्या पथकांनी १९ जुलैला दुपारी बिठूर सर करून गावात प्रवेश केला.

ऑगस्टमध्ये ब्रिटिशांनी नानासाहेबांना पकडून देण्याबद्दल ५० हजार रु. इनाम जाहीर केले. इनामासंबंधीचा हाच मजकूर ६ ऑक्टोबर सन १८५७ रोजी आग्र्याच्या राजपत्रात जाहीर करण्यात आला. या संदर्भात 'ज्ञानोदय' वृत्तपत्रात पुढील बातमी वाचायला मिळते :

'बंडाचा पुढारी नानासाहेब यांस पकडणारास ५० हजारांचे बक्षीस जाहीर झाले.'– 'ज्ञानोदय' १९ नोवेंबर सन १८५७ इसवी.

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात जनरल कॅम्पबेलचे सैन्य व ग्वाल्हेरचे बंडखोर सैनिक यांत कानपूरवर पुन्हा कबजा मिळवण्यासाठी लढाई झाली. त्या वेळी नानासाहेब तिथे होते किंवा नाही हे नक्की सांगता येत नाही. १८५८ सालच्या प्रारंभी नानासाहेबांनी रोहिलेखंडाकडे मोर्चा वळवला. दरम्यान इंग्रजांनी पुन्हा ८ डिसेंबरला (१८५७) बिठूर दुसऱ्यांदा सर केले. बिठूरला इंग्रजांना बरीच लूट मिळाली.*

इंग्रजांनी पेशव्यांचा वाडा ११ डिसेंबरला उद्ध्वस्त केला. वाड्याजवळच्या एका विहिरीतून जी रोकड व जवाहीर इंग्रजांनी हस्तगत केले, त्याचा विचार करता इंग्रजांनी नानासाहेबांच्या धनिकतेबद्दल केलेले अंदाज अतिशयोक्त नसावेत. 'बंडाचे वेळी होमशाळेत विहीर होती, तीत इंग्लिश लोकांस अत्तरदाण्या व गुलाबदाण्या मिळून २७०० व सोन्याचांदीची ताटे दीड हजार सापडली.'[१३१] ३० फूट × ६० फूट

---

* **पेशव्यांचे जडजवाहीर** : बिठूरला हॉलंडरचे सैन्य आले तेव्हा तेथील एक विहीर संशयावरून तपासली असतां नानासाहेबांचे सुमारे ३८ शेर सोने व १२६ शेर रूपें इतके द्रव्य मिळाले. आणखी कांहीं विहिरी आहेत. त्यांमध्यें बाजीरावांचे जवाहीर मिळेल अशी बातमी आहे. नानासाहेबांस हे समजताच बिठूरला येण्यासाठी गंगेच्या काठापर्यंत येऊन गेला पण गंगेच्या अलीकडील नेटिव संस्थाने इंग्लिशांना अनुकूल असल्यामुळे ती त्याला आपल्या मुलखांतून जाऊन देण्यास नाखूष आहेत

– 'ज्ञानोदय', १ मार्च, सन १८५८ इसवी.

"नानांचे जवाहीर जें सरकारांस मिळालें आहे तें कलकत्त्याचे जामदारखान्यांत ठेवण्याकरितां लवकरच रवाना होणार आहे– बं. ग्या.

– 'ज्ञानप्रकाश', २३ सप्तंबर सन १८५८ इसवी.

"अशी वंदता आहे कीं, बाजीरावसाहेब पेशवे यांचे चिरंजीव नानासाहेब यांस बंडवाले सामील होऊन त्याणीं प्रयागचे किल्ल्यावर हात घातला."

– 'धूमकेतू', ७ आगस्ट, सन १८५७ इसवी.

आकाराच्या ४२ फूट पाणी असलेल्या विठूरच्या एका विहिरीतून ४० पाऊंड वजनाचे सोन्याचे मोठे तसराळे, बाजीरावांची चांदीची खासा अंबारी (हौदा) मिळाली.[११] 'ज्ञानोदय' वृत्तपत्राच्या १६ जानेवारी, सन १८६० च्या अंकात बिठूरच्या या वाड्याबद्दल पुढीलप्रमाणे माहिती आहे :-

नानासाहेबांचा संगमरवर चर्चसाठी

बिठूरातील नानासाहेबांच्या वाड्यांचें संगमरवरी धोंडे सरकारने जप्त केले आणि कानपूर मुक्कामी जें ख्रिस्ती भजनालय आहे त्याची फरसबंदी करण्याकरिता नेले."

ब्रिटिशांना बिठूरला जी लूट मिळाली त्यात काही प्राणीही होते. त्यांत १. पाळलेलं वानर, २. इंग्लिश बुलडॉग जातीच्या कुत्र्यांची जोडी, ३. लहान सशाच्या आकाराएवढं गिलहरी, हे होते. त्यांपैकी वानर लंडनच्या Zoological Garden मध्ये रवाना झालं. गिलहरी मेजर शिअररकडे देण्यात आलं पण लवकरच मरण पावलं.

झाशी पडल्यानंतर मार्च, सन १८५८ मध्ये नानासाहेबांनी ग्वाल्हेरचा किल्ला हस्तगत केला. २८ फेब्रुवारीला इंग्रजांनी, नानासाहेबांना पकडण्याबद्दलचे पूर्वीचे ५० हजार रु. चे इनाम वाढवून १ लाख रु. केले. यानंतर मात्र बंडवाल्यांचे सर्वत्र पराभव होऊ लागले. नानासाहेबांना अयोध्येची बेगम हजरतमहल (नवाब वाजिदअलीशाहची एक बेगम) हिच्या आश्रयाने लखनौमध्ये राहावे लागले. बेगमने त्यांचा मोठा सत्कार केला. मे, सन १८५८ पर्यंत ते लखनौमध्ये होते. नंतर परिवारासह नेपाळच्या जंगलात निसटून गेले. या नेपाळ-प्रवासात सर्वांचेच फार हाल झाले.

जून, सन १८५८ नंतरचे नानासाहेबांचे जीवन, वास्तव्य, मृत्यू याबद्दल अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. सन १८५९ मध्ये ते जिवंत होते अशा इंग्रजांच्या नोंदी आहेत. त्यानुसार १३ मे, सन १८५९ रोजी हिंदुस्थान सरकारचे मंत्री बडीन यांनी द्वाही फिरवली :

'ज्या अर्थी नानासाहेब पेशवा व्हिक्टोरिया राणीच्या जाहीरनाम्याचा काहीच फायदा घेऊ इच्छित नाही, त्याअर्थी जेथपर्यंत नानाच्या व्यक्तीचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध येत असेल तेथपर्यंत दयामाया काही भाषाच नाही. नाना शरण येवो, पकडला जावो किंवा कोणी त्याला हजर करो, त्याच्यावर रीतसर लष्करी खटला भरला जाईल व त्यास शिक्षाच होईल.'

डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी यांनी १० सप्टेंबर सन १९८० रोजी पुण्याच्या भा. इ. सं. मंडळाच्या पाक्षिक सभेत वाचलेल्या निबंधावरून समजते की : 'नानासाहेब

पेशव्यांची मथुरेला रावळगल्लीत दोन घरे होती. सन १८५७ च्या उठावानंतर इंग्रजांनी ती जप्त केली. पुढे इंग्रज सरकारने २३ डिसेंबर, सन १८८७ रोजी घरांचा जाहीर लिलाव केला. त्या घरांपैकी मोठे घर ९०० रु. स आणि छोटे घर ५२० रु. स. याप्रमाणे दिलावरखान रिसालदार या गृहस्थांनी दोन्ही घरे विकत घेतली.'

वाराणसीतही नानासाहेबांचे काही वाडे होते. उठावानंतर त्यांचीही जाहीर विक्री करायचा इंग्रजांचा विचार होता. परंतु खरेदीसाठी लोकांकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही असे दिसते. याबद्दलची 'ज्ञानप्रकाश' मध्ये आलेली समकालीन बातमी :

"काशी क्षेत्रांत नानासाहेब व माजी झांशीच्या राणीचे वाडे आहेत. त्याचा लीलाव करावा असा विचार होता पण खरेदी करणारेच कोणी मिळेनांत सबब बराकी वगैरे कराव्या असा सरकारनें ठराव केला आहे असें अबझरवर आधारें समजतें."

"कांहो, काशीस घरमोडे काही कमी आहेत की काय ? बरें कदाचित बिलकुल नसल्यास श्रीमान लोक राहण्याकरितां घेणारे नसतील की काय ? असें असून सदरहू इमारतीच्या बराकी होणार यावरून त्या खरेदी करण्यास कोणी धजत नाहीत. अशी कल्पना होती."

– 'ज्ञानप्रकाश' तारीख २४ नोवेंबर, सन १८५९ इसवी.

या उठावाच्या दरम्यान नानासाहेबांनी रोहिलेखंडाकडे मोर्चा वळवला होता. त्यापूर्वी काही काळपर्यंत त्यांचा मुक्काम अयोध्येच्या जंगलात होता. मार्च, सन १८५८ मध्ये शहाजहानपूर (ता. १२), अलिगंज (ता. १९), बरेली (ता. २५). अशी त्यांच्या प्रवासाची नोंद आढळते. बरेलीला खानबहादूरखान, फिरोझशाह वगैरे पुढाऱ्यांशी खलबते केल्यानंतर त्यांनी एप्रिल अखेर बरेली गाव सोडले. फरीदपूर–पीलभीत जिल्ह्यात बिसलपूर अशा मार्गाने इंग्रजांच्या पाठलागातून निसटण्यासाठी नानासाहेबांचे स्थलांतर चालू होते.

नानासाहेबांच्या व्यक्तिमत्वाबद्दल इंग्रज आणि नेटिव्ह लोक दोघांचीही परस्पर विरोधी (नानासाहेब कमालीचे शूर होते, येथपासून नानासाहेबांचा आणि शौर्याचा दूरान्वयानेही संबंध नव्हता, इथपर्यंत) मते वाचायला मिळतात.

श्री. न. चिं. केळकरांना बिठूरहून ४ नोव्हेंबर सन १९१२ ला पाठवलेल्या पत्रात दुसऱ्या बाजीरावांचे कारभारी रामचंद्रपंत सुभेदार यांचे नातू श्री. पुरुषोत्तम नारायण सुभेदार म्हणतात.[१३३]

" बंडवाले नानासाहेब हे कोणत्याही विद्येत निष्णात असे मुळीच नव्हते. त्यांना मराठी, मोडी, लिहिता वाचता येत होते. यापलीकडे काहीच नाही. लिहिणे वाचणेचा व्यवसायही त्यांनी काही संपादन केला नाही. फक्त पेशव्यांचे दत्तक चिरंजीव इतकेच. शारीरिक व्यवसाय घोड्यावर बसणे वगैरे करून काळ क्रमीत होते. १८५७ च्या बंडाईने त्यांचे प्रारब्ध किंवा जन्मग्रहगुण काही तरी म्हणा, असा नावलौकिक जो हिंदुस्थान व इंग्रजांची विलायत वगैरे पर्यंत प्रसिद्ध झाला, एवढेच काय ते !!! "

श्री. न. चिं. केळकरांना धारवाडच्या सुभेदार घराण्यापैकी एक वृद्ध गृहस्थ १९१६ साली बिठूरला भेटले. ते बंडाचे वेळी हजर होते. त्यांच्या तोंडून ऐकलेल्या माहितीचा भावार्थ असा :

" बंडवाले नानांना भेटले व आमचे पुढारी व्हा, नाही तर मरा असा पेच त्यांनी नानांपुढे टाकला. यामुळे नानांना त्यात सामील व्हावे लागले. इंग्रज या देशातून जावे म्हणून हे बंड नव्हते, तर ते अन्यायाविरुद्ध होते. बंडवाले दिल्लीकडे निघाले पण दिल्ली तर दूर होती. तेव्हा उतावीळपणे ते जवळपास राजा शोधू लागले व पेशव्यांचा वंशज असल्याचे कळले. त्याला त्यांनी पुढारी बनवले." [१३४]

कानपूरच्या कत्तलीबद्दल ते म्हणतात. " गंगेतून (गोऱ्या लोकांच्या) नावा चालल्या. बंडवाले त्यांची कत्तल करा म्हणत होते. पण नानासाहेबांनी खूप विरोध केला. शेवटी बंडवाल्यांनी ऐकले नाही. त्यांनी तोफ डागून नाव बुडवली व शेवटी या सर्वांचे खापर नानांच्या माथी फुटले. " [१३४]

" कानपूरच्या दंगलीशी नानासाहेबांचा मुळीच संबंध नव्हता. उलट त्यांनी इंग्रजांना वाचवण्याचाच प्रयत्न केला. " असे बयाबाई आपटे सांगत. * बयाबाईंच्या हकीगतीनुसार ही सर्व मंडळी आषाढ, शके १७७९ ते भाद्रपद, शके १७८० या काळात वनवास करीत होती.

इंग्रजांनी बंडवाल्यांना अगदी नामशेष करायचा निश्चय केला होता. ता. ३१ डिसेंबर, सन १८५८ ला नेपाळच्या हद्दीत रापती नदीकाठी इंग्रजांनी बंडवाल्यांशी मोठा सामना दिला. या पाच हजार फौजेत नानासाहेब, बाळासाहेब, लखनौची बेगम वगैरे खासा मंडळी हत्तीवरून स्वतः लढत होती. अखेरीस निभाव लागत

---

* " (ध्रुवघाटावरचे) गोलंदाजांनी तावडतोब श्रीमंतास (नानासाहेब) जाऊन कळविले कीं, एक नाव गोरे लोकांनी भरलेली प्रयागाकडे जात आहे व त्यांत बहुतेक बायका आहेत. हुकूम झाल्यास नाव टप्प्यांत आल्यावर गोळा टाकतो. हे ऐकून नानासाहेबांनी जबाब दिला कीं, नावेत जर बायका मुलें असतील तर त्यांस मारण्याचे कांहीं प्रयोजन नाही." – ' माझा प्रवास ' पृ. ३०.

नाही असे पाहून नदीपलीकडच्या जंगलात पेशवे-सैन्य व खासा मंडळी पसार झाली. या नंतर जंगबहाद्दरने इंग्रजांच्या समाधानासाठी 'बंडवाल्यांनी नेपाळच्या हद्दीमधून ताबडतोब बाहेर निघून जावे.' असा जाहीरनामा काढला.

जंगबहाद्दरने याच वेळी बद्रीसिंग नावाच्या सेवकाला लखनौच्या बेगमकडे पाठवून, 'तुम्ही आपल्या सैन्याला रजा देऊन सोबत असलेले स्नेही, सोबती, तालुकदार, नोकरचाकर यांचेसह नेपाळमध्ये खुशाल रहावे, मी इंग्रज सरकारकडून तुम्हाला माफी मिळवून देतो.' असा खास निरोप पाठवला. यावर बराच विचार-विनिमय झाला. सैन्याला रजा दिल्यावर जंगबहाद्दर आपल्याला केव्हाही पकडून इंग्रजांच्या हवाली करू शकेल या कारणासाठी बेगमने आणि नानासाहेबांनी हा प्रस्ताव नाकारला.

या दरम्यान इंग्रजांनी माफीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यामुळे बंडखोरां-पैकी हजारो लोक शस्त्रे टाकून इतरत्र निघून गेले. आता पेशवा-परिवारात फार थोडे लोक उरले होते. जंगबहाद्दरच्या प्रदेशात आश्रय मिळेनासा झाला की घाट ओलांडून इंग्रज हद्दीत यावे. इंग्रज फौजांनी पाठलाग केला की, पुन्हा नेपाळी हद्दीत शिरावे असा प्रकार होऊ लागला. ह्या धावपळीने दमछाक होऊन नानासाहेबांची प्रकृती खंगू लागली.

एके दिवशी अपयशामुळे मन खचून त्यांनी आपली एक करंगळी कापून कालीमातेला अर्पण केली. जंगलातील रोगट हवामानामुळे नानासाहेबांना ताप येऊ लागला. अखेरीस ऑक्टोबर, सन १८५९ अखेर देवखरी येथील रानात एका ओढ्याचे काठी त्यांना हिवतापाने मृत्यू आला.

तेथून जवळच एका गावी पेशवा-परिवारातील स्त्री-वर्ग व इतर चाकर मंडळी होती. त्यांनी मृत्युस्थानी जाऊन अग्निसंस्कार केला. गं. भा. बयाबाई आपटे मृत्यु-सन १८५८ सांगतात. बाकीचा तपशील गं. भा. बयाबाई, वर दिला आहे तसाच देतात. यावरून नानासाहेब व बाळासाहेब १८५९ साली वारले असणे शक्य आहे.

उठावाच्या संपूर्ण कालखंडात नानासाहेबांबद्दल उलट सुलट बातम्या येत. ३१ जानेवारी, सन १८६० चा 'ज्ञानप्रकाश' म्हणतो :– 'नानासाहेबाविषयी वर्तमाने जी येतात ती कालच्याशी आज ताळा नाही.' तर २८ एप्रिल, सन १८६१ चा 'ज्ञानप्रकाश' म्हणतो :– 'नानासाहेब किती वेळा मेला व पुन्हा जिवंत झाला यास तर ठिकाणच नाही.'

नानासाहेब नेपाळमध्ये अज्ञातवासात असताना ठाडा गावापासून सात कोसां-वरील देवखडी गावी दोषी ज्वराने बुधवारी ६ ऑक्टोबर, सन १८५८ रोजी (कालयुक्तनाम संवत्सर, भाद्रपद वद्य १४, शके १७८०) वारले असे बयाबाईंच्या

वृत्तांतावरून दिसते. बयाबाईंनी दिलेल्या नानासाहेब, बाळासाहेब, यांच्या मृत्यूच्या मित्या ' मोडक-जंत्री ' नुसार १८५८ सालाशी जुळतात. १८५९ सालाशी जुळत नाहीत. तथापि नानासाहेबांच्या मृत्युकाळाबद्दल संभ्रम अद्यापही कायम आहे.

या उठावाच्या वेळी बयाबाई आपटे १०–११ वर्षांच्या होत्या. त्या वयात त्यांना घडामोडींची उमज किती असणार ? तेव्हा त्यांनी सांगितलेली हकीगत वस्तुनिष्ठ असेलच असे नाही, असेही म्हटले जाते. वय लहान असले तरी त्या घडामोडींची स्मृतिचित्रे, प्रत्यक्ष घटनांमध्ये परिवार-सदस्य या नात्याने सहभागी असल्यामुळे मनावर कोरली जाणे सहज शक्य आहे. घटनांचे विश्लेषण, आणि अधिक तपशील उठावानंतरच्या काळात भोवतालच्या वडीलधाऱ्या मंडळींच्या तोंडून सतत ऐकून अधिक व्यवस्थितपणे माहिती होणे शक्य आहे.

बयाबाईंनी वयाच्या १२–१५ व्या वर्षी वि. का. राजवाड्यांना माहिती सांगितली असती तर पूर्वोक्त शंकांना विशेष अर्थ होता. उलटपक्षी त्यांनी स्वतःच्या ६६ व्या वर्षी राजवाड्यांना माहिती सांगितली (जानेवारी सन १९१३) आहे, हे लक्षात घ्यायला हवे. तेव्हा बयाबाईंची हकीगत सर्वस्वी अवास्तव मानणे योग्य नाही.

नानासाहेबांसाठी १८३६ साली वधुसंशोधन सुरू झाले. त्यासाठी महाराष्ट्रात व कोकणात कारभारी मंडळींना पाठवण्यासाठी बिठूर-कमिशनरकडे अनुमती-पत्रांसाठी विनंती करण्यात आली होती. परवानगी मिळाल्यावर वधुसंशोधन सुरू झाले.

नानासाहेबांच्या **पत्नी** : (१) सारजाबाई. विवाह १८३६ साली झाला. पिता करमरकर. **पत्नी** : (२) सारजाबाई. पिता पाटणकर. **पत्नी** : (३) कृष्णाबाई. (ऊर्फ पार्वतीबाई ?) माहेरचे नाव सुंदराबाई. जन्म सुमारे १८४६. (?) विवाह सन १८५६. या बहुधा सांगलीकर पटवर्धनांच्या कोणी नातलग असाव्यात. विवाहाचे वेळी त्यांचे वय सुमारे १० वर्षे होते. सर्वजण त्यांना ' काकूसाहेब ' म्हणत. त्या फार विनयशील होत्या. नेपाळमध्ये राणीगंज येथे राहत्या वाड्यात १८८६ साली वारल्या. (परिशिष्ट सातवे पहा.) पिता रामचंद्र सखाराम करमरकर. बयाबाई आपटे, त्यांचे नाव गोंजुमामा करमरकर असे सांगत. [१२२] कृष्णाबाईंबद्दल त्या वेळच्या वृत्तपत्रांत बातम्या आलेल्या आढळतात. त्यांतून त्या वेळच्या समाजाच्या समजुती व भावना यांवर प्रकाश पडतो. त्या दोन बातम्या पुढीलप्रमाणे –

१. नानासाहेबांची विधवा स्त्री

कृष्णाबाई नांवाच्या एका स्त्रीनें आपण स्वतः नानासाहेब यांची विधवा स्त्री असून त्यांच्या श्राद्धतिथीचा विधी करण्याविषयीं तिचा दीर बाळासाहेब यांच्याकडे नेपाळला पत्र पाठविण्याची अनुमती मागण्यासाठीं सरकारकडे अर्ज केला. हा अर्ज

अर्थात् सरकारने कबूल केला नाही.

सर्वसाधारण लोकांची समजूत अशी आहे कीं, ब्राह्मणांच्या बायका खोटे-पणानें कधी स्वतःला विधवा म्हणून घेणार नाहींत. पण ' ज्ञानोदय 'कार म्हणतात कीं, अशा प्रकारची लबाडी करण्यांस ब्राह्मण लोक मुळीच चुकणार नाहीत. ब्राह्मणाचा जीव वांचत असेल तर खोटें बोललें तरी चालेल असें हिंदुशास्त्रांत सांगितले आहे. कृष्णाबाईने असे ढोंग केले तरी तिला दोष न देतां तिनें पुण्यकर्मच केले, असे हिंदु लोक मानतील. ' नानासाहेब खचित मेला असा लोकांच्या मनांवर ठसा उठण्यास ही संभवनीय हिकमत आहे, ' हे नगरच्या 'वृत्तवैभवाचे' मतही ज्ञानोदयकारांनी दिले आहे. – ' ज्ञानोदय ' १–२–१८६४.

२. नानासाहेबांच्या विधवेचा गंगाविधी

असें म्हणतात कीं, थोड्या दिवसांवर कानपूर येथें नानासाहेब बंडवाल्यांच्या विधवेनें गंगाविधी करून आपले केश आपल्या नातलगांस वाटून दिले. आतां बरीक नाना खचित मेला असें म्हणतात. या प्रमाणे विधवांचे केश वाटण्याची चाल हिंदु लोकांत आहे असें आम्हीं कधी पाहिलें किंवा ऐकिलें नाहीं. - ' अरुणोदय ' ९-३-१८७३.

बिठूर येथील पेशव्यांच्या बायकांनी बंडाचे काळात युरोपियन स्त्रियांना भरपूर आणि चांगली मदत केली, याबद्दल अनेक इंग्रज अधिकाऱ्यांच्या ग्रंथांमध्ये सविस्तर उल्लेख आढळतात.

' ज्ञानोदय ' वृत्तपत्राच्या १ ऑगस्ट, सन १८५३ च्या अंकात : ' बाजीराव पेशव्याच्या दत्तक पुत्राची पत्नी नवऱ्याशी बनत नसल्यामुळें नाशकास राहणार आहे ' अशी विस्मयात टाकणारी बातमी वाचायला मिळाली. अधिक तपशील आणि संदर्भ उपलब्ध न झाल्यामुळे ही कोणती सून, हे स्पष्ट करता येत नाही.

मुलगी : मैना. सन १८५७ च्या उठावाच्या काळात बिठूरचा पेशव्यांचा वाडा इंग्रजांनी लुटून जाळला तेव्हा वाडा सोडायला नकार देऊन, मैना आगीत जळून मेली असा आख्यायिकावजा उल्लेख मिळतो. मैना ही धोंडोपंत नानासाहेबांची अनौरस मुलगी, तसेच चित्रकूटच्या विनायकराव पेशव्यांची औरस मुलगी असेही विसंवादी उल्लेख मिळतात.

तात्पर्य, ही नेमकी कोणाची मुलगी, औरस की अनौरस, याबद्दल निश्चित स्वरूपाची अधिकृत माहिती उपलब्ध नाही.

बिठूरच्या जळत्या वाड्यात जिवंत जळून गेल्यामुळे, बिठूर गावातील स्त्रिया मैनेच्या देहाची रक्षा या भावनेने वाड्याच्या अवशेषातील माती आपल्या मुलांना कोणाची दृष्ट लागू नये म्हणून तीट किंवा देवाचा आंगारा याप्रमाणे मुलांच्या कपाळी लावीत असत. ही प्रथा अलीकडच्या काळापर्यंत प्रचलित होती, असाही एक प्रवाद ऐकिवात आहे.

गंगाधर बाजीराव : (९) हे दत्तक आले. जनक पिता, महादेव नारायण भट. नानासाहेब पेशव्यांचे जनक घरचे सख्खे बंधू. नानासाहेबांच्या दत्तक विधानानंतर काही दिवसांनी, बाजीरावांनी यांना दत्तक घेतले. बाळाराव, बाळासाहेब या नावानेच हे इतिहासात प्रसिद्ध आहेत.

२८ जून, सन १८५७ च्या कानपूरच्या दरबारात यांच्या सन्मानार्थ १७ तोफा उडवल्या होत्या. कानपूरच्या सतीचौरा घाटावरील इंग्रज कैद्यांच्या स्थलांतराचे वेळी एकूण व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठी तात्या टोपेंचे बरोबर हेही हजर होते. या वेळीच किनाऱ्यावर लपलेल्या बंडवाल्यांकडून इंग्रजांची मोठी कत्तल (२७ जून) झाली. कानपूरला नानासाहेबांनी स्थापन केलेल्या कारभारी-मंडळात बाळासाहेबांकडे अर्थखाते सोपवले होते.

ते कमालीचे शूर होते. १५ जुलै, सन १८५७ ला कानपूरजवळ अहिरवा गावाजवळ झालेल्या (पांडु नदीच्या) लढाईत हे जखमी झाले. या लढाईतील कामगिरीबद्दल यांना बंडवाल्यांतर्फे ' रणकुशल ' पदवी देण्यात आली.

कानपूर, बिठूर सोडल्यावर नानासाहेबांच्या बरोबरच बाळासाहेब काही दिवस अयोध्येच्या जंगलात विजनवासात राहात असत. बाळासाहेबांना नेपाळ-सरकारने आश्रय नाकारला होता. अशा वेळी अवध संस्थानातील बहराईच जिल्ह्यातील तुळसापूर जहागिरीच्या विधवा राणीने त्यांना आश्रय दिला. बाळासाहेबांना ताब्यात घेण्यासाठी इंग्रजांनी तुळसापूरला बंडवाल्यांशी आठवडाभर लढा दिला. होप ग्रँटच्या सैन्याने बाळासाहेबांना ' अवधच्या ' सरहद्दीबाहेर हुसकावले. या चकमकी संपेपर्यंत बाळासाहेब नेपाळमध्ये निघून गेले होते.

पुढे बाळासाहेबांनी शरणागतीबद्दल इंग्रजांशी काही वाटाघाटी केल्या. त्यांनी इंग्रजांना लिहिलेल्या एका पत्राचा आशय[१३३] : ' तुम्ही माझे काय वाटेल ते करा. शिपाईगर्दीत नानांनी मला लोटले. शिपाई व नाना यांच्या कोंडीत सापडल्यामुळे नाना सांगतील तसे मला वागावे लागले. '

इंग्रजांच्या नोंदीप्रमाणे बाळासाहेब १८५९ साली हयात होते. बाळासाहेबांनी मेजर रिचर्डसन यांना पत्र लिहून आपण निर्दोष असून नानासाहेबांच्या सक्तीमुळे आपण बंडात पडलो असे सांगितले. बाळासाहेब शरण गेले नाहीत. नेपाळच्या तराईत (जंगलात) बुटबलजवळच्या डोकर भागात डांग* येथे दोषी ज्वराने ते १० जुलै सन १८५८ रोजी शनिवारी* (कालयुक्तनाम संवत्सर, ज्येष्ठ वद्य ३०, शके

* भारत (उत्तर प्रदेश) आणि नेपाळ सरहद्द लगत दक्षिण पश्चिम (नैर्ऋत्य नव्हे.) नेपाळमध्ये, नेपाळच्या दक्षिण सीमेजवळील भाग.

* बाळासाहेब हा आजारी पडून मरण पावल्याची एक बातमी लखनऊ हेराल्ड पत्रावरून समजण्यात येत आहे. – ' धुमकेतू ' २९ जुलई, १८५९. इसवी

१७८०) मृत्यू[१२२] पावले, असे गं. भा. बयाबाई आपटे म्हणतात. इंग्रजांच्या नोंदी-प्रमाणे ते १८५९ साली वारले. निश्चित काहीही सांगता येत नाही.

पत्नी : काशीबाई. यांना इंग्रजांनी पेशव्यांच्या स्त्री-परिवारात नेपाळमध्ये राहू दिले. नेपाळमध्येच राहत्या वाड्यात सन १८९६ पूर्वी केव्हा तरी यांचे निधन झाले. पिता बापूजी सखाराम गोडबोले.[१२२] बिठूरच्या बाजीरावांच्या खाजगी फौजेचे कारभारी. [११६] हे पेशवाई-अखेरच्या विश्वासातील निकटच्या कारभाऱ्यां-पैकी एक होते.

सदाशिव बाजीराव : (९) दत्तक आले. जनक पिता, त्रिंबकराव नारायण भट. यांना दादासाहेब म्हणत. गुरुवार, दि. ७–६–१८२७ या दिवशीच, नाना-साहेबांचे पाठीमागून यांचे दत्तकविधान (परिशिष्ट बारावे पहा.) झाले. दत्तक-विधानाच्या वेळी यांचे वय ३॥ वर्षे होते. त्यावरून यांचा जन्म डिसेंबर, सन १८२३ च्या सुमारास असावा. हे नानासाहेबांचे जनक घरचे सख्खे चुलत बंधू. दुसऱ्या बाजीरावांनी १८३९ साली मृत्यूपत्र केले त्यात यांचा उल्लेख नाही. यांच्या दत्तक मुलाचा उल्लेख आहे. यावरून दादासाहेब स्वतःच्या विवाहानंतर परंतु डिसेंबर, सन १८३९ पूर्वी, म्हणजे तरुण वयात वारले असावेत. **पत्नी :** रोहिणीबाई. यांनी वैधव्यकालात स्वतःचे सख्खे चुलत दीर सीताराम ऊर्फ पांडुरंग विश्वनाथ भट यांना दत्तक घेतले. रोहिणीबाईंचे पिता कारलेकर, रा. वाराणसी.

पांडुरंग सदाशिव : (१०) दत्तक आले. जनक पिता, विश्वनाथ नारायण भट. 'रावसाहेब' या नावानेच हे इतिहासात प्रसिद्ध आहेत. हे बाजीरावांच्या परिवारातच लहानाचे मोठे झाले. यांचा जन्म १८३७–३८ च्या सुमारास असावा. बाजीरावांच्या मृत्यूनंतर यांची व्यवस्था नानासाहेबांनी पूर्ववत ठेवली होती. त्या-खेरीज नानासाहेब यांना दरमहा २०० रु. खासगत खर्चासाठी देत असत. 'खेळ, पोहणे, मैदानी मर्दुमकी, अश्वारोहण व अश्वपरीक्षा यांत ते कमी नव्हते.' असे बयाबाई आपटे सांगत. यांच्या बालपणाविषयी फार त्रोटक माहिती उपलब्ध आहे.

रावसाहेब कानपूरच्या उठावात प्रथम पुढे आले. १७–१८ जुलै, सन १८५७ च्या रात्री नानासाहेबांनी सर्व परिवारासह नावेतून बिठूर सोडले. त्या परिवारात रावसाहेब पत्नीसह होते. त्यापूर्वी २८ जूनला नानासाहेबांच्या कानपूरच्या राज्या-भिषेकाच्या दिवशी यांच्या सन्मानार्थ १७ तोफांची सलामी देण्यात आली. मार्च, सन १८५८ मध्ये रावसाहेब काल्पीमध्ये होते. त्यांनींच राणी लक्ष्मीबाईंचे काल्पीला स्वागत केले. झाशी पडले तेव्हा काल्पी बंडवाल्यांच्या हातात होते. काल्पी येथे सामना करण्यासाठी राणी लक्ष्मीबाईंना रावसाहेबांनी आपले सर्व सैन्य दिले. २३ मे, सन १८५८ ला सर्वांनी काल्पी येथे अखेरचा निकराचा प्रयत्न केला. पण

इंग्रजांनी तो हाणून पाडला. यानंतर दक्षिण भारतात जायची कल्पना रावसाहेबांनी मांडली. परंतु प्रतिकूल परिस्थिती व मर्यादित साधन-सामुग्री यामुळे तो विचार सोडावा लागला. राणी लक्ष्मीबाईंच्या योजनेप्रमाणे ग्वाल्हेरकडे मदत मागायचे ठरले. रावसाहेबांनी गोपाळपूरला, तेथून ग्वाल्हेरला, तात्या टोपेंसह प्रयाण केले.

ग्वाल्हेर काबीज झाल्यावर ३ जून, सन १८५८ रोजी रावसाहेबांना 'पेशवा' घोषित करण्यात आले. दोन आठवडे ब्राह्मणभोजने झाली. या काळात रावसाहेबांचे संरक्षण व्यवस्थेकडे कमालीचे दुर्लक्ष झाले. याबद्दल राणी लक्ष्मीबाईंनीही वारंवार इशारा दिला होता. पण कोणीही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. यामुळेच १८ जूनला, इंग्रज अधिकारी ह्यू रोझला फारसे कष्ट न करता ग्वाल्हेर सर करता आले.

ग्वाल्हेर पडल्यानंतर तात्या टोपे, बांदा नवाब अलीबहाद्दर*, यांच्या सैन्यासह रावसाहेबांनी ग्वाल्हेर सोडले. पेशव्यांच्या हुकमतीखाली ग्वाल्हेर फक्त १८ दिवस होते. २–३ दिवसांनी ही मंडळी ग्वाल्हेरपासून सुमारे ३० मैलांवर असताना इंग्रज सैन्य पाठलागावर आले.

त्यापूर्वी रावसाहेबांची ग्वाल्हेरची कामगिरी लक्षात घेण्यासारखी आहे. 'शहराची नागवणूक होऊ दिली नाही. शिंद्यांच्या फौजेचा थकलेला पगार दिला. त्यासाठी ९ लाख रु. व आपल्या शिपायांसाठी ७॥ लाख रु. खर्च केले. राणी लक्ष्मीबाई व नवाब अलीबहाद्दर यांना अनुक्रमे २० हजार व ६० हजार रुपये वाटले. स्वतः १५ हजार सोन्याच्या मोहोरा घेतल्या. कैदेतील राजबंदी सोडले. शिंद्यांचे जुने नोकर पूर्वीच्याच पदावर कायम ठेवले.' [१३७]

ग्वाल्हेर सोडल्यावर पाठलागावर आलेल्या इंग्रज सैन्याने रावसाहेबांचा पराभव केला. तोफा काबीज केल्या. यानंतर इंग्रजांना चुकवताना रावसाहेबांच्या अनेक चकमकी झाल्या. रावसाहेबांजवळ ६ हजार फौज होती. त्या जोरावर त्यांनी इंग्रजांना खूप दिवस दाद दिली नाही. पारिनच्या राजावर तात्या टोपे मात करी-पर्यंत सर्व संग्रामात रावसाहेब लढत होते. नंतर निगा किल्ल्याच्या मार्गाने सिरोंजला पोहोचले. इसनगड, ललतपूरकडे त्यांनी मोर्चा वळवला. जाकलूणची लढाई मारली.

---

* १० मार्च, सन १८५८ रोजी रावसाहेबांना लिहिलेल्या पत्रात अलीबहाद्दरनी लिहिलेला मायना राजघराण्यातील शिष्टाचारांचा नमुना म्हणून पहाण्यासारखा आहे –

"२३ रज्जब संवत् १९१४। पितृतुल्य की सेवामें पुत्रतुल्य अलीबहाद्दर चरणपर मस्तक रखकर आदाब तस्लीम करता है।"– संदर्भ : 'संकानेजी' पृ. ३३ आधार : 'पो. प्रोसि. सप्लीमेन्ट सन १८५९ नं. ६४५.'

देवगड बारीपर्यंतच्या सर्व लढायांत रावसाहेब तात्या टोपेंचे साथीदार होते. या धावपळीत त्यांनी अनेक वेळा नर्मदा ओलांडली.

दरम्यान रावसाहेबांनी नर्मदा ओलांडून दक्षिणेकडेही उठाव करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. औरंगाबाद, परांडा, नगर, बीड, वगैरे ठिकाणचे किल्ले काबीज करून इंग्रजांविरुद्ध उठाव करावा, हैद्राबाद व इतर ठिकाणचे इंग्रज अधिकारी ठार मारावेत, हैद्राबादची निजामी सत्ता उखडून टाकावी अशी योजना होती. निजाम सरकारला याचा संशय आल्यावर, रावसाहेबांच्या कैदेसाठी ५ हजार रु. इनाम जाहीर केले. रावसाहेब मात्र हाती लागले नाहीत. [१३८]

रावसाहेबांनी इंग्रजांशी अखेरची लढाई २१ जानेवारी, सन १८५९ ला दिली. सपशेल पराभव झाला. यानंतर रावसाहेब व फिरोजशहा यांची तात्या टोपेंपासून कायमची ताटातूट झाली. ते दोघे सिरोंजच्या जंगलात आश्रयार्थ राहिले असताना इंग्रजांनी जंगलाला वेढा देऊन सर्वत्र कसून शोध घेतला. दोघे जिथे राहिले होते ती जागा सापडली पण ते दोघे मात्र सापडले नाहीत.

आतापर्यंतच्या निराशेने रावसाहेबांनी शरणागतीच्या वाटाघाटी सुरू केल्या. १४ मार्च, सन १८५९ ला त्यांनी एक दूत सर रॉबर्ट नेपिअर यांचेकडे पाठवला. त्यांनी सरकारकडून अपेक्षित असलेल्या सवलती स्पष्ट केल्या. इंग्रजांकडून सांगण्यात आले की, रावसाहेबांना पूर्वीच व्यक्तिगत अभय देण्यात आले असून त्यांचा कधीही अवमान होणार नाही. मात्र रावसाहेबांनी आपल्या वागण्या-बोलण्यामुळे इंग्रज लोकांच्या खुनाला चिथावणी दिली नाही हे सिद्ध करावे लागेल. रावसाहेबांना जीविताची हमी देण्यात येईल. त्यांना बेडया घालणे वगैरे अपमानास्पद वागणूक देण्यात येणार नाही. त्यांच्यासाठी निवृत्तीवेतनाचीही तरतूद करण्यात येईल. सरकार ठरवील अशा ठिकाणी राहण्याची अट त्यांना मान्य करावी लागेल. या अटींवर शरणागती पत्करायला रावसाहेबांनी नकार दिला.

दरम्यान त्यांनी ग्वाल्हेर, टोंक राज्यातील जंगलात साधु-वेशात भ्रमण चालूच ठेवले. सिरोंज – उज्जैन – उदेपूर – दिल्ली – ठाणेश्वर – ज्वालामुखी व कांगडा व्हॅली – चिनाई अशी भ्रमंती चालली होती. या काळात त्यांनी ‘लक्ष्मणदास पंडीत’ हे नाव घेतले होते.

त्यांच्या पत्नी व वृद्ध सासूबाईही बरोबर होत्या. पत्नी रमाबाई नेपाळमधून वेश बदलून उदेपूरला येऊन रावसाहेबांना भेटल्या. पुढे सर्व मंडळी दिल्लीला गेली. आपला जुना नोकर उमराव याच्या सोबतीने त्यांनी पत्नी व सासूबाईंना काश्मीर-मध्ये पाठविले. यावेळी पत्नी गरोदर होत्या व स्त्रियांना बरोबर घेऊन धावपळ करणे रावसाहेबांना प्रशस्त वाटेना. नंतर ते जम्मूमधील चिनाई गावी गेले.

रावसाहेबही नानासाहेब व परिवारासह नेपाळमध्ये गेले होते, पण काही महिन्यांनी हिंदुस्थानात परतले होते.

बयाबाई आपटे याबद्दल म्हणतात : 'या १४ महिन्यांच्या पळाला प्रारंभ होऊन २–४ महिने होत नाहीत तोच रावसाहेबांच्या डोक्यात काय क्लुप्ती आली न कळे. ते स्वारीला सोडून ग्वाल्हेरीकडे गेले.'

चिनाई गावापासून ३–४ मैल दूर असलेल्या एका देवळात रावसाहेब देवदर्शनासाठी जात असत. एक दिवस देवदर्शन करून येतात तोच एक भिकारी त्यांचेकडे आला. तो नेहमी तात्या टोपेंबरोबर असणारा भीमराव होता. तो रावसाहेबांबरोबर दीड महिना राहून घरी निघून गेला. हाच भीमराव काही दिवसांनी सियालकोटच्या डेप्युटी कमिशनरसह पुन्हा रावसाहेबांकडे आला. कमिशनरनी त्यांना अटक केली.* चौकशीसाठी कानपूरला आणले. रावसाहेबांनी इंग्रजांचे सर्व आरोप नाकबूल केले. नानासाहेब व तात्या टोपे हेच बंडाचे प्रमुख पुढारी होते, काल्पी, येथे इंग्रजांविरुद्ध लढलो ते आपण तात्या टोपे यांच्या सैन्यात असल्यामुळे व ते सैन्य जेथे जेथे गेले तेथे आपण गेलो, असे सांगितले.[१३९] तसेच कानपूरच्या हत्याकांडात आपला सहभाग नसल्याचे सांगितले.

कर्नल विल्यम्स् यांनी अटकेपूर्वी केलेल्या चौकशीत तपासलेल्या ६३ साक्षीदारांपैकी एकानेही कानपूरच्या हत्याकांडात रावसाहेबांचा हात असल्याचे सांगितले नव्हते. त्यामुळे न्यायालयापुढे नवीनच साक्षीदार उभे करून त्यांचे तोंडून रावसाहेबांवर आरोप करण्यात आले. त्याचा इंग्रजांना अपेक्षित परिणाम होऊन, बिबिघर-हत्याकांडाचा सूड घेतला पाहिजे, या भावनेने रावसाहेबांना २० ऑगस्ट, सन १८६२ ला (दुंदुभिनाम संवत्सर, श्रावण वद्य १०, शके १७८४) बुधवारी बिठूरला राजवाड्यासमोर फाशी दिले.* सुभेदार घराण्यातील वृद्ध गृहस्थ म्हणतात :[१२१] " नानासाहेबांचे चुलत भाऊ रावसाहेब हे जहाल असून हिंमतवान व शूर होते. तोंडात पट्टा धरून भरलेल्या नदीत पोहत जाऊन पैलतीर गाठावयाचा व शिकार करावयाची हा त्यांचा व्यवसाय होता."

रावसाहेबांच्या **पत्नी :** रमाबाई. यांचे माहेर ओकांकडे.[१२२] यांची फारशी माहिती उपलब्ध नाही. 'रावसाहेब पत्नी व मुलासह चिनाई येथे रहात होते.' या

---

* " बंडवाले नानासाहेब यांचे पुतणे रावसाहेब यांस त्यांचा नौकर भिमराव यानें सरकारास पकडून देऊन त्यांची चौकशी कानपूर मुक्कामी सुरू झाली आहे असें टैम्सवरून समजतें." – 'ज्ञानप्रकाश' ७ जुलै, सन १८६२ इसवी.

* यांना कानपूरला किंवा बिठूरला फाशी दिले, याबद्दल एकमत नाही कानपूरला तिवारीबागेत फाशी दिले असाही एक मतप्रवाह आहे.

आशयाचा एक त्रोटक उल्लेख 'एटिन फिफ्टीसेव्हन' या ग्रंथात पृ. ३७८ वर आढळतो. 'त्यांचे कुटुंब रमाबाईसाहेब* इंग्रजी हद्दीत होत्या. त्यांचा अंतही भयंकर स्थितीत झाला. कोणत्या प्रकारे झाला ते माहीत नाही.' असे बयाबाई आपटे म्हणतात, ते चूक आहे. उठावानंतरच्या रमाबाईंच्या जीवनाविषयी समकालीन वृत्तपत्रीय नोंद पुढीलप्रमाणे मिळते. :–

पेशविणबाईंचे मरण

कैलासवासी श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांचे दत्तक नातू भट नावाच्या वंशातील रावसाहेब पेशवे हे इंग्रज सरकारच्या हातानें फांसीच्या द्वारें कैलासवासी झाल्यावर त्यांची पत्नी रमाबाईसाहेब ह्या कांहीं एक दिवसांनी निराधार होऊन होळकर सरकारच्या मुलुखांत आल्या. सबब होंळकर सरकारांनी उदार हस्तानें यांची आजपर्यंत बरदास्त ठेविली होती. दरमहा सुमारे ६२० रुपये देत जाऊन खेरीज लवाजमाही यांच्या योग्य ठेविला होता. त्याकारणाने त्या बाईसाहेबांनी होळकर सरकार आपल्या कुटुंबापैकी आहेत असें समजून, देत असलेल्या पैशांत निर्वाह करून आपल्या माहेरच्या कुटुंबांसह तेथे राहत होत्या. त्या ता. १ माहे मजकूर रोजी देहमुक्त झाल्या. ('ज्ञानचक्षू' वरून) – 'ज्ञानोदय' १५–५–१८७३.

'रावसाहेब पेशव्यांची स्त्री इंदूरास होती' असा बिनचूक उल्लेख लोकहितवादी देशमुखांच्या 'ऐतिहासिक गोष्टी'त (भाग १, पृ. ६७) आहे.

चिमणाजी रघुनाथ : (८) गं. भा. यशोदाबाई पेशव्यांच्या मांडीवर दत्तक गेले. चिमणाजी माधवराव पाहा.

जनार्दन बाजीराव : (७) यांचा जन्म १० जुलै, सन १७३५ रोजी[१४०] (राक्षसनाम संवत्सर, श्रावण शु. २, शके १६५७) झाला. त्या दिवशी व्यतीपात योग होता. 'श्रावण सुध २, गुरुवारी, दिवसा तिसरे प्रहरी राजश्री बाजीराऊ प्रधान यांस कासीबाईचे पोटी पुत्र जाला ... बारावे दिवसी बारसे केले... जनार्दन नाव ठेविले' अशी २४–७–१७३५ ची नोंद आहे.[१४१] बारशाचा खर्च १७७९ रु. झाला. उष्टावण सोमवारी १९ डिसेंबर, सन १७३५ ला (पौष वद्य १ शके १६५७) झाले.[१४२] २६ मार्च सन १७४० ला बुधवारी रौद्रनाम संवत्सर, चैत्र शु. १०, शके १६६२) नानासाहेबांचे हस्ते मुंज झाली. मुंजीनंतर आई काशीबाईसह वडिलांकडे रावेरखेडीला गेले. तेथे पोहचल्यानंतर दोन दिवसांतच थो. बाजीरावांचे निधन

---

* रमाबाई संवत १९२८ (सन १८७२) मध्ये प्रयागला आल्या होत्या. अशी नोंद रामप्रसाद मिश्र संपादित 'बिठूर परिवारके प्रयागमें पंडाकी वही नं. ४ पृ. १८२–८३' वर आहे असे विधान आढळते. (पहा : 'संकानेजी' पृ. ५४) परंतु ही नोंद संशयास्पद वाटते.

झाले. अंत्यसंस्कार यांनीच केले. यांना बाबासाहेब म्हणत असत. १७४१ साली यांना देवी आल्या होत्या.[१४२]

अल्पवयीन असूनही यांनी महत्त्वाच्या घडामोडीत भाग घेतल्याचे दिसते. हे बुंदेलखंडच्या स्वारीवर गेले होते. त्याबद्दलचे निदान एक पत्र उपलब्ध आहे.[१७] हे २१ सप्टेंबर, सन १७४९ रोजी (शुक्लनाम संवत्सर, भाद्रपद बहुल ७ शके १६७१) गुरुवारी वारले. सदाशिवरावभाऊ शंकराजी केशवना लिहितात : 'श्रीमंत राजश्री जनार्दनपंत यांसी आठपंधरा दिवस ज्वर येत होता. त्यांस एकाएकी सन्निपात होऊन भाद्रपद बहुल सप्तमी, गुरुवारी सा घटिका रात्रीस देवआज्ञा जाहली.'[१४३] नवज्वराने सातारा मुक्कामी वारले.[१४४] यांच्या अस्थी ५ नोव्हेंबर, सन १७५० रोजी गंगार्पणासाठी व त्रिस्थळी यात्रा करावयास[११] भास्करराव वझे व रामचंद्र गोविंद यांचेबरोबर पाठविल्या.

पत्नी : सगुणाबाई. विवाह २० एप्रिल, सन १७४४ रोजी (रक्ताक्षीनाम संवत्सर, वैशाख वद्य ५, शके १६६६) शुक्रवारी झाला. पार्वतीबाईप्रमाणेच सात्त्विक वृत्तीच्या होत्या. पेशवे-परिवारातील कलहापासून अलिप्त होत्या. राजकारणात भाग घेत नसत. यांनीही सवाई माधवरावांचे संगोपन केले. सन १७५७ मध्ये काशीयात्रा केली. १०–३–१७५७ ला यात्रेला प्रस्थान ठेवले.[१४५] सन १७७९ च्या सुमाराला त्या पुणे कायमचे सोडून वडूथला रहायला गेल्या. सगुणाबाई वारल्यानंतर त्यांच्या मालमत्तेची मोजणी झाली. त्यांपैकी ११–१–१७८४ ची ग्रंथांची यादी पेद ३२ पृ. २४ वर उपलब्ध आहे. यांचे १३ नोव्हेंबर, सन १७८३ रोजी (शोभननाम संवत्सर, कार्तिक वद्य ४, शके १७०५) गुरुवारी[१४६] नाशिकजवळ जलालपूरला निधन झाले. पिता रामाजी अनंत भिडे, नाईक.

चिमाजी बल्लाळ : (६) यांचा जन्म अंदाजे सन १७०६ मध्ये झाला असावा.* हेच सुप्रसिद्ध चिमाजीआप्पा पेशवे. यांचे मूळ नाव अंताजी (अनंत) असून लहानपणी लाडके नाव चिमण पडले. तेच पुढे चिमाजीआप्पा असे रूढ झाले. यांना गुजराथी लोक 'चिमणराजा' म्हणत. हे थो. बाजीरावांप्रमाणेच शूर, रणधुरंधर, मुत्सद्दी, कर्तबगार होते. वडील बाळाजी विश्वनाथ पेशवे हुसेनअली सय्यदच्या मदतीसाठी दिल्लीला जाण्यापूर्वी भरलेल्या खास दरबारात ६ ऑक्टोबर सन १७१८ रोजी बाजीरावांना सरदारी व चिमाजीआप्पांना हुजूरची मुतालकी मिळाली.[१४७] थो. बाजीरावांना पेशवाई मिळाली, त्याच समारंभात (१७-४-१७२०) चिमाजीआप्पांना 'पंडीत' हा किताब व सरदारी मिळाली. त्याचबरोबर दमाजी थोरातांकडील सरंजाम, जो पूर्वी सातारा दरबारने जप्त केला होता, तोही चिमाजी-

* निश्चित जन्मतारीख अजून उपलब्ध नाही.

आप्पांना मिळाला. आतापर्यंतची चिमाजीआप्पांची मुतालकी महादाजीपंत पुरंदऱ्यांना मिळाली. वडिलांबरोबर यांनीही दमाजी थोरातांच्या कैदेत काही दिवस काढले होते.

सन १७२४ पर्यंत चिमाजीआप्पा मुख्यतः दक्षिणेत राहून ठिकठिकाणी माणसे पाठवून चौथाई सरदेशमुखीचा ऐवज जमा करून मोहिमांसाठी पैसा पुरवीत. शाहू महाराजांचा यांच्यावर फार लोभ असे. त्याबद्दल चिमाजीआप्पाही फार दक्ष असत. यामुळेच सातारा दरबारी बाजीरावांविरुद्ध सूत्रे हालू लागल्यावर त्यावर नजर ठेवणे चिमाजीआप्पाना सोपे जाई. नंतर बाजीरावांची माळव्यात मुलूखगिरी करण्यासाठी नेमणूक केली. चिमाजीआप्पांच्या कर्तबागिरीला येथूनच प्रारंभ झाला. सन १७२४ पासून यांनी मुलूखगिरीला सुरुवात केली. पेशवाई मिळाल्यावर थोड्या दिवसांनी बाजीरावांनी मोगलांविरुद्ध चढाईचे धोरण स्वीकारले. त्या वेळी हे माळव्यात होते. काही काळ उदाजी पवारांचे दिवाण म्हणून काम करीत होते.

सन १७२८-३२ या काळात चिमाजीआप्पांनी अनेक मोहिमा अंगावर घेऊन यशस्वीपणे पार पाडल्या. पेशव्यांच्या उत्तरेकडील मोहिमांत, माळव्यात घट्टपणे पाय रोवून बसण्याची महत्त्वाची कामगिरी त्यांनी जबाबदारीने पार पाडली. सन १७२४–३१ दरम्यान यांनी माळव्यात तीन स्वाऱ्या केल्या. यांनी व उदाजी पवारांनी मिळून माळव्याचा मोगली सुभेदार गिरीधरबहादूर याला २९–११–१७२८ ला आमझेरा येथील युद्धात ठार केले. सन १७३० मध्ये चिमाजीआप्पा व उदाजी पवार गुजराथेत उतरले. सन १७२९ मध्ये स्वतंत्र स्वारीत चिमाजीआप्पांनी माळव्याचा सुभेदार दयाबहाद्दर याला ठार करून तो प्रांत काबीज केला. गुजराथमध्ये मराठा पक्षाचा मोगली सुभेदार सरबुलंदखान यांचेकडून पेशव्यांचे पूर्वीचे सर्व करार कायम करून घेतले. गुजराथमध्ये चौथाई अंमल सुरू केला. सन १७३१ च्या प्रारंभी छत्रपतींचे सेनापती त्र्यंबकराव दाभाडे यांच्याविरुद्ध डभईच्या लढाईत त्यांनी बाजीरावांना मोलाचे सहाय्य केले.

२ ऑक्टोबर, सन १७३२ ला ते पुन्हा एकदा माळव्याच्या मोहिमेवर निघाले. ७ जून १७३३ ला मोहीम यशस्वी करून परतले राजा छत्रसालांच्या शब्दानुसार बुंदेली राज्याचा पेशव्यांचा १/३ हिस्सा, छत्रसालांचे वारसांशी वाटाघाटी करून सीमा निश्चित करण्याची जबाबदारी बाजीरावांनी चिमाजीआप्पांवर याच मोहिमेत सोपवली होती.

सन १७३६ च्या कोकणच्या मोहिमेत चिमाजीआप्पांनी जंजिऱ्याचा 'सिद्दी सात' याला ठार केले. बाजीरावांना पूर्वी कारणपरत्वे अर्धी सोडावी लागलेली कोकणची मोहीम यशस्वीपणे पूर्ण केली. बाजीरावांच्या १७३७ सालच्या उत्तरेकडील मोहिमेचे वेळी सर्व मुस्लिम मुत्सद्यांनी निजामाला मराठी फौजांवर पाठवले. याच वेळी चिमाजीआप्पांनी तापी नदीच्या खोऱ्यात छावणी ठोकून निजामाच्या

हालचाली बंद पाडल्या. त्या फौजेला जखडून ठेवले. रघूजी भोसले नागपूरकर व दाभाडे यांच्या हालचालींवरही पूर्ण लक्ष ठेवून बाजीरावांचा योग्य पाठपुरावा केला. भोपाळच्या संग्रामातील यशाचे निम्मे श्रेय निखालसपणे चिमाजीआप्पांचे आहे.

यानंतरची त्यांची इतिहासात विशेष प्रसिद्ध असलेली कामगिरी म्हणजे 'वसईची मोहीम'. उत्तर कोकणातील साष्टी प्रांतात पोर्तुगीजांनी हिंदू प्रजेचा धर्मच्छल केल्याची गाऱ्हाणी पेशव्यांकडे येऊ लागली होती. त्यामुळे सन १७३७ व सन १७३९ मध्ये मराठ्यांनी चिमाजीआप्पांच्या अधिपत्याखाली पोर्तुगीजांविरुद्ध मोहीम उघडली. वसईची पहिली मोहीम* मार्च सन १७३७ मध्ये सुरू झाली. त्या वेळी ठाण्याचा कोट व इतर ठाणी काबीज करून जुलै, सन १७३७ मध्ये ते पुण्याला परतले. दुसरी मोहीम डिसेंबर, सन १७३८ ते मे, सन १७३९ या काळात झाली. याच मोहिमेत अनेक संस्मरणीय लढाया लढल्या गेल्या. प्रसिद्ध 'वसईचा वेढा' मराठी फौजांनी ७ जानेवारी, सन १७३९ ते ५ एप्रिल, सन १७३९ या काळात दिला होता.

वसई काबीज झाली, (१३-५-१७३९), त्याबद्दलचा श्लोक[१४८] :

'सोळा शतें दशक सा वरि एक आहे। सिद्धार्थ वत्सर तयाप्रति नाम पाहे।
वैशाख वद्य द्वितियेसह भानुवारीं। शाहु निशाण चढले वसईं दुपारीं॥'

मराठी फौजांनी अत्यंत एकजुटीने, प्रखरपणे व निर्णयात्मक निश्चयाने तडीस नेलेल्या मोहिमांमध्ये वसईच्या मोहिमेचा समावेश होतो. या मोहिमेत यशस्वी झाल्यामुळे मराठ्यांना ३४० गावांचा प्रदेश, २० किल्ले, २५ लाखांचा दारुगोळा, वगैरे लाभ झाला. वसईच्या दैदिप्यमान यशामुळे चिमाजीआप्पांचा दरारा शतपटीने वाढला. थो. बाजीराव निधन पावल्यावर यांनीच नानासाहेब पेशव्यांना साताऱ्याला नेऊन शाहू महाराजांकडून पेशवाईची वस्त्रे देवविली. २५ जून, सन १७४० ला झालेल्या या समारंभात चिमाजीआप्पांचाही मोठा गौरव झाला.[१४९] 'चिमणाजी बल्लाळ पंडित यांस बहुमानाची वस्त्रे दिल्ही. वस्त्रे – १ मंदिल, १ झगा जामेवार मोतेचूर, १ चादर, १ पटका, १ इजार, १ तुरा मोतियाचा एकूण ५'.

---

* वसई जवळचा अर्नाळचाचा किल्ला १७३७ साली बाजीरावांनी पुन्हा बांधवला. त्याबद्दलचा दगडावर कोरलेला लेख :–

'बाजीराव अमात्य मुख्य सुमती आज्ञापिलें शंकरा।
पाश्चात्यांस वधूनि सिंधू उदरीं बांधा त्वरें जंजिरा॥
अर्नाळा जलदुर्ग चिंतुनि मनीं बाजी तुळाजी सुता।
शिल्पज्ञें दृढ शौर्य जाणुनि तया दुर्गासि संस्थापिता॥

– वाइवृ शके १८३८, पृ. १२९.

यानंतरच्या मोहिमेत त्यांनी दीव-दमणमधील रेवदंडा हे ठिकाण काबीज केले. चिमाजीआप्पा व नानासाहेब उत्तरेकडे निघाले पण पहिल्याच मुक्कामात त्यांची प्रकृती बिघडली. चिमाजीआप्पांना मोहीम सोडून परतावे लागले. यानंतर त्यांची प्रकृती ढासळू लागली. ' ब्रहस्पतिवारी सप्तमीस दहा घटका रात्रीस वेथा बहुत जाहली... नालगुताची वेथा जाहाली म्हणोन उपाय करीत आहो. ' असे उल्लेख मिळतात.[१५०] ऑक्टोबर सन १७४० मध्ये प्रकृती फारच बिघडून बुधवारी १७ डिसेंबर, सन १७४० ला (रौद्रनाम संवत्सर, पौष शु. १०, शके १६६२) चिमाजीआप्पा पुण्यात निधन पावले.

बाजीरावांना यांनी शब्दशः लक्ष्मणासारखी साथ दिली. शाहू महाराज व सरदार मंडळी बाजीरावांकडील कामे चिमाजीआप्पांच्या मध्यस्तीने करवून घेत. नानासाहेब व भाऊसाहेब पेशवे बहुशः चिमाजीआप्पांच्या तालमीत तयार झाले होते. कुटुंबातील व बाहेरील व्यक्तींचे बरेवाईट व्यवहार चिमाजीआप्पाच उलगडत. जरूर असेल तेव्हाच बाजीरावांना विचारीत. कौटुंबिक मंगलकार्ये, कौटुंबिक वाद, आप्त-सोयऱ्यांचा परामर्श, तीर्थयात्रा, दानधर्म, धार्मिक बाबी, आई राधाबाईंच्या सल्ल्याने तेच संभाळत.

त्यांचा स्वभाव फार विनयी, धोरणी, करारी, मनमिळावू, नीतिमान, कर्तव्य-निष्ठ, लाघवी व प्रेमळ होता. त्यांची शीलसंपन्नता संशयातीत होती. त्यांच्या अत्यंत कडक हिशोबी वृत्तीचा प्रसंगी बाजीरावांनाही धाक वाटे. बाजीरावांच्या कीर्तीमुळे चिमाजीआप्पांचे नाव काहीसे लोपले आहे. ' आपले म्हणणे तर सोडायचे नाही पण वेळप्रसंगी माघार घेतल्यासारखे दाखवून प्रतिपक्षाला चकवायचे आणि अखेरीस त्याच्याकडून आपलेच मत मान्य करून घ्यायचे ' ही कला बाजीरावांपेक्षा त्यांनाच जास्त साधली. दुसऱ्याचे मन न दुखावता पण निश्चयाने कामे करून घेण्यात यांची हतोटी होती.

बाजीराव व चिमाजीआप्पा हे दोघे बंधू इतके एकविचाराने वागत की, शत्रूपक्षाला दोन बाजीराव सगळीकडे संचार करीत आहेत असा भास व्हावा. त्यांनी आपलाच हेका चालवण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. बाजीरावांच्या प्रासंगिक दोषांवर पांघरूण घालून त्यांनी मोठ्या आस्थेने व प्रेमाने बाजीरावांचा पाठपुरावा केला. मस्तानीच्या बाबतीत बाजीरावांचे वागणे चिमाजीआप्पांच्या नैतिक धाकामुळेच मर्यादेत राहिले असे काही इतिहासकारांचे मत आहे. मस्तानीशीही ते आदबीने वागत. योग्यतेच्या दृष्टीने ते काही बाबतीत बाजीरावांपेक्षाही सरस होते. बाजीरावांप्रमाणे यांची प्रकृती दणकट, काटक, नव्हती. मात्र हिंमत व आत्म-शक्ती जबरदस्त होती.

पत्नी : (१) रखमाबाई. यांचा जन्म सन १७१० चा असावा.[१५१] विवाह सन १७१६. या विवाहासाठी बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनी ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकरांकडून ७०० रु. कर्ज काढले होते. कर्जफेडीसाठी थो. बाजीरावांची जामीनकी लिहून दिली होती.* या ३१ ऑगस्ट[१५१], सन १७३० रोजी, सोमवारी, (साधारणनाम संवत्सर, अधिक भाद्रपद वद्य १४, शके १६५२) बहुधा बाळंतरोगाने वारल्या. पिता विश्वानाथ कृष्ण पेठे. (सरदार त्र्यंबकरावमामा पेठे यांच्या ज्येष्ठ भगिनी.)

पत्नी : (२) अन्नपूर्णाबाई. यांचा विवाह गुरुवारी, ९ डिसेंबर, सन १७३१ रोजी (विरोधीनाम संवत्सर, मार्गशीर्ष वद्य ७, शके १६५३) पुण्यात झाला. १७२८ सालच्या माळव्याच्या मोहिमेत ह्या उत्तरेकडे गेल्या होत्या. ह्या स्वभावाने गरीब व अतिशय पतिनिष्ठ होत्या. चिमाजीआप्पांच्या निधनानंतर १७ डिसेंबर सन १७४० ला त्या सती गेल्या. 'सौवती अन्नपूर्णाबाई आपले खावंदसुद्धा पातकापासोन मुक्त होऊन चवदा इंद्र होईजोपर्यंत स्वर्गवास लाभ जाणोन सहगमन गेली.' चिमाजीआप्पांची उत्तरक्रिया व पत्नीचे सहगमनाचा खर्च फक्त ११७५ रु. झाल्याचा उल्लेख आहे.[१५२] पिता मोरेश्वर भिकाजी थत्ते.

पेशवे-घराण्यातील सुनांमध्ये सती जाण्याचा पहिला मान अन्नपूर्णाबाईंचा आहे हे निःसंशय. चिमाजी आप्पांची समाधी व पत्नीचे वृंदावन ओंकारेश्वराचे देवळाजवळ आहे.* समाधीस्थळ :[१५३] ओंकाश्वराचे देवळाबाहेर महाद्वाराचे उत्तरेला नदीकडे जाणाऱ्या वाटेवर मंदिरातील उत्तरेकडील ओवरीतील देवासमोर २० हातांवर समाधी. तिचा खालील भाग भरीव दगडाचा अष्टकोनी. प्रत्येक भाग तीन हात रुंद. चार हात उंच. तिच्या मध्यावर तीन हात चौरस आणि चार हात उंच घडीव दगडी वेलपत्तींचे कोरीव काम केलेले वृंदावन. त्यात पश्चिमेकडे समाधीच्या सपाटीपाशी कोनाडचात शाळुंकेसहित शिवलिंग. शाळुंकेची नाळ उत्तरेकडे. समोर सालंकार घडीव नंदी. खालील समाधी आणि वरील वृंदावन मिळून

---

* संदर्भ : 'ब्रस्वाच' पत्रसंग्रह : पत्र १९ (बाळाजी विश्वनाथांचे पत्र) पत्रावर छापील तारीख नाही. कोणीतरी संशोधकाने पाठीमागून, पुस्तक – प्रतीवर २८ एप्रिल, सन १७१७ ही तारीख पेन्सिलने लिहिली आहे.

* ओंकारेश्वर (पुणे) मंदिराच्या आवारात चिमाजी आप्पांची समाधी आणि सौ. अन्नपूर्णाबाईंचे वृंदावन आहे. त्यावरील अर्वाचीन शिलालेख :

"प्रौढ प्रताप महाराष्ट्र धर्म संरक्षक रणधुरंधर श्रीमंत चिमाजी अप्पासाहेब पेशवे स्वर्गारोहण पौष शु. ११ श. १६६२ श्रीमंत सौ. मातोश्री अन्नपूर्णा देवी श्रीमंता बरोबर या जागी सती गेल्या." या लेखातच पुढे 'जीर्णोद्धार चैत्र शु. १, शके १८६१' रोजी झाल्याचे म्हटले आहे.

श्रीआप्पास्वामी आणि त्यांच्या पत्नी सौ. सती अन्नपूर्णाबाई यांचे स्मारक फार उत्तम प्रकारे साधले आहे.'

अन्नपूर्णाबाईंची **मुलगी** : बयाबाई. जन्म अंदाजे सप्टेंबर, सन १७४०. विवाह २४ एप्रिल, सन १७४५ रोजी (क्रोधननाम संवत्सर. वैशाख शु. ४ शके १६६७) झाला. यांचे सासरचे नाव पार्वती. यांना पेशव्यांनी भाऊबीज म्हणून फुलंब्री गावाची ५००० रु. ची नेमणूक दिली, ही केवळ आख्यायिका आहे असे (ओंकार घराण्यातील वंशज आणि) इतिहासाचे अभ्यासक श्री. माधवराव ओंकार यांचे-कडून समजले. 'छ. १३ जिलकाद [१५४] इसन्ने खमसैन – २३–९–१७५१ सौ. बयाबाईस ऋतुदर्शन जाहाले त्यांस दागिने.' या १८ एप्रिल सन १७५९ ला बुधवारी (प्रमाथीनाम संवत्सर, चैत्र वद्य ६, शके १६८१) वारल्या. पती गंगाधर बाबूजी ओंकार. हे १४ जानेवारी, सन १७६१ ला पानिपतच्या युद्धात मारले गेले.

सदाशिव चिमाजी : (७) यांची आई रखमाबाई. यांचा जन्म ४ ऑगस्ट, सन १७३० रोजी सोमवारी (साधारणनाम संवत्सर, अधिक भाद्रपद शु. २, शके १६५२) झाला. हेच प्रसिद्ध भाऊसाहेब पेशवे ' छ. ११ (१४–७–१७३०) रोजी सदाशिवरावभाऊंचे नामकरण ' [१५५] याखेरीज '१७३३ मार्गशीर्ष शु. ५, भृगुवार १। रु. खासगत खर्च सदाशिव चिमणाजीची शेंडी राखली. त्यास नहावयासी सेला.' अशी जावळासंबंधी नोंद मिळते. [३५] यांची मुंज १२ फेब्रुवारी, [१५६] सन १७३६ रोजी झाली. 'फाल्गुन सुध १२, द्वादसी, गुरुवारी राजश्री चिमाजीआप्पांचे पुत्र सदोबा यांचा व्रतबंध जाला.' चिमाजीआप्पांचे मागे यांचे संगोपन गं. भा. राधाबाईंनी केले. लहानपणापासून तरतरीत व पाणीदार होते.

नानासाहेबांना पेशवाई मिळाल्यावर काही वर्षे हे साताऱ्यालाच असत. या काळात यांची चलाखी, निस्पृहता, करारी वृत्ती, शुद्ध आचरण, न्यायी वृत्ती, हिशोबी वृत्ती, दक्षता इत्यादी गुण शाहू महाराजांच्या लक्षात आले होते. याप्रमाणे त्यांना लहान वयातच साताऱ्याकडचे राजकारणाचे वळण मिळाले. (१७४३ साली चैत्र महिन्यात यांना देवी आल्याची एक नोंद राखं. ६ पृ. ४७ वर आढळते.)

देशमुखांनी तुंगभद्रा दुआबातील उठवलेली पेशव्यांची ठाणी काबीज करण्यासाठी ५ डिसेंबर, सन १७४६ ला महादाजीपंत पुरंदऱ्यांसह सदाशिवरावभाऊ कर्नाटकच्या मोहिमेवर रवाना झाले. जानेवारी सन १७४७ मध्ये त्यांनी आजरे येथे पहिली लढाई मारली. बहादूरभेंड्याचा किल्ला घेतला. तुंगभद्रेपर्यंत जाऊन सावनूरकर नवाब, देसाई व बंडखोरांना जरब बसवली. सावनूरच्या नवाबांकडून पाच्छापूर, कित्तूर, परसगड, गोकाक, यादवाड, बागलकोट, बदामी, नवलगुंद, उंबल, गिरी, तोरगळ, हल्ल्याळ, हरिहर, बसवपट्टण, वगैरे ३६ परगणे सदाशिवरावभाऊंनी काबीज केले. सांगोल्यावर स्वारी करून (ऑगस्ट सन १७५०) यमाजी

शिवदेवाचे बंड मोडले. छत्रपती रामराजांकडून सन १७५० मध्ये मराठी राज्याची कायमची मुखत्यारी लिहून घेतली.

भाऊसाहेब लहानपणापासून शूर, कर्तबगार असल्यामुळे नानासाहेबांची त्यांचेवर फार मर्जी असे. भाऊसाहेब आपले वडील, तसेच प्रसिद्ध रणधुरंधर मुत्सद्दी रामचंद्रबाबा शेणवी यांच्या तालमीत तयार झाले होते. या काळात महादाजीपंत पुरंदरे दिवाणपदावर होते, म्हणून भाऊसाहेबांनी नागपूरकर भोसल्यांची दिवाणगिरी पत्करली. दत्तक रामराजामध्ये कुवत नसल्यामुळे सातारकर छत्रपतींची गादी कोणी चालवावी याबद्दल वाद उत्पन्न झाला. रामचंद्र बाबा शेणवींनी, कोल्हापूरकर संभाजीला साताऱ्याच्या गादीवर न बसवता भाऊसाहेबांनाच कोल्हापूरची पेशवाई मिळवून द्यावी असे सुचवले. ही मसलत नानासाहेबांनी मान्य केली नाही.

सांगोल्याच्या स्वारीहून (सन १७५०) परतल्यावर, कोल्हापूरकरांशी संधान बांधून भाऊसाहेबांनी तिकडची पेशवाई-वस्त्रे, पारगड, कल्लानिधी, चंदनगढी, हे तीन किल्ले आणि सालिना ५० हजार रु. उत्पन्नाची जहागिरी मिळवली. दिवाणगिरीच्या मुद्यावरून भावा-भावात तंटा होऊ नये म्हणून महादाजीपंत पुरंदऱ्यांनी आपखुषीने दिवाणपदाचा राजिनामा दिला. यानंतर लगेचच भाऊसाहेब, नानासाहेब पेशव्यांचे दिवाण झाले.

तुंगभद्रा कोरगाव लढायात १७५१–५२ साली भाऊसाहेब हजर होते. १७५४ साली कर्नाटकात जाताना नानासाहेबांनी कोल्हापूरकर संभाजीची भेट घेऊन, भाऊसाहेबांना प्रधानकीची वस्त्रे देवविली. १७५७–५८ मधील दक्षिणेकडील मोहिमा यशस्वीपणे पार पडल्या. सन १७५९–६० मधील निजामाविरुद्धची उदगीरची मोहीम, जी मराठ्यांच्या अत्यंत यशस्वी मोहिमांपैकी एक आहे, यांच्याच नेतृत्वाने पार पडली. याच मोहिमेच्या प्रारंभी काही व्यक्तिगत कारणांमुळे २८ ऑक्टोबर, सन १७५९ रोजी मुजफ्फरखानामार्फत हैदरखानाने भाऊसाहेबांवर हत्यार चालवले. सुदैवाने भाऊसाहेब बचावले. उदगीरची मोहीम संपते तोच अहमदशहा अब्दालीकडून उत्तरेच्या मराठी फौजांचा पराभव झाल्याच्या बातम्या आल्या. नानासाहेबांनी भाऊसाहेबांना मोहीम आटोपती घेऊन परत बोलावले. २९–२–१७६० च्या पत्रात भाऊसाहेब लिहितात : [१५७] 'अब्दालीच्या पेचामुळे इकडे आटोपावे लागले नाहीतर सारी दक्षिण मोकळी होती.'

हिंदुस्थानचे वाटेवर पूर्णा नदीच्या काठी पटदूर येथे ७ मार्च, सन १७६० पासून अहोरात्र आठवडाभर कडाक्याच्या वाटाघाटी होऊन मोठी फौज, खजिना व सर्व जय्यत तयारीसह भाऊसाहेबांना उत्तरेत पाठवण्याचा नानासाहेबांनी निर्णय घेतला. भाऊसाहेबांच्या आधिपत्याखाली मातब्बर सरदारांसह १४ मार्च रोजी फौज निघाली. या मोहिमेत मराठी फौजांनी दत्ताजी शिंद्यांच्या हत्येचा बदला घेतला.

२ ऑगस्टला दिल्ली काबीज करून, फौजेचा थकलेला पगार देण्यासाठी नाणी पाडण्याकरिता चांदी उपलब्ध व्हावी म्हणून स्वतः भाऊसाहेबांनी शाही तख्ताचे छत फोडले. या चांदीतून ९ लाख रु. उपलब्ध झाले. मराठी फौजांनी १५ ऑक्टोबरलाही दिल्लीत खूप लूट केली. दिल्लीच्या उत्तरेकडील ७९ मैलांवरील कुंजपुरा १७ ऑक्टोबरला काबीज केले. तेथील किल्ल्यात १० हजार खंडी धान्य, ७ लाख रु., ५–६ हजार घोडी अशी लूट मिळाली.

बुधवारी १४ जानेवारी, सन १७६१ ला झालेल्या सर्वंकष (पानिपत) युद्धात देखील दुपारपर्यंत मराठ्यांचा विजय निश्चित होता. मात्र दुपारी विश्वासराव पडल्यावर स्थिती पालटली. विश्वासरावांना जखमी अवस्थेत पाहून भाऊसाहेबांनी खूप शोक केला. त्याही अवस्थेत विश्वासरावांनी त्यांना धीर दिला. विश्वासरावांच्या मृत्यूमुळे दुःखातिशयाने बेभान होऊन भाऊसाहेबांनी 'गिलच्या खाशासुद्धा ठार करीन तरच पुण्यास जाईन.' अशी घोर प्रतिज्ञा केली. ते पायउतार होऊन जिवावर उदार होऊन तलवार मारीत गर्दीत मिसळून लढू लागले. विश्वासराव व भाऊसाहेब दोघेही अंबारीत न दिसल्यामुळे मराठी फौजेचा धीर खचला. १४ जानेवारीलाच (विक्रमनाम संवत्सर, पौष शु. ८, शके १६८२) भाऊसाहेब* पानिपतवर मारले गेले. [१५८] काशिराज, गणेश वेदांती, इत्यादी मुत्सद्यांनी एक लाख रु. खंडणी भरून भाऊसाहेबांचा मृतदेह मराठ्यांच्या छावणीत आणला. १५ जानेवारीला धार्मिक मंत्राग्नीयुक्त अंत्यसंस्कार केले.

ज्या ठिकाणी भाऊसाहेबांना मृत्यू आला असे सांगितले जाते, त्या ठिकाणी ब्रिटिश काळात स्मारकस्तंभ उभारला आहे. त्या दगडी स्तंभावरचा मजकूर –

"This Pillar marks the site of the Black Mango Tree, near which was fought the 3rd battle of Panipat between Ahmadshah Abdali and the Mahratta Confidercy in 1761."

रणांगणावर पराभव झाला तरी पानिपतचा संग्राम हा मराठ्यांचा नैतिक विजयच आहे. इंग्रजांनीही याबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. मेजर इव्हान्स बेल म्हणतो :

"Even the battle of Panipat was triumph and a glory for the Marathas. They fought in the cause of 'India for Indians'–"

भाऊसाहेब उंच, मजबूत, काटक, देहयष्टीचे होते. त्यांच्यामध्ये चिमाजी-आप्पांची तडफ चांगलीच उतरली होती. भव्य कल्पना, अफाट कर्तृत्व, अकुतोभय वृत्ती, बुद्धिमत्ता, तडफ निरलसता, चोख कारभार, माणसाची पारख, दृढ निश्चय,

* पानिपतच्या वीरांच्या यादीत 'भाऊचे ठिकाण नाही.' एवढाच उल्लेख आहे– पुद. १ ले. ४२५. पृ. ३१९.

इत्यादी गुणांत भाऊसाहेबांची बरोबरी करू शकेल असा पुरुष म्हणजे उत्तर पेशवाईत थोरले माधवराव एकटेच झाले. ' हिंदुपदपादशाहीचे ध्येय साध्य करावयाचे असल्यास मराठेशाहीतील सर्व शक्तींची अभेद्य एकजूट झाली पाहिजे व मध्यवर्ती सत्ता सर्वाधिकाराने युक्त, बलिष्ठ व केंद्रिभूत झाली पाहिजे व तिच्या एकसूत्री नेतृत्वाखाली मराठेशाहीची चढाईची मुलूखगिरी चालली पाहिजे. ' हे धोरण सदाशिवराव भाऊने निखालसपणे जाणले होते.' [१५९]

नानासाहेबांचे दिवाण म्हणून भाऊसाहेबांनी सन १७५०-६० मध्ये केलेली कामगिरी व त्यांनी लावलेली फडाची उत्तम व्यवस्था, थोरल्या बाजीरावांच्या जोडीला चिमाजी आप्पांच्या कामगिरीइतकीच महत्त्वाची आहे. बदलत्या काळाची गरज ओळखून स्वतंत्र तोफखाना तयार करून त्यावर इब्राहिमखान गारद्याची नेमणूक करणे, वेळ जाणून जोराचा हल्ला चढवून चडकवंद गराड्यातून वाट काढण्याचे धोरण पत्करून लढाई देणे, या गोष्टी भाऊसाहेबांच्या युद्धकौशल्याची साक्ष देतात. भाऊसाहेब लष्करी व दिवाणी दोन्ही जबाबदाऱ्यांत नेहमीच यशस्वी झाले. त्यांना खोटेपणा खपत नसे. त्यांची वागणूक जरबेची असे. ते करारी, तापट, महत्त्वाकांक्षी होते. ' भाऊ हा आपल्या बापाप्रमाणे तापट व इरेस पडणारा आहे. ज्या गोष्टीचा अभिमान तो धरील ती तो मेला तरी सोडणार नाही -' महादाजीपंत पुरंदरे. [१६०]

भाऊसाहेबांनी केलेली मद्यपानबंदी (सन १७५४) पुष्कळ दिवस होती.[१६१] हिंमत, साहस, जरब, वगैरे गुणांत भाऊसाहेब नानासाहेबांपेक्षा वरचढ होते, पण हट्टी व तापट स्वभावामुळे त्यांची कामे बिघडत.

पत्नी : (१) उमाबाई. माहेरचे नाव वेणूबाई. विवाह गुरुवारी, ७ फेब्रुवारी,[१६२] सन १७४० रोजी (सिद्धार्थीनाम संवत्सर, माघ वद्य ६, शके १६६१) झाला. यांना दोन अपत्ये झाली. पण ती लहानपणी वारली. उमाबाईंच्या आजारपणाविषयी, मुलाच्या जन्मापूर्वीच्या आठवड्यातील एक नोंद : [१६३] ' १७-११-१७४६, छ. १४ जिल्काद सबा आर्बैन अनुष्ठान-खर्च सौ. उमाबाई यांस बरे वाटत नाही. सबब पवित्रके जोड सोने वजन ८ तोळे ' उमाबाई गुरुवारी २२ मार्च, सन १७५० रोजी (शुक्लनाम संवत्सर, फाल्गुन वद्य १०, शके १६७१) वारल्या.[१६३] उत्तर-कार्याचा खर्च कापड[८५] १०९९ रु. आणि रोख ६८५७ रु. मिळून ७९५६ रु. झाला. पिता महादाजी नारायण भानू (फडणीस).

पत्नी : (२) पार्वतीबाई. विवाह गुरुवारी २६ एप्रिल, सन १७५० रोजी (प्रमोदनाम संवत्सर, वैशाख शु. २ शके १६७२) झाला.[१६४] गर्भादान १७५५ साली झाले. [१५६] ' छ. २९ जाखर खमस खमसैन मया व अलफ जमा जामदारखाना कमाविस जमा आहेर गर्भादान सौ. पार्वतीबाई पैकी जमा सनगे

२५५ रु. ८ आ. विद्यमान रा. नानासो १०५४ रु.८ आणे विद्यमान रा. भाऊसो.

पार्वतीबाई १९ ऑक्टोबर, सन १७६६ ते २६ नोव्हेंबर सन १७६६ पर्यंत हरिहरेश्वर यात्रेला गेल्या होत्या. परतीच्या प्रवासापूर्वी ६ दिवस आधी, २० नोव्हेंबरला जंजिऱ्याच्या सिद्दीकडून मेजवानीचे जिन्नस आले. ते आणणाऱ्यांना त्या दिवशी तिवटे आणि रोख रुपये बक्षीस दिले.

पार्वतीबाई सोशिक, सात्त्विक, भोळ्या, थोर पतिव्रता होत्या. ह्यांचे सहसा कोणाशी वाकडे आले नाही. त्या राजकारणात पडत नसत. त्यांनी उत्तर आयुष्य देवधर्म, तीर्थयात्रा, कौटुंबिक व्यवस्था, यांत घालवले. भाऊसाहेबांबरोबर पानिपत-वर गेल्या होत्या. भाऊसाहेबांचा मृतदेह न पाहिल्यामुळे त्यांनी स्वतःच्या मृत्यूपर्यंत सौभाग्यलेणी उतरली नाहीत. सवाई माधवरावांचे त्यांनीच संगोपन केले. त्यांच्या मृत्यूनंतरचे महादाजी शिंद्यांचे उद्‌गार,[१६५] ' बाईंनी कैलासवास केला त्यास इश्वरेच्छेस उपाय नाही. मातुश्री होती तो पावेतो श्रीमंत राजश्री रावसाहेब याज-विषयी खातरजमा होती. सांप्रत बंदोबस्तास खातरजमेचे कोणी दिसत नाही. ' भाऊसाहेबांच्या तोतया प्रकरणात पार्वतीबाईंनी खूप संयमाने वागून बारभाईंना अडचणीत आणले नाही. पार्वतीबाईंना तोतया १७७६ साली समक्ष दाखवून नंतर ठार* मारला,[१६६] असा उल्लेख मिळतो.

पार्वतीबाई १६ ऑगस्ट, सन १७८३ रोजी शनिवारी (शोभननाम संवत्सर, श्रावण वद्य ३, शके १७०५) वारल्या. यांना दोन अपत्ये झाली, पण ती बालपणी वारली.[१५७] ' पार्वतीबाईंनी आपले सौभाग्यचिन्ह अखेरपर्यंत टिकवले म्हणून तिच्या अंत्यविधीत नवऱ्याची सुद्धा क्रिया पलाशविधीने करण्यात आली. '[१६७] सौभाग्य-वायने वाटली.[१२] यांच्या रौप्यतुलेचा खर्च ८३३८ रु. आला. पुढे भाऊसाहेबांचेही उत्तरकार्य १७८४ साली भीमा नदीच्या काठी केले. ह्याचा खर्च ३५,७९५ रु. आला. ' पार्वतीबाईंच्या अस्थी विठ्ठलपंत लेले याजबरोबर पेशव्यांनी काशीस पाठविल्या. '[३४] पार्वतीबाईंचे पिता कृष्णराव मोरेश्वर कोल्हटकर, सावकार ता. पेण, रा. नेवरे.

कृष्णराव सदाशिव : (८) याची आई उमाबाई. याचा जन्म २२ नोव्हेंबर, सन १७४६ रोजी (क्षयनाम संवत्सर, मार्गशीर्ष वद्य ५, शके १६६८) शनिवारी झाला. मुलाच्या नाजुक प्रकृतीबद्दलची[१५७] नोंद : ' २२-११-१७४६, छ. १९ जिल्काद सबा, आर्बैन चिरंजीव कृष्णराव (उमाबाईचा पुत्र) यांस बरे वाटत नाही.

---

* इतिहासकार वा. वा. खरे, न. चिं. केळकरांना २४-१०-१९०९ ला पाठवलेल्या पत्रात म्हणतात : " तोतयास पार्वतीबाईंच्या नजरेसमोर केव्हाही — शेवटीसुद्धा — आणण्यात आले नाही. " संदर्भ : ' सह्याद्री खंड ' पृ. ८१८.

सबब पवित्रके जोड सोन्याचीं करण्यास खर्च. ' याच्या नावाचा एक उल्लेख मिळतो : गोपिकाबाईंनी आपली जाऊ जानकीबाईंना लिहिलेल्या पत्रात,[१६८] ' अपत्ये विश्वासराव व माधवराव व कृष्णा यांचे सां. नमस्कार ' असा मजकूर आहे. पत्रावर तारीख नाही. मंगळवार दि. ३० जून, सन १७४७ ला (प्रभवनाम संवत्सर, आषाढ शु. ४, शके १६६९) याचे बारसे झाले. कृष्णराव फार जगला नाही.

पुत्र सदाशिव : (८) याची आई उमाबाई. नाव समजले नाही म्हणून याचा उल्लेख ' पुत्र ' असा केला आहे. याचा जन्म[१६९] ३० जुलै, सन १७४८ रोजी (विभवनाम संवत्सर, श्रावण वद्य २, शके १६७०) शनिवारी झाला. '२५-८-१७४८ छ. ११ रमजान तिसा आर्बैन पुत्रोछाह राजश्री नाना यांसी पुत्र जाला व राजश्री भाऊ यांसी पुत्र जाला.'[१७०] हा मुलगा देखील जगला नाही.

या मुलाच्या जन्मानंतर आप्पा पुरंदऱ्यांना लिहिलेल्या, ४ ऑगस्ट, सन १७४७ च्या (पुद १, ले १९७) भाऊसाहेबांच्या पत्रावरून कोवळ्या वयात स्त्रीला मुले होणे स्त्रीचे दृष्टीने चांगले नाही याची भाऊसाहेबांना पूर्ण जाणीव असल्याचे दिसते. ते म्हणतात :

" आसीर्वाद उपरी प्रस्तुत पुत्र जाला. त्याचे बारावे दिवसी बारसे करावे लागेल स + यासी माझे मते आधी थोडे वयात दोन मुले जाले हेहि वाईट वाटते."

* *

संदर्भ टिपा :

(**पृ. ६२ ते १२४ थोरली पाती**) :

(१) बाबा पेरो III नोंद १६४, (२) ऐलेसं प. १२७४, (३) त्रिमूर्ती दर्शन पृ. १९, (४) मदरु भा. २, पृ. ६९, (५) वाइवृ शके १८३७, पृ. ९१, (६) मदरु भा. २, प्रस्ता. पृ. १०, (७) कासंपया ले. ४९४, (८) मसाछोब पृ. ६७, (९) पेद ९, पृ. २, (१०) पेद ४, प. ६६, (११) राखं. २, पृ. २-३, (१२) पेद ७, प. ३, (१३) पेद ४४, पृ. ८०, वाइवृ शके १८३७, पृ. ९६, (१४) मरि खं. ३, पृ. ५६, तळटीप, आ. स. १९८९, (१५) कु. गॅझे. आ. स. १९६४, पृ. ९६३, पृ. ९७८, (१६) मराठी ज्ञानप्रसारक पुस्तक १६, अंक ८, सन १८६५, पृ. २३६-४२, (१७) ऐसंसा खं. १, ले. १३८, (१८) पुद १, ले. २१, (१९)

'इतिहास आणि संस्कृती' त्रै. एप्रिल-सप्टेंबर १९८७, पृ. ३३, (२०) संवृ. ५, पृ. १-११, (२१) संवृ ३, पृ. ८६, (२२) शा रो. १, पृ. ४५, नोंद १०१, (२३) पेद ३०, ले. २, (२४) मसाछोब : आशय, (२५) घया- वाइवृ शके १८३५, पृ. ३८२, (२६) पेद ७, प. २९, (२७) बाबा पेरो २, नोंद ३०९, (२८) ऐटि ९, इतिसं डिसेंबर १९०९, (२९) राखं. २, पृ. ३२-३६, राखं. १५, पृ. २९८, (३०) पेव (आ. १९८६), पृ. ३, ऐगो पृ. ९१, मरि. खं. ३, पृ. १५३, आ. स. १९८९, (३१) TES Vol. 1, P. 1, (३२) मरि खं. पृ. आ. स. १९८९, रा. खं. ८, ले. ५६, पृ. ७८, (३३) यनकेसं, (३४) मरि खं, ३, आ. १९८९, पृ. १२७, पेद ३०, पृ. २३६, (३५) वाइवृ शके १८३५, पृ. २००-२०९, (३६) ऐगो पृ. १८, (३७) पेद ९, प. २८, (३८) वाइवृ शके १८३७, पृ. ८६, (३९) इतिसं पु. २, अं. ४, पृ. १४, (४०) पेद २२, पृ. ५४, (४१) पेद २२, पृ. १८, (४२) शिवलेख पृ. ४३, (४३) पेद २२, नोंद ३३०, (४४) राखं. २, पृ. ७४, (४५) राखं. ६, पृ ६७, (४६) ऐस्फुले भा. २, ले. ३, ता. ७-७-१७४६, (४७) इतिसं नोव्हेंबर १९०९ ऐटि ३, (४८) त्रै. १८ : २, पृ. ४०, (४९) इचसं इति पृ. १०४, (५०) बावपेच-बापट पृ. ९, (५१) मदरु भाग २, पृ. ७३, (५२) शारो १, पृ. ४६, (५३) कित्ता नोंद १०६, (५४) पुद १, फे. ७६, (५५) पेद १०, १३, ३०, ३३, (५५) ऐगो पृ. २२, (५७) मस्ता-बाजी पृ. १३, (५८) महा. छत्र. बुंदेला पृ. ९७, (५९) EXP. MAR. PWR., पृ. ५१, (६०) राखं ६, पृ. ३२, (६१) पुद १, ले. ४३६, (६२) बाबा पेरो ३, पृ. ९९, (६३) इतिसं ए. १९१०, (६४) विज्ञावि जानेवारी १९३१, पृ. २१, (६५) पेद ४०, पृ. १७, (६६) 'तुलादान विधी' पृ. १७, (६७) राखं २, पृ. ९३, (६८) पेका महा पृ. ३२८, (६९) राखं २, पृ. १७३, (७०) मदरु भा. २, पृ. ७९, (७१) राखं ४, पृ. १७३, (७२) राखं २, पृ. ८९, शारो १, पृ. ४६, (७३) पुद १, पृ. १४९, (७४) इचसंइति पृ. ६५, (७५) राखं २, पृ. ९७, (७६) राखं २, पृ. २१२, (७७) पुद १, पृ. ३९५, (७८) पुद ३, पृ. १४८, (७९) पुद १, ले. ४००,

(८०) राखं ६, पृ, ४८५, (८१) समापेरो ४, पृ. ९४, (८२) त्रै. २१ : २, पृ. ४६, (८३) पेकामहा पृ. ६७, (८४) थोमापेरो ९१, पृ. ५८, (८५) ऐलेसं ११३५, (८६) गोद मपोभा नं. १४०१, (८७) पेद २२, पृ. १३४, (८८) मरिउवि १, पृ. ४८५, (८९) ऐलेसं १२१९, (९०) पेद ४, पृ. ७०, (९१) ऐलेसं ३१२९, (९२) पुद ३, पृ. ११३, पेद २. पृ. १६२, पेठे द २ (९३) पेद २, पृ १६०, (९४) ज्ञानेश्वर त्रै. ४ : ४, (९५) ऐसंसा खं. ३, पृ. २२७-२२९, (९६) पेद ३२, ले. १४३, (९७) राखं २, पृ. ९३, (९८) पाब पृ. ५३, (९९) राखं २, पृ. १०६, (१००) पेद ४५, पृ. ९१, (१०१) भाऊ बखर पृ ८३, (१०२) होकै पृ. ३१-३२, (१०३) त्रै. १२ : २, पृ. ३३-३४, (१०४) पेद ३९, पृ. १७१, (१०५) त्रै. ६३ : ३-४, पृ. ४२, (१०६) राखं ३, पत्र २४, पृ. १९-२०, (१०७) शिवलेख पृ. ८३, (१०८) पेठे २, शका, (१०९) त्रै. १६ : २, पृ. ३९, (११०) ऐलेसं ले. ३४७, (१११) माधव शका-जोशी (११२) 'मनोरंजन' मासिक जून १९२६, (११३) ऐलेसं प. १०९५, (११४) ऐलेसं ११८१, (११५) पोर्तु. मरा. सं. पृ. २६९, (११६) पेकामहा पृ १०५, (११७) ऐसंसा खं. २, पृ. ५३-६१, (११८) पुद ३, ले. १४८, (११९) ऐलेसं १२२८, १२३०, मोरो १ पृ. ७६, मॉडा पृ. ३३, (१२०) ऐलेसं १२३३, (१२१) पेकामहा पृ. ६१, (१२२) HOM-Vol I P. 577 (१२३) राखं ६, पृ ९९, (१२४) वैदनिका खं. ५, प. २५, (१२५) हरीसंव, पृ. ३४, (१२६) ऐसंसा. ६, पृ. ७२-७३, (१२७) ऐलेसं १२२२, (१२८) थोमापेरो ९, ७४-७७, (१२९) OR MEM I P. 299, (१३०) राखं २, पृ. १०५, (१३१) पेद ४५, पृ. ९०, (१३२) राखं ६, पृ. ६९, (१३३) राखं ६, पृ. ५६, (१३४) राखं ६, पृ. ५६, (१३५) राखं ६, पृ. १२२, (१३६) पेद ३९, पृ. १७३, (१३७) पेद २, पृ. १७०, राखं १, प. २८४, पृ. ३८७, (१३८) ऐलेसं १९०२, (१३९) इतिसं पु. ७, ऐटि. १५, (१४०) ऐलेसं २५२, पुद ३ के. १४८, (१४१) पेठेद. २ ऐलेसं १२७२, १३३०, (१४२) त्रै. ९ : ४, (१४३) मॉडा पृ. ३०७, ३१०, ऐलेसं १३२२, (१४४) पासं ७७, ऐतिलेमा

प. ३४०, (१४५) पुद ३ ले. ११४, (१४६) इतिसं नोव्हेंबर १९०८ ऐटि. १८, (१४७) 'मनोरंजन' मासिक जानेवारी-जून १९१० (१४८) पेद ५, प. ४५, (१४९) इतिसं ऐटि. पृ. २०-२२, (१५०) समापेंरो ४, नोंद ८५, (१५१) कित्ता नोंद ८९, (१५२) ऐतिलेंमा प. ३६७, (१५३) ऐतिप १३७, (१५४) समापेरो ४, पृ. ९९, (१५५) ऐलेसं पृ. ३४४७, (१५६) ऐलेसं ३४८२, (१५७) मेदरु २, पृ. ११८, (१५८) ऐलेसं ३६४६, राखं. ५, पृ. २०७-२०८, नोंद २४१, कासंपया ले. ४६२, (१५९) ऐलेसं. ३६५०, (१६०) PRC. 2, P. 264-265, (१६१) मदरु २, ऐलेसं ९-३६४४, (१६२) राखं ४, पृ. ११०, (१६३) पेद ३२, प. १९६, (१६४) त्रै. ३२ : १-४, पृ. ४२' (१६५) मदरु ३, प. ११०, पृ. ११९, (१६६) ऐलेसं ४५८९, (१६७) मदरु २, पृ. ११३, (१६८) पेद २२, पृ. २७३, (१६९) पेअ १०५, (१७०) मऐसा ले. ३४, (१७१) पेअ २२, नोंद २८०, (१७२) पेअ पृ. २६, (१७३) पेद २२, पृ. १४३, (१७४) ऐलेसं ४७७८, (१७५) राखं ७, पृ. ७, (१७६) कित्ता, पृ. २०, (१७७) ऐलेसं ३७०८, (१७८) ऐलेसं ६७०८, (१७९) पेद ४१, पृ. ११८, (१८०) पोडिव्हॉ ४६-५६४-१८३२-३५, (१८१) त्रै. २२ : ३-४, पृ. ४४, (१८२) त्रै. २४ : १, पृ. ११३, (१८३) पेद २२, प. ४५, (१८४) पेद ९, प. ५.

(पृ. १२५ ते २०० **धाकटी पाती**) :

(२) सखाच पृ. २३७, (३) इचसंइति पृ. ६७, खरे ६८-६९, पेठे २, (४) पेद १९, पृ १०३, (५) पेकामहा पृ. १००, (६) अर्काबुले ४, (७) ऐलेसं १२०८, (८) ऐलेसं १२२८, (९) ऐलेसं खं. ५, (१०) राखं १२, पृ. ९७, करंदीकर कैफि. अर्काबुले ४, (११) मरिउवि १, पृ. ८०, BY GAZ-3, P. 291, (१२) 'Book of Bombay' P. 358, (१३) त्रै, २० : २, आधार ASIATIC RESEARCHERS - 4. P. 405, (१४) मदरु २, पृ. ११०, (१५) CORP. OF E. BURKE-3, P. 6, (१६) इतिसं सप्टेंबर १९०८, पृ. १०, (१७) इतिसं एप्रिल १९१०, पृ. ६७, (१८) इतिसं डिसेंबर १९०८, ऐटि. २०, (१९) ऐलेसं ७-

२६९९, अर्काबुले ४, पृ. ३६, (२०) त्रै. २० : २, पृ. ८५, (२१) वाइवृ श. १८३७, पृ. १२२–२३, (२२) पेद ४, पृ. २२, (२३) अर्काबुले ४ करंदीकर, कॅफि., (२४) ऐलेसं ४८, (२५) पेद ९, पृ. १६८, (२६) राखं १०, प्रस्ता., (२७) पेद ४५, पृ. ९१, (२९) ऐलेसं ७४, (३०) पेद ४, पृ. ४५, (३१) मइतिसा ३, पृ. ७५०, (३२) 'मनोरंजन' मासिक जानेवारी–जून १९१०, (३३) राघो. भरारी, पृ. २२६, (३४) पेद २२, (३५) यनकेसं, (३६) पुद ३, ले. १४८, पेठे द २, (३७) ऐलेसं ८१३, माधव शका–जोशी, (३८) राखं ६, पृ. १२२, (३९) पुद ३, ले. १४५, (४०) पेद ४५, प. ९९, (४१) पेद ४, पृ. ४०, (४२) ऐलेसं प. ७६८, (४३) दुबापेरो ५, पृ. ७०, (४४) ऐलेसं पृ. ५०६५, (४५) पेअ पृ. ५१, (४६) कित्ता पृ. ८९, राखं ७, पृ. २६, (४७) कित्ता पृ. ९६, (४८) कित्ता पृ. १३१, (४९) मऐसा प. ९८, (५०) कित्ता प. ९९, (५१) ऐलेसं पृ. ७६७४, ८०५७, (५२) 'नेटि. जर्नी अप्पर प्रो. इंडिया–हेबर भा. १, पृ. ३०६, ३७४–७५, (५३) पेद १९, पृ. ११०, पुद ३, पृ. १२३, थोमा पेरो ९, पृ. १०७, (५४) मरिउवि १, पृ. १९२, (५५) यनकेसं, अर्काबुले ४, मरिउवि ३, (५६) 'संशो. मित्र' पृ. २०९, (५७) कासंपया पृ. ४७३, मोजं, (५८) मेअ पृ. १११, (५९) 'मस्ता–बाजी' पृ. १०३, (६०) पोडिव्हॉ २१–१८८५, पृ. ३०९, अर्काबुले ८, पृ. ७९, (६१) जोग कुवृ. पृ. ६०–६१, (६२) 'मस्ता–बाजी' पृ. ११३, (६३) ऐगो १, पृ. ७७, (६४) 'माझा प्रवास' पृ. १०५, (६५) HIM III P. 20, (६६) कित्ता V P. 141, (६७) '1857 Some Untold Stories' P. 96, (६८) TES III P. P. 142, (६९) HIM V P. 303, (७०) 'माझा प्रवास' पृ. १०१, (७१) TES III P. 119, (७२) बुंदेसंइति – पृ. २८६, (७३) ऐलेसं १४३८, (७४) कित्ता ३६५७, (७५) राखं ७, पृ. ८, (७६) 'पुनाज् ग्रेट डेज्' पृ. १४, (७७) ऐतिपत्र्य प. ३६५, (७८) HOM II P. 331, (७९) पेद ४, प. ५५, (८०) पेद ४३, ले. १३५, पेद ३२, ले. १९४, (८१) कुला. गॅझे. पृ. ९४७, (८२) पुशव पृ. ६८,

(८३) मदरु २, ले. ४, (८४) दादोबा पांडु. चरित्र पृ. १७७, (८५) PRC. 13 Pt 2, P. 431, (८६) NSRK - Gupta P. 2, (८७) सकेवाखं ७, पृ. १४५, (८८) त्रै. २० : २, पृ. १४९, (८९) एटिन फिफ्टीसेवन– सेन पृ. १२५, (९०) Book of By - P. 315, (९१) गोपाळराव हरी. पृ. ५, पेद ४१ प.२६१, (९२) इतिसं. नोव्हेंबर १९१२, (९३) मदरु २, (९४) त्रै. १८ : ४, पृ. १४४, (९५) वाइवृ श. १८३५, पृ. ४२२, (९६) इतिसं पेदसप नोंद ६, (९७) पेद २२, नोंद २६१, (९८) मइतिसा ३ पृ. ८६८, (९९) पोडिव्हॉ ३२–१८५१, पृ. २२९, (१००) तीर्थयात्रा प्रबंध पृ. ११८–१९, (१०१) पेद ४४, प. १६, (१०२) इस–केळकर, रा. सा. मंडलीक १, पृ. ९, (१०३) पेअ पृ. १६, पृ. ९१, ऐलेसं १२२८, (१०४) पेसा पृ. ७, (१०५) पेअ. पृ. ८३, (१०६) दुबापेरो V पृ. २७, (१०७) ऐलेसं १०, पृ. ५०५४, (१०८) पुनसंवृ. २, १५२, (१०९) त्रै. १६ : १, पृ. २८, (११०) पेद २२, नोंद २६०, (१११) त्रै. २० : २, (११२) मरिउवि ३, पृ. ५४१ (जुनी आवृत्ती), (११३) त्रै. २० : २ पृ. १५०, (११४) त्रै. २३ : ४, पृ. ७४, (११५) पेअ पृ. १७२, त्रै. २० : २, पृ. १४६, (११६) माझा प्रवास पृ. ४२, (११७) इतिसं. नोव्हेंबर १९१२, ऐस्फुल ३, वाईवृ श. १८३५, पृ. ४२०, (११८) कित्ता पृ. ४२५, (११९) आपटे इति. पृ. ८–९, (१२०) अर्का. बुले. ८, (१२१) सकेवाखं ७ पृ. ३५५, (१२२) वाइवृ श. १८३५, पृ. ४१९–२६, (१२३) त्रै. ११ : ३, पृ. २७, (१२४) ऐलेसं १५ पृ. ८०५९, (१२५) पेद २२, पृ. ११३, (१२६) दुबापेरो V पृ. ४७, (१२७) पेअ. पृ. १५४, (१२८) त्रै. १८ : ४, (१२९) शमी पूजन पृ. ७७, (१३०) HIM — P. 74, (१३१) कित्ता पृ. ७८, (१३२) एटिन फिफ्टी सेवन पृ. १२५, (१३३) त्रै. १८ : ४ पृ. *१३३ निबंधमाला – सह्याद्रि खंड पृ. ८२०, (१३४) सकेवाखं ७, पृ. ९२६, (१३५) एटिन फिफ्टी सेवन पृ. ३६९-७०, (१३६) तीर्थ यात्रा प्रबंध पृ. ७९, (१३७) शिपाई गर्दी पृ. २०१–२, (१३८) अर्का. बुले. भा. १, (१३९) एटि. फिफ्टी सेवन पृ. १५०, (१४०) राखं २, पृ. ७२–७३, (१४१) पेद

२२, पृ. १६३, (१४२) त्रै. २४ : १, राखं ६, पृ. ३२, (१४३) पेद १८, पृ. १५०, (१४४) राखं ४, पृ. १११, (१४५) राखं १, प. ६०, पृ. १०५, (१४६) पेद ३२, पृ. २४, कासंपया ले ४९३, ले ४८२, (१४७) शारो I नोंद १०८, (१४८) ऐगो १, पृ. २३, (१४९) शारो I नोंद ११२, (१५०) ब्रस्वाच ले. २५, (१५१) पेठेद २, (१५२) मदरु २, पृ. ७९, (१५३) शिवलेख पृ. ४१, (१५४) पेद ४५, पृ. ९१, (१५५) राखं. २. पृ. ६१, (१५६) पेद २२, नोंद ३३१, (१५७) मरामवि ३ (जुनी आवृत्ती), (१५८) पेद २, ते १४८, (१५९) सखाच-प्रस्ता. पृ. १, (१६०) पेब, (१६१) पेद १२, नोंद २०६, (१६२) पेद ९, प. १५, पृ. २१, राखं २, पृ. ८४. (१६३) पेद ४५, पृ. ८७, (* १६३) ऐलेसं. प. ६४९०, पृ. ७५८२, (१६४) ऐसा पृ. १, त्रै. ९ : ३, (१६५) इतिसं ऐटि ३७, (१६६) मदरु पृ १०८, ऐलेसं १९४७, (१६७) मरिउवि १, (१६८) पेद १८, प. ५१, (१६९) राखं २ प. १०५, (१७०) पेद ४५, पृ. ९०

प्रकरण आठवे

बाजीराव - मस्तानी शाखा

मस्तानीचे पूर्ववृत्त

थोरले बाजीराव आणि मस्तानी यांचा पुत्र समशेरबहाद्दर. समशेरबहाद्दरांची शाखा कालांतराने ' बांदा नवाबांची शाखा ' म्हणून ओळखली जाऊ लागली. मस्तानी, छत्रसाल बुंदेल्यांची मुलगी असेच उपलब्ध ऐतिहासिक तपशीलांवरून बहुमताने समजले जाते. तिची आई इराणी वंशाची असून मस्तानी छत्रसालाच्या अनौरस संततीपैकी एक असावी. छत्रसालाकडून स्वतःच्या राज्यापैकी बुंदेलखंडाचा जो भाग बाजीरावांना मानसपुत्र म्हणून मिळाला, त्याचे बाजीरावांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी तीन सुभे केले. १. मुख्य ठिकाण **सागर** : गोविंद बल्लाळ खेरांकडे (गोविंदपंत बुंदेले). २. मुख्य ठिकाण **बांदा**. बाजीराव – मस्तानी पुत्र समशेरबहाद्दरकडे. ३. मुख्य ठिकाण **झांशी** – सरदार रघुनाथ हरी नेवाळकरांकडे.

महाराज छत्रसाल बुंदेल्यांच्या अनौरस संततीची सविस्तर माहिती मिळते. त्यात म्हटले आहे.[१] : " एक मुसलमान उपपत्नीसे भी छत्रसालके शमशेरखाँ और खाँजहा नामक दो पुत्र और एक पुत्री थी। जनश्रुती है कि यही पुत्री पेशवा बाजीराव प्रथमको भेंट की जानेवाली मस्तानी थी। "

उपलब्ध ऐतिहासिक माहितीनुसार मस्तानी बाजीरावांच्या जीवनात सन १७२९ नंतर म्हणजे मुहम्मदशाह बंगश विरुद्धच्या मोहिमेनंतर केव्हा तरी आली. ग्रँट डफ म्हणतो[२] :

" He (Bajee Rao) also left one illegitimate son by a Mahomedan mother, whom he bred Mussalman and named Shumsher Buhadur. "

स्कॉट वेरिंगने बुंदेलखंडासंबंधी माहिती देताना म्हटले आहे[३] :

" Shamsher Bahadur, the illegitimate offspring of the great Bajy Rao. "

मस्तानी निजामाची मुलगी, अशा आशयाचा ('कासंपया' ले. ४९६ पृ. ४९९) एक उल्लेख मिळतो :

" बेगमेने नवाबास सांगितले की, आपली कन्या वधू आहे. ती राव बाजी यास द्यावी. वर उत्तम द्यावयासी योग्य आहे. हिचे लग्न करून देऊन घरोबा वाढवावा म्हणोन त्याजवरोन नवाबांनी संधान करविले. खंजिराबरोबर विवाहविधी केला. लेकीस आंदण बहुत दिले. हत्ती व पागा व दासी असे दिले. जवाहीर व वस्त्रे व भूषणें बहुत दिल्ही. त्या लोकांत आपली कन्या पुतण्यास द्यावी असा मार्ग आहे म्हणोन केले. त्याजप्रमाणे घेऊन आले. तिचे नाव मस्तानी. तिचे आंदण आले. त्या घोड्याची पागा व हत्ती वगैरे व तिचे संस्थान निराळे राहून पुण्यातील वाड्यात निराळी हवेली करून ठेविली. तिचे पोटी दोन मुले जाहली. ती राहिली नाहीत.* एक पुत्र जाहला. त्याचे नाव समशेरबहाद्दर ठेविले. त्याची योग्यता खासे पुत्राचे अन्वये राखिली. लग्न केले. त्यास सरदारी दिल्ही. पुढे नानासाहेब याणी चौघडा साहेबनौबत सोन्याचे दांडीची चौरी दिल्ही. त्याचा पुत्र एक अलिबहाद्दर जाले. त्याचाही तसाच मरातब राखिला."

मस्तानी, बाजीरावांना छत्रसालांकडूनच मिळाली, ती कलावंतीण होती, असे उल्लेख 'मराठी साम्राज्याची छोटी बखर' मध्ये मिळतात. १. 'बाजीरावसाहेब यांची बहुत प्रकारे मुदारत येऊन एक कळवंतीण मस्तानी खुपसुरत नजर दिली.' (पृ. ७४). २. 'मस्तानी कळवंतीण छत्रसाल राजाने दिली ती बाजीरावसाहेबाने राखली होती.' (पृ. ७७).

मस्तानीच्या पूर्व वृत्ताबद्दल एक उल्लेख मिळतो तो असा की, निजामाविरुद्धच्या युद्धानंतर मस्तानीची चिमाजीआप्पांशी योगायोगाने भेट झाली. यानंतर स्वतः चिमाजीआप्पांनीच तिला पुण्याला आणून बाजीरावांना अर्पण केली.[४] ही हकीगत खरी मानणे म्हणजे नीतिनिष्ठूर व करारी चिमाजीआप्पांसारख्या चारित्र्यसंपन्न सेनापतींवर अन्याय करण्यासारखेच आहे. ही आख्यायिका 'काव्येतिहाससंग्रहा'तील सोहोनी विरचित 'पेशव्यांच्या बखरी' वरून प्रसारित झाली असावी.

मस्तानी ही बुंदेलखंडनरेश राजा छत्रसालांची अनौरस कन्या असल्याबद्दल काही आधार मिळतात ते पुढीलप्रमाणे – (भारतवर्ष, पुस्तक २ रे).

१. सागरच्या सुभेदारांकडील बांद्याच्या नवाबांच्या वंशावळीचा प्रारंभीचा मजकूर हिंदुस्थानी भाषेत पुढीलप्रमाणे दिला आहे. 'बाजीराव बल्लाळ पेसुवा साहब दखनसे हिंदुस्थानमें परनावाले राजा छत्रसालने बुलाए. राजाके उपर रुहेल-

* हा उल्लेख फक्त येथेच मिळाला. इतरत्र समशेरबहाद्दर खेरीज अन्य अपत्यांचा उल्लेख मिळत नाही.

खंडसे बंगसकी फौज चढकर परनाका राज खाली किया और राजा को जेरवार वहद किया. उस वकत राजाने पुनाको खत भेजकर बुलाये सो पेसुवा साहबकी सवारी आयकर परनाके उपर लढाई करके बंगसको भगा दिया और राजा छत्र-सालको गादीपर कायम किया उस वकत तीन हिसे राजके करके येक हिसा पेसुवा साहबको दिया और महलसे मस्तानी औरत कबूल सूरत थी सो राजाने पेसुवा साहबको दी. उस औरतसे यह औलाद.'

२. बुंदेल्याचे इतिहासकार कॅप्टन पॉगसन यांनी सन १८२८ मध्ये प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात पुढील मजकूर आहे.' ... The Peeshwa remained sometime settling the affairs of the Provience, of which he demanded, and obtained the chouth as his annual Nuzurana. On quitting Boondelkhund, he took with him a Moosulman girl, named Mustanee, by Whom he had a son, named Shumsheer Buhadoor, who dying in his 27th year, left issue, Ulee Buhadoor. the father of the late Shumsheer Buhadoor, who was succeded by his half brother Zoolfiquar Ulee, the Present Nawab of Bandah.'[५]

३. सातारचे रेसिडेन्ट जनरल ब्रिग्ज यांनी सन १८२१ मध्ये पेशव्यांच्या सरदारांची अस्सल कागदपत्रांवरून एक वंशावळ तयार केली त्यात बांद्याच्या नबाबांची हकीगत पुढीलप्रमाणे दिली आहे. ' This family owes it's rise to the circumstance of being descended from Shumsheer Bahadur, the illegitimate son of Bajiee Raw Bulal Peshwa by a Mahomedan female, whose history is as follows..Chutra Sal gave to Bajiee Raw Bulal his own illegitimate daughter, Mustany, born of a Mahomedan mother.' ..

४. शके १७६१ मधील (सन १८३६) एका जुन्या बखरीतील उल्लेख पुढील प्रमाणे आहे. ' बुंदेले राजे यांणीं बाजीरावसाहेब पेशवे यांस सामोरे जाऊन आपल्या स्थळास घेऊन आले. बहुत सन्मान करून आपल्या राज्यापैकी राज्य दिले आपण कळवंतीण राखली होती तिची कन्या एक बहुत चांगली होती ती बाजीरावसाहेब पेशवे यांस देऊन पाच लाख रुपयांचा सरंजाम तिचे लुगडेचोळीबद्दल देऊन निरोप दिला. '

५. " मस्तानी ही छत्रसाल राजाची वेश्येच्या पोटी झालेली कन्या असून ती बाजीरावावर फारच आशक झाली होती. तिनें पुष्कळ प्रार्थना केली, पण कांहीं उपयोग झाला नाही. शेवटीं त्या वृद्ध राजाने प्रार्थना केल्यावरून बाजीराव साहेबांनी स्विकार केला. " अशी माहिती 'तवारीख – ई – बुंदेलखंड ' नावाच्या उर्दु पुस्तकात असल्याचे व आपण पाहिल्याचे द. ब. पारसनीस म्हणतात.

पारसनीस शेवटी म्हणतात, ' याशिवाय आम्हांस चांगल्या रीतीने स्मरते की, राजा माधवराव विनायक पेशवे (चित्रकोट येथील विनायकरावसाहेब यांचे चिरंजीव) हे काही दिवसांपूर्वी मुंबईस आले होते. तेथे असताना सहज या पुस्तकाच्या संबंधाने बोलत असता वर लिहिल्याप्रमाणेच मस्तानीच्या संबंधीची माहिती त्यांनी सांगितली होती. "

' मला मुलगा होईल त्याला राज्य मिळेल तरच मी तुमच्या बरोबर राहीन. ' असे मस्तानीने बाजीरावांना सांगितल्याची आख्यायिका, पुढीलप्रमाणे प्रचलित होती.

' त्याजवरून बाजीरावसाहेब यांणी तिला बलावणे पाठवून आपले डेऱ्यात आणिली. तिचे स्वरुप पाहून बाजीरावसाहेब भुलले, आणि तिजला सांगितले की, तुजला मी आपले आंगाखाली घालितो. त्यावरून बाजीरावसाहेब आपल्यास पाहून भुलले, आता आपण जे मागू ते देतील, असे चित्तांत आणून बाजीरावसाहेब यांस तिणे विनंती केली की, " महाराज, मी आपली आज्ञा कबूल करिते; परंतु माझे मागणे आपण कबूल केले पाहिजे." तेव्हा बाजीरावसाहेब बोलले की, " काय मागणे ते माग. " त्याजवरून तिने विनंती केली की, " माझे पोटी आपलेपासून बेटा झाला, तर त्याजला आपले संस्थानचा वाटा द्यावा. " हे श्रीमंतांनी ऐकून तिजजवळ कबूल केले की, " माझेपासून बेटा झाला तर त्याजला मी आपले संस्थानचा वाटा देईन. " असे म्हणून तिजला आंगाखाली घातली आणि तिची बरदास्त पहिलेप्रमाणे ठेविली. '

' ही आख्यायिका ' पेशवे बखरी ' त (डॉ. भीमराव कुलकर्णी प्रत, सन १९८६) पृ. १४ वर उल्लेखलेली आहे.

दुसरी आख्यायिका बाजीराव – मस्तानीच्या सातारा भेटीबद्दल उपरोक्त ' पेशवे बखर ' प्रतीच्या पृ. १८ – १९ वर उल्लेखलेली आहे :

' पुढे मस्तानी कलावंतीण आणली होती तिच्याशिवाय श्रीमंतांस चैन पडेनासे झाले. तिचे वेड भारीच लागले. तिला घेऊन बाजीरावसाहेब साताऱ्यास गेले. शाहू महाराज त्यांच्या भेटी झाल्या. सारा मजकूर राजांस विदित केला. परंतु वेड सारे कलावंतिणीचे ! तिच्याशिवाय अगदी एक घटका चैन नाही. साताऱ्यास मुक्काम दोन चार महिने केला. त्या समयी सौभाग्यवती राधाबाईचे नाव घेतनासे झाले. अहोरात्र कलावंतिणीशी लंपट होऊन राहिले. हे वर्तमान शाहू महाराज यांस समजले. तेव्हा बाजीराव यांचे स्नेही साताऱ्यास जोशी व अनगळ हे मोठे सावकार त्या वेळेस होते. त्या उभयतांस महाराज यांणी बोलावून सांगितले की, " तुम्ही उभयता बाजीराव यांजकडे जाऊन त्यांस सांगावे की, तुम्ही येथे चार महिने असून दरबारात एक दोन वेळा आला. एरव्ही आठही प्रहर कंचनीस घेऊन पडतां ही गोष्ट नीट नाही. यामुळे तुमचे पद तुम्हांस देणार नाही. शुद्धीवर आला तर चांगले. "

असे जोशी व अनगळ यांजपाशी सांगून त्यांजला बाजीराव यांजकडे पाठविले तेव्हा ते उभयता बाजीराव यांजकडे येऊन त्यांची भेट घेऊन शाहू महाराज बोलले हा मजकूर त्यास विदित केला.

'खेरीज अनगळ व जोशी यांणीही बहुत फजीत केले. तेव्हा श्रीमंतांनी उभयतांपाशी करार केला की, " मी आता पहिले चालीप्रमाणे चालतो; परंतु ही मला सुटेल असे घडत नाही. " मग उभयतांनी येऊन महाराजांस मजकूर विदित केला. महाराज " बरे आहे. " म्हणून बोलले. नंतर बाजीरावसाहेब आठ पंधरा दिवस तेथे राहून, नित्य दरबारास येऊन, महाराजांची आज्ञा घेऊन पुण्यास आले.'

हा उल्लेखही इतरत्र फारसा उपलब्ध नाही. ह्या दोन्ही आख्यायिकांना प्रत्यक्ष प्रत्यंतर पुरावा नसल्यामुळे त्यांची विश्वासार्हता संशयास्पद आहे. तत्कालीन प्रचलित समजुतीनुसार बखरीत लिहिले गेले असणे संभवनीय आहे. बखर खूप वर्षांनंतर लिहिली आहे हेही लक्षात घ्यावे.

'मस्तानी' या शब्दाभोवती काही तरी गूढ वलय असल्याची भावना लोकांच्या मनात असते. इतिहासाचा विचार करता तशी वस्तुस्थिती दिसत नाही. 'एक अजरामर प्रीती – गाथा' अशा थाटात मस्तानी आणि थोरले बाजीराव ह्यांच्यातील संबंधांची मांडणी करण्याचे काहीच कारण नाही. ललित लेखकांनी वातावरण-निर्मिती, रंजकता आणि व्यक्तिचित्रणासाठी घेतलेल्या आवश्यक स्वातंत्र्यानुसार केलेले कल्पनारम्य चित्रण म्हणजे इतिहास नव्हे. हे भान अभ्यासकांनी आणि वाचकांनी ठेवायला हवे.

मस्तानीच्या संदर्भात ऐतिहासिक तपशीलांचा शोध घेताना काही मर्यादा अपरिहार्यपणे नजरेसमोर येतात.

(१) मस्तानीचे जनक माता – पिता कोण ? (२) जन्मानुसार तिचा दर्जा काय होता ? (३) तिचा जन्म नक्की कधी, कोणत्या ठिकाणी झाला ? (४) मस्तानी – थो. बाजीराव यांची पहिली मुलाखत केव्हा, कोठे, कोणत्या पार्श्वभूमीवर झाली ? (५) बाजीराव मस्तानी ह्यांचा विवाह नक्की झाला होता का, कुठे, कोणत्या पद्धतीनुसार ? (६) मस्तानी दक्षिणेत, पुण्यात केव्हा आली ? (७) शनिवारवाडा ह्या वास्तूशी तिचा संबंध किती आला ? (८) पेशवे-परिवारातील मस्तानीचे स्थान नेमके काय होते ? (९) बाजीराव – मस्तानी ह्यांची अखेरची भेट कुठे, केव्हा झाली ? (१०) मार्च सन १७४० मध्ये वरखेडे मुक्कामी बाजीराव – चिमाजीआप्पा ह्यांच्यात झालेल्या अखेरच्या भेटीत ठरल्याप्रमाणे मस्तानीला कैदेतून सोडवून बाजीरावांकडे का पाठवले नाही ? किमानपक्षी बाजीरावांच्या आजाराची खबर आल्यावर सौ. काशीबाई समवेत रावेरखेडी मुक्कामी का पाठवले नाही ? (११) मस्तानीच्या जीवनाचा शेवट कुठे, केव्हा, कोणत्या

पद्धतीने झाला ? (१२) पाबळ येथील मस्तानीची मशीद आणि कबर केव्हा बांधली ? कोणी बांधली ?

हे काही मूलभूत प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. इतिहास या प्रश्नांबद्दल काहीही सांगत नाही. मस्तानीचा प्रत्यक्ष उल्लेख (त्रोटक का होईना) असलेल्या अस्सल नोंदी सुमारे फक्त २० आहेत. त्यात सविस्तर तपशील नाहीत. २ – ३ वाक्यांच्या नोंदीच जास्त आहेत. इतकेच नव्हे तर मस्तानीचे समकालीन अस्सल चित्र उपलब्ध नाही. अगदी वेगवेगळ्या वेषभूषेतील आणि पूर्णपणे वेगळी व्यक्तिमत्त्वे दर्शवणारी ' मस्तानी 'ची म्हणून समजली जाणारी काही चित्रे उपलब्ध आहेत. ती चित्रे अस्सल नाहीत, याबद्दल इतिहास-संशोधकांत एकमत आहे.

मस्तानीचा विचार करताना ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे.

मस्तानीची चित्रे

मस्तानीविषयी जी गुढे आजही कायम जाहेत, त्यांत ' मस्तानीची चित्रे ' म्हणून सांगण्यात येणारी चित्रे आपआपल्या परीने भरच घालतात. त्यांपैकी दोन चित्रे विशेष महत्त्वाची आहेत.

१. पहिले चित्र पुण्याच्या ' राजा केळकर वस्तुसंग्रहालया'त पहायला मिळते. त्या चित्रातील स्त्रीची चेहेरेपट्टी व भाव हिंदुस्थानी, किमानपक्षी आशियायी स्त्रीशी मिळते जुळते दिसत नाहीत. इटालियन किंवा अन्य युरोपियन स्त्रियांशी या चित्राचे साम्य जाणवते.

दुसरी गोष्ट म्हणजे त्या काळात कोणीही हिंदुस्थानी स्त्री ' टोपी ' किंवा तत्सम शिरोभूषण वापरत असल्याचे इतिहास सांगत नाही. त्यामुळे या चित्राचा अस्सलपणा संशयास्पद ठरतो.

२. दुसरे चित्र नाना फडणीसांच्या मेणवली येथील संग्रहातील असून त्यांच्या वंशजांकडे आहे असे सांगितले जाते. या चित्राबद्दल प्रमुख आक्षेप म्हणजे मूळ चित्र तैलरंगात आहे. चित्र नाना फडणीसांच्या संग्रहात होते, या एका कारणावरून ते अस्सल मानण्यास काही प्रमाण नाही.

ही दोन्ही चित्रे अस्सल मानायची तर, मस्तानीचा मृत्यू १७४० सालात झालेला असल्यामुळे चित्रांचे मूळ रेखाटन किमान त्यापूर्वी झालेले असायला हवे. १८ व्या शतकाच्या पूर्वार्धातील हिंदुस्थानी चित्रकारीच्या पद्धतीचा विचार करता असे दिसते की –

अ) चित्रे प्रायः पार्श्वमुख चित्रे (Profile) असत.

आ) चित्रे तयार करण्यासाठी, रंगवण्यासाठी, तैलरंगांचा वापर होत नसे.

उपरोक्त दोन्ही चित्रे या पद्धतीशी जुळत नाहीत. ह्या कारणांवरून दोन्ही चित्रे समकालीन व अस्सल नसून १८ व्या शतकाच्या अखेरीस किंवा १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात निर्माण झाली असावीत, अशी शंका घ्यायला जागा आहे.'

इतिहास संशोधक ग. ह. खरे म्हणतात[६] :

Date 4-9-79

Out of the two paintings shown to me by Dr. Bhagwan Das Gupta and said to be of Mastani, the mistress of Bajirao I, the one with a hat on the head can never be of Mastani as Hindu or Muslim women of those days never used any hats. The original of the other is an oil painting of a modern period now preserved in the palatial building of Nana Phadnis at Menavali near Wai (Dist. Satara). In old times oil paintings were quite a rarity. Therefore this cannot be of Mastani. In addition, artists of the 18th century used to draw paintings in profile and never used oil colours, Thus, both the paintings cannot be of Mastani, I am sure.

Sd. G. H. Khare

मेणवली दप्तरातील चित्र व ' राजा केळकर वस्तु संग्रहालया'तील चित्र वगळता ' मस्तानी ' ची आणखी चार पाच चित्रे उपलब्ध आहेत. डोक्यावर टोपी घातलेल्या रंगीत चित्रासारखीच फक्त टोपी खेरीज करून ती थेट एकाच पद्धतीची आहेत. त्यांतील वेशभूषा, केशभूषा, रंगभूषा, दागिने, ह्यांत काडीमात्र फरक नाही. बैठकीची पोझही खूप एकसारखी आहे. ह्यावरून ती अ – आशियायी पद्धतीची भासणारी चित्रे, मूळ एकाच चित्राच्या किंचित फरक करून तयार केलेल्या प्रतिकृती असणे असंभवनीय नाही.

पुण्यातील उत्तर – पेशवेकालीन नाइक घराण्यातील मंडळींकडे त्यांपैकी काही तसबिरी आहेत. अशी माहिती मिळते.* ती चित्रे खूप जुनी असली पाहिजेत हे मान्य केले तरी, अस्सल व समकालीन मानण्यासाठी इतिहाससिद्ध आधार उपलब्ध नाही. ती चित्रे देखील ग. ह. खरे म्हणतात त्याप्रमाणे उत्तर-पेशवाईत १९ व्या शतकाच्या प्रारंभी चितारली असणे अधिक स्वाभाविक आहे.

त्या तसबिरींमध्ये बाजीराव – मस्तानीची एकत्र अशी दुर्मिळ तसबीर आहे, असेही समजले. अशा प्रकारचे या उभयतांचे एकही चित्र उपलब्ध नाही. उलट-पक्षी बहुश: सर्व पेशवे पती – पत्नींची काही एकत्रित चित्रे पूर्वी, जुन्या पिढीतील

---

* ' नाइकांची टोलेजंग हवेली ' – ले. डॉ. मंदा खांडगे, ' रविवार सकाळ ' पुरवणी, दि. ७ ऑक्टोबर सन १९९०.

संशोधक ल. ना. जोशी ह्यांच्या संग्रहात होती.*

उपरोक्त संयुक्त तसबीर बाजीराव – मस्तानी ह्यांची नसून बाजीराव – सौ. काशीबाई ह्यांची आहे हे इतिहासप्रसिद्ध आहे. उभयतांचे तेच रंगीत चित्र ग्रंथात इतरत्र छापले आहे. बाजीरावांबरोबरचे स्त्री-चित्र हे मस्तानीचेच असले पाहिजे ही समजूत योग्य नाही.

तात्पर्य, मस्तानीचे पूर्णतः अस्सल, समकालीन एकही चित्र आजतागायत उपलब्ध नाही. उपलब्ध चित्रे एकतर बनावट किंवा काल्पनिक आणि चित्रकारांच्या कल्पनाशक्ती व वकुबानुसार रंग – रूप बदलत गेलेली चित्रे आहेत.

मस्तानीचे व्यक्तिमत्त्व

' मस्तानी ' या शब्दातील मूळ फारसी शब्द ' मस्तान ' असून ते विशेषण आहे. त्याचा अर्थ गुंग, धुंद, मस्त, उन्मत्त असा आहे. त्याचे स्त्रीलिंगी रूप ' मस्तानी.' धुंदी आणणारी असा या शब्दाचा अर्थ आहे. यावरून जिच्यामुळे (जिच्या दर्शनाने, म्हणू या !) धुंदी व नशा येईल ती मस्तानी असा अर्थ निघू शकतो.

यावरून छत्रसालाची अनौरस मुलगी मस्तानी हिचे ' मस्तानी ' नाव तिच्या बालपणापासूनच्या मोहक रूपामुळे पडले असणे शक्य आहे. तिचे मूळ नाव वेगळेच असणेही अशक्य नाही. अर्थात् अपुऱ्या तपशीलांमुळे याबद्दल ठामपणे काही सांगता येत नाही.

मस्तानीचे जन्मस्थान व जन्मसाल उपलब्ध नाही. १७२९ साली मस्तानी नुकतीच तारुण्यात पदार्पण करीत होती. यावरून ती या वेळी १५ – १६ वर्षांची असावी. उपलब्ध अती त्रोटक तपशीलांवरून बाजीराव आणि मस्तानी ह्यांच्या वयात १३–१४ वर्षांचे अंतर असावे असा तर्क करणे एवढेच शक्य आहे. बाजीराव मस्तानी यांची पहिली भेट केव्हा, कुठे झाली ? हे इतिहास स्पष्टपणे सांगत नाही बाजीरावांचा पराक्रम, दरारा, देखणे रूप, पाहून ती बाजीरावांवर मोहीत झाली असावी.

मस्तानीच्या मृत्यूनंतर, पेशव्यांच्या मुख्य खासा देवघरात मस्तानीचा टाक* ठेवण्याबद्दल खुद्द चिमाजीआप्पांनी सूचना केली होती. त्या टाकाबद्दल इतिहास

---

* ही चित्रे श्री. ल. ना. जोशींनी इतिहास संशोधक द. वा. पोतदारांचे स्वाधीन केली होती, अशी विश्वसनीय सूत्रांकडून समजलेली माझी ऐकीव माहिती आहे.

* पूर्वीच्या काळी स्त्री सती गेल्यानंतर तिचा टाक करून तो घरातील देवांत ठेवत. पेशवेकुलात अशा प्रकारचे सौ. अन्नपूर्णाबाई व सौ. रमाबाईंचे टाक देवांत ठेवले होते. टाक = धातूच्या पत्र्यावरील देवतेचा ठसा, ' महा. शब्दकोश ' भा. ३. पृ. १३७८.

संशोधक (कै.) कृ. वा. पुरंदरे यांचे संशोधन आहे. या संशोधनामुळे मस्तानीचा बाजीरावांशी कोणत्या ना कोणत्या पद्धतीने विवाह झाला असावा, असे म्हणता येईल. अन्यथा देवघरातील देवांमध्ये टाक ठेवण्याची पात्रता मान्य झाली नसती. तथापि विवाहाबद्दल स्पष्ट माहिती मिळत नाही. कृ. वा. पुरंदऱ्यांच्या संशोधनाबद्दल माहिती माझ्या वाचण्यात आली नाही. ती मला संशोधक श्री. य. न. केळकरांकडून समजली.

मूळ ऐतिहासिक कागदात 'मस्तानी', 'मस्तान कलावंत' असे नाव आढळते.[७] मस्तानीच्या व्यक्तिमत्वाविषयी पुढीलप्रमाणे दोन उल्लेख मिळतात. –

१. **'लेटर मुघल्स, भाग'** २, पृ. २९७

" Mastani a kanchani or dancing girl, followed Baji Rao on all his expeditions and never left his side. She rode on a tall horse, stirrup to stirrup with him and was as good as any Mahratta in horsemanship, Spear throwing and sword play. "

२. **'तारीख-ई-महम्मदशाही' भाग १** पृ. ४१३ :

" She was a kanchani a dancing girl possessing fine horsemanship and skill in handling the Sword and Spear. She always accompanied Baji Rao in his campain and rode stirrup to stirrup with him. "

पेशव्यांकडील गणपती उत्सव व कृष्णाष्टमीचा उत्सव या दोन प्रसंगी मस्तानी नृत्य – गायन पेश करीत असे. शनिवारवाड्याच्या दिल्ली दरवाजाजवळ काहीशी दुर्लक्षित अशी सुमारे सातशे वर्षांपूर्वीची हजरत मकबूल हुसेनशा बुखारी यांची कबर असून, मस्तानी रोज त्या कबरीची पूजा करीत असे. बाजीरावांबरोबर मोहिमांवरही जात असे. बाजीरावांच्या मार्च सन १७३७ मधील प्रसिद्ध दिल्ली स्वारीत मस्तानी, बाजीरावांबरोबर गेली होती. दिल्लीहून झपाट्याने परतत असताना उभयतांना घोड्यावरून जाताना काही मोगल सैनिकांनी पाहिले होते. दोघेही प्रसन्नचित्त होते.[८]

परिवाराची प्रतिक्रिया

बाजीरावांच्या गैरहजेरीत मस्तानीला, शनिवारवाड्यात सौ. काशीबाईइतके जवळचे, दुसरे कोणी नव्हते. सौ. काशीबाई मस्तानीला नेहमी संभाळून घेत. तिच्याबद्दल त्यांना सहानुभूती वाटत असे. या दोघींमध्ये किती जवळीक होती याचा उल्लेख बाबूराव गणेश यांच्या २७ नोव्हेंबर, सन १७३७ च्या पत्रात आहे[९] : " सौभाग्यवती काशीबाई व मस्तानी यांकडे न्यूनता होत नाही. दिवसेंदिवस

अधिकताच आहे." नोव्हेंबर सन १७५३ मध्ये थो. समशेर बहाद्दरच्या दुसऱ्या विवाहानिमित्त, मस्तानी आणि समशेरबहाद्दरची पहिली पत्नी लालकुंवर या दोघींच्या स्मरणार्थ सुवासिनींना स्वतंत्र भोजन दिले होते.[१०]

समशेरबहाद्दरचा जन्म १७३४ सालच्या सुरुवातीला झाला. त्या वेळी बाजीराव, चिमाजीआप्पा दोघेही मोहिमांच्या निमित्ताने पुण्याबाहेर होते. मस्तानीच्या बाळंतपणाची स्वतः प्रत्यक्ष पुढे न होता, सौ. काशीबाईमार्फत राधाबाईंनी सर्व खबरदारी व काळजी घेतली. समशेरबहाद्दरांचे दुसरे नाव कृष्णसिंह होते. हे नाव खुद्द राधाबाईंनीच, सौ. काशीबाईंचे मार्फत सुचविले होते. वंशावळीवर नजर टाकल्यास कृष्ण हे नाव बाजीरावांच्याही आधीपासून घराण्यात चालत आलेले आढळते.

गं. भा. राधाबाई किंवा चिमाजीआप्पा यांनी मस्तानीचा व्यक्तिगत राग किंवा द्वेष केला असे इतिहासात कोठेही दिसत नाही. त्यांना कठोर व्हावे लागले ते राज्यहितासाठी. राधाबाई व चिमाजीआप्पा दोन्हीही अत्यंत करारी, कर्मठ, कर्तबगार, व्यक्तिमत्वे होती हे विसरता कामा नये.

१८ वर्षांच्या तरुण नानासाहेबांना पुढे करून (बाजीरावांच्या पुण्यातील गैरहजेरीच्या दरम्यान) बाजीरावांचे मस्तानीबद्दल मत कलुषित व्हावे म्हणून एक कारस्थान रचल्याचे काही उल्लेख मिळतात. बाबुराव गणेश यांच्या १९ ऑगस्ट, सन १७३९ च्या एका पत्रात, नानासाहेब व मस्तानी यांच्यात जवळीक जमवण्याचा प्रयत्न झाल्याबद्दल उल्लेख आहे. मस्तानीला नानासाहेबांचा खरा हेतू समजताच तिने नानासाहेबांना समज दिली.[११]

समशेरबहाद्दरची मुंज

रघुनाथप्रमाणेच– समशेरला हिंदू धर्मात प्रविष्ट करून त्यानंतर– समशेरची मुंज लावावी अशी बाजीरावांची इच्छा असल्याची आख्यायिका आहे. 'जुन्या पितृसावर्ण्याच्या पद्धतीप्रमाणे, बाजीराव ब्राह्मण असल्यामळे त्यांचा मुलगा समशेरबहाद्दर हाही ब्राह्मण ठरत होता. काशीबाईंपासून झालेले पुत्र जसे ब्राह्मण तसाच हा मस्तानीपुत्रही ब्राह्मण मानला जावा असा बाजीरावांचा आग्रह होता. बाजीरावांची ही विचारसरणी त्या काळी महाराष्ट्रीय समाजाला पटण्यासारखी नव्हती.' असे या आख्यायिकेच्या समर्थनार्थ सांगितले जाते या आख्यायिकेला थोडादेखील अस्सल आधार नाही.

समस्त ब्रह्मवृंदांनी पेशवेकुलातील धार्मिक कार्यावर बहिष्कार टाकण्याची भाषा सुरू झाली, त्यावरून कदाचित ही कथा निर्माण झाली असावी. पुढे

बाजीरावांना मद्य-मांस सेवनाची सवय जडली. त्याचा सगळीकडे बभ्रा होऊ लागला. निकटवर्तीयांची कुचंबणा होऊ लागली. हे आचार सत्य होते असे समकालीन कौटुंबिक पत्रांवरून स्पष्ट होते.

बाजीरावांना मांसाहार आणि मद्य प्राशनाची (शराब) सवय जडली होती. हे खरे आहे. अठरा पगड जातीपंथाच्या सैन्यात बाजीराव मोकळेपणाने वावरत असत. सामान्य सैनिकांत बंधुतुल्य भावनेने मिसळत असत. त्यांच्याचप्रमाणे खातपीत असत. ' मद्य-मांस ' ही सवय सैन्यातील सवंगड्यांकडून लागली नसेलच असे ठामपणे म्हणता येत नाही. तसेच मद्य–मांस प्राशनाची सवय केवळ मस्तानीच्या सहवासामुळे लागली यालाही काही ठाम आधार नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे.

मद्य-मांसप्राशनामुळे पुष्कळांच्या मनातील धुसफूस चव्हाट्यावर येऊ लागली. शनिवारवाड्यात स्वतंत्र महाल बांधून बाजीरावांनी मस्तानीची राहण्याची स्वतंत्र सोय केली, हे लोकमत विशेष प्रक्षुब्ध होण्याचे एक कारण होते. मस्तानी शनिवारवाड्यात शके १६५८ मध्ये राहाण्यास गेली.[१२]

बहिष्कार-प्रकरण जेव्हा उग्र स्वरुप धारण करू लागले तेव्हा राधाबाईंनाही समाजातील ढोंगीपणाचा संताप आला. पुण्यातील ब्रह्मवृंदांनी बहिष्कार चालू ठेवला तर पेशवे वाराणसीहून ब्राह्मण घेऊन येतील व सर्व धर्मकृत्ये चालवतील असे गं. भा. राधाबाईंनी ब्राह्मणांना स्पष्टपणे बजावल्याचे उल्लेख मिळतात.

संघर्षाचे स्वरुप

पेशव्यांच्या घरातील मस्तानीच्या संदर्भातील वादळाचे पडसाद सर्वत्र उमटले हे खरे आहे. मस्तानीमुळे लोकापवादाला खतपाणी मिळते. या प्रकरणाला वेळेवरच आवर घातला पाहिजे, ही गं. भा. राधाबाई व चिमाजीअप्पा यांची भूमिका होती. समशेरबहाद्दरबद्दल बाजीरावांना सुरुवातीपासूनच फार आपुलकी वाटत असे. हे अपत्यप्रेमच राज्याचा घात करील. भविष्यकाळात समशेरबहाद्दर राज्याचा वाटा मागू लागला तर मराठी साम्राज्याचे अस्तित्वच धोक्यात येईल, हीच या माता-पुत्रांना खरी भीती वाटत होती.

मस्तानीच्या आहारी गेल्यामुळे बाजीरावांचे राजकारणाकडे दुर्लक्ष होईल, पेशव्यांनी दरबारी कामात लक्ष घालणे कमी केले तर राज्यकारभारावरची पकड सैल होईल, परकीय शत्रू या परिस्थितीचा फायदा घेतल्याशिवाय राहणार नाहीत. ही संभाव्य संकट परंपरा टाळणे राज्य हितासाठी अत्यावश्यक होते. मस्तानी आणि बाजीराव यांचा एकमेकांशी असलेला संपर्क तोडणे आवश्यक आहे, या जाणीवेतूनच गं. भा. राधाबाई आणि चिमाजीआप्पा यांनी कठोरपणा पत्करला

होता. त्यांच्या जाणीवपूर्वक कठोर वागणुकीला 'खलनायकी' रंग देण्याचा प्रयत्न काही मंडळी करतात. तो इतिहासाचा उघड विपर्यास आहे.

मस्तानीला १७३९ साली राहत्या वाड्यात कैद केले होते. काही महिने कैदेत काढल्यानंतर नोव्हेंबर महिन्यात ती युक्तीने बाजीरावांकडे पळून गेली. त्याबद्दल (रा. खं. ६, पृ. ३०–३१) एक उल्लेख पुढीलप्रमाणे मिळतो :

शके १६६१ सिद्धार्थीनाम संवत्सरे – "मार्गेस्वर सुध ५ मंदवारी रात्री मस्तानी, राजश्री रायांची कलवंतीण आपले हवेलीतून निघोन पाटसास रायाकडे गेली. तिचा व रायाचा अति सहवास जाला. याजमुळे राऊ विलासी फार जाले. याजकरिता मातुश्रीनी व आप्पानी रायान सांगितले की इचा वियोग चार दिवस करावा. ऐसे म्हणोन तिजला हवेलीत ठेविले. बाहेर जाईल रायाकडे म्हणोन चौक्या ठेविल्या. राऊ रागेच कुरकुंबास श्रीच्या दर्शनास गेले. पाटसी येऊन राहिले. इजला त्यांखेरीज खमेना. त्याजलाही खमेना. याजकरिता युक्तीने हवेलीतून निघोन गेली आसे."

या काळातील समाजरचना, धार्मिक कल्पना, कर्मठ रूढि-परंपरांचा समाजावरील प्रभाव, धार्मिक सामाजिक संकेतांविरुद्ध गेल्यास धर्मपीठांकडून देण्यात येणाऱ्या प्रायश्चित्तांबद्दलची भीती, जातिव्यवस्थेची कठोर बंधने व बंदिस्त सामाजिक चौकट, या गोष्टींचा विचार केला तर तत्कालीन ब्राह्मण समाजाकडून या प्रकरणाला झालेला सामाजिक विरोधही फारसा चूक ठरत नाही. या विरोधाचे १. धार्मिक, २. राजकीय असे दोन भाग पडतात.

समाजाचा व ब्राह्मणांचा विरोध प्रामुख्याने सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक कारणांसाठी होता. 'धर्मबाह्य वर्तन' हे त्यांचे मूळ सूत्र होते. गं. भा. राधाबाई, चिमाजीआप्पा आणि त्यांच्या निकटवर्तीयांकडून झालेला विरोध प्रामुख्याने राजकीय आणि पारिवारिक कारणांसाठी होता. (त्यांना सामाजिक, धार्मिक विरोध अमान्य होता असे नाही.) तुलनेने पेशवा-परिवाराच्या विरोधामागची भूमिका जास्त व्यापक होती.

१७४० सालच्या निकरावर आलेल्या परिस्थितीतील गं. भा. राधाबाई व चिमाजीआप्पा यांच्या पत्रातील उतारेच त्यांची भूमिका स्पष्ट करतात. राधाबाईंचे चिमाजीआप्पांना पत्र: [१३] "चिरंजीव राजश्री राव याजपासी बहुत युक्तीच्या विचारे जो विचार करणे तो करून येणे चालीवर नजर देऊन जे कर्तव्य ते करावे." या पत्राचे उत्तर चिमाजीआप्पांनी दिले ते : [१४] "रायासीहि च्यार गोस्टी नम्रतेने बोलणे तैशा बोललो. सांप्रत पहिल्यापेक्षा बोलून चालून भोजन करून सुखरूप आहेत. देवाची दया आहे तर दिवसेंदिवस संतोषीच होत जातील. चित्तांत मात्र वेध आहे तो कललाच आहे सविस्तर नानाही सांगतील त्याजवरून कलेल हे

विनंती. " बाजीराव मस्तानीसह राहू लागल्यावर त्यांचेकडे इतरांचा प्रवेश बहुतेक बंदच पडला. चिमाजीआप्पा मात्र आगाऊ वर्दी देऊन भेटीला जात.

या कालखंडातील बाजीरावांच्या मांसाहाराबद्दल बहुदा एकच अस्सल उल्लेख उपलब्ध आहे. नानासाहेबांना लिहिलेल्या पत्रात (बहुदा १६ जानेवारी, १७४० च्या) चिमाजीआप्पा म्हणतात :[१५]

" ... त्यामुळे पाटलासी सहजात (बाजीराव) बोलले जे कोंबड्याचे प्रयोजन आहे घेऊन येणे. काये बोलतो हा अर्थ चित्तात नाही. हे विचार मस्तानी जवळून निर्माण जाले असेत. ती पीडा जाईल तेव्हा पुण्यच प्राप्त होईल न होई यैसे दिसत नाही... तुम्हाकडील बोभाट मस्तानीने लिहिला तर तो लटके म्हणावयास आम्हास कार्यास येईल छ. १७ सवाल हे आसीर्वाद. "

बाजीरावांच्या गैरहजेरीत मस्तानीला कसे वागवावे, हा प्रश्न निर्माण होऊ लागला. स्वतःच्या जबाबदारीवर काहीही निर्णय घ्यायला इतरांना अधिकार पोहोचत नव्हता. शेवटी पुण्याच्या कारभाऱ्यांनी शाहू महाराजांना सर्व हकीगत कळवून योग्य तो आदेश देण्याची विनंती केली. गोविंद खंडेराव चिटणीसांनी शाहू महाराजांचा आदेश नानासाहेबांना कळवला आहे.[१६]

"ऐशियास राजश्री स्वामीची मरजी पाहाता ते वस्तु त्याअबरावर न द्यावी; ठेऊन घ्यावी; चौकी बसवावी; यांजमुळें राजश्री राऊ खटे जाले तऱ्हीं करावे ऐसी नाही. त्याची वस्त त्यांस द्यावी. त्याचे समाधान करावे दुर्वेसनाचा मजकूर त्या वस्तुवर नाही. त्यांच्या चित्तांत पश्चात्ताप होऊन टाकतील तेव्हाच जाईल ऐसे असता या वस्तूस अटकाव करून सखा तोडू नये ऐसी मरजी आहे. "

त्यामुळे पुण्यात मस्तानीला साध्या कैदेत टाकण्याचा विचार सुरू झाला. मस्तानीला प्रत्यक्ष अटक करण्यापूर्वी तिचा प्रथम विश्वास संपादन करावा कारण केव्हाही भेटायला येताना मस्तानी सोबत माणसे घेऊन येते, असे नानासाहेबांना लिहिलेल्या १४ जानेवारी सन १७४० च्या पत्रात चिमाजीआप्पा म्हणतात.

मस्तानीच्या संदर्भात बाजीरावांशी जे सविस्तर बोलणे झाले त्याबद्दल नानासाहेबांना लिहिलेल्या (बहुदा १२ जानेवारी, १७४० च्या) पत्रात चिमाजीआप्पा बाजीरावांचे वक्तव्य देतात.[१७]

" जे, गडमुक्तेश्वराहून गंगोदकाच्या कावडी आल्या आहेत त्या जमा करून ठेविल्या आहेत. या उदके आपण स्नान करावें व आम्हांसही स्नानास उदक देऊन स्नान जालियावर गंगोदक आमच्या हातावर घालावें मस्तानी आणून देणें म्हणजे महिन्या दोचौमध्यें आपण प्राशनाचें सोडतों..."

सरतेशेवटी नानासाहेबांनी बाजीराव पुण्यात नसताना चिमाजीआप्पांच्या सल्ल्यानुसार मस्तानीला युक्तीने २६ जानेवारी, सन १७४० रोजी पर्वतीच्या बागेत

कैद केले. नानासाहेबांनी त्याच दिवशी चिमाजीआप्पांना या कैदेसंबंधी पत्र पाठवले, ते पुढीलप्रमाणे : [११]

"तीर्थरूप आपा स्वामीचे सेवेसी, अपत्ये नानानें सा. नमस्कार विनंती येथील वर्तमान ता। छ. ७ जिल्काद शनवार संध्याकाळ पर्वतीचा बाग येथे असो. मस्तानीस बागात बोलावून कैद केली. कोणी हत्यार धरिले नाही. रात्री घरास घेऊन जाऊ मग घरी ठेवावीसा विचार जाहला तर घरांत स्वामींचें लिहिल्याप्रमाणें बंद करून ठेवू अथवा चोरून दहा माणसे बरावर देऊन, कोथळा धनगड येथे भलते जागा पाठवू. स्वामींनी रायाचा जीव जतन करावा. नासरजंगचा मनसबा तो या गोष्टीने बुडाला. राजाची मर्जी गेली असे असता स्वामींची आज्ञा व आमचा तवकल करून येणेप्रमाणे आज संध्याकाळी जाहले. येथून घरात घेऊन गेल्यावर सुचेल ते करू. मारीत नाही. घरी ठेवू अथवा गडावर चोरून पाठवू. राया भोवती चौकी केली पाहिजे. नासरजंगचा मनसबा तो होत नाही तवकल करून फंद (?) नियमित केले. कपाळी असेल ते होईल हे विनंती."

या कैदेत मस्तानी सुमारे ३ महिने असावी. कैद केल्यानंतर तिला तिच्याच वाड्यात (मस्तानी महल) बंदोबस्तात ठेवले. रात्री तिने पळून जाऊ नये म्हणून वाड्याभोवती चौक्या बसवल्या. या काळात मस्तानीने आपला मनाचा सरळपणा व्यक्त करण्यासाठी, नानासाहेबांना लिहिलेले एक पत्र उपलब्ध आहे ते पुढीलप्रमाणे : [१८] "सेवेसी विज्ञापना साहेबीं रात्रीस वाडियाभवत्या चवक्या बसावयासी आज्ञा केली आहे किं हे पळून जातील तरी जाऊ न द्यावी तरी साहेबांस पुसल्यावाचून जाऊ हे होणे नाही ऐशास साहेबास वसवास असेल कीं, रावसाहेब यांसी चोरून नेतील अथवा रात्री दिवसा हर तजविजीने जातील ऐसे कितेक गोष्टीने खतराच असेल तरी आज्ञा होईल तर वाडियात दाहा बायका जेथे निजत असतील त्यांत निजावयासी तेथेच येत जाईन. यासी साहेब धणी आहेत जे आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करू हे तसलिमात.'

नासिरजंग विरुद्धच्या मोहिमेत अखेरच्या काळात (मार्च सन १७४०) बाजीरावांनी चिमाजीआप्पांना मुद्दाम वरखेडे येथे बोलावून घेतले. या काळात चिमाजीआप्पांची बाजीरावांशी मस्तानीसंबंधी खूप सविस्तर बोलणी झाली. याबद्दल चिमाजीआप्पा पुण्याला पाठवलेल्या पत्रात लिहितात[१९] : "राऊस्वामी १९ जिल्हेजी (७ मार्च) गेले त्या दिवसापासून आजपावेतो त्यांचे पत्र नाही जेथपर्यंत यत्न चाले तो केला परंतु ईश्वराचे चित्तास न ये त्यास आमचा उपाय काय? त्यांचे प्राक्तनी असेल ते सुखरूप होऊ. आपण निमित्य घ्यावे ऐसे नाही. पुण्यास गेल्यावर तिची रवानगी त्याजकडे करावी. आपले निमित्य वारावे. त्यांचे प्राक्तनी असेल ते होईल ते ऐसा विचार केला आहे. त्यांचे शरीरी समाधान नाही

यास्तव स्वारीस जावे ऐसा अर्थ नाही घरास यावयाचा विचार करावा म्हणोन आम्ही लिहोन पाठविले आहे. त्यांचे विचारास येईल तसे करतील त्यास आमचे लिहिण्याचे पथ्य आहे असे नाही.' या मजकुरावरून बाजीरावांची आणि चिमाजी-आप्पांचीही मन:स्थिती चांगली स्पष्ट होते. हे पत्र २९ मार्च सन १७४० चे असून त्यानंतर चिमाजीआप्पा पुण्याला आले व बाजीराव खर्गोण प्रांताच्या जहागिरीची व्यवस्था लावण्यासाठी तिकडे रवाना झाले.

मस्तानीचा मृत्यू

नासिरजंग विरुद्धची मोहीम संपवून बाजीराव रावेरखेडी येथे पोहोचले. तेव्हा मस्तानी पुण्यात कैदेत होती. नुकतीच मुंज झालेला मुलगा जनार्दन आणि सौ. काशीबाईंना पुण्याहून रावेरखेडीला पाठवले, त्यानंतर दोनच दिवसांनी बाजीरावांचे आजारामुळे वाताच्या झटक्यात निधन झाले. ही बातमी पुण्यात पोहोचल्यानंतर केव्हा तरी मस्तानीचा मृत्यू झाला एवढे मात्र खरे. तिने काहीतरी उपायाने आत्महत्याच केली असावी. नैसर्गिक मृत्यूची शक्यता कमी. मस्तानीची कबर आणि मशीद* पाबळला आहे एवढेच तूर्त सांगता येते. तिच्या मृत्यूबद्दल स्पष्ट नोंदी मिळत नाहीत.

बाजीराव–मस्तानी पुण्याजवळ पाबळ येथे ज्या वाड्यात राहत असत, त्याच वाड्यात, पाबळला मुक्काम असताना थोरले समशेर बहाद्दर, थोरले अलीबहाद्दर, थोरले झुल्फिकार अली यांच्या परिवारातील मंडळी राहात असत. याबद्दल 'मदरु भाग ३' मध्ये पत्रव्यवहारात खूप उल्लेख आहेत.

पाबळच्या वाड्याजवळ असलेल्या विहीरीचे पाणी मस्तानीसाठी रोजच्या वापरासाठी पाबळहून रोज पुण्याला येत असे, असे पाबळचे रहिवासी सांगतात.

मस्तानी आणि बाजीराव यांचे संबंध, तत्कालीन सामाजिक परिस्थिती यासंबंधी इतिहासप्रेमी लेखक श्री. म. श्री. दीक्षित यांनी आपल्या 'प्रतापी बाजीराव' या ग्रंथात 'मस्तानी : शोध आणि बोध' या परिशिष्टात उत्तम प्रकारे आढावा घेतला आहे. जिज्ञासू वाचकांनी त्याची जरूर दखल घ्यावी.

---

* कबर (कब्र) = थडगे, प्रेत पुरण्यासाठी खोदलेला खड्डा, त्यावर बांधलेला चबुतरा (पृ. ६२). मस्जीद = नमाज पढण्याची जागा (पृ. ३३७)– 'उर्दू – मराठी शब्दकोश.' जुन्या प्रथेनुसार मुसलमानात व्यक्ती पैगंबरवासी झाल्यावर प्रेताचे दफन करून वर कबर बांधीत. जवळच एक हौद बांधीत. तिथून थोड्या अंतरावर नमाज पढण्यासाठी मशीद बांधीत. कबर आणि मशीद मृत व्यक्तीच्या नावाने ओळखली जाई. त्यानुसारच मस्तानीची मशीद आणि कबर पहायला मिळते.

मस्तानीची पावळ येथील कबर आणि भोवतालचा परिसर यांची हल्लीची (डिसेंबर १९९०) दयनीय स्थिती सांगताना श्री. सुरेश गरसोळे म्हणतात.*

"आपल्या प्रेमदेवतेला बाजीरावाने इनाम दिलेले हे पाबळ गाव तेथील गावातील मस्तानीची गढी स्थानिक अनास्थेमुळे केव्हाच जमीनदोस्त झाली आहे. आता उरली आहे गावाबाहेरील वेशीपलीकडे असलेल्या मुस्लिम कबरस्तानातील रुपगर्विता मस्तानीची दुर्लक्षित कबर. दगडी चौथऱ्यावरील जाईचा वेल मस्तानीच्या कबरीवर हिरवी सावली धरून आहे; परंतु गवत व झाडाझुडपात आणि पडक्या मशिदीच्या भिंतीआड ती एकांती आहे. या समोरच एक लाकडी कमानदार पेशवेकालीन वास्तुशिल्प रचनेची मशिदीसारखी जागा आहे. आजुबाजूला सिताफळांची अनेक झाडे आहेत. पाबळच्या मस्तानीच्या गढीची वाताहात झाली आहे. कबरीलगतची कोरीव लाकडी कामाची मशीद व वास्तू झाडाझुडपात, उन-पावसात ढासळत आहे."

व्यक्ति परिचय

समशेर बहाद्दर पिता बाजीराव : (७) यांचा जन्म २८ जानेवारी सन १७३४ रोजी * झाला असावा. समशेर बहाद्दर हे नाव त्यांच्या मामाच्या नावावरून (शमशेरखाँ) सुचले असण्याचा संभव आहे. त्यांचे दुसरे नाव कृष्णसिंह होते. ऐतिहासिक कागदात 'समशेर बहाद्दर कृष्णसिंह' असे उल्लेख आढळतात.[२] समशेर बहाद्दर आपल्या वडिलांप्रमाणेच देखणे दिसत. वयाच्या ६ व्या वर्षी मातृ-पितृ विहीन झाल्यावर थोरल्या नानासाहेबांनी प्रेमाने, आपुलकीने, योग्य इतमामांनी यांचा प्रतिपाळ केला. बाजीराव–मस्तानी हयात असताना जे वादळ उठले होते. त्याचा समशेरबहाद्दरांचे पालन-पोषणाचे बाबतीत थोडाही प्रतिकूल परिणाम झाला नाही, हे विशेष आहे. परिवारातील इतर मुलांप्रमाणेच हे देखील शनिवार वाड्यात लहानाचे मोठे होत होते. इतर मुलांप्रमाणेच त्यांचे सर्व शिक्षण झाले. यांना सुंदर मराठी भाषा, देवनागरी व मोडी लिपी येत असे.[२१]

सदाशिवराव भाऊंच्या हाताखाली वागून हे कारभारी व दरबारी कामात हुषार बनले होते. तसेच लष्करी कामातही तरबेज बनले होते. समशेर बहाद्दरांनी मोठ्या लष्करी मोहिमेत भाग घेतल्याचा पहिला उल्लेख सन १७५३ मध्ये मिळतो. रघुनाथरावांबरोबर उत्तर भारताच्या मोहिमेत (३० ऑगस्ट सन १७५३

---

* 'साप्ताहिक सकाळ' – १५ डिसेंबर १९९०, पृ. ९–१०.

* "छ ३ रमजान रोजी (२८ जानेवारी १७३४) मुलगा होऊन बारसे जाले."–'राखं २ : पेशव्यांची शकावली' पृ. ६९. ही नोंद समशेर बहाद्दरची असावी काय ?

ते ऑक्टो. सन १७५५) हे देखील सहभागी झाले होते. परंतु मे सन १७५५ मध्ये कोकणात लष्करी मोहिमेत अडचणी निर्माण झाल्यामुळे, समशेरबहाद्दरना उत्तरेकडची मोहीम इतरांवर सोपवून महाराष्ट्रात परत यावे लागले. यानंतर त्यांना दिनकर महादेव बरोबर कोकणच्या लष्करी मोहिमेवर रत्नागिरी जिल्ह्यात रवाना व्हावे लागले. तुळाजी आंग्र्यांविरुद्धच्या या मोहिमेत त्यांनी १८ फेब्रुवारी, सन १७५६ ला रत्नागिरीचा किल्ला सर केला. यापूर्वी १७५२ साली पेशवे व सलाबतजंग यांच्यातील युद्धाचे वेळी यांचा घोडा तोफगोळ्यामुळे मेला पण हे नशीबानेच बचावले.[२२]

नानासाहेबांनी समशेरबहाद्दरना लहानपणीच सरदारी दिली. तेव्हाच महादाजी गोविंद काकिर्डे यांना त्यांचा कारभारी नेमले. समशेरबहाद्दर पेशव्यांच्या फौजेत खासे सरदार असत. पेशव्यांच्या अनेक मोहिमांत हजर राहून यांनी मराठी साम्राज्याची बहुमोल सेवा केली. तडफ व शौर्याबद्दल यांचा लौकिक होता. यांना पेशव्यांबद्दल अतिशय निष्ठा व आदर वाटत असे. हे धर्माने मुसलमान असूनही पत्रावर ' पांडुरंग ' लिहित.

कोकणच्या मोहिमेनंतर दरम्यान उत्तरेकडे जयाप्पा शिंदे मारले गेल्यामुळे नानासाहेबांनी समशेरबहाद्दरना झाशीचे सुभेदार नारोशंकर यांचेबरोबर सैन्यासह राजपुतान्यात रवाना केले. तो गुंता सुटल्यावर दोघेही अंतरवेदीत गोविंदपंत बुंदेल्यांना मदत करण्यासाठी रवाना झाले. सर्वांनी मिळून दुआबात मराठा वर्चस्व निर्माण केले. त्यानंतर समशेरबहाद्दर रूपनगरला जनकोजी शिंद्यांना जाऊन मिळाले. ऑक्टोबर, सन १७५६ मध्ये शिंद्यांबरोबर माळव्यात मोहिमेवर गेले.

नोव्हेंबर, सन १७५६ ते एप्रिल, सन १७५७ पर्यंत समशेरबहाद्दर उत्तरेतच होते. याच काळात रघुनाथराव पेशव्यांची उत्तरेकडे प्रसिद्ध ' अटकेवर स्वारी ' झाली. त्या वेळी समशेरबहाद्दर दिल्लीत होते. सन १७५८ च्या मध्याच्या सुमाराला समशेरबहाद्दरांकडे आणखी एक कामगिरी आली. या काळात बुंदेलखंडात छत्रसालांचे नातू हिंदुपत हे बलवान राजे राज्य करीत होते. त्यांना नानासाहेबांनी राजा म्हणून मान्यता दिली होती. याबद्दलच्या अंतिम कराराच्या अटी ठरवण्यासाठी बोलणी करण्यासाठी समशेरबहाद्दरना बुंदेलखंडात पाठवले. हिंदुपत हे छत्रसालांचे नातू तसेच बाजीराव–मस्तानी यांचे पुत्र म्हणजेच छत्रसालांचे नातू समशेरबहाद्दर, म्हणून उभयतात बंधुभावाने, मोकळेपणाने बोलणी होऊन राजा हिंदुपत आणि पेशवे यांच्यात करार झाला. या करारावर पेशव्यांतर्फे प्रतिनिधी व साक्षीदार म्हणून समशेरबहाद्दर आणि गोविंदपंत बुंदेले यांनी सही केली.

जुलै, सन १७५८ मध्ये समशेरबहाद्दर पुण्याला परतले. याच प्रकारचे एक काम त्यांना पुन्हा करावे लागले. बुंदेलखंडात जैतपूरला छत्रसालांचे दुसरे एक

नातू जगतरायपुत्र पहाडसिंग आणि पहाडसिंगांचे दोन पुतणे यांच्यात गादीसाठी वाद निर्माण झाला होता. या परिस्थितीचा आढावा घेऊन न्याय्य निर्णय करण्यासाठी नानासाहेबांच्या आदेशावरून समशेरबहाद्दरना बुंदेलखंडात जावे लागले. समशेरबहाद्दरांनी सर्व परिस्थिती पाहून पहाडसिंगांचे बाजूने कौल दिला. धोरणीपणा, मुत्सद्देगिरी, सेनानायकत्व, दक्ष कारभार असे समशेरबहाद्दरांचे गुण यासारख्या अनेक प्रसंगांमधून दिसतात.

१७५९ साली समशेरबहाद्दरना साहेबनौबतीचा मान मिळाला.[२३] त्याची नोंद : " १-१०-१७५९, छ ९, सफर खर्च पोतापैकी – समशेरबहाद्दर यांस साहेबनौबत दिल्हि सबब वस्त्रे सदरेस विा रा नाना (पुढे वस्त्रांचा तपशील)" १७५९ साली उद्‌गीरच्या मोहिमेत त्यांनी मोठा पराक्रम गाजवला होता. यानंतरच्या पानिपतच्या युद्धातही तोडीस तोड पराक्रम गाजवला. १४ जानेवारी, सन १७६१ च्या पानिपतच्या युद्धात समशेरबहाद्दर जबर जखमी होऊन, त्याच अवस्थेत भरतपूरच्या दिशेने गेले व भरतपूरजवळ दिग येथे मरण पावले. सुरजमल जाट यांनी औषधोपचाराचे खूप प्रयत्न केले पण उपयोग झाला नाही. 'जखमांनी घायाळ झालेला समशेरबहाद्दर कुंभेरीस आला. सुरजमल्लाने त्याची निगा चांगली केली – भाऊ ! भाऊ ! असा शोक करून तो लवकरच मरण पावला.' यांची कबर भरतपूरला आहे.

पत्नी : (१) लालकुंवर. विवाह निश्चय १४ जानेवारी, सन १७४९.

'या विवाहापूर्वी समशेरबहाद्दरला हिंदू करून घ्यावे व त्यानंतर त्याचा विवाह लावून द्यावा या मताला पेशवे बंधू अनुकूल होते परंतु गोपिकाबाईंच्या दुराग्रहामुळे हा विचार मागे पडला' या आशयाची एक आख्यायिका ऐकिवात आहे.

या लालकुंवर सन १७५३ मध्ये वारल्या. पिता लक्षधीर दलपतराय, जहागीरदार ऊर्फ अब्दुल मोमीन. हे मूळचे हिंदू असून आडनाव पवार होते.[२४] या विवाहाची नोंद : " छ ५ सफर (१४-१-१७४९) समशेरबहाद्दर बद्दल मागणी घातली. लक्षधीर दलपतराव पवार संस्थान पेठ व पुढे जावल महिन्यांत लग्न जाले. "[२५] विवाह एप्रिलमध्ये झाला.

पत्नी : (२) मेहेरबाई. विवाह १८ ऑक्टोबर, सन १७५३ रोजी गुरुवारी (श्रीमुखनाम संवत्सर, अश्विन वद्य ६ शके १६७५) झाला.[२६] या पतीबरोबर पानिपतच्या मोहिमेवर गेल्या होत्या. युद्धाचा बेरंग दिसू लागल्यावर समशेरबहाद्दरनी यांना झाशीला पाठवून दिले. तेथून त्या पुण्याला निघाल्या. पानिपतच्या विध्वंसानंतर नानासाहेबांनीच मेहेरबाईंना मुलासह (थोरले अलीबहाद्दर) आपल्या वडिलांकडे पाठवले. गं. भा. गोपिकाबाई वारल्यानंतर या बांद्याहून

पुण्याला शोकसमाचारासाठी येऊन गेल्या. पत्रव्यवहारात यांचे उल्लेख 'माहाराज साहेब' नावाने आढळतात.

"श्रीमंत माहाराज पाबलास होती ते श्रीमंत मातुश्री गोपिकाबाईंचे वर्तमान ऐकोन पुणियास आली सुखरुप आहेत. श्रीमंत सौ दुलजबेगम व दादासाहेब व प्यारीसाहेब पुणियात सुखरूप आहेत. श्रीमंत सौ. रहिमत बीबी पाबली आहेत." [२७] मेहेरबाईंची मराठी पत्रे 'मदरु ३' मध्ये आहेत.

मराठी जीवनाशी – संस्कृतीशी त्या एकरूप झाल्या होत्या. एकादशी, चतुर्थी-सारखे उपास, स्पर्श-अस्पर्शाच्या कल्पना त्यांच्या मनात रुजल्या होत्या. सोवळे ओवळे, विटाळशीपणा यावरून त्यांचे रहिमतबीबीशी कारणपरत्वे खटके उडत. मस्तानीच्या वंशजांचा हा परिवार इस्लामी असूनही तीन पिढ्या ब्राह्मणी संस्कारांच्या प्राबल्याखाली वागत होता हे लक्षात घेता, कधी कधी उद्‌भवणाऱ्या कौटुंबिक खटक्यात अस्वाभाविक काही नाही असेच म्हणावे लागेल. [२८]

२९ सप्टेंबर सन १७८९ च्या पत्रात उल्लेख मिळतो : [२९]

"श्रीमंत माहाराजाची प्रकृत हाली बरी आहे... श्रीमंत मातुश्री माहाराजाची मर्जि सर्वांवर चांगली आहे."

मुलीचा विवाह वेळेवर झाला पाहिजे. अन्यथा समाजाच्या टीकेला तोंड द्यावे लागेल या सामाजिक दडपणाचा प्रभाव लोकांवर कसा असे? याचे प्रतिबिंब मेहेरबाईंनी आपली नात प्यारी बेगम हिच्या विवाहाच्या संदर्भात १ फेब्रुवारी सन १७९० ला अलीबहादूरना लिहिलेल्या पत्रात पहायला मिळते. [३०]

"चिरंजीव प्यारी साहेब यांचे सोयरिकीची योजना असो द्यावी. येथे वो राजश्री मुकुंद जोशी बाबा याणी रा. काजीतकी कडील पैगाम आणिला होता. आमचे विचारास आला नाही. तुम्हावर हवाला घातला. बोलणें आले म्हणोन तुम्हास सूचना लिहीली आहे. येथे ब्राह्मणातील वस्ती. बहुत थोर जाली उपहास करतील. यास्तव मुख्य सोईरिकीविसी कालजी असो द्यावी."

उत्तरेत गोसावी-प्रकरणावरून अलीबहादूर आणि महादाजी शिंदे यांच्यात मतभेद होऊन दुरावा निर्माण झाला होता. तो मिटून उभयतांत पुन्हा दिलजमाई झाल्याचे वृत्त ऐकून झालेली मेहेरबाईंची प्रतिक्रिया फार बोलकी आहे : [३१]

"आपले व पाटीलबाबाचे सख्य जालियाची पत्र श्रीमंत मातुश्री महाराजास आले त्यावरून सर्वांस बहुत आनंद जाहला. निमे दुखणे माझे गेलें म्हणोन श्रीमंत माहाराजांनी मला लिहिलें आहे."

१८०५ साली त्या पुण्याला येऊन गेल्या होत्या. [३२]

मेहेरबाईंना राजकारणाचीही चांगली समज होती. अलीबहाद्दर आणि महादाजी शिंदे यांच्यात दुरावा निर्माण झाला होता, त्याबद्दल त्यांनी अलीबहाद्दराना लिहीलेल्या पत्रावरून त्यांची राजकीय परिपक्वता चांगलीच समजून येते. [३२]

मेहेरबाईंचे पिता गुलाम हैदर मोहिद्दीनखान निंबगिरीकर. [२८] विवाहित स्त्रियांखेरीज समशेरबहाद्दर यांच्या रामबाई व फुलबाई या दोन रक्षा होत्या.

अलीबहाद्दर समशेरबहाद्दर: (८) वडील समशेरबहाद्दर निजामाच्या स्वारीवर असताना पुण्यापासून फक्त दोन मजला अंतरावर लष्करी छावणीत १७५८ साली यांचा जन्म झाला. आई मेहेरबाई. मेहेरबाईंना नानासाहेब पेशव्यांनी समशेरबहाद्दरची सरदारी अलीबहाद्दरकडे चालवतो असे आश्वासन देऊनही त्या पुण्याला आल्या नाहीत. पुढे नानासाहेब वारल्यावर त्या कायमच्या पुण्याला आल्या. नानासाहेबांच्या शब्दाप्रमाणे माधवरावांची सर्व व्यवस्था पूर्ववत केली. यामुळे अलीबहाद्दर यांची पहिली सुमारे ३॥ वर्षे आजोळच्या परिवारात गेली. थोरल्या माधवरावांनी अलीबहाद्दरांचे पालनपोषण योग्य इतमामाने केले. हे आपल्या वडिलांप्रमाणेच पराक्रमी होते.*

अलीबहाद्दर आपल्या विधवा आईसह पुण्याला शनिवार वाड्यात मस्तानी महालात राहत असत. [३३] सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत नाना फडणीस आणि महादाजी शिंदे यांच्यात सत्तास्पर्धा वाढली. उत्तरेकडे शिंद्यांचे वाढते सामर्थ्य पाहून, शिंद्यांचे स्वतंत्र सत्ताकेंद्र निर्माण होईल असा धाक वाटून, बाह्य देखाव्यानुसार शिंद्यांना मदत करण्यासाठी परंतु अंतस्थ हेतुनुसार शिंद्यांच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी नाना फडणीसांनी अलीबहाद्दरना सैन्यासह उत्तरेकडे पाठवले. [३४] अलीबहाद्दर ८ सप्टेंबर सन १७८७ ला बुंदेलखंडात जायला निघाले.

अलीबहाद्दरनी प्रथम हिम्मतबहाद्दर ऊर्फ अनुपगीर गोसावी यांच्याशी स्नेह-संबंध प्रस्थापित केले. हिम्मतबहाद्दरना बुंदेलखंडाचे राजकारण, सामाजिक परिस्थिती वगैरेची तपशीलवार माहिती होती. अलीबहाद्दरनी हिम्मतबहाद्दरना बुंदेलखंडचा काही भाग देण्याचा शब्द दिला. हिम्मतबहाद्दरनी अलीबहाद्दरना 'बांदा नवाब' होण्यासाठी मदत करण्याचे वचन दिले. [३४]

यानंतर बख्तसिंहाविरुद्धच्या अजयगढच्या युद्धात अलीबहाद्दर व हिम्मत-बहाद्दर यांच्या संयुक्त फौजेचा विजय झाला. यामुळे बांदा सुभा पूर्णपणे अली-

---

* सौवती रमाबाई यांनी थेऊरला सती जाण्यापूर्वी अलीबहाद्दरना केलेला उपदेश : "तू आमचा परंतु अन्य ज्यातीत उत्पन्न जाहलास तुझे ज्याप्रो वडिलांनी चालविले त्याप्रो नारायणराव चालवितील तुम्ही येकनिष्ठ वर्तणूक करून सुखरूप रहावे यात तुमचे कल्याण आहे." – मदरु भाग २, पृ. ९७.

बहाद्दरच्या ताब्यात आला. अलीबहाद्दरनी उत्तरेकडे एकूण पाऊण कोटीचा मुलूख काबीज केला. नाना फडणीसांच्या परवानगीने, पेशव्यांच्या अधिकृत सनदेनुसार यांनी बुंदेलखंडात सागर जिल्ह्याच्या इशान्येला 'बांदा संस्थान' स्थापन करून तिथेच कायमचे वास्तव्य केले. बांद्याला पुण्याहून विविध क्षेत्रांतील जाणकार लोक नेऊन तिकडे अठरा कारखाने स्थापन केले. गोरे आडनावाच्या चित्पावन गृहस्थांना पुण्याहून बोलावून दिवाण पदावर नेमले. भिकाजी नारायण पाळंदे हे गृहस्थ अलीबहाद्दरांचे कारभारी होते.[३५]

बांदा नबाबांच्या वंशावळीत पुढीलप्रमाणे शेरा आहे:[३६] "पुनासे नवाब साहब बिदा भये तब पेशवा साहबने सनद बुंदेलखंडके उपर लिख दई चंद्र २२ माहे जिल्काद सन सल्लास सबे सन ११७३ हिजरीको दो लाख के जगाकी भई सो बुंदेलखंड से आये" थोरले अलीबहाद्दर पहिल्यांदा उत्तरेकडे गेले त्याचा हा संदर्भ आहे.

श्रीमंत थोरले नारायणराव पेशव्यांच्या हत्येनंतर (१७७३ साली) करारात ठरल्याप्रमाणे गारद्यांना पाच लाख रुपये आणि तीन किल्ले किंवा किल्ल्यांच्या मोबदल्यात ३ लाख रु. रघुनाथरावांनी दिले नाहीत आणि स्वतःखेरीज दुसऱ्या कोणाला पेशवापदावर आणल्यास रघुनाथरावांनाही मारून टाकू व थोरल्या बाजीरावसाहेबांचे नातू अलीबहाद्दर यांना पेशवापदावर बसवू अशी गारद्यांनी रघुनाथरावांना धमकी दिली होती.[३७] "शहजादा पुण्यास आला होता त्यास युवराजपद द्यावे असे पुणे दरबारचे मनात होते पण हा शहजादा अस्सल (औरस) नाही या सबबीवर महादाजीने ही गोष्ट घडू दिली नाही."[३८]

गुलाम कादरच्या छळापासून मुक्तता होण्यासाठी राणेखानाला अलीबहाद्दरनी मदत केली. हिम्मतबहाद्दर यांच्या सहाय्याने बुंदेलखंडचा पेशव्यांचा सर्व मुलूख शिवाय आणखीही मुलूख जिंकला. यांना पेशव्यांची सार्वभौम सत्ता सर्वस्वी मान्य होती. अलीबहाद्दरनी नाना फडणीसांकडून स्वतःचे नावे 'बांदा नवाब' म्हणून पेशव्यांची सनद मिळवली व गरजेनुसार पुण्याहून फौजा नेऊन बुंदेलखंडात पेशव्यांची सार्वभौम सत्ता पुनर्स्थापित केली. यांनी पेशव्यांशी करार करून, हे जो प्रदेश जिंकतील तो पेशव्यांच्या साम्राज्याचाच भाग राहील व मानला जाईल असे निश्चितपणे ठरवून घेतले होते. यांनी १२-१३ वर्षे बांदा संस्थानचा उपभोग घेतला पण त्यांचा बहुतेक काळ लढायांत गेला.

अलीबहाद्दरांचा, यशवंतराव नाईक हा शूर सरदार संवत् १८५३ मध्ये रिवा राज्य जिंकताना मारला गेला. पुण्याहून आलेली फौज आणि हिम्मतबहाद्दरांचे आधिपत्याखालील फौज व स्वतःची फौज यासह, यशवंतराव नाईकांचे हत्येचा सूड घेण्यासाठी अलीबहाद्दरांनी जैतपूरवर आक्रमण केले. जैतपूरचा पाडाव केला. याच वेळी चालून आलेल्या अजयगडच्या फौजेचा पराभव केला. यानंतर रिवा राज्यावर

आक्रमण केले. रिवाच्या फौजेचाही पराभव केला.[३६] या सर्व पराक्रमांमुळे पुणे दरबारात अलीबहाद्दरांची प्रतिष्ठा खूपच वाढली.

कलिंजरचे जहागीरदार चोबे यांनी मात्र अलीबहाद्दरांची सत्ता मानली[३९] नाही. या वेळी कलिंजरचा किल्ला रामकिसन चोबे यांच्या ताब्यात होता. दोन वर्षे युद्ध करूनही कलिंजरचा किल्ला अलीबहाद्दरांच्या ताब्यात आला नाही. याच युद्धात अचानक आजारी पडून छावणीतच २३ ऑगस्ट सन १८०२ रोजी सोमवारी (दुंदुभिनाम संवत्सर, श्रावण वद्य ११ शके १७२४) अलीबहाद्दर मृत्यू पावले.[४०]

हे कृष्णभक्त होते. यांच्या मृत्यूनंतर दुखवटा समारंभ धाकटे चिमणाजी आप्पासो पेशवे यांचेकडून १ ऑक्टोबर सन १८०२ रोजी झाला. मंगळवार दि. २२ जुलै, सन १८२८ रोजी अलीबहाद्दरांचा ताबूत पुण्यात शुक्रवार पेठेत निघाल्याची नोंद आहे.[४१]

पत्नी : (१) बादशाहबेगम. या लहान वयातच वारल्या. **पत्नी** : (२) दुलजबेगम. हा विवाह पुण्यात झाला.[३८] यांची मुलगी प्यारीबाई. **पत्नी** : (३) बक्षी बेगम. या सहारणपूरच्या मुगल-चुगताई घराण्यापैकी होत्या.[४२] याखेरीज रहिमतबी नावाची रक्षा होती. 'दिनकर बल्लाळ गोरे पुण्यास होता. तो सन १७९२ त यजमानाची बायको घेऊन बुंदेलखंडात गेला.'[४३] 'सन १७७७ – रु. २३, अलीबहाद्दर याचे घरी लग्न जाले त्याबा ' अशा २ नोंदी मिळतात.[४४] त्याबद्दल अधिक खुलासे मिळाले नाहीत.

अलीबहाद्दरांची कबर दिल्लीमध्ये मोगलाईपासून 'कुतुबसाहेब' नावाने ओळखल्या जाणाऱ्या शाही कब्रस्तानात आहे. गुलाम कादिर* विरुद्धच्या युद्धात विशेष शौर्य दाखवल्याबद्दल शहाआलम बादशाहाने विशेष मान म्हणून अलीबहाद्दरांच्या परिवारातील मृत सदस्यांचा दफनविधी या शाही कब्रस्तानात करायची परवानगी दिली होती.[४५]

समशेरबहाद्दर अलीबहाद्दर : (९) यांची आई दुलज बेगम. यांचा जन्म सन १७८५ मध्ये झाला. यांना दादासाहेब म्हणत. २१ फेब्रुवारी, सन १७९१ रोजी पुण्यात यांची सुंता झाली. त्याबद्दल[४६] "इहिदे तिसैन साली चिरंजीव समशेरबहाद्दर यांचे सुंतेबा अलीबहाद्दर यांस ५००० रु. दिले. अलीबहाद्दर यांस हत्ती दिला व त्याचे खर्चास दरमहा नेमणूक २०० रुपये दिली. इसवी सन १७९०–९१" समशेरबहाद्दरांचा बिस्मिल्ला* वयाचे पाचवे वर्षी झाला.[४७]

---

* पानिपतप्रसिद्ध नजीबखानाचा नातू व जाबिताखानाचा मुलगा.

* मुसलमानात मुलीला अगर मुलाला घोड्यावरून मिरवणूक काढून मशिदीत नेऊन कुराणाची कलमे पढवतात त्याला बिस्मिल्ला म्हणतात. – 'इतिहासातील सहली' खंड २, पृ. ९२.

" दि. २-२-१७९०, श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे बिसमिला पावलास आज छ ७ जाखरी इंदुवारी होणार. सरंजाम तेथे गेला. मिठाई पाऊणशे रुपयाची पेढे लाडू वगैरे मिलोन व पोषाख जरी छडीदार येक व पैठणी येक येणेप्रमाणे वगैरे जिन्नस ऐसे तेथून रवाना केले आहेत. कलावंतीणीचे ताफ्याचा वेत पहिला नवता परंतु पर्वा पत्रे आली त्याजवरून काल रवाना केला आहे. "

यांना पेशव्यांनी २०० रु. दरमहा नेमणूक करून दिली होती. यांचे सर्व शिक्षण पुण्यातच झाले. सामान्यतः पावळ व पुण्यात रहात असत.[४३]

या परिवाराचे भोवती हिंदू – ब्राह्मण वातावरण होते तरी इस्लामी संस्कारही शिकवले जात असतच. म्हणूनच – " श्रीमंत राजश्री दादासाहेब नगरास (अहमदनगर ?) सैद इमाम याचे दर्शनास गेले होते ते कालच पावलास दाखल जाले. " असे उल्लेख वाचायला मिळतात. [४८]

वडील अलीबहाद्दर वारले त्या वेळी हे पुण्यात होते. बातमी समजल्यावर अमृतराव पेशव्यांची परवानगी घेऊन फौज जमवून बुंदेलखंडात गेले.[४०] थोरल्या अलीबहाद्दरांचे पश्चात हिम्मतबहाद्दर व गनीबहाद्दर सर्व सत्ता बळकावून बसले होते. सुरुवातीला काही काळ हिम्मतबहाद्दर हे समशेरबहाद्दरांचे दिवाण होते. समशेरबहाद्दरनी गनीबहाद्दरचा सपशेल पराभव केला. परहस्ते विष देऊन गनी-बहाद्दरची हत्या करवली.[४९] बुंदेलखंडात पुन्हा आपले वर्चस्व प्रस्थापित करून १८०३ साली किलींजरवर स्वारी केली. तिथे अलीबहाद्दरांची फौज व लवाजमा होताच. तो हस्तगत करून समशेरबहाद्दरांनी ' बांदा नवाब ' म्हणून वस्त्रे धारण केली.

यानंतर मात्र हिम्मतबहाद्दरनी समशेरबहाद्दरांची साथ सोडली आणि इंग्रजांची साथ धरली. बुंदेलखंडचा प्रदेश इंग्रजांना आपल्या कबजात हवा होता. त्यासाठी कर्नल पॉवेल यांच्या नेतृत्वाखाली इंग्रजांचे सैन्य सप्टेंबर, सन १८०३ मध्ये अलाहाबादहून बांद्याला दाखल झाले. हिम्मतबहाद्दरनी इंग्रजांना सैन्यासह मदत केली. या संयुक्त फौजांना समशेरबहाद्दरनी नेटाने तोंड दिले. सरतेशेवटी बांद्यापासून ९ मैलावर बेटवा नदीजवळ झालेल्या युद्धात १३ ऑक्टोबर, सन १८०३ रोजी समशेरबहाद्दरांचा सपशेल पराभव झाला.

इंग्रजांशी शत्रूत्व चालेना तेव्हा मिळते घेणे भाग पडले. १८ जानेवारी, सन १८०४ रोजी इंग्रज व समशेरबहाद्दर यांच्यात दोस्तीचा तह झाला. यामुळे बांदा जहागिरी व इतर मालमत्ता सुरक्षित राहिली. समशेरबहाद्दर इंग्रज सैन्यात नोकरदार अधिकारी बनले. इंग्रजांनी त्यांना चार लाख रु. तैनात मंजूर केली. यानंतरचे त्यांचे आयुष्य शांतपणे व ऐषारामात गेले.

यापूर्वीच दुसऱ्या बाजीरावांनी समशेरबहाद्दर आपली अवज्ञा करतात असा राग धरून, ५ ऑक्टोबर, सन १८०३ च्या इंग्रजांशी केलेल्या करारान्वये बुंदेलखंडातील थोरल्या अलीबहाद्दरांच्या ताब्यातील ३६, १६००० रु. वसुलाचा प्रदेश ईस्ट-इंडिया कंपनीच्या सैन्यखर्चासाठी इंग्रजांच्या हवाली केला.[५०] थोरले अलीबहाद्दर पुण्याला शनिवारवाड्यात मस्तानी महालात राहात तो देखील १८१२ साली जमीनदोस्त केला. त्यात समशेरबहाद्दरांची पत्नी व आई राहात होती. त्यांना वाड्याबाहेर काढून दुसऱ्या जागी ठेवून 'वाडा दरोबस्त खणून माती मलमा वगैरे झाडून बाहेर टाकीले आणि जाग्यावर झाडे लाविली शके १७३३ इसन्ने अशूर मय्यातैन '[५१] असो.

समशेरबहाद्दर बांदा येथेच ३१ ऑगस्ट, सन १८२३ रोजी रविवारी (सुभानुनाम संवत्सर, श्रावण वद्य १०, शके १७४५) मृत्यू पावले.[५२] **पत्नी :** हे लग्न मंगळवार २६, डिसेंबर, सन १७९७ रोजी (समान तिसैन, ७ रज्जब) (पिंगलनाम संवत्सर, पौष शु. ८ शके १७१९) झाले.[५२]

फत्तेबहाद्दर अलीबहाद्दर : (९) 'चिरंजीव मेहेरमबाई व अलीबहाद्दर यांचे धाकटे पुत्र फत्तेबहाद्दर झाशीस आहेत. ते पुण्यास येणार (इ. स. १८०४–०५)' अशी नोंद मिळते.[३२] जास्त माहिती नाही. कदाचित हा अनौरस संततीपैकी असावा. यांचा उल्लेख इतरत्र मिळाला नाही.

झुल्फिकारअली अलीबहाद्दर : (९) अलीबहाद्दर वारले वारले त्या वेळी हे त्यांच्या परिवारातच बुंदेलखंडात होते. त्या वेळी त्यांचे वय २ वर्षे इतकेच होते.[४३] समशेरबहाद्दर १८२३ साली वारल्यानंतर यांना ४ लाख रु. पेन्शन मिळू लागले. त्याच वेळी हे बांद्याचे नवाब झाले. कृष्णाजी विष्णु करमरकर* हे गृहस्थ झुल्फिकारअलींचे दिवाण होते. त्यामुळे करमरकर बांद्यालाच रहात.[५३]

झुल्फिकारअलींनी बांदा संस्थानच्या आणि बांदा शहराच्या वैभवात खूप भर घातली.[५४] अनेक वास्तु, बाग–बगीचे, धर्मशाळा, तलाव, मशिदी यांची बांदा शहरात निर्मिती केली. खासमहल, सुरईमहल, बारादरीमहल, जामामस्जिद, हमामघर, मेहमानकी सराई, नवाबका तलाब, ऐशबाग, नजरबाग, गुलाबबाग, बेरीबाग, गन्नाबाग, वगैरे विशेष प्रसिद्ध आहेत. अनेक कवी आणि विद्वानांना त्यांचा आश्रय होता.[५४]

---

* यांचे नातू नेपाळमध्ये प्रथम स्थायिक झाले. पणतु राजाराम गणेश ह्यांचा जन्म नेपाळमध्ये झाला. राजारामपंतांचा पेशवा परिवाराकडे लहानपणापासून राबता असे. त्यांची मुंज सईबाईंनी लावली. यांनी पेशव्यांची हकीगत सांगितली आहे.

प्रख्यात शायर मिर्झा असदुल्लाखान गालिब यांच्याशी झुल्फिकारअलींचे नजीकचे नाते होते. दुसऱ्या अलीबहाद्दरांचे एक पणतु श्री. नवाबबहाद्दर (बार - अॅट - लॉ) रा. इंदोर हे इंदोरहून याबद्दल कळवतात :

" Mirza Galib was connected to my ancestors from both sides, paternal as well as maternal. He himself has in his famous letters described his relationship wlth Zulfiquar Bahadur . . . Galib went to Banda Several times and stayed there. The last time when he went to Banda while he was going to Calcutta in connection of his Pension. "

१८४२ साली उत्तर हिंदुस्थानात दंगे झाले. त्यावेळी योगायोगाने झुल्फिकार-अली व दुसरे बाजीराव पेशवे इतर काही कामानिमित्त गव्हर्नर - जनरलना भेटायला अहालाबादला गेले होते. त्यांचे काम झाल्यानंतर, उत्तरेकडील दंग्यांशी या दोघांचा संबंध असल्याच्या संशयावरून दोघांनाही अलाहाबाद परवानगीशिवाय सोडायची मनाई केली होती.* झुल्फिकारअली १८२३ साली वारले असे काही ठिकाणी छापले आहे ते चूक आहे. ते प्रत्यक्षात १८४९ साली वारले.[५५] बांद्यामध्ये नवाबांच्या आठवणी, आख्यायिका अजूनही सांगितल्या जातात.

झुल्फिकारअलींची **पत्नी** : नवाब बेगम १८५७ च्या उठावानंतर यांना भोपाळला नजरकैदेत ठेवले होते. त्याबाबत नवाबबहाद्दर म्हणतात :

" Ali Bahadur's mother was forced to live at Bhopal and the two were neither allowed to go out of Indore and Bhopal respectively.. His mother was allowed (during last days of life) to go to Agra, where she also died. Ali Bahadur's mother who had taken refuge to Bhopal was ordered to go to Sehore. In 1860, she also applied that at Sehore she did not keep good health and may be therefore allowed to go to Agra, Gwalior or Kanpur. She was allowed to go to Agra. "

अलीबहाद्दर झुल्फिकारअली : (१०) झुल्फिकारअली वारल्यानंतर अलीबहाद्दर बांद्याचे नवाब झाले. १८५७ मध्ये यांचे वय २२ वर्षे होते. यावरून यांचा जन्म सन १८३५ चा असावा.[५६] बांदा १८१९ सालपर्यंत बुंदेलखंडच्या ब्रिटिश अधिकार-कक्षेतील जिल्ह्यात राहिले. त्यानंतर दक्षिण बुंदेलखंडचा वेगळा जिल्हा करून बांदा त्या जिल्ह्याचे मुख्य ठिकाण बनले.[५७]

अलीबहाद्दरांकडे बांद्याचे नवाबपद आले त्या वेळी इंग्रज अधिकारी शिअरर बांद्यात होता. तो अलीबहाद्दरांबद्दल म्हणतो : 'अलीबहाद्दर पोरसवदा, बांध्याने

* याच पुस्तकाचे पृ. १५८ – ५९ पहा.

लहान असला तरी चपळ असा असून संथ स्वभावाचा आणि सुस्वभावी आहे. त्याला मिळालेल्या वागणुकीबद्दल त्याचा राग दिसला नाही.'

बांद्याचा इंग्रज कलेक्टर मेन अलीबहाद्दरांबद्दल म्हणतो[५८] : 'He was always devoted to field sports and mainly exercises. He is a good shot with both rifle and pistol, a first rate whip and good plucky rider and can undergo immense personal fatigue.'

अलीबहाद्दरांच्या कारकीर्दीतच १८५७ चा उठाव झाला. नवाबांनी या काळात इंग्रजांना शक्य ती सर्व मदत केली. बंडाचा वणवा बांदा जहागिरीपर्यंत यायला वेळ लागला नाही. शुक्रवार १२ जून, सन १८५७ ला बंडखोरांनी बांदा शहरात युरोपियनांच्या दोन बंगल्यांना आगी लावल्या. बांद्याचा कलेक्टर मेन याचा बंगलाही सुरक्षित राहण्याची खात्री नव्हती. मेनसह अनेक इंग्रज अधिकारी आपल्या सर्व परिवारासह अलीबहाद्दरांच्या राजवाड्यात १२ जूनला आश्रयासाठी आले. मेनच्या म्हणण्याप्रमाणे अलीबहाद्दरनी सहानुभूतीने वागवले. परंतु एका दिवसानंतर राजवाड्यातील हिंदू व मुसलमान नोकर इंग्रज लोकांविरुद्ध बिथरले. नवाबांनी इंग्रजांच्या संरक्षणासाठी खूप धडपड केली. आसपासच्या सर्व लोकांनी, स्वतःच्या सैनिकांनीही इंग्रजांविरुद्ध बंड पुकारल्यामुळे बांद्याच्या राजवाड्यात इंग्रजांचे संरक्षण करणे अशक्य झाले. नवाबांनी कलेक्टर मेनला स्वतःची असमर्थता स्पष्ट सांगितली.

अलीबहाद्दरांनी सर्व इंग्रज लोकांना सुरक्षिततेसाठी मिर्झापूरला रवाना केले. सर्व इंग्रजांनी १४ जूनला रात्री ८ वाजता बांदा सोडले. बांद्यामधली इंग्रजांची सत्ता संपल्यानंतर १५ जूनला अलीबहाद्दरांनी 'बांदा नवाब' म्हणून शासन आपल्या हातात घेतले. आपली स्थिती मजबूत करण्यासाठी हालचाली सुरू केल्या. संस्थानात गाई-बैलांची हत्या करण्यावर बंदी घातली. कलेक्टर मेनशी अलीबहाद्दरनी याही परिस्थितीत संपर्क ठेवला होता. जे इंग्रज लोक आसपासच्या प्रदेशातून बांद्याला येत होते किंवा बंडखोरांकडून कैदी म्हणून आणले जात होते, त्यांना पूर्ण संरक्षण देऊन इतरत्र इंग्रजांकडे पाठवले जात होते. अशाप्रकारे अलीबहाद्दरनी किमान ५० युरोपियन लोकांचे प्राण वाचवले. जोपर्यंत बंडाचे चित्र स्पष्ट होत नाही तोपर्यंत अलीबहाद्दर बंडखोर आणि इंग्रज अधिकारी दोघांशीही संपर्क ठेवून दोघांकडूनही सहानुभूती बाळगून होते. त्यांच्यापुढे त्या परिस्थितीत दुसरा पर्याय नव्हता. "सैन्य फुटले तरी बांदा नवाबाने युरोपियन अधिकाऱ्यांना चांगल्या प्रकारे वागवले, आपल्या राजवाड्यात आश्रय दिला, एवढेच नव्हे तर बेगमांनी कित्येक युरोपियन स्त्रियांशी फार ममतेचे वर्तन केले."[६०]

बंडखोरांची ताकद वाढू लागली तसे अलीबहाद्दर नाइलाजाने बरेच उशीरा बंडात सामील झाले. ऑगस्ट १८५७ ते ऑक्टोबर १८५७ मध्ये बांदा शहरात बंड-

वाल्यांचे किमान १२००० सैन्य जमा झाले होते. यामुळे बांद्याची आर्थिक स्थिती अगदीच वाईट झाली, म्हणून अलीबहाद्दरनी करवीच्या नारायणराव पेशव्यांकडे २ लाख रु. कर्जाऊ मागितले. प्रथम नारायणरावांनी दुर्लक्ष केले. हे पाहून अलीबहाद्दर स्वतः करवीवर स्वारी करण्यासाठी २००० सैन्य घेऊन १५ नोव्हेंबर १८५७ ला निघाले. यामुळे सरतेशेवटी नारायणराव पेशव्यांनी नवाबांना २ लाख रु. दिले आणि बांदा प्रदेश आपआपसांत वाटून घेण्याचा करार केला. त्यानुसार नारायणरावांकडे मऊ, कमासिन, करवी, बदौसासह आर्धा बबेरु, छिबू, दरसैंडा, तिरोहा वगैरे प्रदेश आणि नवाबांकडे दैलानी, सिमौनी, आर्धा बबेरु, सिहुंडा वगैरे प्रदेश अशी वाटणी झालीं. रकमेसह प्रदेशही मिळाल्यामुळे अलीबहाद्दरची स्थानिक प्रतिष्ठा वाढली.[११]

अलीबहाद्दर आता बंडवाल्यांच्या प्रमुख पुढाऱ्यांपैकी एक समजले जाऊ लागले. आता पाय मागे घेणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनी जानेवारी सन १८५८ मध्ये उघडपणे हालचाली सुरू केल्या. फेब्रुवारीत बांद्यातील ख्रिस्ती चर्च, ख्रिस्ती दफनभूमी, पूर्वीची इंग्रजांची कार्यालये, कागदपत्रे, तुरुंग इत्यादींचा बंडवाल्यांनी नाश केला. दरम्यान अलीबहाद्दरनी नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, वगैरे इतर पुढाऱ्यांशी संपर्क स्थापन केला. नानासाहेबांच्या कानपूरच्या राज्याभिषेकाबद्दल आनंद व्यक्त करून सोन्याच्या २१ मोहोरा भेट म्हणून पाठवल्या आणि आपल्या विश्वासू माणसामार्फत बांद्याची हकीगत कळवून लष्करी मदतीची* विनंती केली.[१२] राणी लक्ष्मीबाईंनी (झांशी) यांना ' राखीबंध भैय्या ' मानले होते.

अलीबहाद्दरांची हिम्मत वाढली होती. या प्रदेशात बांद्यापासून २२ मैलांवरचा किलिंजरचा किल्ला तेवढाच इंग्रजांच्या ताब्यात होता. अलीबहाद्दरांच्या सैन्याने किलिंजरच्या किल्ल्याला वेढा घातला. इतक्यात मेजर जनरल व्हिटलॉक यांची मद्रास रेजिमेन्ट बांद्यावर चालून येत असल्याची बातमी आल्यामुळे अलीबहाद्दरना किलिंजरचा नाद सोडून बांद्याला परतावे लागले. दोन्ही सैन्यांत बांद्यापासून २४ मैल पश्चिमेला कबरईजवळ १७ एप्रिल १८५८ ला लढाई झाली. व्हिटलॉकच्या प्रशिक्षित, तरबेज सैन्यापुढे बांद्याचे सैन्य हरले. दुसरी लढाई १९ एप्रिलला बांद्यापासून ८ मैल पश्चिमेला गोयरा मुगलीजवळ झाली. पुन्हा व्हिटलॉकची सरशी झाली. नवाबांचे वाचलेले सैनिक हमीरपूर-कल्पीकडे निघून गेले. अलीबहाद्दर बांदा

---

* या पत्राचा मायना : " सेवामे,

बिठूरके नानासाहब बहादूर
मेरे पुज्य तथा आदरणीय चाचा। "

संदर्भ : ' संकानेजी ' आधार : अलीबहाद्दरचा पत्रव्यवहार, बांदा फाईल सं. XVIII – ३५

शहरात परतले. आपल्या चीजवस्तू गोळा करून घेऊन जलालपूरला आपल्या सैन्याला मिळाले. २० एप्रिल, सन १८५८ ला इंग्रज सेनेनी बांद्यात प्रवेश केला. तेव्हाच अलीबहाद्दरांचा १० महिन्यांचा बांद्याचा शासनकाल संपला.[६२] या धामधुमीत उत्कृष्ट शृंगारलेला राजवाडा, जडजवाहीर, संपत्तीची लूट झाली.

काल्पीला पोहोचताना अलीबहाद्दराजवळ सामानासह २००० सैन्य होते. काल्पी बंडखोरांचे मुख्य केंद्र बनले होते. ४–५ एप्रिलच्या रात्री राणी लक्ष्मीबाई, ५ एप्रिलला दिवसा तात्या टोपे तेथे दाखल झाले होते. रावसाहेब पेशवे आधीपासूनच तेथे होते. २२ मे रोजी बंडवाले आणि सर ह्यू रोझची सेना यात तुंबळ युद्ध झाले. त्यात बंडवाल्यांनी सपाटून मार खाल्ला. सर्व पुढारी कसेबसे काल्पीत परतले. बऱ्याच विचारविनिमयानंतर ग्वाल्हेरहून शिंद्यांची मदत मागायचे ठरले.[६३]

यानंतर बंडवाल्यांना फारसे यश मिळाले नाही. सप्टेंबर सन १८५८ मध्ये बाणापूरचे राजा मर्दनसिंह आणि शाहगडचे राजा बख्तबली इंग्रजांना शरण गेले. १६ ऑक्टोबरला सिंधवाच्या लढाईत अलीबहाद्दरांचा पराभव झाला. पूर्वी इंग्रजांशी सहानुभूतीने वागल्यामुळे पूर्वोक्त दोघांना इंग्रजांनी माफी दिली. हे पाहून अलीबहाद्दर खूप प्रभावित झाले. आपणही इंग्रजांशी सहानुभूतीने वागून अनेक इंग्रज नागरीकांचा जीव वाचवल्यामुळे आपल्यालाही इंग्रज सरकारकडून सहानुभूती मिळेल अशी अलीबहाद्दरना आशा वाटू लागली होती.

यापूर्वी १९ ऑगस्ट सन १८५७ च्या हिंदुस्थान सरकारच्या राजपत्रानुसार नानासाहेब पेशव्यांना पकडून इंग्रजांच्या हवाली करणाऱ्या व्यक्तीला जी माफी जाहीर करण्यात आली होती, त्या सवलतीतून ज्या चार व्यक्तींना वगळले होते, त्यामध्ये अलीबहाद्दरही होते.

आतापर्यंत सतत सहा महिन्यांच्या अयशस्वी धावपळीने अलीबहाद्दर थकले होते.[६४] म्हणून त्यांनी सिरोंजहून दोन मुन्शींना खलीता घेऊन मध्य भारताचे, गव्हर्नर-जनरलचे एजन्ट सर रॉबर्ट हॅमिल्टन यांच्याकडे पाठवले. हॅमिल्टन यांच्याकडून ताबडतोब पत्रोत्तर आले नाही. परंतु एक अधिकारी लेफ्ट. कर यांनी कळवले की, जर आपण केवळ असहाय्य परिस्थितीमुळेच बंडखोरांना सामील झालो, असे नवाब सिद्ध करू शकले तरच त्यांना जीवदान मिळण्याची शक्यता आहे. ज्या वेळी नवाब बंडवाल्यांची साथ सोडतील त्या वेळी नवाबांनी सफेद निशाणासह (ट्रुस फ्लॅग) इंग्रजांच्या छावणीत दाखल व्हावे. मात्र पूर्ण माफीबद्दल आताच आश्वासन देता येत नाही.

या पत्रानुसार अलीबहाद्दरनी शरण जायचे ठरवले. संधी मिळताच तात्या टोपे आणि रावसाहेब पेशव्यांना डोंगरपूरजवळच सोडून, अलीबहाद्दर माळवा डिव्हि-

जनचे सेनापती मेजर जनरल मिचेल यांच्या छावणीत १४ नोव्हेंबर सन १८५८ रोजी दाखल झाले.[६४]

इंग्रजांकडून माफी मिळाल्यानंतर अलीबहाद्दरना एका सैन्य पथकाच्या पहाऱ्याखाली– नोकरवर्ग, आश्रित, संपत्ती, परिवारातील सदस्य, सामान वगैरेसह– महू छावणीत (इंदोरजवळ) रवाना केले. शरणागती पत्करताना अलीबहाद्दरांकडे १) सुमारे २५ हजार रुपयांचे जडजवाहीर, २) सात-आठ लाख रुपये रोख, ३) अन्य सामान, इतकी एकूण चीजवस्तू होती. यापैकी धन संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करून तात्कालीक खर्चासाठी नवाबांकडे १००० रु. दिले. या वेळी अलीबहाद्दरांच्या परिवारात १) स्त्रिया ३७, २) मुले १३, ३) घोडेस्वार २९, ४) पदाती सैनिक ५२ मिळून १३१ माणसे होती. जनावरांपैकी काही जनावरे सरकारजमा केली. काहींचा लिलाव करून विकली.[६५]

अलीबहाद्दर परिवारासह १ डिसेंबर, सन १८५८ ला महू छावणीत पोहोचले. यापुढचे आयुष्य कसे घालवावे, याबद्दल इंग्रजांनी त्यांना अटी सांगितल्या. त्या :– १) नवाबांना खर्च आणि भविष्यकालीन गरजांसाठी अनुदानात उदारता दाखवावी. २) ज्या अर्थी नवाबांनी विद्रोहाच्या प्राथमिक अवस्थेत नवगाव, फत्तेहपूर इत्यादी ठिकाणचे शरणार्थी, स्कॉटिश आणि अन्य युरोपियन ख्रिस्ती बांधवांशी सहानुभूती आणि सहृदयतापूर्ण वर्तन केले होते आणि त्या वेळी नवाबांची इंग्रज सरकारबद्दल शत्रूत्वाची भावना नव्हती. त्याअर्थी, आणि सरकारचे असे मत आहे की, त्यांनी केवळ असहाय्यतेमुळे बंडखोरांना आपले नाव आणि साधनसामुग्रीचा उपयोग करू दिला म्हणून नवाबांशी सौम्यपणे वागावे. ३) व्यक्तिगत बंधने न लादता त्यांना महू मध्येच ठेवावे. सरकारी अनुमतीशिवाय स्थलांतर करू देऊ नये. ४) तनखा परिवारासह सुखाने रहाण्याला पुरेसा असावा, परंतु दुरुपयोग होण्याइतका जास्त नसावा. नवाबांशी सन्मानपूर्वक व्यवहार करावा. त्यांनी 'नवाब' ही पदवी धारण करू नये. बांद्याशी संबंध दर्शविणारे कोणतेही चिन्ह बाळगू नये. ६) ते किंवा त्यांचे अनुयायी शस्त्रे बाळगणार नाहीत. ७) ते दिवाणी न्यायालयाच्या कार्यकक्षेत येतील. ८) नवाबांचा तनखा दरसाल ४० हजार रु. पेक्षा जास्त असणार नाही. ९) नवाबांना हे स्पष्ट करण्यात यावे की, त्यांनी इंग्रज शरणार्थींना संरक्षण देऊन जी सन्मानपूर्वक वर्तणूक– व्यवहार केला, हे लक्षात घेऊन नवाबांचेबद्दल उदारता दाखवण्यात येत आहे.[६६]

दुसरे अलीबहाद्दर यांचे पणतू, नवाब बहादर यांचेकडून पुढीलप्रमाणे माहिती समजते : 'After 1857' Ali Bahadur II faced a court-martial at Mahow, but consideration was shown to him and he was acquitted. For some time he was forced to live at Mahow cantonment,

then he was made to shift his living to Indore a place about 14 miles from Mahow. He was granted a political pension which he received from political department Delhi. He used to live with his first wife Iftkar Mohal at Indore at place near from Railway station, place known as 'Banda Compound.' Ali Bahadur II, until his death lived with his first wife Iftkar Mahal and died on 14th August 1873 at Banarus. Alibahadur II had very intimate relations with Raja Sahib of Banarus. In 1862, Ali Bahadur II applied to the Govt. that he did not keep good health at Indore and he may be allowed to go somewhere else, leaving the residence of Mahow cantonment.'

अलिबहाद्दरनी पुढचे सर्व आयुष्य जवळजवळ स्थानबद्ध स्थितीत इंदूरला घालवले. आयुष्याच्या अखेरीला इंग्रजांनी, त्यांना हवे असल्यास बनारसच्या राजे-साहेबांकडे जाण्याची परवानगी दिली. त्याप्रमाणे अलीबहाद्दर वाराणसीला गेले असताना तेथेच अकस्मात १८७३ साली (१४ ऑगस्ट) वारले. यांची मशीद बांदा येथे आहे ती यांच्या वैभवाची साक्ष देते.

नवाबबहाद्दर म्हणतात : 'When Ali Bahadur II died his body was brought to Delhi and was buried in 'Quetub Sahib. 'This fact is stated by Kishan Narayan in his 'History of Bundelkhand and Jalon, (P.109)'

नवाब अलीबहाद्दर यांच्या शरणागतीबद्दल दि. १४ फेब्रुवारी सन १८५९ च्या 'ज्ञानप्रकाश' मधील बातमी :

बांद्याच्या नवाबाला क्षमा

"इंग्रजांनीं बांद्याच्या नवाबाला बंडातील राजद्रोहाची क्षमा केली व दरसाल ४०००० रु. नेमणूक दिली त्याविषयी – यास्तव ही अपार दया सरकारने आपल्या राजद्रोही पुरुषांवर केली, ही जरी लोकरंजनार्थ उत्तम प्रकारची झाली, तरी यथान्यायाने झाली असे दीर्घ विचारी यांचे विचारासारखी नाही."

त्यांच्या **पत्नी** : १) इफ्तकार महल २) मुबारक महल.

१७८८ साली थोरल्या अलीबहाद्दरांनी स्थापन केलेल्या बांदा संस्थानाबद्दल खालीलप्रमाणे माहिती मिळते :–

"The Principal Town of the District, of the same name is situate on the right side of the river cane or keyn, which here is described as having steep banks, sandy bottom and usual depth of water from Nov. to June from one and a half to two feet. The town is of considerable size, but straggling and ill built, the houses

being of mud though there is abundance of excellent building stone procurrable. The habitation of the Nawaub or the titular prince of the place is an exception, being at the time of Jacquemont's visit in 1830, new spacious and built with solidity; but in vile taste Partly Indian, Partly Europeon; wretchedly furnished and having a profusion of gross sculptures. This nominal Prince has however an annual Income equal to 40,000/- which his father, the late Nawaub is said to have expended in conviviality and genial enjoyment This provision is securd to the family by an engagement with the East India Company, concluded in 1812. In liue of the military force maintained by his father, the present Rajah has been allowed to retain only a suitable revenue. The population amounted in 1847 to 33, 464 Distant S. W. from Allahabad. '

- GAZETTER OF INDIA; BY THORNTON (Ed-before 1856)

BANDA-A district in the Jhansi divison of the United provinces of Agra and Audh, lying between North Lat. 24° 53° and 25° 55°, East long 79° 59° and 81° 34° bounded on the North—East by the river Jmuna, on the West by the river Ken and Hanurpur, on the South and south-East by the Native states of Punna, Charkhari and Rewa, and on the east by Allahabad district. Area. 2864·20 square miles. Languages spoken, - Hindi and dialect of Hindustani : Dak Bunglow at Banda, Babery, mau, karwi and Naraini :

- THACKER'S INDIAN DIRECTORY - 1947-48.

अलीबहाद्दरना इंदोरला ठेवून इंग्रजांनी त्यांचा इतर लोकांशी संपर्क तोडल्यामुळे त्यांचे स्नेही, परिचित आणि चाहते या मंडळींना अलीबहाद्दरना भेटणेही अवघड झाले. ज्येष्ठ शायर (जे अलीबहाद्दरांचे नातलगही होते) मिर्झा गालिब अलीबहाद्दरना भेटण्यासाठी व्याकूळ होत असत. या अस्वस्थतेतून त्यांनी रचलेला एक शेर उपलब्ध आहे :-

गालिब खुदा करे कि सवारे समन्द नाज।
देखूँ अली बहादुरे आली गौहर को मैं ॥

अलीबहाद्दरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वंशजांना दरसाल १३००० रु. पोलिटिकल पेन्शन मिळू लागले. त्याबद्दल एक उल्लेख मिळतो.[६७] : ' इनके वंशज अभी तक इंदौरमें मौजूद हैं, जिन्हें आजकल पेन्शनके रूपमें सालाना तेरह हजार रुपये मिलते है। " त्यांच्या मुलांचा उल्लेख मिळतो तो : [६८]

"नवाब अल्लीबहाद्दर हा सन १८७३ साली मृत्यू पावला. त्यास तीन चिरंजीव असून येथे 'बांदेवाले नवाब' या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांचे इंदूर येथील राजकुमार कॉलेजात बरेच अध्ययन झालेले असून त्यास मध्य हिंदुस्थानच्या एजंटाच्या दरबारात बडे लोक म्हणून उच्च प्रतीचा मान मिळत असतो."

'१८५७' नंतरची हकीगत

अलीबहाद्दरांचे एक पणतू श्री. नवाबबहाद्दर (बार-ऍट-लॉ) रा. इंदोर (ज. सुमारे सन १९१३) उठावानंतरची परिवाराची हकीगत पुढीलप्रमाणे कळवतात :

नवाब दुसरे अलीबहाद्दर यांना तीन मुलगे : १. झुल्फिकार बहाद्दर ऊर्फ नवाब बहाद्दर (मृ. सन १९०७). २. समशेरबहाद्दर ऊर्फ तिसरे उमराव बहाद्दर, (मृ. सन १९२६). ३. सरदार बहाद्दर. यापैकी उमराव बहाद्दर व इतर काही वंशजांचे, कुटुंबियांचे फोटो अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटीत संभाळून ठेवले आहेत. ही गोष्ट युनिव्हर्सिटीच्या सिनेटच्या एका सभासदाकडून श्री. नवाबहाद्दरांना समजली.

दुसरे अलीबहाद्दर यांचे दोन विवाह झाले होते. पहिला विवाह बांदा येथेच बेगम इफ्तकार महल यांच्याशी झाला. दुसरा विवाह त्यांचीच धाकटी बहीण मुबारक महल यांचेशी झाला. दुसरा विवाह अलीबहाद्दर इंदोरला स्थानबद्ध असताना इफ्तकार महलच्या हयातीत झाला. पुढे मृत्यूपर्यंत अलीबहाद्दर इंदोरला इफ्तकार महल बरोबरच राहात असत.

त्यांना इफ्तकारमहल पासून तीन अपत्ये झाली : १. सुगरा बेगम, २. वझीर बेगम, ३. उमराव बहाद्दर.

मुबारक महलपासून चार अपत्ये झाली. १. सरदार बहाद्दर, २. झुल्फिकार बहाद्दर, ३. इम्तियाझ बेगम. ४ डोंकर बेगम.

यांपैकी सुगरा बेगम आणि वझीर बेगम यांचे विवाह काल्पीचे नवाब मुहम्मद साद उद्दीन खाँ 'शफीक' यांच्या अनुक्रमे थोरल्या थोरल्या व धाकटचा मुलांशी, अलीबहाद्दरांचे मृत्यूनंतर झाले. दोघींनाही लग्नखर्चासाठी ५००० रु. दिले होते. १९३४ साली सुगरा बेगम हयात होत्या. वझीर बेगमची मुलगी कायसर बेगम ही उपरोक्त बॅरिस्टर नवाब बहाद्दरांची आई.

उपरोक्त उमराव बहाद्दर आणि झुल्फिकार बहाद्दर १८५७ पूर्वी बांदा येथे जन्मले. उमराव बहाद्दर चांगले सुशिक्षित होते. अरेबिक आणि पर्शियन या दोन भाषा त्यांना उत्तम येत असत. ते प्रख्यात उर्दू कवी मुनीर शिकवा आबादी आणि जलाल लखनवींचे शिष्य होते. यांची काव्यरचना, साहित्य, 'दिवान' लखनौहून प्रसिद्ध झाले आहे. अलीबहाद्दर वारल्यानंतर हे काही वर्षे लखनौला राहात असत. उमरावबहाद्दर यांनीच प्रथम इंदोरमध्ये शेर-शायरीचे मुशायरे (कवी संमेलन) आयोजित करायला सुरुवात केली. उत्कृष्ट कवी म्हणून त्यांनी इंदोरमध्ये नाव

मिळवले होते. शायर 'दिलेर' या टोपण नावाने ते काव्य-रचना करीत. अली-बहादूरांचे नंतर यांना सरकारकडून पेन्शन मिळत असे. हे १९२६ साली वारले.

उमराव बहादूर यांचे ज्येष्ठ चिरंजीव इक्बाल बहादूर ऊर्फ अमीर बहादूर हे लवकर अविवाहित असतानाच वारले. उमराव बहादूर यांचेनंतर त्यांचे धाकटे दोन चिरंजीव एहसान बहादूर आणि सैफ अलीबहादूर यांना पेन्शन मिळत असे. सैफअलीबहादूर यांचे दुसरे लग्न १९२८ साली झाले. एहसान बहादूर उर्दू कवी होते. ते १९७३ साली आणि सैफअलीबहादूर १९७४ साली २६ एप्रिल रोजी वारले. या काळापर्यंत या कुटुंबियांचे पेन्शन कमी होत जाऊन फक्त ६२ रु. ५० पै. राहिले होते. या बंधूंच्या मृत्यूनंतर हे पेन्शनही बंद झाले. वर उल्लेखलेले बॅ. नवाब बहादूर हे सैफअलीबहादूर यांचे चिरंजीव.

नवाब बहादूर यांना ३ चिरंजीव व ११ भावंडे आहेत. चिरंजीवांची नावे १. जुनेदअलीबहादूर, २. सुजानअलीबहादूर, ३. खत्रीबहादूर

१८५९ साली इंदोरला वास्तव्यासाठी आल्यानंतर १९४७ सालपर्यंत अगदी जकीरीचा जीवनक्रम या मंडळींच्या वाटेला आला. स्थलांतरे व प्रवास करण्यावर, समाजात मिसळण्यावर निर्बंध होते. पुढे हे निर्बंध थोडे थोडे शिथिल झाले.

गेली काही वर्षे श्री. नवाब बहादूर व त्यांचे कुटुंबीय इंदोरच्या 'मनोरमागंज' या भागात राहतात. इंदोरमधल्या राहत्या वास्तूचे नाव 'बांदा कोठी' होते. या मंडळींनी इंदोरजवळ सिहोरला ६५ एकर जमीन खरेदी करून 'बांदा इस्टेट' ही उभारली.

पुण्यात शनिवारवाड्यासमोर श्रीमंत थोरले बाजीरावसाहेब पेशवे यांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ शनिवार दि. ४ फेब्रुवारी, सन १९८४ रोजी सकाळी भारतीय लष्कराचे (त्या वेळचे) सरसेनापती जनरल अरुणकुमार वैद्य यांच्या हस्ते पार पडला. त्या समारंभासाठी नवाब बहादूरांचे ज्येष्ठ चिरंजीव जुनेदअलीबहादूर नवाबबहादूरांचे दोघे धाकटे बंधू इसरार बहादूर आणि तमकीन बहादूर हे तिघे पुण्यात पहिल्यांदाच आले होते.

पुण्यात आल्यानंतर घराण्याच्या पूर्ववृत्तासंबंधी माहिती सांगताना जुनेदअली-बहादूर म्हणतात[९९] : "आमचे वडिलांनी पंडीत नेहरू व त्यांचेनंतरही अनेक वेळा सरकारशी पत्रव्यवहार केला. त्यात बांद्याची खासगी इस्टेट आम्हाला परत करावी अशी मागणी केली होती. पत्रव्यवहार करूनही सरकारने काहीही परत दिले नाही. धोरणाचा भाग म्हणून देता येत नाही असे कळवले."

"इफ्तकार महल, मुबारक महल, कंकर महल, बारादरी महल असे चार महल आहेत. त्यात महानगरपालिका व इतर सरकारी कार्यालये आहेत. 'यशबाग' ही ५० एकर आंब्याची बाग आहे. तेथील समशेरबहादूर तलाव १२ एकरांत पसरलेला आहे. त्याची खुबी अशी आहे की तो असा खोदला आहे की, आकाशातून

त्याकडे पाहिल्यावर उर्दूतील अक्षरे दिसतात, 'समशेरबहाद्दर'. १९७८ साली आम्हाला काही कार्यक्रमासाठी बांद्याला बोलावले होते. तेच आमचे पहिले बांदा-दर्शन. पुण्यातही आम्ही प्रथमच आलो."


* *

संदर्भ टिपा :

(१) महा छत्र. बुंदेला पृ. १२३, (२) HOM VOL I P. 419, (३) कासंपया ले. ४९६ पृ. ४९९, (४) पेब-कुलकर्णी पृ. १७, (५) P.B.P 108, (६) 'बाजी-मस्ता' पृ. १४-१५, (७) पेद ३० पृ. ३६३ (८) 'लेटर मुघल्स' भा. २ पृ. २९७, (९) पेद १८ ले. १२, (१०) पेद २७ ले ८१, (११) इतिसं मार्च १९०९, (१२) भाव पु. २, (१३) पेद ९ प ३४, (१४) पेद ९ प. ३५, (१५) पेद ९ प. ३०, (१६) पेद ९ प ३२, (१७) पेद ९ प ३, (१८) इतिसं ऐटि भाग २ पृ. १२, (१९) पेद प ३३, (२०) पेद ४५ पृ. ८८, पेद ९ ले ८१ वगैरे, (२१) पेद १८ पृ. ६६, (२२) EXP. of MAR PWR L. No. 155, (२३) पेद ३९ पृ. १७१, (२४) त्रै. १३:४ ले. २०, (२५) राखं २ पृ. १०६, (२६) दुबापेरो ५, पृ. २६ (२७) मदरु ३ प. ४२, (२८) मदरु ३ प. १८०, (२९) मदरु ३ प. ९३, (३०) मदरु ३ प. १३०, (३१) मदरु ३ प १३१, (३२) मदरु ३ प. ९२, (३३) 'मस्ता-बाजी' पृ. ३४, (३४) बुंदेसंइति पृ. २७२, (३५) मदरु ३ पृ. १२३, (३६) भावश पु. २ पृ. १२, (३७) ऐलेसं भा. ५, (३८) गोरे द. इंदूर त्रै. ६:१-४ पृ. १०६, (३९) बुंदेसं पृ. २७६, (४०) ऐलेसं ६४४१, ६४४६, (४१) त्रै. ३२ : १-४, (४२) 'मस्ता-बाजी' पृ. ६८, (४३) मदरु ३, (४४) पेसा ३, (४५) 'मस्ता-बाजी' पृ. ६३, (४६) पेदसप नोंद १०६, (४७) मदरु ३ ले. १३१, (४८) मदरु ३ प १३३, (४९) बुंदेसंइति पृ. २७९, (५०) ऐमसा ले ३१३, मदरु ३ ले २२३, (५१) इससं २ पेअ पृ. १५६, (५२) 'मस्ता-बाजीराव' पृ. १३०, (५३) 'हिमालयात' पृ. ४४ (५४) मस्ता-बाजी पृ. १३२-३३, (५५) कित्ता पृ. १३०-१३२, (५६) 'तारिख-इ-बुंदेलखंड' पृ. १३५, (५७) बुंदे. गॅझे पृ. १३०, (५८) तारिख-इ- बुंदेलखंड पृ. ५२९, (५९) 'मस्ता-बाजी' पृ. १०७, (६०) भावश पु २, (६१) 'मस्ता-बाजी' पृ. १०९-११०, 'संकानेजी' पृ. १६, (६२) कित्ता, पृ. ११२-११३, (६३) कित्ता पृ. ११६-११७, (६४) कित्ता पृ. १२५, (६५) कित्ता पृ. १२६-२७, (६६) कित्ता पृ. १२८, (६७) बुंदेसंहति पृ. २४२, (६८) भाव पु २, (६९) 'मनोहर' साप्ताहिक दि. २५-२-१९८४.



▲ बाजीराव बल्लाळ पेशवे समाधी, रावेरखेडी



▲ रावेर गावाच्या बाजूने दिसणारा समाधीच्या तटबंदीचा दर्शनी भाग



◄ सौ. काशीबाईंनी रावेरखेडी - नर्मदा तीरी बांधवलेले श्रीरामेश्वर मंदिर




▲ रावेरखेडी येथील थोरले बाजीरावांचा राहता वाडा

▶


बाळाजी बाजीराव पेशवे





◀

सौ. राधाबाई पेशवे



▲ शनिवार वाडा. मूळ चौथऱ्यांवर उभारलेल्या आंग्लकालीन वास्तुंसह फोटो




▲ गणेश दरवाजा, शनिवारवाडा




▲ हजारी कारंजे, शनिवारवाडा



▲ नगारखाना, आतील बाजू



▲ डावीकडून : मल्हारराव होळकर, थोरले बाजीराव



▲ थोरले समशेरबहादूर



◄ रघुनाथ बाजीराव पेशवे



मस्तानी, मेणवली दप्तर




थोरले अलीबहाद्दर



◀ मस्तानीची मशीद, पाबळ



▲ थोरले बाजीराव निर्मित छत्रसाल बुंदेला यांची अपूर्ण छत्री



▲ पानिपत युद्धभूमीवरील 'काला आम' जागेवरील ब्रिटिशकालीन स्मारक स्तंभ. भाऊसाहेब पेशवे येथेच पडले असे म्हणतात.

माधवराव बल्लाळ पेशवे







नारायणराव बल्लाळ पेशवे



▲ डावीकडून : नाना फडणीस, सवाई माधवराव, महादजी शिंदे



▲ सवाई माधवराव शिकार करताना,



▲ विश्रामबागवाडा, पुणे



गं. भा. बयाबाई आपटे



सौ. बयाबाई आपटे

दुसरे अलीबहाद्दर






रावसाहेब पेशवे




▲ दु. नानासाहेबांच्या बिठूरच्या राहत्या वाड्याचे भग्नावशेष



▲ दु. नानसाहेबांचे वास्तव्य स्थान (मार्च १८५८) गव्हर्नमेन्ट कॉलेज, बरेली.




▲ बाजीराव रघुनाथ पेशवे



'बिठूरचे गंगा मंदिर'

राजवाड्याप्रमाणेच या मंदिराचा विध्वंस करण्यात आला. हे मंदिर बाजीराव पेशव्यांनी बांधले होते. उजव्या बाजूला 'पेशवे मंदिर' दिसत असून डाव्या बाजूला आता एक धर्मशाळा आहे.



पेशव्यांच्या बिठूर येथील राजवाड्याचे भग्न अवशेषांचे दुसरे चित्र




◀ पेशव्यांचा शिलालेख, नेपाळ



▲ देशमुखी वाड्याचा चौथरा, श्रीवर्धन

लक्ष्मणराव थत्ते







लक्ष्मीनारायण मूर्ती, नेपाळ




▲ लक्ष्मीनारायण मंदिर उजवीकडून फोटो



▲ पुष्करणी, मंदिराच्या उजवीकडे



▲ देशमुखी वाड्याच्या चौथऱ्यावर अलिकडे बांधलेली वास्तु, श्रीवर्धन



▲ मस्तानीची कबर, पाबळ



विनायकराव रघुनाथ पेशवे



अमृतराव रघुनाथ पेशवे


दुसरे नानासाहेब पेशवे






‘वसईचा तह’ झालेली वास्तु, वसई.

▶ श्रीदेवदेवेश्वर मंदिराचे महाद्वार, पर्वती पुणे.





◀ विश्रामबागवाडा पुणे, दर्शनी मेघडंबरी.




▲ श्रीदेवदेवश्वर पर्वती पुणे.

श्रीरमणागणपती, पर्वती पायथा पुणे. ▼




श्रीमंत नानासाहेब पेशवे
ह्यांचे मृत्युस्थान
पर्वती पुणे.




श्रीमंत नानसाहेबांच्या
मृत्युस्थानाच्या पिछाडीचे
पेशवेकालीन चाफ्याचे झाड






थो. माधवराव - रमाबाई पेशवे
ह्यांची समाधी, थेऊर.




थो. चिमाजीआप्पा - अन्नपूर्णाबाई पेशवे ह्यांची समाधी, औंकारेश्वर, पुणे.



▲ श्रीमंत नानासाहेब पेशवे समाधी, लकडीपूल पुणे.




▲ श्रीमंत नारायणराव पेशवे समाधी, लकडीपूल पुणे.



◀ लाल कळस
गणेश मंदिर,
नयाघाट वाराणसी.



▲ अन्नछत्र व शिवालयांचे स्थान, राजाघाट वाराणसी.



▶ श्रीकालभैरव हरिहरेश्वर



▶ श्रीलक्ष्मीनारायण, अन्नछत्रस्थ, वाराणसी.




श्रीसिद्धीविनायक,
राजाघाट वाराणसी.




श्रीअन्नपूर्णादेवी,
अन्नछत्र, वाराणसी.




श्रीलक्ष्मीनारायण श्रीवर्धन.




श्रीगणपती, वाराणसी.



◀ अमृत विनायक मंदीर:
गाभारा व सभामंडप,
वाराणसी



▲ सदाशिवराव (भाऊसाहेब) पेशवे



▲ रघुनाथ बाजीराव पेशवे



▲ सवाई माधवराव पेशवे.

प्रकरण नववे

' सत्तावनी ' नंतरची हकीगत

प्रास्ताविक

' १८५७ ' नंतर पेशवा घराण्याचा ऐतिहासिक संदर्भ संपतो. त्या उठावाच्या गदारोळात दुसऱ्या बाजीरावांची शाखा अस्तंगत झाली. धाकट्या चिमाजी-आप्पांच्या मुलीकडून (गं. भा. द्वारकाबाई थत्ते) जो विस्तार होता, त्यापैकी द्वारकाबाईंचे एक नातू (कै.) लक्ष्मणराव चिमणाजी थत्ते यांना गं. भा. सईबाई-साहेब पेशव्यांनी वाराणसीहून नेपाळात बोलावून १८८१ साली दत्तक घेतले होते. परंतु त्या मंडळींनी ' थत्ते ' आडनावच कायम ठेवले. श्रीमंत अमृतराव साहेब पेशवा ह्यांचे दत्तक नातू श्रीमंत राजा माधवराव साहेब – ज्यांनी बालपणापासून ' १८५७ ' मधील वनवासाचा भरपूर अनुभव घेतला होता ते – मार्च सन १९१३ पर्यंत हयात होते.*

दुसऱ्या बाजीरावांच्या दहाव्या पत्नी गं. भा. सईबाईसाहेब १८९६ साली वारल्यानंतर नेपाळमध्ये पेशवा परिवारापैकी कोणीही राहिले नाही. त्या वेळी ' पेशवा ' घराण्यापैकी फक्त राजा माधवराव पेशवा आणि त्यांचे कुटुंबीय बास-बरेली येथे राहात होते.

एकमेव हयात वारस म्हणून इंग्रज सरकारने पेशव्यांच्या नेपाळमधील संपत्ती – व्यवस्थेसंबंधी वारसा – हक्काबद्दल राजा माधवरावांकडे विचारणा व

---

* अव्वल पेशवाईच्या अखेरच्या वारस श्रीमंत गं. भा. बयाबाईसाहेब आपटे, ह्या बाजीराव कन्येच्या निधनानंतर (१९ जून, सन १९१७) पेशव्यांचा जनक वंश-विस्तार संपल्याच्या निमित्ताने श्रीमंत अमृतराव साहेब पेशव्यांचे दत्तक नातू श्रीमंत राजा माधवराव साहेब ह्यांच्या शाखेची त्रोटक परिचयवजा माहिती इतिहास संशोधक पां. न. पटवर्धन यांनी ' केसरी ' वृत्तपत्राच्या ११ सप्टेंबर, सन १९१७ च्या अंकात ' पेशवे घराण्याची एक शाखा ' या लेखात दिली आहे. इतिहासात भर पडण्यासारखी माहिती त्यात नाही. १९१७ सालच्या पारिवारिक स्थितीची वाचकांना तोंडओळख करून द्यावी इतकाच त्या लेखाचा माफक उद्देश दिसतो. म्हणून तो लेख या ग्रंथात घेतला नाही.

पत्रव्यवहार केला होता. नेपाळमधील संपत्ती व स्थावर मालमत्तेविषयी स्वारस्य दाखवल्यास, कदाचित '१८५७' नंतर इंग्रजांकडून व्यवस्थितपणे दरसाल मिळणाऱ्या ठेवींच्या व्याज रकमेवर विपरीत परिणाम होईल, हे निमित्त करून इंग्रजांनी नवीन काही पळवाट काढल्यास उठावानंतर मिळणाऱ्या कौटुंबिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होईल, नवीन समस्या निर्माण होतील, यापेक्षा आहे हीच व्यवस्था ठीक आहे. 'नेपाळ प्रकारणा'त लक्ष न घालणे अधिक श्रेयस्कर आहे, असा विचार करून राजा माधवरावांनी त्याबद्दल काहीही स्वारस्य दाखवले नाही असे पेशवा कुटुंबियांकडून समजले.

राजा माधवराव साहेबांच्या वंशजांची आजमितीपर्यंतची पारिवारिक माहिती येथे दिली आहे. पेशवा घराण्यापैकी ही एकच शाखा आज विद्यमान आहे. राजा माधवरावसाहेबांना दोन मुलगे होते. १. कृष्णराव बाळासाहेब, २. सदाशिवराव बाबासाहेब.

व्यक्ति-परिचय

कृष्णराव माधव : (११) यांचा जन्म बहुदा १८६५ सालचा असावा. बाळासाहेब या नावाने विशेष परिचित होते. यांनी संस्कृत वेदाध्ययन पूर्ण केले होते. इंदूरच्या 'प्रिन्स कॉलेज' मधून बी. ए. झाले होते. बाळासाहेब व त्यांचे धाकटे बंधू बाबासाहेब वडिलांच्या हयातीतच बास बरेली येथील पेशवा वास्तूच्या आवारात असलेल्या दोन स्वतंत्र वाड्यांमध्ये विभक्त राहात असत. उभयतांकडे कुलाचारही स्वतंत्रपणे होत असत.

मृत्यूच्या वेळी बाळासाहेबांचे वय सुमारे ४१–४२ वर्षांचे होते. बाळासाहेब १६ नोव्हेंबर, सन १९०७ रोजी शनिवारी (तुळशीचे लग्न) (प्लवंगनाम संवत्सर, कार्तिक शुद्ध १२, शके १८२९) बरेली येथेच वारले. **पत्नी** : रमाबाई. हे सासरचे नाव. 'गिरिजाबाई मळेकरांची कन्या बनुबाई Daughter given in marriage to Balasaheb Malekar' अशी य. न. केळकर (इतिहास संशोधक) यांचेकडील नोंद मिळाली. नोंद कुठून उपलब्ध झाली याचा खुलासा मिळाला नाही. मात्र नोंदीवरून त्यांचे माहेरचे नाव बनुबाई असल्याचे समजते.

रमाबाईंचा जन्म १८७० साली झाला. 'बाईसाहेब' या नावाने त्यांचा उल्लेख होत असे. सुखवस्तु गृहिणी. स्वभावाने मानी, जिद्दी व करारी होत्या. माहेरच्या घराण्याचा त्यांना फार अभिमान होता.

रमाबाईंच्या आई सौ. गिरिजाबाई या श्रीमंत लक्ष्मणराव अण्णासाहेब पटवर्धन मिरजकर यांच्या पत्नी व त्यांचे चिरंजीव हरिहरराव दादा, असे ३० जानेवारी सन १८६० च्या 'ज्ञानप्रकाश'मधील एका बातमीवरून समजते. यावरून

रमाबाईंचे आई - वडिलांची नावे समजतात. हे पटवर्धन ' मिरज ज्युनियर'चे. ' मळेकर ' या नावानेही ओळखले जात. पुण्यात नागनाथपाराजवळ (सदाशिव पेठ) यांचा वाडा होता. तो ' मळेकरांचा वाडा ' म्हणून ओळखला जाई.

रमाबाईंचे वास्तव्य प्रामुख्याने बासबरेली येथे असे. राजा माधवरावांच्या पश्चात (सन १९१३ नंतर) पेशवा परिवारावरील इंग्रजांची बंधने हळूहळू शिथिल झाली. त्यानंतर साधारणत: १९२० सालानंतर रमाबाई माहेरी येण्याच्या निमित्ताने पुणे–बुधगाव इकडे येऊ लागल्या.

उत्तरेकडचा उन्हाळा सोसत नसे म्हणून, त्या दरसाल पुण्यात तीन महिने येऊन राहात. ' मळेकरांच्या वाड्या 'त त्यांचा मुक्काम असे. सहाजिकच या परिवाराचे पुण्याशी दळणवळण १९२० सालापासून वाढत्या प्रमाणावर सुरू झाले.

रमाबाई आपण होऊन कोणाच्या घरी जात नसत. उलटपक्षी तत्कालीन ब्रिटिश कलेक्टर आणि रेव्हेन्यु कमिशनर यांच्या पत्नी दर महिन्यातून एकदा रमाबाईंना भेटून त्यांची विचारपूस करण्यासाठी वाड्यावर येत असत.

रमाबाई १४ जानेवारी सन १९३० रोजी मंगळवारी (शुक्लनाम संवत्सर, पौष शु. १५ शके १८५१) वारल्या. **मुली** : (१) छबुताई. सासरचे नाव पार्वतीबाई. सुखवस्तु गृहिणी. विवाहापूर्वी वास्तव्य बासबरेली, नंतर कुरुंदवाड. या अंदाजे १९६३ साली वारल्या. पती विनायकराव पटवर्धन, वाडीकर.

(२) ठकूताई. सासरचे नाव लक्ष्मीबाई. सुखवस्तु गृहिणी. विवाहापूर्वी वास्तव्य बासबरेली, नंतर बुधगाव. या अंदाजे १९७७ साली वारल्या. पती बाबा साहेब ऊर्फ माधवराव हरिहरराव पटवर्धन, संस्थानाधिपती मिरज ज्युनियर.

विनायक कृष्णराव : (१२) यांचा जन्म उपलब्ध माहितीनुसार १८९१ सालचा असावा. बापूसाहेब या नावाने विशेष परिचीत होते. बालपणापासून वास्तव्य बासबरेलीला असे. द्वितीय विवाह झाल्यानंतर प्रारंभी काही वर्षे तिथेच राहात. काही कारणाने द्वितीय पत्नी मालतीबाई यांचे आपल्या सासुबाई गं. भा. रमाबाई ह्यांच्याशी पटेनासे झाले. त्यामुळे सौ. मालतीबाई बासबरेली सोडून माहेरी कुरुंदवाडला राहू लागल्या. काही वर्षांनी बापूसाहेबही कुरुंदवाडला सासरी राहू लागले. पुढे ते आजारी पडले व कुरुंदवाड येथेच, २२ वर्षांचे वय असताना १४ ऑक्टोबर सन १९१३ रोजी मंगळवारी (प्रमादिनाम संवत्सर, आश्विन शु. १४, शके १८३५) वारले.

पत्नी : (१) माहेरचे नाव मैना. या लवकर वारल्या. पिता बळवंतराव नारायण साठे, व्य. इंजिनियर. (हुंडीवाले साठे, देवरुख शाखा) ' साठे कुलवृत्तांता 'त बासबरेली ऐवजी चुकून रायबरेली असे छापले आहे.

पत्नी : (२) मालतीबाई. बापूसाहेबांचे पश्चात ८–१० वर्षे त्या हयात होत्या. माहेरी कुरुंदवाडलाच त्यांचे निधन झाले. पिता नानासाहेब ऊर्फ विनायकराव हरिहरराव पटवर्धन. संस्थानाधिपती कुरुंदवाड ज्युनियर. **मुलगी** : मालतीबाईंना एक मुलगी झाली होती पण ती लवकर वारली.

विश्वनाथ कृष्णराव : (१२) यांचा जन्म १९०५ साली झाला. राजासाहेब या नावाने हे विशेष परिचीत होते. आग्रा विद्यापीठातून बी. ए. (इंग्लिश) झाले होते. संगीताची विशेष आवड होती. अभ्यासही केला होता. टेनिस, बिलिअर्ड या खेळांची आवड होती. सुखवस्तु. स्वभाव मनमिळावू व उदार असे. सुरुवातीपासून वयाच्या ३० व्या वर्षापर्यंत प्रामुख्याने बासबरेलीला राहात. त्या काळात कारणपरत्वे पुण्याला येत. पुढे १९३६ सालापासून पुण्यात स्थायिक झाले. नंतर बासबरेलीला जाऊन येऊन वास्तव्य असे.

रियासतकार गो. स. सरदेसाईंना यांनीच श्रीमंत अमृतरावांच्या शाखेची '१८५७' नंतरची माहिती दिली होती. राजासाहेब ९ एप्रिल सन १९५१ रोजी सोमवारी (खरनाम संवत्सर, चैत्र शु. ३, शके १८७३) पुण्यात निधन पावले.

पत्नी : अन्नपूर्णाबाई. माहेरचे नाव कुसूम (गौरी). यांचा जन्म १९११ साली झाला. सुखवस्तू गृहिणी. यांना संगीताची आवड होती. विवाहपूर्व काळात वास्तव्य सागर येथे असे. विवाहानंतर वास्तव्य बासबरेली येथे. नंतर पुण्यात असे या जानेवारी सन १९५० मध्ये (पौष नवमी) घरगुती अपघाताने वारल्या. पिता विश्वासराव गोविंद भावे, व्य. सामाजिक कार्यकर्ते. इंडियन नॅशनल काँग्रेसचे कार्यकर्ते, रा. सागर.

श्री. भावे काँग्रेसचे क्रियाशील कार्यकर्ते असल्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश पोलिसांची परिवारावर सक्त नजर असे. त्यामुळे गंभीर वातावरणात हा विवाह पार पडला होता.

मुली : (१) सरोजिनी. जन्म सन १९२५. शिक्षण मॅट्रिक्युलेशन. पती (कै.) श्री. भय्यासाहेब ऊर्फ मंगलमूर्ती विनायक पटवर्धन, रा. तासगाव वा. पुणे, (२) रत्नमाला, ज. सन १९३५ सुमारे ६ महिने इतके वय असताना वाराणसी मुक्कामी वारल्या.

कृष्णराव विश्वनाथ : (१३) यांचा जन्म १९२७ साली झाला. प्रतापसिंह हे टोपणनाव. रावसाहेब या नावानेच विशेष परिचीत आहेत. पुणे विद्यापीठाची एम. एस्सी. (भूशास्त्र) ही पदवी १९५७ साली मिळवली. त्यानंतर 'जेमॉलॉजिकल इन्स्टिटयूट ऑफ इंडिया' आणि जेमॉलॉजिकल असोसिएशन ऑफ ग्रेट ब्रिटन' या संस्थांच्या रत्नशास्त्राच्या पदविका मिळवल्या.

रत्नांची पारख करण्याचा मोठा अनुभव आहे. तसेच कोळशांच्या खाणीतील जबाबदारीच्या कामांचा १५ वर्षांचा अनुभव आहे. ‘ नॅशनल कोल डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन ’ आणि ‘ भारतीय भू-वैज्ञानिक सर्वेक्षेण संस्था ’ येथे नोकरी करीत असत.

बालपणी वास्तव्य बासबरेली येथे. नंतर पुण्यात वास्तव्य. नोकरीनिमित्त रांची, नागपूर, लखनौ येथे वास्तव्य. तसेच बिहार, आसाम, बंगाल, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा या राज्यांत फिरावे लागले.

निवृत्तिनंतर पुण्यात वास्तव्य. सन १९८३–८५ दरम्यान अभियांत्रिकी विद्यापीठात (ज्ञानेश्वर विद्यापीठ) प्राध्यापक. सध्या (सन १९९१) ‘ व्होकेशनल गायडन्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट ’ मध्ये व्हिजिटिंग प्राध्यापक. या संस्थेमार्फत चालवल्या जाणाऱ्या रत्नशास्त्रविषयक अभ्यासक्रमाचे संयोजक व तज्ञ. सन १९८८ पासून ‘ महाराष्ट्र चित्पावन संघ ’, पुणे च्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व विश्वस्त.

पत्नी : रमा. माहेरचे नाव उषा. यांचा जन्म १९३७ साली झाला. सुप्रसिद्ध मराठी कादंबरीकार (कै.) हरी नारायण आपटे हे यांचे सख्खे चुलते होत. सुखवस्तू गृहिणी. शि. एस्. एन्. डी. टी. विद्यापीठाची बी. ए (मराठी) पदवी आणि महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेची हिंदी प्रवीण परीक्षा. बी. ए. परीक्षा १९८३ साली दिली. पिता दत्तात्रय नारायण आपटे, रा. पुणे.

मुलगी : मोहिनी. जन्म सन १९६०. शि. बी. एस्सी (होमसायन्स). प्रारंभी वास्तव्य नागपूर, रांची, नंतर पुणे. पती प्रकाश नारायण करकरे व्य. व्यापारी जहाज कंपनीत हल्ली (सन १९९१) कॅप्टन हुद्याचे अधिकारी.

विश्वनाथ कृष्णराव : (१४) जन्म सन १९६३. प्रचलित नाव महेंद्रसिंह, शि. ए. एम्. आय्. ई. (मेकॅनिकल), एम्. बी. ए.. व्य. पुण्यात ‘ किर्लोस्कर न्युमॅटिक कंपनी ’त इंजिनियर,

पत्नी : सुचेता, जन्म १९६५ साली मुंबईत. शिक्षण बी. एस्सी (होम-सायन्स), माहेरचे नाव सुचेता. पिता मनोहर रामचंद्र दीक्षित, वा. मुंबई.

विनायक विश्वनाथ : (१३) यांचा जन्म १९३९ साली झाला. उदयसिंह या नावाने परिचीत आहेत. १९६२ साली पुणे विद्यापीठाची एम्. एस्सी. (भू-शास्त्र) पदवी मिळवली. १९७५ साली नेदरलंडस्‌ची एम्. एस्सी (रिमोट सेन्सींग) पदवी मिळवली. १९७२ साली डेहराडूनहून डी. पी. आय्. (डिप्लोमा इन् फोटो जिओलॉजी) पदविका मिळवली. १९७७ साली पुणे विद्यापीठाची पीएच्. डी. (डॉक्टरेट) मिळवली.

पुणे विद्यापीठात भूशास्त्राचे प्राध्यापक. पीएच्. डी. साठी पुणे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त गाईड. पुण्याच्या 'श्रीदेवदेवेश्वर संस्थान पर्वती व कोथरूड' चे १९६७ सालपासून एक विश्वस्त. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, आणि महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभा पुणे, या संस्थांचे पदाधिकारी होते.

निरनिराळ्या देशी, विदेशी मासिकांमधून सन १९८३ अखेर अभ्यास विषयातील ५१ लेख प्रसिद्ध. शिक्षणानिमित्त वास्तव्य डेहराडून, हॉलंड. स्थायिक वास्तव्य पुणे. व्याख्याने देण्याच्या निमित्ताने अनेकदा परदेश प्रवास केला.

पत्नी : सरस्वती. माहेरचे जयमंगला हेच नाव विशेष प्रचलित. यांचा जन्म १९४२ साली झाला. १९७८ साली पुणे विद्यापीठाची एम्. ए. पदवी मिळवली. 'ऐतिहासिक मराठी कादंबरी' या विषयावर पुणे विद्यापीठाच्या एम्. फिल्. / पी. एच्. डी. साठी गेली काही वर्षे अभ्यास चालू. पिता अप्पासाहेब पंतप्रतिनिधी विशाळगड, रा. कोल्हापूर, संस्थानिक. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मनीलेंडर्स खात्यात २५ वर्षे अधिकारीपदावर नोकरी. वास्तव्य इंग्लंड, गोवा, पुणे.

मुली : (१) शुभदागौरी. जन्म स. १९६४ शि. एम्. ए. (मानसशास्त्र) पती नितिन दत्तात्रय अत्रे रा. पुणे. व्य. कॉम्प्युटर सर्व्हिसेस, इंटिरिअर डेकोरेशन सर्व्हिसेस. (२) सुपर्णा. जन्म सन १९६८. शिक्षण एम्. ए. (जर्मन) जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून (नवी दिल्ली) एम्. फिल (जर्मन) पुढील शिक्षणासाठी सध्या वास्तव्य जर्मनीमध्ये. स्थायिक वा. पुणे.

रघुनाथ विनायक : (१४) जन्म सन १९७५. प्रचलित नाव पुष्कर. महाविद्यालयीन विद्यार्थी.

सदाशिव माधव : (११) यांचा जन्म १८६८ साली झाला असावा. बाबासाहेब या नावाने विशेष परिचीत होते. यांचे शिक्षण मॅट्रिक्युलेशनपर्यंत झाले होते. वास्तव्य बासबरेली येथे असे. वास्तुच्या आवारात वाड्यांमध्ये विभक्त राहात असत. बाबासाहेब २२ ऑक्टोबर सन १९१६ रोजी रविवारी (अनलनाम संवत्सर आश्विन वद्य ११, शके १८३८) बासबरेली येथे वारले.

पत्नी : पार्वतीबाई. या बरीच वर्षे बरेलीलाच राहात असत. १९५० साली बासबरेली येथेच त्यांचे निधन झाले. पिता बापूशास्त्री ऊर्फ नरहरी सीताराम देव. हे जुन्या काळातील प्रकांड पंडीत आणि वाराणसी येथील प्रख्यात ज्योतिषी होते. राजा माधवराव पेशवा यांचे शिक्षक होते. राजा माधवराव इंग्रजांचे राजबंदी आणि गैरमर्जीतील असल्यामुळे त्यांच्या मुलांची लग्ने व्हायला अडचणी येऊ लागल्या. हे पाहून बापूशास्त्रींनी हिंमत दाखवून बाबासाहेबांना जावई करून घेतले अशी जुनी आख्यायिका आहे.

मुलगी : ही लहान वयातच वारली. वयाने बंधू रघुनाथरावांपेक्षा लहान.

रघुनाथ सदाशिव : (१२) यांचा जन्म १९०० साली झाला. तात्यासाहेब या नावाने विशेष परिचीत होते. बरेचसे वास्तव्य बासबरेली येथेच असे. यांचे शिक्षण मॅट्रिक्युलेशनपर्यंत झाले होते. इंग्रज सरकारने स्थलांतराची परवानगी दिल्यानंतर १९२५–२६ सालपासून पुण्यात येऊ लागले. त्या वेळी सदाशिव पेठ हौदाजवळ विंचूरकरांच्या वाड्यात राहात असत. १९२६ साली पुण्यात स्थायिक झाले. काही दुखण्यामुळे हे २९ नोव्हेंबर सन १९३२ रोजी मंगळवारी (अंगिरस नाम संवत्सर, मार्गशीर्ष शु. २, शके १८५४) वारले.

पत्नी : कमलिनीबाई. माहेरचे नाव इंदिरा यांचा जन्म १९०९ साली झाला. सुखवस्तू गृहिणी. यांचे १९७३ साली पुण्यात निधन झाले. पिता विनायकराव गणेश पटवर्धन, रा. तासगाव.

मुलगी : प्रभावती. या १–१॥ वर्षाच्या असताना १९२७ साली वारल्या.

विश्वास रघुनाथ : (१३) यांचा जन्म अंदाजे १९२३–२४ साली झाला. सुमारे २ वर्षांचे असताना वारले.

❋ ❋

प्रकरण दहावे

संकीर्ण उतारे

पेशवा घराणे, घराण्यातील व्यक्ती, पेशवाई यासंबंधी उपयुक्त परंतु व्यक्ती-परिचयात्मक रचनापद्धतीमध्ये त्या त्या ठिकाणी न देता येणारी माहिती येथे संदर्भासह एकत्र दिली आहे.

१. पेशवा पदाचे स्वरूप

पेशव्यांकडे सर्व फौजेचा व मुलखाचा बंदोबस्त करून दुसरे दरकदार व प्रधान यांना घेऊन राज्यकारभार चालवण्याचे मुख्य काम होते. राजपत्रावर पहिला शिक्का पेशव्यांचा होई. छत्रपती पेशव्यांना पत्र लिहिताना शेवटी 'बहुत काय लिहीणे सूज्ञ असा' हे वाक्य स्वहस्ते लिहीत. पेशवा पदाची वस्त्रे व अलंकार पुढीलप्रमाणे असत :– मंदील, जामेवार, पटका, चादर बादली, किनखाप, एकूण पाच वस्त्रे, शिक्के कटचार, तलवार, ढाल, जरीपटका, चौघडा, तीन हत्ती व एक घोडा, शिरपेच, मोत्याची कंठी व तुरा आणि चौवडा, झगा, सोन्याच्या दांडीची चवरी.[१]

पेशवे दिल्लीच्या बादशहाचे सुभेदार, छत्रपतींचे प्रधान व आपल्या स्वतःच्या राज्यापुरते मालक होते. हे तीन विजातीय संबंध एके ठिकाणी असल्यामुळे त्या व्यक्तींचे म्हणजे पेशव्यांचे राजतंत्र बरेच बिकट व नाजूक झाले होते. बादशहाच्या नोकरांशी म्हणजे सुरत, जंजिरा, सावनूर, अर्काट वगैरे संस्थानांच्या नवाबांशी दोस्त सरकार या नात्याने त्यास वागावे लागे. निजामाशी पेशव्यांचा संबंध त्याहून अधिक निकट होता. चौथाई, सरदेशमुखी वसुलीमुळे पेशवाई व मोगलाईचे नफा-नुकसान एकच असे. स्वाभाविकच हर्षामहर्षाचे प्रसंग वारंवार येत.[२]

याखेरीज राज्यात पेशव्यांहून वरीष्ठ अशी दोन संस्थाने होती. त्यापैकी पहिले सातारकर छत्रपतींचे संस्थान पूर्णपणे त्यांच्या ताब्यात होते. दुसरे करवीर संस्थान कोणासही खंडणी देण्यास पात्र नसून स्वतःपुरते स्वतंत्र व पृथक होते. इतके असूनही त्यांचा शिवशाहीमध्ये अंतर्भाव होत असे.[२]

त्याखालचा दर्जा नागपूरकर व अक्कलकोटकर भोसले, गायकवाड, प्रतिनिधी सचीव, आंग्रे, वाडीकर सावंत, इत्यादि संस्थानिकांचा होता. ते पेशव्यांच्या

बरोबरीचे असून, त्यांनी राज्यात फंदफितूरी केली नाही तोपर्यंत त्यांच्या संस्थानात ढवळाढवळ करण्याचा पेशव्यांना अधिकार नव्हता. ह्या सर्वांचा सांभाळ होऊन त्यांचे उर्जित व्हावे व परस्परात कलह होऊन रयतेची पायमल्ली न व्हावी व रयत निर्भय व संतुष्ट रहावी म्हणून शाहू शहाराजांनी मराठी साम्राज्य 'शिवस्व' म्हणून पेशव्यांच्या हवाली केले. मात्र, 'धड ना धनी, धड ना नोकर' अशी पेशव्यांची स्थिती होती. शाहू महाराजांच्या सनदेने मराठी राज्यात आपआपल्या क्षेत्रापुरते असंख्य 'पेशवे' निर्माण झाले. पूर्वीचे सर्व सरंजाम व तैनाती अधिकार यांना मिरासदारीचा हक्क मिळाला. हा हक्क पेशव्यांच्या कार्यक्षमतेच्या आड येऊ लागला. उदाहरणार्थ, महादाजी शिंद्यांनी दिल्लीपतीच्या दौलतीतून पलटणे तयार केली. ते काम तो मराठी दौलतीतून करू जाता तर मिरासदारांनी उलट त्याचेच उच्चाटन केले असते.[२] ! !

(संदर्भ :– १. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश', विभाग १७, पृ. १८२. २. 'इचलकरंजी संस्थानाचा इतिहास', प्रस्तावना पृ. ९४)

२. पेशव्यांना पुणे इनाम

पेशवे सुपे, सासवड येथे रहात होते. तथापि मध्यवर्ती राजधानीची गरज सर्वांना दिसत होती. तेव्हा शाहूने आपण होऊन 'तुम्ही आपल्यास रहावयास जागा पेशवाईचे कारभाराजोगी, मध्यदेशी पाहून, तेथे वाडा बांधून शहर वसवून तयार करावी.' (पेशवे बखर आ. ५ वी पृ. २१) अशी बाजीरावास आज्ञा केली. यासाठी पुणे कसबा बाजीरावास वंशपरंपरेने इनाम म्हणून दिला.

'राजश्री बाजीराव बल्लाळ यासी कसबे पुणें प्रांत मजकूर हा गांव पेशजीच्या मुकाशाकडून दूर करून हाली स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा देखील इनाम, तिजाई वंशपरंपरेने इनाम देहे १ एकूण सनदा चैत्र शुद्ध दशमी गुरुवासर उपनाम भट गोत्र गार्ग्य शाखा आश्वलायन' (३१ मार्च सन १७२६)

(संदर्भ : 'शाहू रोजनिशी' पृ. ४७ नोंद १०६).

३. मस्तानी

मस्तानी ही थोरल्या बाजीरावांची मुसलमान रक्षा. राजा छत्रसाल बुंदेला यांच्या दरबारातून ही बाजीरावांना मिळाली अशी आख्यायिका आहे. असेही सांगतात की, महम्मदशाह बंगशचा पराभव केल्यानंतर छत्रसाल व बाजीराव याची छत्रसालांच्या दरबारात भेट झाली त्यावेळी बाजीरावांचे मर्दानी रूप पाहून मस्तानी त्यांच्यावर मोहित झाली. ही अप्रतिम सुंदर असून हिच्यामुळे बाजीराव प्रेमांध व विलासी बनले, असा दोषारोप केला जातो. रूपयौवननृत्यगायनादि रूपसंपन्न अशी ही कंचनी सन १७२९ चे एप्रिल-मे महिन्यात बाजीरावाला प्राप्त झाली असावी.

पुण्यात ११ जानेवारी सन १७३० रोजी नानासाहेब पेशव्यांचे लग्न झाले त्यावेळी 'मस्तान-कलावंत' हिला व तिच्या साजिंद्यांना पोषाख दिल्याचा खर्च आहे. (पे. द. ३०-३६३) यावरून बाजीराव मस्तानी किमान अकरा वर्षे एकमेकांच्या सहवासात होते. मस्तानी मुसलमान बीजाची, एवढ्यावरूनच ती मुसलमान गणली गेली. बाजीरावांकडे ती आली तेव्हा १४-१५ वर्षांची असेल. पुढे ती पुण्याला ब्राह्मणी घरात, ब्राह्मण पतीजवळ एकनिष्ठेने राहिली. भाषा, पेहराव अन्नादि व्यवहार तिने ब्राह्मणांचेच स्वीकारले. पेशव्यांचे वाड्यात वार्षिक गणपती उत्सवात तिचे नृत्य-गायन होई. तेव्हा खूप गर्दी जमत असे. ती संस्कृतीने हिंदू बनली होती.

'तारीख – इ – महम्मदशाही'त (भाग १, पृ. ४१३) विधान आहे की, 'मस्तानी कंचनी असून ती आश्वारोहणात विशेष कुशल होती. बाजीरावांप्रमाणेच तलवार- भाला घेऊन ती त्याजबरोबर भरधाव घोडदौड करी, त्या तीव्र वेगात उभयतांच्या रिकीबी यत्किंचित मागेपुढे होत नसत. मोहिमात ती बाजीरावांबरोबर हजर असे. या कसबाने व आपल्या मोहक लावण्याने बाजीरावांचे चित्त तिने आकर्षून घेतले. शनिवारवाड्यात तिच्याकरिता स्वतंत्र जागा बांधली. त्याला 'मस्तानी महाल' व त्या बाजूच्या दरवाजाला 'मस्तानी दरवाजा' असे नाव होते. हळूहळू बाजीरावांसही मद्यमांस सेवनाची गोडी लागून उत्तरोत्तर त्या गोष्टीचा बभ्रा बाहेर वाढत गेला. मस्तानीच्या संसर्गाने बाजीरावाला हे विचार सुचले असा समज पसरला.

काशीबाई बरीचशी आजारी असल्यामुळे आपले वैगुण्य समजून वागली. दोघीही समंजस व एकमेकींना सांभाळून घेणाऱ्या दिसतात. धर्माच्या दृष्टीने मात्र एक हिंदू व एक मुसलमान हा भेद नष्ट होणे शक्य नव्हते. बाजीराव पेशव्याच्या कर्तबगारीने परमोच्च बिंदू गाठला, त्याला वैगुण्य म्हणूनच की काय, हे प्रकरण अनावर झाले. प्रायश्चित घ्यायला बाजीरावांची तयारी होती पण मस्तानीला सोडून द्यायची मुळीच तयारी नव्हती. उलट मस्तानी दूर करणे म्हणजे आपला प्राण हिरावून घेणे असाच आशय त्याने प्रगट केला. बाजीराव मस्तानीला सोडण्यास कबूल नाही तर तिला आपणच जबरदस्तीने दूर करावी, शक्य तर तिला जगातूनच नाहीशी करावी, असा विचार काही मंडळींचा अल्पकाळ चालला. मस्तानी बाजीरावाला या गोष्टी कळल्या. नानासाहेब पेशव्यांनी तिच्याशी प्रेमभाव दाखवून तिने आपण होऊनच बाजीरावाला सोडून निराळे रहावे असा प्रयत्न केला. पण तो सफल होणे शक्य नव्हते. मग शाहू महाराजांना सर्व हकीगत कळवून मस्तानीला दूर करण्याविषयी परवानगी विचारली पण काही झाले तरी बाजीराव शाहूचा मुख्य पेशवा. त्याला दुखवणे म्हणजे राज्याचे नुकसान व अप्रत्यक्षपणे शाहू महाराजांनाच दुखवण्यासारखे होते.

महाराजांच्या चिटणीसांचा जबाब आला तो असा : ' महाराजांची मर्जी पहाता ते वस्तु त्याजबरोबर न द्यावी, ठेवून घ्यावी, चौकी बसवावी, ऐसी नाही. राऊ यास खट्टे न करावे त्यांचे समाधान राखावे दुर्व्यसनाचा मजकूर त्या वस्तूवर नाही. त्यांच्याच चित्तास पश्चात्ताप होऊन टाकतील तेव्हाच जाईल. तिला अटकाव करून सल्ला तोडू नये ऐसी मर्जी महाराजांची आहे. ' (ता. २१ जानेवारी सन १७४०) महाराजांचा सल्ला दूर विचारांचा व योग्य नव्हता असे कोण म्हणेल ? मस्तानीच्या जीवास अपाय झाला नाही याचे श्रेय महाराजांस दिले पाहिजे. नोव्हेंबर सन १७३९ च्या सुमाराला बाजीराव पाटसला गेला असता, तेथून युक्तीने आपली सुटका करून घेऊन ती २४ नोव्हेंबरला पाटसला बाजीरावांकडे गेली.

त्यानंतर बाजीराव नासिरजंगवरील मोहिमेत असताना चिमाजीआप्पांचे सल्ल्यावरून नानासाहेबांनी २६ जानेवारी सन १७४० ला मस्तानीला युक्तीने पर्वतीच्या बागेत आणून कैद केली. तिथे ती दोन तीन महिने तरी कैदेत होती. दरम्यान बाजीराव मस्तानीचे दळणवळण अंतस्थपणे चालू असून एकमेकांचे नोकर जात येत होते. उभय पक्षांचे हेर व पहारे आपआपल्या कामावर असून सर्व हालचालींची माहिती दोन्ही पक्षांना (बाजीराव–राधाबाई) होती. जनार्दनपंतांची मुंज मार्च सन १७४० मध्ये झाली. त्या वेळी बाजीराव हजर नव्हते. मुंजीनंतर काशीबाई व जनार्दन यांची बाजीरावांकडे रवानगी झाली. २८ एप्रिलला बाजीराव मृत्यू पावला. त्या वेळी ही दोघे रावेरखेडी येथे पोहोचली होती. मस्तानी येथे पोहोचली नव्हती. ती पुण्याला कैदेत होती. तिला सोडवून बाजीरावांकडे पोहोचवावी असा विचार चालू होता. काशीबाईबरोबर तिची रवानगी का झाली नाही ? हे कळत नाही.

बाजीरावाचा मृत्यू नैसर्गिक झाला. उलट मस्तानीचा मृत्यू मात्र मुद्दाम ओढवून आणलेला दिसतो. बाजीरावाच्या मृत्यूचे वर्तमान ऐकताच तिचा प्राण गेला (?), नुसत्या धक्क्याने असा प्रकार कदाचित् होऊ शकेल. पण बाजीरावाच्या जिवंतपणी जर उघड्यावर आपले असे भलतेच हाल होऊ शकले तर त्याच्या पश्चात आपल्याला कोण त्राता राहिला ? असे विचार मनात येऊन तिला जिणे दुःसह वाटून तिने मुद्दाम अपघाती प्रयोग करून घेतला असणे संभवनीय आहे. मात्र यासंबंधी निश्चित माहिती अद्याप मिळत नाही.

पुणे गॅझेटियरमध्ये विधान आहे की, मस्तानीचा मृत्यू शनिवारवाड्यात झाला. तेथून तिला तिच्या इनामाचे गाव पाबळ येथे नेऊन पुरले. कित्येकांचे मते ती पुण्यातून निघून बाजीरावाकडे जात असता, पाबळ येथे तिला त्याच्या मृत्यूची बातमी कळली आणि तिने लगेच प्राण सोडला. याचाच अर्थ तिने सहगमन केले असा लोकवार्तेत उतरला. शिरूरनजीक पाबळ येथे मस्तानीची कबर गावाजवळच आहे. पाबळ

केंदूर, लोणी, ही गावे हिला इनाम होती. बुंदेलखंडात बाजीरावांना मिळालेली जहागीर सन १७८८ पासून 'बांदा संस्थान' या नावाने मस्तानीच्या वंशाकडे चालली. मस्तानीच्या सर्व वंशजांना पेशव्यांचा फार अभिमान वाटत असे.

(संदर्भ : 'मराठी रियासत' खंड ३ स. १९८८.)

४. मस्तानी महालाचे शब्दचित्र

थोरले समशेरबहाद्दर याची मातुश्री तिजनिमित्त स्वतंत्र हवेली क्रिडास्थान केले संसारकृत्याचे नावे चौकटी हवेली तुम्ही पाहिलीच होती चहुकडे चार कोनास चार खोल्या चारी बाजूस चार दालने तीन खणाची याप्रोाच दुसरा मजला तिसरा गची मधील चौक प्रथम खुला च होता अलिकडे तो पाडून माझघर केले चौकाचे खाली जमिनीत उष्णकालाकरिता तहखाना वरील काम दालनांतील होते तसाच होता. चारी दालनातून दोन दोन खिडक्या हवेकरिता होत्या पाणपतानंतर त्यांत जळाऊ लाकडे राहू लागली त्या सिवाय दुसरा तहखाना नवता च.

(संदर्भ : भा. इ. सं. मं. त्रै. ६ : १–४ पृ. १०६).

५. थोरले बाजीराव पेशवे

मुंबई इलाख्याचे (सन १८७७–८२) गव्हर्नर, सर रिचर्ड टेंपल, बाजीरावांबद्दल म्हणतात : 'बाजीरावाच्या हाती राज्यसूत्रे आली, तेव्हा त्याला नानाविध अडचणींशी झगडावे लागले. वडिलांनी केलेला उपक्रम पुढे चालवून त्याला मराठी राज्याची वृद्धी व व्यवस्था करावयाची होती. निरनिराळे सरदार एकमेकांशी विरोध करीत. त्यांच्यात ऐक्य निर्माण करणे, मुसलमानांच्या ताब्यातला प्रदेश सोडवणे आणि हिंदूंची संघटना बनवणे ही महत्त्वाची कामे त्याला सिद्धीस न्यावयाची होती. ऐन वेळेवर ही कामे उरकण्यास बाजीराव पुढे आला. ब्राह्मणाचे विशिष्ट गुण त्याच्या ठिकाणी भरपूर उतरले होते. तो स्वरूपाने भव्य व रुबाबदार, वर्तनाने प्रेमळ, भाषणाने आकर्षक, बुद्धीने कल्पक व तरतरीत आणि संकटात युक्तिबाज असल्यामुळे त्याला लागोलाग यश येत गेले. सुंदर भाषणे करण्याची कला त्यांस चांगली साधल्यामुळे समरांगणावरील विजयानंतर तो आपल्या लोकांस आणखी विजय मिळवण्याचा हुरूप आणी, पराभव झाला असल्यास त्यांच्या मनोवृत्तीत पुन्हा चेव उत्पन्न करी. कामाचा उरक व हिशेब या दोन बाबतींत तो बापाहून कमी असला तरी बापाचे सर्व बेत व उद्योग त्याने जवळ राहून पूर्णपणे हस्तगत केले होते. पण अंगच्या वरील गुणांपलीकडे त्याने बाह्य गुणही पूर्णपणे मिळविले होते. अश्वारोहणाच्या कलेत मराठ्यांचा हात कोणी धरणार नाही, पण ह्या कसबात बाजीराव तर अत्यंत वरचढ होता. युद्धसंग्रामात तो सर्वांपुढे निर्भयपणे ठासून उभा रहात असे. सभोवार बंदुकीच्या

गोळ्यांचा मारा होत असता तो कधी कचरला नाही. कष्ट करण्याची सवय त्याला भरपूर होती. सामान्य शिपायांप्रमाणे प्रत्येक काम तो स्वतः करी आणि त्यांच्याच सारखे सामान्य अन्न खाण्यात आनंद मानी. त्याचे स्वार लांब लांब मजला मारीत तेव्हा घोड्यावरच पिशवीत भाजलेले चणे घेऊन ते खात खात दौड करीत, तशाच प्रकारचे फाके मारीत बाजीरावही प्रवास करी. त्याचा स्वराष्ट्राभिमान जबरदस्त असून त्याच्यापुढे कोणतीही अडचण तो जुमानीत नसे. ब्राह्मणांचे सोवळे–ओवळे व जातीचा कर्मठपणा मात्र बाजीरावाचे अंगी बिलकूल उतरला नव्हता. त्याची पहिली ब्राह्मण बायको असता, त्याने आणखी मुसलमान बायको केली. तिला मुलगा झाला, त्याला त्याने आईच्याच धर्मात वाढविले. त्याने मराठी सत्तेचा विस्तार सर्व हिंदुस्थानभर अरबी समुद्रापासून तो थेट बंगाल समुद्रापावेतो केला. मात्र त्याला धनोत्पादन करता आले नाही. त्याचा सारा जन्म जसा उन्हातान्हात उघड्या हवेत गेला तसाच त्याचा मृत्यूही उघड्या आकाशाखाली तंबूच्या आवरणात झाला. 'लढवय्या पेशवा' अशी त्याची वाहवा महाराष्ट्रात अद्यापि होत असते. तो हिंदूंचा मोठा पुरस्कर्ता असून त्यास मृत्यूही एकाएकी अल्पायुष्यातच आला. उघड्या हवेचा जन्मभर झालेला ताण सहन झाला नाही.'

(Oriental Experiences, P. 390).

६. त्र्यंबकेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार

त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाचा महाप्रासाद (मोठे देऊळ) पेशव्यांनी बांधिला. याचा प्रारंभ बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांचे हातून शके १६७७ ह्या वर्षी होऊन याची समाप्ति नानासाहेब यांचे नातू माधवराव नारायण ऊर्फ सवाई माधवराव पेशवे यांचे हातून शके १७०८ या वर्षी झाली. यास खर्च दहा लक्षांवर रुपये लागले असे म्हणतात. एवढे मोठे देऊळ या प्रांती दुसरे नाही! याचे काम फार नकशीदार व बहुत सुंदर आहे. येथे पर्जन्य फार पडतो म्हणून ते बरेच जर्जर झाले आहे! या देवळाच्या उत्तरेकडील महाद्वाराच्या वरल्या भागी त्या वेळच्या संस्कृत भाषेत शिलालेख आहे तो असा :–

> शके १६७७ युवानामसंवत्सरे मार्गशीर्षकृष्णाष्टम्यां
> प्रारंभः श्रीमत्त्रिलोचनशिवालयमश्वैशलभैर्पर्मितथ
> सुशकेचयवाब्दमार्गे ।। कृष्णाष्टमी भृगृदिने नृपतिप्र-
> धानः श्रीबाजिरावतनयो रचने प्रवृत्तः ।। १ ।। नानाभिधः
> स्तदनुतत्सुततोपिवृत्तंपौत्रः प्रपूरयदिदं खलुमाधवाख्यः ।।
> शाकेष्टखाश्ववसुधासमितेनुवृते ।। माघासिते

श्वरतिथौतु पराभवाब्दे ।। २ ।। भगवत्तनयं नानाप्रभुर
त्र नियोजयत् ।। नारायणाख्यं तत्सुतौनागेशः पूर्णमातनोत् १
शके १७०८ पराभवसंवत्सरे महाशिवरात्र्या संपूर्णः ।। ३ ।।

ह्या शिलालेखाच्या श्लोकाचा भावार्थ असा आहे की, श्रीमंत बाजीराव-साहेब पंतप्रधान यांचे पुत्र नानासाहेब यांनीं या शिवमंदिरास शके १६७७ युवानाम संवत्सरे मार्गशीर्ष वद्य ८ भृगुवासर या दिवशीं आरंभ केला. पुढें यांचे नातू श्रीमंत माधवराव नारायण यांचे अमलांत शके १६०८ पराभवनाम संवत्सरे माघ वद्य १४ रोजीं हें काम समाप्त झालें. या कामावर नारायण भगवंत म्हणून कारकून योजिला होता, त्याचे हातून आरंभ होऊन त्याचा पुत्र नागेश नारायण याचे हातून समाप्ति झाली. (हे काम एकंदर ३१ वर्षे चाललें होतें असें दिसतें.) (संदर्भ : 'तीर्थयात्रा प्रबंध'– ग. स. लेले)

७ गोपिकाबाई पेशवे विवाह

भिकाजी शामजी व सदाशिव शामजी हे दोघे बंधू होते. हे दोघेही हुषार व धूर्त व मोठे उद्योगी होते. त्यांचा सावकारी व्यवहार १०–१५ वर्षे उत्तम चाललेला पाहून शाहू महाराज प्रसन्न झाले होते. या नाईक बंधूंनी छत्रपती शाहू महाराज यांना एका दिवाळीचे सणांत लक्ष्मीपूजन व फराळास आग्रहाने बोलावल्यावरून शाहू महाराज यांच्या घरी आले. त्या वेळी भिकाजी नाईक यांची मुलगी गोपिका-बाई हिला महाराजांनी वाढत असताना पाहून म्हणाले, 'ही मुलगी मोठी भाग्यवान आहे. ही कोणाची मुलगी ?' हा प्रश्न होताच भिकाजी नाईकांनी सांगितले, 'ती माझी मुलगी आहे.' तेव्हा महाराज हसून म्हणाले, 'आता तर हिच्या भाग्योदया-संबंधाने शंकाच उरली नाही. हे ऐकून भिकाजी नाईक म्हणाले, 'आमच्यापेक्षा कोणी मोठा व्याजबट्टा करणारा सावकारपुत्र आमचा जावई होईल एवढेच ना ?' 'ते काहीही असो. आमची एक गोष्ट तुम्ही मान्य केली पाहिजे' तेव्हा भिकाजी नाईक हात जोडून म्हणाले, 'महाराजांची आज्ञा आम्हास शिरसावंद्य आहे.' हे नाईक यांचे बोलणे ऐकून महाराज म्हणाले, 'आता तुम्हास काही काळजी करण्याचे कारण नाही. या मुलीचे लग्न आम्हींच करतो' असे म्हणून महाराज वाड्यात गेले. नंतर थोड्याच दिवसात दरबारी कामाकरिता श्रीमंत बाजीराव पेशवे मुख्य प्रधान सातान्याला आले तेव्हा महाराजांचे बोलणे लग्नासंबंधी ऐकून पेशवे यांनीही 'महाराजांच्या आज्ञेबाहेर आम्ही नाही. महाराजास जे मान्य ते आम्हासही मान्यच आहे.' असे म्हणाले, सन १७२९ मध्ये* गोपिकाबाई रास्ते यांचे लग्न श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्याबरोबर श्रीक्षेत्र वाई मुक्कामी झाले. लग्नसमा-

* वस्तुतः लग्न ११ जानेवारी सन १७३० रोजी झाले.

रंभात शाहू महाराज स्वारीनिशी वाई येथे आले होते. श्रीमंत पेशवे यांच्याबरोबर शरीरसंबंध झाल्यामुळे भिकाजी नाईक यांना पालखीचा मान पेशवे यांनी दिला. (संदर्भ : 'गोखले व गोखले रास्ते घराण्याचा इतिहास' आ. स. १९२२).

८. थोरल्या माधवराव पेशव्यांची नऊ कलमी यादी

३० सप्टेंबर, सन १७७२ रोजी खालील नऊ कलमी यादी थोरल्या माधवरावांनी ठरवली व कारभाऱ्यांनी त्यावर कबुली लिहून दिली :– (१) दौलतीस कर्ज आहे ते वारावयाचे. त्यास गुरुजींजवळ ऐवज आहे तो घेऊन तूर्त निव्वळ कर्ज असेल त्यास द्यावा. दुसरा ऐवज दौलतीसंबंधी मसलत न करिता आधी कर्ज वारावे. मग दौलतीसंबंधी जसे करणे तसे करावे. कर्ज वारण्याविषयी चित्तापासून जलदी करून वारू. कदाचित जरुरीची मसलत पडल्यास करावी लागेल. शपथपूर्वक लिहिल्याप्रमाणे करू. दौलतीसंबंधी ऐवजाने कर्ज वारून गुरुजींकडील ऐवजामाफक कर्ज राहील तेव्हा ऐवज घेऊन रोकडीचे कर्ज वारू. (२) कोकणात व देशात इजारे झाल्यामुळे रयतीस सुख नाही, त्यांस बारकाईने मनात आणून वाजवीचे रितीने जसे जाहले असेल ते नीट करून प्रजापालन करावे. (३) श्रीकाशी प्रयाग ही दोन्ही स्थळे सरकारांत यावी असा तीर्थरुपाचा हेतू होता त्यास प्रस्तुत करण्याजोगे दिवस आहेत. दहा वीस लक्षांची जहागीर मुबदला पडली तरी देऊन दोन्ही स्थळे हस्तगत करावी, प्रयत्न करावा. (४) तीर्थरूप मातुश्रीसाहेबांचा हेतू काशीस जावयाचा आहे. त्यांस सुपथ पडल्यावर यात्रा घडवावी. (५) तीर्थरुप भाऊसाहेबांची क्रिया माघमासी जरूर करावी काकूसाहेब जाऊत वा राऊत. उत्तमप्रकारे क्रिया करावी. (६) काशीचे ब्राह्मणास वर्षासने आहेत, ती पिढीजात करून देऊन वर्षास पावती करीत जावी. (७) काशीस दोन लक्ष ब्राह्मणभोजन करावे. दक्षणा दोन पैसे प्रमाणे द्यावी. (८) तीर्थरुप दादासाहेबास पांच लक्षांची जहागीर नीवळ लावून द्यावी. याहून थोडे बहुत अधिक मागितल्यास त्यांचा संतोष राखून मर्जी प्रसन्न राखावी निदान सात लक्षाची जहागीर देऊन मर्जी राखू अधिक काही मागू लागल्यास ऐकू नये. (९) श्रावणमासाचा धर्मादाय पूर्वीपासून चालत आला आहे पाच लक्षांची दौलत राही तावत्कालपर्यंत चालवावा यांसी अनमान करू नये.

'नऊ कलमे लिहिले अन्वये श्री गणपतीची शपथपूर्वक करू.'

(संदर्भ : इतिहाससंग्रह पुस्तक ६ वे ऐतिहासिक स्फुट लेख २३.)

९. थोरले नारायणराव पेशवे समाधी

दहन (लकडी) पुलाचे दक्षिणेस केले. सांप्रतच्या लाकडी सांडव्याजवळ गावातून बाहेर पडताना उजव्या हाताला नदीच्या पात्राच्या प्रारंभी काठाला लागून खडकावर जी समाधी आहे तीच नानास्वामींची असावी असे निश्चित वाटते.

समाधी-स्थलाकरिता खडक चोहोकडून तोडून अलग केला आहे. त्यावर बाहेरील संरक्षक दगडी वेदी साधारण ४ हात उंच, १० हात चौरस घडीव दगडांची असून वरही पाषाणबंदी आहे. पूर्वेकडील अंगास दोन्ही कोपऱ्यांत दोन भोके आहेत. या वेदीला लागून खडकापासून वरपर्यंत (पूर्वेकडे) उत्तरोत्तर कमी होत गेलेल्या चार पायऱ्या आहेत. समाधीकडे तोंड केल्यास डावे हातचे कोपऱ्यात खडकावर ध्वज पुरण्यासाठी ६ अंगुळे व्यासाचा खळगा आहे. मुख्य समाधी दहनभूमीपासून संरक्षक वेदीच्या वर दीड हात उंच म्हणजे एकंदर साडेपाच हात उंच असून ४ हात चौरस पाषाणमय आहे. वर मध्यावर एकाच सबंध पाषाणाची लिंगसहित शाळुंका आणि तिच्याजवळ पश्चिममुखी नंदी (गळयातील आणि इतर अलंकारांसहित) आहे. शाळुंकेची नाळ थेट पश्चिमोत्तर दिशेस आहे. पिंडीवरील तीर्थ दहनभूमीवर पडावे अशा हेतूने, नाळेच्या शेवटी अर्धवर्तुळ भोक खालपर्यन्त ठेविले आहे. मुख्य समाधी-वरील शाळुंका चार बोटे उंच आहे. नंदीची उंची एक हात आहे. मुख्य समाधीवर मेघडंबरी अथवा आच्छादन करण्यासाठी चारही कोपऱ्यांत ३ अंगुळे चौरस भोके आहेत. समाधीवर कोठेही शक इ. काही नाही. संरक्षक वेदीचा वायव्य कोपरा खडकापर्यंत आज (कोजागर्ती पौणिमा शके १८५५) ढासळलेला आहे. त्याची आणि एकंदर समाधीचा जीर्णोद्धार करण्याची जागृती पुणेकरांना होईल काय ? इंग्रजाने पुणे नगराची पहाणी करून मि. लाईट याच्या हातचे भूमिरेखाचित्र शके १७९१–९४ मध्ये छापिले आहे त्यात ते स्थळ स्पष्टपणे दिग्दर्शित केले आहे.*
(संदर्भ : शिवशाहीचा लेखनालंकार – पृ. ४०)

१०. रघुनाथरावांचे एक पद

श्रीमंत पेशवे यांचे घराण्यात कोणी कविता वगैरे रचिल्याचे ऐकिवात नव्हते परंतु नुकतेच निमगाव येथे भिकाजी हरि फाटक यांचे बाडात एक पद उपलब्ध झाले आहे. हे पद श्री रघुनाथ ऊर्फ दादासाहेब पेशवे यांनी केलेले असल्याचे सदरहू बाडातच म्हटले आहे.

॥ दादासाहेब ॥ राग जगला ॥
मन शिवपदकमळीचे भृंग
यज्ञयागतपध्यानधारणा भस्मोद्धलित अंग ॥ १ ॥
नमक चमक मुखि गाजति वाजति
करि शिवपार्थिव लिंग ॥ २ ॥

---

* 'शिव. लेख.' या पुस्तकात जरी हे वर्णन नानासाहेबांच्या समाधीचे म्हणून दिले असले तरी तपशीलावरून वर्णन नारायणरावांच्या समाधीचेच आहे असे दिसते.

सा रि ग म प ध नि सां गंधर्व गायन
वाजे टाळ मृदंग ।। ३ ।।
भृंगी नाचे थय थय् थय् थय्
चरण कमल मन भृंग ।। ४ ।।
चरण शरण रघुनाथ निरंतर
मागे हा चि अभंग । मन शिव ।। ५ ।।

(संदर्भ : भा. इ. सं. मंडळ इतिवृत्त शके १८३५.)

११. आनंदवल्ली

थोरल्या* माधवरावांनी रघुनाथराव पेशव्यांना फक्त जहागीर तोडून घेण्याबद्दल मोठ्या प्रयत्नांनी राजी केले. नाशिक परगण्यातील सुमारे दहा लाख उत्पन्नाचा मुलूख माधवरावांनी त्यांना तोडून दिला. रघुनाथराव नंतर तिकडे जाऊन राहिले. त्र्यंबकेश्वर, कोपरगाव [बेट] येथे त्यांनी स्वतंत्र वाडे बांधले. नाशिकच्या पश्चिमेला तीन मैलावर 'चावंडस' म्हणून एक खेडेगाव होते. ते आनंदीबाईंना फार आवडले. या गावाची वस्ती वाढवत नाशिकपर्यंत गावाची हद्द नेऊन भिडवावी अशी आनंदीबाईंची फार इच्छा होती. पण राजकारणाच्या फेऱ्यात ते शक्य झाले नाही. जवळूनच गोदावरी नदीचा प्रवाह वाहात होता बेलाची भरपूर झाडेही होती. त्र्यंबकेश्वरही जवळच होते. यामुळे देवभोळ्या रघुनाथरावांना हे ठिकाण आवडल्यास नवल नाही. गाव साधारणतः उंचीवर वसलेले होते.

सन १७६४ च्या फाल्गुनात रघुनाथराव व गोपिकाबाई नाशिकला व पुढे अनुक्रमे आनंदवल्ली व गंगापूरला राहू लागले. रघुनाथराव, आनंदीबाई चावंडसला राहू लागल्यावर त्यांना तेथे दुसरा मुलगा झाला. (हा पुढे अपघाताने मरण पावला.) यामुळे गावाचे नाव बदलून 'आनंदवल्ली' केले. येथून पश्चिमेला आणखी तीन मैलांवर गंगापूर हे गाव होते. तेथे गोपिकाबाई राहात असत. यानंतर आनंदवल्लीची वर्दळ व महत्त्व दिवसेंदिवस वाढतच गेले. रघुनाथरावांनी तेथे मोठा वाडाही बांधला. वाड्याला पुण्याच्या शनिवारवाड्याप्रमाणेच भक्कम तटबंदी होती. रघुनाथरावांनी स्वतःच्या हौसेखातर वाड्यात खूप मोठा ग्रंथसंग्रह, पोथ्या, चित्रे, इत्यादींचा संग्रह केला होता. हा प्रचंड संग्रह रघुनाथरावांच्या उत्तर आयुष्यातील नजरकैदेच्या काळात नाना फडणीसांनी स्वतःच्या संग्रहात जमा केला असे सांगतात.

---

* सुलभ विश्वकोश, आनंदीबाई पेशवे यांचे चरित्र, मराठी रियासत वगैरे पुस्तकांमधून माहिती संकलित केली आहे.

आनंदवल्लीचे स्वरूप रघुनाथरावांच्या राजधानीसारखेच होते. अनेक शास्त्री, पुराणिक, उपाध्ये, जोशी, वैद्य, गुरव, गोसावी शागिर्द, कानडे, ब्राह्मण, गवई, वादक, नटवे, दासी, नाटकशाळा, यांचाही चैन करमणुकीसाठी मोठा भरणा असे. त्यामुळे रघुनाथरावांचे वास्तव्य असेल तेव्हा आनंदवल्ली कायम गजबजलेले असे. घोडपे येथे पराभव होऊन रघुनाथराव अटकेत पडल्यावर, त्यांना खर्चासाठी दिलेले सर्व महाल परत घेण्यात आले पण आनंदवल्लीचे ठाणे कायमचे त्यांच्या माणसांच्या ताब्यात देण्यात आले. या ठिकाणी सन १७६८ नंतर रघुनाथरावांचे फारसे वास्तव्य झाले नाही.

याप्रमाणे थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीत या गावाला फार महत्त्व आले. पण रघुनाथराव–आनंदीबाई यांच्या मृत्यूनंतर आनंदवल्लीचे महत्त्व व वैभव गेले ते कायचेच. आनंदीबाईंच्या मृत्यूनंतर अमृतराव, दुसरे बाजीराव व चिमणाजी यांना ‘ बारभाईंनी ’ काही काळ येथे नजरकैदेत ठेवले होते.

१२. आनंदीबाई पेशवे यांचा मृत्यू

आनंदीबाईंच्या मृत्यूनंतर दोनच दिवसांनी, २९ मार्च सन १७९४ रोजी लिहिलेल्या पत्रात त्यांच्या अंतकाळचे वर्णन आहे :

‘ सायंकाली घाबरी जालीं. नेत्रास तटस्थता जालीं म्हणोन दर्भास्तरणावर आली. नंतर गंगोदक मुखांत घातले. घटकेनें किंचित सावध जाली रात्रभर बाजीराव व चिमाजीआप्पा व अमृतराव जवल बसलेले होते. उप्क्रांत धेनु सायंकालीच दिली प्रात:काली सूर्योदयाचे संधीस प्राणोत्क्रमण जाले अखेरपर्यंत सावध होती डोळें पुसणे, अंग खाजविणे, पदर नीट करणे पाणी सांगणें सर्व आपले हातें करी गळचात कफ होऊन शक्तिहीन जाल्याने बोलणें राहिले. पहिला देवपूजन व जप याचा अभ्यास फार तोच अखेरपर्यंत नमस्कार न्यास करावे असा छंद लागला होता. प्रात:कालापासून साहित्य होऊन अग्निहोत्र जालेले ते उपचार जाले अग्नीमंथन करून सर्व विधी जाला गंगेवर जाण्यास दिवस बारा घटका वर आला. बाजीराव क्रिया करितात मागती सर्व वाडयात येत तोपर्यंत अडीच प्रहर दिवस जाला सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. ’

(संदर्भ : ‘ ऐतिहासिक पत्रव्यवहार ’– सरदेसाई, कुलकर्णी, काळे ले. ३२३.)

१३. तोतया यशोदाबाई पेशवे

‘ दुसऱ्या बाजीरावांनी आपले मृत्यूपत्र जाहीर केल्यावर लवकरच स्वत:ला सवाई माधवराव पेशव्यांची विधवा स्त्री यशोदाबाई* पेशवे म्हणवणाऱ्या स्त्रीने

* दुसऱ्या बाजीरावांनी आपले मृत्युपत्र सन १८३९ मध्ये प्रथम केले, तर तोतया यशोदाबाई १८२२ साली बऱ्हाणपूर येथे प्रगट झाली.

मृत्यूपत्राच्या सत्यतेबद्दल आव्हान दिले. (यशोदाबाईंच्या मृत्यूनंतर) सहा वर्षांनी (सन सुमारे १८१६) ? स्वतःला यशोदाबाई म्हणवणाऱ्या स्त्रीने यशोदाबाईच्या मृत्यूचे वृत्त खोटे असल्याचा दावा केला व स्वतःच यशोदाबाई असून सवाई माधवरावांची विधवा या नात्याने पतीच्या संपत्तीवर हक्क सांगितला. यामुळे (सरकारी स्तरावर) कुचंबणा झाली. परंतु चौकशीअंती ती स्त्री तोतया असल्याचे जाहीर करण्यात आले. तिने याच स्वरूपाचे दावे सन १८२६ व सन १८२९ मध्ये केले, पण हे प्रयत्न असफल झाले.

जेव्हा सन १८३४ मध्यें तिने असाच दावा केला तेव्हा बिठूरच्या कमिशनरने तिच्यावर फसवणूक करून स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केल्याबद्दल खटला भरावा अशीं शिफारस कंपनी-सरकारकडे केली. मात्र सरकारची या टोकापर्यंत जायची तयारी नव्हती. वरील स्वरुपाचाच दावा तिने सन १८४९ मध्येही केला. हिची काहीतरी महत्त्वाकांक्षी योजना असल्याचे दुसऱ्या बाजीरावांच्या मृत्यूनंतर लगेचच उजेडात आले होते. त्या वेळी ती कलकत्त्याच्या उत्तरेकडील चितपूर या विभागात राहत असे. तिने निराळाच दस्तऐवज–ज्यान्वये ती बाजीरावांची एकमेव वारस व त्यांच्या संपत्तीची मुखत्यार ठरू शकणार होती–बाजीरावांचे मृत्युपत्र म्हणून दाखल केला.

खरी यशोदाबाई रायगडावर वारली हे सर्वपरिचित होते. परंतु १८२८ साली काशी येथे ३०० ब्राह्मणांनी पंचायत बसवली व हीच खरी यशोदाबाई असल्याचे जाहीर केले. हिच्या म्हणण्याप्रमाणे बाजीरावांनी मृत्यूपूर्वी दोन आठवडे, दि. १३ जानेवारी सन १८५१ रोजी स्वतःचीं अखेरची इच्छा सांगितली. नारायण रामचंद्र नावाच्या कारकुनाने मजकूर लिहून घेतला. बाजीरावांनी त्यावर सही केली व आपला शिक्का उठवला. मृत्यूनंतर त्याप्रमाणे तजवीज करावी अशा सूचनेसह दस्तऐवज कारकुनाकडे देण्यात आला. दस्तऐवज शंकास्पद मजकुरामुळे चौकशीअंती खोटा ठरला.'

(मूळ संदर्भ : NANA SAHIB & THE RISING AT CAWNPORE- BY P. C. GUPTA P. 9 to P. 14 - मराठी गोषवारा.)

१४. सवाई माधवरावांना वकील–ई–मुतालिकी सनद

श्रीमंत कैलासवासी सवाई माधवराव प्रो यास जिनत मकान अलिशाव बुलंद अलकाब सुलतान अलिगोहर बादशहा याणी मोठी मेहेरबानी करून दिल्लीहून वकिल– ई मुतालकीचा खिताब व महिमरातब व नालकी वगैरा जहागिरीच्या सनदा दिल्या त्याचा तपशील :– (मदरु भाग २)

वकिल मुलतलअमिरुलउमरामुख तारुलममालिकमदारुलमहामेसलतनउमदै आराकीनखिलाफतयारवफादारसिपासालारसाआदतमंदबजां

पयबंद फरजंदखासुलखांसवलांजाहांमहाराजाधिराजरावपंडतपरधान सवाई माधोराव नारायण बहाद्दर

खिताबवअतायजागीरमबोजीबजेलबरसाना प्रांताचे नाव मथुरा प्रांत १ बंदकान प्रांताचे नांव १ गोकुलबिंदरावन १

खिलआत वगैरा पोषाख

चारकोबनीमआस्तीनतोकामदार निमआस्तीन १ जामा १ दस्तारसबस्ता १ दुषाला कमरबंद बालाबंद चिरा जवाहीर वगैरा जेगा १ सरपंच मालावर वारीदमयक पदक १ कमलदान पमषेर सिपर कलगी परोदामयकढक नालकी-रोगनीजरकारसायेदारअथरास फिलयजंजिर सिकेदवातमयसिका मोरचादुपालकी जरताबझालरदार

निषानगीने मयाफिलान तोमन थलमझंडा तोगा मरातब माही आस्पसं वारीसस कीलसंवारीजंजीर

गुमास्ते महादाजीमुकररस्यात्फ

१५. सवाई माधवरावांची अस्सलता

सवाई माधवराव पेशवे ह्यांचे पिता श्रीमंत नारायणराव पेशवे नव्हेत. १. सवाई माधवराव गंगाबाईंचे पुत्र नसून एका सोनार स्त्रीचे पोटी जन्माला आले होते. गंगाबाईना मुलगी झाली होती व त्या बाईला मुलगा झाला होता. या दोन्ही अर्भकांची नाना फडणीसांच्या आज्ञेने आदलाबदल करण्यात आली होती. २. नाना फडणीस आणि सवाई माधवराव यांची ठेवण व चेहेरेपट्टीतील साम्य पहाताना तो नाना फडणीसांचा मुलगा होता. नाना व श्रीमंत सौ. गंगाबाई यांचे छुपे संबंध होते त्याचीच सवाई माधवरावाचा जन्म ही परिणती होय.

वरील प्रकारचे सभ्यता आणि सुसंस्कृत शिष्टाचार यांच्या सर्व मर्यादा ओलांडणारे दोन समज १९ व्या शतकापर्यंत समाजात प्रचलित होते. हे दोन्ही समज धादांत खोटे आहेत. (कै.) वि. स. वाकसकर यांनी डिसेंबर १९२० च्या 'विविध ज्ञानविस्तार ' च्या अंकात 'सवाई माधवराव पेशवे व दुर्गाबाई' या लेखात या अफवांचा खरपूस समाचार घेतला आहे.

या अफवांचा खोटेपणा दाखवणारे, ग्रॅन्ट डफ यांनी साताऱ्याचा माजी रेसिडेंट जॉन ब्रिग्ज् याला २८ फेब्रुवारी, सन १८५४ रोजी लिहिलेले पत्र (कै.) द. ब. पारसनीस लेखांत देतात. ते पत्र पुढीलप्रमाणे :–

Eden by Banff. Feb. 28th, 1854 :

" MY DEAR BRIGGS,

It gives me pleasure to see the handwriting of an old friend, especially when I see it, like yours, strong and vigorous, and your

letter is none the-less welcome because it is full of a subject pertaining to my younger days, in which I seldom see any one who takes the slightest interest.

I cannot now lay my hand on the notes of evidence as to the matter you mention; nor do I know where I may have deposited them. But I perfectly recollect the universal opinion of the well informed about Poona and Satara Courts and that no doubt was entertained among them as to the legitimacy of Madhoo Rao Narrian. that the Ministers had Several pregnant women carried up, to make sure of a successor somehow, was also genrally believed, and that Nana Furnavees was afterwards much too intimate with Narrian Rao's widow, but never the less no one of any cousequence expressed any suspicion as to the legitimacy of the child born at Poorundhar, Ballajee punt Nathoo, Abba Joshee (Baji Rao's Private Secretary), Abbajee Gondeo, all of whom you knew, had no doubt about it, and I also recollect asking MadhooRao Rastia if he had ever heard it doubted, and his reply was a decided negative.

I also rather think Raghonath Rao himself belived in the legitimacy of the child, and who have been quite content to have been recognised as Regent. So general was the belief, that however influential Raghoba may have been the adherents of his cause, the English could never have done more than place him temporarily in the regency. Mr. Mostyn's evidence at the time was not so good as yours or mine in the importial period of our inquiries. "

१६. पर्वती देवस्थानची व्यवस्था

॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री बाबासाहेब यांशी,

प्रती गणेशभट कर्वे व वैजनाथ दीक्षित सरवटे व मोर दीक्षित मराठे अनेक आसीर्वाद व शेवेसी बाबूराव गणेश कात्रे व चिंतो वामन सिधये कारकून निा दप्तर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना अैशीजे श्रीदेवस्थानाकडील सालमाारचा माहे मार्गशिर्ष मास येक माही श्रीदेवदेवेश्वर व त्याचे भोवताले देव व श्री विष्णु व श्री स्वामी कार्तीक वास्तव्य पर्वती व श्रीगणपती वास्तव्य सारसबाग पर्वतीचे तळचातील व श्री नवलोबा देव तल्याचे पूर्वेच्या पालीवरील यास व श्री मृत्यूंजयेश्वर देव वास्तव्य बाग मौजे कोथरुड यास पूजेचे सामान व पूजेचे ब्राह्मण वगैरे याचा भोजनखर्च व तैनात शागीर्द पेशा याचा रोजमरा मिलोन व श्री सांब व श्री

नरनारायण देव रथावरील व शुक्रवारचे वाड्यातील व थोरले वाड्यातील श्री काश्मीर लिंग व थोर्ले देवघरचे देव याजकडे पूजेचे सामान व दक्षणा व आश्रीत वगैरे याची तैनात व श्री सांब व श्री नरनारायण याजकडील पालखीचे भोयाची तैनात मिलोन खर्चाबद्दल चांदवड रुपये ३३५० तीन हजार तीनसे पनास बापूजी सखाराम गोडबोले व भिकाजी बाबाजी बाघ व आपाजीपंत आगाशे याजकडून देविले ते बाबूराव गणेश कात्रे हवाला जाले असेत आम्ही पांचजण मिलोन चौकसीने खर्च करोन हिसेब सरकारात समजावू मिा मार्गशिर्ष २ श. १७३५ श्रीमुखनाम संवत्सर सुाा सर्बा सर्बा अशर मयातैन अलफ हे आशिर्वाद.

(मार्गशीर्ष शु. २ धरल्यास इ. स. १८१३ नोव्हेंबर २५, वद्य २ धरल्यास १५ दिवस नंतरची तारीख येईल.)

(श्री. य. न. केळकर यांचे संग्रहातून उपलब्ध. मूळ संदर्भ : पेशवे रोजकिर्द रुमाल १ पुडके ४ कागद २३.)

१७. दुसरे बाजीरावाचे मालकमला पत्र

१६ मे सन १८१८]

माझे अत्यंत जुने दोस्त तीन. पैकी कर्नल क्लोझ दिवंगत जाले, दुसरे जनरल वेल्स्ली, थोर पुरुष, स्वदेशी युरोपात आहेत आणि तिसरे आपण. आपण आजपर्यंत अनेकांचा सांभाळ करून त्यांस पदरांत घेतले आहे. सिंदे होळकर वगैरे सरदारांवर मेहेरनजर करून आपण त्यांची व्यवस्था लावली आहे. तर या संकट समयीं मलाही आपण हात देऊन माझा निभाव करावा. भंगलेल्या होडीतल्या खलाशाप्रमाणे मी आज असहाय्य स्थितीत असतां मला आपला हा आधार सापडला तो मी कसा सोडूं शकणार ? (मूळ संदर्भ : मालकमपत्रसंग्रह, द्वारा – 'ऐतिहासिक पत्रबोध' गो. स. सरदेसाई)

१८. दुसरे बाजीराव पेशवे आणि जनरल मालकम यांचेमधील करार

Dated 1 st June 1818

First : That he shall resign for himself and successors all rights, title and claim, over the Government of Poona, to any soverign power whatever.

Second : That Baji Rao shall immediately come with his family and a small number of his adherents and attendants to the camp of General Malcolm where he shall be received with honour and respect, and escorted safe to the city of Benares or any other sacred place in Hindustan, that the Governor General may, at his request, fix for his residence.

Third : On account of peace of the Deccan, and the advanced state of the season, Baji Rao must proceed to Hindustan without one day's delay, but Brigadier General Malcolm engages that any part of his family that may be left behind, shall be sent to him as early as possible and every facility given to render their journey speedy and convenient.

Forth : That Baji Rao shall on his voluntarily agreeing to this arrangement receive a liberal pension from the Company's Government for the support of himself and family. The amount of this pension will be fixed by the Governor General. Brigadier- General Malcolm takes upon himself to engage that it shall not be less than eight lakhs of Rupees per annum.

Fifth : If Baji Rao by complete and ready fulfilment of this agreement shows that he reposes entire confidence in the British Government, his request in favour of principal Jahagirdars and old adherents who have been ruined by their attachment to him, will meet with liberal attention, his representatives also in favour of Brahmins of venerable character and of religious establishments founded or supported by his family will be treated with regard.

Sixth : The above propositions must not only be accepted by Baji Rao, but he must come personally into Brigadier - General Malcolm's camp within twenty four hours of this period, or else hostilities will be commenced and no further negotiations will be entered into with him.

(Reference : " TREATIES ENGAGEMENTS AND SUNNADS " By C. U. AITCHISON Vol. III E. D. 1863.)

१९. श्रीमंत अमृतराव पेशव्यांबद्दल समकालीन मत

Date : 6 th Sept. 1824 (Page 374-75)

Amrut Row, for a short period of his life Peishwa of the Maharattas and since enjoying a large pension from our Government in addition to a vast private fortune, was one of the chief of these almsgivers.

Amrut Row, on his name-day, that is in Hindostan, the day on which is patron god is worshipped, he annually gave a seer of rice and a rupee to every Brahmin and every blind or lame person who applied between sun-rise and sun-set. He had a large garden,

a short distance from the city, with four gates, three of which were set open for the receiption of the three difference classes of applicants and the forth for the Peishwa and his servants to go backwards and forwards. On each person receiving his dole, he was shewn into the garden, where he was compelled to stay during the day, lest he should apply twice, but he had shade water company and idols enough to make a Hindoo (who seldom eats till sun-set) pass his time very pleasantly. The sums distributed on these occasions are said to have, in some instances, amounted to above 50,000/- rupees. His annual charities altogether averaged, I was informed, probably three times that amount.

He died the second night of my residence at Secrole; Mr. Brook said he was really a good and kind man, religious to the best of his knowledge and munificent not from obstentation but principle.

Date : 7 th Sept. 1824 :

(Page : 396)

Poor Amrut Row, the charitable Ex-Peishwa, (whose ashes I saw yet smoking on Ali Bhaee's Ghat as I passed it) was I find, one of these (about christain Religion) enquirers. Mr. Morris, the Missionery, had received a message with his Highness's compliments, desiring him to call on him the middle of the week, as he was " anxious to obtain a further knowledge of Christianity ! " " It is distressing to think that this message was deferred so long and that, short as the intervals which he had calculated on was, his own time was shorter still. Yet surely one may hope for such a man that his knowledge and faith may have been greater than the world supposed, and that at all events, the feelings which made him thus late in life, desirous to hear the truth, would not be lost on Him whose grace may be supposed to have first prompted it.

(Ref : - " NARRATIVE OF A JOURNEY THROUGH THE UPPER PROVINCES OF INDIA FROM CALCUTTA TO BOMBAY, 1824-1825 " VOL. I.ED - DEC. 1827).
By Reginald Heber D. D. Lord Bishop of Calcutta. -

२०. श्रीमंत विनायकराव पेशव्यांचे मृत्युपत्र

हा दस्तऐवज मला श्री. कृष्णराव वि. पेशवा यांच्याकडून उपलब्ध झाला. मूळ कागद मोडी लिपीत लिहिलेला असून तो राष्ट्रीय अभिलेखागारात आहे असे

समजते. मूळ कागदाच्या इंग्लिश भाषांतराची ही नक्कल प्रत आहे. प्रथम पोलिटिकल एजंटला मृत्युपत्राबद्दल लिहिलेले पत्र व त्यानंतर मृत्यूपत्र दिले आहे.

From :

HIS HIGHNESS VENAYAK RAO OF KERWEE,
To
Honourable Mr. BUSHBY,
Agent, Bundelkhand.
Dear Sir,

THINKING it expedient to consult the British Government on political matters, I informed the Governor General of the disinheritance of my former adopted son, Narain Rao and the adoption of Madho Rao, which was duly made, after obtaining the consent and approval of the Governor General, in a letter from His Excellancy which was conveyed to me by you.

I have now to invite your attention to my will which I executed in behalf of my minor Son, Madho Rao, whom I make my sole lawful heir.

You are now urged to represent this matter to the Supreme Government, requesting on my behalf, that the containts of my will in future should not be overlooked. I hope that the Governor General will be pleased to give instructions to every European gentleman who will have the charge of the Presidency to keep a watchful eye on the boy and try for his welfare,

(Sd/-) VENAYAK RAO PESHWA
of Kerwee.

Dated 25 Ramjan, Sunday,
Jesht Mas Shakey 1775.
('मोडक जंत्री 'नुसार दि. ३ जुलै सन १८५३.)

TRANSLATION

OF THE GENUINE WILL OF VENAYAK RAO OF KERWEE

KNOW YE, all by these presents that I, Venayak Rao of Kerwee in the district of Banda, son of Ex Peishwa Amrut Rao of Poona and grand son of the late Peishwa Raghoba dada of Poona, do hereby solemnly declare that whereas an estate yeilding an income of Twelve Lakhs per annum is settled on me by my

ancestors (without there being any co-parsonary rights with any person) out of which I enjoy only Nine Lakhs per annum, after paying of three lakhs per annume, to the honourable East India Compony for collectidg the revenue in my behalf together with all my movable and immovable property I am in possession of, with the exclusion of what I have bestowed or will bestow in charity and donations during my life time to confer on my minor son Madho Rao.

Being well entitled to device the property hereby descended to me, I do herein out of natural love and affection and of my own free will absolutely and without any reserve give and grant unto and to the use of my mlnor son Madho Rao and his heirs forever all my rights, title and interests in my share.

At present I am in a sound and healthy state of mind and not being swelled by the false persuation of others, execute this will. If my son Madho Rao or his heir should ever happen to set any claim to the property which I have already bestowed in charity it should be rejected as false and no cognizance whatsoever should be taken of it.

I have disinherited my former adopted son Narain Rao as he rebelled against me and settled on him a monthly allowance of Rs, Two Hundred only which sum should be paid after me by Madho Rao.

Narain Rao and his heirs are utterly execluded from laying any claim to my property.

I wish that even the British Government should not make use of even a farthing out of the interest of Rs. Five lakhs, kept for the maintainance of the Chhatra and the temples in Banarus.

Further I wish that the British Government will surely protect my minor son Madho Rao from all impending charges arouud, although I have kept him under the regent Babu Harichand.

The Governor General as I hope from a personal interview will not feel to protect my minor son Madho Rao as was promised.

With this view, I have executed this will in order that it may serve both for the information of my Son Madho Rao and the British Government and the British Officials.

It should be made use of as documentary evidence in case of any Litigation.

Written this day of the year 1853 the 4th January.

Signed and sealed in Marathi.

VENAYAK RAO PESHWA
of KERWEE

WITNESSED BY :

१) मोरभट कर्वे – स्पिरीच्युअल प्रिसेप्टर ॲन्ड हाय प्रिस्ट
२) नारायणशास्त्री कोल्हापूरकर – धर्मशास्त्री
३) नानाशास्त्री वैनकर – धर्मशास्त्री
४) बाबू राधेगोविंद – सबदिवाण
५) बाबू हरीचंद – दिवाण
६) कृष्णदेव पुरखे – नोबल सरदार ऑफ फर्स्ट क्लास
७) मुकुंदराव – जमादार ऑर कॅशिअर
८) रामचंद्रराव घारपुरे – इन्स्पेक्टर जनरल
९) विश्वनाथपंत – मुन्शी
१०) विनायकराव – प्रायवेट सेक्रेटरी टू द महाराजा
११) माधोराव मुळे – कॉनवॉय
१२) रघुनाथराव – अकौन्टन्ट जनरल
१३) कृष्णराव – हाय ट्रेझरर
१४) वामनराव लिमये – क्वार्टर मास्टर
१५) बाबू इश्वरीप्रशाद – इंग्लीश ट्रान्सलेटर
१६) महादू सिंदिया – कमांडर इन् चीफ
१७) राव गोपाळ लाल – जहागीरदार
१८) दामोदरपंत पेंडसे – चीफ् सेक्रेटरी
१९) जीतसिंग सुभेदार
२०) मल्हारराव - कमांडर ऑफ दि हॉर्स
२१) नाझीर नबीखान – ऑफिशिएटिंग गवर्नमेंट तहसीलदार ऑफ तरोहा
२२) महमद हुसेन – परमनंट तहसील-दार ऑफ तरोहा
२३) शोबाजी चोबे – जागीरदार पलदेवा
२४) रामप्रशाद चोबे – जागीरदार पहेरा
२५) बच्चाजीपंत तात्या – स्टेट कौन्सिलर
२६) बाबू लिमये – चीफ ऑफ एम्बसी

२१. ब्रह्मावर्त ऊर्फ बिठूर

(१) हे प्राचीन शहर गंगाकाठी असून २६°. ३७° रेखांश आणि ८०°. १६° अक्षांशांवर वसले आहे. कानपूर तहसीलच्या उत्तर टोकावर कानपूरपासून १४ मैलांवर आहे. कानपूर ते बिठूर चांगला रस्ता असून तो कल्याणपूर गावापासून

मुख्य रस्त्यापासून फुटतो. मुख्य रस्त्यापासून बिठूर सात मैलांवर आहे. त्या रस्त्याला आता 'नानासाहेब पेशवे मार्ग' असे नाव आहे. उत्तर-पूर्व रेल्वेचा एक फाटा मंढाना जंक्शनपासून बिठूरपर्यंत जातो. या रेल्वे स्टेशनचे नाव 'ब्रह्मावर्त' असे आहे. मात्र पोस्ट ऑफीस 'बिठूर' या नावाने ओळखले जाते. 'बिठूर' नावच त्या भागात प्रचलित आहे. गावातून गंगानदी वाहते. बिठूरला पेशव्यांची वस्ती असल्यामुळे गावाची प्रसिद्धी देशभर झाली.

बिठूरचे एकूण क्षेत्रफळ ११४० एकर असून त्यात बिठूर कलान, बिठूर खुर्द, नयागंज, आर्सीलष्कर हे मुख्य भाग आहेत. आर्सीलष्कर भागाची जमीन कंपनी सरकारने बाजीरावाला खास सैन्यासाठी सारामाफीने दिली होती. खुद्द बिठूरचा विस्तार २०८ एकर आहे. सन १८६१ मध्ये या गावाला १८५६ चा चौकीदारीचा कायदा, त्यानंतर १८९२ चा व्हिलेज सॅनिटेशन कायदा आणि १८६१ च्या पोलीस कायद्याचे ३४ वे कलम लागू करण्यात आले. या गावची लोकसंख्या झपाट्याने कमी होत आहे. 'बंडा'पूर्वी सन १८५३ मध्ये लोकसंख्या १३,५८० होती. यात रामेल गावची ९१०६ लोकसंख्या धरलेली नाही. सन १८६५ मध्ये व सन १८७२ मध्ये लोकसंख्या अनुक्रमे ८३२२ व ७७६८ होती. सन १९५१ च्या खानेसुमारीस बिठूर गावची वस्ती २५२८ होती.

पेशवे व त्यांच्या कुटुंबियांना गंगास्नानासाठी जाणे सोपे व्हावे म्हणून दरवर्षी पावसाळ्यानंतर घाटापासून गंगाप्रवाहापर्यन्त वाट केली जाई. पेशवे व कुटुंबीय गंगास्नानासाठी जात त्या वेळी लोकांच्या दृष्टीपासून संरक्षण व्हावे म्हणून या वाटेवर दोन्ही बाजूला तट्या उभा करीत. हा तट्या पावसाळ्यात काढून घेण्यात येई. (संदर्भ : 'नानासाहेब पेशवे आणि १८५७ चे बंड'– डॉ. वा. रा. ढमढेरे).

(२) बाजीराव ब्रह्मावर्तला गेल्यावर तेथे त्यास इंग्रज सरकारने छावणीसाठी भागीरथीचे किनाऱ्यावर सुमारे सहा मैल परिघाची जागा नेमून देऊन तिच्या चोहोबाजूस हद्दीचे खुणांसाठी १६ दगडी खांब रोवले होते. तेथे बाजीराव पेशव्यांनी आपली छावणी स्थापन केली. बाजीराव साहेबांचे लष्कर, स्वार, शिबंदी हत्ती, घोडे, नोकरचाकर, बाजरबुणगे, वगैरे सर्व मिळून एक मोठे नवीन गावच वसले होते. त्यामुळे त्यास राजधानीचे स्वरूप येऊन बाजीरावसाहेब मरेपर्यन्त – म्हणजे इ. स. १८१९ ते इ. स. १८५१ पर्यन्त, – तेथे राजकीय ऐश्वर्य नांदत होते. इंग्रज सरकारने बाजीरावांच्या छावणीमध्ये त्यांचे राजकीय हक्क कायम ठेवून त्यांच्या बंदोबस्तासाठी एक वेगळा युरोपियन लष्करी अंमलदार कमिशनर म्हणून नेमला होता. तो बाजीरावसाहेब हयात होते तोपर्यंत कायम होता.

बाजीरावसाहेब पेशवे यास इंग्रजांनी बिठूर म्हणजे ब्रह्मावर्त हे गाव जहागीर दिले होते. त्या जहागिरीवर पुढे इ. स. १८३२ च्या पहिल्या रेग्युलेशनप्रमाणे

बाजीरावसाहेबास स्वतंत्र अधिकार चालविण्याची परवानगी मिळाली होती. बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त हे इ. स. १८१९ पूर्वी एका परगण्याचे मुख्य ठिकाण होते. तेथे कलेक्टर व जज्ज राहात असत. इ. स. १८१९ मध्ये कानपूर हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण झाल्यानंतर, ब्रह्मावर्त हे चांगले हवेशीर ठिकाण श्री. बाजीरावसाहेबांस देण्यात आले. त्यास ब्रह्मावर्त व रामेल अशी गावे जहागीर देण्यात आली होती. तेथे बाजीराव साहेबांचे लष्कर (camp) वसले. ह्यास ' अरजीलष्कर ' असे म्हणत असत. येथे श्री. बाजीरावसाहेबांचे सुमारे १५,००० लोक राहात असत.

(संदर्भ : ऐतिहासिक स्फुट लेख क्र. ३ द्वारा ' इतिहाससंग्रह ').

(३) बाजीरावांच्या भोजनाच्या पंगतीचे तपशीलही मनोरंजक आहेत :–

स्वतःचे भोजनाचे सोन्याचे ताट (४०० भार) असे. सोन्याच्या २८ वाटचा, सोन्याचे २८ चमचे, हे सर्व चांदीच्या चौकीवर ठेवून जेवण करीत. सर्व मुलांना चांदीचे सामान असे. सर्व मंडळींना सव्वा हात लांब केळीचे पान असे. १० भाज्या, १० चटण्या, कढी व तुपासाठी एक एक द्रोण. तूप पाहिजे तितके वाढीत. सर्व स्वैपाकात तुपाची फोडणी असे. खाशा इतर पंगतीखेरीज पंगतींना रोज पुरणाची पोळी असे. खाशा पंगतीला दोन्ही वेळा वाजंत्री असे. दर पंगतीला रांगोळ्या, पाट, केशरी गंध, उदबत्त्या असत. दररोज शेरभर केशर खर्च होई. अच्छेर उदबत्ती व आरतीसाठी अच्छेर कापूर व अष्टगंध, कधी फुले १ लाख असत.

इष्टी नसल्यास दुपारी १२ वाजता भोजन होई. खाशा पंगतीत १०० पात्रे. तशाच तीन बायकांच्या, तीन सुनांच्या. तीन लेकींच्या, पंगती असत. पंगतीला बरीच मंडळी असत. मुलांच्या स्वयंपाकाखेरीज स्वतः, बायका, लेकी, सूना, यांचा स्वयंपाक एकच असे. मुले निराळ्या वाड्यात असत. खाशा पंगतीचा पात्री खर्च ८ आणे व इतर ठिकाणी पात्री खर्च ३ आणे असे. सर्व मिळून रोज १८०० पात्र रोज एका वेळी असे. तितकेच रात्री असे.

(संदर्भ : भा. इ. सं. मं. त्रै. १८ : ४).

२२. दुसऱ्या बाजीरावांचा निवृत्तीकाल

फेब्रुवारी सन १८१९ पासून बाजीराव बिठूर येथे राहू लागले. मिळणारा भरपूर तनखा, मिळणारे स्वास्थ्य आणि निष्काळजी जीवन यामुळे ७६ वर्षे जगून २८ जानेवारी सन १८५१ रोजी बाजीराव बिठूर येथे वारले. हल्लीच्या रेल्वे स्टेशनजवळ आर्सीलष्कर भागात गंगाकिनारी बाजीरावांनी उत्तराभिमुखी दुमजली, दुचौकी प्रशस्त वाडा बांधला. वाड्याजवळच घाट व ठाकूरद्वार बांधण्यात आले. या ठाकूरद्वारात राम, लक्ष्मण, सीता यांच्या मूर्ती बसवण्यात आल्या. हेच पेशव्यांचे खाजगी मंदिर म्हणून वापरण्यात येई. बाजीरावांना मात्र या वाड्यात समाधान

वाटत नसे. म्हणून यांनी लवकरच आपल्या वैभवाला साजेल असा अत्यंत भव्य वाडा बांधला. त्या नव्या वाड्याला पुण्याच्या शनिवारवाड्याचेच नाव देण्यात आले. वाड्यात प्रशस्त दिवाणखान्यामधून गालीचे, पडदे, शिवाय नक्षीदार आरसे, हस्तीदंत, कलात्मक जिनसा, चिनी काचसामान, मोठी झुंबरे, असे खूप सामान होते. वाड्याभोवती भव्य तट असून वाड्याच्या पटांगणात मोठ्या व खोल सात विहिरी खणल्या होत्या. या वाड्याला 'पेशवे वाडा' असेही म्हणत.

बाजीरावाने कित्येक हत्ती, उंट, घोडे बाळगले होते. हत्तीवरील हौद्यांना सोन्याने व चांदीने मढवले असून हत्तीच्या झुली किनखापाच्या होत्या व त्यावर सोनेरी नक्षीकाम केलेले होते. उंट व घोडे अशाच प्रकारे शृंगारलेले होते. बाजीराव व त्यांचे अनुयायी यांना राहण्यासाठी ब्रिटिश सरकारने बिठूरला जहागीर दिली होती. ही सरकार मर्जीनुसार केव्हाही परत घेऊ शकेल अशी होती. जहागिरीच्या कक्षेत रहाणाऱ्या लोकांना बाजीरावांचे अनुयायी समजण्यात येई. वाद झाल्यास बाजीरावाजवळच्या ब्रिटिश कमिशनरचा निकाल अंतिम समजण्यात येई. जहागीर ब्रिटिश सरकारच्या मुलकी, फौजदारी कोर्टाच्या कक्षेबाहेर असून अंमल पेशवे सरकारचा पण नियंत्रण गव्हर्नर जनरल इन् कौन्सिलचे असे. बाजीराव आणि ब्रिटिश अधिकारी यांचेमधील सर्व पत्रव्यवहार बाजीरावाजवळील ब्रिटिश कमिशनरमार्फत चाले. बाजीरावाकडून येणारी उत्तरेही त्याच मार्गाने जात.

ब्रिटिश सरकार बाजीरावाला 'पेशवा' मानीत नसे व 'महाराज बाजीराव बहादुर' असे संबोधीत असे. याबद्दल बाजीराव फार नाराज होता. पेशव्यांचा तनखा हप्त्याने मिळे. बाजीरावाने वाराणसी, प्रयाग, गयेच्या यात्रा केल्या. धर्मकार्यासाठी बाजीरावाने खूप पैसा खर्च केला. बाजीराव स्वत: विद्वान असून त्याची वाणी अस्खलित व आकर्षक असे. बाजीरावांचे अंगी धैर्य व धडाडी हे गुण नसले तरी त्याचा चेहरा रुबाबदार व व्यक्तिमत्व दुसऱ्यावर छाप पाडणारे होते. बाजीरावाने उरलेले आयुष्य व्रतेवैकल्ये करण्यात घालवले. यातच गुंतून गेल्यामुळे त्याची गतवैभवाची, सत्तेची व प्रचंड प्रतापी साम्राज्य नष्ट केल्याची स्मृती नष्ट होऊ शकली. जुनी स्मृती व मानसिक त्रास त्याने कधी बाहेर दिसू दिला नाही.

सन १८५१ सालच्या जानेवारीत बाजीरावाला दुखणे आले व २८ जानेवारीला तो वारला. त्याचे और्ध्वदेहिक त्याच दिवशी नानासाहेबांचे हातून झाले. ३१ जानेवारी, सन १८५१ रोजी कमिशनर कर्नल मॅन्सन याने ही गोष्ट सरकारला पत्राद्वारे कळवली. (संक्षिप्त)

(संदर्भ : 'नानासाहेब पेशवे आणि १८५७ चे बंड' – डॉ. वा. रा. ढमढेरे)

२३. दुसरे बाजीरावांचे मृत्यूपत्र ॥ श्री ॥ (गुलमोहोर)

मृत्युपत्र सरकार श्रीमंत महाराज राजश्री बाजीराव रघुनाथ पंतप्रधान सुरू सन अर्बेन मयातैन व अलफ शक १७६१ विकारीनाम संवत्सर मुताबिक सन १८३९ ईसवी सरकार दौलतमदारा, इंग्लिस्थान सरकार कंपनी, इंग्लिस्थानचे सरकार (आदि) सर्वास माहीत आणि जाहीर होण्यासाठी लिहिले जात आहे की, चिरंजीव राजश्री धोंडोपंत नाना, सर्वात ज्येष्ठ पुत्र व चिरंजीव गंगाधरराव तिसरे कनिष्ठ पुत्र व सदाशिवराव दुसरे पुत्र होते, त्यांचे पुत्र पांडुरंगराव – नातु ही आमची चिरंजीव संतती आहे. आमच्या पश्चात धोंडोपंत नाना हे ज्येष्ठ पुत्र मुख्यप्रधान, पेशवाईचे व येथील (ब्रह्मावर्त) चे दरोबस्त राज्याचे व दौलतीचे व देशमुखी आदि वतनांचे व द्रव्यादिकांचे आणि जे काही आमचे आहे त्या सर्वाचे खावंद अधिकारी व मालक आहेत. त्यांनीं वंशपरंपरा पेशवाई आदि राज्याधिकार व उपरोक्त दौलतीचा उपयोग करावा व करतील आणि त्यांचे कनिष्ठ बंधू गंगाधरराव व पुतणे पांडुरंगराव सदाशिव यांना व त्यांच्या पुत्रपौत्रादिकांना वंशपरंपरा बंधुत्वाच्या अनुसार संरक्षण व सेवकादि प्रजेचे पालन न्यायानुसार धोंडोपंतनाना तसेच त्यांचे पुत्रपौत्रादिक वंशपरंपरेने करतील आणि गंगाधरराव, पांडुरंगराव यथाक्रम सेवकादि प्रजाजनांनी धोंडोपंतनाना मुख्य प्रधानांच्या आज्ञेनुसार एकनिष्ठेने व्यवहार आणि सेवा करणे जरूर आहे. (जर) आम्हाला एखादा औरस पुत्र झालाच तर तो येथे लिहिल्याप्रमाणे मुख्य प्रधानाचे पेशवापद, इकडचे सर्व दरोबस्त राज्य दौलत व देशमुखी इत्यादि वतन व धनदौलत इत्यादी सर्वांच्या, जे काही आमचे आहे त्या सर्वांचा वंशपरंपरागत खाविंद व अधिकारी व मालक (होईल) त्याला बंधू वर्गाचे संरक्षण व सेवकादि प्रजेचे पालन यथान्याय केले पाहिजे. धोंडोपंतनाना आदि सर्वांनी पुत्रपौत्रादि वंशपरंपरा त्यांच्या आज्ञेत वागले पाहिजे हे मृत्यूपत्र अक्कल हुषारीने * (आपल्या स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिले आहे.) लिहून ठेवले आहे. छ. ४ सवाल मार्गशीर्ष शुक्ल पंचमी मुताबिक * (शके मजकूर) तारीख ११ डिसेंबर * सन १८३९) अधिक काय लिहिणे ?

साक्षी– मेनसन साहेबाची सही इंग्रजी

१ साक्षी– रामचंद्र व्यंकटेश सुभेदार

हे पत्र आमच्या समक्ष लिहिले गेले आहे आणि श्रीमंत पंतप्रधानांच्या स्वाक्षरीने पूर्ण झाले आहे. त्याच्यावर आमच्या समक्ष मोहोर करण्यात आली आहे. ता. ३० एप्रिल १८४१ – दस्तुरखुद्द

---

* हा मजकूर 'नानासाहेब पेशवे आणि १८५७ चे बंड' या पुस्तकात छापलेल्या मृत्यूपत्रात आहे.

१ साक्षी – नारायण रामचंद्र सुभेदार
१ साक्षी – बापूजी सखाराम गोडबोले
१ साक्षी – विनायक बल्लाळ गोखले
१ साक्षी – रामचंद्र गणेश भिडे
(संदर्भ : 'बंडवाले नानासाहेब'– लेखक पु. पां. गोखले.)

या मृत्युपत्राची मूळ प्रत रा. रा. रामचंद्र व्यंकटेश सुभेदार यांनीच लिहिली व तीवर खि. १८४१ एप्रिल ३० या दिवशी बाजीरावांनी स्वहस्ते सीमा म्हणजे 'बहुत काय लिहिणे मोर्तब' ही समाप्ती घालून आपली मुद्राही अंकिली असे सुभेदारांच्या साक्षीखाली स्पष्टच लिहिले आहे.

२४. धाकटे चिमाजीआप्पा पेशवे यांचे निधन

चिमणाजी रघुनाथराव म्हणजे चिमाजीआप्पा पेशवे दुसरे त्यांच्या मृत्यूची 'दर्पण' वृत्तपत्रात आलेली समकालीन बातमी :

चिमाजीरावाचा मृत्यू

आह्मी ऐकतो कीं चिमाजीराव आपासाहेब बाजिरावाचे कनिष्ठ बंधु हे मेल्याची बातमी मुंबईत आली आहे. ते काशीत वैशाख वद्य ३० स म्हणजे मे महिन्याचे २९ वे तारिखेस वारले. आपा साहेबांचा जन्म सन १७८४ चे एप्रिल महिन्यांत गोदावरीचे काठी कोपरगावात झाला होता. त्यांचा बाप रघुनाथराव वारला तेव्हां त्याची आई आनंदीबाई गरोदर होती, आणि पुढें कांहीं महिन्यांनंतर आपासाहेबांचा जन्म झाला. त्या वेळेस नाना फडणवीस यांचे साशंक मसलती प्रमाणे राज्य चालले होते, म्हणोन चिमाजीराव, त्यांची आई आनंदीबाई, त्यांचा भाऊ बाजीराव, व त्यांचे बापाचा दत्तकपुत्र अमृतराव ही सर्व सन १७९३ पर्यंत कोपरगावीं कैदेत होती. नंतर त्यांस नाशिकजवळ आनंदवेलीस नेलीं, व पुढले वर्षाचे एप्रिल महिन्यांत त्यांस तेथून शिवनेरीचे किल्ल्यावर बंदींत ठेविलीं. जेव्हां सन १७९५ त माधवराव पेशवे हे जून्ये वाड्यावरून उडी घेऊन मेले व तेव्हाच नाना फडणविसाने काम सोडलें, त्या संधीस बाजिरावाचे पक्षाचे लोकांनीं त्यास राज्यावर स्थापिला. पुढे लवकरच नवा प्रधान बाळोबा तात्या याणे बाजिरावापासून कित्येक मंडळी फोडून शिंदे व परशुरामभाऊ पटवर्धन यांचे मदतीने बाजीरावास अधिकारावरून काढिला; आणि माधवरावाची बायको यशोदाबाई इला चिमाजी आपा दत्तक देऊन चिमाजी माधवराव या नांवानें त्यास गादीवर बसविला परंतु सर्व संस्थानी व इंग्लिश सरकार याणीं बाजिरावाचा अधिकार कबूल केला, म्हणोन त्यास पुढील डिसेंबराचे ४ थ्ये तारिखेस अधिकारावर आणिला, आणि चिमाजीआंपास तेथून काढून आपले भावाचे राज्याचा अपहार केला म्हणोन त्या

कडून प्रायश्चित्ते करविलीं. तेव्हांपासून त्याणे राज्य कारभारात अगदी मन घातले नाही, आणि बाजीरावाचे दरबारांतील वर्तमानाची कांहीं काळजी केली नाहीं. इंग्रेजांनीं पेशव्यांचें राज्य घेतले त्या वेळेस आपासाहेब त्यांचे स्वाधीन झाला, आणि त्यांचे अनुमतानें काशीस जाऊन विलायती सरकारने वर्षास २००००० ची नेमणूक केली ती घेऊन तेथे राहिला. त्याची मागें कांहीं संतति नाहीं.

(संदर्भ : स्फुट लेख– 'दर्पण' ता. २० जुलै सन १८३२.)

२५. दुसरे नानासाहेब पेशवे यांची व्रतबंध पत्रिका

'अखंड लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री ...... चे सेवेसी बाजीराव रघुनाथ प्रधान यांचे नमस्कार विशेष. तिसा अशरेन मयातेन व अलफ चिरंजीव राजश्री धोंडोपंत नाना याचा व्रतबंध माघ शुक्ल पंचमी रविवारला निश्चित केला आहे. तरी आपण सहपरिवार येऊन मांडव शोभेची वृद्धी करावी. कार्य सिद्धीस नेण्यास श्रीसमर्थ आहे. कळावे बहुत काय लिहिणे ?*

(मोहोर) बाजीराव रघुनाथ.

(वामनरावजी खंडेराव भालेराव ग्वाल्हेर यांच्या दप्तरातून.)
(संदर्भ : बंडवाले नानासाहेब– ले. पु. पां. गोखले.)

२६. बाळाजीपंत नातू यांचे निधन

शनिवारवाड्यावर ब्रिटिशांचा 'युनियन जॅक' फडकवल्यामुळे समाजाच्या रोषाला पात्र ठरलेले उत्तर पेशवाईतील सरदार बाळाजीपंत नातू यांच्या मृत्यूची 'ज्ञानोदय' वृत्तपत्रात आलेली समकालीन बातमी :

बाळाजीपंत नातूंचा मृत्यू

बाळाजीपंत नातू हे काशीयात्रेला गेले होते तेथे ते जूनचे २४ तारखेस मरण पावले. त्यांनी माजी नामदार अलफिन्स्टन साहेब बहादूर यांस फार मदत केली कंपनी सरकारचा व पेशव्यांचा बिघाड झाला, त्यावेळेस सरकारचे उपयोगी पडले व वक्तशीर बातमी वगैरे दिल्ही. तेणेंकरून. नामदार अलफिन्स्टन साहेब यांचा बचाव झाला. या कारणास्तव सरकारकडून पांचशे रुपये दरमहा वेतन पावत होते. नंतर १२,००० रु. साल पेन्शन करून दिल्हें व गाव इनाम वीस हजारांचे दिल्हें. कांहीं दिवसांनीं वेतन बंद झालें. इनाम चालत आहे ते पुढें पुत्राकडे चालत राहील.

– 'ज्ञानप्रकाश' जुलई १८४९ इसवी.

(* बहुत काय लिहिणे ? हे शब्द बाजीराव रघुनाथचे हातचे)

२७. नानासाहेब पेशवे यांच्या कैदेसाठी इनाम

१९ ऑगस्ट सन १८५७ च्या हिंदुस्थान सरकारच्या राजपत्रात गव्हर्नर जनरल व त्याचे कौन्सिलमार्फत खालील मजकूर प्रसिद्ध झाला व हाच मजकूर ६ ऑक्टोबर १८५७ च्या रोजी आग्र्याच्या राजपत्रात पुन्हा प्रसिद्धीस देण्यात आला :–

'श्रीमंत धोंडोपंत नानासाहेब कानपूर जिल्ह्यातील बिठूरचे, (ज्यांना नेहमी नानासाहेब असे म्हणण्यात येते.) त्यांना पकडून जवळच्या मुलकी अगर लष्करी ठाण्यावर हजर करील त्या कोणत्याही व्यक्तीला अगर व्यक्तींना गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ५०,००० पन्नास हजार रुपयांचे बक्षीस देतील. त्यांना पकडून देण्याबद्दल जो बातमी देईल अथवा पकडण्यास मदत करील त्यालाही हे बक्षीस देण्यात येईल. याशिवाय त्याने बंडात केलेल्या सर्व गुन्ह्यांची त्याला माफी देण्यात येईल. मात्र ब्रिटिश प्रजाजनांचा खून करण्याचे ज्यांनी काम केले असेल त्यांना ही माफी लागू होणार नाही.

नानासाहेबांना पकडणे सोपे जावे म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णनही राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले होते.

(संदर्भ : 'नानासाहेब पेशवे आणि १८५७ चे बंड' – डॉ. वा. रा. ढमढेरे.)

२८. बयाबाई आपटे विवाह

(दुसरे बाजीरावसाहेब पेशवे यांची कनिष्ठ कन्या.) शके १७७७ त बयाबाईसाहेब यांचे लग्न ब्रह्मावर्तास झाले त्यावेळी त्यांचे वय नऊ वर्षाचे होते. हे लग्न बायजाबाई शिंदे यांनीच केले असे म्हटले तरी चालेल. कारण लग्नासंबंधी गोष्ट बाबासाहेब आपटे याजपाशी निघाली असता त्यांनी बायजाबाईस निक्षून सांगितले की, ' श्रीमंतांनी जरी राज्य सोडले तरी त्यांच्याबरोबर आमच्यासारख्या गरिबांनी संबंध करणे बरे नाही, कारण मुलीच्या अंगावर घालण्याकरिता त्यांच्या इतमामाला शोभतील अशा तऱ्हेचे दागिने आणावयाचे कोठून ? ' बाबासाहेबांचे हे शब्द ऐकताच बायजाबाई उत्तरादाखल म्हणाल्या ' तुम्हाला काय कमी आहे ? आज चार हत्ती दाराशी आहेत. तुमचे घराणे कुलीन असून रावसाहेबही चांगले देखणे व हुषार असून कर्तृत्ववान आहेत. तुमच्या मातोश्रीचेही म्हणणे माझ्याचप्रमाणे असून रावसाहेबांचा विवाह जुळून यावा अशी त्यांची इच्छा आहे. आमचे म्हणणे तुम्ही मोडणार नाही हे जाणूनच मी श्री. नानासाहेब पेशवे यांना कायमचा रुकार पूर्वीच दिला आहे. आता दागिन्यांसंबंधाने तुम्ही म्हणत असाल तर त्या संबंधाने काळजी करण्याचे तुम्हाला काय कारण आहे ? ' अशा आशयाचे भाषण करून अजमासे तीन लाखांच्या ऐवजांनी भरलेली दोन ताटे आणवून बायजाबाईसाहेबांनी

त्यांचेपुढे ठेविली. तेव्हा बाबासाहेबांना लग्न करणे भाग पडले.

पुढे ग्वाल्हेरीहून वऱ्हाडी मंडळी गाड्या ३००, डंका, निशाण, स्वार शिपाई व हत्ती अशा सरंजामानिशी थाटाने निघाली. प्रत्येक मुक्कामावर श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी वऱ्हाडे मंडळींची बडदास्त उत्तम प्रकारे ठेवली होती. सीमांत पूजनाचे वेळी वरपक्षाकडील मंडळींनी दागिन्यांची ताटे आणून ठेविली. खुद्द श्रीमंतांनी ही ताटे पाहिली आणि ते म्हणाले, 'आपली ही ताटे कशास पाहिजेत ? ' असे म्हणून जवळ जवळ ७–८ लाखांच्या दागिन्यांनी भरलेली पांच ताटे त्यांनी आणून ठेविली. लग्न समारंभ एक महिनाभर चालला होता. इतक्या मुदतीत गावात कुणी चूल पेटवू नये अशी सक्त ताकीद फिरली होती. यावेळी अन्नदान फार करण्यात आले. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी एक लाख रुपये येण्याजाण्याच्या खर्चास दिले व लग्नाप्रीत्यर्थ एकंदर खर्च अजमासे दहा लाखांपर्यंत झाला.

(संदर्भ : ' हिंदुस्थानातील आपटे घराण्याचा इतिहास ' – गो. वि. आपटे, आ. सन १९१४).

२९. अमृतराव पेशवे : बागांचा लिलाव

श्रीमंत अमृतराव पेशवे यांच्या पुणे प्रांतातील बागांचा लिलाव करण्याविषयी जाहिरात :

' सर्वांस कळविण्यात येतें जें × × व खुर्द तालुके हवेली जिल्हा पुणे × × अमृतरावसाहेब यांचे बागांचे मालांविषयी लिलाव तारीख २ मार्च सन १८५७ इसवी रोजीं पुणे कलेक्टरचें कचेरीत बारा वाजतां होणार आहे, याकरितां त्याविषयीची माहिती कोणास करून घेणे असेल तर लिलावाचें ठिकाणीं जाऊन करून घ्यावी. ता. १६ फेब्रुवारी सन १८५७ इसवी.

नाना मोरोजी डिपुटी कलेकटर

– ' ज्ञानप्रकाश ' २ मार्च सन १८५७ इसवी.

(टिप: × × या ठिकाणचा मजकूर फाटला आहे.)

३०. श्रीमंत सौभाग्यवती बयाबाई आपटे यांचे एक पत्र

श्रीमंत (दुसरे) बाजीरावसाहेब पेशवे यांची कनिष्ठ औरस कन्या सौ. बयाबाई साहेब आपटे यांनी, धाकटे चिमणाजी आप्पासाहेब पेशवे यांचे नातू चिमणाजी गणेश थत्ते यांना (लष्कर) ग्वाल्हेरहून लिहिलेले पत्र –

॥ श्रीशिव ॥

चिरंजीव सहस्त्रायु रा. चिमणाजीराव थत्ये मुा श्रीकाशी याशि प्रति – सौ. कुसुमाबाई बयासो आपटे अनेक आशिर्वाद वि. तुम्हाकडील मजकूर पेशजी

उपाधिण वाई याणी सांगीतल्यावरून विदित होऊन संतोष जाहला तुम्हास आम्हाकडील मजकूर माहितच आहे त्याप्रमाणे तुम्ही आपले अर्जाबरोबर आम्हा विषईचा अर्ज गवरमिंट सरकारास अवश्य करावा अनमान करू नये कारण बलव्याचे पूर्वीपासून आपली व्यवस्था तर सरकारास जाहीर आहे यास्तव अशा दुर्घर प्रसंगातून त्याणि आम्हांस व तुम्हांस आपलेजवळ आश्रय दिला तेव्हां त्यांची विशेषता काय वर्णावियाची ? तरि त्याणी असा अंगिकार केला ते याप्रसंगी आपले पोषण करण्याविषई उपेक्षा कधिही करणार नाहीत आता ती श्रीमंत महाराजांचे पश्चात सर्वोपरी इज्जतीनें आपला सांभाळ करणार तेच सरकार आहेत दुसरे कोणी नाही हे तुम्ही जाणितच आहा का कि आम्ही स्त्री व्यक्ती आणि तशात परस्वाधीन यामुळे स्वतः आम्ही उद्योग करू शकत नाही व तुम्हाखेरिज आमचा स्वकीय आप्त आणि विश्वासुकही अन्य कोणी नाही हे तुम्हास माहित आहे या करिता त्यांचे हुजूर हाजर होऊन आमचा वाका निवेदन करण्यास व त्याबद्दल हरएक प्रकारची आम्हाकडून मदतगारी करण्यास्तव तुम्हास कुलअखत्यार आम्ही दिला आहे ये विषई आता अनमान किमपिही करू नये सबब हे पत्र तुम्हास मुद्दाम पाठविले आहे पावल्याचे उत्तर आपलेकडील कुशल वृत्तासह जरूर सत्वर पाठवावे कळावे बहूत काय लिहिणे हे आशिर्वाद मि. वैं. व ७ शके ९३ मुा लष्कर नजीक ग्वाल्हेर (मे ११ इ. स. १८७१).

[सही] : कुसुमाबाई बयासोा आपटे द. खु.

(संदर्भ : ' संशोधक ' डिसेंबर १९८४)

३१. पेशवा परिवारातील स्त्रिया

ब्रिटिशांच्या अधिकृत नोंदीप्रमाणे पेशवा परिवारातील स्त्रियांची माहिती पुढीलप्रमाणे उपलब्ध आहे. त्यात बैजाबाई असे बाजीरावांच्या एका मुलीचे नाव व माहिती आहे. ती बयाबाई असण्याचा संभव आहे. तिचे १८६३ साली वय १२ दिले आहे ते चूक आहे. कारण तिचा जन्म जानेवारी १८४७ चा आहे. माहिती :

१. मैनाबाई – बाजीरावाची विधवा, जात : दक्षिणी ब्राह्मण, वय : १९ वर्षे, शरीरयष्टी : कृश व छोटी, रंग गोरा, चेहऱ्याचा आकार : छोटा, नाक : लहान व चपटे, डोक्यावर चिन्ह : ? डोळे : गोल, चेहऱ्यावर चिन्ह : ? शेरा : ?

२. सेवीबाई (सईबाई ?) – बाजीरावाची विधवा, जात : दक्षिणी ब्राह्मण, वय १८ वर्षे, शरीरयष्टी : उंच व एकेरी, रंग : गोरा, चेहऱ्याचा आकार : लांबट, नाक : मोठे व लांब, डोळ्यावर चिन्ह : ? चेहऱ्यावर चिन्ह : डोळे : विशाल, शेरा : ?

३. बैजा साहब – बाजीरावाची मुलगी. जात : दक्षिणी ब्राह्मण, वय १२ वर्षे, शरीरयष्टी : उंच व कृश, रंग : गोरा, चेहऱ्याचा आकार : गोल, नाक : सरळ, डोक्यावर चिन्ह : ? डोळे : गोल, चेहऱ्यावर चिन्ह : ? शेरा : ?

४. कृष्णाबाई – नानाची धर्मपत्नी. जात : दक्षिणी ब्राह्मण, वय : १७ वर्षे, शरीरयष्टी : स्थूल व छोटी, रंग : गोरा, चेहऱ्याचा आकार : रुंद, नाक : विशाल, डोक्यावर चिन्ह : ? डोळे : गोल, चेहऱ्यावर चिन्ह : चेचकचे चिन्ह, शेरा : मस्तक झुकवून चालते.

५. काशीबाई – बाळासोची धर्मपत्नी. जात : दक्षिणी ब्राह्मण, वय २३ वर्षे, शरीरयष्टी : उंच, रंग : गोरा, चेहऱ्याचा आकार : लांबट, नाक : सुकोमल व लांबट, डोक्यावर चिन्ह : ? डोळे : मोठे. चेहऱ्यावर चिन्ह : चेचकचे चिन्ह. शेरा : अत्यंत लांब व काळे केस.

६. रमाबाई – रावसाहेबांची धर्मपत्नी. जात : दक्षिणी ब्राह्मण, वय : २५, शरीरयष्टी : स्थूल आणि मध्यम, रंग : गोरा, चेहरा : गोल, नाक : रुंद व चपटे, डोक्र्यावर चिन्ह : डोक्यावर केस नाहीत, डोळे : गोल, चेहऱ्यावर चिन्ह : चेचकचे चिन्ह, शेरा : ?

(संदर्भ : ' संकानेजी ' परिशिष्ट पृ. ८, आधार – नॉर्थवेस्टर्न प्रान्त प्रोसि. डिपा. पोलि. जाने. ते जून १८६४. भाग १. पोलि. डिपा. ए. पृ. १८जुलै १८६३ नं. ७२ इन्डेक्स नं. १७).

३२. बयाबाई आपटयांनी सांगितलेली हकीगत

(दुसऱ्या बाजीरावांच्या दत्तक मुलांसंबंधीचा भाग) औरस संततीची निराशा वाटून बाजीरावांनी धोंडोपंत नानासाहेब, दादासाहेब व बाळासाहेब असे तीन मुलगे एकामागून एक दत्तक घेतले. हेतू हा की, पूर्वजास पाणी देण्यास कोणीतरी रहावा. नानासाहेब, दादासाहेब व बाळासाहेब यांची पूर्वीची नावे अनुक्रमे धोंडोपंत, सदाशिवराव व गंगाधरराव अशी होती ... नानासाहेब व बाळासाहेब यांचेशीही त्यांचे तेच नाते होते ... हे चवघेही जवळजवळ समवयस्क होते. त्यांचा काळ घोडयावर रपेट करणे, दांटपट्टा खेळणे, इत्यादि मर्दुमकीच्या खेळात जात असे. तात्या टोपे यांचे सवंगडी होते. नानासाहेब घोडयावर बसण्यात तरबेज असून तत्कालिन अश्वपरीक्षकांमध्ये वगैरे त्यांना मान वरचा असे. रावसाहेबही कमी नव्हते.

दुसरे नानासाहेबांचा अंत भाद्रपद वद्य १४ बुधवारी शके १७८० रोजी झाला. आजारात नानासाहेब ५–६ शेलक्या लोकांसह देवखरीच्या रानात एका ओढयालगत राहिले. तेथेच त्यांचा अंत्य व दहन विधी झाला. नंतर अस्थी गोळा करून त्याच दिवशी बरोबरची मंडळी ठाडयास परतली. ठाडा येथे बारावा तेरावा करून नंतर स्त्रियादि परिवार काही दिवस तेथेच राहिला, त्या परिवारात श्रीमंत मातुश्री गंगाभागिरथी बयाबाईसाहेब आपटे याही होत्या. बयाबाईबद्दल कै. वि.

का. राजवाडे म्हणतात, "नानासाहेबांची उत्तरक्रिया त्यांच्या देखत ठाड्यास झाली. त्या काळी कुसुमाबाई आपटे यांचे वय १२ वर्षांचे होते. त्यांना सर्व गोष्टी यथास्थित कळत होत्या व त्यांनीच मेहेरनजर करून आम्हास ही हृदयद्रावक हकीगत इत्थंभूत मित्तीसुद्धा निवेदन केली."

(संदर्भ : भा. इ. सं. मं. इतिवृत्त शके १८३५.)

३३. नानासाहेब पेशव्यांचे अखेरचे दिवस

सन १८५७ च्या बंडातील पराभवानंतर नानासाहेब आपल्या परिवारासह नेपाळात गेला याबद्दल शंका नाही. 'नानासाहेब' म्हणून अनेकांना इंग्रजांनी फाशी दिले पण खरा नानासाहेब फाशी गेलाच नाही हे निश्चयपूर्वक खरे. नानासाहेब फाशी गेला यावर इंग्रज सरकारचाही विश्वास नव्हता. नानासाहेबाच्या परिवारातील सिद्धमान नावाच्या इसमाने परिवारातील स्त्रियांकडून तोंडी समजल्यानुसार नेपाळचा प्रधान जंगबहादूर याला नानासाहेब ता. २४ सप्टेंबर सन १८५९ रोजी वारल्याचे कळवले. अशा आशयाचे पत्र इंग्रज रेसिडेंटने (बातमी संशयास्पद अशा टिपणासह) विलायती सरकारला ८ ऑक्टोबर सन १८५९ रोजी लिहिले. नानासाहेबांविषयी इंग्रजांची चौकशी इतःपरही चालूच होती. देवखुरी येथे नानासाहेब वाख्याने मेला यावर कोणाचाच विश्वास नाही. नानासाहेबांवरचे संकट टाळण्यासाठीच परिवारातील स्त्रियांनी हा व्यूह रचला असावा. उत्तरक्रियेत प्रेत जाळले ते दुसरेच. नानासाहेबाचे नाही.

दुसऱ्या बाजीरावाची बायको सईबाई हिने जवळचे १०,००० रु. चे जवाहीर विकून नानासाहेबांची क्रिया कार्तिक शु. १० संवत् १९१६ रोजी केल्याचा पुकारा केला. कदाचित् क्रियेचा देखावा झाला असेल. सिद्धमानची पत्रे जंगबहादूरला तराईतून गेली आहेत. नानासाहेब व बाळासाहेब तेथेच होते. बाळासाहेब त्याच सुमाराला वारले. देवखुरी येथे नानासाहेब वाख्याने वारला असा बोभाटा आहे. यावरून नानासाहेब मेल्याच्या हकीगतीत राजकारण असले पाहिजे असा संशय येतो.

नानासाहेबाची पत्नी कृष्णाबाई हिचे माहेर करमरकरांकडे. करमरकरांचे म्हणण्यानुसार नानासाहेब तिबेटकडे गेले. कृष्णाबाई अखेरपर्यंत सौभाग्यचिन्हे बाळगून असल्याचे प्रत्यक्ष बापाचेच वृत्त ठगी दप्तरात * नमूद आहे. नानासाहेबांस पकडून देणारास एक लाख रुपयांचे बक्षीस इंग्रज सरकारने जाहीर केले होते. त्याच्या लोभाने नानासाहेबास आम्ही पाहिले असे सांगणारे अनेक लोक वारंवार पुढे येत. थापाथळी येथे राहत्या वाड्यात बैराग्याच्या मेळ्यात नानासाहेब येऊन राणीस भेटे व त्याचसाठी राणी म्हणजे नानासाहेबाची बायको बैराग्याना शिधाव

---

* 'ठगी दप्तरा'तील मजकूर विश्वसनीय नाही.

कपडे वाटी असाही संशय घेण्यात येत असे. सन १८९५ पर्यंत तरी नानासाहेब जिवंत असल्याच्या बातम्या कानावर येत होत्या.

[पेशवा परिवाराचे निकटवर्ती राजारामपंत करमरकर यांनी सांगितलेली हकीगत]

(संदर्भ : 'हिमालयात'– ले. ना. गो. चापेकर.)

३४. नानासाहेब पेशवे परिवार

पेशवे परिवाराचे जुने निकटवर्ती अशा करमरकर कुटुंबियांपैकी एक वृद्ध गृहस्थ राजाराम गणेश करमरकर यांनी ना. गो. चापेकरांना पेशवे परिवाराविषयी सविस्तर माहिती दिली. (स. १९४०) त्यांपैकी संक्षिप्त भाग : श्री. करमरकर बालपणापासून पेशव्यांच्या वाड्यातच रहात असत.

'सईबाई संवत १९५२–५३ साली–फाल्गुन वद्य संवत १९५३, १ ला पंधरवडा – वारली.* आर्याघाटाजवळ पशुपतीजवळ तिच्या प्रेताचे दहन झाले. सईबाईच्या पश्चात नेपाळात पेशव्यांचे कोणी राहिले नाही. नानासाहेबांची बायको सईबाईच्या अगोदरच वारली होती. त्या वेळी मी लहान होतो. आज माझे वय ६३ वर्षांचे आहे. नानासाहेबांची बायको करमरकरांची मुलगी ती मेली तेव्हा मी ७–८ वर्षांचा होतो. तिला मूलबाळ नव्हते. मरणाच्या वेळी ती सुमारे ४० वर्षांची होती सासवा-सुना दोघी एकत्र राहत असत. सईबाईने लक्ष्मीनारायणाचे मंदिर बांधले. तिच्या राहण्याची जागा थपाथळी. राणीगंज येथे हनुमान मंदिर आहे. ते सईबाईने बांधले. राणीगंज येथे सईबाईने जमीन विकत घेतली होती.

माझी मुंज सईबाईकडेच झाली. १८५७ साली नानासाहेबांबरोबर सईबाई येथे आली. तिला येथे ठेवून नानासाहेब इतरत्र गेले ते पुन्हा ह्या बाजूला आले नाहीत. नानासाहेबांची बायको सवाशीण अशी मेली. नेपाळ सरकारपासून सईबाईने गावे विकत घेतली होती. रामभाऊ नावाचा इसम सईबाईचा कारभारी होता. त्याच्यापूर्वी टोपी नावाचा मनुष्य कारभारी होता. तो पुढे निघून गेला. तात्या टोपी इकडे आलेला नाही. सईबाईने एक मुलगा दत्तक घेण्याच्या हेतूने आणला होता. त्यानेच तिची उत्तरक्रिया केली असावी. तो तिचा भाचा असेल.

सईबाई उंच, गोरी, सडपातळ, अशी होती. ती सोवळी झालेली होती. पेशव्यांची गादी सईबाईबरोबर होती. भगवा झेंडा मी पाहिलेला नाही. नेपाळ हद्दीत नानासाहेब आल्यावर त्यांच्या राहण्याची व्यवस्था नेपाळ सरकारने केली. नानासाहेबांची बायको गोरी, ठेंगणी व काहीशी स्थूल अशी होती. नानासाहेब २'१ वर्षांपूर्वीपर्यंत जिवंत होता. तो चीन देशात जाऊन राहिला होता. येथून तिबेटात गेला व तेथून चीनमध्ये. तेथे तो नेपाळ सरकारच्या सूचनेवरूनच गेला. गादी होती

---

* याबद्दल मिळालेली निश्चित माहिती पुस्तकाचे पृ १७० वर पहा.

ती नारायणराव पेशव्यांची होती. ती तिसऱ्या मजल्यावर ठेवलेली असे. तेथे जाण्यास कोणास परवानगी नव्हती. तेथे रात्री पाणी व फराळाचे पदार्थ दररोज ठेवीत. दिवाही तेवत ठेवीत.

सुनेला ४०० रु. सासूला ८०० रु. दरमहा नेपाळ सरकारातून मिळत. हे वेतन देत तेव्हा नेपाळ सरकारजवळ पेशव्यांचे काही एक धन नव्हते. सईबाई सकाळी ५ वाजता उठून पूजाअर्चा करी. ह्यात तिचे दोन तास जात. पूजेच्या वेळी गवई गात असे. नंतर विश्रांती घेऊन १०॥ वाजता जेवणे होत. दुपारी पुराण होई. ती रात्री फक्त दूध पीत असे. सईबाईच्या परिवारात ५–६ बायका, ५–६ पुरुष व ४–५ स्वयंपाकिणी होत्या. सईबाई वारली तेव्हा ५५–६० वर्षांची होती. नानासाहेब पेशव्यांनी नेपाळात एक तोफ बरोबर आणली होती. ती मात्र म्युझियममध्ये आहे. '

(संदर्भ : ' हिमालयात ' – ले. ना. गो. चापेकर).

गं. भा. बयाबाई आपटे यांनी सांगितलेली बाजीरावांचे परिवारातील स्त्रियांसंबंधी हकीगत – (संक्षिप्त).

दुसरे नानासाहेब सन १८५८ मध्ये नेपाळमध्ये गेले. त्यांचेबरोबर मातोश्री सईबाई, मैनाबाई, नानासाहेबांचे स्वतःचे कुटुंब, बाळासाहेब व त्यांचे कुटुंब, रावसाहेब वगैरे मंडळी होती. शके १७७९ आषाढ ते १७८० भाद्रपद हा काळ ही मंडळी वनवास करीत होती. मुक्काम नेपाळ हद्दीत ५–६ कोसाच्या आत बाहेर जंगलात किंवा जंगली खेड्यात होई... नानासाहेब पेशवे ६ ऑक्टोबर सन १८५८ ला मृत्यू पावले ... पुढे बाजीरावांच्या स्त्रिया मैनाबाई, सईबाई, बाळासाहेबांची स्त्री काशीबाई, नानासाहेबांची स्त्री कृष्णाबाई, बाजीरावांची मुलगी कुसुमबाई या खाशा स्त्रिया मात्र नेपाळमध्ये राहिल्या.

नानासाहेबांचे मृत्यूनंतर या वरील स्त्रियांना फारसा त्रास पोहोचला नाही. काही काळाने ही मंडळी खाटमांडूस गेली. तेथे या बायांजवळचे जडजवाहीर मोडून बाग्मती, रुद्रमती, या नद्यांच्या संगमावरील थापाथळीत जागा विकत घेऊन सईबाईने तेथे राहण्यासाठी वाडा बांधला. ३–४ लाख खर्चून ३–४ जहागिरी गाव योगक्षेमार्थ खरेदी केले. त्यावरून येणाऱ्या ५–७ हजार रुपयांच्या उत्पन्नावर गुजराण चालविली. ' राणीगंज ' हे आपल्या जहागिरीत नवे गाव वसवून तेथे सईबाईने एक रामाचे व एक लक्ष्मीनारायणाचे अशी दोन देवस्थाने स्थापली. लक्ष्मीनारायणाची स्थापना माघ शु. १३, शके १८१४ रोजी झाली. (सोमवार ३० जानेवारी सन १८९३, मोडक जंत्री).

लक्ष्मीनारायणाचे देवळात तीन भाषांत – संस्कृत, मराठी, नेपाळी– शिलालेख कोरलेले आहेत. मैनाबाई, काशीबाई, कृष्णाबाई ह्या सईबाईच्या अगोदर काही

वर्षे वारल्या होत्या. या चौघी बायांनी कालक्रमणा अगदी साधू रीतीने केली असे त्रयस्थ सांगतात. सईबाईने पुढील गावे नेपाळात विकत घेतली. (१) गोविंदपूर, (२) सिर्सिया, (३) धनगढवा, (४) पोषरिया, (५) सिमर्वारि, (६) बरवा, (७) मदनपूरकट्टी, (८) बेरियाकट्टी. नेपाळमध्ये सईबाईला महाराणी म्हणत. सईबाईच्या मृत्यूनंतर नेपाळ सरकारने त्यांची जहागीर बीनवारशी म्हणून जप्त केली. सईबाईच्या पश्चात नेपाळात कोणीही राहिले नाही.

३५. सईबाई पेशवे

सईबाई वगैरे पेशवे परिवारातील स्त्रिया नेपाळात राहात असताना नेपाळचे दिवाण जंगबहादूर यांनी, पेशवे परिवाराला कसलीही अडचण पडू नये, म्हणून एक सुभेदार नेमला होता. दिमतीला नानासाहेबांची दासी भीमा, दोन मोलकरणी, मीरमुन्शी बाळाराम, कारभारी रामभाऊ आणि कोठीवाला परशुराम असा परिवार होता. शिवाय सोळा गुरखे पहारेकरी दिले होते. रात्री नऊची तोफ झाल्यावर कोणाही पुरुषाला पेशवे-महालात प्रवेशच नव्हता. पेशवे परिवारात वडिलकीचा मान सईबाई यांचाच होता. म्हणून त्याच सर्व कारभार हाकीत सईबाईने उभारलेल्या मिळकतीवर कसलाही कर नेपाळेश्वरांनी ठेवला नाही.

आपल्या मिळकतीला ' राणीगंज ' हे नाव देऊन सईबाईंनी स्वतंत्र पेशवाई कारभार सुरू केला. तो नेपाळेश्वरांनी चालू दिला. नेपाळचे लोक सईबाईंना ' दक्षिणी राणी ' म्हणूनच ओळखत. राणीगंजातील सर्व दिवाणी, फौजदारी कारभार स्वतः सईबाईच पाहत. पेशवे-वाड्यात घोडे, गाड्या, शिपाई, स्वार, सर्व काही लवाजमा व सरंजाम थाटण्यात आला. ' विष्णुकली ' नावाची हत्तीण रोज पेशवेगादीला सकाळी सोंडेने कुर्निसात करण्यास चुकत नसे. जंगबहादूर सईबाईला देवतेसमान मानत असे. तो रोज तिचा समाचार घेत असे. सईबाई वाड्याबाहेर पडल्याच तर त्यांच्यावर सोन्याची मूठ असलेले छत्र धरण्यात येत असे.

महाशिवरात्रीचे दिवशी पशुपतेश्वराचे दर्शन घेण्याचा सईबाईंचा नेम असे. त्यासाठी छत्रे – चामरे ढाळत त्यांची स्वारी निघे. गोविंदपुरात सईबाईने रोजच्या दर्शनाची सोय लक्ष्मीनारायणचे मंदिर बांधून केली होती. पूजाअर्चा, कथा–कीर्तनाची सोय पुणेरी पद्धतीने असे. सईबाई व्यवहार-कुशल असल्याने पेशवे-परिवाराच्या या संकटकाळी त्यांनी समयसूचकतेने पेशवे परिवारातील महिलांची प्रतिष्ठा तेजस्वीपणाने संभाळली. सईबाईंना शस्त्रविद्या अवगत होती आणि घोड्यावर स्वारी करणे ही त्यांची सहज लिला होती. त्यांनी आपल्या बाणेदार व स्निग्ध वागण्यामुळे लोकप्रियताही संपादन केली होती.

नानासाहेबांची पत्नी कृष्णाबाई या सुनेने सईबाईचा कित्ता गिरवून आपल्या विनयाने पेशवे-कुलातील 'विनयवतीकांता' परंपरा उज्वलतेने संभाळल्यामुळे ती आपली सासू सईबाई व प्रजा या दोघांनाही आदर्श वाटे. दिवाण जंगबहाद्दर पेशवे परिवारासंबंधी जिव्हाळा बाळगत असले तरी पेशवे-परिवारातील महिलांनी एका पैचीही तोशीस नेपाळेश्वराला लावली नाही. स्वाभिमानाने व विगर लाचारीने सईबाई व पेशवे परिवारातील महिला गुजराण करून राहिल्या.

इंग्रज नानासाहेबांच्या मृत्यूसंबंधी सन १८९६ पर्यंत संशयग्रस्त होते. त्याचा फायदा घेऊन कोणी भारतीयांनी पुन्हा इंग्रजांविरुद्ध उठाव केलाच तर त्यांना उत्तेजित करण्यासाठीच सईबाईंनी नेपाळमध्ये पेशवाईला अज्ञातवासात संभाळली होती. पेशवे-परिवारातील कोणाच्याही मृत्यूनंतर त्याचा अग्निसंस्कार पशुपति-नाथाच्या मंदिराचे परिसरातील देवपाटयामध्ये स्वत.च्या राजघराण्यातील व्यक्तीच्या इतमानाने जंगबहाद्दर घडवीत. तसाच सईबाईचाही दहनसंस्कार झाला.

(संदर्भ : 'बंडवाले नानासाहेब' ले. पु. पां. गोखले)

[असे म्हणतात की, बाजीरावाचे जडजवाहीर त्याच्या विधवा स्त्रियांजवळ होते व पुढे नेपाळ दरबारचे हाती पडले. त्यांपैकी काही रत्ने नेपाळच्या राजाच्या मुगुटात बसवलेली आहेत. – 'नानासाहेब पेशवे व १८५७ चे बंड' – डॉ. वा. रा. ढमढेरे].

३६. बयाबाई आपटे यांचा मृत्युलेख

आम्हांस कळविण्यास अत्यंत वाईट वाटते कीं, शेवटचे बाजीरावसाहेब पेशवे यांची कन्या श्री. गं. भा. बयाबाईसाहेब आपटे यांना नुकतीच काशी येथे देवाज्ञा झाली. यांचा जन्म बाजीरावसाहेब ब्रह्मावर्तास असता, बंडाच्या सालच्या आधी सुमारे दहा वर्षेच झाला होता व त्यांचे सासर ग्वाल्हेरीस होते. यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील लोकांस त्यांचा परिचय विशेष नव्हता तथापि त्या क्वचित् प्रसंगी महाराष्ट्रात येत जात असल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष पाहिलेले असे लोक पुण्यात व इतर ठिकाणी थोडे बहुत असतीलच.

बयाबाईसाहेब यांचा जन्म त्यांच्या वडिलांनी पुणे सोडल्यावर व त्यांचे राज्य गेल्यावर सुमारे ३० वर्षांनी झाला असल्यामुळे त्यांना स्वतःला पेशवाईची अशी आठवण असणे शक्यच नव्हते. पण आपल्या वडिलांची व विशेषतः त्यांचे दत्तक बंधू नानासाहेब पेशवे यांची त्यांना आठवण चांगली होती व त्या वेळच्या तिकडील हकीगती त्या सांगत असताना ऐकणाराला पेशवाईच्या स्मृतीचा आपला धागा अद्यापि अखंड व जिवंत आहे, असेच वाटे. पेशवाई जाऊन शंभर वर्षे झाली, विशेषतः या शंभर वर्षांत महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक स्थितीत जमीन–

अस्मानाचे अंतर पडले. त्यामुळे पेशवाईचा काळ म्हणजे फारच दूरचा काळ आहे असे सकृत्दर्शनी सहजच भासते पण बाजीरावसाहेबांच्या औरस संततीच्या रूपाने पेशवाईचा महाराष्ट्र व आजचा महाराष्ट्र जोडला गेला असल्यामुळे एका अर्थाने पेशवाई ही तितकी दूर असे वाटू नये हेही स्वाभाविकच होते.

बाजीरावसाहेब ब्रह्मावर्तास वारल्याची बातमी पुण्यात आली त्या वेळी ही बातमी येथील सर्वांत जुन्या अशा वृत्तपत्राने म्हणजे 'ज्ञानप्रकाशाने' फक्त एका ओळीत दिली होती! एक ओळीत मृत्यूलेख लिहिला जावा इतकी अप्रियता व्यक्तिशः बाजीरावांनी महाराष्ट्रात मिळवून ठेविली होती. एवढीच गोष्ट त्यावरून सिद्ध होते. आज त्यांच्या कन्येच्या मृत्यूची बातमी देताना आम्ही इतक्या ओळी दिल्या याचा अर्थ इतकाच की स्वतः रावबाजींविषयीचें पासष्ट वर्षांपूर्वीचे महाराष्ट्रातील लोकमत अद्याप कायमच असले तरी निदान ऐतिहासिक दृष्टया पेशवाईविषयीं पासष्ट वर्षांपूर्वी जितकी आस्था होती त्याहून ती आज पुष्कळच अधिक आहे.

काळ जसजसा लोटेल तसतसे पेशवाईतील नादान व्यक्तींचे स्मरणही अधिकाधिक नष्ट होईल व व्हावे अशी आमची इच्छाही आहे. पण शिवाजी-महाराजांनंतरच्या एक दोन पिढ्यांमागून महाराष्ट्रास ग्रासू पहाणारा राष्ट्रीय नादान-पणा ज्यांनी निवारण केला आणि मराठेशाहीच्या नाशाचा दिवस एका शतकाने लांबविला–किंबहुना अव्वल मराठेशाहीत स्वाभाविकपणे आढळून न येणारी मराठी साम्राज्याची कल्पना ज्यांनी दिल्ली व कलकत्ता येथपर्यंत फैलावून मूर्त स्वरूपात आणली, त्यांच्या कर्तृत्वाची आठवण पेशव्यांचा वंशच्छेद झाला तरी बुजणे शक्य नाही. प्रत्यक्ष राजकीय सत्ता नश्वर असो पण कर्तृत्वाची कीर्ती अमर असते.

(संदर्भ : स्फुटलेख, टिपण क्र. १५, केसरी दि. ४–९–१९१७).

३७. न. चिं. केळकर व बयाबाई आपटे यांची मुलाखत

न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांनी त्यांच्या बयाबाई आपटयांशी झालेल्या मुलाखतीचा त्रोटक तपशील स्वतःच्या शब्दांत पुढीलप्रमाणे दिला आहे :

"१९१३ साली एक विलक्षण योगायोग घडून आला. 'तोतयाचे बंड' या आमच्या नाटकाचें प्रयोग त्यावेळीं पुण्यात चालू होते. श्री. बयाबाईसाहेब आपटे या पुण्यास मधून मधून क्वचित् येत, तशा त्या यावेळीही आल्या असून जोगेश्वरीच्या बोळांतील भिडे यांच्या वाडयात उतरल्या होत्या. त्यांना पहाण्याचें व भेटण्याचें कौतुक वाटून आम्ही त्यांजकडे जाऊन बराच वेळ त्यांच्याशी बोलत बसलो होतो. या प्रसंगी आमच्या नाटकाची गोष्ट कोणीं सहज काढली. तेव्हां, "आपल्या इतिहास-प्रसिद्ध चुलत आजोबांचे व आपल्या धीरोदात्त आजीबाईंचे चरित्र नाटकरूपाने मांडण्याचे मी धारिष्टय केले आहे, तरी आपण हे नाटक पहावयास याल काय ?"

अशी विनंती त्यांना भीत भीत केली, पण त्यांनी ती आनंदाने मान्य केली. प्रयोग किर्लोस्कर थिएटरात म्हणजे नाना फडणविसाच्या खास राहत्या वाड्याच्या एका भागात झाला, व नाटकातील काही भाग तर सवाशें वर्षांपूर्वी कदाचित् त्याच जागी व काही त्या जागेपासून हाकेच्या अंतरावर प्रत्यक्ष घडला असावा !"

(संदर्भ : 'मराठे व इंग्रज' न. चिं. केळकर आ. सन १९६३)

३८. भट मंडळींचे त्रोटक उल्लेख

शके १६७६ मधील क्षेत्रोपाध्यायांकडील एक लेख, 'द्वारकाबाई देशमुखीण का। श्रीवर्धन प्रां राजापुरी' यांनी लिहिलेला आहे. बाईंच्या पतीचे नाव अंताजी असल्याचे त्याच लेखावरून दिसते. कदाचित् अंताजी विठोबा भट यांच्या त्या पत्नी असाव्यात काय ?

मराठी रियासतीत (उ. वि. ३, पृ. ५५६) दुसऱ्या बाजीरावांच्या अनाचारांच्या संदर्भात एक उल्लेख वाचायला मिळतो :

"श्रीमंतांचे दुर्दैव उभे राहिले. यामुळे जे आचार कधी कोणी केले नसतील तसे करू लागले. माहुलीचे वाड्यात गंगाबाई राजमाचीकरीण विधवा बाईको. तिचे अंगावर आपला मर्दानी पोषाख व जवाहीर घालून तिला गादीवर बसवून आपण खिजमतगार होऊन चवरी वारू लागले. असे अनेक प्रकारचे वेव्हार होऊ लागले."

ही ऑगस्ट सन १८१७ च्या सुमाराची बाजीरावांच्या माहुली मुक्कामातील गोष्ट आहे. गंगाबाई राजमाचीकरीण, या बाई राजमाचीकर शाखेतील सासुरवाशीण असाव्यात हे या माहितीवरून नक्की ठरते. परंतु अपुऱ्या तपशीलामुळे अधिक काहीही निष्कर्ष काढता येत नाहीत.

३९. पेशव्यांचा वंशज

कोणी एका गृहस्थाने आपण स्वतः पेशवे-कुलातील (तथाकथित) अस्सल वंशज असल्याचा दावा केल्याची आश्चर्यकारक बातमी 'इंडियन एक्सप्रेस' वृत्तपत्राच्या दि. ६–१०–१९८४ (शनिवार) च्या अंकात वाचायला मिळाली. बातमीतील तपशील विश्वसनीय असेलच असे म्हणता येत नाही. बातमी पुढीलप्रमाणे :

Descendent of the Peshwas ? (Express News Service)
PUNE, Oct, 5 :

Madhavarao Peshwa, a 70 year old resident of Uttar Pradesh, has claimed that he is the direct descendent of the Peshwas, the 18th Century rulers, and requested Chief Minister Vasantrao Patil to allow him to stay in the historic Shanwarwada.

It is learnt that the Chief Minister treated Mr. Peshwa cordially, gave him some financial help. At present Mr. Peshwa's

sole income is a meaagre pension of Rs. 125 per month which he gets from Uttar Pradesh Government for being a freedom fighter.

Mr. Peshwa is also in Possession of a number of documents which according to him establish his link with the Peshwa dynasty.

४०. पेशवे – पोर्तुगीज संबंध :

गोवेकर पोर्तुगीज आणि पेशवे यांचे राजकीय वैर सर्वपरिचित आहे. तथापि परस्पर देवाण घेवाण, चांगले वैयक्तिक संबंध, यांत राजकारणामुळे अडथळा आलेला दिसत नाही. पेशवा मंडळी आणि पोर्तुगीज डॉक्टर यांतील सामंजस्य, डॉक्टरांनी केलेले वैद्यकीय उपचार यांच्या काही नोंदी :–

सन १७२४ मध्ये थोरल्या बाजीरावांनी गोळीची जखम बरी करणारा डॉक्टर गोवेकरांकडे मागितला होता. सन १७४७ मध्ये सदाशिवरावभाऊ पेशव्यांसाठी व्हाईसरायने कोस्मि पिंतु हा दिवाडी येथे राहणारा गोवेकर ख्रिस्ती डॉक्टर पाठवला होता. सरदार अर्जोजी यादव याला कोणीतरी विष पाजल्यामुळे २६ एप्रिल सन १७४७ रोजी एका पत्राने पेशव्यांनी गोवेकरांकडे एका डॉक्टरची मागणी केली आहे. त्रिबकरावमामा पेठे फोंडे येथे डिसेंबर सन १७५६ मध्ये औषधोपचारासाठी येऊन राहिले होते. त्यांनी गोवेकरांकडे डॉक्टरची मदत मागितल्यामुळे त्यांचेकडे डॉ. कोस्मि पिंतु याची योजना करण्यात आली.

डॉ. कोस्मि पिंतु याला नानासाहेबांनी १७५७ साली गोवेकरांकडून पुण्याला बोलावून घेतले. तो पुण्याला पुढील महिन्याच्या एप्रिल अखेरपर्यंत होता. त्याच्याबद्दल व्हाईसरायला लिहिलेल्या २६–४–१७५८ च्या पत्रात पेशवे म्हणतात, " कोजम वैद्य यास सरकारात कार्याबद्दल आणिला होता. त्यास याणे सरकार चाकरी बहुत उत्तम केली. हाली यांस रजा देऊन मोहिबांकडे पाठविला आहे. तरी याचा हरएक बाबे गौर करीत गेले पाहिजे. "

सन १७६३ च्या जानेवारीत रघुनाथरावांनी गोव्याचा व्हाईसराय कोंदि द येग याचेकडे फिरंगी वैद्याची मागणी केली होती. सन १७६४ मध्ये रघुनाथराव, कोस्मि पिंतुचे औषध घेत असल्याचा उल्लेख मिळतो. थोरल्या नानासाहेबांच्या द्वितीय पत्नी राधाबाई (वाखरे) यांना डॉ. मानुयल फ्रांन्सिस्कु गोंसाल्विस् हा ऑक्टोबर सन १७७१ मध्ये औषध देत असे. थोरल्या माधवरावांच्या आजारपणात फ्रंई लियांद्रु द माद्रि द देऊस हा गोवेकर डॉक्टर औषध देत असे. थेऊरला माधवराव वारले. सौ. रमाबाई सती गेल्या त्या वेळी हा हजर होता. या डॉक्टरला पेशव्यांनी पालखी दिली होती. डॉ. मानुयल फ्रान्सिस्कु गोंसाल्विस याचेही माधवरावांना उपचार चालू असत.

(संदर्भ : ' पोर्तुगीज मराठे संबंध ' – डॉ. पां. स. पिसुर्लेकर). ❋ ❋

परिशिष्ट पहिले

पेशव्यांच्या मुद्रा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणापासून, १८१८ साली भट – पेशवा घराण्याची पेशवाई खालसा झाली, तोपर्यंतच्या सर्व पेशव्यांच्या उपलब्ध मुद्रा येथे दिल्या आहेत. थोरले शाहू महाराज ' सन १७०८ साली गादीवर आले, म्हणून (अ) ' सन १७०८ पूर्वीचे पेशवे ' (आ) ' सन १७०८ नंतरचे पेशवे ' अशा दोन गटांत सर्व मुद्रा दिल्या आहेत. ' भट ' – पेशवा परिवारातील जनार्दन विश्वनाथ, थोरले चिमाजीआप्पा, सदाशिवराव भाऊ, विश्वासराव बल्लाळ, अमृतराव रघुनाथ, थोरले समशेर बहाद्दर, थोरले अलीबहाद्दर, हे ' पेशवा ' नव्हते. परंतु त्यांच्या काही मुद्रा उपलब्ध आहेत. त्याही (इ) ' इतर मुद्रा ' या गटात दिल्या आहेत.

पेशवापद मिळणे आणि पेशवापदाची स्वतंत्र मुद्रा मिळणे या स्वतंत्र बाबी आहेत. पेशवापद मिळाल्यावर लगेच स्वतंत्र मुद्रा मिळेच असे नाही. त्यामुळे पूर्वीच्या छत्रपतींची किंवा पूर्वीच्या पेशव्यांची मुद्रा काही काळ वापरलेलीही आढळते.

मुद्रांच्या मजकुरात एकवाक्यता आढळत नाही. एकाच पेशव्यांच्या मुद्रेतील शब्दांत नृपती, नरपती, छत्रपती, मुख्य प्रधान, प्रधान, असे पाठभेद आढळतात. याबद्दल राजशिष्टाचारात्मक काही रिवाज होते का ? याचा काहीही खुलासा मिळत नाही.

एक माहिती मात्र अगदी स्पष्टपणे मिळते* की, " भट – पेशव्यांच्या मुद्रांमधील ' मुख्य प्रधान ' या शब्दातील ' न ' हे अक्षर उलटे असे. ' न ' लिहून दुसऱ्या कागदावर उठवला असता जसा उलटा उठतो तसा, मूळ शिक्क्यात सर्वत्र आहे. हा उलटा ' न ' असल्याचे कारण की, पिंगळे यांचे घराण्यात पेशवाई होती. ती त्याकडून काढून भट यांस दिली. हा बदल दर्शविण्याकरिता शाहूने हे शेवटचे अक्षर ' न ' उलटे बठावे असे ठरवले. "

---

* ' काव्येतिहाससंग्रह – पत्रे, यादी वगैरे ' – पृ. ३२५.

अ] सन १७०८ पूर्वीच्या पेशव्यांच्या मुद्रा :–

(१) शामराज नीळकंठ रांझेकर :–
पेशवा – श्रीशिवनरपति हर्षनिधान
शामराज मतिमत्प्रधान ॥ [१]

(२) नरहरी आनंदराव :– यांची मुद्रा उपलब्ध झाली नाही.

(३) महादेव :–
पेशवा – महादेव मतिमत्प्रधान* ॥ [२]

(४) मोरोपंत पिंगळे :–
पेशवा – (क) श्रीशिवचरणीं तत्पर। त्र्यंबक सुत मोरेश्वर ॥ [१]
(ख) श्रीशिवराजेंद्र हर्षनिधान
त्र्यंबकसुत मोरेश्वर मुख्य प्रधान ॥ [१]
(ग) श्रीशिवनरपति हर्षनिधान
मोरो त्रिमल मुख्य प्रधान ॥ [३]
(घ) एषाश्री शिवराजेंद्र मुख्यामात्यस्य सत्यधृक
मुद्रा मोरेश्वरस्वास्तां भद्रा सद्रागदायिनी ॥ [१]

(५) नीलकंठ मोरेश्वर पिंगळे :–
पेशवा – (क) श्रीराजा शिवछत्रपति हर्षनिधान
मोरेश्वरसुत निलकंठ प्रधान ॥ [४]
(ख) श्रीशिवनरपति हर्षनिधान
मोरेश्वरसुत निलकंठ मुख्य प्रधान ॥ [१]
(ग) श्रीशिवनरपति हर्षनिधान
मोरेश्वरसुत नीलकंठ प्रधान ॥ [५]
(घ) श्रीशंभु सुमनोत्कंठ
मोरेश्वरसुत नीलकंठ ॥ [५]
(च) श्रीशंभु भजनोत्कंठ
मोरेश्वरसुत निलकंठ ॥ [१]
(छ) श्रीराजाराम भजनोत्कंठ
मोरेश्वरसुत नीलकंठ ॥ [२]
(ज) श्रीराजाराम नरपति हर्षनिधान
मोरेश्वरसुत नीलकंठ मुख्य प्रधान ॥ [६]

---

* आश्विन वद्य १४, शके १५८४. जास्त माहिती उपलब्ध नाही.

(६) परशुराम त्र्यंबक :–
पेशवा – श्री आइ आदि पुरुष प्रसन्न
श्री राजाराम नरपति हर्षनिधान
परशुराम त्र्यंबक मुख्य प्रधान ॥ [२]

(७) बहिरोपंत मोरेश्वर पिंगळे –
पेशवा – (क) श्रीशिवनरपति हर्षनिधान
मोरेश्वरसुत बहिरव मुख्य प्रधान [१]
(ख) श्रीशिवनरपति हर्षनिधान
मोरेश्वरसुत भैरव मुख्य प्रधान ॥ [७]
(ग) श्रीशाहु नरपति हर्षनिधान
मोरेश्वरसुत भैरव प्रधान ॥ [२]
(घ) श्रीशाहु नरपति हर्षनिधान
मोरेश्वरसुत भैरव मुख्य प्रधान ॥ [१]

आ] सन १७०८ नंतरच्या पेशव्यांच्या मुद्रा :–

(८) बाळाजी विश्वनाथ :–
सरसुभेदार – श्रीउमाकांत पदांभोजभजनाप्तसमुन्नते :
बाळाजी विश्वनाथस्य मुद्रा वीजयतेतरां ॥ [८]
सेनाकर्ते – श्री राजा शाहु नरपति हर्षनिधान
विस्वनाथसुत बल्लाळ प्रधान ॥ [८]
पेशवा – (क) श्रीराजाराम छत्रपति हर्षनिधान
बाळाजी विश्वनाथ प्रधान ॥ [५]
(ख) श्रीराजा शाहु छत्रपति हर्षनिधान
बाळाजी विश्वनाथ प्रधान ॥ [५]
(ग) श्रीराजा शाहु नरपती हर्षनिधान
बाळाजी विश्वनाथ मुख्य प्रधान ॥ [८]

(९) बाजीराव बल्लाळ :–
पेशवा – (क) श्रीराजा शाहु नरपति हर्षनिधान
बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान ॥ [७]
(ख) श्रीराजा शाहु नरपति हर्षनिधान
बाजीराव बल्लाळ प्रधान ॥ [६]

(१०) बाळाजी बाजीराव :–
सरदारी – राजा शाहु चरणीं दृढभाव । बाळाजी बाजीराव ॥ [९]
पेशवा – (क) श्रीराजा शाहु नरपति हर्षनिधान
बाळाजी बाजीराव मुख्य प्रधान ॥ [८]

(ख) शाहु नरपति हर्षनिधान
बाळाजी बाजीराव प्रधान ॥ [१०]

(ग) श्रीराजा शाहु नरपति हर्षनिधान
बाळाजी बाजीराव प्रधान ॥ [११]

(घ) श्रीराजाराम नरपति हर्षनिधान
बाळाजी बाजीराव मुख्य प्रधान ॥ [८]

(११) माधवराव बल्लाळ :–

पेशवा – (क) श्रीशिव राजा शाहु नरपति हर्षनिधान
माधवराव बल्लाळ प्रधान ॥ [११]

(ख) श्रीराजाराम नरपति हर्षनिधान
माधवराव बल्लाळ मुख्य प्रधान ॥ [८]

(ग) श्रीराजाराम नरपति हर्षनिधान
माधवराव बल्लाळ प्रधान ॥ [११]

(१२) नारायणराव बल्लाळ :–

पेशवा – श्रीराजाराम नरपती हर्षनिधान
नारायणराव बल्लाळ मुख्य प्रधान ॥ [६]

(१३) सवाई माधवराव नारायण :–

पेशवा – (क) श्रीराजाराम नरपती हर्षनिधान
माधवराव नारायणराव मुख्य प्रधान ॥ [७]

(ख) श्रीराजाराम नरपति हर्षनिधान
माधवराव नारायण मुख्य प्रधान ॥ [१२]

(ग) श्रीराजाराम नरपती हर्षनिधान
माधवराव नारायण प्रधान ॥ [८]

(घ) श्रीराजा शाहु नरपती हर्षनिधान
माधवराऊ नारायण प्रधान ॥ [६]

(१४) चिमणाजी माधवराव (दत्तक) :–

पेशवा – (क) श्रीराजा शाहु नरपति हर्षनिधान
चिमणाजी माधवराव प्रधान ॥ [८]

(ख) श्रीराजा शाहु नरपती हर्षनिधान
चीमणाजी माधवराव मुख्य प्रधान ॥ [११]

(ग) श्रीराजा शाहु नरपती हर्षनिधान
चीमणाजी माधवराव प्रधान ॥ [१३]

(१५) रघुनाथ बाजीराव :--

पेशवा – (क) सांबपदपंकजलिनस्य मुद्रेयमपराजिता
बाजीराव तनूजस्य रघुनाथस्य विराजतां ॥ [८]

(ख) सांब्रपदपंकजलीनस्य मुद्रेयमपराजिता*
बाजीराय तनूजस्य रघुनाथस्य राजतां ॥ [१४]

(ग) श्रीसांब सपुत्रोति जयते
राजा शाहु नरपती हर्षनिधान
रघुनाथ बाजीराब मुख्य प्रधान ॥ [१५]

(घ) श्रीसांबः सपुत्रो विजयते
राजा शाहु नरपती हर्षनिधान
रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान ॥ [८]

(च) श्रीसिद्ध सुपुत्रो विजयते
राजा शाहु नृपती हर्षनिधान
रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान ॥ [११]

(१६) बाजीराव रघुनाथ :–

पेशवा – श्रीराजा शाहु नरपति हर्षनिधान
बाजीराव रघुनाथ मुख्य प्रधान ॥ [८]

(१७) धोंडोपंत नानासाहेब :–

पेशवा – (क) सरकार श्रीमंत महाराज पेशवासाहब* बहाद्दर ॥ [१७]
(ख) श्रीमान नाना धोंडोपंत बहादूर ॥ [१८]

इ] भट-पेशवे परिबारातील इतर मुद्रा :–

(१) जनार्दन विश्वनाथ :–

सरसुभेदार – श्रीपार्वतीकांतभक्तस्य विश्वनाथात्मजन्मनः
जनार्दनस्यमुद्रेयंभातिलक्ष्मीगजान्विता ॥ [१]

(२) थोरले चिमाजीअप्पा :– यांची मुद्रा उपलब्ध झाली नाही.

---

* रघुनाथरावांच्या शिक्क्याला ५ वर्तुळे असत. त्याबद्दल वि. का. राजवाडे म्हणतात, " हा रघुनाथरावदादाचा शिक्का. बिचाऱ्याचे सर्वच काही अचरट "– म. इ. साधने खंड १० वा. (राजवाडे खंड १० वा)

* इंग्लंडच्या राणीला उद्देशून नानासाहेबांनी काढलेल्या जाहीरनाम्यात (संवत् १९१५) उठवलेली मोहोर :– ' मोहोर दरबार आम खास सरकार श्रीमंत महाराज पेशवासाहब बहाद्दर ॥ "

(३) सदाशिवरावभाऊ :–
श्रीराजा शाहु चरणी तत्पर
सदाशिव चिमणाजी निरंतर ॥ ८

(४) विश्वासराव बल्लाळ :– यांची मुद्रा उपलब्ध झाली नाही.

(५) अमृतराव रघुनाथ :–
श्रीमंत अमृतराव रघुनाथ ॥ ८

(६) थोरले समशेरबहाद्दर :–
श्रीबल्लाळ चरणी तत्पर । समशेरबहाद्दर निरंतर ॥ ८

(७) थोरले अलीबहाद्दर :–
श्रीमाधव चरणी तत्पर । अलीबहाद्दर निरंतर ॥ ८

मुद्रांचे आधार -

(१) महाराष्ट्रेतिहासाची साधने भाग २, (२) म. इ. सा. खंड १५, (३) ऐतिहासिक गोष्टी– लोकहितवादी, (४) म. इ. सा. खंड ८ वा, (५) म. इ. सा. खंड २१, (६) कोकणच्या इतिहासाची साधने भाग १, (७) भा, इ. सं. मं. इतिवृत्त शके १८३५, (८) शिवशाहीचा लेखनालंकार, (९) मराठी दप्तर रुमाल भाग २, (१०) भा. इ. सं. मं. त्रै. २ : १–४, (११) म. इ. सां. खंड १०, (१२) भा. इ. सं. मं. इतिवृत्त शके १८३३, (१३) भा. इ. सं. मं, ६ वे संमेलनवृत्त, (१४) पे. द. भाग १९, (१५) भा. इ. सं. मं. ३ रे संमेलन वृत्त, (१६) ऐ. ले. सं. खंड ७ वा (१७) एटिन फिफ्टी सेवन (१८) १८५७ ची शिपाईगर्दी.

—×—×—

शाहू महाराज यांची रोजनिशी पृ. ४१ ते पृ. ४४

१. शामराज निळकंठ रांजेकर :

कधीं नेमिले त्याजबद्दल शाहूदप्तरीं दाखला नसोन कागद पत्र दप्तरीं नाहीत. शिवाजी महाराजांचे कारकिर्दीत हे पेशवे होते म्हणोन प्रतापसिंह महाराज यांचे खाजगी दप्तरीं एक याद आहे त्यांत लिहिले आहे. सरंजाम दिलेबद्दलचे कागद दप्तरीं नाहीत.

२. मोरो त्रिमल पिंगळे :

कधी नेमिले त्याजबद्दल शाहूदप्तरीं दाखला नसोन कागदपत्र दप्तरीं नाहीत. शिवाजी महाराजांचे कारकिर्दीत हे पेशवे होते म्हणोन प्रतापसिंह महाराज यांचे खाजगी दप्तरीं एक याद आहे त्यांत लिहिलें आहे. सरंजाम दिलेबद्दलचे कागद दप्तरी नाहीत.

३. निळकंठ मोरेश्वर :

मोरो त्रिमल यांचे पुत्र निळकंठ मोरेश्वर यांस राजशक ८ दुर्मति नाम संवत्सरे शके १६०३ रोजीं संभाजी महाराज यांनीं नेमिले. सरंजाम दिलेबद्दलचे कागद दप्तरीं नाहीत.

४. परशराम त्रिंबक प्रतिनिधी :

परशराम त्रिंबक प्रतिनिधी यांस पेशवाईची वस्त्रे दिली. शके २६ प्रमाथी नाम संवत्सरे शालिवाहन शके १६२१ सहा महिनेपर्यंत होते. कारकीर्द राजाराम. सरंजाम दिलेबद्दलचे कागद दप्तरीं नाहीत.

५. बहिरो मोरेश्वर पिंगळे :

कधीं नेमिले याबद्दल दाखला नसोन शाहू महाराज यांनी नेमिले. अशर मया व अलफचे कागदीं यांस प्रधान असें लिहिलें आहे. सुभा प्रांत कल्याण वगैरे महाल सरंजामास.

६. बाळकृष्ण वासुदेव :

अर्बा. याप्रमाणे खतावलेला अवर्जा कोरा आहे. त्यांत यांस प्रधान असे लिहिले आहे. दुसरे कागद नसल्यामुळें समजत नाहीं.

७. बाळाजी विश्वनाथ भट :

पेशजीं सेनाकर्ते म्हणोन हुद्दा होता तो दूर करोन पेशवाई सांगितली छ ९ जिलकाद सुरुसन अर्बा अशर मया व अलफ महाल १६ किल्ले २ सरंजामास.

८. बाजीराव बल्लाळ :

पेशजीं बाळाजी विश्वनाथ मुख्य प्रधान होते ते मृत्यु पावले सबब त्यांचे पुत्र बाजीराव बल्लाळ यांस पेशवाईचा धंदा सांगितला. छ २० जमादिलाखर सुरुसन अशरीन मया व अलफ मुकाम मसूर १३००० सालिना होन, शिवाय सरंजामीं महाल वगैरे.

९. बाळाजी बाजीराव :

पेशजी बाजीराव पंडित प्रधान होते ते वैशाख बहुल द्वादशी रौद्र नाम संवत्सरे रोजीं मृत्यु पावले. सबब त्यांचे पुत्र बाळाजी बाजीराव पंडित प्रधान यांस पेशवाई सांगितली. छ ११ रबिलाखर सुरुसन इहिदे अर्बैन मया व अलफ राजशके ६७ रौद्र नाम संवत्सरे आषाढ बहुल द्वादशी सौम्यवासर मुक्काम शाहूनगर.

१३००० सालिना होन, शिवाय सरंजामी महल वगैरे.

१०. माधवराव बल्लाळ :

इसन्ने सितैन मया व अलफ शके १६८३ वृषा नाम संवत्सरे मित्ति आषाढ शुद्ध ५ बाळाजी बाजीराव मृत्यु पावले. सबब माधवराव बल्लाळ यांस हुजूरची वस्त्रें दिली. वहिवाट वर्षे १२.

११. नारायणराव बल्लाळ :

शके १६९४ नंदन नाम संवत्सरे मार्गशीर्षमासी माधवराव बल्लाळ मृत्यु पावले सबब वस्त्रें झाली. वहिवाट महिने ९.

१२. रघुनाथ बाजीराव :

शके १६९५ विजय नाम संवत्सरे नारायणराव यांस रघुनाथ बाजीराव यांनी मारून वहिवाट आपणच केली. आजमासे महिने ६. वस्त्रे दिल्याचा दाखला नाही.

१३. माधवराव नारायण :

शके १६९६ जय नाम संवत्सरे सालीं माधवराव नारायण यांचा जन्म पुरंदरी जाला. त्यापासून वहिवाट शके १७१७ राक्षस नाम संवत्सरे अश्विन अखेरपर्यंत झाली वर्षे २२ – ६.

१४. बाजीराव रघुनाथ :

शके १७१७ राक्षस नाम सवत्सरे कार्तिक मासापासोन बाजीराव रघुनाथ वहिवाट २२ वर्षे. शके १७३९ ईश्वरी नाम संवत्सरे आश्विनअखेर राज्यभ्रष्ट होऊन ब्रह्मावर्तास गेले.

❋ ❋

परिशिष्ट दुसरे

क्षेत्रोपाध्यायांकडील उतारे

हिंगण्यांच्या दप्तरी पेशव्यांसंबंधाने नोंदी आहेत[1] त्या :-

(१) (४/३५)

'शके १६०१ सीधार्थी नाम सवत्सरे मार्गेस्वर वद १३ ते दिवसीं लिखित विठल वीस्वनाथ आजे अंताजीपंत भट उपनांव गोत्र गारग्य व बंधू जानो वीस्वनाथ व रुद्राजी वीस्वनाथ व बाळाजी वीस्वनाथ गाव × × रसूर (?) ताा श्रीवर्धन देसाई आपले (नासीक) क्षेत्रीचे तीर्थ पुरोहीत वेदमुर्ती (चिंतामणभट) हिंगणे जे आपले वंसी येतील ( ) तील हे लिहिले सही.'

सदरहू लेख विठ्ठल विश्वनाथ याचे हातचा असून अत्यंत महत्त्वाचा आहे. लेख बालबोधींत लिहिलेला आहे.

(२) (१/२)

'लिखीतं राधाबाई भ्रतार बाळाजीपंत सासरे विसाजी विसाजीपंत अजसासरे विसाजीपंत पुत्र बाजीराय व चिममाजी उपनाव भट गोत्र गार्ग्य व गाव श्रीवर्धनचे देशायी राजाजे पेश्वे आपले नाशिकचे तीर्थ पुरोहित चिंतामणभट हिंगणे जे कोण्ही वंशी येतील ते या पुजीतील पूर्वापर असे हे लेहले सही.'

सदरहू लेख बालबोधींत लिहिलेला असून येथून तेथून तो खुद्द बाईंचे हातचा आहे. बाळाजी विश्वनाथ पेशवे ह्यांचे बायकोस लिहिता वाचतां येत होते. हे इतिहासज्ञांस विदित आहेच. सदर लेख कोणत्या मित्तीचा लिहिला हें समजण्यांस मार्ग नाही. तथापि या नोंदीचे मागील व पुढील अशा दोन्ही नोंदींवरून, हा लेख शके १६३५ ते शके १६३९ पर्यंतच्या कालावधीत केव्हा तरी लिहिला हे निर्विवाद आहे.

(३) (४/१८)

'लिखीतं राधाबाई भ्रतार बाळाजीपंत सासरे विसाजीपंत आजेसासरे आंताजीपंत पुत्र बाजीराऊ व चिमाजी उपनांव भट गोत्र गार्गे गाव श्रीवर्धनचे देशाई हल्ली वसती सातारा पेशवे आपले नाशिकचे तीर्थ उपाधे चिंतामणभट हिंगणे पूर्वील परापर आसे ती पूर्वील लिहिले पाहोन आपन आज्ञा करोन लेहविले

आसे हे परापर आपले वौसीचे येतील ते तुम्हास पुजितील हे नासकी यात्रेस येऊन लेहोन दिधले आसे हे लिा सही.'

(४) (५/५३)

वेदशास्त्रसंपन्न राजश्री चिंतामणभट हिगणे वास्तव्य नासिक स्वामीचे सेवेसी, विद्यार्थी बाजीराऊ प्रधान नमस्कार विनंती उपरी क्षेत्र नासिक येथील तीर्थ उपाध्येपण तुम्हांस दिल्हे आहे त्यास क्षेत्र मजकुरी आणीक एक ब्राह्मण आहे तो तीर्थरुप नानोपंत[२] काका यांचे पत्र आपणाजवल आहे म्हणतो त्यांस ते पत्र नारोपंत काका यांचे अक्षर खरे जाहाले तरी तीर्थ उपाध्येपण निमे त्यास व निमे तुम्हास देऊन जर त्याजपासी पत्र आहे ते नानोपंत काकाचे अक्षरचे नव्हेसे जाहाले तरी क्षेत्रीचे अवघे उपाध्यपण आमचे स्वामीचे असे तु ××××× पुजीत जाऊन शके ××× नाम संवत्सरे मार्गसीर्ष शुध नवमी (इं) दुवार लोभ आसो दीजे देसमुख राजापुरी (या) चा माहाल लिहून दिल्हे सही हे विनंती.

लेखन
सीमा

सदरहू नोंद मोडीत असून अनेक दृष्टींनी मनन करण्यासारखी आहे. क्षेत्रस्थ उपाध्यांमध्यें सहाजिकच उत्पन्न होत असलेली चुरस व पेशव्यांच्या मनाचा समतोलपणा व न्यायप्रियता ही सदरहू लेखांत प्रामुख्याने दृष्टीस पडतात. लेख शके १६५२ मार्गशीर्ष शु. ९ चा आहे, हे तदितर विश्वस्य पुराव्यावरूनही सिद्ध आहे.

(५) (६/५१)

'वेदमूर्ती चिंतामण भट हिंगणे यांस साा नमस्कार लिखीतं चिमणाजी बल्लाळ देशमुख प्रां दंडाराजपुरी क्षेत्र नासीक येथील तीर्थ उपाध्यपण तुम्हास दिल्हे असे. आपले वंशपरंपरेने चालेल फालगुन सुध प्रतीपदा पिंगलनाम सवछरे'

हा लेख मोडींत असून सर्व खुद्द चिमाजीआप्पांचे हातचा आहे.

(६) (६/५२)

'विद्यार्थी बाळाजी बाजीराव नमस्कार विनंती आम्ही तीर्थास आलो वेदमूर्ती चिंतामणभट हिंगणे यांस पुजले तीर्थ उपाध्यपण वडीलानी पूर्वापर स्थापन केली असे पुढेहि येणेप्रमाणे चालवावे हे विनंती शके १६५९ पिंगलनाम सवत्सरे फालगुन सुध प्रतीपदा सौम्यवत्सरे उपनाम भट गोत्र गार्ग्य श्रीवर्धनकर देसाई'

हाही लेख मोडीत असून येथून तेथून खुद्द बाळाजी बाजीराव यांचे हातचा आहे श्री चिमणाजी बल्लाळ हे आपले पुतणे श्री नानासाहेब यांसह नाशिक येथे आल्याचे लेखांक ५ य ६ ह्या लेखांवरून स्पष्ट होते.

(७)

(६/५२)

' विद्यार्थी सदाशिव चिमणाजी नमस्कार

वडिलांनी तुम्हास पूजीले त्याप्रमाणे आपण पुजुं शके १६६६ रक्ताक्षीनाम संवत्सरे माघ शुध १ मंगळवार हे विनंती.

हा लेख मोडीत असून खाशांचे हातचा आहे.

(८)

(६/५२)

' तीर्थरूप नाना व भाऊ याणी लिहून दिल्हे त्याप्रमाणे रघुनाथ बाजीराव तत्पर आसे हे विनंती.'

हाहि लेख मोडींत असून श्री रघुनाथरावदादासाहेब ह्यांचे हातचा आहे. लेखावर मित्ती नसल्यामुळे तो केव्हांचा ? हें ओळखण्यास साधन नाही. तत्रापि तो शके १६६६ चे नंतरचा आहे हे निश्चित होय.

(९)

(६/५१)

' शके १६७६ भावनाम संवत्सरे वो शा चिंतामण भट हिंगणे यांस द्वारकाबाई देशमुखीण का श्रीवधेन प्रां राजापुरी भ्रतार अंताजीपंत उपनाव भट गोत्र गार्ग्य आपले तीर्थ पुरोहितपण तुम्हांस लिहून दिल्हे असे. हस्ताक्षर हरि विश्वनाथ भावे '

लेख मोडीतच आहे. ही द्वारकाबाई कोण ? पेशव्यांची जवळची नातलग असावी.

(१०)

(६/७५)

' विद्यार्थी माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी क्षेत्र नासीक येथील तीर्थोपाध्येपण वडिलांहि तुम्हांस लिहून दिल्हे आहे त्याप्रमाणे मान्य आसे मिती मार्गसीर्ष सुध १५ शके १७०६ क्रोधीनाम सवत्सरे हे विनंती '

हाहि लेख मोडीत असून एका दृष्टीने तर फार महत्त्वाचा आहे. श्रीमंत आपले वयाचे दहावे वर्षी अक्षर कोणत्या रितीने काढीत हे त्यावरून स्पष्ट दिसते. अक्षराची मांडणी कित्तेवजा असून त्याबद्दल आदर उत्पन्न होतो.

(११)

(६/७६)

' रावसाहेबांनी लिहिले ते बाजीराव रघुनाथ यांस मान्य असे शके १७११ सौम्यनाम संवत्सरे फाल्गुन शु।। ३ भौम्यवासर ' उपाध्ये हिंगणे नासिकचे.

—×—×—

' वो राजश्री गौरंग पांडे वास्तव्य क्षेत्र पुरुषोत्तम जगन्नाथ गो सेवक अमृतराव रघुनाथ नमस्कार सु।। मयातैन व अलफ जगन्नाथ हरिहर गुमास्ता तुम्हाकडील याणी क्षेत्र मजकूरचे तीर्थ उपाध्येपणाविशी हजूर श्रीचे मुकामी येऊन

विनंती केली त्याजवरून क्षेत्र मजकूरचे तीर्थ उपाध्येपण तुम्हांस लेहून दिल्हे असे तरी मजकूरी आमचे वंशीचे येतील ते तुम्हाकडे तीर्थ उपाध्येपण चालवितील या-पूर्वी दुसरे कोण्हाकडे वडिलाचा लेख निघाल्यास हे पत्र रद असे जाणिजे छ १ शवाल समज्ञार्थ जाण– श्रीलेखन मर्यादा '– अमृतरावांनी एका पंड्याला दिलेला [1] ताम्रपट आकार ९ इंच × ६¾ इंच दि. २६-२-१८०० शके १७२१ फा. शु. ३.

—×—×—

क्षेत्रोपाध्येपणाविषयीच्या पुढील पत्रातील पहिला अर्धा भाग गं. भा. राधाबाईंचे वतीने महादाजी आंबाजी पुरंदरे यांनी आणि त्यापुढील भाग थोरले बाजीराव किंवा चिमाजीआप्पा यांनी लिहिला असे दिसते. [4]

॥ श्री ॥

वेदमुर्ती राजश्री अचलवैष्णव व उमानाथ पाठक गंगापुत्र वास्तव्य श्रीकाशि यांप्रति

प्रतीपूर्वक राधाबाई नमस्कार विनंती उपरि आह्मी श्रीस यात्रेकारणें आलो ते समइं क्रोधसंवत्सरिं तुमचें पुजन करून तुम्हांस हे पत्र लिहुन दिल्हे आहे तरी आमचे चिरंजीव राजश्री बाजीराऊ व राजश्री चिमाजिआपा व आणखि आमचे वंशीचे कोण्हि येतेल ते तुम्हांस पुजतील संवत् १७८२ मीति पौशं वद्य पंचमि स्वस्ताक्षर माहादाजी अंबाजी श्री ×× ×× ××

हें पत्र तुम्हांस मातुश्रीनी दिल्हे आहे जर श्रीमाहाराणाजी व आणखी चौघां मातबरांची पुरोहितपणाची पत्रे तुम्हांजवळ असली तरी हे पत्र मातुश्रींनी दिल्हे लेहून हे प्रमाण असें त्यांची पत्रे नसिली तरी प्रमाण नसे छ ७ रौवल सुा आबैन मया अलफ शके १६६१ सिधार्थीनाम संवसरे हस्ताक्षर बाबुराऊ राम फडणवीस या-खेरीज तुम्हाजधल अजितसिंग व कोटेवाले यांचे लिहिले असिले तरी हे प्रमाण असे. तिघांची पत्रे असतील तर आमचे प्रमाण असे.

* *

संदर्भ-टिपा :

(१) पावृ. शके १८३४, पृ. २७०–७६, (२) नानोपंत, मूळ कागदात जानोपंत असावे. जानोपंत = जनार्दन विश्वनाथ, (३) ऐसंसा खंड ५, (४) पेद ९, पत्र क्र. २५.

परिशिष्ट तिसरे

पेशवाईतील श्रावणमास दक्षिणा

छत्रपति थोरले-शाहू* महाराजांची कारकीर्द आणि पेशवाईचा कालखंड म्हणजे महाराष्ट्राच्या राज्यवैभवाचा काळ. याच काळात स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर झाले. विद्येला, विद्वानांना यथायोग्य उत्तेजन देण्याचे शिवछत्रपतींचे धोरणच अंमलात आले. शाहू महाराजांनी पूर्वीच्या बहुश: सर्व देणग्या, वर्षासने पुन्हा सुरू करून विद्वानांचा चांगला प्रतिपाळ केला.

बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ, बाळाजी बाजीराव हे पहिले तीनहि पेशवे गुणग्राहक, संस्कृतज्ञ, विद्याप्रेमी, असल्यामुळे त्यांच्याकडून विद्वानांना चांगले उत्तेजन मिळून समाजातही ज्ञान आणि विद्येविषयी गोडी निर्माण झाली. पेशवाईच्या काळात विद्वान शास्त्रीपंडितांना, गुणीजनांना उत्तेजन देण्यास 'श्रावणमास दक्षिणा' ही पद्धति प्रामुख्याने कारणीभूत झाली.

पद्धतीचा उगम

'श्रावणमास दक्षिणे'चा उगम शिवाजी महाराजांचे कारकीर्दीतच झाला असे दिसते. समर्थ रामदासस्वामींच्या सांगण्यावरून शिवाजी महाराज श्रावण महिन्यात कोटीलिंगार्चन करीत. या प्रसंगी ब्राह्मणांना धान्य व रोख दक्षिणा दिली जाई. महाराज दरवर्षी विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे श्रावणमास दक्षिणा वाटत असत.

छत्रपति संभाजी – राजारामांच्या काळातही ही प्रथा प्रचलित होती. पण अस्थिर वातावरणामुळे प्रमाण कमी होते. थोरल्या शाहू महाराजांनी मात्र श्रावणात धर्मादाय करण्याविषयी स्पष्ट हुकूम दिला होता. महाराज ब्राह्मणांकडून कोटीलिंगार्चन करवून दक्षिणेप्रीत्यर्थ दोन चार लाख रुपये खर्च करीत असत. तळेगाव परिसर छत्रपतींच्या खासगीकडे होता. या खासगीतूनच विद्वानांची श्रावणात संभावना केली जाई. हा प्रदेश सेनापती दाभाडयांकडे गेल्यानंतर, शाहू महाराजांनी या प्रथेची व्यवस्था दाभाडयांकडे १७१८ साली सोपवली. हा देकार दाभाडे बरीच

---

* माझा हा लेख प्रथम रविवार दि. ८ सप्टेंबर सन १९८५ च्या 'केसरी'त प्रसिद्ध झाला. तो येथे पुनर्मुद्रित केला आहे– प्रमोद ओक.

वर्षे चालवत असत. त्रिंबकराव दाभाडे १७३१ साली लढाईत मारले गेल्यानंतर श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे यांनी पुण्यात दक्षिणेचा देकार सुरू केला. अशा प्रकारे 'श्रावणमास दक्षिणा' प्रथेचे यजमानपद आणि उत्तरदायित्व पेशव्यांकडे आले. तेव्हापासून दुसऱ्या बाजीरावांचे कारकीर्दीचे अखेरीपर्यंत (सन १८१८) ही प्रथा पुण्यात अव्याहत चालू होती.

दक्षिणा रमणा

या प्रथेच्या संदर्भात 'रमणा' हा शब्द नेहेमी कानावर येतो. रमणा म्हणजे चोहोबाजूंनी बंदिस्त केलेली दक्षिणा वाटण्याची जागा, दक्षिणेसाठी खर्च झालेली रक्कम. प्रथम शनिवारवाड्यात नंतर पर्वतीच्या पायथ्याशी रमणा होई. त्यामुळे या दक्षिणेसाठी पुण्यात येणाऱ्या श्रेष्ठ ब्राह्मणांची संख्या दरवर्षी वाढत चालली. त्या प्रमाणात दक्षिणेची रक्कमही वाढत गेली.


रमण्याच्या तटांना सामान्यतः चार दरवाजे असत. या प्रत्येक दरवाज्यावर मान्यवर प्रतिष्ठित गृहस्थ बसून ते दक्षिणा वाटपाचे कामावर देखरेख ठेवीत आणि स्वहस्ते दक्षिणा वाटत. या प्रसंगी दरवाज्यावर बसणे हा फार मोठा मान व अधिकार समजला जाई. १ दक्षिणा देणार १ जवळ बसणार अशा याद्या ऐतिहासिक नोंदीत पहायला मिळतात.

नियोजन व व्यवस्था

पर्वतीच्या दक्षिण पायथ्याशी जे अवशेष आहेत, यालाच पर्वती रमणा असे नाव आहे. हीच दक्षिणा वाटपाची जागा. विद्वानांच्या या मेळाव्यालाही रमणा म्हणत. श्रीमंत थोरले बाजीरावसाहेबांचे काळात व्याप्ति निवडक विद्वानांपुरतीच मर्यादित असल्यामुळें हा देकार कबुतरखान्यात किंवा हुजूरपागेत दिला जाई.

श्रीमंत नानासाहेबांच्या काळात या प्रथेची कीर्ती सर्वदूर पसरून कामाचा व्याप आणि व्यवस्थेचे स्वरूपही बदलत गेले. दक्षिणेचा आकडा सहस्रांवरून लक्षांपर्यंत वाढत गेला कबुतरखान्याची जागा अपुरी पडू लागली म्हणून पर्वतीवर रमणा बांधण्यात आला.

पर्वतीच्या पायथ्याशी मैदानी जागेत ५०–६० हजार माणसे मावतील असे आवार तयार करून बळकट तटभिंती बांधून १७५१ साली पर्वतीचा रमणा बांधण्यात आला. त्याला पांच दरवाजे होते. या आवारात एक गणेश मंदिर आहे. त्याला रमणा गणपति म्हणतात. मंदिराचे भोवती ब्राह्मणांना बसण्यासाठी पडवीची सोय करण्यात आली होती. रमण्याच्या प्रत्येक दरवाज्यावर स्वतः पेशवे, रामशास्त्री प्रभुणे, अय्याशास्त्री, नाना फडणीस, हरिपंत फडके, श्रीमंत अमृतराव पेशवे वगैरे प्रमुख मंडळी बसत. रमण्याची सुव्यवस्था ठेवण्याचे काम जबाबदारीचे, दगदगीचे



श्री रमणा गणपती मंदिर, पर्वती पायथा : पुणे

आणि अतिशय किचकट असून फौजेच्या मदतीने तडीस जाई. प्रेक्षकांची सुद्धा अतोनात गर्दी होई. रमण्याच्या आवारात ब्राह्मणेतरांना सोडीत नसत. सर्वत्र बंदोबस्त असे.

श्रावणात पावसामुळे दक्षिणेसाठी जमलेल्या मंडळींचे हाल होऊ नयेत म्हणून, निवाऱ्यासाठी ४० हजार ब्राह्मणांना पुरतील अशा धर्मशाळा बांधल्या होत्या. याखेरीज राहुट्या, पाले, चांदण्या ठोकून गरजेनुसार सोय करण्यात येत असे. दक्षिणेसाठी जमणाऱ्या सर्वांना रमण्याच्या आवारात प्रवेश दिल्यानंतर, दक्षिणा मिळेपर्यंत आवाराच्या बाहेर पडू देत नसत. श्रावण शु. ६ ला देकार सुरू होई. क्रमाने दक्षिणा मिळण्यास ३-४ दिवस लागत. या काळात सर्वांची निवास भोजनाची सोय आवारातच सरकारी खर्चाने केली जाई. या काळात खिचडी व तुरीची डाळ, मीठ वगैरे शिधा व एक टक्का (एक चलन) दिला जाई. त्यातून लाकूड फाटा व आवश्यक वस्तू आणून ब्राह्मणांनी स्वत: स्वयंपाक करावा असा हेतु असे. सुरुवातीच्या काळात दक्षिणार्थींची संख्या कमी असल्यामुळे सर्व ब्राह्मणांना भोजन देण्यात येई. पुढे संख्या खूप वाढल्याने १७४९ सालापासून खिचडीची प्रथा सुरू झाली.

दक्षिणेचा खर्च

श्रीमंत थोरले बाजीरावसाहेब पेशवे यांनी सन १७३१ नंतर ही प्रथा

पेशव्यांतर्फेच सुरू केल्यानंतर त्यांचे कारकीर्दीतील दक्षिणेचा पहिला उल्लेख १७३६ सालचा मिळतो. त्या वर्षी रक्कम १६३५४ रुपये होती. १७३७ साली रोख व कापड मिळून ४९,०७३ रुपये खर्च झाला. श्रीमंत नानासाहेबांचे वेळी ही रक्कम १ लाख रुपयांवर गेली. सन १७४९ साली १,२३,५३० रुपये खर्च झाला. सन १७५२–६२८५३ रुपये, सन १७५३–१२,०६,०१९ रुपये असे खर्च आढळतात. १७५४ साली ही रक्कम आठ लाखांवर, तर १७५८ साली अठरा लाखांवर पोहोचली.

पानिपतच्या संघर्षापर्यंत सतत वाढत जाणारी ही रक्कम पानिपतच्या आघातामुळे खूपच रोडावली. १७६१ साली देकार झाला नाही. १७६२ साली वैदिक काव्यपाठी, पंडित, यांना मिळून फक्त ११,८९८ रुपये दिले. थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीला निजामाने पुण्याची लूट केली, त्या वेळी तेथील रमणा व धर्मशाळा जाळून उद्ध्वस्त केल्या. यामुळे त्या वर्षी देकार झाला नाही. १७६५ साली कबुतरखान्यात देकार झाला. १,३२,०४३ रुपये खर्च झाला. १७६५ मध्ये माधवरावांनी पर्वतीचा रमणा पुन्हा बांधून काढला. यानंतर १७६८ साली २,८८,७४५ रुपये, १७७३ साली ५,५४४४५ रुपये १७७६ साली ५,०५,१२८ रुपये देकार झाला. सवाई माधवरावांचे कारकीर्दीत पेशवाईचे वैभव पुन्हा दिसू लागले. या सर्व रकमांवरून पेशवाईच्या भरभराटीची तसेच चढउतारांची स्पष्ट कल्पना येते. थोर विद्वानांची दक्षिणा शनिवारवाड्यावर देत. इतर सरसकट ब्राह्मणांना पर्वतीच्या रमण्यात जावे लागे. शनिवारवाड्याच्या जांभूळ दरवाज्यावर बसून श्रीमंत रघुनाथराव पेशवे देकार देत असे उल्लेख सापडतात.

दूरदेशचे ब्राह्मण

श्रीमंत थोरल्या नानासाहेबांचे कारकीर्दीपासून देशातल्या कानाकोपऱ्यातून ज्ञानाच्या विविध शाखांचे ब्राह्मण दक्षिणेला पुण्यात येऊ लागले. पुण्याला श्रावण-मास दक्षिणा मिळणे हा मोठा मान आणि विद्वत्तेला राजमान्यता मिळाल्याचे प्रतीक समजले जाऊ लागले.

श्रावणमास दक्षिणेसाठी कुंभकोण, तंजावर, श्रीरंगपट्टण. रामेश्वर, मथुरा, वाराणसी, कान्यकुब्ज, गढवाल, बऱ्हाणपूर, औरंगाबाद, जालनापूर, कोल्हापूर, इंदूर, शृंगेरी, कांची, ग्वाल्हेर, असे अनेक ठिकाणचे ब्राह्मण येत. रामशास्त्री प्रभुणे, अय्याशास्त्री, गोपिनाथ दीक्षित ओक, यांसारखे विद्वान् दक्षिणार्थींची पूर्ण परीक्षा घेऊन योग्यतेनुसार दक्षिणेची रक्कम ठरवीत. सर्वात मोठी रक्कम १००० रु. असे. विशेष विद्वान् ब्राह्मणांना सोन्याची नाणी देत.

व्यक्तिमत्व, बुद्धिमत्तेचे तेज, अभ्यासावरील प्रभुत्व, वगैरेंची परीक्षा करून श्रेष्ठ विद्वानांचा खुद्द पेशव्यांचे हस्ते यथोचित सन्मान होई. ज्येष्ठ विद्वानांना

घरोघर पालख्या पाठवून सन्मानाने शनिवारवाड्यावर बोलावून घेऊन त्यांचा गौरव करीत. एखादा विद्वान दुखणेकरी असेल तर त्याची दक्षिणा घरपोच दिली जाई.

विद्वानांची विविधता

पुण्यात जमा होणाऱ्या ब्राह्मणात वैदिक : आश्वलायन, दशग्रंथी, आपस्तंब, पंचग्रंथी, तेलंग जटापाठी, वाजसेनी, शतपथ संपूर्ण व पदक्रम जाणणारे, सामवेदी, अथर्ववेदी, पंचग्रंथी, काण्व क्रमपाठी, श्रौती, सोमाचे अध्वर्यु, पंडित, व्याकरण, कौस्तुभ पढलेले, नेय्यायिक, भावानंदी जाणणारे, मीमांसक, शस्त्रदीपिका पढलेले, वेदांती, भाष्य व प्रकरणे, सिद्धान्त लेश असे दोन पद्धतीचे, जोशी : ग्रहकपर्व व संपूर्ण जातक, ताजक पढलेले, पत्रिका वर्षफल जाणणारे, पुराणिक : कौमुदी व वेदांतिक न्याय प्रकरण पढलेले, काव्यपाठी माधान्त काव्ये पढवणारे, अलंकारी : कुलवयानंद पढवणारे वैद्य : शांङगधर पढवणारे, वैद्यक प्रकरण संपूर्ण पढवून रसायनक्रिया जाणणारे, अग्निहोत्री, तपस्वी, वैदिक, गायत्री मांत्रिक, इत्यादी प्रकारचे विद्वान् लोक, शास्त्रज्ञ व कवीही असत.

याखेरीज विद्यावंतांचे पुत्रपौत्र, जंगम, गोसावी, फकीर वगैरेही असत. श्रावणमास दक्षिणेसाठी ब्राह्मणांची दक्षिणा पुढीलप्रमाणे वाढत गेलेली दिसते : सन १७७६ : २६७ पंडित, ११३७ वैदिक, ६१ जोशी, ८२ पुराणिक, ४० वैद्य, १३ कवी, ५४ तपस्वी, सन १७९७ : १०३४ पंडित, १७२८ वैदिक, २१३ जोशी, १०४ पुराणिक, १२६ वैद्य, ४३ कवी, १०८ तपस्वी.

दुसऱ्या बाजीरावांच्या कारकीर्दीत १८१६ साली श्रावण शु. ६ व शु. ७ या दोन दिवसांत ७८,१३५ ब्राह्मणांना ४,४१,१२८ रुपये दक्षिणा वाटल्याची नोंद आहे. परंतु या कालखंडात देकाराचा मूळ हेतू लोपून दक्षिणा मिळवण्यासाठी वशिलेबाजी सुरू झाली.

कॅप्टन मूरची नोंद

कॅप्टन मूर या इंग्रज अधिकाऱ्याने १७९७ साली पुण्याला भेट दिली. त्यावेळी त्याने रमण्याच्या ठिकाणी स्वतः पाहिलेल्या गोष्टी लिहून ठेवल्या आहेत. कॅप्टन मूर म्हणतो : ' चातुर्मासात दान करण्याने मोठे पुण्य लागते अशी त्या वेळी सार्वत्रिक श्रद्धा होती. या ब्राह्मणांची वर्षाच्या निर्वाहाची पुंजी हातात साचे. रमण्याचे आवारात ब्राह्मणेतरांना सोडीत नसत. आम्ही मोठ्या मिनतवारीने पहाण्यासाठी आत जाऊ शकलो. एका दारावर बाजीरावांचे बंधू अमृतराव होते. या दारावर रुपये तोलून वाटणीस देण्याचे काम अमृतरावांच्या देखरेखीखाली चालले होते. जवळच लाल रंगाने भरलेला एक हंडा असून त्यात हात बुडवून एक नोकर आत येणाऱ्या प्रत्येक ब्राह्मणाच्या कपड्यावर किंवा अंगावर आपल्या

पजाचा छाप उठवी. नंतर प्रत्येकाचे पदरात रक्कम घालून लोकास बाहेर सोडीत. प्रत्येकास ३ पासून १० पर्यंत रुपये मिळत. मी रमण्यात गेलो त्या साली बाजीराव, चिमाप्पा, अमृतराव, नाना असे चार आसामी दरवाज्यावर होते. दरसालपेक्षा बाजीरावाने मुद्दाम औदार्य दाखविण्याकरिता जास्त रक्कम खर्च केली. पण नानाला ही गोष्ट पसंत पडली नाही.'

प्रथेची सफलता

पेशवाईच्या काळात, स्वतंत्र शिक्षणसंस्था नव्हत्या. विद्वानांची घरे हीच खरी ज्ञानपीठे असत. आपल्या राष्ट्रात वेदविद्येला उत्तेजन मिळावे, ज्येष्ठ ब्रह्मवृंदांचा मान राखला जावा, समाजात ज्ञानसाधना वाढावी या मूळ हेतूने श्रावणमास दक्षिणेची प्रथा शिवकालापासून सुरू झाली. ' विद्वान् हे राष्ट्राचे भूषण होत ' ही धारणा या प्रथेच्या मुळाशी होती. सर्व शाखांचे, सर्व ठिकाणचे, सर्व स्तराचे विद्वान् एकत्र जमवून त्यांचा गौरव करण्यास ही प्रथाच कारण झाली. राष्ट्र उभारणीच्या कामात या प्रथेने प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष बहुमोल कामगिरी बजावली असेच म्हटले पाहिजे.

आंग्लकालीन स्वरुप

विद्या संवर्धनाच्या हेतूने पेशवाईत प्रतिष्ठा मिळालेली श्रावणमास दक्षिणेची प्रथा समाजात खोलवर रुजली होती. ही प्रथा एकदम बंद करणे इंग्रजांना शक्य नव्हते. म्हणून पेशवाईच्या अस्तानंतरहि काही काळ इंग्रजांनी सुरू ठेवली. परंतु लवकरच विशिष्ट जमातीलाच फक्त उपयोग न होता, रकमेचा अधिक व्यापक स्वरूपात उपयोग व्हावा यासाठी इंग्रजांनी मूळ उद्देश न बदलता, प्रथेला नवे समाजाभिमुख रूप दिले. पुण्यात काही नवीन उपक्रम हाती घेण्यात आले. या रकमेचा स्वतंत्र निधी निर्माण करून त्यातूनच माऊन्ट स्टुअर्ट एलफिन्स्टनच्या प्रेरणेने पुण्याच्या विश्रामबाग वाड्यात ६ ऑक्टोबर सन १८२१ रोजी दसऱ्याच्या सुमुहूर्तावर ' संस्कृत पाठशाळा ' स्थापन झाली. या शाळेत शिकणाऱ्यांना शिष्यवृत्त्या ठरवल्या. मोठे मोठे शास्त्री पंडित शिक्षक नेमले. या पाठशाळेत संस्कृत विद्येला तर उत्तेजन मिळेच पण अपारंपारिक विषयही शिकवण्यात येत. याच ' पाठशाळे 'चे पुढे प्रख्यात ' डेक्कन कॉलेज ' मध्ये रूपांतर झाले. या दक्षिणा फंडापैकी काही रकमेचा उपयोग करून ग्रंथनिर्मितीला उत्तेजन देण्यासाठी इंग्रजांनी ' दक्षिणा प्राईझ कमिटी ' स्थापन केली. या नावावरूनहि पूर्वसंदर्भ आणि उद्देश लक्षात येण्यासारखे आहेत. याखेरीज ' दक्षिणा फेलोशिप ' देखील सुरू करण्यात आली. ही फेलोशिप मिळणे, प्रतिष्ठेची आणि समाजमान्यतेची बाब समजली जात असे. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत सुरू झालेल्या ' श्रावणमास दक्षिणा ' प्रथेचा इंग्रज अमदानीपर्यंतचा प्रवास असा झाला आहे.

❋ ❋

परिशिष्ट चवथे

पर्वतीवरील मूर्ती

पुणे शहराचे ऐतिहासिक वैशिष्टय असलेली पर्वतीवरील विविध देवतांची मंदिरे, ही श्रीमंत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्यांची निर्मिती आहे. त्यांनी १७४९ साली देवदेवेश्वर संस्थानाची स्थापना केली. (वैशाख शुद्ध ५ शके १६७१ = १०-११ एप्रिल सन १७४९) त्या वेळी अर्थातच संस्थान पेशव्यांच्या खाजगी मालकीचे होते. पर्वतीच्या डोंगरावर बांधलेल्या पायऱ्यांवरून सोन्याच्या अंबारीत हत्तीवर बसून पेशवे पर्वतीवर येत असत.

पर्वती संस्थानच्या निर्मितीमागची एक आख्यायिका चिं. भि. डिके यांनी ' पर्वती संस्थानचे वर्णन ' मध्ये (पृ. १०-११) दिली आहे. परंतु त्याचा आधार दिला नाही. ती आख्यायिका अशी :

" एके दिवशी श्रीमंत बाळाजी बाजीरावसाहेब पेशवे यांच्या मातुःश्री काशीबाई या मस्तानी बागेत तेथे असलेल्या पूर्वीच्या एका टुमदार बंगल्यात रहावयास गेल्या असता पर्वतीवरील मंडप त्यांचे दृष्टीस पडला. तसेच वर जाण्याची रहदारीही त्यांनी पाहिली. चौकशी अंती त्यांना असे समजले की, डोंगरावर मोठे जागृत असे देवीचे स्थान आहे व नौलोजी पाटील हा त्या देवीचा भक्त आहे."

" पुढे त्यांनी नवलोजीस बोलावून आणून सांगितले कीं, तुमची देवी नवसास पावते असे ऐकिलें. माझे पायास आवाळूं झाले आहे तर माझा रोग देवीने बरा केला तर मी देवीचे देवालय बांधीन. "

" पुढे काही दिवसांनी देवीच्या तीर्थांगाऱ्याने तो रोग बरा झाला. तेव्हा त्यांनी श्रीमंत नानासाहेब यांस सांगितले की, माझा पाय बरा झाला तर तुझे देऊळ बांधीन, असा मी पर्वताई भवानीस नवस केला आहे. आता माझा पाय बरा झाला आहे. तरी तुम्ही देवीचे देवालय बांधून तिचे उत्पन्न नौलोजी याचे नांवे करून द्यावे. या मातुःश्रीच्या आज्ञेप्रमाणे देवीचे देवालय बांधून आपले कुलदैवत महादेव त्याची देवालयात स्थापना केली. श्रीदेवीकडील उत्पन्न पाटील यांस मिळावे अशी व्यवस्था केली."

पर्वतीवरील मंदिरांसंबंधी, मूर्तींसंबंधी काही समकालीन, उत्तरकालीन नोंदी व तपशील उपलब्ध आहे : ' तिस्सा आर्बैन भया व अलफ ४ जमादिलाखर खर्च

पोतापैकी धर्मादाय मु।। पर्वती येथे श्रीदेवाच्या स्थापना केल्या. अ) श्रीदेवदेवेश्वर ब) रुप्याची महादेवाची मूर्ती व सुवर्णाची मूर्ती मांडीवर १ उजवे मांडीवर गणपतीची व डावे मांडीवर पार्वती. क) श्रीपाषाणाचा गणपती १ श्रीपर्वताई भवानीची आर्चा केली एकूण चार. सदरप्रमाणे देवस्थापना करण्यास छ २९ जमादिलाखरपासून छ ३ जमादिलावलपर्यंत खर्च ५२२२ ।। रुपये व छ. ४ जमादिलावल रोजी खर्च ३७९७ ।। रुपये झाला.[१]' यात छ. २९ जावल ऐवजी २९ राखर पाहिजे अशी श्री. य. न. केळकरांची दुरुस्ती आहे.[२]

आबासाहेब मुजुमदारांकडील पेशवा रोजकीर्दीतील नोंद : तिस्सा अरबैन छ २९ रबिलाखर ६६ देवस्थापना पर्वतीस केली. श्रीगणपती व बाणाची छ ४ जमादिलावल खर्च पोतापैकी ३९९७७ ।। रुपये धर्मादाय श्रीदेवदेवेश्वर स्थापना केली त्या समयी भोजन दक्षिणा.'

द. ब. पारसनीस पेशवा रोजकीर्दीचे आधारे ' पुना इन् बायगॉन डेज 'मध्ये, ७ एप्रिलपासून होमहवनादी धार्मिक विधी व ब्राह्मणभोजने १० एप्रिलपर्यंत चालून ११ तारखेला स्थापना झाली असे म्हणतात. समाराधनांचा खर्च ४३२० रु. आला. स्थापनेच्या वेळी गणपती व पार्वती यांच्या मूर्ती सोन्याच्या होत्या. श्री. ना. वि. जोशी म्हणतात : ' एक सांबाची मूर्ती रुप्याची केली. तिचे वजन दोन मण (ऐंशी शेर) आहे व त्याच्या मांडीवर एक पार्वतीची मूर्ती आहे. तीहि सोन्याचीच आहे व तिचे वजन ९०० तोळे आहे. आता ह्या मूर्तीस दागिने कसले असतील हे सांगण्याची गरज नाही. कारण सोन्या-रुप्याच्या मूर्तीस दागिने मोलवानच असतील. देवास पोषाख वाराप्रमाणे नित्य नवा असतो. म्हणजे आदित्यवारी तांबडा, सोमवारी पांढरा याप्रमाणे. रोज त्रिकाळ नैवेद्य दाखवितात व पंचामृत स्नान घालतात ... नित्य पुराण-पठण, पूजेचे वेळेस गवयाचे गायन, प्रातःकाली सायंकाळी आणि मध्यान्ही चौघड्याचे वादन. रोजच्या पूजेस एक ब्राह्मण असतो. त्यास महिन्यास बदलतात. त्यास रोज रुपया व इच्छा भोजन असे. ह्या ब्राह्मणास वर्णीचा ब्राह्मण म्हणतात.[१]'

गणपतीच्या व पार्वतीच्या मूर्तीचे वजन पारसनीस अनुक्रमे ६८६ व १२४५ तोळे देतात. डिके अनुक्रमे ६८६।। तोळे २ मासा आणि १२४५।।। तोळे देतात. सदाशिवाच्या रुप्याच्या मूर्तीचे वजन डिके ६७३४।। तोळे देतात. पारसनीस ह्या मूर्तीचे वजन देत नाहीत.

डिके ' पर्वती वर्णनात ' तपशीलवार वर्णन देतात : ' पार्वतीचे मूर्तीस सर्व दागिने अंगचेच कोरले आहेत. दोन डोळ्यांत दोन माणके असून कपाळावर कुंक-वाच्या ठिकाणी एक वाटोळे माणिक बसविलेले आहे. डोक्यांत राखाडी असून गोंडेबोरांची वेणी घातलेली आहे. गोंडेबोरात प्रथमतः नागाच्या फण्या काढल्या

आहेत. डोक्यात चंद्र व सूर्य या दागिन्यांबद्दल दोन चमकदार हिरे बसविलेले आहेत. दंडात वेळा व वाकी काढल्या असून हातात जवे व तोडे काढले आहेत. उजवे हातात कमलपुष्प असून डावे हातावर महादेवाची पिंडी घेतली आहे. कमरेत कमरपट्टा असून खाली पटाव नेसून त्याच्या पायघोळ निऱ्या सोडल्या आहेत. पायांत वाळे व तोडे काढिले असून पायाचे प्रत्येक बोटावर एक एक अशी अंगुलीभूषणे काढली आहेत. कानांत कर्णफुले असून त्यांत एक एक हिरा बसविलेला आहे. गळयांत कंठा असून माणकांचे मंगळसूत्र आहे. गणपतीचे बालस्वरुप आहे. गळयांत कंठा व यज्ञोपवीत खोदले आहे. बाहूवर बाहूभूषणे व वाकी आहेत, हातात कमलपुष्प व बोटात अंगठी, सल्ले–जोडवी असे आहेत. नाभीचे ठिकाणी उत्तम नाग असून कटिप्रदेशी कमरपट्टा आहे. पायघोळ पितांबर नेसविला असून पायांत साखळया व घागऱ्या आहेत गंडस्थळाचे मध्यभागी पिंपळपान खोदले आहे. हातापायांची बोटे, नखे, केस वगैरे फारच व्यक्त दाखविले आहेत.'

पर्वतीवरील मूल्यवान मूर्तींना पेशवे फार जपत. संकटकाळी आपल्या जवाहीरखान्याबरोबरच मूर्तीही संरक्षणासाठी सिंहगडावर रवाना करीत. अर्थात् तेथेही पुजारी जाऊन पूजा अर्चा व्यवस्थित होई. याच कारणाने १७ नोव्हेंबर सन १७५१ ते १ मार्च सन १७५२ पर्यंत मूर्ती सिंहगडावर होत्या. थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीत निजामाच्या हल्यात पुण्याची, पर्वतीवरच्या मूर्तींची नासधूस झाल्याची बरीच पत्रे ऐ. ले. संग्रहात व पेशवे-दप्तरात आहेत. १८१७ साली पेशवे – इंग्रज युद्धामुळे दुसऱ्या बाजीरावांनी १० नोव्हेंबरला, पांडुरंग कृष्ण बापट या पुजाऱ्याबरोबर मूर्ती सिंहगडावर पाठवल्या. इंग्रजांनी २ मार्च सन १८१८ रोजी किल्ला जिंकल्यावर त्या इंग्रजांकडे गेल्या. इंग्रजांचा अंमल स्थिर झाल्यावर त्यांनी मूर्ती, नंदीच्या रुप्याच्या कवचासह पर्वती संस्थानला परत केल्या.

पर्वतीच्या देवळाचे कळस सोन्याचे करण्याचे काम १७६०–६१ साली झाले. त्याला १०७९।। तोळे सोने लागले (पंतप्रधान दु. शकावली), ' पुना इन् बायगॉन डेज'मध्ये श्री. पारसनीस १०२० तोळे सोने लागल्याचे म्हणतात. १७६२ साली पुणे लुटीच्या वेळी निजामाने हे कळस कापून नेले. म्हणून माधवरावांनी पुन्हा सोन्याचे कळस करवले.[४] श्रीविष्णूच्या देवळाच्या छताच्या सोन्याच्या मुलाम्याचा खर्च १४ रु. ९ आ. ६ पै. आला.[५]

राजवाडे शकावलीनुसार, नानासाहेबांनी १३–६–१७५८ ला पर्वतीवर श्रीविष्णूची स्थापना केली. आबासाहेब मुजुमदारांकडील नोंदीनुसार २३-३-१७६६ ला थोरल्या माधवरावांनी श्रीविष्णुची पुनस्थापना केली. या देवतांच्या पुनर्स्थापनांविषयी काही नोंदी :-

(१) २३–८–१७६३ श्रीदेवदेवेश्वराची शाळूंका नवीन केली.

(२) २४–८–१७६३ श्रावण वा बुधवार देवदेवेश्वराची स्थापना.

(३) २–११–१७६३ शाळुंकेची यथाशास्त्र स्थापना. (मुजुमदार संग्रह)

(४) २५–११–१७६४ कार्तिकस्वामींची नवीन मूर्ती करावयाची आज्ञा (पेद ३२).

(५) १४–३–१७६६ कार्तिकस्वामीच्या नवीन मूर्तीची पुनर्स्थापना. पुढे केव्हा तरी ती मूर्ती भंगली. मुजुमदार-संग्रहात याखेरीज दोन नोंदी मिळतात त्या :–

(अ) सबा समानीन – १ रज्जब (२०–४–१७८७) श्रीकार्तिकस्वामीची मूर्त पुण्यात नवी तयार केली. ती पर्वतीस स्थापन करावयास नेताना वाटेत जागा जागा फोडावयास लागले नारळ.

(ब) सबा समानीन – १२ रज्जब (१–५–१७८७) कार्तिकस्वामीची स्थापना केली.

१७९१ साली वीज पडून कार्तिकस्वामीचे मंदीर जळाले, पण मूर्तीला धक्का लागला नाही. इंग्रज-आमदानीत नवीन मंदीर बांधून २–६–१८२० ला पुनर्स्थापना केली. १८६७ साली पुजाऱ्याचे हातून देवाचा मुकूट मूर्तीच्या उजव्या हातावर पडून उजवा हात भंगला, म्हणून २८–६–१८६९ ला काळचा पाषाणाची मयुरारूढ षण्मुख, चर्तुभुज मूर्ती पुनर्स्थापित केली.

पर्वतीवरील ' सदरेतील गणपती ' ही मूर्ती देखील जुनी आहे. श्रीदेवदेवेश्वराच्या गाभाऱ्याच्या उजव्या बाजूला ही संगमरवराची पाषाणाची मूर्ती आहे. श्रीदेवदेवेश्वराचे स्थापनेचे वेळी, नेहमीप्रमाणे सुपारीच्या गणपतीला आवाहन न करता, प्रत्यक्ष या मूर्तीवरच आवाहन करून पुण्याहवाचन करण्यात आले. या संपूर्ण मंदिराची रचना अप्रतिम आहे. देवाचा गाभारा, पुढे सभामंडप, कारंजे, नंदीचे देवालय व पुढे महाद्वार, २२ मार्च व २३ सप्टेंबर या दिवशी दिनमान व रात्रीमान समान असते. त्या वेळी सूर्योदयाचे किरण थेट देवाच्या अंगावर पडतात. गाभाऱ्याच्या डाव्या बाजूला जामदारखान्याची खोली आहे. पेशव्यांचा जामदारखाना येथेच असे.

कार्तिकस्वामीच्या मंदिराच्या दक्षिणेला सुमारे ६०० फूट अंतरावर श्रीविष्णुचे प्रशस्त मंदीर आहे. श्रीमंत नानासाहेबांनी श्रीदेवदेवेश्वर आणि शिवपंचायतन स्थापनेच्या वेळीच हे मंदिर बांधले. मात्र श्रीविष्णूची स्थापना तेव्हा होऊ शकली नाही. गंडकी शिळेचीच मूर्ती आणवावी असे ठरले. कालांतराने नेपाळहून मूर्ती आल्यावर १३–६–१७५८ ला नानासाहेबांनी श्रीविष्णूची स्थापना केली.

श्रीविष्णूची हास्यवदन, माधवरूप, चतुर्भुज मूर्ती ४॥ फूट उंच, लक्ष्मी यंत्रावर उभी आहे. शंख, चक्र, गदा, पद्म यांनी युक्त आहे. गळ्यात वैजयंतीमाला व जानवे असून समोरच पाषाणाची गरुड मूर्ती आहे. श्रीविष्णूच्या उजवीकडे उजव्या

हातात लाडू घेतलेली, गंडकी शिळेची भासणारी, रांगणारी श्रीकृष्णाची लाकडी मूर्ती आहे. त्रिंबकरावमामा पेठयांना लढाईच्या लुटीत मिळालेली ही मूर्ती त्यांनी माधवरावांना भेट दिली. सांगलीचे चितामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांनी मोठी सहाण व पूजेची घंटा श्रीमंतांना नजर केल्या होत्या. त्या वस्तू देखील मंदिरात आहेत.

१७५५ साली श्रीमंत नानासाहेबांनी स्वतःसाठी ११ खण तिघई चौसोपी वाडा बांधला. या वाडयाच्या होम शाळेत (म्हणजेच सहाणेची खोली) नानासाहेबांचे २३ जून १७६१ च्या रात्री पानिपतच्या पराभवाच्या धक्क्याने निधन झाले. तेथे आता समाधी बांधण्यात आली असून नानासाहेबांच्या पादुकांची रोज पूजा केली जाते.*

पेशवे पालखीतून किंवा हत्तीवरून पर्वतीवर जात. १८७७ साली त्या वेळचे 'प्रिन्स ऑफ वेल्स' सातवे एडवर्ड हत्तीवर बसून पर्वतीवर गेले होते. तेव्हा हत्ती घसरला, एडवर्डही फेकले गेले पण सुदैवाने त्यांना इजा झाली नाही. पर्वतीवर हत्ती गेल्याची ही अखेरची नोंद.

सारसबाग

पुण्यातील सारसबागेतील मंदिर हा श्रीदेवदेवेश्वर संस्थानचा एक भाग. याची निर्मिती श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीतच झाली. त्याबद्दलची हकीगत आता पाहू या.

पेशवेकालीन पुण्यात आंबील ओढा, हा एक अविभाज्य घटक होता. त्या काळात ओढा पुण्याच्या मध्यवस्तीतून तुळशीबाग–त्र्यंबकेश्वर मंदिर–जोगेश्वरी मंदिर–शनिवारवाडयाची पश्चिम बाजू–अमृतेश्वर मंदिर–मुठा नदी या मार्गाने वाहात असे.

पावसाळयात ओढयाला मोठा पूर येई. त्यामुळे रयतेची बरीच गैरसोय होई. श्रीमंत नानासाहेबांच्या कारकीर्दीत, पर्वती-रमणा* बांधला त्या वेळी ओढा अधिक खोल आणि रुंद केला. एक दोन वेळा दुरुस्तीही केली.

---

* वाडयातील मृत्यूस्थानाच्या पिछाडीला पांढऱ्या चाफ्याचे जुने झाड आहे. त्याचा रंगीत फोटो इतरत्र छापला आहे. माझे स्नेही व वनस्पतीशास्त्राचे प्राध्यापक श्री. प्र. के. घाणेकर यांच्या अभ्यासानुसार ते झाड निदान २०० वर्षांपूर्वीचे म्हणजे सन १७९५ च्या सुमाराला उगवलेले किंवा लागवड केलेले असावे.

* पर्वती पायऱ्यांच्या दक्षिण बाजूला आंबील ओढयाच्या पश्चिमेला मागील ओढयापर्यंत रमण्याची हद्द दिसते. हा रमणा श्रावण मासाखेरीज इतर वेळी पेशव्यांच्या सैन्यासाठी उपयोगात येत असावा – 'पुणे नगर संशोधन वृत्त' खंड १, पृ. ७३.

आंबील ओढ्याचे पाणी वळवून, एक तलाव खोदून त्यात नौकाविहाराची सोय करावी अशी श्रीमंतांना कल्पना सुचली. त्यानुसार १७५० साली खोदाईचे काम सुरू झाले परंतु फार हळूहळू चालून, या सर्व परिसराला नवे रूप लाभेपर्यंत १७५४ साल उजाडले.

हा कृत्रिम तलाव तयार करण्यासाठी सुमारे २५ एकर जमीन खोदून घेतली. खोदकाम करतानाच मध्यभागी सुमारे २५ हजार चौरस फूट जमीन सोडून बाजूने तलाव खोदला. त्यामुळे मध्यभागी बेटाचा आभास निर्माण झाला. या बेटावर निरनिराळ्या प्रकारची मोठी झाडे लावण्यात येऊन निसर्गशोभा वाढवण्यात आली. सारस नावाच्या सुंदर पक्षावरून श्रीमंत नानासाहेबांनी या परिसराचे 'सारस-बाग' असे नामकरण केले.

'सारसबागे'तील बेटावरच श्रीमंत सवाई माधवरावांनी १७८४ साली सिद्धीविनायक गणेशाची स्थापना केली. देवासाठी लहानसे दगडी मंदिर बांधले.

पूर्वी हा तलाव मोठा असून एका बाजूने आजच्या टिळक रस्त्यापर्यंत दुसऱ्या बाजूने हिराबागेपर्यंत पसरला होता. नवलोबा व शंकराची मंदिरे पूर्वी तलावातच होती. होड्या थांबण्यासाठी, ठेवण्यासाठी दोन धक्के असून त्यांपैकी एक आजच्या पेशवे-उद्यानालगत होता, दुसरा हिराबागेजवळ होता. हिराबागेत साजरे होणाऱ्या समारंभाची सांगता सारसबाग तलावातील नौकाविहाराने होत असे बेटावरील सिद्धिविनायक मंदिरात १७८४ साली सवाई माधवरावांनी स्थापन केलेली श्रीगणेशाची मूर्ती १८८२ साली भंगली. त्यानंतर १९९० साल अखेरपर्यंत काल-चक्राच्या ओघात दोन वेळा मूर्ती (सन १९१४, सन १९९०) बदलण्यात आली.

पर्वतीवरील मंदिरे, सारसबाग-मंदिर आणि मौजे कोथरूडची काही मंदिरे ही पेशव्यांची खासगी बाब होती. इंग्रज–पेशवे यांच्यात वसईला तह झाल्यानंतर राज्याचा शेवट जवळ आल्याचे बाजीरावांना जाणवू लागले असावे, कारण आता राज्य तर जाणारच तेव्हा ह्या मंदिरांची भावी दैनंदिन व्यवस्था तरी नीट रहावी यासाठी दुसऱ्या बाजीरावांनी १८०३ सालच्या सुमाराला एक स्वतंत्र पंच-समिती निर्माण करून त्या समितीकडे देवस्थानांची व्यवस्था सोपवली. ही व्यवस्था सन १८१८ पर्यंत चालू होती. यातूनच कालांतराने 'श्रीदेवदेवेश्वर संस्थान पर्वती व कोथरूड' हा सार्वजनिक ट्रस्ट अस्तित्वात आला. ट्रस्टच्या मालकी अधिकारात पुण्यातील पुढील मंदिरे आहेत : (१) पर्वतीच्या डोंगरावरील सर्व मंदिरे व वास्तू (२) श्रीसिद्धिविनायक मंदिर, सारसबाग, (३) श्रीदशभुजा गणपति-मंदिर, कर्वे पथ, (४) श्रीमृत्युंजयेश्वर मंदिर कर्वे पथ, कोथरूड, (५) श्री काळी जोगेश्वरी शुक्रवार पेठ.

❋ ❋

आधार– (१) दुबा पेरो २, पृ. २१४, (२) भूभ्र पृ. ७४, (३) पुवश पृ. २७, (४) पेद २२, पृ. ११५, (५) कित्ता पृ. १३१.

परिशिष्ट पाचवे

पर्वतीवरील सोन्याच्या मूर्तींची चोरी

[पुण्याच्या पर्वतीवरील श्रीदेवदेवेश्वर संस्थानच्या मंदिरांमधील पेशवेकालीन सोन्याच्या मूर्तींची १९३२ साली चोरी झाली. तत्कालीन पुणे शहराच्या आणि श्रीदेवदेवेश्वर संस्थानच्या संदर्भात ही फार मोठी खळबळजनक घटना होती. या घटनेबद्दलची पुण्याच्या 'सकाळ' वृत्तपत्रात आलेली बातमी, सामाजिक संदर्भाच्या दृष्टीने महत्त्वाची असल्यामुळे येथे पुनर्मुद्रित केली आहे.]

ता. ३०,

आज सकाळी* प्रक्षाळपूजा करण्यास पर्वतीचा पुजारी गाभाऱ्यात गेला असता पार्वतीची व गणपतीची सोन्याची मूर्ती चोरीस गेल्याचे त्याला आढळून आले. पार्वतीची मूर्ती १२०० तोळे वजनाची व गणपतीची ८०० तोळे वजनाची आहे. या मूर्ती आज सुमारे १७५ वर्षे या देवळात होत्या.

काल संध्याकाळीं सूर्यास्ताबरोबर नेहमीप्रमाणे × × × मुख्य दरवाजा बंद करण्यांत आला. रात्रीही बाकीचे सर्व दरवाजे बंदोबस्तासाठी बंद करण्यात आले होते. देवळापुढे आतल्या बाजूस नेहमीप्रमाणे चार पहारेकरीही होते. मूर्तींचे संरक्षण करण्याकरितां एक रिटायर्ड पोलीस जमादार मुद्दाम ठेवण्यात आला होता. असे असूनही ही चोरी रात्री झाली. मुख्य देवळांच्या उत्तर बाजूस एक लहानशी खिडकी आहे. त्या खिडकीचा कडी-कोयंडा गिरमिटाने दोन तीन भोके पाडून काढला व ती खिडकी उघडून आंत गाभाऱ्यात शिरून मूर्ती पळविल्या. खिडकीच्या तेथे लाकडाचा भुस्सा पडलेला आढळून आला. चोर देवळाच्या आवारात कसा शिरला व एवढ्या जड मूर्ती घेऊन पळून कसा गेला व पहारेकऱ्यांना त्याची दादही

* प्रस्तुत बातमी मायक्रोफिल्मवरून नकलून घेतली आहे. फिल्मवरील काही अक्षरे पुसट झालेली असल्यामुळे, नकलेत क्वचित् एखादी चूक राहून गेली असण्याचा संभव आहे.

काही पुस्तकांमध्ये या घटनेची तारीख १५ जुलै सन १९३२ अशी चुकीची छापली आहे. घटना प्रत्यक्षात ३० सप्टेंबरच्या रात्री घडली हे या समकालीन बातमीमुळे स्पष्ट होते.

कशी लागली नाही हे मोठे कोडेच आहे. पोलीसात याबाबत वर्दी देण्यात आली आहे.

देवस्थानात अशी भयंकर चोरी होण्याचा महाराष्ट्रातील हा दुसरा प्रसंग होय. सुमारे दोन वर्षांमागे प्रतापगड देवस्थानात अशीच चोरी होऊन श्रीअंबा-भवानीच्या अंगावरील दीड लाख रुपये किंमतीचे बहुमोल व पुरातन दागिने चोरीस गेले होते, याचे स्मरण वाचकांस असेलच. त्या चोरीच्या तपासात असे उघडकीस आले होते की, गडावरील व्यवस्थेची पूर्वीपासून बारकाईने पहाणी करून नंतरच चोरांनी व्यवस्थित रीतीने हल्ला केला असला पाहिजे. प्रतापगडावरून चोरीस गेलेल्या दागिन्यांपैकी फारच थोडे दागिने सापडले.

जास्त चौकशी करितां असे समजले की, आज सकाळी पाखालणी करण्या-करितां पर्वती संस्थानच्या गुरवाने मूर्तींना पाणी घातले. त्या वेळी श्रीगजाननाची व पार्वतीची नेहमीची मूर्ती नाहीशी झाल्याचे त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आले. उत्तरेकडील बारीक खिडकीवजा लाकडी दार असून त्यांस पांच ठिकाणी एक इंचाच्या गिर-मीटाने भोके पाडलेली असून त्या दरवाज्याने चोर आत शिरले असावेत. मात्र चोर एकापेक्षा अधिक असावे असे वाटते. काल रात्री गुरव व दोन शिपाई असे तिघे देवळाच्या दक्षिणेच्या बाजूस निजले होते. देवाच्या मूर्ती दोन्ही मिळून अदमासे पंचवीस शेर आहेत व त्यांची किंमत ५० हजार रुपये सहज होईल असे वाटते.

मागे एकदा पांच सहा वर्षांपूर्वी शंकराच्या मूर्तीचे चांदीत गोठवलेले रुद्राक्ष चोरीस गेले होते. पण ती चोरी लवकरच उघडकीस आली. त्याखेरीज दुसरी चोरी एवढी झाली नव्हती. गेल्या सहा वर्षांपासून तेथील पहारेकऱ्यांची संख्या तिसापासून सातापर्यंत कमी करण्यात आली होती. सध्या इंजिनिअर आण्णासाहेब वर्तक, सरपंच असून इतर पंच म्हणून सरदार आबासाहेब मुजुमदार, इंजिनिअर आगाशे, रा. सा. ढमढेरे, गोपाळराव पटवर्धन व रा. ओंकार हे होत.

दुपारी तीन वाजता सी डिव्हिजनचे पो. स. इ. रा. देशमुख यांनी पंचनामा केला. सध्या वहिम कोणावर नसून पोलीसतपास चालू आहे.

– 'सकाळ' तारीख १ ऑक्टोबर सन १९३२.

* *

परिशिष्ट सहावे

नाटकशाळा आणि लेकावळे

[एक ' संदर्भग्रंथ ' असे या पुस्तकाचे स्वरूप ठेवल्यामुळे ऐतिहासिक नोंदीमध्ये उपलब्ध झालेली ही माहिती समाविष्ट केली आहे. अशा संकलनात कोणाचेही चारित्र्यहनन करावे किंवा कोणालाही दुखवावे असा हेतू बिलकूल नाही. केवळ ऐतिहासिक नोंद एवढाच मर्यादित हेतू नजरेसमोर ठेवला आहे. सामाजिक परिवर्तनाचे दृष्टीनेही ही माहिती अभ्यासकांना कदाचित उपयुक्त ठरावी.]

विवाहित स्त्रियांखेरीज इतर उपस्त्रिया, दासी यांचेपासून झालेल्या संततीला ' लेकावळा ' ही संज्ञा आहे. या संततीला कौटुंबिक व कायदेशीर अधिकार, वारसा हक्क याबद्दल स्थान नसे. राजघराण्यात किंवा श्रीमंत हिंदू घराण्यांत बहुभार्यात्वाची व इतर उपस्त्रिया (नाटकशाळा) ठेवण्याची चाल खूपच प्रचलित होती. तत्कालिन समाजरचना व रूढी यांनुसार यात काहीही गैर, अनाचारी, मानले जात नसे.

एक गोष्ट मात्र नक्की की, त्या काळी अनौरसांना तुच्छ मानून वाऱ्यावर सोडले जात नसे. त्यांची लग्नेकार्ये व इतर सर्व जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडल्या जात. घरच्या कुटुंबियातच त्यांची गणना करून ऐपतीप्रमाणे त्यांचा परामर्श घेतला जाई. सर्व पेशवे मंडळींनीसुद्धा आपआपल्या कारकीर्दीत सर्व लेकावळ्या संततीचा परामर्श घेतल्याचे दाखले मिळतात. याचबरोबर संबंधित उपस्त्रिया, नाटकशाळा यांचाही योग्य परामर्श घेतला जाई.

पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचा एक लेकावळा भिकाजी शिंदे या नावाचा असल्याची माहिती मिळते. याची जी वंशावळ व माहिती उपलब्ध आहे तीवरून या भिकाजीला राणोजी हा एक भाऊ असल्याचा उल्लेख आढळतो. इतिहास संशोधक श्री. य. न. केळकर यांचेकडून समजले की, व्यक्तिनाम हे त्या त्या लेकावळ्याचे स्वतःचे असे. आडनाव एक तर जन्मदात्या आईचे लावले जाई किंवा लेकावळ्यांना सरसकट शिंदे आडनाव लावले जाई.* हा भिकाजी आपल्या वडिलांप्रमाणेच शूर व पराक्रमी निपजला. हा थोरल्या बाजीरावांबरोबर अनेक मोहिमां-

* अनौरस संततीला शिंदे आडनाव लावले जाई हे खरे असले तरी केवळ आडनाव शिंदे एवढ्यावरून अनौरसपणा गृहीत धरणे अन्यायमूलक आहे.
(संदर्भ : इतिहासातील सहली खंड २ – केळकर य. न.)

वर, स्वारी-शिकाऱ्यांवर जात असे. त्याचेकडे एका खास पागेचे आधिपत्य होते. लेकावळा असल्यामुळे भिकाजी, बाजीरावांना नमस्कार ऐवजी दंडवत, असे पत्रांच्या मायन्यात लिहितो. (पे. द. ३० पृ. १२३ प. नं. ११५) बहुधा याची आई मराठा जातीची असावी. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनी स्वतःचे अमदानीतच, याला मौजे हिंगणगाव हा कमाल बेरीज रु. १५३९ आ. ८ वसूलाचा गाव पागेच्या सरंजामासाठी लावून दिला होता. सन १८०३ च्या यशवंतराव होळकरांच्या पुण्यावरील स्वारीनंतर दुसऱ्या बाजीरावांनी हा गाव जप्त केला.

थोरला समशेरबहाद्दर वयाच्या अवघ्या ६ व्या वर्षी मातृ–पितृविहिन झाला यानंतर त्याचा प्रतिपाळ थोरल्या नानासाहेब पेशव्यांनी इतमामाने केला. मस्तानीच्या वंशजांबाबत नेहमीच सर्वांचे पालनपोषण इतमामाने, आपुलकीने, योग्य प्रकारे होऊन त्यांची पूर्वीपासूनची व्यवस्था कायम ठेवलेली आढळते.

थोरले नानासाहेब यांच्या गुणवती व केशरी या नाटकशाळांचा उल्लेख शाहीर शिवराम पिंपळगावकर यांच्या कवनात स्पष्टच आहे. याखेरीज त्यांच्या कित्येक नाटकशाळा होत्या, पण त्यांची माहिती संगतवार मिळत नाही. सन १७६० च्या मध्याचे सुमाराला नानासाहेबांनी गोविंदपंत बुंदेल्यांकडून दोन तीन तरण्या चांगल्या जातीच्या शुद्ध नाटकशाळा मागवलेल्या आढळतात. यातील ‘ जातीच्या शुद्ध ’ हे शब्द महत्त्वाचे आहेत. त्याचा अर्थ या नाटकशाळा त्यांच्या नृत्यगायनादि कलांसाठीच मागितलेल्या नसून जारकर्मासाठीच मुद्दाम पाहिजे आहेत असा होतो. गोविंदपंताकडून अशा मुली पाठविल्या गेल्या की नाही हे नमूद नाही. नानासाहेबांच्या दुसऱ्या लग्नासाठी झांशीपासून सावंतवाडीपर्यंत वधूसंशोधन झालेले दिसते. त्यांपैकी अनेक मुली प्रवासात पेशव्यांच्या छावणीत प्रदर्शनात येऊन गेल्या हे पेशव्यांच्या रोजकीर्दीत नमूद आहे. कृष्णसिंह, हैबतसिंग, लक्ष्मणसिंग, हे तीन नानासाहेबांचे लेकावळे होते. येसू नावाची नानासाहेबांची एक अत्यंत आवडती रक्षा होती तिचे हे तीन मुलगे, परस्परांचे सख्खे भाऊ. १८०२ सालच्या अखेरच्या धावपळीत हे तिघेही दुसऱ्या बाजीरावांबरोबर कोकणात सुवर्णदुर्गाकडे होते. पुढे इतर लोकांबरोबर यांनाही बाजीरावांनी देशावर परत पाठवून दिले, (हे तिघेही रघुनाथरावांचे लेकावळे असे उल्लेख रियासतीत आहेत.) रघुनाथराव व नानासाहेब यांच्या लेकावळ्यांसंबंधी पे. द. नोंदीत बरीच सरमिसळ आढळते.

नानासाहेबांची लाडकी दासी येसू अत्यंत रूपवती होती. इतकेच नव्हे तर, उत्तम गायिका होती. म्हणूनच तिने नानासाहेबास वेड लावले होते असे म्हणतात. पानिपतच्या आघातानंतर नानासाहेबांची वृत्ती चिडखोर, तापट व काहीशी भ्रमिष्ट बनली होती. त्या काळात ह्यांचा विश्वास फक्त या येसूवरच होता. ही येसूबाई नानासाहेब वारल्यानंतर सती गेली. कृष्णसिंग, हैबतसिंग व लक्ष्मणसिंग हे तिघेही

शूर होते. प्रत्येकाकडे एकेक पागा दिलेली होती. यांपैकी हैबतसिंग वद्य ३० रोजी वारला. नानासाहेबांचे धाकटे बंधू रामचंद्र, जनार्दन व आणखी एक असे तिघेही फार लवकर वारल्यामुळे त्यांचे बाबतीत हा प्रश्नच उद्भवला नाही. चौथे बंधू रघुनाथराव यांचे नाद मात्र ऐतिहासिक कागदपत्रात ठिकठिकाणी लिहिलेले आढळतात. यांच्या दासी व नाटकशाळांचा पसारा मोठा होता. १ मैना २ उमेदा ३ यमुनी (हेमंतीची आई) ४ लाडू (वसंतीची आई) ५ केसरी (चंदनीची आई) ६ रत्ना (स्वरूपकुमारीची आई) ७ स्वरूपा (चंद्रसेनेची आई) ८ शामा (नैनीची आई) अशी त्या नाटकशाळांची नावे आढळतात. रोजनिशीत हमेत, वसंत, चपला, चंद्रसेना, अशी आणखीही निराळी नावे असून या पोरींपैकी कोणाला तीन, कोणाला दोन रुपये पगार बांधलेला होता असे सन १७८० मध्ये नमूद आहे.

रघुनाथरावांच्या मृत्यूनंतर आनंदीबाईंनी नाटकशाळांची व त्यांच्या मुलाबाळांची स्वतःच्या मृत्यूपर्यंत आबाळ होऊ दिली नाही. नाटकशाळांबद्दलचे रघुनाथरावांचे वेड सुरुवातीला प्रमाणात होते. परंतु दोहदच्या स्वारीपासून ते अनावर झाले असे खुद्द आनंदीबाईंचे उद्गार आहेत (पे. द. खंड ४) अबा सबैन या वर्षी मनुबाई परदेशीण व सुंदराबाई यांना स्वतंत्र घरे होती व खर्च सरकारातून चाले. याखेरीज कृष्णा म्हणून एक नाटकशाळा होती. इतर काहींची नावे व नेमणुका– १ गहिना १५ रु., २ उमेदा ६ रु., ३ यमनी (हेमंतीची आई) ३० रु., ४ वसंतीची आई ४० रु., ५ केशरी (चपलेची आई) ४५ रु., ६ रत्नरूप (केसरीची आई) ७ रु., ७ स्वरूपा (चंद्रसेनेची आई) ७ रु., ८ शामीची आई ७ रु., दुसऱ्या बाजीरावांच्या कारकीर्दीत– हेमंती नाटकशाळा द. म. ५० रु., नैना द. म. ४५ रु., मैनी कसबीण २०० रु., लक्ष्मी परभीण ३०० रु. अशा काही नोंदी सापडतात. शके १७३८ मध्ये दुसऱ्या एका रमी परभिणीचा उल्लेख आहे. खासे चाकरीच्या स्त्रिया म्हणून रमा माळीण, कृष्णी शुद्री, गंगी कसबीण, भागिरथी शुद्री, आवडी शुद्री यांचे उल्लेख आहेत. याशिवाय बयाबाई दातार, सीताबाई शेंडे, मोरदीक्षित मराठे यांची स्त्री काशीबाई, उमा फडके, ताई पेठे, गंगाबाई राजमाचीकरीण वगैरे स्त्रिया दुसऱ्या बाजीरावाच्या खास मर्जीतल्या होत्या. बिठूर मुक्कामी लाला परदेसी याची मुलगी राधाबाई यांचेशी कटचारीबरोबर दुसऱ्या बाजीरावांचे लग्न लागल्याचे उल्लेख आहेत. दुसरे बाजीराव गादीवर आल्यानंतरच्या नोंदीमध्ये थोरले नानासाहेब व दुसरे बाजीराव यांच्या लेकावळचांची गल्लत झाली आहे. यामुळे कोणाचा कोण लेकावळा हे शोधणे कठीण आहे.

सवाई माधवरावांच्याही नाटकशाळा होत्या असे वाटते. शाहीर प्रभाकर एका कवनात म्हणतात –

सातशे दासी गुणी नाटकशाळा किती। पाहाताच प्रभु काही ओवाळुनि टाकिती। त्या आता येजित अन्नास दैन्य भाकिती। चौदाशे घर गुलाम मुकले ह्या निजपायाला। चाकर तर लक्षानुलक्ष लागतिल फिरायला।

विश्वासराव व नारायणराव खूप लवकर वारल्यामुळे त्यांचे बाबतीतही हा मुद्दा निर्माण होत नाही. विश्वासराव थोरल्या माधवरावांप्रमाणेच कडक व नीति-निष्ठूर असले पाहिजेत असे निश्चितपणे वाटते. थोरले चिमाजीआप्पा, सदाशिव रावभाऊ व थोरले माधवराव हे तिघेही अत्यंत निष्कलंक, उज्ज्वल चारित्र्याचे व अत्युत्तम नीतिमान होते. या तिघांचा सर्वांना नेहमी जो धाक वाटत असे, त्यात यांच्या कडक शिस्तप्रिय व करारी स्वभावाबरोबरच यांच्या उज्ज्वल चारित्र्याचे नैतिक दडपण हेही एक महत्त्वाचे कारण होते.

* *

परिशिष्ट सातवे

नेपाळमधील पेशवा-परिवार


[केसरीच्या २६-७-१९५३, ९-८-१९५३, १६-८-१९५३, २३-८-१९५३, ६-९-१९५३ या पाच अंकांत, दुसऱ्या बाजीरावांच्या पत्नी श्रीमंत गं. भा. सईबाईसाहेब पेशवे यांनी नेपाळमध्ये असताना दत्तक घेतलेले श्री. लक्ष्मणराव चिमणाजी थत्ते यांनी स्वत: सविस्तर लिहिलेले पेशवे परिवारासंबंधीचे पाच लेख आहेत. त्यांचा गोषवारा पुढे दिला आहे :]

लेख १ ला : सन १८५७ च्या बंडाचे भूत पेशवे मंडळींच्याच मागे हात धुवून लागल्याने नानासाहेबास अखेर देशत्याग करावा लागला. पेशवे पुरुष मंडळींपैकी रावसाहेब एकटेच देशाकडे परत फिरले व पुढे काही दिवसांनी त्यांची बायको रमाबाई नेपाळातून गुप्त वेषाने निसटून रावसाहेबास जाऊन मिळाली. पदरच्या नोकराच्या फितुरीने रावसाहेब एका खेडेगावी इंग्रजांच्या हाती लागले व तारीख २०-८-१८६२ ला ब्रह्मावर्तास फाशी गेले. बाळासाहेब व नानासाहेब पेशवे नेपाळच्या तराईतच मृत्यू पावले. नानासाहेब नेपाळात वारले हीच सत्य हकीगत आहे. नेपाळ सरकारच्या आश्रयाखाली खाटमांडु राजधानीत राहण्यास गेलेली पेशवे मंडळी पुढीलप्रमाणे होती :- शेवटच्या बाजीरावाच्या दोन बायका मैनाबाई व सईबाई, नानासाहेबांची बायको पार्वतीबाई (?) ऊर्फ काकूसाहेब, बाळासाहेबांची बायको काशीबाई, रावसाहेबांची बायको रमाबाई व बाजीरावांची दुसरी कन्या बयाबाई आपटे इतक्या खाशा बायका असून भीमा नावाची नानासाहेबांची एक रक्षाही बरोबर होती. याशिवाय परशुराम कोठावळ्या व बाळाराम मीरमुन्शी असे दोन पुरुष नोकरही वरील बायकांबरोबर होते... नानासाहेब पेशव्यांची तिसरी बायको पार्वतीबाई ऊर्फ काकूसाहेब ही सांगलीचे रामचंद्र सखाराम ऊर्फ गुंजुमामा करमरकर यांची कन्या असून तिचे माहेरचे गाव सुंदराबाई होते. लग्न ठरविण्याच्या वेळी नानासाहेबांचे उपाध्ये कर्वे सांगलीस मुलीला पहाण्यास आले तेव्हा हिच्या पत्रिकेवरून ज्योतिषाने सांगितले की, 'या मुलीच्या लग्नानंतर लवकरच युद्ध व रक्तपात होण्याचा योग आहे.' पण पाहिलेल्या इतर मुलींपेक्षा ही मुलगी रूपाने सुंदर असल्याने पसंत करण्यात येऊन हिच्याशीच नानासाहेबांचा विवाह ब्रह्मावर्तास झाला व ज्योतिषाने सांगितल्याप्रमाणे सुमारे वर्षभरातच १८५७ च्या क्रांतियुद्धाचा योगायोग घडून आला. लग्नाच्या वेळी सदर मुलीचे

वय सुमारे १३ वर्षांचे होते. पेशवे स्त्रियांनी आपल्याबरोबर जे थोडेबहुत जड-जवाहीर नेले होते त्यापैकी काही जवाहीर देऊन व काही रोखीने जंगबहाद्दरच्या मार्फत नेपाळच्या तराईत सुमारे आठ गाव अदमासे दीड लाख किंमतीचे नेपाळ सरकारकडून खरेदी केले. त्या सर्व गटांस 'राणीगंज' असे नाव दिले-* १ गोविंदपूर, १ सिरसिया, (२ गाव) संवत् १९१७ अ. आषाढ शु. ११ बुधवार मार्फत जंगबहाद्दर १ धनगढवा, १ सिमरवारी, १ मदनपूरकट्टी, १ बैरियाकट्टी, (४ गाव) संवत् १९२३ श्रावण व. ३ मार्फत जंगबहाद्दर, १ बरखा, १ पोखरिया (२ गाव) संवत् १९३५ अश्विन व. ३ शनवार मार्फत रणउद्दीपसिंग श्री ५ सुरेन्द्र विक्रम (पांच सरकार) शाहा याजकडून गाव खरेदी केले. सदरची आठ गावे नेपाळ हद्दीच्या तराईत जि. पर्सा, परगना नौरगिन्या तर्फ जगतपूरमधील आहेत. याशिवाय काठमांडूत विकत घेतलेली शेते वगैरे आहेत. सदरची सर्व मालमत्ता तिच्या सर्व हक्कासह सईबाईंनी आपल्या पूर्ण मालकीची केल्याने नित्यनैमित्तिक खर्चाची तर बहुतेक तरतूद झालीच. पण सदर गावांचे दिवाणी, फौजदारी इत्यादी सर्व अधिकार प्राप्त झाल्याने एका छोटेखानी संस्थानाचाही रुदबा आला. सदर गावाचे त्या वेळचे वार्षिक उत्पन्न खर्चवेच वजा जाता सुमारे बारा तेरा हजारांचे होते. सदरच्या राणीगंजातील गोविंदपूर हे बाईसाहेबांच्या राजधानीचे गाव होते. तेथे राममंदिर, हनुमानमंदिर व देवस्थाने असून राहण्याचा वाडा व कचेरीही होती. कचेरीत पेशव्यांची गादी व्यवस्थितपणे ठेवलेली असे... पेशव्यांच्या नाव-लौकिकाची नेपाळ दरबारास पूर्ण जाणीव असल्याने पेशवे स्त्रियांस मोठ्या आदराने वागवले जाई... नेपाळच्या मुख्य राजाराणीव्यतिरिक्त कोणत्याही बड्या मनुष्यास सोन्याच्या दांडीच्या झालरीदार छत्रीचा मान दिला जात नाही. पण तो मान सईबाईसाहेबांस दिला जात असे... काकूसाहेब फार देखणी असून पाणीदार डोळ्यांची व बाणेदार स्वभावाची होती. ती अंगाने मजबूत व अत्यंत हुषार अस-ल्याने तिच्या हयातीपावेतो सईबाईसाहेबांस काहीच पहावे लागत नसे. तिचा स्वभाव मोकळ्या मनाचा व निर्भिड असल्याने सर्वांस जसा तिचा वचक असे तसे प्रेमही असे. नेपाळात बरोबर आणलेल्या पेशव्यांच्या गादीची पुढील संरक्षणाची काळजी अद्याप त्या सास्वासुनास जाचतच होती. पेशव्यांची गादी व नाव सही-सलामत रहावे म्हणून बरोबर आणलेले जडजवाहीर देऊन पेशव्यांचे स्वतंत्र असे 'राणीगंज' नावाचे छोटें संस्थान बाईसाहेबांनी मुद्दाम निर्माण केले. मुख्य हेतू वरीलप्रमाणें असल्याने गादीस योग्य वारस करून ठेवण्याचा मनसुबा त्या सास्वा-

* वाग्मती व रुद्रमती या दोन नद्यांच्या संगमावर वाग्मतीच्या उत्तर तीरा-वर नेपाळ नरेशांना प्रिय असलेल्या थपाथळी ह्या गावी सुंदर वाडा बांधून सईबाई व सर्व परिवार त्यात राहात असे.


थपाथळी येथील पेशव्यांच्या वाड्याचा करमरकरांच्या वर्णनाप्रमाणे नकाशा



१ स्वयंपाकघर (हल्ली मंदिर). २ जेवणानंतर बसण्याची बैठी जागा. ३ सास्वासुनांची बसावयाची पडवी, तळमजल्यावर. त्यावर दोन मजले. पहिला राहण्यानिजण्याचा व दुसरा कोठीचा. ४ पाहुणे व नेपाळचे राजेरजवाडे भेटावयास येत त्यांच्यासाठी माडीवर दिवाणखाना. ५ स्नानगृह – त्यांत पाण्याचे दोन हौद. ६ देवघर. ७ माडीवर पानसुपारी तयार करण्याची जागा. खालून रस्ता. ८ गवई गाण्यासाठी बसण्याची जागा. ९ कुणबिणींच्या खोल्या. १० पुरुषांसाठी स्वतंत्र घर. ११ शौचकूप. १२ गोशाळा. १३ विहीर. १४ देवडी.

(आराखडा : ' हिमालयात ' – ना. गो. चापेकर)

वाड्याच्या आवारातील श्रीलक्ष्मीनारायण मंदीर व भोवतालचे आवार यांचा नकाशा



१ मंदिर १८ × ३८ फूट. २ हौद किंवा पुष्करिणी. ३ मारुतीचे देऊळ. ४ गरुड. ५ शिलालेख. ६ देवडीवजा लहान इमारत. ७ विहीर.
(आराखडा : ‘ हिमालयात ’ – ना. गो. चापेकर.)

सूनांनीं ठरविला व त्याकरिता काशीस रहात असलेल्या चिमणाजी नावाच्या आपल्या नातवाची निवड केली. चिमणाजी गणेश थत्ते (आमचे वडील) हे दुसऱ्या बाजीरावांच्या कनिष्ठ बंधूचे म्हणजे चिमाजीआप्पासाहेबांच्या द्वारकाबाई नावाच्या एकुलत्या एक मुलीचे औरस पुत्र होत. द्वारकाबाईसाहेबांच्या पश्चात् लहानपणीच यास बाजीरावांनी चित्रकोटाहून ब्रह्मावर्तास घेऊन जाऊन आपले चौथे दत्तक पुत्र म्हणून पालनपोषण केले.* त्यामुळे पेशव्यांच्या बायकांचाही चिमणाजी गणेशावर

* चिमणाजी गणेश थत्ते यांचे बाजीरावांनी पालनपोषण केले हे खरे परंतु त्यांचे दत्तकविधान झाले नाहीं. तीं समजूत चुकीची आहे.

अत्यंत लोभ असे. दुसरे असे की, पेशव्यांच्या रक्ताचा प्रत्यक्ष संबंध असणाऱ्या व इतक्या घरोब्यातील वरील चिमणाजी नातवाव्यतिरिक्त दुसरा कोणीच औरस पुरुष नसल्याने चिमणाजी नातवाच्या घराण्यातील मुलगा दत्तक घेण्याचे बाईसाहेबांनी निश्चित केले.

लेख २ रा : १८५७ च्या बंडाच्या भाऊगर्दीत ज्यास जिकडे वाट मिळाली तिकडे तो गेला. त्यांत चिमणाजी थत्ते हे आपल्या मंडळीसह काशीस येऊन राहिले होते. बयाबाई आपटे यांचे काशीत वरचेवर जाणे येणे होतेच व मधून मधून त्या नेपाळासही माहेरपणाला जात असत. त्यामुळे चिमणाजीची सर्व खबर सईबाईसाहेबास समक्षच कळत असे. बाईसाहेबांनी चिमणाजीस भेटीकरिता निकडीचे बोलावणे पाठवले कारण या वेळी दत्तक घेण्याची योजना बाईसाहेबांस अमलात आणावयाची होती. चिमणाजी हे त्यांचे कुटुंब सत्यभामाबाई यासह व माझ्यासह (म्हणजे लक्ष्मण चिमणाजीसह) सन १८८० च्या सुमारास बाईसाहेबांकडे नेपाळात गेले. त्यावेळी मी दीड वर्षाचा होतो. वारसाहक्काने चिमणाजीस मिळालेली पेशव्यांची इस्टेट त्यांच्या अज्ञानावस्थेत संरक्षणार्थ इंग्रज सरकारच्या ताब्यात दिली होती व जिला सरकार गिळू पहात होते ती इस्टेट सोडवण्याच्या खटपटीत चिमणाजी गुंतले असल्याने त्यांना सईबाईसाहेबांनी सर्वांनीच नेपाळात येऊन राहण्याची गळ घातली तरी रुकार देता येईना तेव्हा बाईसाहेबांनी चिमणाजींजवळ माझी मागणी केली व त्याप्रमाणे चिमाजीपंतांनी व त्यांच्या पत्नीने उभयतांनी सईबाईसाहेब पेशवे यांच्या ओटीत मला विधिपूर्वक घालून त्यांच्या आज्ञेचे परिपालन केले. दत्तविधान उरकल्यावर मी अगदीच लहान असल्याने माझेसह चिमणाजीपंतास काशीस परत जाण्याची आज्ञा बाईसाहेबांनी दिली. दत्तविधानानंतर सुमारे पाच सहा वर्षांनी बाईसाहेबांची आवडती कार्यकुशल सून काकूसाहेब बाईसाहेबास सोडून गेल्याने त्या अगदी एकाकी झाल्या. तरी ते दुःख थोडे बाजूस सारून दत्तकाबद्दल नेपाळ सरकारची संमती मिळवण्याची खटपट त्यांनी सुरू केली. नेपाळच्या मुख्य प्रधानास भेटीस बोलावून दत्तविधानाची हकीगत त्यांच्या कानावर घालून, दत्तकाबद्दल त्यांची व नेपाळ सरकारची संमती मिळवली. ही गोष्ट दत्तविधानाचेच वेळी केली असती पण इंग्रज सरकारच्या पाताळयंत्री राजकारणाची त्यांना दहशत वाटत असल्याने त्यांनी सदरची गोष्ट मुद्दाम गुप्त ठेवली. राजाज्ञेची आडकाठी दूर झाल्यावर मला म्हणजे लक्ष्मण चिमणाजी थत्ते यांस नेपाळात घेऊन जाण्याबद्दल बाईसाहेबांनी आपले मुख्य कारभारी रामभाऊ भिडे यांस काशीस पाठवले. त्यावेळी माझे वडील चिमणाजी व मातोश्री उभयता हयात नव्हती. वडिलांची सापत्न मातोश्री अयोध्याबाई ऊर्फ माईसाहेब हयात होत्या. यांचा व बाईसाहेबांचा परिचय ब्रह्मावर्तास असताना विशेषच असल्याने त्यास माझ्या वडील बंधूसही घेऊन येण्याबद्दल बाईसाहेबांनी कारभाऱ्यास आज्ञा देऊन ठेवली होती. याप्रमाणे माझे बंधू गणपतराव व त्यांचे कुटुंब शारदाबाई

यांचे समवेत मला घेऊन बाईसाहेबांचे कारभारी काशीहून निघाले. याप्रमाणे सन १८८८ च्या सुमारास आम्ही नेपाळला पोचल्यावर, मुख्य प्रधान वीर समशेर यांस सईबाईसाहेबांनी कळविले. त्याप्रमाणे त्यांनी मला पाहून माझ्या दत्तकोत्सवाचा व मुंजीचा दिवस ठरवला. नेपाळमधील प्रसिद्ध पशुपतिमंदिरासन्निध वरील दोन्ही कार्ये करण्याचे बाईसाहेबांनी ठरवले व त्याप्रमाणे माझ्या दत्तकविधानाचा व मुंजीचा सोहळा श्री पशुपतेश्वराच्या मंदिराजवळ साजरा करण्यात आला. अनेक दुःखांनी बाईसाहेबांचे अंतःकरण जरी करपून गेले होते तरी वरील दोन्ही समारंभ त्यांनी तेथे उपलब्ध असलेल्या सामुग्रीने चांगले झोकांत केले. बाईसाहेब अशावेळी काशीतीलच आपले ब्राह्मण बोलावीत असत. यावेळी गोविंदभट मेहेंदळे, भिकु दीक्षित ओक, हरिशास्त्री पशुपती (जोशी), इत्यादी पांच सहा ब्राह्मण नेपाळात आले होते. वरील कार्ये निर्विघ्नपणे पार पाडल्याबद्दल वाड्यातही कुलदेवतांची, गादीची व सत्यनारायणाची महापूजा करून खाजगी समारंभ करण्यात आले. सईबाईसाहेब मनाच्या थोर, शांत व प्रेमळ, मनमिळावू होत्या. त्यांनी आम्हांस मोठ्या वात्सल्याने व प्रेमानेच वाढवले. मी त्यांचा मुलगा झाल्यापासून नैमित्तिक धार्मिक कृत्ये त्या मजकडूनच करवीत. इतकेच नव्हे तर नेपाळातील राहत्या वाड्याच्या माडीवर पेशव्यांची गादी असे. तिच्या पूजेच्या वेळी त्या मला आपल्याबरोबर दररोज घेऊन जात असत. तसेच संस्थानाच्या रिवाजाप्रमाणे दसऱ्याच्या दिवशी शस्त्रादीच्या मुख्य मुख्य पुजा माझ्या हातानेच त्या करवीत. याशिवाय दसऱ्याच्या दिवशी गादीचा मालक पूजेनंतर गादीवर बसून नजर नजराणे घेण्याचा रिवाज आहे. त्याप्रमाणे दसरा व वसंतपंचमीच्या दिवशी बाईसाहेब मजसोबत गादीवर बसून नजर नजराणे घेत व मला शिलंगणाला पाठवीत. दत्तकाचे नाव ठेवण्याची वहिवाट आहे. परंतु बाईसाहेबांनी माझे नाव पहिलेच – म्हणजे लक्ष्मण हेच – कायम केले. कारण माझे वडील चिमणाजी हे त्यांचे दत्तक पुत्रच होते (?) म्हणून माझे नाव बदलण्याची त्यास जरूरी वाटली नसावी. बाईसाहेबांनी माझ्या नावाचा शिक्का करून तो कचेरीत चालू केला. जमाखर्ची वगैरे कागदावर शिक्का करण्याकरिता मी नेपाळ सरकारने नेमलेल्या व्यवस्थापकाच्या कचेरीत दर आठवड्यास जात असे. शिक्का सरकारने नेमलेल्या व्यवस्थापकाच्या ताब्यात असे. माझ्यावेळी विष्णु भगत नावाचा सुब्बा (व्यवस्थापक) होता. संवत् १९४६ च्या दसऱ्याच्या मुहूर्तावर बाईसाहेबांनी माझ्या नावे मुखत्यारगिरी गावापासून तो नेपाळातील वाड्यापावेतो कामदारीची सनदही करून दिलेली होती. याप्रमाणे नेपाळातील सुमारे अडीच तीन वर्षांचा माझ्या वास्तव्याचा काळ माझे पणजोबा श्री. चिमाजी आप्पासाहेब पेशवे व माझे वडील चिमणाजी आप्पासाहेब ह्यांच्याप्रमाणे पेशवेपदाचा उपभोग घेण्यात गेला. यानंतर पुढे काशीस घरी कार्य निघाले म्हणून बाईसाहेबांनीं मला काशीस जाण्याची परवानगी दिली व मी काशीस (सन १८९१ मध्ये) निघून

आलो. काशीतील घरचे कार्य संपून नेपाळात परत जाण्याची माझी तयारी होते तोच एकाएकी जबरदस्त विषमाने काशीतच मी घरी आजारी पडलो. या दुखण्यातून मी बरा होण्याची आशा कोणीच दर्शविली नाही. त्यामुळे बाईसाहेबांचे मनही अगदी उदास झाले व त्या पुढील योजनेचा विचार करू लागल्या. बाईसाहेबांच्या मनात रहात्या वाड्यातील खुल्या जागेत सुबकसे एक लहान लक्ष्मीनारायणाचे मंदिर बांधावयाचे होते म्हणून मी तेथे असतानाच त्याची आखणी थोडी चालू होती. स्थापनेच्या वेळी माझ्या येण्याची आशा बाईसाहेबांनी सोडली व स्थापनेचा दिवस त्यांनीं मुक्रर केला. बाईसाहेब मोठ्या कृष्णभक्त होत्या. त्या आपल्याजवळ सदोदित एक चांदीचा सुमारे अडीच तीन इंच उंचीचा बाळकृष्ण बाळगीत असत व त्याचे सर्व सोपस्कार स्वत: जातीने मोठ्या भक्तिभावाने करीत. वर्षातून एकवेळ श्रीपशुपतीच्या दर्शनाव्यतिरिक्त त्या इतर देवांच्या दर्शनास कधी गेल्या नाहीत. पेशव्यांची गादी व नाव राखण्याकरिता बाईसाहेबांनी मोठ्या दूरदृष्टीने जो खटाटोप केला तो निरर्थक ठरेल अशी माझ्या आजारपणाच्या वार्तेने त्यांच्या मनाची खात्री झाली. पेशव्यांची सर्व इस्टेट, स्थापन केलेल्या देवांच्याच नावची करावी म्हणजे आपली जबाबदारी व काळजी कमी होऊन ती अनायासे देवावरच पडेल व आपल्या पश्चात त्याच्या इच्छेनुरूप जे व्हायचे असेल ते होईल असे बाईसाहेबांनी जवळील कामगारांच्या सल्ल्याने ठरवून त्यांनी आपली सर्व इस्टेट शेवटी सुरक्षिततेच्या दृष्टीने परमेश्वरार्पण केली.

पुण्याच्या धर्तीचे एक चांगले टुमदार देऊळ बांधून त्यात बाईसाहेबांनी संवत् १९४९ माघ शु. १३ सोमवार रोजी (मोडक जंत्री – ३० जानेवारी सन १८९३ नंदननाम संवत्सर) श्री लक्ष्मीनारायणाची स्थापना* केल्याची वार्ता काशीस आम्हास कळविण्यात आली. परंतु त्याचवेळी सईबाईसाहेबांनी आपली इस्टेट देवास अर्पण केल्याची खबर आम्हास कळविण्यात आली नाही. पण काशीहून सदरच्या समाराधनेस्तव गेलेली ब्राह्मण मंडळी जेव्हा काशीस परत आली तेव्हा ही वार्ता आमच्या कानावर आली. तथापि आम्हास त्याचा खेद वाटला नाही. उलट बाईसाहेबांच्या मुत्सद्दीपणाच्या धोरणाची आम्ही तारीफच केली. कारण या योजनेने बऱ्याचशा गोष्टी साधणाऱ्या होत्या ... सईबाईसाहेब पेशवे यांनी आपली इहलोकची यात्रा सन १८९६ च्या चैत्र शु. १२ रोजी नेपाळातील काठमांडू राजधानीत संपविली. एकादशीचा उपवास करून द्वादशीस ब्राह्मण जेवल्यानंतर स्वतः भगवंताचा तीर्थप्रसाद घेऊन श्रीकृष्ण परमात्म्याचे चिंतन करीत त्यानी आपला देह ठेविला. पशुपतीजवळ आर्याघाटावर त्यांचे दहन झाले. त्यावेळचा मुख्यप्रधान वीर समशेर

*पुर्नवसु नक्षत्रावर, मीन लग्नावर, सोमवारी सकाळी सूर्योदयापासून ७ घटिका व ५७ पळांनी, धनुर्नवांशात स्थापना झाली असे शिलालेखावरून समजते.

यास बाईसाहेबांच्या मृत्यूची वर्दी लागताच त्यांनी बाईसाहेबांच्या वाड्यात कडेकोट बंदोबस्त ठेविला व चहूकडे टाळेबंदी करून बाईसाहेबांची सर्व इस्टेट आपल्या ताब्यात घेतली.

लेख ३ रा : (यात मुख्यतः नेपाळच्या प्रधानांनी हस्तगत केलेली इस्टेट सोडवून घेण्यासाठी थत्ते मंडळींनी केलेल्या प्रयत्नांची माहिती व नंतर पुढील माहिती दिली आहे –) मी माझ्या वडील मुलासह (नारायण लक्ष्मण थत्ते) सन १९४७ च्या महाशिवरात्रीच्या दिवशी नेपाळात जाण्यासाठी निघालो ... आम्ही बाईसाहेबांच्या गोविंदपूर गत राजधानीस जाऊन येण्याचे ठरविले. तेथे अद्याप पावेतो विद्यमान असलेल्या पेशव्यांच्या गादीचे व श्रीराम वगैरे देवांचे दर्शन घेऊन तेथील पुजाऱ्यास आम्ही तेथील व्यवस्थेबद्दलची माहिती विचारली. पण त्यांनी मालकाच्या दहशतीमुळे नीटशी सांगितली नाही. तथापि त्यांनी थोडक्यात असे सांगितले की, ' गादीची रोजची पूजा माझेकडे आहे. रामजी व हनुमानजीचा पुजारी दुसरा आहे. पूर्वीचा पेशव्यांचा वाडा व ही कचेरी आणि रामजीच्या देवळाचा भाग भूकंपात पडला. जेथे गादी ठेवली आहे तो पूर्वीच्याच कचेरीपैकी शिलकी भाग आहे. देवाबद्दल विशेषतः खर्च नाही. '

लेख ४ था : सईबाईचे शब्दचित्र -- सईबाईसाहेब पेशवे ह्या नेपाळात ' दखिखनी महाराणीसाहेब ' या नावाने प्रसिद्ध होत्या. त्यांचा शरीरबांधा उंच व किडकिडीत होता. लांबट चेहरा, डोळे व ओठ लहान, नाक सरळ व तरतरीत असून त्या गोऱ्या व निकोप प्रकृतीच्या होत्या. त्यांचा स्वभाव मितभाषी, मनमिळावू व शांत होता. वागणूक मर्यादशील व सभ्यतेची असून राहणी अगदी साधी होती. त्या नेहमी साधा व शुभ्र कपडा वापरीत. त्यांच्या दोन्ही कानांत सोन्याच्या तारेत ओवलेली मोती, रुद्राक्ष व पोवळे, अशा तीन लहान मण्यांची लहानशी बाळी असे. तसेच हाताच्या बोटात चांदी, तांबे व सोने, यांच्या बारीक तारेचे एक वळीव वेढे असे.

वाडा : बाईसाहेबांचा राहण्याचा वाडा अडीच मजली दुबई व सात आठ खणांचा असून त्याच्या चहूबाजूस मोकळी जागा होती. वाड्याच्या दक्षिण बाजूस हवा खाण्याकरिता बाईसाहेबांनी एक टुमदार नजरबाग तयार करून तीत त्या दररोज सायंकाळी फिरावयास जात. सदर बागेच्या पश्चिम भागातच बाईसाहेबांनी लक्ष्मीनारायणाचे मंदिर बांधलेले आहे. सदर वाड्याच्या तळमजल्यावर देवघर, स्वयंपाकघर, बाईसाहेबांचा नेहमी बसण्याचा लहानसा दिवाणखाना इत्यादी असून वरील मजल्यात पश्चिम बाजूकडील एका लहान खोलीत पेशव्यांची गादी दरबारी थाटात मांडलेली असे व गादीच्या मागच्या भिंतीत शस्त्रे व छत्रचामरादी ठेवलेली असत. खुद्द गादीवर एक उत्तम तलवारही ठेवलेली असे. याच गादीवर मी बाई-साहेबांबरोबर बसून नजर नजराणे घेई व त्यावरील तलवारीने दसऱ्याच्या दिवशी मुख्य गादीचा बळी माझ्या हाताने वाड्याच्या मुख्य दरवाजाहेर होई. सदर खोलीच्या

उत्तर बाजूस एक मोठा दिवाणखाना असून तेथे बड्या बड्या मंडळींचे स्वागत होई. त्या वेळी बाईसाहेब गादीच्या खोलीत बसत व दारास चिकाचा पडदा लावून मुख्य कारभाऱ्यांच्या मध्यस्थीने बोलणी होत. गादीच्या दक्षिण बाजूकडील खोलीत जामदारखाना असून, बाहेर निजणे बसणे (खाशांचे) असे. याच्या वरील मजल्यात कोठी होती. येणेप्रमाणे बाईसाहेबांच्या राहत्या वाड्याची रचना होती. हल्ली सदरचा वाडा भूकंपात पडून गेल्याने तेथे मैदान झाले आहे.

लेख ५ वा : (चित्रकूटच्या पेशवे शाखेची माहिती) : १८५७ सालच्या हुल्लडीत इंग्रज सरकारने चित्रकूट खालसा करून नारायणरावास हजारीबागेस व माधवरावास बरेलीस नजरबंदीत ठेवले. नारायणराव वारल्यानंतर त्यांचे कुटुंब गंगाबाईसाहेब ऊर्फ वहिनीसाहेब काशीस राहिल्या व तेथेच वारल्या. यांना ७५० रु. दरमहा नेमणूक सरकार देत असे. या काशीत कपिलेश्वर महादेवाच्या गल्लीत भाड्याच्या वाड्यात राहत असत. देवडीवर ' घडी घंटा ' असे. यावरून तद्देशीय लोक यास ' घडीवाली बाईसाहेब ' म्हणत. यांनी आमरणान्त आपले आयुष्य सन्मार्गाने घालविले. यास संतती नव्हती. माधवराव यास कृष्णराव ऊर्फ बाळासाहेब व सदाशिवराव ऊर्फ बाबासाहेब असे दोन पुत्र होते. बाळासाहेबांचा विवाह मळेकरांच्या मुलीशी झाला होता व बाबासाहेबास काशीतील प्रसिद्ध ज्योतिषी पं. बापूदेवशास्त्री यांची कन्या दिली होती. बाळासाहेबास बापूसाहेब व राजासाहेब असे दोन पुत्र होते व ठकूताई नावाची कन्या झाली. पैकी बापूसाहेब वारले. दुसरे विश्वनाथराव ऊर्फ राजासाहेब हे हल्ली आपल्या मंडळींसह पुण्यातच असतात. यास सरोजिनी व कृष्णराव अशी दोन मुले आहेत. हे पदवीधर आहेत. ठकूताई हल्लीच्या मळेकरास दिली आहे. बाबासाहेबास दोन पुत्र झाले. पैकी दुसरा लहानपणीच गेला व पहिला रघुनाथराव बरेच दिवस पुण्यात होता व तेथेच दुखण्याने वारला. यास तासगावकरांची मुलगी दिली असून ती तेथेच आपल्या दिराजवळ असते. वरील विद्यमान प्रमुख व्यक्तीस सरकारकडून मासिक नेमणूक मिळत असते. बरेलीस वरील मंडळींचा मोठा वाडा असून तेथे काही नोकर माणसेही असतात. मालकांपैकी बाबासाहेबांची बायको तेथे असते. तिलाही नेमणूक मिळते. बाळासाहेब १९०७ मध्ये व बाबासाहेब १९१६ मध्ये वारले. असा पेशव्यांचा दत्तक वंश आज हयात आहे. *

---

* चित्रकूट – बरेली शाखेपैकी विश्वनाथराव ऊर्फ राजासाहेब व गं. भा. पार्वतीबाईसाहेब यांचे वरील लेखामध्ये वर्तमानकालीन उल्लेख आहेत. राजासाहेब १९५१ साली वारले व गं. भा. पार्वतीबाईसाहेब १९५० साली वारल्या. यावरून लेख १९५३ साली प्रसिद्ध झाले तरी त्यांतील नोंदी (कै.) लक्ष्मणराव थत्त्यांना ज्ञात असलेल्या वृत्तांतापर्यंतच्या असाव्यात.

× × ×

श्री. लक्ष्मणराव थत्ते यांची सावत्र आजी गं. भा. अयोध्याबाई (चिमाजी आप्पासाहेब पेशव्यांचे जावई गणपतराव थत्ते यांची द्वितीय पत्नी) यांनी लक्ष्मण-रावांना, चिमणाजीराव थत्ते यांना १८५७ च्या उठावाच्या काळात कोणत्या परिस्थितीत ब्रह्मावर्त सोडून वाराणसीला जावे लागले, याबद्दल प्रत्यक्ष हकीकत सांगितली. ती पुढीलप्रमाणे : 'ब्रह्मावर्तास (बिठूर) काही महिने नानाशाही झाली. म्हणजे इ. स. १८५७ च्या बंडात काही महिने धोंडोपंत नानासाहेब यांचा अंमल बसला. पेशव्यांचे अस्सल वंशज चिमणाजीराव असल्यामुळे सहाजिकच समाज त्यास मान देत. याचे बंडवाल्या नानासाहेबास वैषम्य वाटत होते. तेव्हा त्यांचा रोष चिमणाजीरावांवर झाला. त्यांनी त्यांच्या घरावर धरणे पाठविले. ही बातमी एका नोकराने अयोध्याबाईस व दुसऱ्या एका स्त्रीस दिली. त्याबरोबर त्यांनी मौल्यवान जिनसा जमिनीत पुरून छपवाछपवी केली. धरणेकऱ्यांनी बाहेर पडा सांगताच पुरुष मनुष्य घरी नसल्यामुळे आम्ही बाहेर निघणार नाही असे त्या बोलल्या. चिमणाजीराव आप्पासाहेब कोठे गेले विचारता तीन चार दिवस त्यांचा पत्ता नाही असे कळविण्यात आले पण ते ब्रह्मावर्ताकडून तडक निघाले ते श्रीक्षेत्र वाराणसीस दाखल झाले म्हणून सुटले.'

(संदर्भ : 'संशोधक' सप्टेंबर १९८४, राजवाडे संशोधन मंडळ, त्रैमासिक)

× × ×

श्री. लक्ष्मणराव थत्ते यांनी सांगितलेली नेपाळ येथील वास्तव्याची हकीगत, इतिहास संशोधक श्री. य. रा. गुप्ते यांनी 'संशोधक' त्रैमासिकाच्या जानेवारी–मार्च सन १९४३ च्या अंकात (पृ. ४१ -पृ.४४) छापली आहे. त्यापैकी गोषवारा :

'नेपाळ सरकारने आपला दिवाण जंगबहाद्दर यास (पेशवा परिवाराला) सामोरे पाठवून त्यांचा गौरव केला. दर आठवड्यातून एकदा जंगबहाद्दर बायांच्या (पेशवा – परिवारातील स्त्रिया) दर्शनास जाऊन त्यांचा योग्य बंदोबस्त राहिला आहे किंवा नाही याची चौकशी करीत. त्यावेळी ते आपले हात रुमालाने बांधून पुढे जात. नेपाळमध्ये गेल्यापासून ब्रह्मावर्ताचा विसर न पडेल अशा थाटाने तेथील सरकारने त्यांचा बंदोबस्त ठेवला होता.'

'बायांचे संरक्षणार्थ गुरखे शिपायांचा ताफाही नेपाळी सरकारने ठेविला होता. त्यांवर एक अमलदार असून पैशाअडक्याच्या हिशोबावरही तो नजर ठेवीत असे. खेरीज बायांचा कारभारी होता तो वेगळाच.'

'दत्तकाकडे (श्री. लक्ष्मणराव थत्ते) विजयादशमी संवत् १९४६ ता. २३ ऑक्टोबर १८९० इसवी रोजी अधिकार सोपविला. अशी अट होती की, दत्तकाने राणीगंजात न राहता नेपाळ शहरात (नेपाळी हद्दीत ?) राहिले पाहिजे. त्याच्या (दत्तकाच्या) नावाचा शिक्काही झाला. पण त्याच वेळी नेपाळ सरकारची मंजूरी

घेतली नाही ह्यामुळे होमहवनही केले नाही. पण यथाविधी मांडीवर दत्तक घेतलेच होते.'

'महाराणीसाहेब सुवर्णाच्या ४० तोळे वजनाच्या श्रीमंत नारायणरावांच्या मूर्तीची नित्य पूजा करीत. त्या नारायणरावास 'महापुरुष' संबोधीत. २१ तोळे वजनाचा एक सोन्याचा गणपतीही त्या पूजीत असत. एक सबंध मोत्याचा लहान गणपती त्यांच्या जवळ होता. खेरीज पाचेची बोटाएवढी गवळण त्यांच्या संग्रही असे.'

'त्या तासच्या तास ईश्वरभजनात घालवीत. जप करीत, उपवास करीत. त्यास शेवटी शेवटी थोडा भ्रमही झालेला होता. अर्ध्या कपाळास त्या भस्म लावीत, तर उरलेले अर्धे त्या बऱ्याच वेळाने पुरे करीत.'

× × ×

२२ जून सन १९३४ च्या 'केसरी'च्या अंकात पेशवा परिवाराची थोडी माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे :–

पेशव्यांची नेपाळातील मिळकत

दुसऱ्या बाजीरावांचे चिरंजीव नानासाहेब पेशवे हे १८५७ सालात झालेले बंड मोडल्यावर नेपाळात गेले. त्यांजबरोबर त्यांची सावत्र आई व कुटुंबातील इतर कांहीं माणसे होती. नेपाळचे त्या वेळचे मुख्य प्रधान जंगबहादूर यांना हे वृत्त समजले तेव्हा त्यांनी ब्रिटिश सरकार बरोबर नेपाळचा जो तह झाला आहे, त्या तहान्वयें तुम्हांस नेपाळात आश्रय देता येत नाही असे नानासाहेबांस कळविले. तथापि नानासाहेबांच्या सावत्र आईने तेथे राहण्यास त्यांची हरकत नव्हती. म्हणून नानासाहेबांनी नेपाळची हद्द सोडली. त्यानंतर त्यांची सावत्र आई[1] नेपाळात राहिली व तिने आपल्या जवळचे १ लाख ३६ हजार रुपये किमतीचे स्त्रीधन विकून नेपाळच्या चंपारण्य ह्या जिल्ह्यात राणीगंज नावाचे एक खेडे खरेदी केले.[2] त्या खेड्याचे उत्पन्न व नेपाळ सरकारकडून दरमहा मिळणारी ९०० रु. ची नेमणूक बाईस आपल्या योग्यतेने रहावयास पुरत होती. त्याखेरीज बाईच्या संरक्षणार्थ वीस गुरखे शिपायांचा पहाराही दरबाराने ठेवला होता. या बाईस नेपाळात दक्षिणी महाराणी म्हणत.

तिच्या दुर्दैवाने तिचे सगळे मुलगे व सुना तिच्या डोळ्यांदेखत मरण पावल्या. म्हणून राणीने एक मुलगा दत्तक घेण्याचे ठरविले. त्याचे नाव लक्ष्मणराव. लक्ष्मणरावास १८८८ त नेपाळात नेण्यात आले व त्याला राणीने दत्तकही घेतले.[3]

---

१. सईबाई पेशवे, २. आठ गाव खरेदी केले. त्यांना एकत्रित 'राणीगंज' हे नाव दिले., ३. दत्तकविधान १८८१ साली झाले. १८८८ साली दत्तकाला नेपाळात नेले ते अधिकारग्रहण आणि इतर बाबींच्या पूर्ततेसाठी. लक्ष्मणरावांचा जन्म सन १८७९ चा.

हळू हळू तिने त्याजकडे सर्व अधिकारही सोपविला. इतकेच काय पण त्याच्या नावाचा शिक्काही सुरू करण्यात आला. फक्त या दत्तकविधानास नेपाळ सरकारची मंजुरीच काय ती मिळावयाची राहिली होती. ती मंजुरी राणीने मिळवलीही असती परंतु त्यामुळे आपल्या दत्तक मुलाला थपथेली गावी कायमचे रहावे लागेल व ते गाव केव्हाही सोडता येणार नाही, अशी राणीला भीती वाटून तिने मंजुरीचे प्रकरण लांबणीवर टाकले.

अशा अनिश्चित स्थितीत राणी मरण पावली. तिच्या मरणसमयी राणीचा दत्तक मुलगा नेपाळात नसून तो प्रकृती सुधारण्याकरितां महाराष्ट्रात आला होता. राणीच्या मृत्यूची बातमी बाजीरावाची कन्या बयाबाई साहेब आपटे यांस ग्वाल्हेरीस समजली व तिने सदर वर्तमान दत्तक पुत्रास दक्षिणेत कळविले व त्याने राणीचे और्ध्वदेहिकही केले.

राणी मरण पावल्यावर बयाबाई साहेबांनी नेपाळ दरबारास राणीची मिळकत तिच्या दत्तक पुत्राच्या स्वाधीन करण्यापूर्वी आपल्या ताब्यात घेण्याबद्दल कळविले. दरबारने मिळकत ताब्यात घेतली पण ती दत्तक पुत्राला देऊ असे आश्वासन बयाबाईंस दिले नाही. म्हणून बयाबाईने नेपाळ दरबारास दत्तक पुत्राच्या वतीने अर्जावर अर्ज केले. परंतु त्यांची दाद लागण्यापूर्वीच बयाबाई निवर्तल्या.

इकडे नेपाळचे मुख्य दिवाण वीर समशेर यांनी राणीची जंगम मिळकत कबजात घेतली व राणीगंज हा गाव राणीने आपणास दिला असल्याचे दरबारास भासवून सदर गाव आपल्या नावावर करून घेतला. वीर समशेर यांच्याही मृत्यूचा काळ समीप आला. तेव्हा त्याने आपली मालमत्ता आपल्या दोन स्त्रियांत वाटून धाकट्या बायकोस राणीगंज हा गाव दिला. या उत्पन्नाच्या आता[४] पाच वाटण्या झाल्या असून त्याखेरीज ४५० रु. राणीने बांधलेल्या रामाचे व लक्ष्मीनारायणाचे देवळास दरसाल गावच्या उत्पन्नातून मिळत असतात.

वास्तविक दरबारने राणीगंज हा गाव राणीच्या दत्तक पुत्रास द्यावयास पाहिजे किंवा तो गाव ज्या किंमतीस राणीने खरेदी केला ती किंमत तरी दरबाराकडून दत्तक पुत्रास मिळाली पाहिजे. या बाबतीत श्री. लक्ष्मणराव यांनी आपणाकडून पुष्कळ खटपट करून पाहिली. पण त्यांना अद्यापि[४] यश आलेले नाही,

राणीने लक्ष्मणरावास दत्तक घेण्यास नेपाळात नेले त्याला आता ४६ वर्षे झाली. त्या वेळी ते ८/१० वर्षांचे असतील असे गृहीत धरले तरी त्यांचे वय आता ५५ वर्षांच्या घरात गेले आहे. त्यांचे जनक लक्ष्मण चिमणाजी थत्ते असे असून ते पुण्यास शुक्रवार पेठेत अगर काशीत ब्रह्माघाटावर आंग्रे यांचे वाड्यात असतात.[४]

४. सन १९३४.

श्री. कृष्णाजी बळवंत रिसबूड यांचे १९३७ सालचे सुमाराला ६५ वर्षांचे वय होते. सईबाई पेशवे या त्यांच्या चुलत आत्या, सईबाईचे क्रियाकर्मांतर त्यांनीच केले. पेशव्यांच्या नेपाळातील ८ गावांची वहिवाट पाहणे व नेपाळातून बाहेर ये-जा करण्यासाठी कारकून म्हणून हेच काम करीत असत. श्री. कृष्णाजी बळवंत रिसबुडांनी १९३७ सालचे सुमाराला श्री. का. न. केळकरांना नेपाळमधील पेशव्यांच्या वास्तव्याबद्दल समक्ष लिहून दिलेली हकीगत :-

(संदर्भ : 'शमी-पूजन'– ले. का. न. केळकर आ. सन १९४७, पृ. १७८–१७९)

"नानासाहेबांचे बरोबर नेपाळांत त्यांच्या दोन सावत्र आया, त्यांची बायको (यांना काकूसाहेब म्हणत), एक भावजय, पुतणे रावसाहेब पेशवे यांची बायको रमाबाई, बयाबाईसाहेब आपटे इतकी स्त्रीमाणसें व दोन 'कुणबिणी' होत्या. एक कोठावळा परशुराम व दुसरा मीरमुनशी बाळाराम होता. हा जातीचा गोळक होता. माझे जन्माचे सुमारास वडील वारले. माझे चुलते हरीपंत हे सन १८६५ चे सुमारास श्रीमंत सईबाईसाहेब (माझ्या सख्या चुलत आत्या) यांचे घरी नेपाळात राहून त्यांचे कामकाज पहात. त्यांचा बहुतेक जन्म नेपाळात गेला. नानासाहेब पेशव्यांच्या स्त्रीचे शेवटचे क्रियाकर्मांतर हरिपंतकाकांनी केले व बाजीराव-साहेबांच्या पत्नी सईबाई यांची 'क्रिया' माझे हाताने झाली. त्या वेळी मी चोवीस वर्षांचा होतो. मीरमुनशी बाळाराम हा माझ्या देखत सुमारे ७० वर्षांचा होऊन वारला. तो बंडाच्या पुष्कळ गोष्टी सांगत असे. त्या पुष्कळशा प्रसिद्ध हकीकतीं-पैकीच आहेत. तथापि त्यांपैकी एक म्हणजे "नानासाहेब हे क्रूरकर्मा नसून अतिशय न्यायी व दयाळू असत. कानपूरच्या कत्तलीत नानासाहेबांचे मुळीच अंग नव्हते. त्यांच्या पश्चात् शिपाई लोकांनीच ती परस्पर केली, ते नेते असल्यामुळे ती जबा-बदारी त्यांच्यावर चिकटविण्यात येते." असा त्याच्या भाषणाचा आशय असे. तिघा पेशव्यांमध्ये बाळासाहेब हे विशेष उच्छृंखल व तापट असत. नानासाहेबांची बायको कृष्णाबाई अंगापिंडाने मोठी मजबूत, सशक्त व घोड्यावर बसणारी असे. तिला लिहितां वाचतांही येत असे. सईबाई साहेबांनाही घोड्यावर बसणे व लिहिणे येत असे. या दोघी पराकाष्ठेच्या धार्मिक व परोपकारी होत्या. नेपाळसरकारने खाटमांडू येथे 'थापाथली' महालांत त्यांना एक मोठा वाडा राहावयाला दिला असून, त्यांना दर महिन्याला ४०० रुपये तनखा व आठ गावे जहागीर दिली होती. गावांचे उत्पन्न सुमारें १२ हजार रुपये सालिना येत असे. शिवाय बारा नेपाळी शिपायांचा पगारही नेपाळ सरकारच देत असे. झालर असलेले छत्र नेपाळात राजाशिवाय दुसऱ्या कोणास वापरण्याचा अधिकार नाही. पण नेपाळचे मुख्य देवस्थान पशुपतिनाथ याचे दर्शनास जातांना पेशव्यांच्या स्त्रियांना राजछत्र

वापरण्याचा अधिकार होता. तसेच 'देव पाटण' ही पशुपतिनाथाच्या जवळच राजघराण्यातील लोकांच्या अंत्यसंस्काराची जागा आहे, तेथेच पेशव्यांचे घराण्यातील स्त्रियांचे अंत्यसंस्कार केले. नेपाळ सरकारने पंतप्रधान पेशव्यांचे थोर नाव व महिमा पाहून या स्त्रियांना फार सन्मानाने वागविले व त्यांना कमी पडू दिले नाही. सुमारे पस्तीस चाळीस वर्षे अव्याहत दर महिन्याला तनख्याची पहिली तारीख चुकली नाही; व या स्त्रियांना खर्च व दानधर्म करण्याला विवंचना पडली नाही. सईबाईसाहेबांचा स्वभाव मोठा नेमधर्मी, धार्मिक व परोपकारी असे. नेपाळसारख्या थंडीतही त्या पहाटे चार वाजता उठून स्नान करीत व सात वाजेपर्यंत देवपूजा वगैरे धार्मिक कृत्यें आटपीत. नंतर गोठ्यांतील गाईवासरांना दाणावैरण आहे की नाही याची स्वतः फिरून विचारपूस करीत. सरकारने जे आठ गाव त्यांना दिले होते त्यांचे दिवाणी व फौजदारी अधिकार त्यांनाच होते. त्यासंबंधी कामकाजांत लक्ष घालणे, हिशेब सांगून लिहविणे वगैरे कामे दुपारी होत. व संध्याकाळी बाग वगैरे केला होता त्यांत थोडा वेळ फिरत. गतवैभवाच्या गोष्टीबद्दल सहसा त्या बोलत नसत ! पोथीवाचनात काळ घालवीत. सईबाईंचेपेक्षा नानासाहेब पेशव्यांचे कुटुंब अधिक मनमोकळेपणाने इतरांशी बोलत असे. बाळाराम गावच्या वसुलीच्या कामावर असे. येणेप्रमाणे हकीगत आहे.'

(सही)

कृष्णाजी बळवंत रिसबूड

दस्तुर खुद्द

* *

परिशिष्ट आठवे

नेपाळच्या मंदिरातील पेशव्यांचा शिलालेख

हा शिलालेख काळ्या दगडात कोरलेला आहे. याची लांबी ४९ इंच असून तो खालच्या बाजूस निमूळता होत गेला आहे. त्यावरील मजकूराच्या ओळींपैकी ३२ श्लोक संस्कृत भाषेत असून पुढील ओळी गिरीराज (नेपाळी) भाषेत आहेत. तेथील पितळी घंटा मोठी असून त्यावर गोलाकार तीन ओळी मजकूर संस्कृत भाषेत उठावदार अक्षरात आहे. त्यात पहिल्या बाजीरावापासून नामोल्लेख असून पुण्याचे राजे असा उल्लेख आहे.

॥ श्री ॥

(लक्ष्मीनारायणाची मूर्ति)

सूर्यमूर्ति **सूर्यमूर्ति**

श्रीलक्ष्मीनारायण श्री ५ सर्कार

सहस्रचंद्रप्रतिमो दयालुर्लक्ष्मीमुखालोकनलोलनेत्रः ॥
दशावतारैः परितः परीतो नृकेसरी मंगलमातनोतु ॥१॥
नत्वा गणेशं जगदम्बिकां च श्रीसूर्यनारायणवेदमूर्तिम् ॥
श्रीगुह्यकालीरमणं महेशं भक्तार्तिहृद्दाशरथिं रमेशम् ॥२॥
यस्मिन्सुदेशे द्विजबाहुजातवैश्यांत्यजानग्निजवर्णधर्म्यान् ॥
दृष्ट्वा सुरेशोपि सुधर्नमूमौ हैमीं सुवृष्टिमकरोत्कलौ वै ॥३॥
प्रचण्डदोर्दंडजिताखिलाधिपः श्रुतौ सत्यवतीसुतोपमः ॥
निरस्तभृत्यर्तिधनो नृपेश्वरोऽभवत्यसौ कर्ण इवापरोयः ॥४॥
बालाजीविश्वनाथाख्यो रसासुरपतिः स्वयम् ॥
पूनासतारे ह्यनिशं कारयामास चासनम् ॥५॥
स्वबाहुबलवीर्येण राजराजाधिपो भवत् ॥
ततस्तु राजवर्येण पेश्वा संपादनीकृता ॥६॥
यस्य प्रयाणे स्विभवाजिनांपदैः समुत्थितं व्योम्नि परागसंचयं ॥
गत्वा जलं वर्षति यत्तपात्यये घनीभवत्युन्नमदद्यशैत्यतः ॥७॥
पांचालडिल्लीनगरादिमुख्यान् जित्वा सही दिग्विजयाय भूपः ॥

कृत्स्नां भुवं जेतुमयं चरत् वै शक्रानलेंद्वर्कयमांसजन्मा ॥८॥
जगति तद्यशसाधवलीकृते हिमरुचिर्गगनं गजनायकः ॥
अभजर्दिद्रसखो दधिमम्बु तत्किमपि कैतवमाप्य शिवं शिवा ॥९॥
तस्य राज्ञो धर्मपत्न्यां पुत्रौ द्वौ संबभूवतुः ॥
ज्येष्ठो वाजीरावसंज्ञश्चि चिमणाप्पा महानुजः ॥१०॥
वाजीरावस्य पुत्रो भूद्रघुनाथो महायशाः ॥
अपरो बाजीरावाख्यो धार्मिकाणां सदाग्रणीः ॥११॥
पुनाराज्ये यो भून्नृपतिलकसंसेवितपदः ॥
स बाजीरावोयं हरिपदरतो भूसुरवरः ॥
दिगन्ते विख्यातोऽर्जुन इव महीपालवशकृत् ॥
सदानन्दो चन्द्रानलधनदशक्रार्कसदृशः ॥१२॥
स्वमन्त्रिणिराज्यधुरां संन्यस्य नृपसत्तमः ॥
ब्रह्मावर्ते महाक्षेत्रे नारायणपदे रतः ॥१३॥
ब्राह्मणान् वेदसंपन्नान्दीनान्धकृपणांस्तथा ॥
दानं दद्‌द्विजवरो महाराजो दिवंगतः ॥१४॥
वाजीरावजाया पतिपदसरसीजातकिंजल्कधूलिः ॥
स्वादून्मत्ता शिवांघ्र्यर्चनपटुनिरता पुण्यभूमावुदीच्याः ॥
वाग्मत्याहृद्युत्तरेऽतीव रुचिरभवने मुक्तिकामा विशुद्धा ॥
सैबाईनामधेया नृप . . . लका वासभूमिं चकार ॥१५॥
वाग्मत्या रुद्रमत्याश्च संगमेतीव पुण्यदे ॥
थापाथलीति विख्याते क्षेत्रेऽस्मिन्नृपतिप्रिये ॥१६॥
दिठ्ठा इति पदं दत्वा रामरावाख्यशर्मणे ॥
प्रसन्ना भून्महाराज्ञी गृहमारं ददौ किल ॥१७॥
ब्रह्मावर्ते समुद्‌भूतो गुणाढ्यः सुन्दराकृतिः ॥
द्विजवर्यो महातेजा दानधर्मेषु तत्परः ॥१८॥
तस्मै आज्ञां ददौ राज्ञी रचने मन्दिरस्य च ॥
तदाज्ञां शिरसा धृत्वा रमेशस्य मन्दिरम् ॥१९॥
सोद्यानशिल्परचितं वैकुंठमिव चापरम् ॥
चित्रयित्वा पंचरंगै रमेशस्य प्रीतये ॥२०॥
मध्यदेशात्समानीय पतिव्रतपरायणा ॥
श्वेतोपलकृतां मूर्ति रमया सहिता हरेः ॥२१॥
सुवर्णमणिसंयुक्तैर्भूषणैर्भूषितां सदा ॥
तत्रैव स्थापयामास धर्मज्ञा साधुवत्सला ॥२२॥
गोरक्षदेशाधिपतिर्गुह्यकाल्याभिरक्षितः ॥

बहुरत्नानि संगृह्य मौल्यं कृत्वा प्रयत्नतः ॥२३॥
ग्रामानष्टौ ददौ तस्यै महाराजो महायशाः ॥
गोविन्दपुरकं चैव सिसियाख्यं ततः परम् ॥२४॥
धनगढ्वा पोषयाख्यौ द्वौ ग्रामौ च ततः परम् ॥
सिमर्वारि च वरवा ग्रामौ च तदनंतरम् ॥२५॥
मदनपुराकट्टिराख्या वैरिया कट्टिका तथा ॥
क्रमेण गणनां कृत्वा चाष्टौ ग्रामा भवन्ति ह ॥२६॥
प्रसन्ना भून्महाराज्ञी कुलानन्दस्य सेवया ॥
किंचिन्भूमिं ददौ तस्मै मुद्रयित्वा तु कागदम् ॥२७॥
स्थापने दिवसे चैव रमेशस्यच प्रीतये ॥
ब्राह्मणेभ्यः सेवकेभ्य किंचिद्भूमिं ददौ तदा ॥२८॥
एतान्त्यक्त्वा महाराज्ञी शेषान् ग्रामान् समर्पयत् ॥
नेपाले स्वस्य द्रव्येण यत्क्रीतं क्षेत्रसंज्ञकम् ॥२९॥
चतुर्दशरोपनिकं तत्सर्वं हरिप्रीतये ॥
तस्मिन्दिने महाराज्ञी सामात्या गणसंयुता ॥३०॥
संकल्पं कारयामास रघुनाथस्य प्रीतये ॥
पतिव्रतास्वग्रगण्या ह्यनसूयेव सर्वदा ॥३१॥
श्रीविक्रमार्कनववेदग्रहैक ह्यब्दे
माघे सिते मनसिजस्य तिथौ विधोर्हि ॥
एकोनविंशगतसौरिदिनेषु योगे
निष्कंभके निखिलखेचरसानुकूले ॥३२॥

अथ दक्षिणी स्वदेशभाषा

श्रीमन्त बाजीरावाच्या राणीने केली स्थापना खासी ॥
नारायणलक्ष्मीची शोभे द्वारावतीच की जैसी ॥१॥

अथगिरिराजभाषा

स्वस्तिश्री विक्रमार्क सम्वत १९४९ श्री शाके सम्वत् १८१४ सौरमानेन माघमासस्य गतदिनेषु १९ सोमवारे माघमासे शुक्लपक्षे त्रयोदश्यां तिथौ पुनर्वसु-नक्षत्रे निष्कंभयोगे श्रीसूर्योदयात् गतघटी ७ पलेषु ५७ तदा मीनलग्ने धनुर्नवां शके एवं शुभमुहूर्ते ॥ यस्ता शुभदिनमा ॥ स्वस्ति श्रीमन्महाराजशाहुछत्रपतिहर्ष-निधान पेश्वासाहेबबहादुर बाजीरावरघुनाथपन्तप्रधानका श्री महाराणी सईबाई-साहेब आपना राज्य पुना सतारा ब्रह्मावर्तक्षेत्र देखी आई नेपालमा विराजमान मै बक्सनु भयाकाले आफ्नु राज गर्नु भयाका वाग्मतीरुद्रमतीका संगम वाग्मतीतीर

थापाथली कुरिया स्थानमा आफ्नु घरका दक्षिणफुलवारीमा १ का मन्दिर बनाई स्थापना गरी अघी २ मा जवाहिरात चढांउदा २ वाट सर्व कर अकर सर्वांग-माफको लालमोहर गरी खरीदी विर्ता बक्शाको जिलै पर्सा प्रगन्ना नौरंगिया तर्फ जगत्पुरमध्ये मौजे गोविन्दपुर १ मौजे धनगढवा १ मौजे सिर्सिया १ मौजे पोषरिया १ मौजे सिमर्वारि १ मौजे वारवा १ मौजे मदनपुरकट्टी १ मौजे वैरियाकट्टी १ स्मेतमध्येश विर्ता मौजे ८ मध्ये अघी हमिवाट सनदभै विर्ता र १ स्थापनाको कुण्डमंडप अधिवासनमा ब्राह्मण ब्राह्मणिके संकल्प गरी दान दियाको र अघिदेखी सेवाचाकरीमा रुजु रही मन्दिर बनाउंदा पनि मर्मिहिनत् गर्न्या हामरा काम्दार नोकरानके हामीवाट विर्ता बक्शोका जगा बाहेक वांकि जग्गा र नेपालका किनवा विर्ता पाटनको जिल्ला थैमाषेहा रोपनि १।। को पुन्डोल रोपनि ३ काटमांडौ जिल्ला हांडिगांव यकडोल रोपनि १।।। मातगांऊं बसिवु रोपनि ।।। = जमाखेत रोपनि १४ = आफु वशाका घरबारी स्सेत काशी बस्न्या पुरोहित भाउ दीक्षित कर्वे १ राम भट्ट करंदीकर १ नाना वझे सर्दार* १ जयरामशास्त्री जोशी १ भिकू दिक्षीत ओक १ हरिशास्त्री जोशी १ हरिभट्ट अभ्यंकर १ लक्ष्मण भट्ट १ जमा ब्राह्मण जना ९ साक्षीबसि पुरोहित गणेश दीक्षित कर्वे ले संकल्प गराई अघि जग्गामा स्थापना मै रह्याका देव देवता आफुले अघि देखी मानि आयाका देवदेवता र पछी स्थापना हुन्या देवदेवताका पुजा र सदावर्तहरू काम काम गैन्हलाई गुठि-राखि बक्सौं हाम्रा जिया छन ज्याल सो जग्गा हाम्रा तैनातमां राखी हाम्रा जियात् को धनवाट जो जो चालि आयाको हामिवाट चलांउला हाम्रा सेष पछी लाई र हाम्रा जिया छंदैमा पनि गुठीयार खडागरी गुठियार जिम्मा लगाउनाले जो जो गर्नु पर्न्या दानपत्रमा तर्पासिल खोली ज्या ज्या गर्नू मन्या हुन्छ सो बमोजिम चलाउंगा निमित्त श्री परमेश्वरप्रीति गरी चऱ्हाञ्या यो परमेश्वर प्रीति गरी चऱ्हायाको जग्गा जमीन देवधर्म हिन्दुधर्म दिनरात्रि दुनिञ्याहरू रह्या सम्म कसैले न हर्नू हरन गर्न्यों मन्या पश्च महापातक गोवध मातृगमनादि महापातक लागन्याछ मन्या बेहेराको संकल्पपत्रको सिलापत्र गरी बक्सौ ।।

स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्च वसुंधराम् ।।
षष्टिवर्षसहस्राणि विष्टायां जायते क्रिमिः ।।१।।
चन्द्रार्कमेदिनी साक्षी शुभम् भूयात् शुभम् शुभम् ।।
भूयो भूयो भाविनी भूमिपालान् नत्वा नत्वा याचनीयं सुराज्ञी ।।
सामान्योयं धर्मसेतुर्नृपाणां काले काले पालनीयो भवद्भिः ।।१।।

[शिलालेखाचा आधार : ' हिमालयात ' – ना. गो. चापेकर.]

---

* वाराणसीत जातीच्या प्रमुखाला सरदार म्हणण्याची पद्धत असे

लक्ष्मीनारायण मंदिर आणि दागिने : मंदिराच्या आवारात शिरताच पुण्याच्या देवळातच आपण आलो आहो असा भास होतो व हे पेशव्यांचेच देऊळ असले पाहिजे, याविषयी शंका उरत नाही. मंदिरासमोर फरशी, मध्ये तुळशी-वृंदावन, दुतर्फा फुलझाडांचे ताटवे, देवळाची बांधणी, तो सभामंडप, सभामंडपात टांगलेल्या हंड्या, झुंबरे इत्यादी गोष्टी पाहून ही नेपाळी संस्कृती नसून अस्सल महाराष्ट्रीय संस्कृती आहे, या जाणीवेने प्रवासी आनंदित होतो. श्री लक्ष्मी-नारायणाच्या पायांपाशी गरुडाच्या मूर्ती असून समोर तुळशी-वृंदावनाच्या कोना-ड्यातही गरुडाची स्थापना केलेली आहे. देवळातील एका गरुडाचे पंख स्पष्ट दिसतात. श्रीलक्ष्मीनारायणाच्या मूर्ती पांढऱ्या दगडाच्या असून त्या जयपूरहून आणल्या आहेत. सिंहासनाच्या कोनाड्यात दोन देव्हारे ठेवलेले दिसले. सईबाई व कृष्णाबाई या सास्वासुनांच्या देवांचे हे देव्हारे. देव्हारे जड होते. रुप्याचे असावे. वर गंज चढून* काळवटलेले होते. आवारात एक पुष्करणी आहे. देवळाची लांबी ३८ फूट व रुंदी १८ फूट आहे. वाड्याच्या चौकाचा भाग व स्वयंपाकघराखालची जागा ह्यांवर मंदिर बांधले आहे.

देव आणि दागिने यांची यादी :–(१) हिऱ्यावर कोरलेली देवी, (२) सोन्याचा गणपती चांदीच्या सिंहासनावर – २२ तोळ्यांचा (३) देवाची मूर्ती (सोन्याची असावी.) हिरेजडित. ह्या मूर्तीच्या एका हातात हिऱ्यावर बसवलेली अती लहान सोन्याची देवीची मूर्ती – १] सोन्याचा मुगुट – ५९ तोळ्यांचा, २] गोट जोड ३ प्रत्येकी ५ तोळे, ३] पाटल्या नग २ एकूण ६ तोळे, (४) मोती व माणके ह्यांच्या पेट्या ९, (५) मंगळसूत्र सोन्याचे, (६) सोन्याचा ताईत – १ पदक, ४ हिरे (७) ३० हिऱ्यांची माळ, मध्यभागी मोठ्या हिऱ्याचे पदक. १] चांदीची पंचपात्री व पळी, २] चांदीची झारी, ३] चांदीचे छत्र – ९३७ तोळे ५ मासे वजनाचे. या सर्व जिनसा पुजाऱ्याचे घरी असत. त्यांची यादी सरकारी शिक्क्यांची संवत् १९८२ (इ. स. १९३७) ची केलेली आहे. या यादीची एक प्रत पुजाऱ्याला देऊन दुसरी प्रत सरकारने आपल्या दप्तरात ठेवली आहे. संवत् १९८२ नंतर नवीन यादी झाली नाही. देव व दागिने फार जुने आहेत.

(मुख्य संदर्भ : ' हिमालयात ' – ले. ना. गो. चापेकर.)

---

* रुप्यासारख्या धातूला गंज चढू शकतो काय ?

❋ ❋

परिशिष्ट नववे

ग्रंथसंग्रहाची झलक

पेशवाईत शिक्षण कोणत्या प्रकारचे असे, ग्रंथसंग्रह (त्याला पोथी-संग्रह म्हणणेच उचित ठरेल) कोणता असे, ह्याचे तपशील तत्कालीन सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनपद्धतीविषयी बरेच काही सांगतात. म्हणून त्याबद्दलच्या उपलब्ध नोंदी येथे दिल्या आहेत.

त्या काळात लिखाण, ग्रंथरुपात नसून हस्तलिखित पोथ्या व दप्तरांचे रूपात असे. कोणतेही सामान्य काम खासा व्यक्तीने स्वतः करायचे नाही, आज्ञा देऊन इतरांकडून करवून घ्यायचे अशी सरदार – उमरावांच्या घराण्यात पद्धत असे. पोथ्या व अन्य हस्तलिखिते कोणीही स्वतः जातीने वाचीत नसत. त्यासाठी अनुक्रमे पुराणिक व कारकून नेमलेले असत.

पुराणिक आज्ञेनुसार ठरलेल्या वेळी हजर होई. त्याच्या बैठकीची खोली व आसन ठरलेले असे. त्या ठिकाणी बसूनच तो पोथीवाचन करी. वाचन सुरू करताना सामान्यतः समई लावण्याची प्रथा असे. पुराणिक वाचत असे. खासा मंडळी काही अंतरावर बसून फक्त श्रवण करीत.

परिवारातील प्रायः प्रत्येकाचा काही ना काही ' ग्रंथसंग्रह ' असे. यापैकी श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब आणि श्रीमंत गं. भा. सगुणाबाईसाहेब या दोघांचा ग्रंथसंग्रह व काही इतर तपशील उपलब्ध आहे.

रघुनाथरावांचा पोथ्या, औषधे व इतर साहित्याचा संग्रह मोठा होता. डिसेंबर सन १७८३ मध्ये कोपरगावी वास्तव्य असताना स्वतःच्या मृत्यूपूर्वी (डिसेंबरचा १ ला आठवडा) त्यांनी " इच्छारामपंत वैद्य यांस सांगितले की वर चिठ्ठ्या लावून याद करून अमृतराव याजपासी द्यावी व चार लक्ष सुमार ग्रंथ वैद्यकशास्त्र, धर्मशास्त्र, वगैरे संग्रह पुस्तकाचा केला होता. त्याची याद आणून ती पुस्तके अमृतराव याजकडे दिल्ही आणि सांगितले की, याचा कोण्ही भोक्ता जाल्यास उपयोग आहे. नंतर २–३ दिवस बोलणे राहिले तसे येक दिवस होते. दुसरे दिवसी मार्गशीर्ष वद्य ३ शके १७०३, सा घटिका रात्रीस कैलासवासी जाले. "

रघुनाथरावांचा ग्रंथसंग्रह

ही पुस्तकांची यादी पे. द. २२ मध्ये उपलब्ध आहे :

स्वारी दादासाहेब [२२-७-१७५४

अपरार्क ग्रंथ, मदन पारिजात, विज्ञानेस्वर, आध्यात्म रामायण, सहस्त्र-चंदीविधान, सिद्धान्तबिंदू, गीताशंकरभाष्य, अग्निपुराण, कासी माहात्म्य, बृहंनारदी, उपदेशसहस्त्री, गीतगोविंद सटीक, गया माहात्म्य, केदार माहात्म्य, वैशाख माहात्म्य, नीलकंठी सटीक, शूद्र कमलाकर, तत्त्वानुसंधान.

स्वारी दादासाहेब [८-८-१७५४

मार्गसीर्श माहात्म्य, व्रतार्क, ब्रह्मोन्तर खंड, ताजिकसार, प्रायश्चित्तमयूख, नरपति जपचर्चा, माध्यंदिनी संहिता, समय मयूख, श्राद्धमयूख, निर्णयामृत, अयोध्याकांड.

स्वारी दादासाहेब [१४-८-१७५४

मत्स्यपुराण, रत्नावली, मंजिरी, योग रत्नावली, किरणावली, काव्यप्रकाश टीका, अमनस्क, पंचोपनिषद, इषावास्य भास्य, योगसूत्र भास्य टीका, योगसूत्ररती, बृहदारण्योपनिषद, हटप्रदीपिका, मानसोल्लास, छांदोग्य, पंचदसी, सनत्कुमार संहितोक्त प्रकरण, सप्तपदार्थ, सनत्सुजात सटीक, ईशावास्य विवरण, शरीरभाशे, काव्यप्रदीप, तत्त्वानुसंधान, लिंगपुराण.

स्वारी दादासाहेब [२०-८-१७५४

मदन निघंट, योगतरंगिणी, ब्रहत्कथा,

स्वारी दादासाहेब [१३-९-१७५४

तंत्रराज टीका, उदाहरण चंद्रिका, वाक्यसुधा सटीक, संगीत दर्पण, बाल-बोधिनी, अज्ञानबोधिनी, हस्तामलक, प्रयाग सेतू, वेदांत सार टीका, वेदांतार्थ विवेक, अष्टावक्र टीका, मुक्तावली टीका, कुवलयानंद, सिद्धांतलेश, मैत्रेयुपनिषत् दीपिका, डामर कल्प, मुहूर्त चिंतामणी टीकादि पुष्पधारा, लिलावतीची टीका, वसंतराज मूल, वसंतराज टीका, भोजकृत योगसूत्ररति, सांख्यतत्त्व कौमुदी, अष्टाध्याई, मकरंदसारिणी, गृह्यपरिशिष्ट.

स्वारी दादासाहेब [११-४-१७५५

द्वारका माहात्म्य, कालिकासहस्त्रनाम, येत्रराज, सिवसहस्त्रनाम, जोतिसीर रत्नमाला, जैमिनी अश्वमेध, लक्ष्मणोछव वैद्यकी कारक, किरकोली वैद्यजीवन.

गं. भा सगुणाबाईंचा ग्रंथसंग्रह

जनार्दन बाजीराव पेशव्यांच्या पत्नी गं. भा. सगुणाबाई यांना चांगले

लिहिता वाचता येत असे व त्यांनी खास स्वतःचा असा धार्मिक पोथ्यापुस्तकांचा संग्रहदेखील चांगला केला होता. १७८३ साली त्या वारल्यावर त्यांचा ग्रंथसंग्रह सरकारच्या (पुस्तकशाळा विभागाकडे) पुस्तकशाळेकडे जमा करण्यात आला. त्याची यादी पे. द. ३२ मध्ये छापली आहे. त्यात पुढील पोथ्या आढळतात :

१ अध्यात्मरामायण, २ योगवासिष्ठ, ३ हरितत्वमुक्तावली, ४ कर्णामृत, ५ शतकमूल, ६ टिकाकर्णामृत, ७ पंचदशी, ८ द्वैत-विवेक, ९ वाक्य-विवेक, १० भूत-विवेक, ११ तत्व-विवेक, १२ पंचक्रोश-विवेक, १३ चित्रदीप, १४ नाटक दीप, १५ ध्यानदीप, १६ तृप्ती-दीप, १७ ब्रह्मानंद विषयानंद, १८ भागवताचे स्कंध, १९ गणेशसहस्रनाम, २० विष्णुसहस्रनाम, २१ वासुदेवस्तोत्र, २२ जन्म-रहस्य, २३ यमगीता, २४ द्वादश अध्यायी भागवतातील, २५ सूर्यनामावली, २६ कृष्णअष्टशतनामावली, २७ देवी अष्टशत नामावली, २८ सिवाष्टक स्तोत्र, २९ सप्तशतीतील देवी कवच, ३० गौरीदशक, ३१ द्रौपदीकांतस्तवन, ३२ गजेन्द्र-मोक्ष, ३३ शिवसहस्रनामावली, ३४ अध्यात्मरामायणातील रामस्तोत्र, ३५ बृह-न्नारदीतील विष्णुस्तुती, ३६ आदित्यरूप्यस्तोत्र, ३७ रामस्तोत्र.

यांच्या या पुस्तकशाळेतील दोन-तीन अपूर्व चिजा होत्या. एक म्हणजे ताईतात घातलेली व अत्यंत बारीक अक्षरात जडगिरी कागदावर लिहिलेली गीता व दुसरे तसेच ताईतात घातलेले भागवत. त्याप्रमाणेच सचित्र एक पुस्तकही होते.

(संदर्भ : भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक – ऐ. सं. नि. खंड ७, शके १८८७).

* *

परिशिष्ट दहावे

कोपरगावातील पेशव्यांचे वाडे

' संदर्भ-ग्रंथ ' असे प्रस्तुत ग्रंथाचे स्वरूप असल्यामुळे, जास्तीत जास्त माहिती एकत्रित व्हावी या हेतूने, प्रा. ता. ह. निकम यांनी लिहिलेला ' कोपरगावातील पेशव्यांचे वाडे : एक आकलन ' हा लेख येथे समाविष्ट केला आहे.* :–

अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव हे शहर गोदावरी नदीच्या पश्चिम तीरावर १९° – ५४', उत्तर अक्षांश व ७४° – ३३', पूर्व रेखांशावर वसले असून पूर्व तीरानजीक साधारणतः १ कि. मी. अंतरावर बेट कोपरगाव ही छोटी परंतु प्राचीन व पौराणिक वारसा असलेली वसाहत आहे. फार पूर्वी गोदावरी नदीने पात्र बदलल्यामुळे एक बेट तयार होऊन, त्या बेटावर ही वसाहत झालेली असल्यामुळे त्याला ' बेट कोपरगाव ' असे म्हणण्याची प्रथा परंपरेने अस्तित्वात आलेली आहे. याच बेटात ' श्री शुक्लेश्वर ', ' श्री कचेश्वर ', ' श्री विष्णू ' यांची पुरातन मंदिरे आहेत. येथे गुरू शुक्राचार्यांनी ' कचदेवास ' संजीवनी विद्या दिली, अशी पौराणिक आख्यायिका आहे. त्यामुळे हा परिसर पुण्यक्षेत्र मानला जातो. येथे पेशवा रघुनाथराव उर्फ राघोबादादांच्या आयुष्याचे अखेरचे दिवस गेले.

७ मे १७८२ रोजी पुणे दरबारचा इंग्रजांशी सालबाईचा तह झाला व दरमहा रु. २५०००/– निवृत्तिवेतन घेऊन रघुनाथराव ऊर्फ राघोबादादांनी राजकारणापासून अलिप्त राहण्याचे निश्चित झाले. तेव्हा त्यांनी महादजी शिंदेंच्या सल्ल्यावरून कोपरगावला कायमचे वास्तव्य करण्याचे ठरवले व ऑगस्ट १७८२ मध्ये ते कोपरगावला येऊन स्थायिक झाले.

प्रशस्त वाडा

रघुनाथराव ऊर्फ राघोबादादांच्या वास्तव्याची ऐतिहासिक साक्ष देणारा कोपरगावातील वाडा प्रशस्त असून उत्तरायुष्यातील उपेक्षित व्यक्तिमत्वाच्या गतवैभवाची सहज आठवण करून देणारी ही वास्तू आहे. राघोबादादा कोपरगावी राहण्यास येण्यापूर्वीच येथे हा वाडा बांधलेला होता; त्याबाबतची पेशवे दप्तरातील नोंद पुढील प्रमाणे आहे :

* संदर्भ : ' इतिहास संशोधन पत्रिका ' अंक १ सन १९८९-९० (पुणे विद्यापीठ इतिहास अध्यापक संस्था).

" श्रीमंत राजश्री दादासाहेब या मार्गेकरून आनंदवल्लीस (नाशिक नजीक) गेले. वद्य १० मंगळवारी येथे (कोपरगाव) स्वारी आली. श्रीमंतांनी वाडा संपूर्ण हिंडून पाहिला. दुसरे दिवशी प्रातःकाली भोजन येथेच करावे, ऐशी श्रीमंताची मर्जी होती. भोजनाची तर्तूद करावी म्हणून आज्ञा केली होती. मागती दिकत निघाली की, वास्तुशांती झाली नाही. यामुळे तो मनसुबा राहिला. त्यास मातबर इमारत प्रथम काम आले त्या तागाईत वास्तुशांती नाही. यास्तव सूचनार्थ लिहले आहे. " (पेशवे दप्तर १९/५३)

वरील पत्रात कालदर्शक उल्लेख नाही हे खरे, पण पेशवे दप्तर संपादकांनी संदर्भाधिष्ठित तारीख २४ जुलै १७६७ अशी दिली आहे. थोरले माधवराव व राघोबादादा यांच्यातील बेबनाव आनंदवल्ली येथे या सुमारास त्या दोघांची झालेली भेट येथे लक्षात घेण्यासारखी आहे. तात्पर्य इ. स. १७६७ च्या सुमारास कोपर-गावातील पेशव्यांच्या वाड्याचे बांधकाम झालेले होते, असे मानावयास हरकत नाही.

कोपरगावच्या वाड्यासंबंधीचा दुसरा उल्लेख असा –

" मौजे कोपरगाव, परगणा कुंभारी येथे गंगेच्या बेटात श्री. शुक्लेश्वर देवालयासन्निध सन इसने सबैनात (इ. स. १७७१–७२) सरकारचा वाडा व बाग नवा केला. " (पेशवे दप्तर १९/५३). याचा अर्थ इ. स. १७७१–७२ पूर्वी येथील सरकारवाड्याचे बांधकाम पूर्ण झालेले होते.

वाड्याची बाह्यरचना

पेशव्यांचा कोपरगावातील हा प्रशस्त वाडा पूर्वाभिमुख, – धाबा पद्धतीचा असून, पूर्व, पश्चिम व उत्तर बाजूने वाड्यात प्रवेश करण्यासाठी साधारणतः ६' .६" X ४' ·३' X १' ·३" आकाराच्या चौकटी व ३" जाडीचे पितळी फिरक्या बसवलेले व थोडेफार नक्षीकाम केलेले लाकडी दरवाजे आहेत. मुख्य प्रवेशद्वार गंगेच्या बाजूला म्हणजे पूर्वेकडे असून, या बाजूची दगडी जोत्याची उंची सुमारे २० फूट आहे. त्यासाठी दगडी २५ पायऱ्यांचा जिना आहे. मात्र जमिनीच्या चढावामुळे उत्तरेकडील व पश्चिमेकडील प्रवेशद्वारांच्या जोत्यांची उंची कमी आहे. वाड्याच्या जोत्यावरील बांधकामासाठी पक्की, वीट, माती, चुना व घडीव दगड वापरलेला असून, धाब्याच्या छपरासाठी लाकडी फळी, वीट व मातीचा वापर केला आहे. त्यावरून वाळू व चुना यांच्या मिश्रणाचा साधारणतः दीड इंच जाडीचा कोबा आहे.

भरपूर प्रकाश, खुली हवा, यासाठी दक्षिण व पूर्व बाजूच्या भिंतीमध्ये ५' ·६" x २' ·६" आकाराच्या प्रत्येक खणामध्ये एक अशा १५ खिडक्या आणि

पूर्वेकडील भिंतीमध्ये त्याच आकारमानाच्या व तेवढ्याच अंतरावरील १० खिडक्या आहेत. त्या मानाने उत्तर व पश्चिम बाजूच्या भिंतीमध्ये कमी खिडक्या आहेत, तरी परंतु वाड्यामधील दोन चौकांमुळे भरपूर प्रकाश व खुली हवा ही सुविधा साधली आहे. या बांधकामामुळे मुख्यतः दिखाऊपणापेक्षा टिकाऊपणाकडे अधिक लक्ष दिलेले होते, असे दिसते.

अंतर्गत रचना

पेशव्यांच्या या वाड्याचे पुण्यातील विश्रामबाग वाड्याप्रमाणे वाड्यांतर्गत वाडा असे स्वरूप आहे हे पहावयास मिळते. मुख्य वाड्यामधील पहिल्या खोली-मध्ये झोपाळ्याची व्यवस्था होती. त्या खोलीच्या छताचे लाकडावर सुबक नक्षी-काम आहे. वाड्यामध्ये मुख्य प्रवेशद्वार व उत्तर प्रवेशद्वार यांच्या समोर अंदाजे १५ फूट x १५ फूट आकारमानाचा चौक आहे. चौकाच्या चारही बाजूंनी ओसरी व बैठकीच्या सदरेची रचना आहे. ओसरीवर लाकडी खांब असून प्रत्येक दोन खांबामध्ये लाकडी कमानी आहेत. वाड्याच्या मध्यावरील दक्षिणोत्तर सामाईक भिंतीमध्ये भुयार असून त्यालगत आंतर वाड्यातील बैठकीची खोली आहे. भिंतीतून निघालेल्या या भुयारी मार्गाचे दुसरे टोक बेट कोपरगावातील श्री शुक्लेश्वर मंदिराच्या देवडीजवळ निघालेले आहे. ब्रिटिश आमदानीपासून हा भुयारी मार्ग सुरक्षिततेसाठी बंद करण्यात आलेला आहे. सदर वास्तूचा ब्रिटिशांनी तहसील कचेरीसाठी वापर केला होता. तेथील शासकीय तहसील कचेरी १९५३ चे आसपास स्वतंत्र इमारतीमध्ये स्थलांतरित केली गेली.

आंतरवाडा

आंतरवाड्यामध्ये १५ फूट × १५ फूट या आकारमानाचा चौक असून, चौकाच्या चारही बाजूंनी घडीव दगडाची ओसरी आहे. ओसरीच्या वरील बाजूने देवघर, माजघर, इत्यादी खोल्या आहेत. वाड्याच्या या भागातच श्रीमंत आनंदी-बाईसाहेबांचे सुमारे ९ वर्षे वास्तव्य होते.

स्नानगृह व शौचकूप

या आंतरवाड्यातील दक्षिणेकडील कोपऱ्यातील १०' x १२' आकारमानाच्या खोलीमध्ये ५' x ५' आकारमानाचे स्नानगृह व त्याला जोडूनच ५' x ५' आकार-मानाचे शौचकूप आहे.

पाणीपुरवठा व सांडपाणी

पेशव्यांच्या सेवेतील पाणके, गोदावरी नदीचे पाणी पखालीने वाड्यामध्ये भरीत असत. पाणी साठवण्यासाठी मुख्यतः खापरांचे रांजण होते. सांडपाणी व

पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी बंद गटारांची सोय करण्यात आली होती. हे सर्व पाणी वाड्याबाहेर बंद गटारातून काढून उघड्या गटाराने दूर नेऊन सोडलेले आहे, हे आजही पाहावयास मिळते.

विटाळशीचा वाडा

राघोबादादांच्या पत्नी श्रीमंत आनंदीबाईचे या वाड्यात दीर्घकाळ वास्तव्य होते. (इ. स. १७६७ ते १७८३ या कालावधीमध्ये अधून-मधून व इ. स. १७८३ ते १७९२ पर्यंत सलग वास्तव्य होते. तदनंतर या कुटुंबाला पुणे दरबारच्या आदेशानुसार नासिकजवळील आनंदवल्लीला स्थलांतरीत व्हावे लागले.) त्यांच्या सोबत पुत्र बाजीराव, कोपरगावातच जन्मलेले चिमाजी व दत्तक पुत्र अमृतराव ही तीन मुले आणि अमृतरावांची बायको सावित्रीबाई, बाजीरावाची बायको भागीरथीबाई असा राघोबादादांचा कौटुंबिक परिवार येथे होता. त्याशिवाय इतर सेवकांचा लवाजमाही होता. दाहासाहेबांच्या पश्चात हे कुटुंब जवळ जवळ नजरकैदेतच होते. त्यांची देखभाल करण्यासाठी नाना फडणिसांनी गोविंद कृष्ण गोडबोले हे अधिकारी नेमले होते. असे पेशवेदप्तरातील नोंदीवरून दिसते.

श्रीमंत आनंदीबाईंच्या दिनचर्येवरून त्यांचे येथील धार्मिक विधी, व्रतवैकल्ये बाजीरावाचा हुडपणा इ. बाबींची तपशीलवार माहिती मिळते. तसेच श्रीमंत आनंदीबाई ' अस्पर्श ' असताना अंतर्वाड्यातील मागील खोलीत बसत असत, अशी माहिती मिळते. गोदावरी नदीला स्पर्श होऊ नये म्हणून त्या वाड्यातून बाहेर पडत नसत. कदाचित त्यामुळेच या वाड्याला ' विटाळशीचा वाडा ' असे म्हणण्याचा प्रघात पडलेला असावा, हा प्रघात आजही प्रचलित आहे.

तीन भिंतींचा वाडा (हिंगणीचा वाडा)

रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा राजकारणातून निवृत्त होऊन कायमचे वास्तव्य करण्यासाठी जेव्हा कोपरगावात आले तेव्हा त्यांनी कोपरगावचे पश्चिमेला तीन मैलांवर असलेल्या हिंगणी गावाजवळ भव्य वाडा बांधण्याचे ठरवले. त्यांनी वाड्यासाठी गोदावरी नदीच्या पश्चिम तीरावरील निसर्गसुंदर जागेची निवड करून तेथे वाड्याच्या बांधकामाला सुरुवात केली. दुर्दैवाने वाड्याच्या तीन भिंतींचे बांधकाम झाले. पूर्वेकडील चौथ्या, गंगेच्या तीरावरील दर्शनी भिंतीचे बांधकाम चालू असतानाच, श्रीमंत दादासाहेब ११ डिसेंबर १७८३ रोजी आकस्मिकपणे निवर्तले. साहजिकपणे हा ' तीन भिंतींचा वाडा ' आजही राघोबादादांच्या अतृप्त इच्छेची साक्ष देत उभा आहे.

उत्कृष्ट बांधकाम

तीन भिंतींच्या वाड्याचे बांधकाम अतिशय मजबूत, भक्कम व उत्कृष्ट

दर्जाचे आहे. भिंतींची लांबी– २००० फूट, रुंदी– १००० फूट, आणि उंची ४५ फूट असून भिंतीची माथ्यावरील जाडी– ७ फुटांची आहे. या सर्व बांधकामाला आत बाहेर कातीव स्वरूपाचा काळा दगड, चुना वापरलेला आहे. गोदावरी नदीच्या तीरावरील या वाड्याच्या उत्तर व दक्षिण भिंतीला एक एक बुरूज बांधलेला आहे तर फक्त उत्तरेकडील भिंतीमध्ये प्रशस्त प्रवेशद्वार ठेवलेले आहे. राघोबादादांच्या इच्छेनुसार बांधला जाणारा हा तीन भिंतींचा वाडा पूर्ण झाला असता तर प्रशस्त, भक्कम आणि रेखीव नक्षीकामाचा प्रेक्षणीय (वाडा) पहावयास मिळाला असता, परंतु श्रीमंतांच्या आकस्मिक निधनाने चौथी भिंत आणि अंतर्गत बांधकाम जे राहून गेले ते आजतागायत अपुरेच राहिले, त्यामुळे पेशवेकालीन वास्तू शिल्पकलेतील प्रगतीचा एक उत्तम आविष्कार साकार होत असतानाच दुर्दैवाने अपूर्ण राहिला. या तीन भिंतींच्या वाड्यामध्येच राघोबादादांची समाधी आहे.

❋ ❋

परिशिष्ट अकरावे

एलफिन्स्टनच्या शब्दात दुसरे बाजीराव पेशवे

माऊन्टस्टुअर्ट एलफिन्स्टनने १८१५ साली रेखाटलेले श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब पेशवे यांचे व्यक्तिचित्र :

" ह्यांच्या मनात जे मोठेमोठे बेत सुरू असतात ते तडीस नेण्यास ह्यांच्या आंगचा मुख्य मनोविकार भित्रेपणा आड येतो. मनात एक, जनात एक असे दाखविण्याचे विलक्षण कपट त्यांच्या आंगी आहे. त्यामुळे आपले खरे मनोविकार व हेतू गुप्त ठेवून, मनात ज्यांचा गंधही नाही असे विचार ह्यांना बाह्यात्कारी दाखविता येतात. ह्यामुळेच ह्यांच्या स्वभावाविषयी कोणालाही नक्की अंदाज येत नाही. जर ह्यांच्या आंगी थोडेसे अधिक धैर्य असते तर ते महत्त्वाकांक्षी, जुलमी, दुराग्रही व मोठे खटपटी झाले असते. तसेच ज्या गोष्टी करण्याकडे ह्यांच्या मनाची प्रवृत्ती असते व जी प्रवृत्ती हल्ली तर विशेष प्रबळ आहे, ती जोरावली असती. ह्यांचा मूळ स्वभाव भित्रा असल्यामुळे सुख व ऐषाराम ह्यांची त्यांना असलेली आवड नष्ट झाली असती. "

" तथापि, प्रस्तुत स्थिती अशी आहे की, सत्ता मिळविण्यासाठी ते फार आतूर आहेत. परंतु ती मिळविण्यासाठी आवश्यक ते धैर्य त्यांच्या आंगी नाही. तसेच अधिकार प्राप्तीविषयी जरी ते फार आग्रही आहेत तरी विलक्षण आळशी असल्यामुळे त्या अधिकाराचा ह्यांचेकडून उपयोग होत नाही. ह्यांच्या अति संशयी वृत्तीमुळे व ह्यांच्या आंगच्या दक्षतेमुळे आळसही केव्हां केव्हां नाहीसा होतो. सारांश, ह्यांच्या आंगी असा एकही गुण नाही की, तो पूर्ण असून त्यात दुसऱ्याचे मिश्रण आढळणार नाही. ह्यांना मोठेपणाची आवड असल्यामुळे हलक्या दर्जाच्या नोकरांचा सहवास त्यांना फार प्रिय वाटतो. कारण अशा नोकरांवरच आपले वर्चस्व त्यांना मनसोक्त गाजविता येते. त्यांच्याशी ते मोठ्या मगरूरीने व उद्धटपणाने वागतात आणि इतर लोकांशीही ते केव्हां केव्हां गर्वानें आढ्यतेने वागतात. "

" तथापि, आपले कार्य साधण्यासाठी ते कोणतेही नीच कृत्य करण्यास मागेपुढे पहाणार नाहीत. थट्टा-मस्करीच्या कामात ते तब्येती व लहरी आहेत; तरी महत्त्वाच्या मसलतीत मोठे निग्रही आहेत. ह्यांची एखादी मागणी मान्य केली

असता दुसऱ्या मागण्या करण्यास ह्यांना अधिक उत्तेजन येते आणि ह्यांची मागणी अमान्य केली असता ह्यांचा दुराग्रह अधिकच वाढतो. दहशत घातली असता ह्यांचे काही चालत नाही. ते अति खुनशी आहेत. त्यांना दुखावले असता ते कधी विसरणार नाहीत आणि ज्याचा सूड उगविणे असेल त्याचा नाश करण्यासाठी ते हजारो युक्त्या योजितील. ह्या युक्त्या तडीस नेण्यास त्यांच्या पदरचे काही खर्च होत नाही कारण कपटी वर्तन जसे त्यांच्या आंगवळणी पडले आहे तसेच दुसऱ्याची व्यंगे बाहेर काढण्याचे कसब ह्यांच्या आंगी असून कुलंगडी उत्पन्न करणे व दुसऱ्यास फसविणे या गोष्टींची त्यांना स्वभावतःच आवड आहे."

"हे दुर्गुणांचे पारडे झाले. ह्याशी गुणांचे पारडे लावून पहाता आपणास असे कबूल केले पाहिजे की, पेशव्यांचे बुद्धिसामर्थ्य काही कमी नाही. पैशासंबंधी ह्यांचा सर्व व्यवहार अगदी सचोटीचा आहे, भीतीचा किंवा सूड घेण्याचा संबंध नाही अशा सर्व प्रसंगी ते फार दयाळू आहेत. ह्यांचा खर्च जरी बेताचा आहे तरी ते कृपण नाहीत. ह्यांची वागणूक सभ्यपणाची व ह्यांच्या पदवीस शोभण्यासारखीही आहे. पेशव्यांच्या स्वभावातील दुसऱ्या कित्येक गुणांचा जरी ह्यांच्या सार्वजनिक वर्तनाशी संबंध नाही तरी ते सांगणे आवश्य दिसते. ह्यांच्या आंगी धर्मभोळेपणा अगदी खिळून गेला जाहे व ह्यांच्या आयुष्याचे निम्से दिवस उपास, प्रार्थना व तीर्थ-यात्रा करण्यात जातात. ह्यांच्या उत्पन्नाचा बहुतेक भाग जादुगिरीच्या कृत्यांकडे खर्च होतो आणि अद्‌भुत चमत्कार व शकून ह्यांकडे त्यांचे लक्ष असल्यामुळे ह्यांच्यावर वारंवार विघ्ने येतात. ह्यांच्या धर्मभोळेपणामुळे ह्यांच्या ऐषारामात व्यत्यय येतो अशी काही गोष्ट नाहीं आणि जो वेळ धर्मासंबंधी कृत्ये करण्यात घालवीत नाहीत तो बहुतेक वेळ अनीतीची मनसोक्त कृत्ये करण्यांत घालवितात. आपण स्वतः अगदीं पवित्र असल्याचे ते मिष करितात. तरी आपल्या मर्जीतल्या लोकांसह स्त्रियांच्या मोठमोठ्या सयुदायात कित्येक तास घालविल्याशिवाय त्यांचा एकही दिवस जात नाही. अशा प्रसंगी अतिग्राम्य थट्टा-मस्करीत ते फार मजा मानितात आणि विलक्षण किळस उत्पन्न करणारी दुर्व्यसनाची कृत्ये पाहातात."

(**मूळ संदर्भ** : 'लाईफ ऑफ माऊन्ट स्टुअर्ट एलफिन्स्टन '– जे. एस्. कॉटन आ. स. १८९२, पृ. ८७–८८.)

❋ ❋

परिशिष्ट बारावे

दुसरे नानासाहेब पेशवे यांचे जनक घराणे

नानासाहेबांचे जनक वडील महादेव ऊर्फ माधवराव नारायण भट आणि आई सौ. गंगाबाई. माधवरावांची मुले प्रथम जगत नव्हती, म्हणून ते हरिद्वारला गेले. ' मुलगा झाला तर नाव धोंडू ठेवू ' असा अंबाबाईला नवस केला. यानंतरची मुले जगली, अशी आख्यायिका ऐकिवात आहे. माधवरावांना गणपतराव, त्रिंबकराव, भास्करराव व विश्वनाथराव असे चौघे बंधू होते. यांपैकी गणपतरावांनी ३ ऑगस्ट सन १८२५ ला पुण मुक्कामी इंग्रजांसमोर दिलेल्या जबानीवरून, हे भट घराणे श्रीवर्धनच्याच भट घराण्याची एक अप्रसिद्ध शाखा (वंशावळ पृ. ३४६ पहा.) हे स्पष्ट होते. ही शाखा पश्चिम महाराष्ट्रात माथेरानजवळ वेणगावला स्थायिक झाली होती.

गणपतराव भट म्हणतात : " संपूर्ण नाव गणपतराव नारायण भट, श्रीवर्धनकर. वय सुमारे ४०. फेब्रुवारी सन १८२५ त ब्रह्मावर्तातून चित्रकूट येथे आलो . . . . आपण पूर्वी ब्रह्मावर्त येथे राहात असून आपला धाकटा भाऊ भास्कररावदाजी हा सध्या ब्रह्मावर्त येथेच आहे. मी ब्रह्मावर्ती ४ वर्षे राहिलो. बाबासाहेबांच्या (बाजीराव पेशव्यांच्या) आश्रयालाही काही काळ होतो. बनारस येथे (चिमाजी) आप्पासाहेबांकडेही काही काळ घालविला. चिमाजीआप्पांकडे राहिल्यामुळे बाजीरावांची माझ्यावर गैरमर्जी झाली म्हणून मी प्रयाग येथे एक वर्ष घालविले. "

" माझा धाकटा भाऊ भास्करराव याला पूर्वी (सन १७९६) सवाई माधवरावांची द्वितीय पत्नी गं. भा. यशोदाबाई दत्तक घेणार होती. दत्तकविधान व्हायच्या वेळी माझा भाऊ ३–४ वर्षांचा होता. " कदाचित कोकणातून दत्तकासाठी आणलेल्या मुलांमध्ये या भास्करचा समावेश असावा. माधवराव भट ब्रह्मावर्तला बाजीरावांच्या आश्रयाला १८२७ सालच्या प्रारंभी गेले असे आढळते. यावरून माधवरावांखेरीज बाकीचे बंधू सन १८२७ पूर्वी ब्रह्मावर्तला गेले असण्याचा संभव आहे.

सवाई माधवरावांच्या द्वितीय पत्नी यशोदाबाई यांची एक तोतया* १८२२ साली बुऱ्हाणपूरला प्रगट झाली. तिने आपली बाजू इंग्रजांसमोर मांडण्यासाठी

* तोतया यशोदाबाईची काही पत्रे पेद ४१ मध्ये आहेत.

दुसरे नानासाहेब यांचे जनक घराणे

Geneological Table of Narayan Bhat

- Narain Alias Naroo Bhut
  - Gunnesh Punt Bhut
    - Vithul Punt Alias Dada Bhut
    - Sukkaram
  - Trimbuk Punt Bhut
    - Sadasheo Abba Rao Dada Bhut
  - Madhow Rao Bhut
    - Naroo Punt Alias Baba Bhut
    - Dhoondo Punt Nana
  - Bishonath Bhut
    - Gungadhur Rao Alias Balasahib
    - Rango Punt Bhut
    - Gobind Punt Bhut
  - Dajeeba Punt Bhut
    - Pandnrung Alias Rao Sahib
    - Shunkut Bhut

[Ref. : Bulletin of the Dept. of Archives]
[By Maharashtra Archives, Vol. 3 P. 36]

[Signed C. B. Thornhill]
Commissiner.

'गणपतराव श्रीवर्धनकर' याला वकील नेमले. वाटाघाटींचे सर्वाधिकार या गणपतरावांना दिले होते. हेच वर उल्लेखलेले, नानासाहेबांचे सख्खे चुलते 'गणपतराव नारायण भट श्रीवर्धनकर.'

पुण्याचा कलेक्टर हेन्री डंडास रॉबर्टसन याच्या अहवालातील नोंद : '२-८-१८२५ रोजी पुणे येथे एका इसमास पकडण्यांत आले. तो यशोदाबाईचा वकील असल्याचे सांगत होता. कोणतीही गुप्तता न बाळगता तो पुण्यात फिरत होता. गणपतराव श्रीवर्धनकर हा बुऱ्हाणपूरहून २ ऑगस्ट रोजी पुण्याला आला. येथे आल्यावर आपण यशोदाबाई पेशविणीचे वकील असल्याचे उघडपणे जाहीर केले.' यशोदाबाई बरोबर असलेल्या मंडळीत 'आबा भट' या नावाचा एक उल्लेख गणपतरावांच्या जबानीत आहे. गणपतरावांना जून सन १८२६ मध्ये इंग्रजांनी कैदेतून मुक्त केले.

१० जुलै सन १८२५ च्या पत्रात तोतया यशोदाबाई म्हणते : "गणपतराव नारायण श्रीवर्धनकर ज्याला मी एल्फिन्स्टन साहेबांकडे माझी बाजू मांडावयास पाठविले आहे . . ." हे गणपतराव आपल्या जबानीत म्हणतात : "फार वर्षांपूर्वी (खरी) यशोदाबाई मेल्याचे व तिच्या मृत्यूची बातमी आम्हाला समजल्यामुळे व तिचे व आमचे एकच गोत्र असल्यामुळे, मृत्यूनंतर पाळावयाचे विधी आम्ही पाळले होते. त्यामुळे यशोदाबाई बुऱ्हाणपूरला असल्याचे समजल्यावर आम्हाला प्रथम आश्चर्य वाटले."

नानासाहेबांच्या चुलत्यांची थोडी हकीगत वरील जबानीवरून समजते. खुद्द नानासाहेबांच्या जनक परिवारात – (१) सख्खे थोरले बंधू नारायणराव ऊर्फ बाबा भट ऊर्फ बाळ भट, (२) स्वतः नानासाहेब, पाळण्यातले नाव गोविंद, (३) धाकटे बंधू गंगाधरराव. हेच '१८५७' मधील बाळासाहेब पेशवे. (४) सख्खी बहीण मथुराबाई, (५) दुसरी सख्खी बहीण कृष्णाबाई अशी एकूण ५ भावंडे होती.

एक चुलते त्रिंबकराव नारायण भट यांना सदाशिवराव दादासाहेब व आबा हे दोन मुलगे आणि गोदावरीबाई ही मुलगी अशी अपत्ये होती. दुसरे चुलते विश्वनाथराव यांना सीतारामपंत हे एकच चिरंजीव होते. यांना सदाशिवरावांच्या पत्नी रोहिणीबाईंनी (सीतारामपंतांच्या जनक घरच्या चुलत भावजय) वैधव्यकाळात दत्तक घेऊन, नाव पांडुरंग ठेवले. हेच '१८५७' मधील रावसाहेब पेशवे. दुसऱ्या बाजीरावांच्या मृत्यूपत्रात (डिसेंबर १८३९) यांचा उल्लेख 'सदाशिवराव दुसरे पुत्र होते त्यांचे पुत्र पांडुरंगराव – नातू' असा आहे. यावरून यांचे दत्तक विधान डिसेंबर १८३९ पूर्वी झाले असावे व त्या वेळी यांचे वय २–२॥ वर्षांपेक्षा जास्त नसावे असे वाटते.

नानासाहेबांचे थोरले जनक बंधू नारायणराव ऊर्फ बाबा भट यांचा १८५७ उठावात त्रोटक उल्लेख मिळतो. बंडवाल्यांनी जून सन १८५७ मध्ये कानपूर काबीज केल्यानंतर तेथील व्यवस्थेत यांना मुख्याधिकारी व न्यायालयाचे अध्यक्ष नेमले होते. त्यांच्याकडे फौजदारी व महसूली खाती होती. यांनी दिलेल्या शिक्षा कानपूर कोर्टापेक्षाही कठोर असत असे म्हणतात. हे विद्वान् व संघटनाकुशल होते. बाबा भटांची अन्य कौटुंबिक माहिती मिळत नाही. यांचा एक मुलगा रामराव (आण्णा) यांची, नानासाहेबांना ओळखण्यासाठी (जमनादास प्रकरण) '१८५७' नंतर साक्ष झाली होती.

नानासाहेबांच्या भावंडापैकी (१) स्वत: नानासाहेब (२) गंगाधरराव (३) मथुराबाई, (४) कृष्णाबाई, (५) सदाशिवराव, (६) गोदावरीबाई, यांना दुसऱ्या बाजीरावांनी बिठूर येथे एका मागून एक दत्तक घेतले. त्यामुळे नाना-साहेबांची मूळची चुलत भावंडे दत्तक घरी सख्खी भावंडे झाली.

नानासाहेबांचे दत्तकविधान बिठूरला गुरुवारी ७ जून सन १८२७ रोजी झाले. दुसरे दत्तकविधान – चुलत बंधू सीतारामपंत यांचे – त्याच दिवशी झाले. याबद्दल बाजीरावांचे बिठूरचे एक कारभारी बापूजी सखाराम गोडबोले यांनी आपला भाऊ दिनकर तात्या गोडबोले यांना ११ जुलै सन १८२७ रोजी लिहिलेल्या पत्रात पुढीलप्रमाणे तपशील आहे :

" १. श्रीमंत माहाराज याणी दोघे पुत्र वेणगावकर भट याचे दत्तक विधानयुक्त ज्येष्ठ शु. १३ गुरुवारी सुमुहूर्ते घेतले (७-६-१८२७) कलम –

(१) वडीलपुत्र भागवत याचे मुलीचे नावे घेतला त्याचे नाव धुंडिराज नाना ठेविले रा. महादाजीपंत भट याचे पुत्र वय वर्षे २॥

(१) धाकटे पुत्र पेंडसे ताचे मुलीचे नावे घेतला त्याचे नाव सदाशिवपंत-दादा ठेविले रा. त्र्यंबकपंत भट याचे पुत्र वय वर्षे ३॥ याप्रो दोघे पुत्र विधान-युक्त दत्तक घेतले पुत्रोच्छाही उत्तम जाला तुम्हास कळावे – कलम."

याखेरीज इतर भावंडांच्या दत्तकविधानांच्या तारखा उपलब्ध झाल्या नाहीत. ही दत्तकविधाने बिठूरच्या कमिशनरना पूर्वीपासून सविस्तर कळवून रीतसर पार पाडली होती. गव्हर्नर जनरलना सुद्धा ताबडतोब कळवण्यात आले होते. हजारो लोकांच्या उपस्थितीत–साक्षीने–दत्तकविधाने समारंभपूर्वक करण्यात आली होती.

नानासाहेबांच्या जनक पणजोबांचे नाव गणेशपंत (पृ. २६ पहा.) होते. उपरोक्त गणपतराव भटांच्या जबानीतील माहितीवरून हिशोब केल्यास या गणेश-पंतांचा जन्म सन १७४० चे सुमाराचा येईल. १७९३ साली रघुनाथराव पेशवे,

थो. माधवराव, थो. नारायणराव यांच्या अस्थी श्रीवर्धनच्या गणेश भट बिन अनंत-भट यांच्याबरोबर महायात्रेला पाठवल्याचा उल्लेख मिळतो. ' वेदमूर्ती गणेशभट बिन अनंतभट उपनाव भट गोत्र गार्ग्य सूत्र आश्वलायन श्रीवर्धनकर यांस तीर्थरूप कैलासवासी दादासाहेब व माधवरावसाहेब व तीर्थरूप नारायणरावसाहेब यांच्या अस्ती देऊन महायात्रेस पाठविले त्याणी प्रयागी जाऊन त्रिवेणीत अस्ती निक्षेपून गयेस जाऊन त्रिवर्गाचे व तीर्थरूप कैलासवासी भाऊसाहेब यांचे गयावर्जन करून पुण्यास आले. यास्तव कृपाळू होऊन यांस... (आर्बा तिसैन मया व अलफ जिल्काद ५ ता.– १५ जून सन १७९३) ' हे गणेशपंत नानासाहेबांचे पणजोबा असावेत काय ?

धोंडोपंत नानासाहेब पेशव्यांच्या जनकशाखेची एक वंशावळ 'अठराशे सत्तावनचा महाराष्ट्र ' या पुस्तकात दिली आहे. ही वंशावळ इंग्रजांच्या गुप्तहेरांनी मिळवलेली असल्याची त्याखाली टीप आहे. ११ ऑक्टोबर सन १८५८ च्या 'ज्ञानप्रकाश ' च्या विशेष पुरवणीत नानासाहेब, बाळासाहेब, रावसाहेब व नारोपंत ऊर्फ बाबा भट या पेशवे मंडळींच्या शारीरिक बांध्याचा तपशील दिला आहे. या तपशीलाखाली ' सदरील चेहेरेपट्टी कानपूरचे असिस्टंट कमिशनर लेफ्ट. जे. पाकिन्स याणी केली आहे. ती ग्याझीटावरून घेतली. ' अशी तळटीप आहे.

पो. डि. भाग १ ए, पृ. १९, इन्डेक्स नं. १७, प्रोसिडिंग नं. ७२ दि. जुलै सन १८६३ (उत्तर प्रदेश अभिलेखागार) येथे पुढील वर्णन उपलब्ध आहे* :

क्र. १. **धोंडोपंत बाजीराव ऊर्फ नानासाहेब** – जात : दक्षिणी ब्राह्मण, वय : ३२, रंग गोरा, शरीरयष्टी : ५ फूट ८ इंच, शक्तिशाली व बलवान, चेहरा : चपटा आणि गोल, नाक : सरळ व सुडौल, डोळे : विशाल, गोल, दात : सम, छातीवरील चिन्ह : केसांनी आवृत्त, चेहऱ्यावर चिन्ह : ?, केसांचा रंग : काळा, कानात केस : आहेत, शेरा : मराठी वैशिष्ट्ये स्पष्टपणे दिसतात, पायाच्या अंगठ्यावर सूज व आघाताचे चिन्ह आहे. आता दाढी वाढवली आहे. यवनाप्रमाणे दिसतो. तुटक्या कानाचा एक नोकर कधी त्याची साथ सोडत नाही.

क्र. २. गंगाधर ऊर्फ बाळाराव– जात : पूर्वोक्त, वय : २८, रंग : सावळा, शरीरयष्टी : उंच व कृश. चेहरा : लांबट, नाक : बेडौल, डोळे : गोल, दात : समोरचे दात नाहीत, छातीवरील चिन्ह : काही केसांनी आवृत्त, चेहऱ्यावर चिन्ह : चेचकचे चिन्ह, केसाचा रंग : काळा, कानात केस : आहेत, शेरा : छातीवर एक गोळी लागल्याचे चिन्ह आणि दाढी वाढवल्यामुळे यावनी रूप आहे. (तोंडावर व्रण, गुडघे काही फिरलेले, धोंडोपंताचा बंधू व त्याचे अमलातील सैन्याचा कमांडर इन्

* ' संकानेजी ' परिशिष्ट २.

चीफ सेनापती असेही उपरोक्त ज्ञानप्रकाशात वर्णन मिळते.)

क्र. ३. पांडुरंग ऊर्फ रावसाहेब – जात : पूर्वोक्त, वय : ३०, रंग : गोरा, शरीरयष्टी : उंच व कृश, चेहरा : लांवट, नाक : लांब व मोठे, डोळे : विशाल, दात : ?, छातीवर चिन्ह ?, केसांचा रंग : काळा, कानात केस : आहेत, शेरा : डोळे मोठे, गलीत कुष्ठ चिन्हे दिसण्यास प्रारंभ झाला आहे. यांचेही रूप यावनी आहे.

क्र. ४. नारोपंत ऊर्फ बाबा भट– जात : पूर्वोक्त, वय : ५५, रंग : पिवळसर, शरीरयष्टी : उंच आणि सुडौल, चेहरा : ?, नाक : लांब आणि मोठे, डोळे : छोटे, दात : दीर्घ, छातीवर चिन्ह : काही पांढरे केस, चेहऱ्यावर चिन्ह : ?, केसांचा रंग : पांढरे आणि अगदी थोडे राहिले आहेत, कानात केस : आहेत, शेरा : ?

क्र. ५. रामू ऊर्फ आण्णा– बाबा भटाचा मुलगा. जात : पूर्वोक्त, वय : २५, रंग : पिवळसर, शरीरयष्टी : मध्यम व कृश, चेहरा : ?, नाक : सरळ, डोळे, काळे, दात : सम, छातीवर चिन्ह : ? चेहऱ्यावर चिन्ह : ?, केसांचा रंग : काळा: कानात केस : नाहींत, शेरा : क्रांतीमध्ये आपल्या वडिलांचे हाताखाली काम केले आहे.

ऐतिहासिक नोंदींवर आधारित, नानासाहेबांच्या जनक शाखेची वंशावळ पृ. ३४६ वर दिली आहे. ती गं. भा. बयाबाई आपटे यांनी सांगितलेल्या तपशिलाशी जुळते. याखेरीज इंग्रजांच्या रेकॉर्डमधील एक वंशावळ या परिशिष्टासह दिली आहे. त्यातील तपशील मात्र थोडा वेगळा आहे.

* *

परिशिष्ट तेरावे

नवलाखा हार व काही दागिने

पेशवे परिवाराच्या नेपाळमधील वास्तव्याच्या दरम्यान पेशव्यांच्या नवलाखा हारासंबंधी ऑक्टोबर सन १९३७ च्या 'सह्याद्रि' मध्ये माहिती मिळते.

'नवलाखा हार' या नावावरूनच, समकालीन मूल्यमापनानुसार हाराची किंमत किमान नऊ लाख रु. होते हे स्पष्टच आहे.

हा पेशव्यांचा विशेष नामांकित कंठा होता. त्यात पांचू, हिरे, माणिक, मोती वगैरे अनेक रत्ने गुंफलेली होती. हा कंठा कोणी व केव्हा बनवला याचा इतिहासात स्पष्ट उल्लेख नाही. रघुनाथरावांचे बरेचसे जवाहीर व मौल्यवान जिन्नस इंग्रजांनी इंग्लंडला पाठवले होते. ते त्यानंतर सुमारे वर्षभरातच हिंदुस्थानात परत आणून रघुनाथरावांना परत दिले. त्या ४००–५०० नगांमध्ये नवलाखा हाराचा उल्लेख नाही. कदाचित् तो इंग्रजांकडे दिला नसण्याचा संभव आहे.

हाच, दुसऱ्या नानासाहेबांनी अडचणीच्या काळात त्यांच्याकडून नेपाळमध्ये, नेपाळचा तत्कालीन प्रधान जंगबहाद्दर याने अवघ्या ९३,००० रु. स विकत घेतला. यानंतर हार जंगबहाद्दरच्या खाजगी मालकीचा झाला.

जंगबहाद्दरच्या पश्चात् प्रधानपदावर आलेल्या राणा उद्दिपसिंग आणि वीर समशेर ह्या उभतांकडे हा हार राहिला. त्यांनी तो रुबाबाने भरपूर वापरला. कालांतराने वीर समशेरच्या विधवा राणीने तो हार स्वतःचा दीर देव समशेर याला विकला. काही कारणाने देव समशेरला २६ जून सन १९०१ रोजी नेपाळमधून हद्दपार व्हावे लागले.

या दरम्यान नेपाळ–हिंदुस्थान सरहद्दीजवळच्या दरभंगा संस्थानच्या नरेशांकडे नरेश संपन्न आणि कट्टर हिंदू धर्माभिमानी असल्यामुळे तातडीने संदेश गेला, "नौलाखा विक्रीस निघाला. तावडतोब सौदा ठरवा."

याप्रमाणे एका रात्रीत, नवलाखा हार देव शमशेरकडून दरभंगा नरेशांकडे १९०१ साली गेला.

दुसऱ्या नानासाहेबांनी व त्यांच्या पश्चात् त्यांची भावजय गं. भा. काशीबाई-

साहेब (श्रीमंत बाळासाहेबांच्या पत्नी) यांनी जंगबहाद्दरला आणखीही बरेच दागिने व जडजवाहीर विकले. त्यात एक विशेष उल्लेखनीय पांचू होता. तो तीन इंच लांबीचा हिरवा खडा असून नेपाळी प्रधानाच्या दरबारी मुगुटात बसवलेला होता असे म्हणतात.

द्राक्षांच्या घडाप्रमाणे दिसणारा एक पाचूचा घोसही नानासाहेबांकडून जंगबहाद्दरने विकत घेतला होता. नानासाहेबांच्या सर्व आंगठ्यांचा जोड दरभंगा नरेशांकडे असे. त्यातील एक हिरा ३/८" × १/२" आकाराचा अस्सल शुभ्र पाणीदार, अतिशय मूल्यवान, भारी किंमतीचा होता.

४८ मोती व २४ पाचू मिळून गुंफलेला एक कंठा नानासाहेबांनी नेपाळमध्येच विकला. हिऱ्याचा एक मणिबंध (दागिना) नानासाहेबांकडे होता. तो ३" × २" आकाराचा असून त्याच्या मध्यभागी असलेला हिरा ५/८" × १/२" आकाराचा होता. त्याभोवती ३४ हिरे ताणून बसवलेले होते. गं. भा. सईबाईंनी जंगबहाद्दरला जे दागिने विकले त्यात हे दोन दागिने असावेत.

❋ ❋

परिशिष्ट चौदावे

पहिला मुद्रण-प्रयोग

पेशवाईत राज्यकारभार वाढला. पत्रव्यवहार, फर्माने, बखरी, हुकूमनामे इत्यादींची निर्मिती कागदावरच होत असे. परंतु सर्व हस्तलिखित असे. ग्रंथ, पोथ्या; यांच्या हस्तलिखित प्रती लिहिणारे व्यावसायिक लेखक असत. हस्तलिखित पोथ्या, ग्रंथ तयार करणे हा पूर्ण वेळचा व्यवसाय असे. हे काम करणाऱ्या मंडळींमध्ये गुजराथी व कानडी लोक जास्त असत. लिखणावळ पोथीमधील श्लोक संख्येवर आधारित असे. पोथी किंवा ग्रंथ फार मोठा असल्यास सालवार पगारी लेखक नेमले जात. त्यांनी वर्षभरात ठराविक लिखित ग्रंथसंख्या पूर्ण केली पाहिजे असे बंधन असे. लेखनासाठी सामान्यतः दिव्याच्या ज्योतीवर धरणाऱ्या काजळीची शाई वापरीत. १००० पृष्ठांच्या लेखनाबद्दल २–३ रु. मोबदला मिळे.

मोठे धनिक, उमराव, सावकार, ह्यांच्या पदरी असे अनेक लेखक असत. हिंदुस्थानात मुद्रणाचे तंत्र पोर्तुगीजांनी १६ व्या शतकात रूढ केले होते. एका ख्रिस्ती पाद्र्याने दिल्लीपती सम्राट अकबराला बायबलची छापील प्रत भेटीदाखल पाठवली होती, हे सत्य असले तरी महाराष्ट्राला मुद्रणक्षेत्र अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत जवळ जवळ अपरिचित होते. स्वाभाविकच ज्ञानसंग्रह आणि ज्ञानार्जन-पद्धती यावर अपरिहार्यपणे खूप मर्यादा येत. या काळात पाठांतरावर जोर असे तो याच कारणामुळे.

छापील पुस्तके, ग्रंथ, व्याकरणाची पुस्तके, कित्ते, शब्दकोश, अशी साधने अजून निर्माण झाली नव्हती. पोथीरूपातील पारंपारिक कथा-पुराणे, धार्मिक वाङ्मय, या खेरीज अन्य ग्रंथ नव्हते. ग्रंथ, पोथ्या, ‘ वाचण्यासाठी ’ नसून ‘ श्रवणासाठी ’ असतात अशी सार्वत्रिक ठाम समजूत असे.

हस्तलिखिते हाच एक मार्ग असल्यामुळे ग्रंथांच्या किमती खूप असत. भारत ३६१ रु., भागवत ३६ रु., गीता २॥। रु., ज्ञानेश्वरी २६१ रु., शारीरभाष्य १००० रु., शिवपुराण ६॥ रु. अशा पेशवाईच्या अखेरच्या टप्प्यातील काही नोंदी आढळतात.

तत्कालीन लेखन परिस्थितीविषयी वि. का. राजवाडे म्हणतात :

“ ... मराठ्यांच्या संस्कृतीत प्रथम व्यंग म्हटले म्हणजे त्यांना छापण्याची कला माहीत नव्हती व ती माहीत करून घेण्याचा त्यांनी कधी प्रयत्नही केला

नाही. युरोपातील सर्व देशचे लोक त्यांच्या दारी उभे असून मराठयांनी छापण्याची कला कशी घेतली नाही याचे आश्चर्य वाटते. " (रा. खं. १ पृ. १००).

या पार्श्वभूमीवर उत्तर पेशवाईतील पहिल्या मुद्रणप्रयोगाचा विचार केला पाहिजे.

पुण्याचे तत्कालीन रेसिडेन्ट सर चार्लस् मॅलेट यांच्या सहाय्याने नाना फडणीसांनी पुण्यात एक चित्रशाळा आणि शिल्पशाळा स्थापन केली. शिल्पशाळेत शिकून तयार झालेल्या एका तांबट विद्यार्थ्याकडून मराठी अक्षरांचे खिळे (टाईप) तयार करवून घेऊन भगवद्गीतेचा ग्रंथ छापण्याची कल्पना मनात आणली. पाश्चात्य देशात या वेळेपर्यंत, सुटे खिळे (Movable Types) हे धातूचे ओतलेले असत.

सुटचा खिळचांचा शोध लागण्यापूर्वी लाकडाचे टाईप कोरून ते वापरण्यात येत असत. त्यानुसारच १७८५ साली, नाना फडणीसानी लाकडी ठोकळचांवर अक्षरे कोरून गीता–ग्रंथ छापून घेण्याचा प्रयत्न केला होता.

त्या काळी परंपरेनुसार भगवद्गीता व इतर धार्मिक ग्रंथ सुंदर अक्षरात लिहवून घेत. भगवद्गीतेच्या अशा प्रकारे तयार केलेल्या प्रती ब्राह्मणांना मोफत वाटण्याची प्रथा होती. जयपूर, वाराणसी, मथुरा, येथून सुंदर अक्षरात लिहवून घेतलेले, वेलबुट्टींनी सजवलेले ग्रंथ विकत घेऊन ते वाटण्यात येत असत. हे ग्रंथ इंग्रजी पुस्तकांप्रमाणे ठशात छापणे अधिक चांगले असे वाटून नाना फडणीसांनी कुशल कारागिरांकडून ठसे करवून घेण्याचा प्रयत्न पुण्यात केला पण तो फारसा सफल झाला नाही.

पुण्याच्या राजकारणात १७९५–९६ सालापासून बेबंदशाही माजल्यामूळे मुद्रणाचा प्रयत्न अपुरा राहिला. राजकीय–सामाजिक अस्थिरतेमुळे पुण्यातील विविध व्यवसायांतील कारागीर स्थिर चरितार्थासाठी देशांतर करून इतरत्र गेले. तसेच मुद्रण–तंत्र जाणणारे कारागीरही परप्रांतात निघून गेले. त्यांच्यापैकी एक जण मिरज प्रांतात गेला हे समजल्यावर मिरजेचे अधिपती गंगाधरराव गोविंद पटवर्धन ह्यांनी त्या कारागीराचा शोध घेऊन त्याची विचारपूस करून त्याला आश्रय दिला. त्याचे नाव मात्र आज उपलब्ध नाही.

त्या कारागीराने तयार केलेल्या मुद्रिका पाहून पटवर्धनांनी त्याच्याकडून भगवद्गीतेच्या मुद्रा तयार करवून घेतल्या. त्या तांब्याच्या पत्र्यावर शब्द कोरून लाकडी दाबाने व लाखी शाईने छापून महाराष्ट्रातील देवनागरी लिपीतील हा पहिला ग्रंथ १८०५ साली तयार केला. या भगवद्गीतेच्या ग्रंथाची अर्पणपत्रिका पुढील प्रमाणे आहे —

अगयुग्माग भूतुल्ये १७२७ शके क्रोधनसंवत्सरे मार्कंडेय मुनि क्षेत्रे पटवर्धन संज्ञक: निगमागधर्मज्ञ: श्री गोविन्दतनूदभव: विदुषामन्त-रायासम् दिव्यां कृतिः गङ्गाधरो मुदा तज्जन्यं पुस्तकं यत् तत् द्विजेभ्यो दत्तवानसौ। गोपालकृष्ण चरणप्रसार ज्ञानलब्धये श्रीरस्तु।

श्रीभगवानुवाच ऊर्ध्वमूलमधःशाख
मश्वत्थंप्राहुरव्ययं छंदांसियस्यपर्णानि
यस्तंवेदसवेदवित् १ अधश्चोर्ध्वंप्रसृ
तास्तस्यशाखागुणप्रवृद्धाविषयप्रवा
लाः अधश्चमूलान्यनुसंततानिकर्मानु

बंधीनिमनुष्यलोके २ नरूपमस्येह
तथोपलभ्यतेनांतोनचादिर्नचसंप्रतिष्ठा
अश्वत्थमेनंसुविरूढमूलमसंगशस्त्रे
णदृढेनछित्वा ३ ततःपदंतत्परिमार्गि
तव्यंयस्मिन्गतानिवर्तंतिभूयः नमे

उत्तर पेशवाईतील पहिला मुद्रण प्रयोग (सन १८०५)

मिरजेत तयार केलेल्या ठशांच्या आधारे मुद्रण केलेल्या या ग्रंथाच्या मजकुराचा एक नमुना सोबत (वर पहा) छापला आहे. ठशांचा आकार ४ ३/८ × २ ३/१६ इंच असून अक्षरांची एकूण उंची अर्धा इंच आहे. हे ठसे पुण्याच्या 'भारत इतिहास संशोधक मंडळा'च्या संग्रहात आहेत, तसेच या ग्रंथाची (भगवद्‌गीतेची) एक प्रत मुंबईला 'मराठी संशोधन मंडळा'त आहे असेही समजले.

उत्तर पेशवाईतील १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील महाराष्ट्रा-तील पहिला मुद्रण-प्रयोग म्हणून हे प्रयत्न विशेष महत्त्वाचे ठरतात. यात शंका नाही.

परिशिष्ट पंधरावे

काही मनोरंजक नोंदी

एक :

इंग्रजांनी सिंहगड लुटला त्या वेळी, किल्ल्याच्या तटात भिंतीत लपवलेली गणपतीची सोन्याची मूर्ती त्यांना सापडली. ती सुमारे पाच लाख रुपयांची होती. सावकारांनी दीड लाख रु. पर्यंत मागणी घातली होती असे म्हणतात. डिसेंबर सन १७६६ मध्ये तंजावरचे तुळजाजी भोसले यांच्याकडून थोरल्या माधवरावांना गणपतीची सोन्याची मूर्ती भेटीदाखल मिळाली होती, तीच ही मूर्ती असावी. कदाचित इंग्रजांच्या हल्ल्याच्या भितीने पर्वतीवरील मूर्ती व जडजवाहीर सुरक्षिततेसाठी सिंहगडावर पाठवले त्यात ही मूर्ती असावी. तीच इंग्रजांना सिंहगडावर लपवलेली सापडली असावी. पेशवाई संपल्यावर सिंहगडावरची जी लूट इंग्रजांनी पर्वती देवस्थानला परत केली त्यात ही मूर्ती असावी. १९३२ साली पर्वतीवर मोठी चोरी होईपर्यंत मूर्ती तेथे शाबूत होती. [१]

दोन :

थोरले माधवराव राजकारणाच्या धामधुमीतून स्वस्थपणा मिळाला की, विश्रांतीसाठी अष्टविनायक–स्थानांपैकी थेऊरला मुक्काम करीत. त्यांनी ' चिंतामणी ' मंदिराच्या सभामंडपाचा जिर्णोद्धार करून मंदिराचा विस्तार केला. मंदिराच्या महाद्वारापासून नदीकिनाऱ्यापर्यंतचा रस्ता बहुदा थोरल्या नानासाहेबांनी बांधवला आहे. पेशव्यांच्या काही सरदारांनी परिसराच्या विस्तार–विकासासाठी वेळोवेळी हातभार लावलेला आहे. [२]

तीन :

अष्टविनायकापैकी पालीच्या बल्लाळेश्वराला कौल लावून पेशवे अनेक वेळा न्यायनिवाडे करीत असत असे उल्लेख मिळतात. बल्लाळेश्वर मंदिराच्या बाहेरच्या कमानीत, नाशिकच्या ' नारो-शंकरी ' घंटेसारखी मोठी घंटा आढळते. थोरल्या चिमाजीआप्पांनी वसई प्रांत आणि वसईचा किल्ला पोर्तुगीजांकडून जिंकला त्यावेळी मराठी फौजांना मिळालेल्या लुटीपैकी सदर घंटा असून पेशव्यांकडून

देवस्थानला मिळाली असे सांगतात. येथील धर्मशाळा व मठ मोरोबा दादा फडणीसांनी बांधली.[२]

चार :

थोरल्या माधवरावांच्या स्वप्नात एकदा टिटवाळचाचा 'महागणपती' आला होता. तो दृष्टांत समजून माधवरावांनी तळ्याकाठी गणेशमंदिर बांधून दिले. रमा–माधवांनीच गणपतीच्या पुळचाला धर्मशाळा बांधली होती.[३]

पाच :

दुसऱ्या बाजीरावांच्या बिठूर येथील दैनंदिन पूजेतील श्रीगणेशाच्या मूर्तीची थोडी माहिती उपलब्ध आहे :[४]

निदान १९४२ सालपर्यंत ही मूर्ती बिठूर येथील श्री. भवानीशंकर पंड्या ह्यांच्या राममंदिरात ठेवलेली होती. या काळात मूर्तीची पूजा-अर्चा कोणी करीत नसे असा उल्लेख मिळतो. बाजीरावानी बांधवलेले छोटेखानी मंदिर कालमान-परत्वे मोडकळीला आल्यानंतर गणेशमूर्ती श्री. पंड्या यांच्याकडे स्थलांतरित झाली. यानंतरची माहिती उपलब्ध झाली नाही.

सदर मूर्तीचे दोन विशेष सांगता येतात. ती उजव्या सोंडेची आहे. ती दशभुजा म्हणजे दहा हातांची आहे. गणपतीची दशभुजांकित मूर्ती ही दुर्मिळ गोष्ट समजली जाते. मूर्तीचे वजन ४॥ मण असून संगमरवरी दगडाची आहे. दुसरे बाजीराव रोज पूजेच्या वेळी मूर्तीपुढे एक सोन्याची मोहोर ठेवत असत अशी आख्यायिका निदान १९५५ सालापर्यंत तरी बिठूरचे रहिवासी सांगत असत असे समजते.

सहा :

नाना फडणीसांना हिंदुस्थानातील[५] सर्व प्रांतांची माहिती करून घेण्यासाठी त्या त्या प्रांतांचे नकाशे मिळवण्याची फार जरूरी असे. त्यांनी पाश्चात्य लोकां-कडून व आपल्या लोकांकडून मुद्दाम नकाशे (नक्षे) तयार करवून घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी मराठ्यांच्या राज्यांचे, मराठ्यांच्या आरमारांचे, लढाऊ किल्ल्यांचे व युद्धांच्या जागांचे नकाशे तयार करवले होते. हा नकाशा संग्रह फार मूल्यवान व मनोरंजक होता. नाना फडणीसांचे भूगोलाचे ज्ञान चांगले होते.

सात :

मराठा दरबारात[६] पत्रव्यवहार व इतर संदर्भात इंग्रजांसाठी विशिष्ट सांकेतिक नावे वापरत असत. ती फार मनोरंजक आहेत :–

लेखांक १

।। श्री ।।

यादी नावे मुंबईच्या पत्रातील–

१. प्रीति–शाहू शेणवी
१. शुक्र–डेव्हिड इस्काट
१. श्रोणितापूर–मुंबई
१. सिंह–पुणे
१. सप्तमी–फत्तेसिंग
१. कन्या–मद्रास
१. शनि–टामस गाडर
१. केतु–हार्नबी जनरल
१. तूळ–सुरत
१. मृत्युयोग–स्वार
१. कुंभ–विलायत
१. राहु–ड्रेपर

आठ :

पेशवाईत इंग्लिश [७] पद्धतीच्या घड्याळांचा (Wall-Clock) प्रवेश बराच लवकर झाल्याचे आढळते. कॅप्टन वॉकर यांनी थोरल्या बाजीरावांना लिहिलेले ३ नोव्हेंबर सन १७३५ चे एक पत्र उपलब्ध आहे. त्यात पेशव्यांकडील इंग्लिश पद्धतीचे घड्याळ दुरुस्त केल्याचा उल्लेख आहे. घड्याळ साहेबमजकुरांनी (कॅ. वॉकर) दुरुस्त केले. त्यावरून पेशवाईत या प्रकारच्या घड्याळांचा प्रवेश थोरल्या बाजीरावांच्या कारकीर्दीत सन १७३५ पूर्वी झाला असे म्हणता येते.

पत्राची सुरुवात, मायना व शेवट पुढील प्रमाणे आहे :

उं

अजमं अकरमं बाजीराऊजी पंतप्रधानजी उस सलामत–

....

....

दराज काय लिहिणे ? प्यार मोहबत असू देणे येथे सार शिकार खिजमत फरमावीत जाणे खिजमतेस हाजीर असो.

तारीख २८ जमादिलाखर ऊर्फ इंगरेजी तेरीख ३ नोवेंबर सन १७३५.

नऊ :

भटकुळातील गणेशोपासनेची परंपरा

भट आणि घोटवडेकर ही दोनही कुळे [८] जंजिऱ्याच्या नबाबाच्या राज्यात रहात असताना ग्रहलाघवकर्ते गणेश दैवज्ञ घोटवडेकर यांना, आपण बांधावयाला काढलेला जंजिऱ्याचा जलदुर्ग अभेद्य आणि अजिंक्य होईल, असा मुहूर्त काढून देण्याची नबाबांनी विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी मुहूर्त काढून दिला. पण त्या

म्लेच्छांची चूकभूल होऊन त्या मुहूर्ताची वेळ काही पळाविपळांनी टळली. या चुकीच्या परिणामाविषयी प्रश्न विचारला असता गणेश दैवज्ञांनी सांगितले की हा जवळ जवळ अजिंक्यच होईल, पण कालांतराने भटकुळातील कोणी पुरुष एका रविवारी हा किल्ला जिंकून घेईल. ही आपदा टाळण्याकरिता नबाबांनी भटकुळाचे शिरकाण केले. पण त्यातून वाचलेल्या एका बालकाने तरुणपणी म्लेच्छांच्या उच्छेदाप्रीत्यर्थ खडतर गणेशोपासना आरंभिली. तेव्हा देवांनी त्याच्या कुळाला राज्यप्राप्तीचा वर देऊन त्याला गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली. त्याचप्रमाणे राज्यप्राप्तीनंतर अथर्वशीर्षाच्या आवर्तनांसह एक कोटि दूर्वा वाहण्याचा नेम त्या कुळाला सांगून ठेवला. राज्यप्राप्तीनंतर हा नेम करण्याचे काम बाळाजी विश्वनाथांनी कायगांवचे पाटणकर दीक्षित यांचेकडे दिले. त्याप्रमाणे नानासाहेबांचे राजवटीपर्यंत सत्तावीस लक्ष दूर्वा वाहिल्याचा उल्लेख दीक्षितांचे पत्रांतून आढळतो. पुढे या नेमाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे पेशव्यांचे राज्य विलयाला गेले. तरीसुद्धा पुण्यात पेशव्यांचा गणेशोत्सव मोठ्या थाटाने होत असे. सत्तावन्नच्या क्रांतियुद्धातील पराभवामुळे पेशवेकुळातील गणेशोत्सव बंद पडल्यानंतर त्यांच्या परिवारातील मंडळींनी म्लेच्छांचा उच्छेद करून स्वराज्यस्थापनेत नानासाहेबांना यश यावे, या करिता धुंडिराजाचा उत्सव या नावाने गणेशोत्सव चालू केला.

दहा :

खालील हकीगतीचा पेशवा घराण्यातील-व्यक्तींशी प्रत्यक्ष संबंध नाही तथापि हकीगतीवरून तत्कालीन समजुती आणि मर्यादा यावर प्रकाश पडतो पेशवेकालीन समाजचित्रणाच्या दृष्टीने ही हकीगत उपयोगी ठरण्यासारखी आहे म्हणून येथे दिली आहे.

काशी क्षेत्रातील कर्मनाशीचा पूल

श्री काशी क्षेत्राबद्दल प्रत्येक हिंदूच्या मनांत आदरबुद्धी वसत असून, तेथें काही पुण्यकर्म करावें म्हणजे आपणास मोक्षप्राप्ती होईल, असा भक्तिभाव पेशवाईमध्ये फार होता. नाना फडणविसांच्या मनांतही ह्याप्रमाणें काशी येथें कांहीं पुण्यकृत्य करावें असे होतें. त्याप्रमाणें त्यांनी कर्मनाशी नदीवर पूल बांधण्याची कल्पना आपले मनांत आणिलीं.

त्याप्रमाणें त्यांनी काशी येथील आपले कारकून भास्करपंत कुंटे ह्यांना पुलाचें काम सुरू करण्याबद्दल लिहिलें. त्यांनी पुलाचा पाया खणण्यास सुरुवात केली. परंतु नदीमध्यें वाळूचा भराव व पाण्याचा जोर विशेष होता, ह्यामुळें पायास धर लागेना. तेव्हां त्यांनी पूर्वीच्या समजुतीप्रमाणें मांत्रिक बोलावून अनुष्ठानास सुरुवात केली; व कुमारस्वामी कोमटी यांचे विद्यमानें, पुलाचे पायांतील पाणी व वाळू बंद

व्हावी ह्याकरितां, शके १७१८ सालीं अधिक भाद्रपद वद्य ८ पासून अनुष्ठानास प्रारंभ केला.

ही गोष्ट नाना फडणविसास कळली, तेव्हां त्यांनी पुलाचे कामास मांत्रिकी अनुष्ठानाचा काही उपयोग होणार नाहीं, असें भास्करपंत कुंटयास कळवून अनुष्ठान बंद करविले; आणि बेकर नामक एका युरोपियन कारागिरास (इंजिनियर ह्यांस) २०,००० रुपये देऊं करून पुलाचा पाया खोदण्यास प्रारंभ केला. त्यानें प्रथमतः पुलाचे पायांतील पाणी काढावयास दोन बंब तयार करविले, परंतु ते लागू झाले नाहीत. तेव्हां त्यानें कलकत्त्याहून कळीचे बंब आणवून काम पुरे केले.

ह्या गोष्टीवरून इंग्रजी यंत्रकलेची मदत मराठी राज्यामध्ये कशी घेऊं लागले होते, त्याची कल्पना येते.

* *

आधार : (१) भूभ्र पृ. ५४, (२) गकोश पृ. १६३, (३) कित्ता पृ. १६९ (४) 'सह्याद्रि' ऑगस्ट सन १९४१, (५) इतिसं, ऑगस्ट सन १९०९, (६) इतिसं ऑगस्ट सन १९०८, (७) इतिसं, ऐटि, भाग ४, नोंद २, (८) 'क्रांतिकारक टिळक नि त्यांचा काळ' पृ. १३२. याचा मूळ आधार दिलेला नाही. आख्यायिकेची विश्वासार्हता संशयास्पद वाटते. (९) इतिसं, जु. ऐ. गो. क्र. २०.

परिशिष्ट सोळावे

पेशवाई जाऊन शंभर वर्षे झाली

दुसरे बाजीराव पेशवे ३ जून सन १८१८ ला इंग्रज सेनापति ब्रिगेडिअर जनरल जॉन माल्कम यांच्या स्वाधीन झाले व पेशवाईची राजवट संपून महाराष्ट्रात ब्रिटिशांचा अंमल सुरू झाला. या घटनेला शंभर वर्षे झाली त्या निमित्ताने, मंगळवार, ४ जून सन १९१८ च्या 'केसरी'च्या अंकात अग्रलेख प्रसिद्ध झाला होता. केसरीकारांचे विवेचन ह्या दृष्टीने त्याला महत्त्व असल्यामुळे तो अग्रलेख येथे समाविष्ट केला आहे :—

पेशवाई जाऊन शंभर वर्षे झाली

आहार, निद्रा, भूक, इत्यादी मनुष्यप्राण्याला व पशुपक्ष्यांना सारखेच असतात. मग मनुष्याला अधिक विशेष काय तर ज्ञान होय. पशुपक्षांनाही ज्ञान अगदीच नसते असे नाही. त्यांनाही कित्येक गोष्टींचे उपजत ज्ञान असते व काही बाबतींत तर त्यांचे ज्ञान मानवी ज्ञानाच्यापेक्षा वरचढ असते. मानवी ज्ञानाची ज्योत मात्र भूत व भविष्य या कालात यथेच्छ संचार करीत असते. पूर्वी आपण कोण होतो, कसे होतो आणि पुढे कसे होऊ, असले विचार जर मनुष्यमात्राच्या मनातून कायमचे नष्ट होतील तर त्यांच्यात व पशूत 'पुच्छविषाणहीन' त्याशिवाय दुसरा कोणता भेद राहील ? अर्थात् भूतकालीन स्थितीचे सिंहावलोकन आणि भविष्यकालाचे मनोराज्य हे दोन मनोव्यापार अत्यंत हीन स्थितीतील व्यक्तीस देखील स्फूर्तिदायक होतात आणि म्हणून प्रत्येक मनुष्य केव्हा ना केव्हा तरी या दोहोंतून कोणत्या ना कोणत्या तरी एका मनोव्यापारात तल्लीन होऊन गेलेला आढळतो. हा जो सिद्धांत व्यक्तीस तोच राष्ट्रांसही लागू पडतो. त्यात फरक एवढाच की, व्यक्तीच्या आयुर्मानाच्या मानाने त्यास जसे एक वर्ष तसे राष्ट्राच्या आयुर्मानाला शतसंवत्सर होय. यास्तव मनुष्य जसा आपल्या व्यवहारात वार्षिक आढावा काढीत असतो तसा राष्ट्रानेही शतसंवत्सरिक आढावा काढणे जरूर आहे.

वरील विचारसरणीस अनुसरून महाराष्ट्राचा गेल्या शतकाचा आढावा काढावयाचा विचार मनांत आणला तरी त्याचे आजमितीला औचित्य काय असा प्रश्न कदाचित् कित्येक वाचकांनी केला असता, परंतु रा. न. चि. केळकर यांनी 'मराठे व इंग्रज' या नावाचे पुस्तक लिहून व त्यावर 'मराठेशाहीचे शतसांवत्सरिक वाङ-

मयश्राद्ध ' असा शिक्का मारून अगाऊच गौप्यस्फोट करून ठेवला असल्याने इतिहासाभिज्ञ वाचकांसही बुचकळ्यांत पडण्याचे कारण राहिलेले नाही. तारीख ३ जून १८१८ रोजी मराठेशाहीची अखेर झाली. त्या विधीघटनेस शंभर वर्षे पुरी झाली. या शंभर वर्षानंतर महाराष्ट्राची स्थिती काय आहे याचे सिंहावलोकन करण्याचा हा योग्य प्रसंग असल्याने त्यात औचित्यभंगाचा दोष येण्याची भीती बाळगावयास नको. मराठेशाहीची अखेर ३ जून १८१८ रोजी झाली का त्याच्या आगेमागे कधी झाली याविषयी कदाचित् मतभेद असू शकेल असे समजून रा. केळकर यांनी आपल्या पुस्तकात या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केली आहे, परंतु तो वाद आम्हास तूर्तच्या प्रसंगी अप्रस्तुत वाटतो. ता. ३ जुन १८१८ हाच मराठेशाहीच्या खग्रास ग्रहणाचा काळ होय असे आम्हीच मानतो असे नसून ज्या मालकम साहेबाने बाजीरावाकडून राज्याचा जाहीरनामा लिहून घेतला त्यालाही हा दिवस हिंदुस्थानातील इंग्रजांच्या कारकीर्दीत अपूर्व वाटला. ' पहिला हिंदुराजा आम्हास बिनशर्त शरण आला असा हाच पहिला दिवस असून आमच्या अप्रतिहत शक्तीची सर्व हिंदुस्थानभर छाप बसण्याला हीच गोष्ट कारणीभूत झाली. असे मालकमने आपल्या रोजनिशीत लिहून ठेविले आहे.

ता. ३ जून सन १८१८ रोजी सकाळी १० वाजण्याचे सुमारास महाराष्ट्राच्या उत्तर सरहद्दीवर अशिरगड किल्याच्या उत्तरेस २०/२५ मैलांवर कैरी नावाच्या खेड्यानजिकच्या छावणीत काय प्रकार चालला होता त्याचे चित्र आमच्या वाचकांनी कल्पनेच्या जोरावर आपल्या अंतश्चक्षुपुढे आणिल्यास त्यांस काय दिसेल बरे ? महाराष्ट्राचा शेवटचा हतभागी व नादान पेशवा आपली शेवटची छावणी सोडून आपला सर्व इतमाम व अभिमान बाजूस सारून इंग्रजांच्या छावणीत येऊन दाखल झाला आणि तेथे आपल्या राज्याचे उदक मालकम साहेबांच्या हातावर सोडले ! रावबाजीने कोणत्या अटींवर शरण यावे याची वाटाघाट तीन दिवस चालली होती पण मालकमने एकदा ज्या आपल्या अटी कळविल्या त्यात रेसभरही माघार घेतली नाही आणि अखेरीस ता. ३ रोजी १० वाजता बाजीरावाने मुठीत नाक धरून त्या सर्व अटी कबूल केल्या आणि आठ लाखांपेक्षा कमी नाही इतके वार्षिक पेन्शन घेऊन आपल्या राज्याचा बेवारसा लिहून दिला !

बाजीरावावर असा दुर्धर प्रसंग कसा ओढवला आणि शंभर वर्षांची पेशवाई अथवा दीडशे वर्षांची ' शिवशाही ' अशी चुटकीसरशी नष्ट कशी झाली हा मोठा कूटप्रश्न आहे. मालकमच्या हातावर राज्याचे उदक सोडण्यापूर्वी इंग्लिशांच्या कैचीतून निसटण्याकरिता बाजीरावाने खडकी, कोरेगाव, आष्टी, इतक्या ठिकाणी रणदेवतेची आराधना केली होती. परंतु देवता तरी भक्तांची श्रद्धा पाहूनच त्यांस प्रसन्न होत असते आणि बाजीरावाची रणदेवतेवर किती निस्सीम श्रद्धा होती हे

जगजाहीरच आहे ! तथापि बाजीराव पेशवा तसाच नादान व रणभीरू होता एवढे म्हटल्याने हे गूढ उकलत नाही. १८०२ साली बाजीरावाने वसईचा तह करून राजीखुषीने आपल्या पायात खोडा अडकवून घेतला होता खरा, परंतु तो तह शिंदे, होळकर, भोसले, प्रभृति मराठा मंडळाला बिलकूल मान्य नसल्याने त्यांनी इंग्रजां-विरुद्ध हत्यार उपसले होते आणि हे सरदार काही बाजीरावासारखे कमकुवत, कच्च्या दिलाचे किंवा पळपुटे नव्हते. असे असता त्यांच्या कपाळी हरहमेष अपेशच का लिहिले गेले ? मराठ्यांखेरीज हिंदुस्थानातले इंग्रजांचे दुसरे प्रतिस्पर्धी हैदर व टिपू हे होत. हे पितापुत्र समशेरबहाद्दर नव्हते असे त्यांचे शत्रूदेखील म्हणू शकत नाहीत, तथापि त्यांनादेखील इंग्रजांच्या युद्धकलेपुढे हातच टेकावे लागले की नाही? सारांश व्यक्तिशः रावबाजी कितीही बेहिकमती व नतद्रष्ट असला तरी मराठे-शाहीच्या ऱ्हासाची सामान्य कारणे दुसरीकडेच शोधली पाहिजेत.

मराठेशाही का बुडाली याचे उत्कृष्ट विवेचन ' मराठे व इंग्रज ' या पुस्तकात ग्रंथकर्त्यांनी सविस्तरपणे व निःपक्षपातीपणाने केलेच आहे. येथे खंडन अगर मंडन अथवा अनुवादही करण्याची आवश्यकता नाही. तथापि काही कारणाने विशेष स्पष्टीकरण करू. बाजीरावास महाराष्ट्रात कोणत्याच सरदाराचे पाठबळ न मिळा-ल्याने तो हताश होऊन महाराष्ट्र सोडून तापी पार होऊन इंग्रजांस शरण गेला. त्यास सरदारांची मदत न मिळण्याला सरदारांचा बेईमानपणा व सरंजामपद्धती ही दोन कारणे पुढे करण्यात येतात परंतु ज्या बाजीरावाने आपल्या संबंध कारकीर्दीत एकाही सरदाराशी इमान राखले नाही आणि सरदारांच्या त्रासातून सुटण्याकरिता म्हणून ज्याने इंग्रजांच्या हातापाया पडून त्यांची सरंजामी फौज आपल्या राज्यात ठेवून घेतली, त्याला ऐन आणीबाणीच्या प्रसंगी आपल्या सरदारांनी हातचे सोडले अशी तक्रार करण्यास जागाच उरली नव्हती. मराठेशाहीतील सरंजामी पद्धती मराठ्यांचे राज्य स्थापित होण्यास, ते वृद्धिंगत होण्यास आणि अनेक आघातातून त्याचा बचाव करण्यास कारणीभूत झाली नाही असे म्हणता येत नाही. शिवाय युरोपखंडातदेखील कवायती फौजेचे जेव्हा महत्त्व लक्षात आले तेव्हाच सरंजामी पद्धती मोडत चालली हे उघड आहे. आणि मराठेशाहीत जोपर्यंत कवायती फौजेची जरूरी भासू लागली नव्हती तोपर्यंत सरंजामी पद्धतीचा राज्याला उपयोग चांगलाच झाला हे कोणासही नाकारता यावयाचे नाही. अर्थातच कवायती खड्या फौजेला सरंजामी पद्धती कितीही विसंगत असली तरी एकेकाळी ती उपयुक्त होती म्हणूनच तिचा महाराष्ट्रात अवलंब करण्यात आला.

सरंजामी फौजेचा मनू पालटून खड्या कवायती फौजेचा मनू सुरू झाला हे युरोपखंडात तरी फ्रेड्रिक धी ग्रेटच्या बापानेच आधी ताडले आणि स्वतः फ्रेड्रिकने या नव्या तऱ्हेचे सैन्य प्रथम उपयोगात आणून आपले राज्य वाढविले ही गोष्ट

युरोपखंडात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धातच घडली असल्यामुळे हिंदुस्थानात तिचा पेशव्यांनी तत्पूर्वी अवलंब केला नाही, याबद्दल हिणवण्याचे विशेष कारण दिसत नाही. तोफा, बंदुका, संगीनी इत्यादी नव्या तऱ्हेची हत्यारे मात्र युरोपखंडात अनेक शतके प्रचारात असून आणि युरोपियन व्यापाऱ्यांनी आणि राज्यकर्त्यांनी त्यांचा हिंदुस्थानातही प्रसार केला असून मराठ्यांनी त्यांचा करावा तसा उपयोग केला नाही आणि ही हत्यारांची उणीवच अखेरीस त्यांच्या नाशास कारणीभूत झाली. युरोपखंडात आजमितीला सगळ्या शास्त्रीय शोधांचे पर्यवसान युद्धकलेत होत असून युद्धातील जयापजय शास्त्रज्ञांच्या बुद्धिप्रकर्षावर अवलंबून आहे. हिंदुस्थानात लढवय्या वर्ग व बुद्धिमान संशोधक यांची अनेक शतकांपासून फारकत झाली असल्याने युद्धकलेत बुद्धिमत्तेचा काही उपयोग आहे, ही गोष्टच प्रथम हिंदी लोकांच्या लक्षात आली नाही आणि ज्या वेळी ती लक्षात आली त्या वेळी युद्धकलेतील त्यांचे गुरूच त्यांचे शत्रू बनल्यामुळे त्यांना हातोहात हार खावी लागली. याचीच पुनरावृत्ती आजमितीला तुर्कस्तान व इराण या देशात घडून येत आहे.

मराठ्यांना आपल्या शत्रूचे बातबेत कळत नव्हते, इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच आले कोठून, त्यांचा उद्देश काय, त्यांना त्यांच्या देशातून पाठबळ किती मिळण्यासारखे आहे वगैरे गोष्टींचा मागमूसही लागत नसे व उलटपक्षी युरोपियनांना मराठ्यांच्या अंतःपुरातीलही बित्तंबातम्या कळत इत्यादी गोष्टीला कित्येक लेखक निष्कारण नसते महत्त्व देतात. परंतु संपादित द्रव्याचे रक्षण करणारा मालक व त्या द्रव्याचा अपहार करण्यास टपलेला भोंदू स्नेही या उभयतांच्या जागरुकतेत नेहमी अशी तफावत पडतेच. बाजीरावाच्या राज्यातील खडान्‌खडा माहिती करून घेण्याबद्दल ज्या इंग्रज बहाद्दरांची खरेशास्त्री इतकी वाखाणणी करितात त्याच इंग्रजांना जर्मन हेरांची लंडन शहरात चाललेली कारस्थाने कळू नयेत अथवा जर्मनांचा हल्ला कोणत्या आघाडीवर येणार हे देखील कळू नये याचा अर्थ काय ? याचा अर्थ इतकाच की रक्षक व अपहारक यांच्या जागरूकतेचे प्रमाण १ : १ असूनच नव्हे तर १०० : १ असून देखील भागत नाही कारण अपहारकाच्या चुकीचा काही रक्षकाला फायदा घेता येत नाही, पण रक्षकाची चुकी मात्र त्याला तात्काळ भोवते.

मराठ्यांना सवत्या सुभ्याची आवड फार असे आणि त्यांच्या ठायी संकलित देशाभिमानाचा अभाव होता, हा दोष मात्र कोणासही नाकबूल करता यावयाचा नाही. या दोषाचा फायदा कसा घ्यावा हे अकबराला कळले होते व इंग्रज तर त्या विद्येत निष्णातच होते. म्हणून त्यांच्या राज्याची वृद्धी होत गेली आणि अवरंगजेब व पोर्तुगीज यांना ती विद्या अवगत नव्हती, अतएव त्यांच्या सत्तेचा ऱ्हास झाला. सगळ्या शत्रूंना एकदम दुखवावयाचे नाही व एका शत्रूशी लढताना देखील त्याच्याच संघातला कोणीतरी घरभेद्या आपल्याजवळ नेहमी बाळगावयाचा या भेदनीतीचा

इंग्लिशांनी प्रत्येक कारस्थानात उपयोग करून घेतला. बाजीरावांचे राज्य गिळंकृत करताना त्यांनी साताऱ्च्या महाराजांस हाताशी धरले आणि 'पेशवे पुंड बंडखोर होते ते गेले, पण खरी दौलत मागे शिल्लक राहिली. आम्ही मराठी दौलत पूर्वी-प्रमाणेच चालविणार आहोत, गेले ते राज्य पेशव्यांचे, महाराजांचे राज्य अबाधितच आहे.' असा जाहीरनामा इंग्रजांनी काढला व तेवढ्या शाब्दिक लालचीने सर्व सरदार बाजीरावास सोडून चालते झाले, परंतु एकानेही या इंग्रजबहाद्दरास असे विचारले नाही की, पेशवे जर पुंड व बंडखोर होते तर ते गेले हे ठीकच झाले, पण त्या बंडखोर पुंडांच्या ताब्यातला मुलुख साताऱ्च्या महाराजांना परत द्यावयाचा का तुम्हीच तो मधल्या मधे लाटावयाचा ? पुंडखोर प्रधानाला प्रधानपदावरून दूर केले तर राजाचा मुलूख खालसा का ? बाजीराव पेशवे गेले तर त्यांच्या जागी सातार-कर महाराज दुसऱ्या पेशव्याची नेमणूक करतील. शिवाय पेशवे कितीही पुंड झाले तरी त्यांनी बाह्यतः तरी साताऱ्च्या महाराजांच्या नावाने व त्यांच्याकडून अधि-काराची वस्त्रे आणवूनच पुण्याचा कारभार चालविला होता. परंतु अल्फिष्टन साहेबाने तर महाराजांकडून अधिकारवस्त्रेही न घेताच कारभार चालविला हे कसे ?

असले अनेक प्रश्न इतिहासकार व नीतिशास्त्रकार विचारू शकतील. परंतु त्या वेळी इंग्रजांना असा सवाल विचारण्याची प्रत्यक्ष सातारकर महाराजांची किंवा एकाही मराठा सरदाराची छाती नव्हती, किंबहुना इच्छाही नव्हती. हीच तर हिंदी लोकांच्या वर्तनातली मोठी गोम होय. पोर्तुगीजाप्रमाणे किंवा अवरंगजेबा-प्रमाणे इंग्रज जर सरसकट सर्वास सारखेच झोडीत उठले असते तर मराठ्यांनीही राजारामाच्या वेळेप्रमाणेच एकजूट करून त्यांचा प्रतिकार खात्रीने केला असता, परंतु इंग्रजांनी हिंदी लोकांची ही गोम ओळखली असल्यामुळे कोणालाही न दुखविता एकेकाच्या तोंडावर एकेक तुकडा फेकीत त्यांनी सर्व देश पादाक्रांत केला आणि ही त्यांची राजनीती अद्यापही जागृत आहेच. बाजीराव शरण आल्यास त्यास कसे वागवावयाचे हे देखील मालकम साहेबाने याच धोरणावर ठरवून ठेवले होते. बाजीरावावर एकदम स्वारी करून त्यास पकडणे व ठार करणे त्यास अशक्य नव्हते, परंतु तसे केले असता अवरंगजेबाने संभाजीच्या बाबतीत जी चुकी केली तिचीच पुनरावृत्ती झाली असती. पण मालकम पडला पक्का धोरणी ! आपल्या वरिष्ठांस लिहिलेल्या एका खलित्यात तो असे लिहितो की, 'महाराष्ट्रातील सर्व दर्जाच्या सर्व वर्गांच्या लोकांचा स्वभाव मला पुरता माहीत झाला आहे. त्यावरून मी सांगतो की, देशांत शांतता प्रस्थापित होण्याला व ब्रिटिशांची धवलकीर्ती पसरण्याला बाजीरावाने शरण यावे व आपखुषीने राज्याधिकार सोडावा हेच इष्ट आहे. तो जर ठार मारला गेला तर त्याच्याविषयी मराठे लोकात अनुकंपा उद्भवेल आणि दुसरा कोणीतरी महत्त्वाकांक्षी वारस पुढे होऊन सर्व मराठे आपल्या

निशाणाखाली एकत्र करील. बरे त्याला पकडून कैदेत टाकावा तर त्याला सोडविण्याचे यत्न होतील व कदाचित तो कैदेतून निसटला तर फिरून आमच्या विरुद्ध निशाण उभारील यास्तव उत्तम मार्ग म्हणजे त्याने आपण होऊन आमच्याकडे यावे, आपल्या सैन्यास रजा द्यावी, आपल्या राज्याची सोडचिठ्ठी लिहून द्यावी आणि खुशाल आनंदात पेन्शन खात रहावे. म्हणजे त्याचा सर्व लोकांचे मनावर वेगळाच परिणाम होईल आणि ज्या राज्याचे त्याने आपखुषीने दान केले ते राज्य त्याला परत मिळवून देण्याचा कोणीही प्रयत्न करणार नाही.' या लेखावरून मालकम साहेबाचे काय धोरण होते हे उघड दिसते व या हेतूप्रमाणे बाजीरावाला राजीखुषीने राज्य सोडावयास लावण्यासाठी त्याने कडेकोट बंदोबस्त केला होता!

अस्तु. मराठेशाहीतील अंतर्गत दोष आणि हिंदी लोकांच्या स्वभावातील नैसर्गिक वैगुण्य ह्यांच्या समुच्चयाने मराठेशाहीचा लोप झाला हे तर खरेच, परंतु त्याला बाह्य जगातील घडामोडीही कारणीभूत झाल्या. फ्रेंच व इंग्रज यांच्यामध्ये अठराव्या शतकाच्या प्रारंभापासून युरोपखंडात जो झगडा चालला होता त्याचे प्रतिबिंब हिंदुस्थानातील कारस्थानावर पडल्याखेरीज रहात नसे. सप्तवार्षिक युद्धातील फ्रेंचांच्या पराजयामुळे इंग्लिशांना मद्रास इलाख्यात धुमाकूळ घालण्यास आणि हैदर व टिपू यांस तंबी देण्यास मुभा मिळाली. पुढे इजिप्त व आशिया–मायनरमध्ये नेपोलिअनचा पराभव होऊन तो निराश होऊन परत फ्रान्सला गेल्याने टिपूचे मरण जवळ ओढवले आणि टिपूची इंग्रजांच्या उरावरील कट्यार नाहीशी झाल्याने वेलस्ली साहेबाला बाजीरावास पाठीशी घालून त्याच्याकडून वसईच्या तहावर सही घेऊन शिंदे व होळकर यांची नांगी मोडता आली. त्यानंतर १८०५ पासून १८१५ पर्यंत युरोपात नेपोलिअनने धुमाकूळ माजविल्यामुळे इंग्रजांनी हिंदुस्थानात बिलकूल हालचाल केली नाही. पण वॉटर्लूच्या लढाईत नेपोलिअनचा नक्षा उतरताच हिंदुस्थानातही इंग्रजांची कमान वर चढू लागली आणि ज्या मालकम साहेबाने नुकतेच वॉटर्लूचे रणांगण व नेपोलिअनचा राज्यत्याग पाहिला होता तोच मालकम हिंदुस्थानात येताच त्यालाही बाजीरावाच्या राजीनाम्याची सुखस्वप्ने पडू लागली आणि त्याने बाजीरावाची सातारा मुक्कामी भेट घेऊन 'तुजवर जर काही कठीण प्रसंग आला तर मजकडे ये, मी तुझ्या दुःखाचा परिहार करीन' असे मधाचे बोट आगाऊ लावून ठेविले आणि त्याच मधाच्या बोटाने बाजीराव नर्मदातीराकडे आकर्षिला गेला व अखेर जाळ्यात सापडला. 'विनाशकाले विपरीत बुद्धिः' या म्हणीप्रमाणे नेपोलिअनचीदेखील जेथे बुद्धी चकली व तो नेमका इंग्लिश गलबतावर जाऊन दाखल झाला तेथे बाजीरावालाच काही दोष देण्याचे कारण नाही. 'येन केन प्रकारेण' का होईना परंतु ता. ३ जून १८१८ रोजी बाजीरावाने मराठेशाहीला तिलांजली दिली आणि महाराष्ट्रावर कंपनी सरकारचा अंमल सुरू झाला. शंभर वर्षांनंतर या गतकालीन राजकीय डावपेचाकडे पाहिले असता कोणते विचार व

विकार मनात उद्भवतात ते सांगण्याचे प्रयोजन नाही. तथापि या शतवार्षिक कालावधीत महाराष्ट्राची स्थिती नेमकी काय झाली आणि तिचे पर्यवसान काय होणार याचे किंचित् दिग्दर्शन करून हा लांबवलेला लेख आटोपता घेऊ.

परकीय राजसत्तेला हिंदी लोकांनी इतर राष्ट्रातल्याप्रमाणे निकराने विरोध केला नाही यावरून हिंदी लोकांत राष्ट्राभिमान नाही असे अनुमान कित्येक इतिहासकार काढितात. पण वस्तुस्थिती तशी नाही. हिंदी लोकांना धर्माचा, संस्कृतीचा आचारविचाराचा फार तर काय आपल्या पोषाखाचा देखील अभिमान आहे. मग राष्ट्राभिमान नसेल हे संभवते तरी कसे? तर मग आपला राज्यकारभार ते बिनदिक्कत दुसऱ्याच्या हवाली करितात याचा अर्थ काय? तर याची उपपत्ती अशी आहे की, हल्लीची पाश्चात्य राष्ट्रांची राजसत्ता जशी सर्वव्यापी आहे तशी त्यांची राजसत्तेची कल्पना नव्हती. राजाने उत्पन्नाचा १।६ कर घ्यावा आणि अंतर्बाह्य शत्रूंचा बंदोबस्त करावा एवढेच त्याचे काम. राजसत्तेत व्यापारी सत्ता, धर्माधिकार, शिक्षणावर देखरेख अशा अनंत गोष्टींचा समावेश होतो अशी त्यांची कल्पना नव्हती. पण प्रत्यक्ष अनुभव तसा येऊ लागल्यापासून राजसत्तेत आपले अंग असणे जरूर आहे असेच हिंदी लोकांस वाटू लागले आहे. हातचे स्वराज्य गमावताना महाराष्ट्रीयांच्या मनात इंग्रजांविषयी जी आदरबुद्धी होती ती आज राहिली नाही. यातले मर्म तरी हेच होय. स्वराज्यहानीबरोबर धार्मिक, नैतिक, बौद्धिक, शारीरिक, आर्थिक, सर्वच प्रकारची जर हानी होऊ लागली तर शांततामय सुराज्यापेक्षा सदोष दंगाधोप्याचेच का होईना पण स्वराज्य बरे असे कोणास वाटणार नाही? मराठेशाहीत इतर कितीही दोष असले तरी त्या वेळी महाराष्ट्रात संपती, पौरुष, गुण, नशीब काढण्यास वाव व साधने आणि आत्मविश्वास व इभ्रत ही सर्वच निःसंशय उत्कटत्वाने वास करीत होती. त्यांच्या जागी आज लुलेपांगळेपणा भरला आहे.

सर्वंकश अशा परकीय सत्तेचा वरवंटा महाराष्ट्रावर शंभर वर्षे फिरल्याने आमची राष्ट्रीयदृष्टचा व वैयक्तिकदृष्टचा किती घोर हानी झाली ते आमचे आम्ही जाणतो. तथापि 'इमे दोषाः स्वयंकृताः' अशी स्थिती असल्यामुळे आमच्या वैयक्तिक अवनतीच्या दृष्टीने सरकारास सवाल करीत नाही, परंतु ब्रिटिश सरकारास त्यांच्याच हिताच्या दृष्टीने आम्ही अशी पृच्छा करितो की, महाराज आपण जे बाजीरावाच्या हातून मराठी राज्याचे उदक आपल्या हातावर घेतले ते काही त्यापासून मोक्षप्राप्ती मिळणार होती म्हणून खास नव्हे. त्यापासून आपल्या साम्राज्यास काही प्रत्यक्ष लाभ व्हावा म्हणूनच हा उपाध्येपणा आपण पत्करला. परंतु शंभर वर्षांच्या कालावधीनंतर महाराष्ट्रापासून आपल्या साम्राज्यास कितीसा उपयोग होत आहे? नुसत्या महाराष्ट्रात पेशव्यांचा व त्यांच्या सरदारांचा मिळून

६०–७० हजार पर्यंत घोडा नांदत असे आणि पेशवे स्वारीवर निघतानाच नालबंदी घेऊन स्वारीत येण्यास लाखो लोक तयार असत. त्यावरून महाराष्ट्रात शिपाईगिरी किती भरपूर नांदत होती हे दिसून येते आणि आजची स्थिती काय आहे ? शेतकी व व्यापारी दृष्टीने पाहिले तरी तीच रडकथा ! आज महायुद्धामुळे देशाचा माल व परमुलुखातला माल येईनासा होताच पोटाला चिमटा घेण्याची व रस्त्यातून अंधारातून हिंडण्याची पाळी आली आहे. शंभर वर्षांत सुताच्या व कापडाच्या गिरण्यांखेरीज इतर कोणते मोठे कारखाने निघून साम्राज्याच्या संपतीत भर पडली ? शेतीचे उत्पन्न शंभर वर्षांत किती पटीने अधिक वाढले ? नाही म्हणावयाला अबकारी उत्पन्न मात्र पेशव्यांच्या वेळी अवघे ५० रुपये होते ते आज अडीच कोटी रु. झाले आहे. महाराष्ट्रातील बुद्धिमत्तेचा आज आपण कितीसा उपयोग करून घेत आहा ? असे अनेक प्रश्न आपल्या डोळ्यांपुढे उभे रहात नाहीत काय ? शंभर वर्षांपूर्वी हिंदुस्थानात आपली सत्ता स्थापित झाली नव्हती तरी नेपोलिअनशी टक्कर मारण्याला हिंदुस्थानचे सहाय्य थोडे बहुत तरी झाले. त्या वेळच्या मानाने पाहता आज किती तरी पटीने अधिक मुलुख आपल्या हाती आहे. पण तितक्या पटीने सहाय्य होत आहे काय ? नेपोलिअनच्या महत्त्वाकांक्षेपेक्षा कायसरची महत्त्वाकांक्षा शेकडो पटीने अधिक भितीप्रद नाही काय ? आणि या भीतीचे निर्मूलन करावयाचे असल्यास हिंदुस्थानास सामर्थ्यवान बनवावयास नको काय ? आपल्या गेल्या शंभर वर्षांच्या राज्यपद्धतीने या देशाचे सामर्थ्य – नुसते लष्करीच नव्हे तर आर्थिक, बौद्धिक सामर्थ्य – वाढत जाईल अशी साक्ष आपली मनोदेवता आपणास देत आहे काय ? शंभर वर्षांचा आढावा आपणास काय सांगत आहे बरे ? या गोष्टीकडे असेच आणखी दुर्लक्ष करून या पुढे चालावयाचे नाही असे युरोपचे रणकंदन आर्तस्वराने सांगत आहे. अर्थातच पूर्वीची राज्यपद्धती – एकमुखी अनियंत्रित राज्यपद्धती – बदलून जेणेकरून हिंदी लोकांच्या अंगी स्वाभिमान व तेज जागृत होईल अशी स्वराज्यपद्धती येथे सुरू करणे अपरिहार्य झाले नाही काय ? आणि असे स्वराज्य जर येथील लोकांस देणे प्राप्त आहे, तर ते देण्याला महाराष्ट्रीयांच्या स्वराज्याचे दानोदक घेतल्याच्या शतसांवत्सरिक पर्वणीपेक्षा अधिक उचित पर्वणी दुसरी कोणती असणार ?

* *

परिशिष्ट सतरावे

कौटुंबिक कालपट

संपूर्ण पेशवाईच्या कालखंडांचा कौटुंबिक, राजकीय, सामाजिक, सर्व नोंदीं सह विस्तृत कालपट तयार केल्यास मध्यम आकाराचे स्वतंत्र पुस्तक तयार होईल. प्रस्तुत ग्रंथाचे स्वरूप लक्षात घेऊन येथे कौटुंबिक नोंदींवर भर दिला आहे.

×-×-१५७५	महादाजीपंत भट, श्रीवर्धन-हरिहरेश्वर गावांचे देशमुख होते.
×-×-१६६०	(सुमारे) बाळाजी विश्वनाथ भट यांचा श्रीवर्धनला जन्म.
१६९९-१७०३	बाळाजी विश्वनाथ भट पुणे परगण्याचे सरसुभेदार.
१८-८-१७००	बाजीराव बल्लाळ (पेशवे) यांचा जन्म.
१७०३-१७०७	बाळाजी विश्वनाथ भट दौलताबाद परगण्याचे सरसुभेदार.
×-×-१७०६	(सुमारे) थोरले चिमाजीआप्पा बल्लाळ पेशवे यांचा जन्म.
×-×-१७०८	बाळाजी विश्वनाथ भट, आमात्यांचे मुतालिक होते.
×-×-१७०८	थोरल्या बाजीरावांची बहीण भिऊबाई यांचा जन्म.
×-×-१७१०	(सुमारे) रखमाबाई भ्र. थो. चिमाजीआप्पा यांचा जन्म.
×-×-१७११	थोरले बाजीराव – काशीबाई विवाह (चासकर जोशी).
२०-८-१७११	बाळाजी विश्वनाथ भट, छत्रपति शाहू महाराजांचे 'सेनाकर्ते' झाले.
×-×-१७१२	भिऊबाई बल्लाळ पेशवे (कन्या) यांचा विवाह (बारामतीकर जोशी).
१७-११-१७१३	बाळाजी विश्वनाथ भट, छत्रपति शाहू महाराजांचे 'पेशवा' झाले.
×-×-१७१४	अनुबाई बल्लाळ पेशवे (कन्या) यांचा जन्म.
×-×-१७१६	थोरले चिमाजीआप्पा – रखमाबाई विवाह (पेठे).
६-१०-१७१८	थोरले बाजीरावांना छत्रपति शाहू महाराजांकडून सरदारी आणि थोरले चिमाजीआप्पांना मुतालिकी मिळाली.
३-३-१७१९	बाळाजी विश्वनाथ पेशव्यांना दिल्लीपतीकडून चौथाईची सनद.
१५-३-१७१९	बाळाजी विश्वनाथ पेशव्यांना दिल्लीपतीकडून सरदेशमुखींची सनद.

२४...

२३-५-१७१९	बाळाजी विश्वनाथ सासवडला स्थायिक झाले.
×-×-१७१९	अनुबाई बल्लाळ पेशवे (कन्या) यांचा विवाह (घोरपडे जोशी).
२-४-१७२०	बाळाजी विश्वनाथ यांचे सासवडला निधन.
१७-४-१७२०	थोरले बाजीराव ' पेशवा ' झाले.
२५-३-१७२१	थोरले बाजीराव सासवडहून पुण्याला स्थायिक झाले.
१६-१२-१७२१	थोरले नानासाहेब (बाळाजी बाजीराव) यांचा साते गावी जन्म.
×-×-१७२३	हरिहरेश्वरच्या श्रीकालभैरव मंदिराचा थोरले बाजीरावांकडून जिर्णोद्धार.
×-×-१७२५	गोपिकाबाई भ्र. बाळाजी बाजीराव यांचा जन्म.
३१-३-१७२६	थोरले बाजीरावांना शाहू महाराजांकडून पुणे गाव वंशपरंपरेने इनाम.
११-१-१७२८	थोरले नानासाहेब यांची मुंज.
×-११-१७२८	थोरल्या राधाबाई (भ्र. बाळाजी विश्वनाथ) यांची पंढरपूर, तुळजापूर यात्रा.
×-५-१७२९	(सुमारे) थोरले बाजीराव-मस्तानी यांची बुंदेल खंडात प्रथम मुलाखत (आख्यायिका).
×-१-१७३०	मस्तानी दक्षिणेत प्रथम दाखल. (थोरले नानासाहेब विवाह प्रसंग).
१०-१-१७३०	पुण्यात शनिवारवाडा बांधायला सुरुवात.
११-१-१७३०	थोरले नानासाहेब - गोपिकाबाई विवाह (गोखले-रास्ते).
४-८-१७३०	भाऊसाहेब (सदाशिव चिमाजी) यांचा जन्म.
१४-८-१७३०	भाऊसाहेब (सदाशिव चिमाजी) यांचे बारसे.
३१-८-१७३०	रखमाबाई भ्र. थोरले चिमाजीआप्पा यांचा मृत्यू.
९-१२-१७३१	थोरले चिमाजीआप्पा - अन्नपूर्णाबाई विवाह (थत्ते).
२२-१-१७३२	रथसप्तमीला पुण्यात शनिवारवाड्याची वास्तुशांत.
×-×-१७३२	रामचंद्र बाजीराव पेशवे यांचा जन्म.
×-×-१७३३	रामचंद्र बाजीराव पेशवे यांचा मृत्यू.
३-३-१७३३	थोरले बाजीरावांच्या तिसऱ्या मुलाचा जन्म. नाव अज्ञात.
२८-१-१७३४	मस्तानी पुत्र थोरले समशेर बहाद्दर यांचा पुण्यात जन्म. (अंदाजे)
१-८-१७३४	रघुनाथराव बाजीराव यांचा जन्म.
१४-२-१७३५	गं. भा. थोरल्या राधाबाई यांचे काशीयात्रेला प्रस्थान.
१०-७-१७३५	जनार्दन बाजीराव यांचा जन्म.

१९-१२-१७३५	जनार्दन बाजीराव यांचे उष्टावण.
१२-२-१७३६	भाऊसाहेब पेशवे यांची मुंज.
२४-५-१७३६	गं. भा. थोरल्या राधाबाई काशीयात्रेहून पुण्यात परतल्या.
१-६-१७३६	थोरल्या राधाबाईंच्या काशीयात्रेचे मावंदे पार पडले.
×-११-१७३९	पुण्यात राहत्या वाड्यात मस्तानी कैद.
२४-११-१७३९	पहाऱ्यातून निसटून मस्तानी पाटसला थोरले बाजीरावांकडे गेली.
×-१-१७४०	गोपिकाबाई भ्र. बाळाजी बाजीराव यांचे गर्भादान.
२६-१-१७४०	थोरले चिमाजीआप्पांच्या सूचनेवरून थोरले नानासाहेबांनी मस्तानीला पर्वतीच्या बागेत कैद केले.
४-२-१७४०	रघुनाथ बाजीराव यांची मुंज.
७-२-१७४०	थोरले भाऊसाहेब – उमाबाई विवाह (भानू फडणीस).
२६-३-१७४०	जनार्दन बाजीराव यांची मुंज.
३०-३-१७४०	नासिरजंगच्या मोहिमेनंतर खर्गोण--हंडिया प्रांताच्या व्यवस्थेसाठी तिकडे थोरले बाजीराव रवाना.
२८-४-१७४०	थोरले बाजीराव यांचा रावेरखेडी येथे मृत्यू.
×-५-१७४०	थोरले बाजीरावांचे मृत्यूनंतर मस्तानीचा मृत्यू (अंदाजे) आत्महत्येचा संभव.
३-६-१७४०	थोरले बाजीराव वारल्यानंतर, पत्नी गं. भा. काशीबाई पुत्र जनार्दनपंत यांचेसह फौजेबरोबर पुण्याला परतल्या.
२५-६-१७४०	थोरले नानासाहेब 'पेशवा' झाले.
×-९-१७४०	बयाबाई चिमाजी पेशवे (कन्या) यांचा जन्म.
३१-१०-१७४०	थोरले चिमाजीआप्पा प्रकृती अस्वास्थामुळे मोहीम सोडून पुण्याला परतले.
१७-१२-१७४०	थोरले चिमाजीआप्पा यांचा पुण्यात मृत्यू. पत्नी अन्नपूर्णाबाई सती गेल्या.
२५-२-१७४२	रघुनाथराव – जानकीबाई विवाह (बर्वे)
२२-७-१७४२	विश्वासराव बल्लाळ यांचा जन्म.
२०-१२-१७४२	भाऊसाहेब, रघुनाथराव, जनार्दनपंत हे गंगास्नानासाठी नाशिकला.
२८-५-१७४३	काशीबाई पेशवे रामेश्वर यात्रेहून पुण्याला परतल्या.
४-७-१७४३	पेशव्यांना सवाई जयसिंगामार्फत पातशाहाकडून माळव्याची सनद.
×-३-१७४४	थोरले नानासाहेबांचे 'पेशवा' पद शाहूमहाराजांनी काढून घेतले.

१३-४-१७४४	थोरले नानासाहेबांना 'पेशवा' पद परत मिळाले.
२०-४-१७४४	जनार्दनपंत पेशवे- सगुणाबाई विवाह (भिडे)
१६-२-१७४५	थोरले माधवराव बल्लाळ यांचा सावनूरला जन्म.
२४-४-१७४५	बयाबाई चिमाजी पेशवे (कन्या) यांचा विवाह (ओंकार)
१६-२-१७४६	काशीबाई पेशवे यांचे काशीयात्रेला प्रस्थान.
२२-११-१७४६	कृष्णराव सदाशिव यांचा जन्म.
७-६-१७४७	भिऊबाई पेशवे (कन्या- बारामतीकर जोशी) यांचा मृत्यू.
३०-६-१७४७	कृष्णराव सदाशिव यांचे बारसे.
×-९-१७४७	आनंदीबाई भ्र. रघुनाथराव बाजीराव यांचा जन्म.
×-×-१७४८	थोरले रमाबाई भ्र. माधवराव बल्लाळ यांचा जन्म. (सुमारे)
९-७-१७४८	भाऊसाहेब पेशव्यांच्या दुसऱ्या मुलाचा जन्म, नाव अज्ञात.
१३-८-१७४८	यशवंत बल्लाळ यांचा जन्म.
३०-८-१७४८	अंगारकी चतुर्थीनिमित्त थोरले नानासाहेबांची थेऊरला सुवर्ण-तुला.
१४-१-१७४९	थोरले समशेर बहाद्दर - लालकुँवर यांचा विवाहनिश्चय.
९-३-१७४९	विश्वासराव बल्लाळ यांची मुंज.
×-४-१७४९	थोरले समशेर बहाद्दर - लालकुँवर यांचा विवाह.
२१-९-१७४९	जनार्दन बाजीराव यांचा सातारा येथे मृत्यू.
१५-१२-१७४९	छत्रपति थोरले शाहू महाराजांचे निधन.
४-१-१७५०	थो. नानासाहेबांनी रामराजाला 'सातारा गादीवर' बसवले
२२-३-१७५०	उमाबाई भ्र. भाऊसाहेब यांचा मृत्यू.
२६-४-१७५०	भाऊसाहेब - पार्वतीबाई विवाह (कोल्हटकर)
२-५-१७५०	विश्वासराव बल्लाळ - लक्ष्मीबाई विवाह (दीक्षित पटवर्धन)
×-८-१७५०	श्रीवर्धनच्या पिढीजात देशमुखी वाड्याचा थोरल्या नानासाहेबांकडून जिर्णोद्धार.
५-९-१७५०	मोरेश्वर बल्लाळ यांचा जन्म.
१५-१०-१७५०	जानकीबाई भ्र. रघुनाथ बाजीराव यांचे गर्भादान.
५-११-१७५०	कै. जनार्दनपंत बाजीराव : अस्थी गंगार्पणासाठी रवाना.
२२-३-१७५१	मोरेश्वर बल्लाळ यांचा मृत्यू,
१५-७-१७५१	थोरले राधाबाई पेशव्यांची रौप्यतुला.
२६-७-१७५१	यशवंत बल्लाळ यांचा मृत्यू.
२३-९-१७५१	बयाबाई चिमाजी पेशवे (कन्या- ओंकार) यांचे गर्भादान.
१४-२-१७५२	थोरले माधवराव बल्लाळ यांची मुंज.
१९-४-१७५३	थोरल्या राधाबाई भ्र. बाळाजी विश्वनाथ यांचा मृत्यू.

१८–१०–१७५३	थोरले समशेर बहादूर – मेहेरबाई विवाह.
९–१२–१७५३	थोरले माधवराव बल्लाळ – रमाबाई विवाह (जोशी).
२६–६–१७५४	थोरले नानासाहेबांची सुवर्णतुला.
११–८–१७५५	नारायणराव बल्लाळ यांचा जन्म.
×–८–१७५५	रघुनाथराव बाजीरावांच्या पहिल्या मुलाचा जन्म. नाव अज्ञात.
२२–८–१७५५	जानकीबाई भ्र. रघुनाथराव यांचा मृत्यू.
१७–१२–१७५५	रघुनाथराव– आनंदीबाई विवाह (ओक)
×–४–१७५८	लक्ष्मीबाई भ्र. विश्वासराव बल्लाळ यांचे गर्भादान.
२८–१०–१७५८	पुण्यात गारपीरावर छावणीत भाऊसाहेब पेशव्यांवर असफल खुनी हल्ला.
×–×–१७५८	थोरले अलीबहादूर यांचा जन्म. (मस्तानीचे नातू)
×–×–१७५९	लालकुँवर सौ. थोरले समशेरबहादूर यांचा मृत्यू.
१८–४–१७५९	बयाबाई चिमाजी पेशवे (कन्या– ओंकार) यांचा मृत्यू.
१–१०–१७५९	थोरले समशेरबहादूर यांना साहेबनौबतीचा मान मिळाला.
७–३–१७६०	पानिपत मोहिमेबद्दल पटदूर येथे वाटाघाटी सुरू.
१४–३–१७६०	पटदूरहून पानिपत मोहिमेसाठी मराठी फौज रवाना.
×–३–१७६०	थोरले नानासाहेबांची तुला, पैठणला झाली.
२७–१२–१७६०	थोरले नानासाहेब– राधाबाई विवाह (वाखरे)
१४–१–१७६१	भाऊसाहेब, विश्वासराव, पानिपत युद्धात मारले गेले. थोरले समशेरबहादूर गंभीर जखमी होऊन १–२ दिवसांनी मृत्यू पावले.
२४–१–१७६१	थोरले नानासाहेब परिवार व सैन्यासह भेलसा येथे पोहोचले. पानिपतची पहिली बातमी येथेच समजली.
२२–३–१७६१	थोरले नानासाहेब दक्षिणेत परतण्यासाठी पाठोराहून निघाले.
११–४–१७६१	ओंकार-मांधाता येथे थोरले नानासाहेबांची सुवर्णतुला झाली.
६–६–१७६१	पानिपतच्या प्रवासाहून थोरले नानासाहेब पुण्यात पोहोचले.
१२–६–१७६१	पर्वतीवर आजारी म्हणून थोरले नानासाहेब शनिवाड्यात परतले.
२२–६–१७६१	थोरले नानासाहेब पुन्हा पर्वतीवर वास्तव्यासाठी गेले.
२३–६–१७६१	थोरले नानासाहेबांचा पर्वतीवरील वाड्यात होमशाळेत मृत्यू.
२४–६–१७६१	थोरले माधवरावांकडून नानासाहेबांचे दहन लकडी पुलाजवळ झाले. (पुणे)
२०–७–१७६१	थोरले माधवराव बल्लाळ 'पेशवा' झाले.
२६–२–१७६२	भास्कर रघुनाथ यांचा जन्म.

२८-५-१७६२	नारायणराव बल्लाळ यांची मुंज.
१४-२-१७६३	लक्ष्मीबाई भ्र. विश्वासराव बल्लाळ यांचा पुण्यात मृत्यू.
६-३-१७६३	रघुनाथराव पेशव्यांवर अयशस्वी खुनी हल्ला. भास्कर रघुनाथ याचा त्र्यंबकेश्वरला मृत्यू.
२२-४-१७६३	नारायणराव बल्लाळ – गंगाबाई विवाह (साठे).
१८-९-१७६३	निजामी हल्ल्याने उध्वस्त झालेल्या पुण्याच्या पुर्नरचनेला प्रारंभ.
×-३-१७६४	गोपिकाबाई पेशवे पुणे सोडुन कायम वास्तव्यासाठी गंगापूरला रवाना.
१५-८-१७६४	विनायक रघुनाथ यांचा जन्म.
३-७-१७६५	रमाबाई भ्र. माधवराव बल्लाळ यांचे गर्भादान.
११-१२-१७६५	दुर्गाबाई रघुनाथ पेशवे (कन्या) यांचा जन्म.
१९-४-१७६८	रघुनाथरावांनी भुस्कुटे घराण्यातला मुलगा दत्तक घेतला. हेच अमृतराव पेशवे.
१७-७-१७६९	गंगाबाई भ्र. नारायणराव बल्लाळ यांचे गर्भादान.
१०-१०-१७६९	रघुनाथराव पेशव्यांच्या दुसऱ्या मुलीचा जन्म नाव अज्ञात.
७-११-१७६९	पर्वतीहून देवदर्शनाहून परतताना संध्याकाळी थोरले माधवरावांवर असफल खुनी हल्ला.
२५-५-१७७०	हैदर स्वारीहून परतताना कृष्णा-घटप्रभा संगमावर कप्पाडी गावाजवळ थोरले माधवरावांची सुवर्ण तुला झाली.
×-८-१७७०	थोरले माधवरावांनी धाकटे बंधू नारायणरावांना दिवाणगिरीची वस्त्रे दिली.
×-६-१७७१	राधाबाई भ्र. थोरले नानासाहेब (वाखरे) यांची रौप्यतुला झाली.
१३-७-१७७१	थोरले माधवरावांची कटोरे मुक्कामी सुवर्णतुला झाली.
२८-८-१७७१	थोरले माधवरावांनी बंधू नारायणरावांना कटोरे मुक्कामी मोलाचा व्यावहारीक उपदेश केला.
२३-१०-१७७१	चंद्रग्रहणाचे मुहूर्तावर थोरले माधवरावांची कचेश्वर येथें सुवर्णतुला झाली.
९-११-१७७१	राधाबाई भ्र. थोरले नानासाहेब यांचा मृत्यू (वाखरे).
२६-१२-१७७१	थोरले माधवरावांनी हरीपंत फडक्यांना, श्रीवर्धन देशमुखीपैकी स्वतःचा हिस्सा निष्ठेबद्दल इनाम दिला.
५-३-१७७२	थोरले माधवराव थेऊरला ' चिंतामणी'जवळ येऊन राहिले.
२७-३-१७७२	थोरले माधवराव थेऊरहून पुण्याला परतले.
×-५-१७७२	अमृतराव रघुनाथराव-सावित्रीबाई विवाह (बिवलकर).

३०-९-१७७२	थोरले माधवरावांनी प्रख्यात ' ९ कलमी यादी ' ठरवली.
२८-१०-१७७२	थोरले माधवराव पुण्याहून थेऊरला आले.
२९-१०-१७७२	रमाबाई भ्र. थोरले माधवराव यांनी थेऊरहून पुण्याला सतीची वस्त्रे आणण्यासाठी स्वार पाठवला.
१-११-१७७२	थोरले माधवरावांनी सौ. रमाबाईंना सतीबद्दल बोध केला. स्वतः खाशा वाड्यातून ' चितामणी ' मंदिराच्या ओवरीत वास्तव्यासाठी आले.
७-११-१७७२	थोरले माधवराव दर्भाचा सोवळा बिछाना करून राहिले.
१८-११-१७७२	थोरले माधवराव यांचा थेऊरला मृत्यू. पत्नी रमाबाई सती गेल्या.
१३-१२-१७७२	नारायणराव बल्लाळ ' पेशवा ' झाले.
७-२-१७७३	दुर्गाबाई रघुनाथ (कन्या) यांचा विवाह (बारामतीकर जोशी).
३०-८-१७७३	नारायणराव बल्लाळ यांची शनिवारवाड्यात हत्त्या.
१०-१०-१७७३	रघुनाथराव बाजीराव ' पेशवा ' झाले.
३१-१०-१७७३	रघुनाथरावांनी अळेगावला पेशवाईची वस्त्रे धारण केली.
३०-१-१७७४	गंगाबाई भ्र. नारायणराव बल्लाळ पुण्याहून सुरक्षिततेसाठी पुरंदरला पोहोचल्या. तेथून ' पेशवाई 'ची घोषणा.
२८-८-१७७४	रघुनाथरावांचे ' पेशवा'पद छत्रपति रामराजांनी रद्द केले.
१८-४-१७७४	(सवाई) माधवराव यांचा पुरंदर किल्ल्यावर जन्म.
२९-४-१७७४	(सवाई) माधवराव पेशव्यांचे बारसे.
२८-५-१७७४	(सवाई) माधवराव ' पेशवा ' झाले.
१०-१-१७७५	बाजीराव रघुनाथ यांचा धार येथे जन्म.
२९-३-१७७५	श्रीवर्धनच्या लक्ष्मीनारायण मंदिराचा जिर्णोद्धार.
×-४-१७७७	(सवाई) माधवरावांचे जावळ (चौल) झाले.
१२-७-१७७७	गंगाबाई भ्र. नारायणराव बल्लाळ यांचा पुरंदरावर मृत्यू.
२८-७-१७७८	थोरले नारायणरावांच्या हत्येनंतरचा मोठा गणेशोत्सव साजरा.
×-७-१७७८	सावित्रीबाई भ्र. अमृतराव पेशवे यांचा मृत्यू (बिवलकर).
×-×-१७७९	रघुनाथराव बाजीराव – मथुराबाई विवाह (पेंडसे).
×-२-१७७९	अमृतराव – सावित्रीबाई विवाह (मोडक).
२१-४-१७७९	सवाई माधवरावांची पर्वतीवर मुंज झाली.
२६-४-१७७९	सवाई माधवरावांनी मुंजीनंतर शनिवारवाड्यात सुमुहूर्तावर प्रवेश केला.
५-६-१७८०.	मथुराबाई भ्र. रघुनाथराव यांचा सुरतेला मृत्यू.
१०-२-१७८३	सवाई माधवराव – रमाबाई विवाह (थत्ते).

×-७-१७८३	रघुनाथराव – आनंदीबाई यांची कोपरगावला नजरकैदेत रवानगी.
४-८-१७८३	थोरले नारायणरावांच्या हत्येबद्दल रघुनाथरावांनी प्रायश्चित घेतले.
१६-८-१७८३	पार्वतीबाई भ्र. भाऊसाहेब पेशवे यांचा मृत्यू.
११-१२-१७८३	रघुनाथराव पेशव्यांचा कोपरगाव – कचेश्वरला मृत्यू.
३०-१२-१७८३	अनुबाई बल्लाळ पेशवे (कन्या-घोरपडे) यांचा मृत्यू.
३०-३-१७८४	चिमणाजी रघुनाथ यांचा कोपरगावला जन्म.
७-११-१७८४	सवाई माधवराव व गोपिकाबाई यांची गंगापूर येथे पहिली मुलाखत.
×-×-१७८५	दुसरे समशेर बहाद्दर यांचा जन्म.
१६-७-१७८६	बाजीराव रघुनाथ – भागिरथीबाई विवाह (भागवत).
१९-७-१७८६	सौ. भागिरथीबाई पेशवे विवाहानंतर सासरी दाखल.
×-३-१७८८	सवाई माधवराव आणि गोपिकाबाई यांची गंगापूर येथे दुसरी मुलाखत.
×-×-१७८८	थोरले अलीबहाद्दर यांनी बांदा येथे स्वतंत्र संस्थान स्थापन केले.
३-८-१७८८	गोपिकाबाई भ्र. थोरले नानासाहेब यांचा नाशिकजवळ पंचवटी येथे मृत्यू.
×-३-१७८९	चिमणाजी रघुनाथ यांची कोपरगाव येथे मुंज.
२१-१०-१७८९	रमाबाई भ्र. सवाई माधवराव यांचे गर्भादान.
२-२-१७९०	दुसरे समशेरबहाद्दर यांचा बिस्मिल्ला.
२१-२-१७९१	दुसरे समशेरबहाद्दर यांची सुंता पुण्यात झाली.
×-४-१७९१	सवाई माधवरावांच्या कन्येचा जन्म. नाव अज्ञात.
७-६-१७९१	शनिवारवाड्याला पहिली मोठी आग लागली.
२२-६-१७९२	महादाजी शिंद्यांनी, सवाई माधवरावांना ‘वकील-ई-मुतालिक’ व ‘मीरबक्षी’च्या सनदा पुण्यात अर्पण केल्या.
×-×-१७९२	विनायकराव अमृतराव यांचा जन्म.
३१-१-१७९३	रमाबाई भ्र. सवाई माधवराव यांचा पुण्यात मृत्यू.
६-३-१७९३	सवाई माधवराव – यशोदाबाई विवाह. (गोखले)
×-×-१७९३	भागिरथीबाई भ्र. बाजीराव रघुनाथ यांचा मृत्यू.
१८-६-१७९३	बाजीराव रघुनाथ – सरस्वतीबाई विवाह (मंडलीक).
×-×-१७९३	श्रीवर्धनच्या कालभैरव मंदिराचा पेशव्यांकडून जिर्णोद्धार.
२७-३-१७९४	आनंदीबाई भ्र. रघुनाथराव यांचा मृत्यू.

२५-१०-१७९५ सवाई माधवराव सज्जातून पडून जखमी झाले.
२७-१०-१७९५ सवाई माधवराव यांचा मृत्यू.
३-३-१७९६ बाजीराव रघुनाथ आणि चिमणाजी रघुनाथ जुन्नरच्या कैदेतून परशुरामभाऊ पटवर्धनांबरोबर पुण्याला आले.
२२-३-१७९६ पुण्यात दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या कारभाराची द्वाही फिरली.
१६-५-१७९६ चिमणाजी रघुनाथ यांचे गं. भा. यशोदाबाई पेशव्यांचे मांडीवर 'चिमणाजी माधवराव' या नावाने दत्तकविधान.
२६-५-१७९६ चिमणाजी माधवराव (दत्तक) 'पेशवा' झाले.
२७-१०-१७९६ चिमणाजी माधवराव पेशवापदावरून पदभ्रष्ट.
४-१२-१७९६ बाजीराव रघुनाथ 'पेशवा' झाले.
६-१-१७९७ सरस्वतीबाई भ्र. बाजीराव रघुनाथ यांचा मृत्यू.
१६-१२-१७९७ बाजीराव रघुनाथ – राधाबाई विवाह (फडके).
×-१२-१७९७ अमृतराव, दुसऱ्या बाजीरावांचे कारभारी झाले.
२६-१२-१७९७ दुसरे समशेर बहाद्दर यांचा विवाह.
१-१०-१७९८ दौलतराव शिंद्यांमार्फत अमृतरावांना सात लाखाची जहागिरी.
७-२-१७९९ विनायकराव अमृतराव यांची मुंज.
४-३-१८०० राधाबाई भ्र. बाजीराव रघुनाथ यांचे गर्भादान.
२३-४-१८०० दुसऱ्या बाजीरावांनी अमृतरावांना 'दिवाण' नेमले.
×-×-१८०० (सुमारे) बांद्याचे नवाब झुल्फिकारअल्ली यांचा जन्म.
२२-७-१८०० अमृतरावांनी पेशव्यांचे दिवाणपद सोडले.
१६-४-१८०१ दुसरे बाजीरावांनी शनिवारवाड्यात विठोजी होळकरांना हत्तीच्या पायी दिले.
२-७-१८०१ दुसरे बाजीराव आणि अमृतरावांची कचेश्वर मुक्कामी मुलाखत.
×-८-१८०१ यशोदाबाई पेशवे कैदेत असताना त्यांचे नोकर दूर केले.
२३-८-१८०२ थोरले अलीबहाद्दर यांचा कलिंजर छावणीत मृत्यू.
१-१०-१८०२ चिमणाजी रघुनाथ पेशव्यांमार्फत थोरले अलीबहाद्दरांच्या मृत्यूचा शनिवारवाड्यात शोकसमारंभ.
२४-१०-१८०२ दुसरे बाजीराव 'पेशवा'पदावरून पदभ्रष्ट.
२५-१०-१८०२ यशवंतराव होळकरांनी पुणे उध्वस्त केले.
७-११-१८०२ अमृतराव पेशवे जुन्नरहुन पुण्याला आले.
१२-११-१८०२ अमृतरावांनी होळकरांच्या तंत्राने कारभार हातात घेतला.
२२-११-१८०२ विनायकराव अमृतराव यांचे नावे पेशवाईची वस्त्रे आणवली.
३१-१२-१८०२ दुसरे बाजीराव – इंग्रज कंपनी सरकार यांच्यात वसई मुक्कामी 'तैनाती फौजेचा तह' झाला.

१८–३–१८०३	अमृतराव रघुनाथराव–सत्यभामाबाई विवाह (फडके).
×–३–१८०३	अमृतरावांनी पुणे दरबारचा कारभार सोडला.
×–५–१८०३	सावित्रीबाई भ्र. अमृतराव यांचा मृत्यु.
१३–५–१८०३	बाजीराव रघुनाथ, इंग्रजांच्या सहाय्याने 'पेशवा' झाले.
१४–८–१८०३	अमृतरावांनी स्वतंत्रपणे इंग्रजांशी दोस्तीचा तह केला.
१८–१–१८०४	दुसरे समशेरबहाद्दर यांनी बांदा येथे इंग्रजांशी दोस्तीचा तह केला.
×–×–१८०५	(अखेर) अमृतराव पेशवे दख्खन सोडून कायमचे वाराणसीला स्थायिक झाले.
१९–५–१८०६	राधाबाई भ्र. बाजीराव रघुनाथ यांचा मृत्यु.
११–६–१८०६	बाजीराव रघुनाथ–वाराणसीबाई विवाह (फाटक-रास्ते)
२२–१२–१८०६	वाराणसीबाई पेशवे यांना 'देवी' काढवल्या.
×–१२–१८०६	चिमणाजी रघुनाथ यांची सालिना तैनात रेसिडेंटच्या मध्यस्थीने दोन लाख रु. ठरली.
११–६–१८०७	अमृतराव पेशव्यांनी वाराणसीला 'अमृत-विनायक' मंदीर बांधले.
×–×–१८०७	काशीबाई विनायक (कन्या) यांचा जन्म.
३–६–१८०८	बाजीराव रघुनाथ-वेणूबाई विवाह (ढमढेरे)
६–१–१८०९	सवाई माधवराव व रमाबाई यांच्या अस्थी गंगार्पणासाठी पाठवल्या.
२६–२–१८०९	सीताबाई भ्र. चिमणाजी रघुनाथ यांचा अपघाताने मृत्यू.
१०–१०–१८१०	वामन बाजीराव यांचा जन्म
३–११–१८१०	वामन बाजीराव यांचे बारसे.
१४–१–१८११	यशोदाबाई भ्र. सवाई माधवराव यांचे रायगडावर निधन.
२७–३–१८११	वामन बाजीराव यांचा मृत्यू.
२०–५–१८१२	चिमणाजी रघुनाथ–कावेरीबाई विवाह (जोशी)
×–×–१८१२	दुसरे बाजीरावांनी शनिवारवाड्यातील मस्तानी-महल उध्वस्त केला.
३१–१२–१८१२	बाजीराव रघुनाथ-सरस्वतीबाई विवाह (पेंडसे)
×–×–१८१५	काशीबाई विनायक (कन्या) यांचा विवाह (जोग)
२४–७–१८१६	कृष्णाबाई बाजीराव (कन्या) हिचा जन्म.
२–८–१८१६	दुसरे बाजीरावांची कन्या, जन्मानंतर लगेच वारली. नाव अज्ञात.
१०–९–१८१६	दुसरे बाजीरावांना मुलगा झाला. नाव अज्ञात.

२०-९-१८१६ दुसरे बाजीरावांचा मुलगा वारला.
१२-११-१८१६ वेणूबाई भ्र. बाजीराव रघुनाथ यांचा मृत्यू.
×-×-१८१६ (अखेर) कृष्णाबाई बाजीराव (कन्या) यांचा जन्म.
१६-११-१८१७ दुसरे बाजीरावांनी पुणे कायमचे सोडले.
१७-११-१८१७ शनिवारवाड्यावर 'युनियन जॅक' फडकले.
×-×-१८१८ अमृतरावांना उत्तरेत करवी छावणीची जागा इंग्रजांकडून मिळाली.
१०-५-१८१८ वाराणसीबाई पेशव्यांनी प्रखर प्रतिकारानंतर रायगड किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन केला.
१६-५-१८१८ दुसरे बाजीरावांनी शरणागती पूर्वी आपला वकील इंग्रजांच्या महू छावणीमध्ये पाठवला.
१-६-१८१८ जनरल मालकम यांचा दुसरे बाजीरावांना शरणागतीसाठी इशारा.
३-६-१८१८ दुसरे बाजीराव पेशवे जनरल मालकमच्या स्वाधीन. पेशवाईची इतिश्री.
१७-८-१८१८ दुसरे बाजीरावांनी इंग्रजांच्या पहाऱ्यात उत्तरेकडे कूच केले.
×-१-१८१९ राजकीय निवृत्तीनंतर चिमणाजी रघुनाथ पेशवे वाराणसीला पोहोचले.
३१-८-१८२३ दुसरे समशेरबहाद्दर यांचा बांदा येथे मृत्यू. झुल्फिकारअली बांद्याचे नवाब झाले. याच वर्षी द्वारकाबाई चिमणाजी पेशवे यांचा जन्म.
६-९-१८२४ अमृतराव रघुनाथ पेशवे यांचा वाराणसीत मृत्यु.
८-१२-१८२४ दुसरे नानासाहेब पेशवे (दत्तक) यांचा जन्म.
३-७-१८२५ दुसरे बाजीरावांची सहावी पत्नी सरस्वतीबाई यांचा मृत्यू.
७-६-१८२७ गोविंद (नानासाहेब) आणि सदाशिव (दादासाहेब) यांना एकाच दिवशी दुसरे बाजीरावांनी बिठूर येथे दत्तक घेतले.
२१-२-१८२८ शनिवारवाड्याला अखेरची सर्वांत मोठी आग लागली.
२२-७-१८२८ पुण्यात थोरले अलीबहाद्दर यांचा ताबूत निघाला.
×-×-१८२८ इंग्रजांच्या करारानुसार हरिहरेश्वर राज्यकारभाराच्या सोयीसाठी जंजिऱ्याच्या हबशांकडे गेले.
८-२-१८२९ दुसरे नानासाहेब यांची बिठूरला मुंज.
×-×-१८२९ विनायकराव अमृतराव पेशवे वाराणसी सोडून करवीला स्थायिक.
३०-५-१८३२ चिमणाजी रघुनाथ पेशवे यांचा वाराणसीत मृत्यू.

३-६-१८३३	द्वारकाबाई चिमणाजी पेशवे (कन्या) यांचा विवाह (थत्ते)
१०-५-१८३६	कावेरीबाई भ्र. चिमणाजी रघुनाथ पेशवे यांचा करवी येथे मृत्यू.
×-×-१८३६	दुसरे नानासाहेब पेशवे-सारजाबाई विवाह (करमरकर)
११-१२-१८३९	दुसरे बाजीरावांनी स्वतःचे मृत्यूपत्र तयार केले.
×-३-१८४१	दुसरे बाजीरावांना पक्षघाताचा झटका आला.
३०-४-१८४१	दुसरे बाजीरावांनी मृत्यूपत्रावर अंतिम सही केली.
×-×-१८४३	योगाबाई बाजीराव पेशवे (कन्या) यांचा जन्म.
१६-१-१८४७	बयाबाई ऊर्फ कुसुमावती बाजीराव पेशवे (कन्या) यांचा जन्म.
×--×--१८४८	माधवराव विनायक पेशवे (दत्तक) यांचा जन्म. (अंदाजे)
×--×--१८४९	बांदा नवाब झुल्फिकारअली यांचा मृत्यू.
११-१-१८५१	दुसरे बाजीराव पेशवे यांचे दुखणे बळावले.
२८-१-१८५१	दुसरे बाजीराव पेशवे यांचा बिठूरला मृत्यू.
३१-१-१८५१	बिठूरचे कमिशनर मॅन्सनने दुसरे बाजीरावांच्या मृत्यूची बातमी सरकारला कळवली.
१५-९-१८५१	गव्हर्नर-जनरल डलहौसी यांनी दुसरे नानासाहेबांना पेन्शन नाकारले.
३१-१०-१८५१	बिठूर-कमिशनरची कचेरी बंद.
१९-५-१८५२	लॉर्ड डलहौसीचा निर्णय कंपनी-सरकारने कायम केला.
६-७-१८५३	विनायकराव अमृतराव पेशवे यांचा मृत्यू.
×-×-१८५५	योगाबाई (पटवर्धन) आणि बयाबाई (आपटे) या भगिनींचे विवाह. (?)
१२--१--१८५६	थोरले नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत सुरू झालेली, पुण्यात रात्री ११ वाजता पहाऱ्याची तोफ उडवण्याची प्रथा बंद झाली.
×--×--१८५६	दुसरे नानासाहेब– कृष्णाबाई विवाह (करमरकर)
१०--५--१८५७	मीरत येथे '१८५७' च्या उठावाची ठिणगी पडली.
५--६--१८५७	दुसरे नानासाहेबांनी कानपूरला उठावाचे नेतृत्व स्विकारले.
१५--६--१८५७	दुसरे अलीबहाद्दरनी बांदा नवाब म्हणून बांदा प्रशासन हातात घेतले.
२८-६-१८५७	दुसरे नानासाहेबांच्या सन्मानार्थ कानपूरला मोठा दरबार.
३०-६-१८५७	दुसरे नानासाहेबांना बिठूरला राज्याभिषेक.
१-७-१८५७	दुसरे नानासाहेबांचा जाहीरनामा कानपूरला प्रसिद्ध.

१५-७-१८५७	बाळासाहेब (गंगाधरराव) पेशवे पांडू नदीच्या लढाईत पराभूत.
१७-७-१८५७	दुसरे नानासाहेबांनी परिवारासह जलमार्गाने बिठूर सोडले.
×-८-१८५७	दुसरे नानासाहेबांच्या अटकेसाठी इंग्रजांचे ५० हजार रु. इनाम जाहीर.
११-१२-१८५७	इंग्रजांनी बिठूरचे पेशव्यांचे वाडे उध्वस्त केले.
×-१२-१८५७	दुसरे नानासाहेबांचा परिवारासह नेपाळमध्ये प्रवेश.
२८--२-१८५८	दुसरे नानासाहेबांवर लावलेले इनाम इंग्रजांनी १ लाख रु. केले.
१७-४-१८५८	इंग्रजांचे सैन्य बांदा जहागिरीत शिरले.
२०-४-१८५८	बांद्याच्या नवाबी वाड्याची इंग्रजांकडून लूट.
३-६-१८५८	पेशव्यांचे प्रतिनिधी म्हणून रावसाहेब पेशव्यांना ग्वाल्हेरला राज्याभिषेक.
६-६-१८५८	करवीमध्ये इंग्रज सैन्य. पेशव्यांचा वाडा लुटला.
×-×-१८५८	योगाबाई बाजीराव पेशवे (कन्या- पटवर्धन) यांचा बिठूरला मृत्यू.
१०-७-१८५८	बाळासाहेब पेशवे यांचा नेपाळात जंगलात मृत्यू. (बयाबाई नोंद)
६-१०-१८५८	दुसरे नानासाहेब यांचा नेपाळमध्ये मृत्यू. (बयाबाई नोंद)
१४--११--१८५८	दुसरे अलीबहाद्दर इंग्रजांना शरण गेले.
×--११--१८५९	दुसरे नानासाहेब यांच्या वाराणसी येथील वाड्यांचा लिलाव.
५--११--१८५९	दुसरे नानासाहेब यांचा मृत्यू. (इंग्रजांची नोंद)
१०--७--१८५९	बाळासाहेब पेशवे यांचा मृत्यू. (इंग्रजांची नोंद)
×--×--१८६०	नारायणराव पेशवे (दत्तक) यांचा हजारीबाग तुरुंगात मृत्यू.
२०--८--१८६२	रावसाहेब पेशव्यांना बिठूरला जाहीर फाशी.
×-×-१८६५	(सुमारे) कृष्णराव माधवराव पेशवा यांचा जन्म.
१--५--१८७३	रमाबाई भ्र. रावसाहेब पेशवे यांचे इंदूर येथे निधन.
१४--८--१८७३	दुसरे अलीबहाद्दर यांचा वाराणसीत मृत्यू.
×--×--१८८१	दुसरे बाजीरावांच्या १० व्या पत्नी सईबाई पेशवे यांनी लक्ष्मणराव चिमणाजी थत्ते यांना दत्तक घेतले.
×--×-१८८६	(सुमारे) कृष्णाबाई भ्र. दुसरे नानासाहेब पेशवे, यांचा नेपाळात मृत्यू.
२३-१२--१८८७	दुसरे बाजीरावांच्या मथुरेतील दोन घरांचा लिलाव.

२३–१०–१८९०	सईबाई पेशवे यांनी दत्तक लक्ष्मणराव थत्त्यांकडे नेपाळातील संपत्तीचा व व्यवहाराचा वारसा-अधिकार सोपवला.
२५–३–१८९६	सईबाई भ्र. दुसरे बाजीराव पेशवे यांचा नेपाळात मृत्यू.
×–×–१९०५	गंगाबाई भ्र. नारायणराव विनायक पेशवा, यांचा वाराणसीत मृत्यू.
१६–११–१९०७	कृष्णराव माधवराव पेशवा यांचा मृत्यू.
×–×–१९०७	झुल्फिकारबहाद्दर ऊर्फ नवाबबहाद्दर यांचा मृत्यू.
५–१–१९०८	थेऊरच्या सती–वृंदावनाचा मि. किंकेड यांचे हस्ते जिर्णोद्धार
२२–३–१९१३	माधवराव विनायक पेशवा यांचा मृत्यू.
१४–१०–१९१३	विनायकराव बापूसाहेब पेशवा यांचा मृत्यू. (कोजागिरी पौर्णिमा.)
२२–१०–१९१६	सदाशिवराव माधवराव पेशवा यांचा मृत्यू.
१९–६–१९१७	दुसरे बाजीराव पेशवे यांची कन्या बयाबाई आपटे यांचा मृत्यू

❋ ❋

परिशिष्ट अठरावे

घराण्याच्या सोयरिकी

पेशव्यांच्या सोयरिकींबद्दल प्रभाकर शाहीराच्या पोवाडयात उल्लेख सापडतो. त्यात सर्व व्याह्यांचा उल्लेख नाही. 'काही अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे' या छोटया पुस्तकात श्री. य. न. केळकरांनी तो भाग दिला आहे: 'विपुल त्या रास्त्यांच्या घरी आजवर संतत संपत्ती / इचलकरंजीकर, बारामतीकर सोयऱ्यांत धनपती / पहा कृष्णराव चासकर साजणी / कोकणचे कोल्हटकर, साजणी / महशूर सोलापूरकर साजणी / दिक्षीत–पेठे–साठे--ओक--ओंकार सभाग्यामधी / फाटक, थत्ते, बर्वे, पेंडशांची रीत सुधी ॥ १ ॥

१. अत्रे-- विनायकराव विश्वनाथराव यांची कन्या शुभदागौरी, पती अत्रे.
२. अभ्यंकर-- बाजीराव रघुनाथ यांची सातवी पत्नी सत्यभामाबाई.
३. आठवले-- बाजीराव रघुनाथ यांची आठवी पत्नी गंगाबाई.
४. आपटे-- बाजीराव रघुनाथ याची कनिष्ट कन्या बयाबाई, पती आपटे
५. आपटे-- कृष्णराव विश्वनाथराव यांची पत्नी रमा ऊर्फ उषा.
६. ओक-- रघुनाथ बाजीराव यांची दुसरी पत्नी आनंदीबाई.
७. ओक-- पांडुरंग (रावसो) सदाशिव यांची पत्नी रमाबाई.
८. ओंकार– थोरले चिमाजीआप्पा यांची कन्या बयो, पती ओंकार.
९. करकरे– कृष्णराव विश्वनाथराव यांची कन्या मोहिनी, पती करकरे.
१०. करमरकर– धुंडीराज (नानासो) बाजीराव याची पहिली पत्नी सारजाबाई.
११. करमरकर धुंडीराज (नानासो) बाजीराव यांची तिसरी पत्नी कृष्णाबाई.
१२. कारलेकर– सदाशिव बाजीराव यांची पत्नी रोहिणीबाई.
१३. किबे– माधवराव विनायकराव यांची पत्नी लक्ष्मीबाई.
१४. कोल्हटकर– सदाशिवराव (भाऊसो) यांची दुसरी पत्नी पार्वतीबाई.
१५. गोखले (रास्ते)– बाळाजी बाजीराव यांची पहिली पत्नी गोपिकाबाई.
१६. गोखले– माधवराव नारायणराव यांची दुसरी पत्नी यशोदाबाई.
१७. गोखले– बाजीराव रघुनाथ यांची नववी पत्नी मैनाबाई.

१८. गोडबोले– गंगाधर बाजीराव यांची पत्नी काशीबाई.
१९. घाटे– अमृतराव रघुनाथ यांची चौथी पत्नी.
२०. चितळे– बाजीराव रघुनाथ यांची अकरावी पत्नी.
२१. जोग– विनायकराव अमृतराव यांची कन्या काशीबाई, पती जोग.
२२. जोशी– बाळाजी विश्वनाथ यांची ज्येष्ठ मुलगी, भिऊबाई, पती जोशी
२३. जोशी (घोरपडे)– बाळाजी विश्वनाथ यांची दुसरी मुलगी अनूबाई, पती जोशी.
२३. जोशी (चासकर)– बाजीराव बल्लाळ यांची पत्नी काशीबाई.
२५. जोशी (बारामतीकर)– रघुनाथ बाजीराव यांची मुलगी दुर्गा, पती जोशी.
२६. जोशी– माधवराव बल्लाळ यांची पत्नी रमाबाई.
२७. जोशी– चिमणाजी रघुनाथ यांची दुसरी पत्नी कावेरीबाई.
२८. थत्ते– चिमणाजी बल्लाळ यांची दुसरी पत्नी अन्नपूर्णाबाई.
२९. थत्ते– चिमणाजी रघुनाथ यांची मुलगी द्वारकाबाई, पती थत्ते.
३०. थत्ते (टोकेकर)-- माधवराव नारायणराव यांची पहिली पत्नी रमाबाई
३१. दातार-- अमृतराव रघुनाथराव यांची चौथी पत्नी.
३२. दातीर-- विनायकराव अमृतराव यांची पहिली पत्नी.
३३. दामले-- चिमणाजी रघुनाथ यांची पहिली पत्नी सीताबाई.
३४. देव-- सदाशिवराव माधवराव यांची पत्नी पार्वतीबाई.
३५. दीक्षित-- विश्वनाथ कृष्णराव (महेंद्रसिंह) यांची पत्नी सुचेता.
३६. ढमढेरे (देवधर)-- बाजीराव रघुनाथ यांची पाचवी पत्नी वेणूबाई.
३७. नेने– नारायणराव विनायकराव यांची पत्नी गंगाबाई.
३८. पटवर्धन (दीक्षित)-- विश्वासराव बल्लाळ यांची पत्नी लक्ष्मीबाई.
३९. पटवर्धन-- बाजीराव रघुनाथ यांची दुसरी मुलगी योगाबाई, पती पटवर्धन.
४०. पटवर्धन-- कृष्णराव माधवराव यांची पत्नी रमाबाई.
४१. पटवर्धन-- कृष्णराव माधवराव यांची मुलगी ठकूताई, पती पटवर्धन.
४२. पटवर्धन– कृष्णराव माधवराव यांची मुलगी छबूताई, पती पटवर्धन.
४३. पटवर्धन -- रघुनाथराव सदाशिव यांची पत्नी कमलिनीबाई.
४४. पटवर्धन -- विनायकराव कृष्णराव यांची दुसरी पत्नी मालतीबाई.
४५. पटवर्धन -- विश्वनाथराव कृष्णराव यांची मुलगी सरोजिनी, पती पटवर्धन.
४६. परांजपे -- विनायकराव अमृतराव यांची दुसरी पत्नी. आनंदीबाई

४७. पंतप्रतिनिधी – विनायकराव विश्वनाथराव यांची पत्नी सरस्वती ऊर्फ जयमंगला.
४८. पाटणकर – धुंडीराज (नानासो) बाजीराव यांची दुसरी पत्नी सारजाबाई.
४९. पेठे – चिमाजी बल्लाळ यांची पहिली पत्नी रखमाबाई.
५०. पेंडसे – रघुनाथ बाजीराव यांची तिसरी पत्नी मथुराबाई.
५१. पेंडसे – बाजीराव रघुनाथ यांची सहावी पत्नी सरस्वतीबाई.
५२. फडके – बाजीराव रघुनाथ यांची तिसरी पत्नी राधाबाई.
५३. फडके – अमृतराव रघुनाथ यांची तिसरी पत्नी.
५४. फाटक (रास्ते) – बाजीराव रघुनाथ यांची चौथी पत्नी वाराणसीबाई.
५५. बर्वे – बाळाजी विश्वनाथ यांची पत्नी राधाबाई.
५६. बर्वे – रघुनाथ बाजीराव यांची पहिली पत्नी जानकीबाई.
५७. बिवलकर – अमृतराव रघुनाथ यांची पहिली पत्नी सावित्रीबाई.
५८. भागवत – बाजीराव रघुनाथ यांची पहिली पत्नी भागिरथीबाई.
५९. भानू (फडणीस) – सदाशिव चिमाजी यांची पहिली पत्नी उमाबाई.
६०. भावे – विश्वनाथराव कृष्णराव यांची पत्नी अन्नपूर्णाबाई.
६१. भिडे – जनार्दन बाजीराव यांची पत्नी सगुणाबाई.
६२. मंडलीक – बाजीराव रघुनाथ यांची दुसरी पत्नी सरस्वतीबाई.
६३. मेहेंदळे – विश्वनाथ परशराम यांची मुलगी पती मेहेंदळे.
६४. मेहेंदळे – चिमणाजी रघुनाथ यांची तिसरी पत्नी सत्यभामाबाई.
६५. मोडक – अमृतराव रघुनाथ यांची दुसरी पत्नी सावित्रीबाई.
६६. रिसबूड – बाजीराव रघुनाथ यांची दहावी पत्नी सईबाई.
६७. वाखरे (देशस्थ) – बाळाजी बाजीराव यांची दुसरी पत्नी राधाबाई.
६८. साठे – नारायणराव बल्लाळ यांची पत्नी गंगाबाई.
६९. साठे – विनायकराव कृष्णराव यांची पहिली पत्नी.

* *

परिशिष्ट एकोणिसावे

छापता छापता

(१) मराठी नियतकालिकांच्या, ग्रंथांच्या जुन्या यादीत : (१५) ' न्यायाश्रम ' (१८६९) राजमाचीकर व कै. शि. ह. साठे पुणे, असा उल्लेख मिळतो. हे राजमाचीकर कोण, याचा शोध लागला नाही. (' मराठी नियतकालिकांचा इतिहास १८३२–१९३७ ' – कानडे रा. गो., आ. स. १९३८ पृ. ९).

(२) राजमाचीकर, त्र्यंबकराव नारायण : ' चमत्कारिक न्यायाच्या व अकलेच्या गोष्टी ' भाग १ ला, पुणें, जगदितेच्छु छापखाना १८६७, पृ. ८ + २०६ शिळा, ६.१ × ४.७ मू. रु. ०-१२-० (' मराठी दोलामुद्रिते – प्रा. सु. आ. गावस्कर, आ.स. १९६१ पृ. १३५) क्र. १ वर उल्लेखलेले व क्र. २ वर उल्लेखलेले गृहस्थ एकच असावेत. तसेच क्र. ३ चे गृहस्थ, यांचेच चिरंजीव असावेत असे सर्व संदर्भांवरून अनुमान निघते. हे उभयता, राजमाचीकर-शाखेतील नारायण त्रिंबक (१०) (पृ. १९ पहा). यांचे वंशज असावेत.

(३) राजमाचीकर, नरहर त्रिंबक ऊर्फ दादासाहेब; बी. ए. सरदार इनामदार मेहूणपुरा शनवार पेठ (' चित्पावन समाजचित्र ' – जोशी शं. ना., करंदीकर ज. स. आ. मार्च १९४० पृ. ८६).

(४) **गं. भा. बयाबाई आपटे यांची नेपाळ भेट** : ' श्रीक्षेत्र काशीं ' येथें मागें एकवार येऊन सर्व यात्राकृत्य आटोपून गेलेल्या श्री. बयाबाईसाहेब आपटे (बाजीरावसाहेब पेशवे यांची कन्या) ह्या आपल्या मातुश्रीस बंधूपत्नीस – (श्री. नानासाहेब पेशवे यांचे कुटुंबास) भेटण्याकरितां ह्मणून मुद्दाम काशीहून परिवारासह नेपाळास गेल्या होत्या. त्या तेथें जाऊन पोहोचल्यावर तेथील राजेसाहेबांच्या अनुमोदनानें त्यांच्या मातुश्रीच्या व बंधूपत्नीच्या भेटीचा लाभ ह्यांस होऊन त्या तेथें कांहीं दिवस राहून तेथील यात्राकृत्य आटोपून स्वारीं ग्रहणाकरितां ह्मणून पुन्हा काशीस आली आहे. राजेसाहेबांनी उभय बाईसाहेबांची सर्व प्रकारे व्यवस्था फार उत्तम रीतीने ठेविली होती. असे तेथून आलेले लोक सांगत आहेत व त्यांस तेथील सर्व लोक ' दखनी महाराणी साहेब ' अशा संज्ञेपें त्यांची नावें घेतात. ह्यांचें हे कुशल वृत्त सर्व हिंदुधर्माभिमानी लोकांस संतोषदायक वाटल्यां वाचून राहणार नाही.

– ' केसरी ' मंगळवार, दि. २१-४-१८८५

परिशिष्ट विसावे

प्रमुख संदर्भ-साहित्य व साधने

हिंदी

चरित्रे – पुस्तके

गुप्त, (डॉ.) भगवानदास – ' मस्तानी बाजीराव और उनके वंशज बांदाके नवाब (आ. स. १९८३).

गुप्त, (डॉ.) भगवानदास – ' महाराजा छत्रसाल बुंदेला ' (आ. स. १९५८).

तिवारी, (डॉ.) गोरेलाल – ' बुंदेलखंडका संक्षिप्त इतिहास ' (आ.संवत् १९९०).

भार्गव, (डॉ.) मोतीलाल – ' नानासाहब ' (आ. स. १९६३).

भार्गव, (डॉ.) मोतीलाल – ' संघर्ष-कालीन नेताओंकी जीवनियाँ ' (आ. स. १९५८).

मराठी

कोश – गॅझेटिअर्स

खरे, ग. स. – ' खरे जंत्री सन १६२९ - सन १७२८ ' (आ. स. १९२३).

गाडगीळ, अमरेन्द्र – ' श्रीगणेशकोश ' (आ. एप्रिल सन १९६७).

चित्राव, सिद्धेश्वरशास्त्री – ' भारतवर्षीय मध्ययुगीन-चरित्रकोश ' (आ. स. १९३७).

जोशी, श्रीपाद, गोरेकर एन्. एस्. – ' उर्दू-मराठी शब्दकोश ' (आ. स. १९६८).

दाते, य. रा.; कर्वे, चि. ग.; – ' सुलभ विश्वकोश ' भाग १ ते ६ (आ. स. १९४९ – ५१).

मोडक, वा. प्र. – ' मोडक जंत्री सन १७२८ – सन १८९४ ' (आ. स. १८८९).

मोडक, वा. प्र. – ' मोडक जंत्री सन १८९४ – सन १९१३ ' (आ. स. १९०८).

राजवाडे, वि. का. – ' नामादिशब्द व्युत्पत्तिकोश ' (आ. श. १८६४).

चरित्रे – पुस्तके

श्रीगोंदेकर, ग. न. – ' पुणे नगरवाचन मंदिराचा शंभर वर्षांचा इतिहास – १८४८–१९४९ ' (आ. स. १९४९).

आपटे, गो. वि. – ' गोखले व गोखले – रास्ते घराण्याचा इतिहास. ' (आ. स. १९२२).

आपटे, गो. वि. – ' बरवे घराण्याचा इतिहास ' (आ. श. १८३८).

आपटे, गो. वि. – ' संस्थानिक पटवर्धन घराण्याचा इतिहास ' (आ. स. १९१९).

आपटे, द. वि.; ओतुरकर रा. वि.; – ' साधन–परिचय अर्थात् महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास ' (आ. स. १९६३).

ओक, भ. प्र. – ' ओक घराण्याचा इतिहास ' (आ. स. १९७६).

करंदीकर, अ. ज.– ' क्रांतिकारक टिळक नि त्यांचा काळ ' (आ. स. १९६९).

कानडे, रा. गो. – ' मराठी नियतकालिकांचा इतिहास (१८३२–१९३७)' (आ. स. १९३८).

कानेटकर, य. गो. – ' सखारामबापूंचे चरित्र ' (आ. स. १९३५).

कुलकर्णी, पु. वा. – ' निर्णयसागराची अक्षरसाधना ' (आ. स. १९६७).

कुलकर्णी, भीमराव – ' भाऊसाहेबांची बखर ' (आ. स. १९८५).

कुलकर्णी, भीमराव – ' पेशव्यांची बखर ' (आ. स. १९८६).

कुलकर्णी, वि. म.; अ. रा.; देशपांडे, अ. ना.; – ' पेशव्यांची बखर ' (आ. स. १९६३).

केळकर, का. न. – ' शमी पूजन ' (आ. स. १९४७).

केळकर, का. न. – (संपा.) ' केळकरांची निबंधमाला ' सह्याद्रि खंड (ले. न. चिं. केळकर) (आ. स. १९५५).

केळकर, न. चिं. – ' मराठे व इंग्रज (आ. स. १९६३).

केळकर, न. चिं. – व्याख्यानसंग्रह ' समग्र केळकर–वाङ्मय ' खंड ७ (आ. स. १९३८).

केळकर, य. न. – ' ऐतिहासिक पोवाडे ' भाग १ (आ. स. १९२८).

केळकर, य. न. – ' इतिहासातील सहली ' खंड २ (आ. स. १९६४).

केळकर, य. न. – ' काही अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे ' (आ. स. १९६७).

केळकर, य. न. – ' हिराबागेचा इतिहास ' (आ. स. १९७४ ?)

केळकर, य. न. – ' होळकरांची कैफियत ' (आ. स. १९५४).

केळकर, य. न. – ' भुतावर भ्रमण ' (आ. स. १९४०).

खरे, ग. ह.; जोशी, शं. ना; – ' ऐतिहासिक मराठी साधने ' (आ. स. १९८३).

खरे, ग. ह. – 'तुलादान विधी' (आ. स. १९४८).
खरे, ग. ह. – 'शनिवारवाडा' (आ. स. १९५८).
खरे, ग. ह. – 'संशोधकाचा मित्र' (आ. स. १९५१).
खरे, वा. वा. – 'अधिकार योग' (आ. स. १९०८).
खरे, वा. वा. – 'इचलकरंजी संस्थानचा इतिहास' (आ. स. १९१३).
खरे, वा. वा. – 'ऐतिहासिक लेखसंग्रह' : भाग १ ते १५.
खरे, वा. वा. – 'नाना फडणीस यांचे चरित्र' (आ. स. १९२७).
खोबरेकर, वि. गो. – 'मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम' (आ. स. १९७७).
खोबरेकर, वि. गो; शिंदे श. सं; – 'कोकणच्या इतिहासाची साधने सन १६९२ ते सन १८२९' खंड १ (आ. स. १९७१)-
गर्गे, स. मा. – 'करवीर रियासत' (आ. स. १९८०).
गावस्कर, सु. आ. – 'मराठी दोलामुद्रिते' (आ. स. १९६१)
गोखले, पु. पां. – 'अठराशे सत्तावनचा महाराष्ट्र' (आ. स. १९५७).
गोखले, पु. पां. – 'बंडवाले नानासाहेब' (आ. स. १९७२).
गोगटे, चिं. ग. – 'नानासाहेब पेशवे चरित्र' (आ. स. १९०८).
गोगटे, चिं. ग. – 'बाळाजी विश्वनाथ पेशवे चरित्र' (आ. स. १९११).
गोडसे, विष्णुभट – (संपा. – रा. ब. चिं. वि. वैद्य) 'माझा प्रवास' (आ. स. १९४८).
गोवंडे, (डॉ.) वि. भा. – 'त्रिमूर्ती दर्शन' (आ. स. १९५३).
चापेकर, ना. गो. – 'चित्पावन' (आ. स. १९६६).
चापेकर, ना. गो. – 'पेशवाईच्या सावलीत' (आ. स. १९३७).
चापेकर, ना. गो. – 'हिमालयात' (आ. श. १८६३).
चांदोरकर, गो. का. – 'पेशवाईची अखेर' (आ. श. १८४०).
चितळे, वि. सी. – 'पेठे दप्तर' भाग २ (आ. स. १९५०).
जांभेकर, ग. गं. – 'बाळशास्त्री जांभेकर शताब्दि स्मारक ग्रंथ' खंड २ (आ. स. १९५०).
जोशी, आ. वा; चांदोरकर, आबा; – 'शिवशाहीचा लेखनालंकार' (आ. शि. श. २६०).
जोशी, ना. वि. – 'पुणे वर्णन' (आ. स. १९७१ : पुनर्मुद्रण).
जोशी, ल. ना. – 'थोरले बाजीराव चरित्र' (आ. स. १९३५).
जोशी, ल. ना. – 'बाळाजी विश्वनाथ पेशवे' (आ. स. १९३३).
जोशी, शं. ना. – 'माधवराव शकावली' (आ. स. १९३८).
जोशी, शं. ना., करंदीकर, ज. स. – 'चित्पावन समाजचित्र' (आ. स. १९४०).

टिळक, दे. ना. – ' महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई ' (आ. स. १९६०).
डिके, चिं. भि. – ' पर्वती संस्थानचे वर्णन ' (आ. स. १९१४).
दीक्षित म. श्री. – ' प्रतापी बाजीराव ' (आ. स. १९७९).
देशमुख, लोकहितवादी (गो. ह.) – ' ऐतिहासिक गोष्टी ' भाग १ (आ. स. १९०९).
देसाई, संजीव प. – ' पेशवे सवाई माधवराव यांची पत्नी यशोदाबाई हिचा तोतया ' (आ. स. १९७७).
नाटेकर, वि. वा. – ' मौंटस्टुअर्ट एलफिन्स्टन ह्यांचे चरित्र ' (आ. स. १८९७).
परांजपे, मो. वि. – ' श्रीक्षेत्र हरिहरेश्वर संक्षिप्त वर्णन ' (आ. स. १९४६).
पारसनीस, द. ब. – ' इतिहास संग्रह ' – (१) सन १९०८ ऑगस्ट, सप्टें. नोव्हें., डिसें., (२) सन १९०९ मार्च, जून, ऑगस्ट, नोव्हें., डिसें., (३) सन १९१० मार्च, एप्रिल (४) सन १९१२ नोव्हें., डिसें., (५) सन १९१३ जाने. (६) सन १९१५ मे, जून, जुलै, नोव्हें., (७) सन १९१६ जाने.
पारसनीस, द. ब. – ' ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांचे चरित्र ' (आ. स, १९००).
पारसनीस, द. ब. – ' भारतवर्ष '
' पुस्तक २ रे ' (एप्रिल सन १८९९ – मार्च सन १९००)
पिसुर्लेकर, (डॉ.) पां. सं. – ' पोर्तुगीज मराठे संबंध ' (आ. स. १९६७).
प्रियोळकर, अ. का. – ' रा. ब. दादोबा पांडुरंग ' (आ. स. १९४७).
पुरंदरे, कृ. वा. – ' चिमाजीअप्पा पेशवे चरित्र ' (आ. श. १८७०).
पुरंदरे, कृ. वा. – ' पुरंदरे दप्तर ' भाग १ ते ३ (आ. स. १९२९/२९/३४).
फाटक, न. र. – ' अठराशे सत्तावनची शिपाई गर्दी ' (आ. स. १९५९).
बापट, ना. वि. – ' श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे (आ. स. १९२९).
बेहेरे, ना. के. – ' १८५७ ' (आ. स. १९५७).
बेंद्रे, वा. सी. – ' महाराष्ट्रेतिहासाची साधने ' भाग २, ३ (आ. स. १९६५).
भावे, वा. कृ. – ' पेशवेकालीन महाराष्ट्र ' (आ. स. १९७६).
भावे, वि. ल. – ' मराठी दप्तर रुमाल ' भाग २, ३ (आ. स. १९२२/२८).
भावे, वि. ल. – ' महाराष्ट्र–सारस्वत ' (खंड १), (आ. स. १९८२).
भुस्कुटे, वि. म. – ' सदाशिवरावभाऊ (आ. स. १९४६).
मिश्रा, आनंदस्वरूप– (मराठी अनु. – डॉ. वा. रा. ढमढेरे) ' नानासाहेब पेशवे आणि १८५७ चे बंड ' (आ. स. १९७३).

मोडक ज. बा. – 'मराठी साम्राज्याची छोटी बखर' (आ. स. १८८९).
राजवाडे, वि. का.– 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने'– खंड १, २, ४, ५, ६, ७, ८, १०, १२, १५, १९, २१.
लिमये, अ. ह.– 'मराठी प्रकाशनांचे स्वरूप – प्रेरणा व परंपरा (१८०५–१९००)' (आ. स. १९७२)
लेले, वि. गं.– 'शिवशाहीचा अस्त' (आ. स. १९५७).
वझे, भाऊशास्त्री– 'माझा चित्रपट व काशीचा संपूर्ण इतिहास' (आ. स. १९४०).
वाड, रा. ब. ग. चि.– 'शाहू रोजनिशी I' (आ. स. ?)
वाड, रा. ब. ग. चि.– 'बाळाजी बाजीराव पेशवे रोजनिशी II' (आ. स. १९०६).
वाड, रा. ब. ग. चि. – 'बाळाजी बाजीराव पेशवे रोजनिशी III' (आ. स. १९०७).
वाड, रा. ब. ग. चि. – 'सवाई माधवराव पेशवे रोजनिशी IV' (आ. स. १९०८).
वाड, रा. ब. ग. चि. – 'दुसरे बाजीराव पेशवे रोजनिशी V' (आ. स. १९०८).
वाड, रा. ब. ग. चि. – 'सवाई माधवराव पेशवे रोजनिशी IV' (आ. स. १९०८).
वाड, रा. ब. ग. चि. – 'माधवराव बल्लाळ पेशवे रोजनिशी IX' (आ. स. १९११).
विंचूरकर, रघुनाथराव – (संपा. ग. स. लेले) 'तीर्थयात्रा प्रबंध' (आ. स. १९६४)
वैद्य, शं. ल. – 'वैद्य दप्तर निवडक कागद' खंड ५ (आ. श. १८७३).
सरदेसाई, गो. स. – 'ऐतिहासिक पत्रबोध' (आ. स. १९३९).
सरदेसाई, गो. स. – 'ऐतिहासिक लेखमाला' भाग २ (आ. स. १९४०).
सरदेसाई, गो. स. – 'नानासाहेब पेशवे चरित्र' (आ. स. १९२६).
सरदेसाई, गो. स. – 'मराठी रियासत' मध्यविभाग भा १, सन १७०७–४० *
सरदेसाई, गो. स. – 'मराठी रियासत' मध्यविभाग भाग २, सन १७४०–६१.

---

* 'पॉप्युलर प्रकाशन' कृत 'रियासती'च्या नव्या आवृत्तीच्या (१९८८–१९९२) खंडांचा देखील उपलब्धतेनुसार वापर केला आहे.

सरदेसाई, गो. स. – 'मराठी रियासत' मध्यविभाग भाग ३, सन १७५०–६१.
सरदेसाई, गो. स. – 'मराठी रियासत' मध्यविभाग भाग ४, सन १७६१–७४.
सरदेसाई, गो. स. – 'मराठी रियासत' उत्तरविभाग भाग १, सन १७७४–८३.
सरदेसाई, गो. स. – 'मराठी रियासत' उत्तरविभाग भाग २, सन १७८३–९५.
सरदेसाई, गो. स. – 'मराठी रियासत' उत्तरविभाग भाग ३, सन १७९५–१८४८.
सरदेसाई, गो. स., काळे, या. मा., वाकसकर, वि. स. – 'काव्येतिहास-संग्रह ऐति. पत्रे यादी वगैरे' (आ. स. १९३०).
सरदेसाई, गो. स., कुलकर्णी, कृ. पां., काळे, या. मा. – 'ऐतिहासिक पत्र-व्यवहार' (आ. स. १९३३).
सहस्रबुद्धे पु. ग. – 'महाराष्ट्र संस्कृती' (आ. स. १९७९).
सहस्रबुद्धे, स. अ. – 'थोरले माधवराव पेशवे चरित्र' (आ. स. १९३७).
सुंठणकर, स. रं. – 'राघोबादादा ऊर्फ राघोभरारी' (आ. स. १९४५).
हवालदार, ग. रा. – 'रा. सा. वि. ना. मंडलिक चरित्र' भाग १ (आ. स. १९२७).
हेरवाडकर, र. वि. – 'पाणिपतची बखर' (आ. स. १९६६).
हेरवाडकर, र. वि. – 'थोरले शाहू महाराज यांचे चरित्र' (आ. स. १९७६).

कुलवृत्तांत

'केळकर' – संपा. केळकर, सी. वि., केळकर, य. न. (आ. स. १९५८).
'कोल्हटकर' – संपा. कोल्हटकर, वा. श्री. (आ. स. १९३६).
'खरे' – संपा. खरे, मो. ह. (आ. श. १८६२).
'जोग' – संपा. कानिटकर, शं. रा. (आ. स. १९५३).
'जोशी' (शांडिल्य गोत्री) – संपा. मोकाशी, दि. वा., जोशी, रा. द., प. क., कृ. रा., न. म., मो. य., वा. ज. (आ. श. १९०४).
'थत्ते' – संपा. थत्ते प. वि., वि. ना., (आ. स. १९३६).
'देवधर' (ढमढेरे) – संपा. ढमढेरे, डॉ. वा. रा. (आ. स. १९६७).
'नेने' – संपा. नेने, म. पां., (आ. स. १९८०).
'परांजपे' (देव, मंडलीक) – संपा. परांजपे, त्रि. वि. (आ. स. १९५८).

'पेंडसे' – संपा. पेंडसे, कृ. वि. (आ. स. १९३८).
'पेठे' – संपा. पेठे कुलसमिती (आ. स. १९८५).
'पोंक्षे' – संपा. पोंक्षे, भा. सि. (आ. स. १९४९).
'फाटक' – संपा. रानडे, स. भा. (आ. स. १९८२).
'बर्वे' – संपा. बर्वे, श्री. गो. (आ. स. १९७७).
'भावे' – संपा. भावे, गो. वा. (आ. स. १९४०).
'रिसबूड' – संपा. रानडे, स. भा. (आ. स. १९७८).
'साठे' – संपा. साठे, प. पु. (आ. स. १९४०).

भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे यांची प्रकाशने

(अ) इतिवृत्ते – शके १८३२, ३३, ३५, ३७, ३८, षावृ. शके १८३४.
(आ) ऐति. संकीर्ण साहित्य – खंड १ ते ६.
(इ) त्रैमासिके, वर्ष : अंक – (१) ४ : १ – ४, (२) ६ : १ – ४, (३) ९ : २, (४) ९ : ४, (५) १६ : ३, (६) १८ : २, (७) १९ : ३, (८) १९ : ४, (९) २३ : ४, (१०) २४ : १, (११) २८ : १ – २, (१२) २९ : ३ – ४, (१३) ३२ : १ – ४, (१४) ६४ : ३ – ४.
(ई) संमेलन वृत्त – ३ रे शके १८३७, ५ वे शके १८३९, ६ वे शके १८४०, ७ वे शके १८४१.
(उ) पुणे नगर संशोधन वृत्त –
खंड १ (आ. स. १९४२),
खंड २ (आ. स. १९४३),
खंड ३ (आ. स. १९४६),
खंड ४ (आ. स. १९५२).

नियतकालिके – वृत्तपत्रे

'इतिहास संशोधन पत्रिका' अंक १ सन १९८९–९०.
'इतिहास संशोधन प्रदिप' त्रैमासिक – ऑगस्ट १९७६, ऑगस्ट १९८३.
'इतिहास आणि संस्कृती' त्रैमासिक – एप्रिल ते सप्टेंबर १९८७.
'केसरी' वृत्तपत्र – २१–४–१८८५, ४–९–१९१७, ११–९–१९१७, ४–६–१९१८, २२–६–१९३४, २६–७–१९५३, १६–८–१९५३, २३–८–१९५३, ६–९–१९५३, ८–९–१९८५.
'मनोरंजन' मासिक – जानेवारी ते जून सन १९१०.
'मनोहर' साप्ताहिक – २५–२–१९८४.
'सकाळ' दैनिक – १–१०–१९३२, ७–१०–१९९०.
'सत्तावनी उठावाची समकालीन कात्रणे' – मालसे, स. गं. (आ. स. १९७७).

' साप्ताहिक सकाळ ' १५-१२-१९९०.
' विविध ज्ञानविस्तार ' मासिक – जाने. सन १९१३, डिसेंबर सन १९२०, फेब्रुवारी सन १९२१, जून सन १९३१ एप्रिल १९२१.
' सह्याद्रि ' मासिक – सप्टें., ऑक्टो. १९३७, मे १९४०, ऑगस्ट, सप्टें. १९४१, नोव्हें. १९४२, जुलै १९४४.
' संशोधक ' त्रैमासिक – जाने. – मार्च १९४३, जाने. – मार्च १९४५, सप्टेंबर – डिसेंबर १९८४.
' ज्ञानेश्वर ' त्रैमासिक – वर्ष १, अंक १, वर्ष ४, अंक ४.

समक्ष मुलाखती

पेशवा बंधु व परिवार, श्री. नवाब बहादूर, रा. इंदोर, श्री. (कै.) गो. प. नेने यांचे कडून मिळालेली अधिकृत माहिती.

English

Gazetters Etc. –

Maharashtra State Gazetteers – '*Kolaba District*' (Revised Ed. 1964).
'*Thacker's Indian Directory : 1947-48*'
'*Political Dep. Vols.*' – *6, 14, 21, 32, 46, 76, 126,*

Books –

Aitchison, C. U. – '*Treaties Engagements & Sunnuds*' Vol. III (Ed. 1863).
Douglas, James '*Book of Bombay*' (Ed. 1863).
Duff, Grant J. – '*History of the Mahrattas*' Vol. I & II (Ed. 1921).
Forbes,. James – '*Oriental Memoiers*' Vol. I (Ed. 1834).
Gupta, P. C. – '*Nana sahib & The Rising at Cownpore*' (Ed. 1963).
Gupta, P. C. – '*Baji Rao II & The East India Company 1796–1818*' (Ed. 1964).
Heber, Reginald D. D. – '*Narrative of a Journey through the Upper Provinces of India from Calcutta to Bombay, 1824–1825*' Vol . I (Ed. Dec. 1827).
Irvin, William – '*Later Mughals*' Vol. II (Ed. 1922).
Joshi, P. M. – '*Expansion of the Maratha Power (1707– 1761)*' – (Ed. 1957).

Kaye & Maleson, — '*History of the Indian Mutiny*'
— Vol. I (Ed. 1891) Cabinate Ed.
— Vol. III (Ed. 1889) " "
— Vol. V (Ed. 1889) " "

Majumdar, R. C. — *The sepoy Mutiny & Revolt of 1857*' (Ed. 1957).

Parasnis, D. B. — '*Poona In Bygone Days*' (1922).

Sardesai G. S.— '*Historical Geneologies*' (1957).

Sardesai G. S. — '*Selections from the Peshwa Daftar*' Vol. 1 to 45 (Ed. 1930-34). (In Marathi)

Vaidya, Dr. (Mrs.) S. G. — '*Peshwa Bajirao II & the Down-fall of the Maratha Power*' (Ed. 1976)

P. R. C. Vols.

Vol.— 7 : '*Poona Affairs*' – Sardesai G. S. (Ed. 1940)

Vol.— 12 ; '*Poona Affairs*' – (Pt. I) – Sardesai G. S. (Ed. 1950).

Vol. 13 : '*Poona Affairs*' (Pt. II) Sardesai G. S. (Ed. 1950).

Periodicals

Maharashtra Archives – '*Bulletine of the Dept. of Archives*'
Vol. 1 : Joshi, P. M., Khobrekar, V. G., (Ed. 1962).
Vol. 3 : Dixit, M. R., " " (Ed. 1968).
Vol. 4 : " " " " (Ed. 1968).
Vol. 8 : Khobrekar, V. G. (Ed. 1971)
Vol. 9 & 10 : " " (Ed. 1973)

* *

लेखक-परिचय

प्रमोद ओक

(मार्च १९९१ पर्यंतचे लेखन – संशोधन)

१. **स्वतंत्र ग्रंथलेखन** – (१) 'पेशवे घराण्याचा इतिहास' – पेशवा घराण्याचा सोळाव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंतचा, सर्व तपशील एकत्रित देणारा एकमेव ग्रंथ. १८ व्या आणि १९ व्या शतकाच्या सामाजिक अभ्यासासाठी विशेष उपयुक्त. (पहिली आवृती : 'केसरी प्रकाशन' पुणे ३०. मे सन १९८५. संपूर्ण सुधारित दुसरी आवृत्ती : 'कॉन्टिनेन्टल प्रकाशन' पुणे ३०. मार्च सन १९९१).

(२) 'दुर्दैवी आनंदीबाई पेशवे' (चरित्र) – श्रीमंत सौ. आनंदीबाई पेशवे ह्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विश्लेषण करणारे चरित्र. (पहिली आवृती : 'समीक्षा प्रकाशन' हडपसर, पुणे – २८. ऑगस्ट १९८८).

(३) 'एलफिन्स्टन' – नवनिर्मित मुंबई इलाख्याचे पहिले आणि कर्तबगार गव्हर्नर माऊन्ट स्टुअर्ट एलफिन्स्टन ह्यांचे स्वतंत्रपणे लिहिलेले मराठी भाषेतील पहिले चरित्र. १९ व्या शतकातील मुंबई इलाख्याच्या अभ्यासासाठी उपयुक्त. या ग्रंथाला 'महाराष्ट्र साहित्य परिषद' पुणे, या संस्थेचा १९९० सालचा "कै. म. म. द. वा. पोतदार" पुरस्कार मिळाला. (पहिली आवृती : राजहंस प्रकाशन' पुणे – ३०. मार्च १९९०).

२. **लेखनसहाय्य** – (१) 'ओक घराण्याचा इतिहास' (आ. ऑक्टोबर १९७६). (२) 'ओक कुल-व्यक्तिपरिचय' (आ. मार्च १९७९) या दोन ग्रंथांच्या निर्मितीसाठी, ग्रंथांचे अनुक्रमे लेखक आणि संपादक ह्यांना संशोधन, संपादन, लेखन, यासाठी महत्त्वपूर्ण सहाय्य.

३. **स्फुट लेखन** – वृत्तपत्रे, नियतकालिके, स्मरणिका, गौरवग्रंथ, यांमध्ये ऐतिहासिक, सामाजिक, प्रासंगिक, विषयांवर लेखन. १९ व्या आणि २० व्या शतकांतील काही नामांकित महाराष्ट्रीय व्यक्तिविशेषांसंबंधी चरित्रात्मक लेखन नियतकालिकांमध्ये वेळोवेळी प्रकाशित. १८ वे शतक (पेशवाकाल) आणि १९ वे शतक (ब्रिटिशकाल) या कालखंडांचा विशेष अभ्यास. ऐतिहासिक विषयांवर काही व्याख्याने दिली आहेत.

पत्ता : ३९/२० एरंडवणे, कर्वेरस्ता
लेन ९ वी, पुणे – ४११ ००४.

स्थल-नाम-संदर्भ-सूची

व्यक्ती-नामे, स्थल-नामे, तदनुशंगिक, संदर्भ, यासह सूची तयार केली आहे. पानावर एकापेक्षा अधिक वेळा उल्लेख असेल तर सूचीत एकच प्रातिनिधिक उल्लेख केला आहे. ओळीने ३-४ पानांवर उल्लेख असेल तिथे संक्षिप्त उल्लेख केला आहे. उदा. :- ५-९ इत्यादी. कुलदेवता, कुलाचार, सनदा, वृत्तपत्रे, तह, मोहिमा, तीर्थयात्रा, समाधी (वृंदावन), पुतळे, तोतये, हत्या-प्रयोग, हे तपशील स्वतंत्र उप-शीर्षकांतर्गत दिले आहेत. मजकुरात दिलेली संदर्भ-साधनांची नावे अवतरणात दिली आहेत. किरकोळ उल्लेख वगळले आहेत. सूची, पृ. १ ते पृ. ३६८ पर्यंत केली आहे.

प्रस्तुत सूचीसाठी पुढील वर्णानुक्रम अनुसरला आहे :-

श्री अ अं अॅ आ ऑ इ इं ई ईं उ
उं ऊ, ऊं ऋ ए एं ऐ ऐं ओ ओं औ

उ

ए

ऐ

ओ

औ

क

म

पेशवाईचा मागोवा घेणारी संग्राह्य पुस्तके

संशोधनपर

मराठ्यांचा इतिहास (भाग ३)
संपादक : ग. ह. खरे – अ. रा. कुलकर्णी

सत्तावनचे स्वातंत्र्यसमर (संक्षिप्त)
वि. दा. सावरकर

उमाजी नाईक मुक्काम डोंगर
सदाशिव आठवले

पेशवाईतील साडे तीन शहाणे
शं. रा. देवळे

ललित

पानिपतची मोहीम (कादंबरी) : ना. वि. बापट
दुसरा पेशवा (नाटक) : वि. वा. शिरवाडकर
राऊ (थोरले बाजीराव) : ना. सं. इनामदार
मंत्रावेगळा (दुसरे बाजीराव) : ना. सं. इनामदार
झेप (त्रिंबकजी डेंगळे) : ना. सं. इनामदार
झुंज (यशवंतराव होळकर) : ना. सं. इनामदार
शिकस्त (पार्वतीबाई पेशवे) : ना. सं. इनामदार

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर पुणे : ४११० ३०